॥ श्रीविठ्ठल ॥

# गाथापंचक.

## गाथा पहिली.

# श्रीज्ञानदेवमहाराज

यांच्या

## अभंगांची गाथा.

[ श्रीनिवृत्तिनाथमहाराज, श्रीसोपानदेवमहाराज, श्रीमुक्ताई व श्रीचांगदेवमहाराज यांच्या अभंगांसह. ]

सांप्रदायिक

## ब्रह्मीभूत श्रीनानामहाराज साखरे

ज्ञानेश्वरी-भाषांतरकार

**यांच्या संग्रहांतील पुरातन हस्तलिखित वह्यांवरून पाठ दुरुस्त करून तयार केली.**

ती

## त्र्यंबक हरी आवटे

यांनीं

**अभंगांची विषयवार निवड करून**

पुणें येथील आपल्या " इंदिरा " छापखान्यांत छापून प्रसिद्ध केली.

विजयादशमी शके १८३०.

किंमत दीड रुपया.

हा ग्रंथ **त्र्यंबक हरी आवटे** यांनीं पुणें पेठ सदाशिव येथील
आपल्या ' **इंदिरा** ' छापखान्यांत छापून पुणें पेठ सदाशिव
घर नंबर १८१ येथें प्रसिद्ध केला.

सर्व हक्क प्रकाशकानें स्वाधीन ठेविले आहेत.

# श्रीनानामहाराज साखरे.



जन्मशक १७५०. समाधिशक १८२५.

॥ श्री ॥

श्रीज्ञानदेवमहाराज श्रीनामदेवमहाराज श्रीएकनाथमहाराज
श्रीतुकाराममहाराज व श्रीनिळोबामहाराज

या

ईश्वरावतार साधुपुरुषांचीं

# अमृतवचनें

म्हणजे

अखिल धर्मांचें पुनरुज्जीवन, अखिल शास्त्रांचें ज्ञानभांडार,

आणि

सकल मानवांचे धर्मनीतिव्यवहारबंधनात्मक

# गाथापंचक.

हा ग्रंथ

सांप्रदायिक

**ब्रह्मीभूत श्रीनानामहाराज साखरे**

ज्ञानेश्वरी-भाषांतरकार

यांच्या कृपाप्रसादानें तयार करून
त्यांच्याच प्रेरणेनें

**श्रीविठ्ठलस्वरूपीं**

**श्रीगुरु नानामहाराज साखरे**

यांच्या सेवेशीं

अत्यंत लीन होऊन अर्पण करितों.

त्र्यंबक हरी आवटे.

॥ श्रीविठ्ठल ॥

# गाथापंचक–प्रस्तावना.

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ १ ॥

भगवद्गीता.

धर्माची वाट मोडे । अधर्माची शीग चढे ।
तैं आह्मां येणें घडे । संसारस्थिती ॥ १ ॥
आह्मां का संसारा येणें । हरीभक्तिनामस्मरणें ।
जडजीव उद्धरणें । नामस्मरणें करुनी ॥ २ ॥
सर्व कर्म ब्रह्मस्थिती । प्रतिपादाव्या वेदोक्ती ।
हेंचि एक निश्चिती । करणें आह्मां ॥ ३ ॥
नानामतें पाषांड । कर्मठता अति बंड ।
तयाचें ठेचणें तोंड । हरीभजनें ॥ ४ ॥
विश्वरूप सृष्टी । अर्जुना दाविली दृष्टी ।
भिन्न भेदाची गोष्टी । बोलूं नये ॥ ५ ॥
एकाजनार्दनीं । धरिती भेद मनीं ।
दुऱ्हावले येथुनी । निंदक जाण ॥ ६ ॥

श्रीएकनाथ.

शास्त्रसिद्धांतानुरूप वस्तुतः सर्व जीव ब्रह्मरूप आहेत. परंतु तें अज्ञानानें मोहीत झाल्यामुळें जीवदशेस पात्र झाले आहेत. त्या अज्ञानाचे निवृत्तीवांचून जीवांना स्वस्वरूप प्राप्त होत नाहीं. अज्ञानाची निवृत्ती करण्याकरितां युगायुगांचें ठिकाणीं भगवदवतार होतात, त्यांत मच्छकूर्मादि अवतार तर प्रसिद्धच आहेत. त्याचप्रमाणें, जे जे अपरोक्षानुभवी असून शरण आलेल्या जीवांचेंही अप-

रोक्षज्ञानद्वारां अज्ञान निवृत्त करितात तेही भगवदवतारच होत, असें बृहदारण्यक श्रुति सांगते; त्याचप्रचाणें ईश्वरापेक्षांही जीवांचे कल्याण करणारे साधु हे श्रेष्ठ होत, असें भागवताचे ११ व्या स्कंधांत नारदवसुदेवसंवादामध्यें असलेलें प्रसिद्धच आहे. त्याच न्यायानें या कलियुगांत बहुत साधु होऊन गेले; त्यांमध्यें विशेष प्रसिद्ध म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीनामदेवमहाराज, श्रीएकनाथमहाराज, श्रीतुकाराममहाराज व श्रीनिळोबामहाराज हे होत. वरील साधुवर्यांचे अवतार व सर्व प्रयत्न हे, लोकांना अज्ञानापासून सोडवावें, आणि धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांचा व विशेषतः भक्तीचा मार्ग त्यांना दाखवावा, ह्या कारितांच झाले आहेत. तें काम त्यांनीं प्राकृत भाषेंत हजारों ओंव्या, अभंग, पद्यें वगैरे रचून परिपूर्ण केलें आहे; तीं वचनें प्राकृत आहेत. तथापि तीं वेदतुल्य आहेत; कारण वेदामध्यें कर्म उपासना व ज्ञान ह्यांचें जें जीवांच्या अधिकारानुरूप वर्णन आहे, त्याचें हुबेहूब चित्र ह्या प्राकृत वचनांत आलेलें आहे; ह्मणून आह्मां अज्ञजन भोळ्या भाविकांचा हा पांचवा वेद आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

असो; ह्या दुस्तर भवसागरांत मोहीत होऊन पडलेल्या जीवांना आत्मसुखशांति मिळविण्यास, व स्वधर्म आणि भक्ति यांचा मार्ग साधण्यास, सांप्रतकालीं या ईशरूपी साधुपंचकानें केलेल्या गाथापंचकरूपी अमृतवचनाचें भक्तियुक्त सेवन केल्यावांचून दुसरा मार्गच नाहीं. जीं वेदविहित अमृतवचनें प्रत्यक्ष श्रीविठ्ठलांनीं लिहिलीं असून त्यांच्याच मनोगतानुरूप साधुवाणींतून निघालेलीं आहेत, त्यांचें वर्णन करणें मानवाच्या शक्ती बाहेर आहे.—अर्थात् या वचनांचा महिमा अगाध आहे!! धन्य त्या महात्म्यांची!!!

संसाराच्या नांवें घालूनियां शून्य । वाढता हा पुण्य धर्म केला १<br>
हरिभजनें हें धवाळिलें जग । चुकविला लाग कळिकाळाचा ॥२॥<br>
कोणाही साधनांचा न लगेचि पांग । करणें केला त्याग देहबुद्धि ३<br>
तुका ह्मणे सुख समाधि हरिकथा । नेणें भवव्यथा गाईल तो ४

ज्या साधुवर्यांनीं आपल्या गुरुपरंपरागतज्ञानयुक्त अमृतवचनांच्या योगानें वारकरी सांप्रदाय चालू करून जडमूढ जनास आत्मसुखशांतिकरितां स्वधर्मयुक्त भक्तिमार्ग सुगम करून दाखविला, त्यांचे उतराई होणें ह्मणजे त्यांनीं दाखविलेल्या मार्गाचें अनुगमन करून त्यांच्या वचनांचा अनुभव आपल्या ठिकाणीं बाणून घेणें हेंच होय.

आज सुमारें ७०० वर्षें होत आलीं, वारकरी सांप्रदाय अव्याहत वाढत्या प्रमाणावर चालू आहे. तथापि बहुत काळ हीं अभंगीं वचनें हस्तलिखितच असून शिवाय तीं समग्र अशीं एके ठिकाणीं कोठेंच मिळालीं नाहींत. प्रथम श्रीतुकाराममहाराजांची गाथा कै. शंकर पांडुरंग पंडित यांनीं इंदुप्रकाशांत मोठ्या प्रयासानें छापिली. या कामास सरकारची मोठी मदत असून ही गाथा शुद्ध असल्याबद्दल अखिल हिंदुधर्मीय वारकरी सांप्रदायाचे अध्वर्यू वासकर, यांच्या मंडळींतील हरिभक्तिपरायण भाऊ काटकर, यांनीं आपली संमती दिली. यानंतर प्राकृत पांचही गाथा निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या रीतीनें प्रकाशित झाल्या. त्यांत अभंगांच्या संख्येचा कमजास्तपणा बराच दिसून येत असून एकंदर पांच गाथांस १५ रुपयांपासून १७ रुपयांपर्यंत किंमत पडते.

तथापि, ह्या गाथा मुद्रित झाल्यामुळें त्यांजपासून लोकांस मोठा उपयोग झाला, ही गोष्ट कबूल केली पाहिजे. पण सर्वसाधारण लोकांस यांचा उपयोग होण्याचे बाबतींत किंमतीच्या संबंधानें येणारी अडचण दूर व्हावी व आपल्या शक्त्यनुरूप होतां होईल तों मूळप्रतीस धरून आणि विषयवारी जितकी विशद करितां येईल तितकी करून ह्या पांचही गाथा एका धर्तीवर छापून लोकांपुढें ठेवाव्या, या हेतूनें आम्ही हा प्रयत्न करण्याचें धाडस केलें आहे.

हें गाथापंचक, विषयवार निवड करून प्रकाशित करण्याची स्फूर्ती ज्या श्रीगुरू नानामहाराज साखरे यांच्या कृपाप्रसादानें झाली, त्यांच्या सांप्रदाय परंपरेचा वृत्तांत थोडक्यांत येथें देणें इष्ट वाटल्यावरून तो खालीं दिला आहे.

सुमारें १५० वर्षांपूर्वी श्रीज्ञानेश्वरमहाराज ह्यांचे कृपेस पुणें येथील केसकर ह्यांचे वंशांतील श्रीअच्युतमहाराज नांवाचे पुरुष पात्र झाले. जन्मांतरींच्या बहुत पुण्याईनें ह्या भाग्यवान पुरुषास अशी इच्छा झाली कीं, श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं आपलेवर कृपा करून ज्ञानेश्वरी ग्रंथ समजून द्यावा ! ही इच्छा पूर्ण व्हावी ह्मणून त्या थोर पुरुषानें श्रीक्षेत्र आळंदी येथें उपोषित राहून महाराजांचे समाधीपुढें ज्ञानेश्वरीचें पारायण करण्यास आरंभ करून असा निश्चय केला कीं, ज्या दिवशीं महाराजांचा अनुग्रह होईल, त्याच दिवशीं महाराजांस नैवेद्य समर्पण करून पारणा करावयाची; नाहींपेक्षां अनुष्ठान करीत करीत प्राणत्याग करावयाचा ! निश्चयाचें बळ । तुका ह्मणे तेंचि फळ ! ॥ श्रीअच्युतमहाराज ह्यांचा हा तीव्र निश्चय पाहून २७ वे दिवशीं रात्रीं ज्ञानेश्वरमहाराजांनीं स्वप्नामध्यें दर्शन देऊन मस्तकावर वरदहस्त ठेविला आणि सांगितलें कीं, आजपासून तूं जो ज्ञानेश्वरीचा अर्थ सांगशील तोच बरोबर असेल. अशा रीतीनें श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे कृपेस पात्र झालेले श्रीअच्युतमहाराज परमानंदाचा अनुभव घेत घेत शेवटीं परमानंदरूप झाले. त्यांस एक कनिष्ठ बंधु शामराजमहाराज ह्मणून होते, त्यांजवर त्यांनीं अनुग्रह केला. असा जीवनमुक्तिसुखाचा अनुभव घेत असतां अनंत जीवांवर त्यांनीं अनुग्रह केला. त्यांतच पुणें येथील राहणारे चिमाजीआप्पा ( पेशव्यांचे बंधु ) यांचे खासगी कारभारी रामचंद्रपंत जोशी यांजवरही त्यांनीं अनुग्रह केला, तो प्रकार असा:—

एके दिवशीं रात्रीं रामचंद्रपंत घोड्यावर बसून हिंडावयास निघाले असतां, येथील बुधवारांतील पासोड्या मारुतीचे देवळांत श्रीअच्युतमहाराज यांचें कीर्तन चालू होतें, तेथें क्षणभर उभे राहिले. श्रीअच्युतमहाराज यांची ज्ञानपूर्वक भक्ति, व निष्कपट वैराग्य पाहून, आणि अप्रतिम वक्तृत्व ऐकून दैवयोगानें त्यांस उपरति झाली. त्यांचे जवळ २१ लाख रुपये रोख होते. पोटीं पुत्रसंतान वगैरे कांहीं नव्हतें. अशा स्थितींत

त्यांची अशी खात्री झाली कीं, ह्यांचेशिवाय आपलें संसारदुःख कोणी निवारण करणार नाहीं. ते दुसरे दिवशीं सकाळींच येथील सदाशिव पेठेंतील हौदापलीकडे श्रीअच्युतमहाराज यांजकडे गेले, आणि हात जोडून ह्मणाले कीं माझेवर अनुग्रह व्हावा, मी आपला शिष्य असून आपणास शरण आलों आहें. तेव्हां अच्युतमहाराजांनीं सांगितलें कीं, "बाबा, तूं श्रीमंत आहेस, आम्ही गरीब आहों, अशा स्थितींत तुझें व आमचें जमावें कसें? परमार्थाला द्रव्य फार प्रतिबंधक आहे!" असें श्रीअच्युतमहाराजांचे मुखांतील वाक्य श्रवण करितांच त्यांनीं लागलींच २१ लाख रुपयांवर त्यांचे समक्ष उदक सोडलें, आणि बुधवारांतून मोरोबादादांचे हौदाचें पाणी आपल्या खांद्यावर कावडीनें त्यांचें येथें भरलें. तेव्हां, श्रीअच्युतमहाराज यांचें अंतःकरण सुप्रसन्न होऊन त्यांनीं त्यांस उपदेश देऊन त्यांचेकडून श्रीज्ञानेश्वरी ग्रंथ अध्ययन करविला. तसेंच २१ लाख रुपये ब्राह्मणभोजनांत खर्च कर ह्मणून सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं ब्राह्मणभोजनांत त्या द्रव्याचा व्यय केला. हें ब्राह्मणभोजन करतेवेळीं पुणें येथें व श्रीक्षेत्र आळंदी येथें अशी स्थिति झाली कीं, गांवांत व्यापाऱ्यांचे दुकानांत तूप व साखर मिळेनाशी झाली. तेव्हांपासून लोकांत त्यांचें नांव **साखरेबोवा** असें पडलें. साखरेबोवा हे पुणें येथें शनवारांतील मारुतीचे देवळासमोर आंग्रे यांचा वाडा आहे तेथें राहत असत. त्यांनीं गोपालकृष्णाची मूर्ति व श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पादुका यांची स्थापना ज्येष्ठ शु० १३ रोजीं केली. ते असतांना वाढदिवसाचा उत्साह ज्येष्ठ शुद्ध १३ पासून १५ पावेतों तीन दिवस करीत, तसेंच श्रावणमासांत श्रावण वद्य १ पासून वद्य १० पावेतों गोकुळअष्टमीचा मोठा उत्साह करीत असत. पुढें पुण्यांतील त्यांचे भाऊबंदांपैकीं गोविंदपंत जोशी यांचे चार पुत्र केशवराव, हरीपंततात्या, विनायकराव व पंढरीनाथआबा ( हे जन्मभर ब्रह्मचारी होते. ) हे चौघेही त्यांचे शिष्य झाले. ह्या चौघांची गृहस्थिति फार गरीबीची होती, तथापि

त्यांची साखरेबोवांच्या ठिकाणीं असलेली गुरुभक्ति मोठी अप्रतिम होती. ज्या वेळीं साखरेबोवांच्या मनांत संन्यास करावयाचें आलें, त्या वेळीं हें संस्थान काणाचे स्वाधीन करावें असा प्रश्न सहजच त्यांच्या व त्यांचे हजार बाराशें शिष्य होते त्यांच्या मनांत आला. त्या मंडळींत श्रीमान् लोक बरेच होते, त्यांनीं त्यांचेजवळ संस्थान आमचेकडे द्यावें ह्मणून प्रार्थना केली, परंतु आह्मी सर्वांचे ह्मणण्याचा विचार करून काय करावयाचें तें करूं असें ते सांगत असत. शेवटीं त्यांनीं सर्वांस बोलावून असें सांगितलें कीं, जरी आमचेजवळ श्रीमान् लोकांनीं देवस्थानची मागणी केली, तरी आमचे मनोगताप्रमाणें देवस्थान चालविण्याचें हरीपंततात्या व पंढरीनाथआबा ह्यांचेशिवाय दुसऱ्याचे हातून होणार नाहीं; जरी ते गरीब आहेत, तरी भगवद्भक्ति म्हणजे काय हें त्यांसच माहीत आहे. असें सर्वांसमक्ष सांगून देवस्थान त्यांचे स्वाधीन केलें. तेव्हांपासून ह्या जोशांचे घराण्यास साखरे असें नांव पडलें, तें अद्याप चालू आहे. पुढें ते संन्यस्त झाले त्या वेळीं त्या आश्रमांतील त्यांचें नांव **ब्रह्मानंदस्वामी** असें होतें.

ते पुणें येथें समाधिस्त झाले, तेव्हां त्यांचे पट्टशिष्य जे चौघे, जोशी त्यांनीं त्यांचे इच्छेप्रमाणें व निष्ठेप्रमाणें त्यांची समाधि श्रीक्षेत्र आळंदी येथें सिद्धबेटांत त्यांस पुण्याहून नेऊन दिली व पुढें ते त्यांची पुण्यतीथि करूं लागले. ह्या बंधुचतुष्टयाची आपले गुरूंवर इतकी श्रद्धा असे कीं, आपले गुरु ज्या ठिकाणीं रहात असत त्या ठिकाणचा कोणी गडी, मोलकरीण, माणूस, कारकून कोणीही त्यांचेकडे येवो, हे सर्व बंधु त्यांस वंदन करीत असत. इतकेंच नव्हे तर, साखरेबोवा समाधिस्त झाल्यास सुमारें १०० वर्षें झालीं व त्यांचे संस्थानचा उत्साह अद्याप श्रीनानामहाराज जोशी साखरे ह्यांचे वंशाकडे चालू आहे, तरीही पण आंग्रे ह्यांच्या वाड्यांतील जानवी काढण्यास बसणारे तेलंगी ह्यांना पंढरीनाथमहाराजांनां व्याही असें नांव दिलें. त्याप्रमाणें श्रावणमासाचा उत्साह सुरू झाला कीं,

पहिले दिवशीं त्यांना भोजनास निमंत्रण करावयाचें ही गोष्ट अद्याप पावेतों साखरे यांचे घरीं चालू आहे. जोशी बंधुचतुष्टय यांचा "देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो ।। अन्न आच्छादन । हें तों प्रारब्धाआधीन" इत्यादि वचनांवर पूर्ण निश्चय असल्यामुळें उपजीविकेच्या साधनांत कोणीच प्रवृत्त झालें नाहीं. त्या चौघांपैकीं हरीपंततात्यांस तीन पुत्र व चार कन्या असा परिवार होता. तथापि ते प्रपंचाकडे कधीं ढुंकून देखील बघत नसत. उपरामस्थितींत ते नेहमीं असत. कोणी अंतरंगी पुरुष आलाच तर त्याच्यांशीं अध्यात्मज्ञानाचीच गोष्ट बोलावयाची, ह्यामुळें त्यांचे ठिकाणीं सर्व बंधूंची गुरुबुद्धि असे. त्यांच्या परिवाराचे संगोपनाची खटपट आपण स्वतः ब्रह्मचारी असतां खुद्द पंढरीनाथआबाच करीत असत. हीं मुलें लहान असतांच हरीपंततात्या हे वारले. पुढें पंढरीनाथआबा यांनीं ह्या मुलांचा सांभाळ करून, गुरूकडून भाग्यानें प्राप्त झालेलें श्रीगोपालकृष्णाचें संस्थान व गुरूंची कार्तिक शुद्ध ९ ची साखरेबोवांची पुण्यातिथि हीं कृत्यें ते त्यांचे हातून करवूं लागले, त्याचप्रमाणें श्रीज्ञानेश्वरी व अमृतानुभव ह्या ग्रंथांचेंही त्यांनीं त्यांचेकडून अध्ययन करविलें. श्रीहरीपंततात्यांचे मुलांपैकीं रामभाऊ व नाना हेच कायते अध्ययन करण्याचे वयांत होते; आणि ते त्यांचे शिष्य होते. तिसरे दामूअण्णा हे त्या वेळीं लहान होते. त्यांपैकीं पंढरीनाथमहाराजांचे मनाप्रमाणें श्रीज्ञानेश्वरीचें अध्ययन **श्रीनानामहाराज** ह्यांनीं केलें. साखरेबोवांचे देवस्थानचे संबंधानें गुरुवारीं व एकादशीस रात्रौ जागर व पहांटेस पंचपदी व रोज नित्य पंचपदी असा क्रम आहे; जागरास साखरेबोवांचे शिष्य व पुढें जोशी ह्यांचे झालेले शिष्य येत असत, त्यांचे पुढें पंढरीनाथ महाराजांनीं **श्रीनानामहाराज** ह्यांचेकडून ज्ञानेश्वरी सांगवावी; अशा रीतीनें **श्रीनानामहाराज** ह्यांचा सुमारें दहा बारा वर्षें श्रीज्ञानेश्वरी ग्रंथावर असा कांहीं अभ्यास झाला कीं, सर्व ज्ञानेश्वरी ग्रंथ त्यांस मुखोद्गत झाला. ते स्वप्नांत जरी बरळले तरी ज्ञानेश्वरीच्या ओंवींचा अर्थच बरळत, इतकी त्यांची त्या ग्रंथांत

तयारी झाली. गुरुकृपेनें त्यांचे वक्तृत्वास इतका कांहीं मोहकपणा आला होता कीं, कोणीही सहज जरी श्रीनानामहाराजाचे मुखांतून ज्ञानेश्वरीच्या चार ओंव्या ऐकिल्या तरी त्याची चित्तवृत्ति रंगून गेल्याशिवाय रहात नसे. ह्या अप्रतिम गुणामुळें, वडील व चुलतें वारल्यानंतर ह्या संस्थानचे पारमार्थिक कृत्याचा सर्व भार **श्रीनानामहाराजांवरच** पडला. पूर्वीं वडिलांनीं कीर्ति संपादन केली होतीच. त्यांतही **श्रीनानामहाराजांचे** अंगचे गुणानें तीं सर्व कृत्यें मोठया व्यवस्थेनें चालली. **श्रीनानामहाराज** यांनीं आपलें सर्व आयुष्य श्रीज्ञानेश्वरीचे अध्ययनांत व अध्यापनांत घालविलें. कोणी कोणत्याही वेळीं कोणतेही जातीचा कोणच्याही अधिकाराचा मनुष्य त्यांच्याकडे जावो, त्याला आतां मी सांगत नाहीं असें त्यांनीं कधींही कोणास ह्मटलें नाहीं. ते असत तोंपावेतों त्यांचे घरीं रोज ज्ञानेश्वरीचा पाठ चालत असे; आणि तोच गुरुपरंपरेचा क्रम त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव **विनायकबोवा** हेही आज चालवीत आहेत. **श्रीनानामहाराजांनीं** ज्ञानेश्वरीचा मराठींत सरळ अर्थ केलेली ' सान्वय व सार्थ भगवद्गीतेसह सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी ' आह्मी पूर्वी प्रकाशित केलीच आहे. **श्रीनानामहाराज** ह्यांनीं शके १८२५ चे चैत्र शुद्ध ९ स चतुर्थाश्रम घेतला; आणि पुढें सुमारें सहा महिन्यांनीं म्हणजे शके १८२५ भाद्रपद वद्य १० रोजीं ते समाधिस्थ झाले.

श्रीगुरु ब्रह्मीभूत नानामहाराज साखरे यांच्या कृपाप्रसादानें हा ग्रंथ विषयवार निवड होऊन व त्यांच्याच घराण्यांतील वह्यांवरून पाठ शुद्ध करण्यास सांपडून आणि अधीक सांपडलेले अभंग त्यांत मिळविण्यांत येऊन प्रकाशित झाला, ह्याबद्दल त्यांचे चरणीं लीन होऊन साष्टांग प्रणिपात करितों. श्रीनानामहाराजांचे परम योग्य चिरंजीव हरिभक्तिपरायण विनायकबोवा साखरे यांनीं वेळोवेळीं विषयवारीसंबंधानें कठीण स्थलीं समजूत केली याबद्दल त्यांचा मी मोठा ऋणी आहे. माझे मित्र गंगाधर रावजी खैरे यांनींही याकामीं मला विशेष साह्य केलें, याबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक आभार

मानतों. शिवाय ज्या मंडळींनीं निरपेक्षबुद्धीनें मला लोकोपकारार्थ हस्तलिखित वह्या दिल्या व अनेक प्रकारच्या उपयुक्त सूचना केल्या त्या मंडळींचाही मी फार आभारी आहें.

शेवटीं,—

**करविली तैशी केली कटकट । वांकडी कीं नीट देव जाणे ॥१॥**
**कोणा कारणें हें जालेंसे निर्माण । देवाचें कारण देव जाणे ॥२॥**
**तुका ह्मणे मी या अभिमाना वेगळा । घालूनि गोपाळा भार असे ३**

एवढेंच जिज्ञासु, सहृदय व निष्ठावंत वाचकांस हात जोडून सांगून परमपूज्य श्रीगुरु नानामहाराज यांच्या चरणीं मस्तक ठेवून ही अल्प प्रस्तावना पुरी करितों.

विजयादशमी
शके १८३०. } **त्र्यंबक हरी आवटे.**

॥ श्रीज्ञानदेव ॥

# प्रस्तावना.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें मूळ वडिलार्जित गांव नेवाशाजवळ आपे-गांव म्हणून खेडें आहे तें होय. यांच्या वडिलांचें नांव विठ्ठलपंत व आईचें नांव रखुमाबाई. विठ्ठलपंताचे वडील गोविंदपंत हे आपेगांवचे कुळकर्णी, त्यांच्या पत्नीचे नांव निराबाई. ह्या सुशील दंपत्यास विठ्ठलपंत हेच कायते एकुलतें एक पुत्ररत्न होतें. ह्यामुळें त्यांजवर त्यांची फार प्रीति असे. दृष्टीवेगळें त्यांस कधींही करूं नये असा त्यांचा नेम होता. विठ्ठलपंताची ईश्वरावर फार निष्ठा असे. त्यांनीं मातापितरांची तीर्थयात्रा करण्यास परवानगी मागितली. मातापितरांची आज्ञा घेऊन ते तीर्थयात्रा करीत करीत आळंदी येथें आले. आळंदी येथें शिदोपंत नांवाचे यजुर्वेदी ब्राह्मण मोठे सधन आणि भगवद्भक्त राहात होते. त्यांस रखुमाबाई नांवाची एक कन्या होती ती मोठी सद्गुणी व सुलक्षणी होती. तिला योग्य वर मिळेना या काळजींत ते होते. विठ्ठलपंत स्नान करून इंद्रायणीचे तीरीं पोथी वाचीत बसले असतां शिदोपंत तेथें आले, विठ्ठलपंताची ती निष्ठा पाहून त्यांनीं त्यांस घरीं येण्याविषयीं अतिशय आग्रह केला, त्यावरून विठ्ठलपंत त्यांच्या घरीं गेले. तेथें त्यांचा मुक्काम पडला. त्याच रात्रीं शिदोपंत निद्रिस्त असतां पंढरीनाथानें प्रगट होऊन सांगितलें कीं, आलेल्या पाहुण्यास आपली मुलगी सालंकृत कन्यादान करून द्यावी. दुसरे दिवशीं विठ्ठलपंत निद्रिस्त असतां श्रीपांडुरंग येऊन विठ्ठलपंतास ह्मणाले कीं, तूं शिदोपंताची मुलगी रुक्माबाई इजशीं विवाह कर. इच्या पोटीं तीन पुत्र व एक कन्या फारच सद्गुणी सद्भक्तशिरोमणी होतील. पुढें उभय-तांनीं झालेला दृष्टांत एकमेकांस सांगितला आणि लागलीच ज्योति-षाकडून ज्योतिष वर्तवून पाहिलें तों छत्तीस गुण उतरले; मग

लग्नसाहित्याची तयारी होऊन ज्येष्ठमासीं लग्नसोहळा चार दिवस मोठ्या थाटानें करून विठ्ठलपतानें रखुमाबाईचें पाणिग्रहण केलें.

विठ्ठलपंत गीता वाचीत असतां संन्यास घ्यावा असें त्यांच्या मनांत आल्यावरून त्यांनीं आपल्या पत्नी रखुमाबाई यांची आज्ञा मागितली. त्यावरून रखुमाबाईनें आपल्या वडिलास सांगितलें. " रखुमाई म्हणे ऐकतां जी ताता । संन्यास घ्यावा आतां म्हणताती ॥१॥ संततीवांचुनी न घ्यावा संन्यास । ऐशी सांगा त्यांस शास्त्रनीति ॥२॥ " हें मुलीचें अर्थपरिप्लुत भाषण ऐकतांच मुलीच्या शहाणपणाचें अतिशय कौतुक वाटून विठ्ठलपंताच्या होणाऱ्या कृतीविषयीं फार खेद वाटला. एके दिवशीं विठ्ठलपंतानें पुनः रखुमाबाईस संन्यासग्रहणाविषयीं परवानगी मागितली त्यावरून रखुमाबाईनें रागानें जा ह्मणून सांगितलें. मग काय, त्याच वेळेस रात्रसमय मनांत न आणतां घरांतून बाहेर पडून आळंदी सोडून उत्तरेचा मार्ग धरिला. विठ्ठलपंत काशीस पोंचल्यावर दुसऱ्या दिवशीं भागीरथीचें स्नान करून श्रीपादयतीश्वर स्वामीकडून संन्यासाश्रमाचा उपदेश घेतला. आणि चैतन्य नामाभिधान पावून श्रीपादस्वामींच्या मठांत आनंदवृत्तीनें राहिले.

कांहीं कालानें श्रीपादस्वामी श्रीसेतुबंधरामेश्वरास जाण्याकारितां काशीहून निघाले, ते आळंदी येथें येऊन अश्वत्थानजीक उतरले. नित्यनेमाप्रमाणें रखुमाबाई अश्वत्थाची पूजा करून प्रदक्षिणा वगैरे आटोपून घरीं जाणार, तों श्रीपादयतीश्वरास पाहून रखुमाबाईनें त्यांचे चरणीं प्रेमभावानें नमस्कार केला; तोंच यतींनीं " अष्टपुत्रा सौभाग्यवती भव " असा आशिर्वाद दिला. त्यावरून श्रीपादस्वामींनीं शिदोपंत, रखुमाबाई इत्यादि मंडळींस काशीस नेऊन चैतन्यास संतापानें म्हटलें, त्वां आश्रम घेण्याचे वेळेस 'मला स्त्री नाहीं ' ह्मणून सांगितलेंस तें खरें काय ? हें ऐकतांच चैतन्याची बोबडी वळली, व चेहरा उतरला. पुढें चैतन्यानें स्वामींचे पाय धरून पूर्वीची सर्व स्थिति सांगितली. नंतर श्रीपादस्वामींनीं विठ्ठलपंतास सांगितलें कीं, त्वां ही तुझी स्त्री रुक्माबाई इचा आंगिकार करावा व सुखेनैव संसार करून परमार्थ साधावा. अविधि कर्माचें भय मनांत

तिलप्राय धरूं नये. तुजवर परमेश्वराची पूर्ण कृपा होईल. विठ्ठलपंतांनीं गुर्वाज्ञेवर पूर्ण श्रद्धा ठेवून कांहींएक मनांत न आणतां गीता भागवतादि पारमार्थिक ग्रंथाचें अवलोकन आरंभून निरंतर भगवन्नामाचें चिंतन करीत आनंदात गृहस्थाश्रमांत काल क्रमूं लागले. याप्रकारें सतत बारा वर्षें सारखा क्रम ठेविला.

नंतर कांहीं दिवसांनीं रखुमाईच्या उदरीं शके ११९० सालीं श्रीनिवृत्तिनाथ अवतरले. हे शंकराचे अंश असून उपजत ज्ञानी होते. श्रीनिवृत्तीनाथाचें वय दोन वर्षांचें झाल्यावर शके ११९३ सालीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा अवतार झाला, हे प्रत्यक्ष विष्णूचे अवतार होत; हे शुकाचार्यासारखे उपजत ज्ञानी असून जडमूढांचा उद्धार करण्याकरितां अवतरले. शके ११९६ सालीं रखुमाईस तिसरें पुत्ररत्न झालें. त्याचें नांव विठ्ठलपंतांनीं सोपान असें ठेविलें. हे ब्रह्मदेवाचें अंश असून उपजत ज्ञानीच होते. शके ११९९ सालीं मुलगी झाली तिचें नांव मुक्ताई ठेविलें. ह्याही पण ज्ञानानंदांत निमग्नच होत्या.

हीं चारी भावंडें केवळ ईश्वरांश असून जगाच्या उद्धारार्थ अवतीर्ण झालीं. पुढें तीं क्रमानें वाढून १६।१२।१०।८ या वयाचीं होत आलीं. परंतु वाळींत असल्यामुळें त्यांच्या मौजीबंधनास आळंदींतील ब्रह्मवृंदांनीं अडथळा केला. त्यामुळें विठ्ठलपंतास फार वाईट वाटलें. त्या आवेशाच्या भरांत ते आळंदीहून निघाले व प्रयाग येथें जाऊन त्रिवेणींत देहार्पण करून मुक्त झाले. हें रखुमाबाईस कळतांच तिनेंही त्यांच्याप्रमाणेंच आपला देह त्रिवेणींत टाकला व पतीच्या भेटीस गेली. याप्रमाणें विठ्ठल-रखुमाईचा शेवट झाला.

ज्ञानेश्वरादि चारी भावंडें जातींत घेण्याविषयीं आळंदींत ब्रह्मवृंदाच्या मागें लागलींच होतीं. त्यांनीं त्यांस सांगितलें कीं, तुम्ही पैठणास जाऊन शुद्धिपत्र आणावें म्हणजे आम्ही तुम्हांस जातींत घेऊं. त्याप्रमाणें तेथील ब्रह्मवृंदाचें पत्र घेऊन पैठणास जाण्याकरितां निघाले. प्रथम ते निवृत्तिमहाराजांच्या म्हणण्यावरून त्र्यंबकेश्वरीं गेले. तेथें निवृत्तिमहाराजांस गयनीनाथांनीं अनुग्रह केला. ती गुरुपरंपरा निवृत्तिनाथांनीं खालील अभंगांत वर्णन केली आहे.

आदिनाथ उमा बीज प्रगटलें । मच्छिंद्रा लाधलें सहजस्थिती १
तेचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली । पूर्ण कृपा केली गयनीनाथा २
वैराग्यें तापला सप्रेमें निवाला । ठेवा जो लाधला शांतिसुख ३
निर्द्वंद्व निःसंग विचरतां मही । सुखानंद हृदयीं स्थिर जाला ४
विरक्तीचें पात्र अन्वयाचें मुख । देउनि सम्यक् अनन्यता ५
निवृत्ती गयनी कृपा केली पूर्ण । कूळ हें पावन कृष्णनामें ६

हें पाहून ज्ञानेश्वर सोपान व मुक्ताबाई या त्रिवर्गांनीं निवृत्ति-महाराजांचे पाय धरिले, त्यावरून श्रीनिवृत्तिनाथांनीं श्रीज्ञानदेव-महाराजांवर अनुग्रह केला. त्याबद्दल श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं खालील अभंगांत आपल्या गुरुपरंपरेचा उल्लेख केला आहे.

आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा । मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य १
मच्छिंद्रानें बोध गोरक्षासी केला । गोरक्ष ओळला गयनीप्रती २
गयनीप्रसादें निवृत्ती दातार । ज्ञानदेवा सार चोजविलें ३

यापुढें निवृत्तिनाथाचें बंधूचें नातें सुटून गुरुशिष्याचें नातें झालें. पुढें श्रीज्ञानदेवमहाराजांनीं श्रीसोपानदेव व श्रीमुक्ताबाई यांजवर अनुग्रह केला. नंतर ते नाशिक, पुणतांबें या गांवांवरून पैठणास येऊन मुख्य धर्माधिकारी व शिष्टजन यांची गांठ घेऊन सभा करून आम्हांस शुद्ध करावें म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं त्यांची प्रार्थना केली. पैठणकरांनीं परमेश्वराची अनन्यभावानें भक्ति करून सर्व भूतांच्या ठायीं समानता ठेवून तीव्र अनुताप पोटीं धरून भगवद्भजन करा, ह्याप्रमाणें वर्तन केल्यानें तुम्ही शुद्ध व्हाल. असें सांगून शुद्धिपत्र दिलें.

पैठणाहून शुद्धिपत्र मिळवून ते नेवाशास आले. येथेंच श्रीज्ञानेश्वर-महाराजांनीं भगवद्गीतेवर भावार्थदीपिका अथवा आई ज्ञानेश्वरी या नांवाची टीका केली. ती सच्चिदानंदबावांनीं लिहिली. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं ती टीका श्रीगुरु निवृत्तिनाथापुढें ठेविली. ती पहातांच त्यांस फार कौतुक वाटलें व त्यांनीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांची धन्यता

वाखाणिली. आणि म्हटलें; या शिवाय मुकुंदराजांनीं केलेल्या विवेकसिंधूप्रमाणें स्वानुभव विषयक एखादा ग्रंथ केल्यास विशेष होईल. त्यावरून त्यांनीं अमृतानुभव ग्रंथ केला व अभंगही केले. श्रीविठ्ठलाचा आवडता भक्त श्रीनामदेव यांजला श्रीविठ्ठलाच्या परवानगीनें श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं बरोबर घेऊन तीर्थयात्रा केली. त्यांनीं तो सर्वकाल अध्यात्मविषयांच्या चर्चेत घालविला.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांस २२ वें वर्ष लागलें तेव्हां त्यांस समाधि घ्यावी असें वाटलें. त्यावरून श्रीविठ्ठलाची परवानगी मागण्याकरितां ते पंढरपूर येथें गेले व आपले मनोगत श्रीविठ्ठलास कळविलें. श्रीविठ्ठलांनीं श्रीज्ञानदेवमहाराजांस आळंदी येथें समाधी घ्यावी अशी आज्ञा करून श्रीविठ्ठलांनीं श्रीनामदेवादि सकल संतासह स्वतः आळंदीस येऊन शके १२१५ कार्तिक वद्य १३ त्रयोदशीस मोठ्या आनंदसोहळ्यानें श्रीज्ञानदेवास समाधि दिली. श्रीसोपानदेवमहाराजांस त्यांच्या वयाच्या एकोणिसाव्यावर्षीं म्हणजे शके १२१५ मार्गशीर्ष वद्य १२ द्वादशीस सासवड मुक्कामीं समाधि दिली. चांगदेवमहाराजांस पुणतांबें येथें शके १२१५ माघ वद्य १३ त्रयोदशीस समाधी दिली. शके १२१६ चैत्र वद्य द्वादशीस मुक्ताबाईस समाधि देण्यांत येत असतां एकाएकी विजेसारखा आवाज होऊन त्या नाहींशा झाल्या. श्रीनिवृत्तीनाथास त्यांच्या वयाच्या २६ वे वर्षीं म्हणजे शके १२१६ ज्येष्ठ वद्य त्रयोदशीस समाधि दिली. याप्रमाणें समाधि सोहळा आटोपला.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या अमृतवचनानें अखिल जगावर उपकार केला. वेदश्रुतीचें गुह्यज्ञान जडमूढजनांस समजण्यास यांनींच मार्ग दाखविला. श्रीनिवृत्तिमहाराज, श्रीसोपानदेवमहाराज, श्रीमुक्ताबाई व श्रीचांगदेव यांचींहीं अमृतवचनें फार उत्तम आहेत तीं या गाथ्यांत दिलींच आहेत.

विजयादशमी
शके १८३०.

त्र्यंबक हरी आवटे.

# विषयानुक्रमणिका.

## श्रीनिवृत्तिनाथमहाराज.


| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| श्रीहरीच्या सगुणनिर्गुण स्वरूपाचें वर्णन. ... ... | १ |
| सद्गुरुप्रसादानें प्राप्त झालेल्या स्थितीचें वर्णन. ... | २१ |
| पंढरीमाहात्म्य. ... ... ... ... | ३३ |
| पंढरींतील काला. ... ... ... ... | ३६ |
| नामसंकीर्तनमाहात्म्य. ... ... ... | ३९ |
| संतमहिमा. ... ... ... ... | ४६ |
| उपदेश—जन व मुमुक्षु यांस उपदेश. ... ... | ४८ |
| ज्ञान. ... ... ... ... ... | ५४ |


## श्रीज्ञानदेवमहाराज.


| | |
| --- | --- |
| श्रीहरीच्या सगुण-निर्गुण स्वरूपाचें वर्णन. ... ... | ५९ |
| श्रीपंढरीमाहात्म्य. ... ... ... ... | ७३ |
| बुद्धिरूपी सखीशीं संवाद. ... ... ... | ७९ |
| श्रीनिवृत्ति व श्रीज्ञानदेव यांचा संवाद. ... ... | ८२ |
| सद्गुरु श्रीनिवृत्तीनाथप्रसादानें प्राप्त झालेली स्थिती. ... | ९० |
| श्रीविठ्ठलप्रसादानें प्राप्त झालेली स्थिति. ... ... | ९७ |
| एकविध. ... ... ... ... | १०३ |
| उपासना. ... ... ... ... | १०४ |
| संतमहिमा. ... ... ... ... | १०६ |
| नामसंकीर्तनमाहात्म्य. ... ... ... | १०९ |
| नाममाला. ... ... ... ... | ११४ |
| देवापाशीं प्रेमाचें भाषण. ... ... ... | १२४ |

| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| करुणा. ... ... ... ... | १३८ |
| देवापाशीं मागणें. ... ... ... ... | १३९ |
| ज्ञान-स्वस्थितिसंबंधानें उद्गार. ... ... ... | १४३ |
| उपदेश–वेषधाऱ्यांस उपदेश. ... ... ... | १६२ |
| संसारतापानें तप्त झालेले प्राणी बाह्य वेषधारी साधूंचा आश्रय करितात त्याचा परिणाम. ... ... | १६३ |
| खऱ्या त्यागाचें वर्म न कळतां बाह्य गृहादि त्यागयास उपदेश. ... ... ... ... | १६४ |
| मनास उपदेश. ... ... ... ... | १६६ |
| जनास उपदेश. ... ... ... ... | १६७ |
| मुमुक्षूंस उपदेश. ... ... ... ... | १८४ |
| बालक्रीडा. ... ... ... ... ... | १९५ |
| रूपकें. ... ... ... ... ... | २०२ |
| मदालसा. ... ... ... ... ... | २४१ |
| ॐकार अक्षर. ... ... ... ... | २५३ |
| हरिपाठ. ... ... ... ... ... | २५९ |
| अभंगमाला—योग ... ... ... ... | २६४ |
| अद्वैत. ... ... ... ... ... | २८१ |
| गीतामाहात्म्य. ... ... ... ... | २९९ |
| गुरु. ... ... ... ... ... | २९९ |
| संत. ... ... ... ... ... | ३०० |
| स्वस्वरूपस्थिति. ... ... ... ... | ३०२ |
| कर्मविधिनिषेध. ... ... ... ... | ३०३ |
| नामग्रहण ... ... ... ... | ३०५ |

## श्रीसोपानदेवमहाराज.

| | |
| --- | --- |
| पंढरीमाहात्म्य. ... ... ... ... | ३०७ |
| पंढरींतील काला. ... ... ... ... | ३०७ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| नाममहिमा. ... ... ... ... | ३०७ |
| आपल्या स्थितीसंबंधानें देवाशीं उद्गार. ... ... | ३०९ |
| आपल्या स्थितीसंबंधानें जनाशीं उद्गार. ... ... | ३१० |
| निवृत्तिनाथप्रसादानें प्राप्त झालेली स्थिति. ... ... | ३११ |
| उपदेश. ... ... ... ... ... | ३१३ |
| ज्ञान. ... ... ... ... ... | ३१३ |
| घोंगडी. ... ... ... ... ... | ३१५ |

## श्रीमुक्ताई.

| | |
|---|---|
| पंढरीमाहात्म्य. ... ... ... ... | ३१७ |
| नाम. ... ... ... ... ... | ३१७ |
| संत. ... ... ... ... ... | ३१९ |
| आपल्या स्थितीसंबंधानें जनाशीं उद्गार. ... ... | ३१९ |
| सद्गुरुप्रसादानें प्राप्त झालेल्या स्थितीचें वर्णन. ... | ३२० |
| उपदेश. ... ... ... ... ... | ३२० |
| ज्ञान. ... ... ... ... ... | ३२२ |
| कूट. ... ... ... ... ... | ३२४ |

## श्रीचांगदेवमहाराज.

| | |
|---|---|
| मुक्ताई व चांगदेव यांचा संवाद. ... ... | ३२५ |
| ज्ञानोपदेश. ... ... ... ... ... | ३२८ |
| कूट. ... ... ... ... ... | ३३३ |
| अंबुला. ... ... ... ... ... | ३३५ |
| घोंगडी. ... ... ... ... ... | ३३५ |

॥ श्रीविठ्ठल ॥

# श्रीनिवृत्तिनाथमहाराज.

## श्रीहरीच्या सगुण-निर्गुण स्वरूपाचें वर्णन.

१. **जेथुनि उद्गारु प्रसवे ॐकारु** । तोचि हा श्रीधरु गोकुळीं वसे ॥१॥ जनकु हा जगाचा जीवलगु साचा । तो हरि आमुचा नंदाघरीं ॥२॥ नमाये वैकुठीं योगियांचे भेटी । पाहतां ज्ञानदृष्टी नये हातां ॥३॥ निवृत्ति ह्मणे देवो ह्मणविता हे रावो । तो सुखानुभवो यादवांसी ॥४॥

२. **वैभव विलास नेणोनि सायास** । कल्पनेची आस नाहीं जेथें ॥१॥ तें रूप दुर्लभ कृष्णमूर्तिठसा । वोतल्या दशदिशा नंदाघरीं ॥२॥ योगियाचें ध्यान मनाचें उन्मन । भक्तांचें जीवन गाई चारी ॥३॥ निवृत्ति साकार ब्रह्मींचा प्रकार । ॐतत्सदाकार कृष्णलीला ॥ ४ ॥

३. **उपजे तें मरे मरे तें तें झुरे** । जन्म येरझारे एकरूपें ॥ १ ॥ तें हें कृष्णनाम गोपिसंगें मेळे । नंदाघरीं सोहळे बाळक्रीडा ॥ २ ॥ अमर अमरे अमरकंद खरें । होउनि गोजिरें दूध मागें ॥ ३ ॥ निवृत्ति परिचार सर्व हा गोपाळ । पुजी दिनकाळ आत्माराम ॥ ४ ॥

४. **रूप ना अरूप रूपाचें रूपस** । कांसवी डोळस निगमागमें ॥१॥ तो हा ब्रह्मामाजि गोपाळ संगती । यशोदे हो प्रती दूध मागे ॥२॥ जो रेखा अव्यक्त रेखेसिहि पर । दृश्य द्रष्टाकार सर्वांभूतीं ॥३॥ निवृत्ति तटाकें चक्रवाक एक । वासनासि श्लोक गुरुनामें ॥४॥

५. **स्थिर धीर नीर सविचार सार** । ब्रह्मांड आगर गोपवेषें ॥१॥ तो हा कृष्ण सखा नंदाघरीं देखा । यशोदे सन्मुखा दूध मागे ॥२॥ कळिकाळ कळिता काळा आकळिता । आपण स्वसत्ता विश्व हरी ॥३॥ निवृत्ति निकट ज्ञानदेव धीट । खेचरासि वाट गुरुनामें ॥४॥

६. **विश्रामधर्मता आश्रमपूर्णता** । आपरूपें कथा निमे जेथें ॥१॥ तें हें कृष्णबाळ गोपिकांशीं खेळे । नंदाघरीं सोहळे आनंदाचे ॥२॥

कथा त्या कथितां पूर्ण त्या मथिता । अरूपें अच्युता सर्व असे ॥३॥ निवृत्ति समाधान कृष्ण हें चोखडें । मनोनिग्रह कोडें चरणीं गोंवी॥४॥

७. **अकर्ता पैं कर्ता नाहीं यासी सत्ता** । आपण तत्त्वतां स्वयें असे ॥१॥ तें रूप चोखाळ कृष्णनामें बिंबे । यशोदा सुलभें गीतीं गाय ॥२॥ व्योमाकार ठसा नभीं दशदिशा । त्यामाजि आकाशा अवकाश होय ॥३॥ निवृत्ति म्हणे गुरु माझा पूर्ण ब्रह्म । उपदेश सुगम कृष्णनाम ॥४॥

८. **सारासार धीर निर्गुण परतें** । सादृश्य पुरतें हरिनाम ॥१॥ तें हें कृष्णनाम यशोदेच्या घरीं । वनीं गायी चारी यमुनेतटीं ॥२॥ सुलभ सुभग आगमु निगमु । तो हा आत्मारामु गोपवेषें ॥३॥ निवृत्तीचे पार गयनीचें गुज । मज मंत्रबीज उपदेशिलें ॥४॥

९. **नीट पाठ आम्हां धीट हा प्रबंध** । जन वन प्रबोध ब्रह्मरसें ॥१॥ तें मेघःशाममूर्ति स्वरूप गोजिरी । गोकुळींची चोरी करी कृष्ण ॥२॥ मुद्दल शामळ नित्यता अढळ । अखंड अचळ स्वरूप ज्याचें ॥३॥ निवृत्ति पुरता गुरु विवरण । गयनीची खूण आगमरूपें ॥४॥

१०. **पियूष पुरतें कासवी ते विते** । संपूर्ण दुभतें काम धेनु ॥१॥ तेंचि हें डोळस सांवळें सुंदर । यशोदे सकुमार बाळकृष्ण ॥२॥ मधुर क्षारता माधवीं अखंड । दिनकाळ प्रचंड आत्माराम ॥३॥ निवृत्तीचें ताट पियूष पुरतें । कांसवी दुभतें वाटियेसि ॥४॥

११. **निर्दोषरहित सर्वगुणीं हेत** । द्वैत विवर्जित अरूप सदा ॥१॥ तें रूप स्वरूप कृष्ण बाळलीला । माजि त्या गोपाळा सदा वसे ॥२॥ गुणागुणीं धीट वासना अवीट । तद्रुप प्रगट निरंजन ॥३॥ विकार विवर्जित विवरण सोपें । अकार पैं लोपे एका नामें ॥४॥ निःसंदेह छंद वासनेचा कंद । ब्रह्माकार भेद नाहीं नादा ॥५॥ निवृत्ति परिवार ब्रह्मरूप गोकुळीं । वृंदावन पाळी यमुनातटीं ॥६॥

१२. **परेसि परता पश्यंति वरुता** । मध्यमे तत्त्वता न कळे हरी ॥ १ ॥ तें हें कृष्णरूप गौळियांचें तप । यशोदे समीप नंदाघरीं ॥२॥ चोखट चोखाळ मनाचे मवाळ । कांसवीचा ढाळ जया नेत्रीं ॥३॥ निवृत्ति सर्वज्ञ गुरूची धारणा । ब्रह्म सनातना माजि मन ॥४॥

१३. **वर्ण व्यक्ति सख्ये वर्णाश्रम मुखें** । ब्रह्मनाम सौख्ये योगी-

जन ॥१॥ तें हें कृष्णनाम देवकी सफळ । वसुदेवकुळ गोपवेशें ॥२॥ धर्म धरी धार धारणा धीरट । निरालंब पीठ सौख्य शोभा ॥३॥ निवृत्ति सौभाग्य ब्रह्म सर्व सांग । गुरुनामें पांग हरे एक ॥४॥

१४. **मंगल्य मांगल्य ब्रह्म हें सखोल** । ब्रह्मरूप बोल ब्रह्म भोगी ॥१॥ तें हें कृष्ण नाम बोळलें त्या नंदा । आनंदें यशोदा गीती गात ॥२॥ विश्वाद्य वेद्याद्य श्रुतीशीं अभेद्य । तें ब्रह्मपणें वंद्य ब्रह्म भोगी ॥३॥ ॐकार मूर्धनि प्रणव प्रणम्य । वेदादि आगम आंगभूत ॥४॥ निराळ वैकुंठ निराकार धीट । निगम एकट एकपणें ॥५॥ निवृत्ति परिवार गुरु गयनी अमर । गोरक्षी कंदर ब्रह्म माझें॥६

१५. **ग्रासुनि भान मान दृश्य द्रष्टा भिन्न** । आपण चिद्धन वैकुंठीं रया॥१॥ तें रूप सखोल कृष्णरूपें खेळे । नंदयशोदेमेळे गोपीसंगें ॥२॥ नित्यता प्रकाश सर्व पूर्ण सार । आपण श्रीधर सर्व सुखें ॥३॥ तेंची हें रूपडें कृष्णनामें पिकलें । यमुने स्थिरावलें वेणू वाता ॥४॥ ज्योतिरूपें कीर्ण अनंत विस्तारु । ब्रह्मांड आकारु अनंत कोटी ॥५॥ निवृत्ति सोज्वळ नित्य नूतन सोय । आपणाचि होय गोपरूपें ॥६॥

१६. **गगनवाड दृष्टी सर्व तत्व शेखी** । जिव शिव पोखी कारणभूत ॥१॥ तेंची हें सांवळें स्वरूप गोजिरें । कृष्णनाम खरें नंदाघरीं ॥२॥ पृथ्वीचें तळवट अनंत विराट । आपण वैकुंठ गोपिसंगें ॥३॥ निवृत्ति तत्पर लक्ष ते स्वानंद । नित्यता आनंद ब्रह्म नांदे ॥४॥

१७. **नेणती महिमा ब्रह्मादिक भद्र** । आणि ते महेंद्र नानास्थानीं ॥१॥ तें रूप खेळत गौळियांच्या संगें । पुंडलिकामागें भीमातीरीं ॥२॥ उत्पात्ति उलथा न चले तो मार्ग । दुजियाचा संग नाहीं ज्यासी ॥३॥ निवृत्ति प्रगट गुरुमंत्र फळद । गोपाळ विद्गद ब्रह्म सेवी ॥४॥

१८. **सिद्धीचें साधन नेणती ते सिद्ध** । अधिक उद्बोध आनंदाचा ॥१॥ तें रूप सांवळें देवकीये लीळे । भोगिती सोहळे कृष्णरूपें ॥२॥ उन्मनी अवस्था लाविती ते मुनी । अखंड तें ध्यानीं कृष्णसुख ॥३॥ निवृत्ति ठकार श्रुतीचा आकार । गोपाळ साकार अंकुरले ॥४॥

१९. **नसे तो ब्रह्मांडीं नसे तो वैकुंठीं** । दुजियाची गोष्टी नाहीं जेथें ॥१॥ तें रूप सुंदर देवकी उदरीं । वसुदेवा घरीं कृष्ण माझा

॥२॥ ब्रह्मांड-कडवा मनाचा वोणवा । साधितां राणिवा हारपती ॥३॥ निवृत्ति सुंदर कृष्णरूप सेवी । गयनीगोसावी उपदेशिलें ॥४॥

२०. **खुंटले वेदांत हारपले सिद्धांत** । बोलणें धादांत तेंही नाहीं ॥१॥ तें रूप पहातां नंदाघरीं पूर्ण । यशोदा जीवन कृष्णबाळ ॥२॥ साधितां साधन न पविजे खूण । तो बाळरूपें कृष्ण नंदाघरीं ॥३॥ निवृत्ति संपन्न सेवी गुरुकृपा । गयनीच्या द्वीपा तारूं गेलें ॥४॥

२१. **तेथें नाहीं मोल मायाचि गणना** । आपण येसणा ब्रह्मघडु ॥१॥ तें रूप साजिरें निर्गुण साकारु । देवकीबिढारु सेवियेलें ॥२॥ नसंपडे ध्याना मना अगोचर । तें गोपवेषधर गोकुळीं रया ॥३॥ निवृत्ति धर्मपाठ गयनीं विनट । कृष्णनामें पाठ नित्य वाचा ॥४॥

२२. **नाहीं छाया माया प्रकृतीचिया आया** । मनाच्या उपाया न चले कांहीं ॥१॥ तें रूप स्वरूप प्रत्यक्ष अमूप । यशोदे समीप खेळतसे ॥२॥ विश्वाचा विश्वास विश्वरूपाधीश । सर्वत्र महेश एकरूप ॥३॥ निवृत्ति सर्वज्ञ नाममंत्रयज्ञ । सर्व हाचि कृष्ण आत्माराम ॥४॥

२३. **प्रतिपाळ सम प्रतिज्ञेचा नेम** । सर्वज्ञता तम गिळीतसे ॥१॥ तें रूप सकुमार गोपवेषधर । सर्वज्ञ साचार नंदाघरीं ॥२॥ त्रिपुर उदार सर्वज्ञता सूत्र । नाम रूप पात्र भक्तिलागीं ॥३॥ निवृत्ति संपदा सर्वज्ञ गोविंदा । सूत्रमणी सदा तेथ निमो ॥४॥

२४. **ज्ञानेंशीं विज्ञान रूपेंशीं सज्ञान** । ध्यानेंशीं धारणा हारपली ॥१॥ तें रूप संपूर्ण वोळलें हें खूण । नंदासि चिद्घन वोळलासे ॥२॥ अरूपें सरूप लक्षिता पैं माप । नंदा दिव्यदीप उजळला ॥३॥ निवृत्ति संपूर्ण नाम नारायण । सच्चिदानन्दघन सर्व सुखी ॥४॥

२५. **आदिरूप सम मूळ प्रकृति नेम** । वैकुंठ उत्तम सर्वत्र असे ॥१॥ तें रूप संपूर्ण वोळलें परिपूर्ण । सर्व नारायण गोपवेष ॥२॥ आधारीं धरित निर्धारीं धरित । सर्वत्र पुरत एकरूपें ॥३॥ निवृत्ति साधन सर्वरूपें जाण । एकरूपें कृष्ण सेवितसे ॥ ४ ॥

२६. **वैकुंठ कैलास त्यामाजीं आकाश** । आकाशीं अवकाश धरी आत्मा ॥१॥ तें रूप सुघड प्रत्यक्ष उघड । गौळियासी कोड कृष्णरूप ॥२॥ न दिसे निवासा आपरूपें दिशा । सर्वत्र महेशा आपरूपें ॥३॥

तारक प्रसिद्ध तीर्थ पैं स्वानंद । नामाचा उद्बोध नंदाघरीं ॥४॥ प्रकाशपूर्णता आदिमध्य सत्ता । नातळे तो द्वैता अद्वैतपणें ॥५॥ निवृत्ति स्वानंद कृष्णरूपें खुण । विश्वीं विश्वपूर्ण हरि माझा ॥६॥

२७. **निरशून्य गगनीं अर्क उगवला** । कृष्णरूपें भला कोंभ सरळु ॥१॥ तें रूप सुंदर गौळियाचे दृष्टी । आनंदाची सृष्टी नंदाघरीं ॥२॥ रजतम गाळी दृश्याकार होळी । तदाकार जळीं कृष्ण बिंबे ॥३॥ निवृत्ति साकार शून्य परात्पर । ब्रह्म हें आकार आकारलें ॥४॥

२८. **निरालंब सार निर्गुण विचार** । सगुण आकार प्रगटला ॥१॥ तें रूप सुंदर शंखचक्रांकित । शोभतो अनंत यमुनातटीं ॥२॥ अपार उपाय आपणचि होय । सिद्धांचा न साहे रोळु सदा ॥३॥ सर्व हें घडुलें कृष्णाचें सानुलें । घटमठ बुडालें इये रूपीं ॥४॥ सर्व सुखमेळे नामाकृती वोळे । सिद्धीचे सोहळे कृष्णनामीं ॥५॥ निवृत्ति तटाकु घटमठ एकु । कृष्ण हा सम्यकु नामरूपें ॥६॥

२९. **ज्या नाम अनंत न कळे संकेत** । वेदाचाही हेत हारपला ॥१॥ तें रूप सानुलें यशोदे तान्हुलें । भोगिती निमोले भक्तजन ॥२॥ अनंत अनिवार न कळे ज्याचा पार । जेथ चराचर होत जात ॥३॥ निवृत्तिसंकेत अनंताअनंत । कृष्णनामें पंथ मार्ग सोपा ॥४॥

३०. **विश्वाद्य अनाद्य विश्वरूपें वंद्य** । आणि हा अभेद्य भेद नाहीं ॥१॥ तें रूप साजिरें नंदाचें गोजिरें । येशोदे निर्धारें प्रेमसुख ॥२॥ हारपती दिशा सृष्टींचा कडवसा । आपरूपें कैसा ओळलासे॥३॥ निवृत्तिसाधन वसुदेव खूण । गोपिकांचें धन कृष्ण माझा ॥४॥

३१. **निराकृति धीर नैराश्य विचार** । परिपूर्ण साचार वोळलासे ॥१॥ तें रूप रूपस सुंदर सुरस । तें पूर्ण प्रकाश गोकुळीं रया ॥२॥ नानारूप हरपे दृश्य द्रष्टा लोपे । तो प्रत्यक्ष स्वरूप नंदाघरीं ॥३॥ निवृत्ति सादर निराकार अंकुर । साकार श्रीधर गोपवेष ॥४॥

३२. **निगम आगम वेदादिक सम** । श्रुतीचा उपक्रम हारपला ॥१॥ तें रूप साजिरें नंदाचें गोजिरें । यशोदा श्रीधरें प्रेमभेटी ॥२॥ जेथें हें वाग्वाट शून्यता निघोट । प्रत्यक्ष तें वैकुंठ गोपवेष ॥३॥ निवृत्ति तटाक निवांत सम्यक । सर्वरूपें एक आत्माराम ॥४॥

३३. **आदि मध्य वावो अवसान अभावो** । पाहातां निर्वाहो हारपला ॥१॥ तें रूप माजिठे गोपवेषें खेळे । नंदाचे सोहळे पुरविले ॥२॥ धन्य ते यशोदा खेळवी मुकुंदा । आळवीत सदा नित्य ज्यासी ॥३॥ निवृत्ति सधर ब्रह्मरूपासार । वृत्तीचा विचार हारपला ॥४॥

३४. **जेथें रूप रेखा ना आपण आसका** । सर्व रूपें देखा हरि माझा ॥१॥ तें रूप गोजिरें नंदांघरीं असे । जनीं वनीं दिसे गोपिकांसी ॥२॥ नादभेद कळा जेथें भेद नुठी । ब्रह्मरूपें सृष्टि अवघी होय ॥३॥ निवृत्ती सज्जन जन वन देव । आत्मरूप भाव ब्रह्म जाला ॥४॥

३५. **मध्य-बिंदनाद उन्मनि स्वानंद** । रूपस गोविंद गुणनिधी ॥१॥ तें रूप सुरवर सेवितां अरुवार । नित्यता सविचार भोगितातीं ॥२॥ गौळिया गोजिरें दैवत सारें । नंदासि एकसरें प्रेम देतु ॥३॥ निवृत्ति निवाला प्रेमरसें धाला । सर्व सुख झेला हरिकृष्ण ॥४॥

३६. **विश्वातें ठेउनि आप निरंजनीं** । नामाची पर्वणी भक्तालागीं ॥१॥ तें रूप संपूर्ण वसुदेवाकुळीं । यादव गोपाळीं बोललासे ॥२॥ व्यापकपण धीर ब्रह्मांड साकार । तें रूप तदाकार भाग्ययोगें ॥३॥ निवृत्ति घनवट आपण वैकुंठ । कृष्णनाम पेठ गोकुळीं रया ॥४॥

३७. **विश्वंभरमूर्ति विश्वाचे पाळक** । वैकुंठव्यापक जीवशीव ॥१॥ तें रूप सुंदर नंदाघरीं वसे । जनींवनीं दिसे कृष्णरूप ॥२॥ निखळ निघोट नितंब परिपूर्ण । आनंदपूर्णघन गोपवेषें ॥३॥ निवृत्ति परिकर वैकुंठ अपार । भाग्य पारावार यशोदेचें ॥४॥

३८. **त्रिभंगी त्रिभंग जया अंगसंग** । एकरूप सांग बोध वर्ते ॥१॥ तें रूप सावळें भाग्ययोगें बोळे । नंदाचे सोहळे पाळियेले॥२॥ श्रुतिप्रतिपाद्य शास्त्रांसी जें वंद्य । निर्गुणाचें आद्य भाग्यनिधि ॥३॥ निवृत्ति नितंब रूपस स्वयंभ । कृष्णनामें बिंब बिंबलेंसें ॥४॥

३९. **ज्याचेनि स्मरणें कैवल्य साजणें** । एकानामें होणें चतुर्भुज ॥१॥ तें रूप वैकुंठ भोगीती गोकुळीं । नंदाचिये कुळीं बाळकृष्ण ॥२॥ न संपडे ध्यानीं लावितां उन्मनीं । तो गोपाळाचे कानीं सांगे मातु ॥३॥ निवृत्ति अरुवार कृष्णरूप सेवी । मन ठाणदिवी हृदयामाजी ॥४॥

४०. **विकट विकास विनट रूपस** । सर्व हृषिकेश दिसे आम्हां

॥१॥ तें रूप साजिरें नंदाचें गोजिरें । उन्मनि निर्धारें भोगूं आम्हीं ॥२॥विलास भक्तीचा उन्मेश नामाचा। लेशु त्या पापाचा नाहीं तेथें ॥३॥ निवृत्ति म्हणे ते सुखरूप कृष्ण । दिननिशीं प्रश्न हरि हरि ॥४॥

४१. **गगनाचिये खोपे कडवसा लोपे** । क्षीरोनियां दिपे दृश्यद्रष्टा ॥१॥ तें बोळलें गोकुळीं वसुदेवाकुळीं। पूर्णता गोपाळीं गोपीरंगीं॥२॥ जिव शिव सीमा नाहीं जेथें उपमा। हारपे निरोपमा तया माजी॥३॥ निवृत्ति तत्पर वेदांचा ॐकार । ॐतत्सदाकार कृष्णरूपें ॥४॥

४२. **गगनीं उन्मनीं वेद होती मौनी** । श्रुतीची काहणी अरुती ठाके ॥१॥ तें ब्रह्म साबडे नंदाचिये घरीं । वनीं गाई चारी गोपवेशें ॥२॥ न पाहतां होय ब्रह्मांड पीठिका । तें युग क्षणिका हारपे त्या ॥३॥ निवृत्ति दैवत कृष्ण परिपूर्ण । सर्वत्र जीवन सर्वीं वसे ॥४॥

४३. **गगनीं बोळलें येतें तें देखिलें** । दर्पणीं बिंबलें आपणपें ॥१॥ तें रूप रूपस रूपाचा विलास । नामरूपीं वेष कृष्ण ऐसे ॥२॥ सांडुनी दिठींव जालासे राजीव । सर्वत्र अवेव ब्रह्म येणें ॥ ३ ॥ निवृत्ति घडुला सर्वत्र बिंबला । दर्पण विसरला आत्मबोधीं ॥४॥

४४. **क्षीराचा क्षीराब्धि क्षरोनियां लोटे** । वैकुंठ सपाटे पाट वाहे ॥१॥ तें माये हरिरूप कृष्णरूप माझें । नेणिजे तें दुजें इये सृष्टीं ॥२॥ सांडुनी उपमा गोकुळीं प्रकट । चतुर्भुजपीठ यमुनेतटीं ॥३॥ निवृत्ति निकरा वेणु वाहे धरा। यमुने स्थिरस्थिरा नादध्वनी ॥४॥

४५. **निरशून्य गगनीं अंकुरलें एक** । ब्रह्मांड कवतुक लीळातनु ॥१॥ तो माये वो हरि गोपिका भोगिती । शंखचक्राकृति कृष्ण मूर्ति ॥२॥ निराभास आश निःसंदेह पाश । तोचि हृषीकेश नंदाघरीं ॥३॥ निवृत्ति प्रकार ध्यानाचा विचार । सर्व हा श्रीधर यशोदेचा ॥४॥

४६. **निरोपम गगनीं विस्तारलें एक** । अनंत हे ठक गणना नाहीं ॥१॥ तो माय सांवळा यमुनेच्यातटीं । कृष्ण जगजेठी यशोदेचा ॥२॥ निराकृतिआकार अंकुर गोमटे । तो गोपिकांसी भेटे भाग्ययोगें॥३॥ निवृत्ति संपन्न कृष्णरूप ध्यान। गयनी तल्लीन नाम घेतां॥४॥

४७. **निराळ निरसी जिव शिव रसीं** । सर्व ब्रह्म समरसीं वर्ते एक ॥१॥ तें रूप परिकर कृष्णमूर्ति ठसा । गोपिका कुंवासा नंदाघरीं ॥२॥

संसाराचें तारूं ठागमाण दिसे । शाम प्रभा वसे तिये ब्रह्मीं ॥३॥ निवृत्ति घनदाट घनश्याम कृष्ण । योगीजनां ध्यान नित्यरूपें ॥४॥

४८. **निरासि निर्गुण नुमटे प्रपंच** । विषयसुख साच नाहीं नाहीं ॥१॥ तें रूप गोजिरें कृष्णमूर्ति ठसा । गोपाळा समरसा माजि खेळे ॥२॥ चित्ताचे राहाविते आपणचि द्रष्टे । नेतुसे वैकुंठें नाम घेतां ॥३॥ निवृत्तीशीं ध्यान सर्व जनार्दन । वैकुंठ आपण गोपीसंगें ॥४॥

४९. **निरालब देव निराकार शून्य** । मनाचेंही मौन हारपलें ॥१॥ तें रूप साबडें शंखचक्रांकित । यशोदा तें गात कृष्णनाम ॥२॥ मौनपणें लाठें द्वैत हें न साहे । तें नंदाघरीं आहे खेळेमेळे ॥३॥ निवृत्ति आकार ब्रह्म परिवार । गोकुळीं साकार मूर्त ब्रह्म ॥४॥

५०. **दुजेपणा मिठी आपणचि उठी** । कल्पना हे सृष्टि गाळू पाहे ॥१॥ तें कृष्णरूप गाढें यशोदा घे पुढें । दूध लाडेंकोडें मागतसे ॥२॥ सृष्टीचा उपवडु ब्रह्मांडाचा घडु । ब्रह्मींचा उपवडु उघड दिसे ॥३॥ निवृत्ति उघडु ब्रह्मांमाजि लोळे । नंदाघरीं खेळे गोपवेषें ॥४॥

५१. **अरूप बागडे निर्गुण सवंगडे**। खेळे लाडेंकोडें नंदाघरीं॥१॥ तें रूप संपूर्ण यशोदा खेळवी । कृष्णातें आळवी वेळोवेळां ॥२॥ सागरजीवन सलावीची खूण । मेघ तो वर्षण वोळलासे ॥३॥ निवृत्तीचें धन गोकुळीं श्रीकृष्ण । गयनी सहिष्ण प्रेमें डोले ॥४॥

५२. **मेघ अमृताला जेथूनि पवाड** । दुजियाची चाड नाहीं तेथें ॥१॥ तें रूप अरूप सुंदर सावळे । भोगिती गोवळे सुखसिंधु ॥२॥ विराट नाटकु वैराज जुनाटु । गोपवेषें नटु नंदाघरीं ॥३॥ निवृत्ति सत्वर सेवि सुखसार । प्रकृति आकार लोपें ब्रह्मीं ॥४॥

५३. **ज्ञानेसी विज्ञान उन्मनिं निमग्न** । द्वैत रूपें भग्न उरों नेदी ॥१॥ तोचि हा गोपाळ गोपिसंगें खेळे । गो-गोपाळ-मेळे नंदाघरीं ॥२॥ दृश्य द्रष्टा सर्व तितिक्षा उपरती । श्रुतीसी संपत्ती येथ जाणा ॥३॥ निवृत्ति सधर गोरक्षी गयनी । ब्रह्मरूपीं पूर्णी समरसे ॥४॥

५४. **ब्रह्मांड करी हरि ब्रह्म झाडा करी** । तो नंदयशोदे घरीं खेळतुसे ॥१॥ त्रैलोकीं दुर्लभ ब्रह्मांदिकां सुलभ । रुक्मिणीवल्लभ कृष्ण सांवळा ॥२॥ हिरण्याक्ष वधूनि दाढेवरी मेदिनी । तो हा चक्रपाणी

यशोदेचा ॥३॥ रामावतारु गाढा दशशिरा रगडा । रिठासुर दाढा तेणेंपाडे ॥४॥ चतुर्भुज श्रीपति सकुमार साजती । शंख चक्र हातीं हरि माझा ॥५॥ निवृत्ति ध्यानसुरस सर्वरूपें श्रीधर । जिंकिला भौमासुर रणयुद्धीं ॥६॥

५५. **आदीची अनादि मूळ पैं सर्वथा** । परादि या कथा हारपती ॥१॥ तें अव्यक्त रूप देवकीचें बाळ । वसुदेवकुळ कृष्ण ठसा ॥२॥ मुरालीं ब्रह्मांडें अमित्य पैं अंडें । ढिसाळ प्रचंडें जया आंगीं ॥३॥ निवृत्तिचें धन मानी तो श्रीकृष्ण । सांगितसे प्रश्न गयनीराजे ॥४॥

५६. **बिंबीं बिंब एक बिंबलें सम्यक** । आपण तिन्ही लोक एक्यारूपें ॥१॥ तो कृष्णरूप ठसा गोपाळां लाधला । सर्वत्र देखिला चतुर्भुज ॥२॥ निळिमा अंबरीं निळवर्ण तेज । गोपाळ सहज बिंबाकारें ॥३॥ निवृत्ति परिपाठ नीळवर्ण खरा । नंदाचिया घरा कृष्ण आला ॥४॥

५७. **वैकुंठ दुभतें नंदाघरीं माये** । तें पूर्ण पान्हाये यशोदेसी ॥ १ ॥ तें रूप रूपस कांसवी प्रकाश । योगीजनमानस निवताती ॥ २ ॥ सुंदर-सुनीळ राजस गोपाळ । भक्तांसी दयाळ एक्या नामें ॥ ३ ॥ निवृत्ति गयनी मन ते चरणीं । अखंडता ध्यानीं तल्लीनता ॥ ४ ॥

५८. **गोकुळीं वैकुंठ वसे गोपाळांमाजी सौरसें** । अभक्ता न दिसे काय करूं ॥१॥ पूर्वपुण्य चोखडें ब्रह्म लाडे कोडें । ते यशोदेकडे शोभे कैसें ॥२॥ वसुदेव अमूप देवकी समीप । वैकुंठीचें दीप लाडेंकोडें ॥३॥ उग्रसेन संप्रधार केला राज्यधर । यादव परिवार रामकृष्ण ॥४॥ द्वारकानाथ हरि सोळा सहस्र नारी । बळिराम परिवार हरि माझा ॥५॥ निवृत्ति जीवन ध्यान एक रामकृष्ण । उच्चारणीं कोटि यज्ञ होती नामें ॥६॥

५९. **सर्व स्वरूप नाम सर्व घटीं घनश्याम** । तो गोकुळीं आत्माराम दूध मागे ॥१॥ भाग्येंविण दुभतें दैव उभडतें । नंदाघरीं आवडतें घरीं खेळे ॥२॥ मंजुळ वेणु वाहे लुब्धल्या धेनुवा । नंदाघरीं दोहवा पूर्ण वाहे ॥३॥ घरोघरीं दुभतें गौळियां परिपूर्ण । यशोदा ते आपण गोरस घुसळी ॥४॥ गो-गोपाळ हरिखु नंद यशोदे-

सुख । गौळणी कौतुक करिती हरि ॥५॥ निवृत्ति गयनी देव उपदेशिला सर्व । गोरक्षी गुह्यभाव सांगती मज ॥६॥

६०. **हें व्यापूनि निराळा भोगी वैकुंठ सोहळा** । नंदाघरीं गोवळा हरि माझा ॥१॥ न साहे सगुण अवघाचि निर्गुण । तो कृष्ण आपण गोपाळसंगें ॥२॥ गायी चारी हरि मोहरी खांद्यावरी । वेणु नानापरि वातु असे ॥३॥ निवृत्ति गयनी कृष्ण जप तो अमुप जाण । सांगितल्या खूण गोरक्षानें ॥४॥

६१. **न साहे दुजेपण आपण आत्मखुण** । श्रुतीही संपूर्ण हारपती ॥१॥ वेदरूप श्रीकृष्ण योगिया जीवन । तें रूप परिपूर्ण आत्माराम ॥२॥ न दिसे वैकुंठीं योगियां ध्यानबीज । तो गोपाळांचें काज हरि करी ॥३॥ निवृत्ति गयनी हरि उच्चारीत । माजि करि पुरी कामसिद्धि ॥४॥

६२. **नाहीं हा आकार नाहीं हा विकार** । चतुर्भुज कर हरि माझा ॥१॥ हरु जपे जप हरिहर रूप । गौळियांचें तप सहज कृष्ण ॥२॥ हरिरूप घरीं सोळा सहस्र नारी । तो बाळ ब्रह्मचारी गाई राखे ॥३॥ निवृत्ति रोकडें ब्रह्म माजिवडें । तो यशोदेपुढें लोणी मागे ॥४॥

६३. **धीराचे पैं धीर उदार ते पर** । चोखाळ अमर अभेदपणें ॥१॥ तें हें चतुर्भुज कृष्णरूपें खेळे । माजि त्या गोपाळें छंदलग ॥२॥ क्रिडाळ परतें चोखाळ आरुतें । मी माझें हें कर्तें तेथें नाहीं ॥३॥ निवृत्ति धर्मता विचार चोखाळ । सर्वत्र गोपाळ सखा आम्हां ॥४॥

६४. **योगियाचें धन तें ब्रह्म संपन्न** । तो हा जनार्दन नंदाघरीं ॥१॥ हरिरूप मायें सर्वांघटीं आहे। दूध लोणी खाये गौळियांचें ॥२॥ चिंतिता अजामेळा नाम आलें मुखा । तो वैकुंठीच्या सुखा देतु हरी ॥३॥ निवृत्तीचें धन जगाचें जीवन । नाम नारायण तरुणोपाय ॥४॥

६५. **देव मुकुटमणि ऐकिजे पुराणीं** । तो हा चक्रपाणी नंदाघरीं ॥१॥ नंदानंदन हरि गौळणी गोरस । गोकुळीं हृषीकेश खेळतसे ॥२॥ हरि हा सुकुमार भौमासुर पैजा । वोळलासे द्विजा धर्मा घरीं ॥३॥ निवृत्ति रोकडें नाम फाडोवाडें । हरिरूप चहूंकडे दिसे आह्मां ॥४॥

६६. **वेदबीज साचें संमत श्रुतीचें** । गुह्य त्या शास्त्रांचें हरि माझा

॥१॥ तो हरि खेळतु प्रत्यक्ष मूर्तिमंतु । द्रष्टा मुक्ति देतु जीवघातें ॥२॥ अर्जुना साहाकारी द्रौपदी कैवारी । तो विदुराचे घरीं अन्न मागे ॥ ३॥ निवृत्तीचें धन गोकुळीं श्रीकृष्णु । यादव सहिष्णु हरि माझा ४

६७. **ब्रह्मादिक पूजा इच्छिती सहजा** । तो गौळियांच्या काजा तिष्टतुसे ॥१॥ देखिलें सांवळें पूजिती गोवळे । नंदाघरीं खेळे स्वामी माझा ॥२॥ निवृत्तिदैवत पूर्ण मनोरथ । योगी तें चिंतीत हृदयीं जया ३

६८. **ब्रह्मांड उतरडी ज्याचे इच्छे घडी** । तो उच्छिष्टें काढी धर्मा घरीं ॥१॥ देखिला वो माये चतुर्भुज स्वभावी । वारु तो वागवी अर्जुनाचे ॥२॥ याज्ञिक अर्पिती मंत्राच्या आहुती । तो द्रौपदियेप्रति भाजी मागे ॥३॥ निवृत्तिदैवत पूर्ण मनोरथ । पांडव कृतार्थ कृष्णनामें ॥४॥

६९. **निरालंब बीज प्रगटे सहज** । तो गौळियांचें काज करी कृष्ण ॥१॥ हरि हा सांवळा वेधिलिया बाळा । माजि त्या गोवळा गायी राखे ॥२॥ वंदिती सुरगण ब्रह्मादिक चरण । तो यशोदेसि स्तन मागे हरि ॥३॥ निवृत्ति ध्यान मनाचें उन्मन । योगिया जीवन हरि माझा ॥४॥

७०. **वैकुंठ दैवत देवामुकुटमणी** । ऐकिजे पुराणीं कीर्ति ज्यांची ॥१॥ तो हरि बाळक गोपिका कौतुक । गोपाळ सकळिक संवगडे ॥२॥ आदि शिवा जप जपतु अमूप । तें प्रत्यक्ष स्वरूप नंदाघरीं ॥३॥ निवृति समाधि उगवली कळिका । तारी तिहीं लोकां एकानामें ॥४॥

७१. **गगन घोटीत उठी पृथ्वी सगळी दाटी** । आपणाचि पाठी कूर्म जाला ॥१॥ कांसवी तुसार अमृत सधर । भक्त पारावार तारियेले ॥२॥ उचलिती ढिसाळ सर्व हा गोपाळ । तो यशोदेचा बाळ नंदाघरीं ॥३॥ निवृत्ति सादर तें हरिरूप श्रीधर । आपण चराचर विस्तारला ४

७२. **गगनींचा गगनीं तेज पूर्ण धरणीं** । आपणची तरणी जगा यया ॥१॥ ब्रह्मा माजीवडे गोपाळ संगती । वेद वाखाणिती ज्याचा महिमा ॥२॥ लोपती त्या तारा हारपे दिनमणी । तो खेळे चक्रपाणी गोपाळामाजीं ॥३॥ निवृत्ति निधान श्रीरंग खेळतु । गोपिकासी मातु हळूहळू ॥४॥

७३. **निरपेक्षता मन अनाक्षर मौन्य** । प्रकाश संपूर्ण तया ब्रह्मा ॥१॥ ऐसें रूप पाहा क्षरे दिशा दाहा । सर्वभावें पोहा एका कृष्ण

॥२॥ नित्यता अढळ नित्यपणें वेळ । विकाश अकळ नित्य तेजें ॥३॥ रूपस सुंदर पवित्र आगर । चोखाळ साचार पवित्रपणें ॥४॥ नेणें हें विषये आकार सामाये । विकार न साहे तया रूपा ॥५॥ निवृत्ति तत्पर गुरु गयनी आमर । ॐतत्सदाकार हरि माझा ॥६॥

७४. **अद्वैत अमरकंदु हा घडला** । ब्रह्मांडीं संचला ब्रह्म साचें ॥१॥ तें रूप कारण कृष्ण तेजाकार । सर्व हा आकार त्याचा असे ॥२॥ विराट विनटु विराट दिसतु । आपणचि होतु ब्रह्मसुखें ॥३॥ निवृत्ति कोंवळें आपण सोवळें । त्यामाजि वोविलें मन माझें ॥४॥

७५. **जयामाजी दीक्षा हारपोनि जाये** । द्वैत हेंही ठाये दुजेपण ॥१॥ तें रूप रोकडे दिसे चहूंकडे । गोपाळ संवगडे खेळताती ॥२॥ उपरति योगियां उपरती हारपे । मायाकार लोपे कृष्णध्यानें ॥३॥ निवृत्ति तत्पर सर्व हा श्रीधर । मनाचा विचार हारपला ॥४॥

७६. **रसज्ञ रसाचा रसामाजी वसे** । जीवन हें सोसे असोस होय ॥१॥ तें रूप स्वरूपाचें रूपचि वोळले । कर्दपें घोळिले नंदाघरीं ॥२॥ नाहीं त्या आकार अवघाचि वैकुंठ । अद्वैत घनदाट ब्रह्ममय ॥३॥ निवृत्ति नितंब कृष्ण तो स्वयंभ । श्रीमूर्तीचें बिंब दिसे सर्व॥४॥

७७. **अनंत रचना हारपती ब्रह्मांडें** । हेळाचि वितंडें मोडीतुसे ॥१॥ तें रूप राजस वसुदेव भोगी । देवकियेलागीं वोळलेंसे ॥२॥ विचित्र रचना ब्रह्मांड कुसरी । निरालंब हरि गोकुळीं वसे ॥३॥ निवृत्ति संपदा गाताती गोविंदा । भोगिती मुकुंदा निजबोधें ॥४॥

७८. **व्यापरूपें थोर व्यापक अरूप** । दुसरें स्वरूप नाहीं जेथें ॥१॥ तें अव्यक्त साबडें कृष्णाचें रूपडें । गोपाळ बागडें तन्मयता ॥२॥ उन्मनि माजिठें भोगिती जे मुनी । मूर्तीची पर्वणी हृदयीं वसे ॥३॥ निवृत्ति कारण कृष्ण हा परिपूर्ण । यशोदा पूर्णघन वोळलासे॥४॥

७९. **आद्यरूपसार जेथुनि ॐकार** । तो प्रणवसाचार हारपला ॥१॥ तें रूप समर्थ रामकृष्णनाम । गोपिका कृतार्थ नाम घेतां ॥२॥ ब्रह्मांड घडलें अनंत घटमठ । आपरूपें धीट मुनिजनां ॥३॥ निवृत्तीचें सार सर्व हा परिवार । कृष्णाचि साचार बिंबलासे ॥४॥

८०. **कारण परियेस कामधाम नेम** । सर्व आत्माराम नेमि-

येला ॥१॥ तें रूप सुंदर सर्वां अगोचर । कृष्ण परिवार गोपवेषें ॥२॥ वेदादिक कंद ॐकार उद्बोध । साकार प्रसिद्ध सर्वां घटीं ॥३॥ निवृत्ति ह्मणे धाम कृष्ण हा परम । सौख्यरूपें सम वर्ततुसे ॥४॥

८१. **जेथ रूप रेखा नाहीं गुण देखा ।** चिदाकाशें लेखा आपतत्त्व ॥१॥ तें रूप गोजिरें कृष्णरूपें सांग । यशोदेचा पांग हरियेला ॥२ ॥ जेथें रजतम नाहीं तें निस्सीम । आप शम दम पूर्णघन ॥३॥ निवृत्ति सार पार ब्रह्मसुख घन । सर्व जनार्दन गोपवेषें ॥४॥

८२. **गोत वित्त चित्त गोतासी अचुक ।** चाळक पंचक तत्त्वसार ॥१॥ तें रूप सादृश्य कृष्णनामें सोपें । नंदा यशोदा खोपें बाळलीला ॥२॥ निरसूनि गुण उगवली खूण । गोकुळीं श्रीकृष्ण खेळे कैसा ॥३॥ निवृत्तीचें सार कृष्णनामें पार । सर्व हा आचार हरी हरी ॥४॥

८३. **विश्वाचा चाळकु सूत्रधारी एकु ।** विज्ञान व्यापकु ज्ञानगम्य ॥१॥ तें रूप साजिरें कृष्ण घनःश्याम । योगिया परम जपु ज्याचा ॥२॥ शिवाशिवोत्तम नाम आत्माराम । जनवनसम गोपवेषें ॥३॥ निवृत्ति चाळकु सर्वत्र व्यापकु । आपरूपें एकु सर्वत्र असे ॥४॥

८४. **जाणोनि नेणते नेणत्या मागते ।** आपण पुरते नित्यपूर्ण ॥१॥ तें स्वरूप कृष्ण गौळियाचें भाग्य । नंदासि सौभाग्य भागा आलें ॥२॥ जाणते पूर्णता पूर्णते समता । आपण चित्सत्ता गोपवेष ॥३॥ निवृत्ति परिमाण सर्व पूर्णघन । दिननिशीं कृष्ण भाग्ययोगें ॥४॥

८५. **मृगजळभास लहरी अपारा ।** हा प्रपंच पसारा उदरीं जया ॥१॥ तें रूप वैकुंठ कृष्णरूपें खेळे । गोपाळांचे लळे यमुनातटीं ॥२॥ जाळूनि इंधन उजळल्या दीप्ती । अनंतस्वरूपीं एक दिसे ॥३॥ निवृत्ति सागर ज्ञानार्क आगर । कृष्णाचि साचार बिंबलासे ॥४॥

८६. **गोत वित्त धन मनाचें उन्मन ।** निमोनि संपूर्ण तयामाजी ॥१॥ जीवन पावन रसाचें निधान । रसरूपें धन रसनेचें ॥२॥ भोग्य भोग भोक्ता आपण तत्त्वतां । त्याहुनी परता तयामाजी ॥३॥ निवृत्ति आगर कृष्ण हा सागर । सर्वरूपें श्रीधर दिसतुसे ॥४॥

८७. **निराकृत कृत्य विश्वातें पोखितें ।** आपण उखतें सर्वाकार ॥१॥ तोचि हा सांवळा डोळस सुंदर । रुक्मिणी भ्रतार कृष्ण

माझा ॥२॥ निश्चळ अचळ नाहीं चळाचळ । दीन काळ फळ हारपती ॥३॥ निवृत्ति सोपान खेचर हारपे । तदाकार लोपे इये ब्रह्मीं ॥४॥

८८. **मथीन मथन मधुरता आपण** । विश्वीं विश्व पूर्ण सदोदित ॥१॥ तें हें चतुर्भुज मुगुटवर्धन । सुंदर श्रीकृष्ण खेळतुसे ॥२॥ द्रुमद्रुम पाणि द्रुमिळित ध्यानीं । दृढता निशाणीं काष्टीं लागे ॥३॥ ध्रुवाद्य अढळ ब्रह्म हें अचळ । शोखी मायाजाळ निःसंदेहें ॥४॥ क्लेशादि कल्पना क्लेशनिवारण । आपरूपें भिन्न होऊं नेदी ॥५॥ निवृत्ति कठिण गयनिप्रसाद । सर्वत्र गोविंद नंदाघरीं ॥६॥

८९. **मन निवटलें स्नेहें सांडवलें** । ठाणदिवीं केलें ध्यानालागीं ॥१॥ उमटला ध्वनि कृष्णनाम ठसे । सर्व हृषीकेशें भरलें दिसे ॥२॥ दिशा द्रुम ध्यान हारपली सोय । अवघा कृष्ण होय ध्यानींमनीं ॥३॥ निवृत्तिमाजि घर मनाचा सुघडु । कृष्णाचि उपवडु दिसतुसे ॥४॥

९०. **अव्यक्त आकार आकारलें रूप** । प्रकाशस्वरूप बिंबलेंसे ॥१॥ तें रूप अव्यक्त कृष्णनाम चोज । नामअधोक्षज चतुर्भुज ॥२॥ वर्णासी अव्यक्त वर्णरूप व्यक्त । भोगिती विरक्त नामपाठें ॥३॥ निवृत्तीचें काज नाम ब्रह्म बीज । गयनी सहज तुष्टलासे ॥४॥

९१. **निरशून्य बिंबीं आकार पाहतां** । आपण तत्त्वतां हरी एकु ॥१॥ तें रूप साबडे कृष्ण माजिवडें । सोंवळें उघडें शौच सदा ॥२॥ तेथें वर्ण व्यक्ति कल्पना हारपती । मनाची खुंटती गती जेथें ॥३॥ निवृत्ति नितंब सोंवळा स्वयंभ । प्रकाशलें बिंब चहूंकडे ॥४॥

९२. **पंचतत्त्व कळा सोंविळी संपूर्ण** । त्याचेही जीवन जनार्दन ॥१॥ तो सोंवळा संपूर्ण अमृताचा घन । त्यामाजि सज्जन हरि आत्मा ॥२॥ नित्यता सोंवळा स्वयंपाकीं शौचे । न दिसे आमुचें आह्मां तेथें ॥३॥ निवृत्ति सोंवळा स्वयंपाकीं नित्य । नाम हें अच्युत जपतुसे ॥४॥

९३. **हिरण्यगर्भ माया अंडाकार छाया** । ब्रह्म असलया तेथें नेत ॥१॥ तें रूप वैकुंठ जिवशिवपेठ । मायेचा उद्धाट छायासंगें ॥२॥ माया ब्रह्म हरि माता पिता चारी । जिवशिव शरिरीं एक नांदे ॥३॥ निवृत्तीची छाया जिवशिवमाया । वासना संदेहा लया गेली ॥४॥

९४. **अनंत सृष्टि घटा अनंत नाम मठा** । परिमाण पैठा

आत्माराम ॥१॥ तें रूप साजिरें चतुर्भुजवेष । वैकुंठींचें लेश नंदभाग्यें ॥२॥ सिद्धींचें साधन चिंतामणि धन । कल्पवृक्ष घन वसती जेथें ॥३॥ निवृत्तीचें मूळ गोपाळ सकळ । साधक दयाळ हरी होय ॥४॥

९५. **नित्य निर्गुण सदा असणें गोविंदा** । सगुणप्रबंधा माजि खेळे ॥१॥ तें रूप सगुण अवघेंचि निर्गुण । गुणि गुणागुण तयामाजि ॥२॥ अनंत तरंगता अनंत अनंता । सृष्टीचा पाळिता हरि एकु ॥३॥ निवृत्ति प्रमाण अनंत नारायण । सर्व हें चैतन्य आपरूपें ॥४॥

९६. **नामींरूपीं गोडी ब्रह्मांडा एवढी** । द्वैताची परवडी हारपली ॥१॥ तें रूप सुंदर कृष्ण सकुमार । सेविती सुरवर भक्तराज ॥२॥ विराट अनंतें ज्यामाजि विरतें । नव्हेचि पुरतें शेषादिकां ॥३॥ निवृत्ति लक्ष्मी गरुड चिंतिती । तयाचिये मति आकळ हरी ॥४॥

९७. **खुंटलें साधन तुटलें बंधन** । सर्वही चैतन्य एकरूप ॥१॥ नाहीं तेथें माया नाहीं तेथें छाया । निर्गुणाच्या आया ब्रह्मरूप ॥२॥ चैतन्य साजिरें चेतवी विचारें । आपरूपें धीरे विचरत ॥३॥ निवृत्ति ह्मणे तें कृष्णरूप सर्व । रोहिणीची माव सकळ सृष्टी ॥४॥

९८. **निकट वेल्हाळ नेणों मायाजाळ** । विव्हळ पाल्हाळ नेणों कांहीं ॥१॥ तें रूप सादर मानवी आकार । सर्व संप्रधार सिद्धि बोळे ॥२॥ कुटुंब आचार कुळवाडी साचार । सर्व हा श्रीधर एकाएक ॥३॥ निवृत्ति निमग्न गयनीचि प्रज्ञा । नामें कोटि यज्ञा होत जात ॥४॥

९९. **भरतें ना रितें आपण वसतें** । सकळ हें होतें तयामाजी ॥१॥ तें रूप पैं ब्रह्म चोखाळ सर्वदा । नित्यता आनंदा नंदाघरीं ॥२॥ आशापाश नाहीं अशिजे पूर्णापूर्णें । सकळ जग होणें एकरूपें ॥३॥ निवृत्ति तटाक रूपें ब्रह्म एक । जेथ ब्रह्मादिक हारपती ॥४॥

१००. **न देखों सादृश्य हारपे दृश्यादृश्य** । उपनिषदांचें पैं भाष हारपलें ॥१॥ तें रूप उघडें कृष्णरूप खेळे । गोपाळांचे लळे पुरवितु ॥२॥ नेघे हा प्रपंच नाहीं त्या आहाच । सर्व हाचि साच हरी आह्मां ॥३॥ निवृत्तीचें पर कृष्ण हें साचार । सर्व हा आचार कृष्ण आह्मां ॥४॥

१०१. **नाहीं त्या आचारु सांवळा परिवारु** । तो गोकुळीं साचारु अवतरला ॥१॥ हा गाई चारी गोपवेषधारी । नंदाचा खिल्लारी ब्रह्म

जालें ॥२॥ ध्याताति जे ध्यानें चिंतिताती मौन्यें।योगियांचीं मनें हारपलीं ॥३॥ निवृत्ति ह्मणे तें वसुदेवाकुळीं । अवतार गोकुळीं धरिलासे ॥४॥

१०२. **अजन्मा जन्मला अहंकार बुडाला** । बोध पैं उठिला गोकुळीं रया ॥१॥ आपरूपें गोकुळीं आपरूपें आप । अवघेंचि स्वरूप हरीचें जाणा ॥२॥ रूपाचें रूपस सुंदर साकार । गोकुळीं निर्धार वृंदावनीं ॥३॥ निवृत्तीचें पुण्य वेणु वाहे ध्वनि । जन वन मोहनी एकरूप ॥४॥

१०३. **परेसि परता न कळे पैं शेषा** । तो गौळिया अशेषा माजी हरी ॥१॥ भाग्य पैं फळलें नंदाघरीं सये । यशोदा पैं माय परब्रह्माची ॥२॥ गौळिये नांदती गोधनाचे कळप । त्यामाजि स्वरूप कृष्णमूर्ति ॥३॥ निवृत्तीचें ध्यान गोपाळ आमुचा । आतां जन्म कैंचा भक्तजनां ॥४॥

१०४. **ज्या रूपा कारणें वोळंगती सिद्धी** । हारपती बुद्धी शास्त्राचिया ॥१॥ तें रूप साजिरें गोकुळीं गोजिरें । यशोदे सोपारें कडिये शोभे ॥२॥ न संठे त्रिभुवनीं नाकळे साधनीं । नंदाच्या अंगणीं खेळे हरी ॥३॥ निवृत्ति निधडा रूप चहूंकडा । गोपाळ बागडा गोकुळीं वसे ॥४॥

१०५. **उफराटी माळ उफराटें ध्यान** । मनाचें उन्मन मूर्ति माझी ॥१॥ तें रूप आवडे भोगिती साबडें । यशोदेसी कोडें बुझावितु ॥२॥ मोठेनि परिमाण हारपलें ध्यान । आपणचि कृष्ण सर्व जाला ॥३॥ निवृत्तीचा जप जपमाळा हे गोमटी । मन हें वैकुंठीं ठेवियेलें ॥४॥

१०६. **सूर्यातें निवटी चंद्रातें घोंटी** । उन्मनि नेहटी बिंबाकार ॥१॥ तें रूप सांवळें योगियाचें हित । देवांचें दैवत कृष्णमाये ॥२॥ सत्रावी उलंडी अमृत पिऊनि । ब्रह्मांड निशाणी तन्मयता ॥३॥ निवृत्ति अंबुटें वोळलें अमृत । गोकुळीं दैवत नंदाघरीं ॥४॥

१०७. **न साधे तें योगी न संपडे जगीं** । तो नंदाच्या वोसंगीं उत्संगीं खेळे ॥१॥ कृष्ण माझा हरी खेळतो गोकुळीं । गोपिकीं सकळीं वेढियेला ॥२॥ गाईंचे कळप गोपाळ अमुप । खेळतसे दीप वैकुंठींचा ॥३॥ निवृत्ति दीपडें वैकुंठ साबडें । यशोदातें कोडें चुंबन देतु ॥४॥

**१०८. भावयुक्त भजतां हरी पावे पूर्णता** । तो गोकुळीं खेळतां देखों हरी ॥१॥ मुक्ती माजिवडे ब्रह्म चहूंकडे । गौळणी वाडेकोडें खेळविती॥२॥ न संपडे ध्यानीं योगिया उन्मनीं । तो गोकुळीचें लोणी खाये हरी ॥३॥ निवृत्ति संजीवन गयनी निरूपण । तो कृष्ण आपण गोकुळीं वसे ॥४॥

**१०९. जेथुनीयां परा पश्यंती वोवरा** । मध्यमा निर्धारा वैखरी वाहे ॥१॥ तें रूप श्रीधर नाम हें सुंदर । जेणें चराचर रचियेलें ॥२॥ वेदा जन्मस्थान वेदरूपें आपण । तो हा नारायण नंदाघरीं ॥३॥ निवृत्ति दैवत पूर्ण मनोरथ । गोपिकांचें हित हरी माझा ॥४॥

**११०. न साहात दुजेपण आपणचि आत्मखुण** । श्रुति जेथें संपूर्ण हारपती ॥१॥ वेदरूप श्रीकृष्ण योगियां संजीवन । तें रूप परिपूर्ण आत्माराम ॥२॥ न दिसे वैकुंठीं तें योगियांचें ध्यानबीज । तो गोपाळांचें काज हरी करी ॥३॥ निवृत्ति गयनि हरि उच्चारितां माजी घरीं । होती मनोरथ पुरी कामसिद्धि ॥४॥

**१११. श्यामाची श्यामशेज वरि निजतेज विराजे**। सहजें केशिराजे क्षीरार्णवीं॥१॥ शेषशयन अरुवारी गोविंद क्षीरसागरीं। तो नंदयशोदेघरीं क्रीडतुसे ॥२॥ अनंतनामीं क्षीर क्षरलासे साचार । गोपिकांसमोर हरीराजा ॥३॥ नाहीं योगिया दृष्टि मनोमयें करी सृष्टी । पाहतां ज्ञानदृष्टी विज्ञान हरी ॥४॥ शांति नेणें क्षमें पारु विश्रांतिसी अरुवारु। तो कैसा पा उदारु गोपाळांसी॥५॥ विचाराचें देटुगें आकार निराकार सांगे। तो गोसावी निगे गोकुळीं रया ॥६॥ निवृत्तीचें परब्रह्म नामकृष्ण विजय ब्रह्म । चिंतितां चिंताश्रम नासोनि जाय ॥७॥

**११२. विस्तार विश्वाचा विवेक पैं साचा** । बोलतांचि वाचा हारपती ॥१॥ तें रूप श्रीधर कृष्णाचा आकार । सर्व निराकार एकरूपें ॥२॥ नसतेनि जीव असतेनि शिव। तदाकार माव मावळली ॥३॥ निवृत्ति स्वरूप कृष्णरूप आप । विश्वीं विश्वदीप आपरूपें॥४॥

**११३. तारक प्रसिद्ध तीर्थ तें अगाध** । नामाचा उद्बोध नंदाघरीं ॥१॥ प्रकाश पूर्णता आदिमध्यें सत्ता । नातळे तो द्वैतां द्वैतपणें ॥२॥ निवृत्ति साधन कृष्णरूपें सुख । विश्वीं विश्वरूप हरी माझा॥३॥

**११४. गगनग्रास घोंटी ब्रह्मांड हें पोटीं** । निमुनि शेवटीं निरालंबीं ॥१॥ तें ब्रह्म साबडें माजि लाडेंकोडें । यशोदेमायेपुढें खेळतुसे ॥२॥ ब्रह्मांडाच्या कोटी तरंगता उठी । आप आपासाठीं होत जात॥३॥निवृत्तीचें ध्यान यशोदेचें धन । वासुदेव खुण आम्हांमाजी॥४॥

**११५. आगमा निगमा बोलतां वैखरी** । तो यशोदेच्या करीं धरूनी चाले ॥१॥ न संपडे शिवा बैसतांही ध्यानीं । जालिया उन्मनीं दृश्य नव्हे ॥२॥ कमळासनीं ब्रह्मा ध्यानस्थ बैसला । पाहतां पाहतां मुळा न संपडे ॥३॥ निवृत्ति गयनीं सांगतुसे खुणा । तो देवकीचा तान्हा बाळ जाला ॥४॥

**११६. हा पुरुष कीं नारी नव्हे तो रूपस** । शेखी जगदीशं जगद्रुपें ॥ १ ॥ तें हें कृष्णरूप यशोदेकडीये । नंदाघरीं होये बाळरूप ॥२॥ ज्यातें नेणें वेद नेणती त्या श्रुती । त्या गोपिका भोगिती कामरूपें॥३॥निवृत्तीचें ब्रह्म कृष्णनामें खेळे । असंख्य गोवळे ब्रह्मरूपीं ॥४॥

**११७. अंधरिये रातीं उगवे हा गभस्ती** । मालवेना दीप्ति गुरुकृपा ॥१॥ तो हा कृष्ण हरी गोकुळामाझारीं । हाचि चराचरीं प्रकाशला ॥२॥ आदि मध्य अंत तिन्ही जालीं शून्य । तो कृष्णनिधान गोपवेषें ॥३॥ निवृत्तिनिकट कृष्णनामपाठ । आवडी वैकुंठ वसिन्नले ॥४॥

**११८. दुभिलें द्विजकुळीं आले पैं गोकुळीं** । नंदयशोदेजवळी बाळकृष्ण ॥१॥ खेळे लाडेकोडें गौळणी चहूंकडे । नंदाचें केवढें भाग्य जाणा ॥२॥ ज्या रूपें वेधनें ब्रह्मांड निर्मळे । तेंचि हें आकारलें कृष्णरूपें ॥३॥ निवृत्ति दिवटा कृष्णाचिया वाटा । नामेंचि वैकुंठा पावन होती॥४॥

**११९. विश्वीं विश्वपती असे पैं लक्ष्मीनाथ** । आपणचि समर्थ सर्वांरूपीं ॥१॥ तें रूप गोकुळीं नंदाचिये कुळीं । यशोदे जवळी बाळकृष्ण ॥२॥ सर्वघटीं नांदे एकरूपसत्ता । आपणचि तत्वतां सर्वांरूपीं ॥३॥निवृत्तीचें पार कृष्णचि पैं सार । गोकुळीं अवतार नंदाघरीं ॥४॥

**१२०. जेथें नाहीं वेदु नाहीं पैं त्या शाखा** । द्वैताचा हा लेखा हारपला ॥१॥ तें रूप वोळलें नंदायशोदे सार । वसुदेव बिढार भाग्ययोगें॥२॥ नमाये पुरता ब्रह्मांड उभवणी । त्यालागीं गौळणी खेळविती ॥३॥ निवृत्ति ब्रह्मसार सेवितुसे सोपें । नामें पुण्यपापें हारपती ॥४॥

१२१. **अष्टांग साधनें साधिती पवन** । ज्यासी योगीजन शिणताती ॥१॥ तो हा कृष्ण गोपीगोपाळांमाझारी । क्रीडा नानापरी करी आत्मा ॥२॥ अठरा साहिजणें बोलती परवडी । तो माखणासीं जोडी स्वयें कर ॥३॥ निवृत्तीचें ध्येय कृष्ण हाचि होय । गयनिनाथें सोय दाखविली ॥४॥

१२२. **ध्यानाची धारणा उन्मनीचें बीज** । लक्षितां सहज नये हातां ॥१॥ तें हें कृष्णनाम सखे नंदाघरीं । गौळियां माझारी ब्रह्म खेळे ॥२॥ न दिसे पहातां शेषादिकां गति । यशोदे श्रीपति बाळ जाला ॥३॥ गुंफलें मायाजाळीं अनंत रचनें । तो चतुरानना खुणें न संपडे॥४॥नकळे हा निर्धारु तो देवकी हो देवी । शेखीं तो अनुभवीं भुलविला॥५॥ निवृत्ति रचना कृष्णनाम सार । नंदाचें बिढार ब्रह्म जालें ॥६॥

१२३. **चतुरानन घन अनंत उपजती** । देवो देवी किती तयामाजि ॥१॥ तेंचि हें सांवळें अंकुरलें ब्रह्म । गोपसंगें सम वर्ते रया ॥२॥ निगमा नाठवे वेदांचा द्योतकु । तो चतुर्भुज वशु नंदाघरीं ॥३॥ निवृत्ति ह्मणे शंखचक्रांकित मूर्ती । आपण श्रीपती क्रीडतुसे ॥४॥

१२४. **ज्या रूपाकारणें देव ओळगणें** । योगी गुरुखुणें सेविताती ॥१॥ तें रूप गोकुळीं गोपाळांचे मेळीं । अखंड समेळीं खेळतुसे ॥२॥ ब्रह्मांड कडोविकडी ब्रह्मांड घडी । या योग परवडी हारपती ॥३॥ निवृत्तीचा तारू गोपाळ नंदाचा । यशोदे देवकीचा लाभ थोरु ॥४॥

१२५. **गगनग्रास घोटी ब्रह्मांड हें पोटीं** । चैतन्याची सृष्टी आपण हरी ॥१॥ देखिलागे माये सुंदर जगजेठी। नंदयशोदे दृष्टी ब्रह्म खेळे ॥२॥ आकाश सौरस तत्त्व समरस । तो हा हृषीकेश गोपीसंगें ॥३॥निवृत्ति साधन निरालंबीं ध्यान।तोचि हा श्रीकृष्ण ध्यान माझें॥४॥

१२६. **निज लक्षाचें लक्ष हारपलें भान** । दिनमान शून्य जयारूपीं ॥१॥ तें ब्रह्म गोजिरें गोपाळ संगतीं । संवगडे सांगाती भाग्यवंत ॥२॥ वेणु वाये ध्वनि यमुनाजळ स्थिर । ध्यानाचा प्रकार कृष्णराशी ॥३॥ निवृत्ति ह्मणे तें स्वरूप सौख्यडें । पाहाती चहूंकडे योगीजन ॥४॥

१२७. **अनंतरूप देव अनंत आपण** । अंतर्बाह्य खुण योगीयांसी ॥१॥ तो हा हरिमाये गोकुळीं अवतार । गोपिसंगें श्रीधर खेळतुसे ॥२॥ शास्त्रांसि नाकळे श्रुतीहि बरळे । तो गोपवेषें खेळे गोपाळांमाजी ॥३॥ निवृत्तीचें सार गयनी विचार । ब्रह्म चराचर माजि वसे ॥४॥

१२८. **जेथें न रिघे ठाव लक्षतां लक्षणें** । सूर्य तारांगणें हारपती ॥१॥ तें रूप रूपस कृष्णब्रह्मनाम । गौळिया सप्रेम वोळलेंसे ॥२॥ जेथें लय लक्ष हारपोन सोये । द्वैत हें न साहे सोहंबुद्धी ॥३॥ निवृत्ति मान्यता सेवितु साकार । आपण आकार गोपवेषें ॥४॥

१२९. **मीपणें सगळा वेदु हारपला** । शास्त्रांचा खुंटला अनुवाद ॥१॥ तें रूप सुंदर कृष्णनामें पार । निरालंब चर गोकुळींचें ॥२॥ सेवितां योगियां सुलभ दुर्गम । गौळियां सुगम नाम घेतां ॥३॥ निवृत्ति निकट कृष्णनाम सार । पापांचा संभार नामें छेदी ॥४॥

१३०. **जेथें नाहीं मोल मापाची गणना** । आपण येसणा ब्रम्हघडु ॥१॥ तें रूप साजिरें निर्गुण साकार । देवकी बिढार सेवियेलें ॥२॥ न संपडे ध्याना मना अगोचर । तो गोपवेषधर गोकुळींरया ॥३॥ निवृत्ती धर्मपाठ गयनि विनट । कृष्णनामें पाठ नित्य वाचा ॥४॥

१३१. **ज्या कारणें साधिती साधनें** । त्या गोकुळीं खेळणें भाग्यनिधी ॥१॥ तें रूप वैकुंट ब्रम्हादिकां पूज्य । योगियांचें भज्य आत्मलिंग ॥२॥ न पडे आगमा नाहीं त्यासि सीमा । तो गौळियांच्या कामा धांवे कृष्ण ॥३॥ निवृत्तीचें धन ब्रह्म हें रोकडे । गौळणी त्या कोडें खेळविती ॥४॥

१३२. **सुमना सुवासु तैसा हृषीकेशु** । आपण सौरसु जनीं इयें ॥१॥ मनादि इंद्रियें चैतन्याभीतरी । अंतर्बाह्य हरी एकु नांदे ॥२॥ हरीवीण दूजें शून्य त्रिभुवन । आपण जीवन तयामाजी ॥३॥ निवृत्ति सुमन जनवनसखा । वेदमुखें लेखा ऐसा आहे ॥४॥

१३३. **चिंतितां साधक मनासि ना कळे** । तो गोपिका आकळे करितां ध्यान ॥१॥ देखिलागे माये सगुण-निर्गुणनिधी । यशोदा गोविंदीं प्रेमपान्हा ॥२॥ न माये सर्वांघटीं आपणाचि सृष्टी । तो

यमुनेच्या तटीं गायी चारी ॥३॥ निवृत्ति साधन कृष्णाचें रूपडें। ब्रह्मांडाएवढें तदाकार ॥४॥

१३४. **सप्त पाताळें एकवीस स्वर्गें पुरोनि उरला हरि।** काया माया छाया विवर्जित दिसे तो आहे दुरी ना जवळी गे बाईये ॥१॥ प्रत्यक्ष हरि तो दाविपा डोळां ऐसा सद्गुरु कीजे पाहोनि। तनु मन धन त्यासि देऊनी ते वस्तु घ्यावी मागोनि गे बाईये ॥२॥ पावाडां पाव आणि करी परवस्तुसि भेटी ऐसा तोचि। तो सद्गुरु-विण मूढासि दर्शन कैंचें ऐसा तोचि चमत्कारु गे बाईये ॥३॥ एक मंत्र एक उपदेशिती गुरु। ते जाणावे भूमिभारु। निवृत्ति म्हणे तत्त्व साक्षित्वें दावी ऐसा तोचि चमत्कार गे बाईये ॥४॥

---

## सद्गुरुप्रसादानें प्राप्त झालेल्या स्थितीचें वर्णन.

१३५. **आदिनाथ उमा बीज प्रकटिलें।** मच्छिंद्रा लाधलें सहज-स्थिती ॥१॥ तेचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली। पूर्ण कृपा केली गयनि-नाथा ॥२॥ वैराग्यें तापला सप्रेमें निवाला। ठेवा जो लाधला शांतिसुख ॥३॥ निर्द्वंद्व निःसंग विचरतां मही। सुखानंद हृदयीं स्थिर जाला ॥४॥ विरक्तीचें पात्र अन्वयाचें मुख। देऊनि सम्यक् अनन्यता ॥५॥ निवृत्ति गयनी कृपा केली असे पूर्ण। कूळ हें पावन कृष्णनामें ॥६॥

१३६. **माता पिता नाहीं बंधु बोधु कांहीं।** सर्व सम डोहीं वर्तताती ॥१॥ सर्व आत्माराम भजन निष्काम। दिन काळ नेम भजनशीळ ॥२॥ दया वसे देहीं क्षमा ते माधवी। कासवीं शांभवी जनीं इये ॥३॥ निवृत्ति ह्मणे ऐसा गयनि सद्गुरु। उपदेश पूरु अमृताचा ॥४॥

१३७. **पूर्णबोधें धाले आत्माराम जाले।** निखळ वोतलें पूर्ण-तत्त्वें ॥१॥ पूर्वपुण्य चोख आह्मांसि सफळ। गयनि कल्लोळ तुसार आह्मां ॥२॥ चंद्र सूर्य कीर्ण आकाश प्रावर्ण। पृथ्वी अंथुरण सर्वकाळ ॥३॥ निवृत्ति ह्मणे तो गुरु धडफुडा। ब्रह्मांडा एवढा अनंत माझा ॥४॥

१३८. **आह्मां जप राम गुरुखूण सम।** जन वन धाम गुरुचेंची ॥१॥ नेघों हे कल्पना न चढो वासना। एका पूर्णघना शरण जाऊं ॥२॥

तप हें अमूप नलगे संकल्प। साधितां समीप जवळी असे ॥३॥ निवृत्ति ह्मणे मज निरोपिलें धन। हेचि ब्रह्मखुण जाणिजेसु ॥४॥

१३९. **आह्मां हेचि थोर सद्गुरुविचार**। नलगे संप्रधार नानामतें ॥१॥ नेघों ते कावाड न करूं विषय। ब्रह्मांड हें होय आत्माराम ॥२॥ नेदूं यासि दुःख उन्मनीचें सुख। न करूं तो शोक आला गेला॥३॥ निवृत्ति ह्मणे आह्मां सद्गुरु उपदेशु। सर्वांभूतीं वासु हरी असे ॥४॥

१४०. **चराचरीं हरि गुरुमुखें खरा**। माजि ब्रह्म सैरां विचरों आम्हीं ॥१॥ आह्मां ऐसें व्हावें तरीच हें भोगावें। निरंतर ध्यावें पोटाळूनी ॥२॥ नाहीं येथ काळ अवघे शून्यमय। निर्गुणीं सामाय तनु माझी ॥३॥ निवृत्ति ह्मणे पर त्रिकुटीं गोल्हाट। त्यावरील नीट वाट माझी ॥४॥

१४१. **नव्हे हें पोखणें नव्हे तें साधन**। उपदेश खूण वेगळी रया ॥१॥ न भेदें पालथें वज्र मढियेलें। जीवन घातलें न भरे घटु ॥२॥ नाइके उपदेशु नव्हे खुण सिध्दु। योनिसी प्रसिध्दु पढिलासे ॥३॥ निवृत्ति ह्मणे जरी कृपा करील गुरू। तरिच संप्रधारु धरी आत्मा ॥४॥

१४२. **साकार निराकार हे ब्रह्मींचे विकार**। तेथील अंकुर गुरुराज ॥१॥ रज तम नाहीं सात्विकही डोहीं। परिपूर्ण देहीं आत्माराम ॥२॥ सर्वघटवासि सर्वत्रनिवासी। आपण समरसीं बिंबलासे ॥३॥ निवृत्तीची खुण गुरुकृपा उद्धार। सर्व हा निर्धार आत्माराम ॥४॥

१४३. **कांसवीचीं पिलीं करुणा जरी भाकी**। परि सांपडली निकीं चरणसोय ॥१॥ कामधेनु घरीं हरि माझा गोपाळ। मज काळवेळ नाठवे तैसी ॥२॥ चातकाची चिंता जरी न पवे जीवन। तरीच शोकें प्राण तृषा हेतु ॥३॥ निवृत्ति स्वानंदु कामधेनु गुरु। नामाचा उच्चारु तेणें छंदें ॥४॥

१४४. **सार हें निःसार निवडुनि घेईन**। सर्व हा होईन आत्माराम ॥१॥ राम सर्वांघटीं बिंबलासे आह्मां। पूर्ण तो पौर्णिमा सोळा कळी ॥२॥ न देखों दुसरें हरिवीण काज। आणिकाचें चोज नाहीं तेथें ॥३॥ निवृत्ति गौरव गुरुमुखें घेत। आपणाचि होत समरसें ॥४॥

१४५. **पृथ्वी हे श्रीराम आकाश निजधाम**। आपण विश्राम एक-

रूपें ॥१॥ सूक्ष्मस्थूल राम साधक परम । नाम सर्वोत्तम सर्वांरूपीं ॥२॥ आकार विकार सम सारिखाचि हरी । बाह्य अभ्यंतरीं आपणाचि ॥३॥ निवृत्ति निष्टंक ज्ञान तें सम्यक् । गयानि विवेक सिद्ध पंथु ॥४॥

१४६. **प्राकृत संस्कृत एकाचि मथीत** । गुरुगम्य हेत पुराणमहिमा ॥१॥ वेदादिक मत शास्त्र तें बोलत । श्रुतीचा संपत वाद जेथें ॥२॥ पृथ्वी हे ढिसाळ आकाश कव्हाळ । जन मायाजाळ विरे तेथें ॥३॥ निवृत्ति ह्मणे गुरु गयानि सौरसु । आपण जगदीशु सर्वरूपीं ॥४॥

१४७. **प्रकृतीचा पैठा कल्पना माजिठा** । न पवे तो वैकुंठा कर्मजाडयें ॥१॥ अहिंसेचें स्वरूप हेंचि हरिरूप । न ह्मणे हरी आप सर्व आहे ॥२॥ नाहीं त्यासि जय नधरे सर्वथा । हरिवीण व्यथा कोण वारी ॥३॥ निवृत्ति ह्मणे धरी गुरुचरणसोये । तेणें मार्गें पाहे हरी सोपा ॥४॥

१४८. **चेतवी चेतवी सावधान जीवीं** । प्रकृति मांडवी लग्न वोजा ॥१॥ मातृका माया निवेदन हरी । प्रपंच बोहरी रामनामें ॥२॥ निवत्तिदेवीं अद्वैत परणिली शक्ति । निरंतर मुक्ति हरीनामें ॥३॥

१४९. **हरि आत्मा होय परात्पर आलें** । नाम हें क्षरलें वेदमतें ॥१॥ वेदांतासिद्धांत नाहीं अनु हेत । सर्वभूतीं हित हरी आहे ॥२॥ हरिवीण न दिसे गुरु सांगतसे । हरी हा प्रकाशे सर्वरूपीं ॥३॥ निवृत्ति कोंदलें सद्गुरूनें दिधलें । हरिधन भले आह्मां माजी ॥४॥

१५०. **सुमनाची लता वृक्षीं निपजली** । ते कोणे घातली भोगावया ॥१॥ तैसा हा पसारा जगडंबर खरा । माजि येरझारा शून्य खेपा ॥२॥ नाहीं यासि छाया नाहीं यासी माया । तो हा वृक्ष वाया विंदान करी ॥३॥ निवृत्तिराज ह्मणे तो गुरुविण न तुटे । प्रपंच सपाटे ब्रह्मीं नेत्रु ॥४॥

१५१. **छेदिला हा वृक्ष तुटलें तें मूळ** । प्रपंच समूळ उडाला रया ॥१॥ गेलें तें सुमन ठेले फलहेतु । अखंडता रितु गोपाळ रया ॥२॥ सांडिला आकारु धरिला अविकारु । सर्व हरिहरु रूप आह्मां॥३॥ निवृत्ति निधान वोळले गयनी । अमृताची धणी आह्मां भक्तां ॥४॥

१५२. **परम समाधान परमवर्येधन** । नाम जनार्दन क्षरलें असे ॥१॥ अक्षर अनंत क्षर हा संकेत । मागुतें भरत आपण्यामाजी

॥२॥ आपण क्षरला आपण उरला । वैकुंठीं वसिन्नला चतुर्भुज ॥३॥ निवृत्ति गुरुगयनी सांगतसे हरी । नाम चराचरीं विस्तारलें ॥४॥

१५३. **विस्तार हरीचा चराचर जालें।** त्या माजी सानुलें गुरु दैवत ॥१॥ गुरुविण व्यर्थ विज्ञान न संपडे । ज्ञान हेतुकडे हिंडणें व्यर्थ ॥२॥ गुरु परब्रह्म गुरु मातापिता । गुरूनें समता दाखविली ॥३॥ निवृत्ति ह्मणे गुरुबोध दिठी । भक्ति नाम पेटी उघडिली ॥४॥

१५४. **तुटलें पडळ भेटला केवळ।** सर्व हा गोपाळ गुरुमुखें ॥१॥ न देखों बंधन सर्व जनार्दन । व्यासादिकीं खूण सांगितली ॥२॥ ब्रह्मांडविवरण हरीचा हा खेळ । त्यांतील तो वेल तोडियेला ॥३॥ निवृत्ति बोधला गुरु खुण बोधु । मनाचा उद्बोधु हरिचरणीं ॥४॥

१५५. **मारुनि कल्पना निवडिलें सार।** टाकिलें असार फलकट ॥१॥ धरिला तो हरी गोंविलेंसें सर्व । विषयाची माव सांडियेली ॥२॥ पहातें दुभतें कासवी भरितें । नेवातें करितें तृप्त सदा ॥३॥ निवृत्ति अमृत गुरुकृपा तूं सार । सर्व हा विचार हरी केला ॥४॥

१५६. **आमुचा आचार आमुचा विचार।** सर्व हरिहर एक पुरे ॥१॥ धन्य माझा भाव सद्गुरू उपदेश । सर्व हृषीकेश दावियेला ॥२॥ हरिवीण दुजें नेणें जो सहजे । तया गुरूराजें अर्पियेलें ॥३॥ हरी हेंचि व्रत हरी हेचि कथा । हरिचिया पंथा मनोभाव ॥४॥ देहभाव हरी सर्वत्र स्वरूप । एका जन्में खेप हरिली माझी ॥५॥ निवृत्ति हा हरी प्रपंच बाहेरी । आपुला शरीरीं हरी केला ॥६॥

१५७. **सर्वांघटीं वसे तो आत्मा प्रकाशे।** प्रत्यक्ष आह्मां दिसे गुरुकृपा ॥१॥ विरालें तें ध्येय ध्यान गेलें मनीं । मनाची उन्मनि एक जाली ॥२॥ ठेला अहंभाव सर्व दिसे देव । निःसंदेह भव नाहीं आम्हां ॥३॥ निवृत्तिसाधन गयनिप्रसाद । सर्व हा गोविंद सांगतुसे ॥४॥

१५८. **हरिविण न दिसे जनवन आम्हां।** नित्य हे पौर्णिमा सोळा कळी ॥१॥ चंद्रसूर्यरश्मी न देखों तारांगणें । अवघा हरी होणें हेंचि घेवों ॥२॥ न देखों हे पृथ्वी आकाश पोकळी । भरलासे गोपाळीं दुमदुमीत ॥३॥ निवृत्ति निष्काम सर्व आत्माराम । गयनी हें धाम गुरुगम्य ॥४॥

 ४३७ ब, ना. पेठ

**१५९. स्वरूप साजणी निद्रिस्त निजलें ।** भलें चेताविलें गुरु-रायें ॥१॥ सावध सावध स्मरेंरे गोविंद । अवघा परमानंद दुमदुमित ॥२॥ निद्रेचिया भुली स्वरूपविसरू। प्रकाशला थोरु आत्माराम ॥३॥ निवृत्तिदेवो आनंद झालिया । लवति बाहिया स्वस्वरूपीं ॥४॥

१६०. **एक तत्व सांगती वेदादिक बडिवार ।** ब्रह्मकर्म आचार भजनालागीं ॥१॥ आदिमध्य अवसान सत्व रज तम । प्रकृति सम अळंकारले ॥२॥ सोहं पैं अनंतु सेवितां साचार । गुरुमुखें सार भ-जन केलें ॥३॥ देवीं नांदे रसना धर्मीं नांदे भावो । एक तत्वीं देवो क्षरला असे ॥४॥ आदिअंत हरपला नाहीं तेथें कल्पना । देहीं दीपभाना विठ्ठलचरणीं ॥५॥ याचेनि परिपाठें नासतील पापें । एक नाम सोपें हरीचें जाणा ॥६॥ निवृत्ति साम्यता सर्वांघटीं दिसतु । विठ्ठल हेचि मातु नित्य नेम ॥७॥

**१६१. मनाची वासना मनेंचि नेमावी ।** सर्वत्र धरावी विठ्ठल सोय ॥१॥ आपेंआप निवेल आपेंआप होईल । विठ्ठलचि दिसेल सर्वरूपीं ॥२॥ साधितां मार्ग गूढ वासना अवघड । गुरुमार्गीं सुघड उपरती ॥३॥ निवृत्ति वासना उपराति नयनां । चराचर खुणा हरी नांदे ॥४॥

**१६२. एक देव आहे हा भाव पैं सोपा ।** द्वैतरूपें बापा पडसी नरकीं ॥१॥ द्वैत सांडी अद्वैत धरी । एक घरोघरीं हरी नांदे ॥२॥ सबाह्य कोंदलें परिपूर्ण विश्वीं । तोचि अर्जुनासि दृष्ट जाला ॥३॥ गयनि प्रसादें निवृत्ति बोधु । अवघाचि गोविंदु अवघा रूपीं ॥४॥

**१६३. दिननिशीं नाहीं अवघा दीपक ।** एकारूपें त्रैलोक्य बिं-बलेंसें ॥१॥ तें रूप सांगतां नये पैं भावितां । गुरुगम्य हाता एक-तत्वें ॥२॥ सांडावें पैं कोहं धरावें पैं सोहं । अनेकत्व ओहं एकतत्वीं ॥३॥ निवृत्ति साकार वैकुंठींचें घर । देह हें मंदीर आत्मयाचें ॥४॥

**१६४. द्वैताचिये प्रभे नसोनि उरला ।** निराकार संचला एकरूपें ॥१॥ तें हें सांवळें स्वरूप डोळस । बाळरूप मीस घेतलेंसें ॥२॥ तिहीं लोकीं दुर्लभ न कळे जीवाशिवीं। तो आपणाचि लाघवी मावरूपें ॥३॥ निवृत्तीचें सार जिवशिव बिढार । गुरूनें निर्धार सांगितला ॥४॥

**१६५. निजतेज बीज नाठवे हा देह ।** हारपला मोह संदेहेसी

॥१॥ काय करूं कैसें कोठें गेला हरी । देहीं देहमापारी हरी जाला ॥२॥ विदेह पैं गंगा पारुषली चित्तीं । चिद्रुपीं पैं वृत्ति बुडोनि ठेली ॥३॥ गुरुलागीं भेटी निवृत्ति तटाक । देखिलें सम्यक् समरसें ॥४॥ चित्तवृत्ति धृति यज्ञ दान कळा । समाधि सोहळा विष्णुरूप ॥५॥ ज्ञानदेव गाये हरिनामांमृत । निवृत्ति त्वरित घरभरी ॥६॥

१६६. **नेणें पैं द्वैत अवघेंचि अद्वैत** । एक रूप मात करूं आह्मी ॥१॥ अवघाचि श्रीहरी नांदे घरोघरीं । दिसे चराचरीं ऐसें करा ॥२॥ सेवा गुरूचरण गुरुमूर्ति ध्यान । गयनि संपन्न ब्रह्मरसें ॥३॥ निवृत्ति चोखडा ब्रह्मरसु उघडा । गुरुकृपें निवाडा निवडिला ॥४॥

१६७. **ह्मणवितो नंदाचा बाळ यशोदेचा** । आपण चौवाचातीत कृष्ण ॥१॥ शब्दासि नातुडे बुद्धिसि सांकडें । तो सप्रेमें आतुडे स्मरतां नाम ॥२॥ उपचाराच्या कोडी न पाहे परवडी । तो प्रेमळाचीं घोडीं धुये अंगें ॥३॥ निवृत्तीचें तप फळलें अमुप । गयनिराजें दीप उजळिला ॥४॥

१६८. **अनंत ब्रह्मांडें अनंत रचना** । शून्य हे वासना तेथें जाली ॥१॥ मन गेलें शून्यीं ध्यान तें उन्मनीं । चित्त नारायणीं दृढ माझें ॥२॥ जेथें नाहीं ठावो वेदासि आश्रयो । लोपले चंद्र सूर्यो नाहीं सृष्टी ॥३॥ निवृत्ति ह्मणे तो ठाव मज पैठा । नेतसे वैकुंठा गुरु माझा ॥४॥

१६९. **बुद्धि बोध नाहीं क्षमारूप सर्व** । तेथें देहभाव अर्पियेला ॥१॥ नाहीं काळ वेळ नाहीं तो नियम । सर्व यम नेम बुडोनि ठेले ॥२॥ हरिरूप सर्व गयनिप्रसादें । सर्व हा गोविंद आम्हां दिसे ॥३॥ निवृत्ति सफळ गयनि बोलला । सर्वकाळ जाहला हरिरूप ॥४॥

१७०. **व्योमामाजि तारा असंख्य लोपती** । तैसे लक्ष्मीपती माजी विरों ॥१॥ धन्य दिवस नित्य सेवूं श्रीरामासी । जनवन समरसी पूर्णबोधें ॥२॥ तारा ग्रह दीन त्या माजि उन्मन । प्रपंचाचें भान दुरी ठेलें ॥३॥ निवृत्ति निमग्न नाम सेविताहे । ब्रह्मपणें होये सदोदीत ॥४॥

१७१. **खुंटिनलें मन तोडियेली गति** । वेल तो पुढती तोडियला ॥१॥ जाहालें गा उन्मन विरालें तें मन । श्रीराम चरण पुरे आह्मां ॥२॥ गेलें मन रामीं निष्काम कल्पना । बुडाली वासना तिये

डोहीं ॥३॥ धन्य ते चरण नित्यता स्मरण । अखंड संपन्न प्रेम देतु ॥४॥ अमृत कुपिका अमृताचा झरा । पाटु एकसरा वाहातुसे ॥५॥ निवृत्ति तिष्ठतु सप्रेमें डुल्लतु । मन हें निश्चितु रामपायीं ॥६॥

१७२. **सौजन्य समाधान सर्व जनार्दन** । आत्मरूपें धन इतुकें पुरें ॥१॥ गोपाळ माधव कृष्णरूपें सर्व । ब्रह्मपद देव सकळ आह्मां ॥२॥ नेघो द्वैतभाव भावो अद्वैत उपावो । सर्व ब्रह्म देवो एक ध्यावो ॥३॥ निवृत्तीचा भावो सर्व आत्माराम रावो । हरि हा अनुभवो वेदमतें ॥४॥

१७३. **मातेचें बाळक पितृचें जनक** । गोत हें सम्यकू हरी आह्मां ॥१॥ मुकुंद केशव हाचि नित्य भाव । हरिरूप सावेव कृष्णसखा ॥२॥ पूर्वज परंपरा तें धन अपारा । दिनाचा सोयिरा केशिराज॥३॥निवृत्तीचें गोत कृष्ण नामें तृप्त।आनंदाचें चित्त कृष्णनामें॥४॥

१७४. **विश्रामींचा श्रम आश्रम पैं नेम** । जप हा परम आत्मलिंगीं ॥१॥ वैकुंठ घनदाट कृष्णरूपें आह्मां । अखंड पूर्णिमा नंदाघरीं ॥२॥ निवृत्ति चित्ताची गेली झगबग । केला अनुराग कृष्णरूपीं ॥३॥ निवृत्ति धारणा कृष्णनाम सार । सर्वत्र आचार हरी हरी ॥४॥

१७५. **चातकाचें ध्यान मेघाचें जीवन** । आम्हां नारायण तैसा सखा ॥१॥ चकोरां अमृत चंद्र निववितें । भक्तांसि दुभतें हरी आह्मां ॥२॥ विश्रांतीसी स्थळ वैकुंठ सफळ । दुभतें गोपाळ कामधेनु ॥३॥ आशापाश नाहीं कर्तव्यता कांहीं । चिंतामणि डोहीं एकविध ॥४॥ समिरासगट गति पावली विश्रांति । नामरूप जाति भेदशून्य ॥५॥ नामाची हे धणी तेचि हो पर्वणी । तृप्तातृप्त तृप्ती होतु आम्हां ॥६॥ सांडिलें पैं द्वैत दिधलें पैं अद्वैत । हरिविण रितें न दिसे आम्हां ॥७॥ निवृत्ति परिवार मुक्तलग आगर । रत्नांचा सागर नामें वोळे ॥८॥

१७६. **साधक बाधक न बाधी जनक** । सर्व हरि एक आत्मा असे ॥१॥ हरीविण नाहीं हरिविण नाहीं । हरि हाचि पाही एकरूप ॥२॥ हरि माजी जन हरि माजी धन । हरि हा निर्गुण सर्वांठायीं॥३॥ निवृत्ति हरिलीळा दिनकाळ फळला । निमिषोनिमिष कळा हरी जाणे॥४॥

१७७. **त्रैलोक्य पावन जनीं जनार्दन** । त्यामाजि परिपूर्ण आत्मज्योति ॥१॥ नाहीं आम्हां काळ नाहीं आम्हां वेळ । अखंड सोज्वळ-

हरी दिसे ॥२॥ ब्रह्म सनातन ब्रह्मींचे अंकुर । भक्तिपुरस्सर भूत दया ॥३॥ निवृत्ति ह्मणे दीन दुर्बळ मी एक । मनोमय चोख आह्मां गोड४

१७८. **प्रपंच टवाळ वृक्षच हा सफळ** । उपटिलें मूळ कल्पनेचें ॥१॥ गेली ते वासना निमाली भावना । चुकलें बंधना यमपाश ॥२॥ उपजत मूळ खुंटलें तें जाळ । मायेचें पडळ हरपलें ॥३॥ निवृत्ति स्वानंद नित्यता आनंद । जन हा गोविंद आम्हां पुरे ॥४॥

१७९. **कल्पना कोंडूनि मन हें मारिलें** । जीवन चोरिलें सत्रावीचें ॥१॥ साजीव सोलीव निवृतीची ठेव । कृष्ण हाचि देव हृदयीं पूजीं ॥२॥ विलास विकृति नाहीं पैं आवाप्ति । साधनाची युक्ति हारपली ॥३॥ निवृत्ति कारण योगियांचे हृदयीं । सर्व हरि पाहीं दिसे आह्मां ॥४॥

१८०. **नामरूपीं सोय नाहीं जया रूपा** । तेथिलिये कृपा खेळों आह्मी ॥१॥ आह्मां हेंचि रूप अद्वैत स्वरूप । नाहीं तेथें कीलाफ कल्पनेचा ॥२॥ ध्येय ध्यान खुंटे प्रचंच हा आटे । नाम हें वैकुंठे नेतु असे ॥३॥ निवृत्ति साधन वृत्तीचें संपन्न । नाम हें जीवन अच्युताचें ॥४॥

१८१. **कल्पितें कल्पिलें चित्त आकाळिलें** । तन्मय घोळिलें चैतन्याचें ॥१॥ सांग माये कैसें कल्पिलें कायसें । सर्व हृषीकेश दिसे आम्हां ॥२॥ निवृत्ति समरस सर्व हृषीकेश । नाहीं आम्हां लेश कल्पनेमाजि ॥४॥

१८२. **नाहीं जनीं विजनीं विज्ञानीं** । निर्गुणकाहणीं आम्हां घरीं ॥१॥ सुलभ हरी दुर्लभ हरी । नांदे माजघरीं आमुचिये ॥२॥ आनंदे सोहळा उन्मनीचि कळा । नामाचि जिव्हाळा जिव्हे सदा ॥३॥ निवृत्तिदेवीं साधनीं राणीव । हारपला भाव इंद्रियांचा ॥४॥

१८३. **प्रपंचाची वस्ति व्यर्थ काह्या काज** । आह्मां बोलतां लाज येत सये ॥१॥ काय करूं हरी कैसा हा गवसे । चन्द्र सूर्य अवसे एकसूत्र ॥२॥ तैसें करूं मन निरंतर ध्यान । उन्मनि साधन आह्मां पुरे ॥३॥ निवृत्ति परिपाठ हरिनाम हेचि वाट । प्रपंच फुकट दिसे आह्मां ॥४॥

१८४. **सजीव साजिरी तिगुण गोजिरी** । नांदे माजघरीं आत्मराजु ॥१॥ सदाचार आह्मां नित्य हरिप्रेमा । नेणों मनोधर्मा प्रपंचाचिया ॥२॥ नित्य पैं सोंविळा अखंड पैं निर्मळा । ह्मणीं

बारा सोळा म्हणाल तया ॥३॥ निवृत्तिदेवीं कलिका पैं अमूप । विश्वींविश्वरूप दावीतसे ॥४॥

१८५. **देहाच्या देउळीं राउळ निद्रिस्त** । मायेचें अनुचित भुलिवेशी ॥१॥ चेतवला आत्मा अचेत पैं हरी । कर्म भरोवरी खुंटलें रया ॥२॥ भ्रांत माया सदा पैं वैरिणी । मारूनी जीवनीं जीव ठेवी ॥३॥ निवृत्ति अमर आत्माचि साचार । माया देवी घर ब्रह्म केलें ॥४॥

१८६. **सृष्टीच्या संमता सुरतरुतरु** । बोलिला विस्तारु धर्मशास्त्रीं ॥१॥ नेघों हे तरु प्रपंच परिवारु । प्रत्यक्ष ईश्वरु पुरे आम्हां ॥२॥ निवृत्ति निवांत हरीच सेवीत । दोअक्षरीं उचित इंद्रियासी ॥३॥

१८७. **चंदनाचें झाड परिमळें वाड** । त्याहूनि कथा गोड विठ्ठलाची ॥१॥ परिमळु सुमनीं जाई जुई मोगरे । त्याहूनि साजिरे हरि आह्मां॥२॥ आह्मां धर्म हरी आह्मां कर्म हरी । मुक्ति मार्ग चाऱ्ही हरी आह्मां ॥३॥ कल्पतरु इच्छेसि सागरु । त्याहूनि आगरु हरी माझा ॥४॥ निवृत्ति सुवासु ब्रह्माचा प्रकाशु । विठ्ठल रहिवासु आह्मां पुरे॥५॥

१८८. **पुरुष प्रकृति नांदताती घरीं** । अखंड शेजारीं ब्रह्मसुखें ॥१॥ नाहीं तया भुली प्रपंच अबोला । ब्रह्मसुखें धाला रहिवासु ॥२॥ विषयगरळा टाकिला अभिमानु । सर्व जनार्दनु आह्मां घरीं ॥३॥ निवृत्ति प्रकृति पुरुष नांदती । सर्वत्र श्रीपती होउनि ठेला ॥४॥

१८९. **द्वैताचा दुकाळ अद्वैताच्या देशीं** । प्रपंच उपवासी मेला रया ॥१॥नाहीं नाहीं चाड इंद्रियांचें कोड । कृष्ण हेंचि वाड हृदयीं आम्हां॥२॥ देहाचा दिवटा अखंड पैं केला । निरंतर सोहळा कळी नाहे ॥३॥ निवृत्ति परम निरंतर सम । सर्वांघटिं राम बिंबलासे ॥४॥

१९०. **आदि मध्य अंतीं तुज माजि बिंबावो** । ब्रह्मीं ब्रह्मथावो लवण जळीं ॥१॥ तैसें जालें ज्ञान उन्मनिं उलथा । प्रपंच पालथा निमालिया ॥२॥ रिगु निगु काज जाले तुझे धीरू । अवघाचि संसारू कळला आम्हां ॥३॥ गौप्य गुजराज उमजलासे हरी । दिसे अभ्यंतरीं आत्माराम ॥४॥ न देखसी ज्ञाना देहीं आत्माराम । घेतला विश्राम ऐसें दिसे ॥५॥ निवृत्ति निवांत समरसें पाहात । अवघाचि दिसत देहीं विदेहीं ॥६॥

**१९१. ज्ञानघन मुक्ति विज्ञानघन संपन्न** । सर्वघटीं चैतन्य हरी नांदे ॥१॥ त्या रूपें मोहिलें काय करूं साजगी । अखंड उन्मनि लागे त्याची ॥२॥ समाधि संजिवन कृष्णाचे पैं ध्यान । दिननिशीं मन निजरूप दिसे ॥३॥ निवृति घनवट स्वामी माझा दिसे । एकतत्त्व पैसे शोभतुसे ॥४॥

**१९२. आम्ही चकोर हरि चंद्रमा** । आम्ही कळा तो पूर्णिमा ॥१॥ कैसा बाहिजु भीतरी हरी । बिंबे बिंबला एकसूत्रीं ॥२॥ आम्ही देही तो आत्मा । आम्ही विदेही तो परमात्मा ॥३॥ ऐक्यपणें सकळ वसे । द्वैतबुद्धि कांहीं न दिसे ॥४॥ निवृत्ति चातक इच्छिताहे । हरिलागीं वरतें पाहे ॥५॥

**१९३. आह्मी किरण तूं सूर्यो** । आह्मी अस्तु तूं उदयो ॥१॥ कैसा देहीं देवो दिवटा । परा पश्यंती चारी वाटा ॥२॥ आह्मी कळा तूं चंद्रमा । तूं अमृत आह्मी गरिमा ॥३॥ आह्मी निधि तूं निधान । आम्ही ध्येय तूं साधन ॥४॥ निवृत्ति उपरती वाहे । हृदयीं कृष्णनाम ध्याये ॥५॥

**१९४. आह्मी बोध तुम्हीं बुद्धि** । आम्ही स्वयें तुम्हीं शुद्धि ॥१॥ कैसा देहीं देह हरी । सर्व नांदे चराचरीं ॥२॥ आम्ही सोहं धरूं भावें । तुवां हृदयींच ठसावें ॥३॥ निवृत्ति पाठ पदा । नामें वैकुंठ तें सदा ॥४॥

**१९५. अनुभवाच्या गांवीं ज्ञान हेंचि फळ** । विज्ञान केवळ वृक्ष तया ॥१॥ साधनीं स्वानुभव अनुभवीं अनुभव । ब्रह्माची राणीव आह्मां घरीं ॥२॥ रिकामा बरळू नसे खेळेमेळे । ब्रह्माची कल्लोळे भोगीतुसे ॥३॥ निवृत्ति सरळ निरसलें अज्ञान । सर्वत्र संपन्न आत्माराम ॥४॥

**१९६. पूर्विलीये क्षेत्रीं पूर्वज पूरता** । तरिच अरुता हरि दिसे ॥१॥ सर्वभावीं नाम वोळलें सर्वदा । अखंड गोविंदा गाऊं गीति ॥२॥ शामतनु हरि प्रभा दिसे भानु । तो माझा जीवनु हरि आह्मां ॥३॥ निवृत्ति आवडे सद्गुरु गयनी । चित्त नारायणीं तल्लीनता ॥४॥

**१९७. ध्यान ना उन्मनीं दृढ ना बंधनीं** । सर्वीं सर्व पूर्णी हरि एकु ॥१॥ वेदाचा वेदकु शास्त्रांचा विवेकु । श्रुति परलोकु हरि आह्मां

॥२॥ उगवलें क्षेत्र पिकतें घोळत । तैसें हें अनंतरूप दिसे ॥३॥ निवृत्ति चोखाळ गयनीप्रसाद । श्रीरंग गोविंद दिधला मज ॥४॥

१९८. **मी माझी कल्पना नाहीं मजसवें** । दिननिशीं उगवे हरि माये ॥१॥ हरिविण दुजें न देखें त्रिभुवनीं । नायकिजे कानीं भेदबुद्धी ॥२॥ वेदीं ठेलें कर्म शास्त्रासि मोहन । शेषासि अनुमान नकळे माये॥३॥ निवृत्तिदेवी घर हरी आमुचा माये । हरी एक पाहे विश्वरूपीं ॥४॥

१९९. **निमाली ते निशी पळाला तो दीन** । प्रपंचाचें भान लोपिन्नलें ॥१॥ हरिवीण नाहीं सूत्रधारी रूप । वासना संकल्प उपटिला ॥२॥ तोडियेलें सूत्र उगविला गळा । अखंड सोहळा ब्रह्मरूप ॥३॥ निवृत्ति निःसंग परब्रह्म चांग। फेडियला पांग गुरुराजें॥४॥

२००. **रूपस रूपडें दिसे चहूंकडे** । मन तेथें कोडें गोवियेलें ॥१॥ जाला पैं उलट सांपडली वाट । श्रीवैकुंठ पेठ आम्हांमाजीं ॥२॥ गेला पैल तीरा आणिलें कापुरा । दीप एकसरा पाजळिला ॥३॥ निवृत्तीचे दीप सद्गुरु पुरविले । भांडवल जालें हरिरूप ॥४॥

२०१. **नाहीं काळ वेळ नाहीं तो नियम** । सर्व यमनियम बुडाले रया ॥१॥ हरिरूप सर्व गयनीप्रसाद । सर्व हा गोविंद आम्हां दिसे ॥२॥ अच्युत अनंत नारायण हरी । नाम चराचरीं विस्तारलें ॥३॥ निवृत्ति सफळ गयनि बोळला । सर्व काळ झाला हरीरूप ॥४॥

२०२. **वेदादिक सम गुरुगम्य पार** । तोचि हा साचार गुरु उपदेशु ॥१॥ नाहीं येथ दुजे सर्व हरिराजे । गोपाळ सहजें विस्तारला ॥२॥ दुजेपणा काटी नियम निस्सीम । सदोदित राम पूर्णपणें ॥३॥ निवृत्ति उपदेशु ज्ञानासी सोहपा । सोपान मंडपा विरहीत ॥४॥

२०३. **हरी हेचि खूण सांगितली आह्मां** । जनवनसमा वर्ता तुम्हीं ॥१॥ ॐकार मूर्धनी करावा कीर्तनीं । नित्य ब्रह्मार्पणीं भजन भावें ॥२॥ नित्यकाळ कथा हरि विचरो सार । जनवन घर आह्मां असे ॥३॥ निवृत्ति म्हणे मी गुरूचा अंकीत । वाचे उच्चारीत हरी हरी ॥४॥

२०४. **सर्व परिपूर्ण भरलेंसे अखंड** । त्यामाजि ब्रम्हांड अनंत कोटि ॥१॥ आपणाचि देव आपणाचि भक्त । आपण विरक्त सर्व

जाला ॥२॥ अनंत संकेत जीवशिवरत । मागुतें भरत सिंधु तोयें ॥३॥ निवृत्ति म्हणती तेथींचे हे अंश । साधक विश्वास गयनिराजे ॥४॥

२०५. **भांडवल हरि पैल द्वीपांतरीं**। हरिरूप चारी दिशा पूर्ण ॥१॥ न दिसे तें भान दृश्य द्रष्टा हरी। सर्व घरोघरीं आत्माराम॥२॥ ज्ञानेसी विज्ञान गेले अनाठाया । हरीरूप छाया आम्हांवरी ॥३॥ निवृत्ति दिधला नामेंरूपें दिसे । सर्व हरी असे तेजोमय ॥४॥

२०६. **विवेक वैराग्य उन्मनी विनट** । हरिनामें वाट सांपडली ॥१॥ हरिनाम भला हरिकृष्ण भला । दीन उगवला ब्रह्मरूपें ॥२॥ हरी हरी सार वाचेसि उच्चार । सर्व हा श्रीधर पुरे आम्हां ॥३॥ निवृत्ति निर्माण एकनाम हरी । प्रपंच बोहरी कोटी राशी ॥४॥

२०७. **शिव शांति तेजें रवितेज बिंबे** । जीवशिवा बिजे समतेज ॥१॥ तैसें तुझें ज्ञान जालेंरे हें काज । केशवीराज चित्त जालें ॥२॥ समाधीचें रूप रूपासि आलें काह्या । पसरोनी बाह्या देत क्षेम ॥३॥ प्रवृत्ति निवृत्ति दोहींचे तटाक । उतरलासि एक शुद्धोदकें ॥४॥ क्षिर-निरहंसी जाला तुझा स्वादु । अवघाचि गोविंदु नांदे देहीं ॥५॥ निवृत्ति संपत्ति आलिया पैं हातां । तत्त्वीं तत्त्व नित्यता उलधा तुझा॥६॥

२०८ **विवरण सार हरिहर आप** । सर्व हरिरूप आपणपणें ॥१॥ आपरूपें गोविंद गोंविला सगळा । चरण कमळा विनटलों ॥२॥ भिन्न दुजें लाटे मन उफराटें । उन्मनिये वाटे भेदियेलें ॥३॥ निवृत्ति गो-ल्हाट मार्ग तो सपाट । भेदुनी त्रिकुट साधियेलें ॥४॥

२०९. **निगम नियम सर्व सर्वोत्तम**। दिननिशीं राम सेवितुसे॥१॥ आम्हां गोड हरी आम्हां चाड धरी । हरी तो संहारी आम्हांमाजी ॥२॥ नेघों हरिवीण दुजें तें पैं भिन्न । सांगितली खूण गुरुराजें ॥३॥ निवृत्ती गयनी प्रसाद उन्मनी । निरंतर ध्यानीं रामनाम ॥४॥

२१०. **मोडिला तो खेळ तोडियेलें सूत्र** । टाकिलें परत्र पैल रूप ॥१॥ रूपें केला गोड वासना मवाळ । जिव्हेसी वाचाळ हरी आला ॥२॥ शोधिलें जीवन निक्षेपिलें धन । मनोमय जाण हरी जाला ॥३॥ निवृत्ति गयनी ध्येय ध्याता ज्ञानी । अखंड निशाणी रामनामीं॥४॥

२११. **छेदिला समूळ प्रपंच विव्हळ** । तारक गोपाळ भवनिधी

॥१॥ नावाडा नाटकु उतरील तीरा। जन्म येरझारा एके खेपे ॥२॥ नाहीं तेथें मोल नाहीं तो विकरा । आपणाचि सौरा हिंडतुसे ॥३॥ निवृत्तीनें तीर टाकिलें पैं सार । जन्म येरझार तोडियेली ॥४॥

---

## पंढरीमाहात्म्य.

२१२. **अवीट अमोला घेतां पैं निमोला**। प्रत्यक्ष देखिला भीमातटीं ॥१॥ अव्यक्त साकार आकारिलें अंकूर । क्षरला चराचर भक्तिकाजें ॥२॥ अनुमान विटे सर्वघटीं माजिठे । तें परब्रह्म विटे भक्ति साह्य ॥३॥ निवृत्ति घनवट पिकलिसे पेठ। पंडालिकें प्रगट केलें कैसें ॥४॥

२१३. **पंढरीये चोख रूपडें अशेख**। भीमातीरीं देख पुण्यभूमी ॥१॥ आदिपीठ देव ब्रह्म हें स्वयमेव । पुंडलिक भाव प्रगटला ॥२॥ जन हें विव्हळ तारक गोपाळ । कीर्तनीं कळिकाळ दुरी ठाहे ॥३॥ नाम हें विठ्ठल नलगे पैं मोल । नित्यता सफळ पांडुरंग ॥४॥ त्रिविधताप पाप त्यजतील अमूप । पुरतील संकल्प एकानामें ॥५॥ निवृत्ति ह्मणे धन्य जो कीर्तन करी । सर्वत्र चराचरीं बोलियेलें ॥६॥

२१४. **पुंडलिकाचें भाग्य वर्णावया अमरीं**। नाहीं चराचरीं ऐसा कोणी ॥१॥ विष्णुसहित शिव आणिला पंढरीं । केलें भीमातीरीं पेखणें जेणें ॥२॥ ब्रह्मादिकां अंत न कळे ज्या रूपाचा । एवढी कीर्ति वाचा बोलों काय ॥३॥ निवृत्ति सांगे मातु विठ्ठल उच्चार । वैकुंठ उतरे एक्यानामें ॥४॥

२१५. **रूपाचें रूपस विठ्ठलनामवेष**। पंढरीनिवास आत्माराम ॥१॥ पुंडलिकभाग्य फळलें संपूर्ण । दिनानिशीं कीर्तन विठ्ठल हरी ॥२॥ त्रैलोक्य उद्धरे ऐसी पव्हे त्वरें । कीर्तन निर्धारें तरणोपाय ॥३॥ पुण्य केलें चोख तारिले अशेख । जनीं वनीं एक रूप वसे ॥४॥ वेदादिकमति ज्या रूपा गुंतती । तो आणूनि श्रीपति उभा केला ॥५॥ निवृत्तीचा सखा विठ्ठलरूप देखा। निरालंब शिखा गगनोदरीं ॥६॥

२१६. **भाग्याचेनि भाग्य उदो पैं दैवयोगें**। पुंडलिका संगें भीमातटीं ॥१॥ ध्यान मनन एक करितां सम्यक् । होय एकाएक एकतत्त्व ॥२॥ उदो अस्तु मैळें ब्रह्म न मैळें । भोगिती सोहळे

प्रेम भक्त ॥३॥ निवृत्ति निवांत विठ्ठल सतत । नघे दुजी मात हरिवीण ॥४॥

२१७. **निराकार वस्तु आकारासि आली** । विश्रांति पैं जाली भक्तजनां ॥१॥ भिवरासंगमीं निरंतर समी । तल्लीनता ब्रम्हीं उभी असे ॥२॥ पुंडलिक ध्याये पुढत पुढती सोये । विठ्ठल हेंचि गाये संकीर्तनीं ॥३॥ निवृत्तिसंकीर्तन ब्रह्म हें सोज्वळ । नाम हें रसाळ अनिर्वाच्य ॥४॥

२१८. **पहातां साधन विठ्ठलकीर्तन** । भक्तसंजीवन आत्माराम ॥१॥ विठ्ठल सधर भिवरा तें नीर । नाम निरंतर केशवाचें ॥२॥ शिवसुरवर चिंतिती सुखार । कीर्तनविचार पंढरीसी ॥३॥ निवृत्ति कीर्तन दिननिशीं ध्यान । मनाचें उन्मन इये रूपीं ॥४॥

२१९. **पुंडलिकपेठ वैष्णवाचा हाट** । करिती बोभाट हरिनामाचा ॥१॥ वोळलें अंबर अमृत तुषार । झेलीत अमर चकोर झाले ॥२॥ देव मुनी सर्व ब्रह्मादिक लोठे । पंढरीये पेठे प्रेमपिसे ॥३॥ निवृत्ति निर्वाळला ज्ञानदेव सोपान । खेंचर तल्लीन विठ्ठलनामें ॥४॥

२२०. **मन कामना हरि मनाची बोहरी** । चिंतितां श्रीहरी सुखानंद ॥१॥ तें पुंडलिक तपें वोळलें स्वरूपें । जनाचीं पैं पापें निर्दाळिलीं ॥२॥ वेणुनाद तीर्थ चंद्रभागा समर्थ । विठ्ठलदैवत रहिवासें निवृत्ति साकार विठ्ठल आचार । भिवरा तें नीर अमृतमय ॥४॥

२२१. **विठ्ठल श्रीहरी उभा भीमातीरीं** । तिष्ठती कामारी मुक्तिचारी ॥१॥ मुनिजनां सुख निरंतर लक्ष । भक्तां निजसुख देत असे ॥२॥ पुंडरिकपुण्य मी दीन कारुण्य । उद्धरिले जन अनंत कोटी ॥३॥ निरानिरंतर भीमरथी तीर । ब्रह्म हें साकार विटे नीट ॥४॥ नित्यता भजन जनींजनार्दन । ब्रह्मादिक खूण पावताती ॥५॥ निवृत्ति तत्पर हरीरूप सर्वत्र । नाम घेतां तृप्त आत्माराम ॥६॥

२२२. **भवजळ काया पंचतत्वमाया** । भजन उपाया पंढरीरावो ॥१॥ तारक पंढरी प्रसिद्ध भीमातीरीं । ब्रीदें चराचरीं बोले वेदु ॥२॥ माया मोहजाळ ममता निखळ । सेवितां सकळ होय हरी ॥३॥ निवृत्तीचें फळ सकळ गोपाळ । तोडी माया जाळ संकीर्तनें ॥४॥

२२३. **नित्य हरिकथा नित्य नामावळी** । वैष्णवाचे कुळीं धन्य जन्म

॥१॥ ह्मणोनि पंढरीं उपजावें संसारीं । प्रत्यक्ष श्रीहरी तीरीं उभा ॥२॥ नित्यता दिवाळी नाहीं तेथें द्वैत । नित्यता अच्युत तिष्ठतसे ॥३॥ निवृत्ति सधर विष्णुमय सार । विठ्ठल आचार पंढरीये ॥४॥

२२४. **प्रारब्ध संचित विठ्ठलदैवत** । कुळीं उगवत भाग्ययोगें ॥१॥ तें रूप पंढरीं उभें असे सानें । त्रिभुवन ध्यानें वेधियेलें ॥२॥ उगवली ज्योति प्रभा पैं फाकती । नाहीं दिनराती पंढरीये ॥३॥ प्रभात हरपे सायंकाळ लोपे । दिनमणी दीपे विठ्ठलप्रभा ॥४॥ पृथ्वी हे ढिसाळ वायु व्योमफळ। सेवितां अढळ जोडती रया ॥५॥ निवृत्ति सप्रेम जोडती सर्व काम । पंढरीये राम विश्रामले ॥६॥

२२५. **सर्व काम धन सर्व सिद्ध पूर्ण** । पतीतपावन हरि एकु ॥१॥ तें रूप पंढरीं पुंडलिका बोळलें । आणूनि ठेविलें भीमातीरीं ॥२॥ नलगती त्या सिद्धी करणें उपाधी । नित्य चित्तशुद्धी विठ्ठलनामें ॥३॥ कळिकाळासि त्रासु चित्तीं हृषिकेशु । उगवला दिवसु सोनियाचा ॥४॥ त्रिभुवनीं थोर क्षेत्र पैं सार । विठ्ठल उच्चार भीमातीरीं ॥५॥ निवृत्ति तत्पर निवाला सत्वर । नित्यता आचार विष्णुमय ॥६॥

२२६. **उघडें स्वरूप प्रत्यक्षाचे दीप** । नाम घेतां पाप हरे जनां ॥१॥ तें रूप विठ्ठल विनट सकळ । सेवा दिनकाळ पंढरीयेसी ॥२॥ रजतमें दुरी नामाची माधुरी । निशाणी एकसरी रामकृष्ण ॥३॥ भवाब्धितारक नावाडा विवेक । पुंडलिक देख सेवितुसे ॥४॥ विश्व हें तारिलें नामचि पिकलें । केशवीं रंगलें मन हेतु ॥५॥ निवृत्ति विठ्ठल सेवितु सकळ । दिनकाळफळ आत्माराम ॥६॥

२२७. **जनांसी तारक विठ्ठल हेंचि एक** । केलासे विवेक सनकादिकीं ॥१॥ तें रूप पंढरीं ओळलेंसें देखा । द्वैताची पैं शाखा तोडीयेली ॥२॥ उगवलें बिंब अद्वैत स्वयंभ । नाम हें सुलभ विठ्ठलराज ॥३॥ निवृत्तीचें गूज विठ्ठल सहज । गयनीराजें मज सांगितलें ॥४॥

२२८. **पिंड हा न धरी ब्रह्मार्पण करी** । विष्णु चराचरीं ग्रंथीं पाहे ॥१॥ तें रूप विठ्ठल ब्रह्माकार दिसे । पंढरीं सौरसें भीमातीरीं ॥२॥ जनाचे तारक पूज्य पुण्य श्लोक । तृप्त सनकादिक नामें होती ॥३॥ पतीतपावन नाम हें जीवन । योगियाचें ध्यान हरि आत्मा ॥४॥

वेणुनादीं काला पिंडाकृती जाला। भाग्यें भोगी केला दृष्टी पडे ॥५॥ निवृत्ति ह्मणे तें रूपडें अनंत। विठ्ठल संकेत तरुणोपय ॥६॥

२२९. **हरिविण व्यर्थ आचार समर्थ।** हरि हेंचि हीत अरे जनां ॥१॥ तें रूप पंढरी पुंडरिकसंगें। एका नामें पांग पाश तोडी ॥२॥ सर्व ब्रह्मार्पण कर्म करी जाण। वेदमतें खुण ऐसी असे ॥३॥ निवृत्तीचा देव सर्व हा गोविंद। नाहीं भिन्न भेद विश्वीं इये ॥४॥

२३०. **प्राणिया उद्धार सर्व हा श्रीधर।** ब्रह्म हें साचार कृष्णमूर्ती ॥१॥ तें रूप भीवरें पांडुरंग खरें। पुंडलिक निर्धारें उभें असे॥२॥ युगें अठ्ठावीस उभा हृषीकेशु। पुंडलिका सौरसु पुरवितु ॥३॥ निवृत्तीचें गुज पुंडरीक बीज। विश्वजनकाज पुरे कोडें ॥४॥

२३१. **ध्येय ध्याय मनीं उन्मनीं साधनी।** लाविता निशाणी ध्यानमार्गें ॥१॥ तें रूप सघन गुणागुणसंपन्न। ब्रह्म सनातन नांदे वीटे ॥२॥ विठ्ठलनाम सार ऐसाचि निर्धार। मुक्ति पारावार ती अक्षरीं ॥३॥ निवृत्ति निवांत केलेंसे मथीत। चित्त समर्पिलें पुंडलिकें ॥४॥

---

## पंढरींतील काला.

२३२. **काळवेषें दुरी काळचक्र करीं।** बाह्य अभ्यंतरीं हरी नांदे ॥१॥ सर्वत्र श्रीकृष्ण नंदाघरीं जाला। कृष्णें काला केला गोपवेषें॥२॥ गोपाळ संवगडे खेळवी लाडेकोडें। यशोदेमायेपुढें छंदलग ॥३॥ निवृत्ति ह्मणे तो स्वामी सकळांचा। दिनकाळ वाचा कृष्ण जपों ॥४॥

२३३. **नाहीं यासि गोत नाहीं यासि कूळ।** शेखीं आचारशीळ कोण ह्मणे ॥१॥ सोंवळा हा हरी गोकुळीं लोणी चोरी। तो यशोदा पाचारी थान ध्याया ॥२॥ बाळरूपें हरी वागवी शिदोरी। तो गोपाळांच्या करीं काला देतु ॥३॥ निवृत्ति संपूर्ण कवळु देतु पूर्ण। ब्रह्मसनातन गोकुळीं माये ॥४॥

२३४. **नुघडि तो दृष्टि न बोले तो वाचा।** हरिरूपीं साचा तल्लिनता ॥१॥ उठिं उठिं नाम्या चालरे सांगातें। माझे आवडते जीवलग ॥२॥ कुरवाळिला करें पुसतसे गूज। घेईं ब्रह्मबीज सदोदित ॥३॥ ज्ञानासि लाधलें निवृत्ती फावलें। सोपान घडलें दिनकाळ

॥४॥ तें हें रे सखया खेंचरासि पुसे । गुरुनामीं विश्वासे ब्रह्मरूपें॥५॥ निवृत्ति ह्मणे आतां अनाथ श्रीहरी । तूंचि चराचरीं हेंचि खुण ॥६॥

२३५. **आनंद सर्वांचा काला अरुवार** । नामया साचार फुंदतुसे ॥१॥ राहिरखुमामाई सत्यभामा माता । आलिया त्वरिता काल्यामाजी ॥२॥ उचलिला नामा प्रेमाचें फुंदन । नुघडी तो नयन कांहीं केल्या ॥३॥ बुझाबित राही रखुमादेवी बाही । पीतांबर साई करिती हरी ॥४॥ ज्ञानासी कवळु सोपानासी वरु । खेचरा अरुमारु कवळु देतु ॥५॥ निवृत्ति पूर्णिमा भक्तीचा महिमा । नामयासि सीमा भीमातीरीं ॥६॥

२३६. **सत्यभामा माये अन्नपूर्णा होये** । वेळोवेळां सोय कवळ मुखीं ॥१॥ राही रखुमाई आदिमाता मोहे । नामा तो उपायें बुझाविती ॥२॥ घेरे नाम्या ग्रास ब्रह्मींचा गळाला । आवडसि गोपाळा प्रीतीहूनी ॥३॥ कुर्वाळितो हरि नुघडि तो दृष्टी । सप्रेमाच्या पोटीं अधिक होसी ॥४॥ धरुनि हनुवटि पाहे कृपादृष्टी । आनंदाचे सृष्टि माजिनामा ॥५॥ निवृत्ति ज्ञानदेव सोपान चांगा हरी । यांसी परोपरी कवळु देतु ॥६॥

२३७. **उघडुनियां दृष्टि नामा पाहे पोटीं**।आनंदाची सृष्टि तया झाली ॥१॥ घेरे नाम्या कवळु आनंदाचा होसी । तुजमाजि निवासि हरी आहे ॥२॥ नामा पसरीं मुख आनंदला तृप्त । कवळु पूर्णभरित हरिराजा ॥३॥ निवृत्तीनें सेविला कवळु हा हरि । तूंचि चराचरीं दिससी आह्मां ॥४॥

२३८. **गोपाळ संवगडे आले वांडेंकोडें** । असंख्य बागडे हरिरूपीं ॥१॥ बिंबली पंढरी हरीरूपीं सार । अवघाचि शृंगार विठ्ठलराजु ॥२॥ कालिया कौशल्य नामदेव जाणे । तेथिलीये खुणे निवृत्तिराजु ॥३॥ ज्ञानदेव सोपान जगमित्र नागा । नरहरि वेगा झेलिताती ॥४॥ वैकुंठ सांवळे माजी भक्त मेळे । काला ऐक्य काळें करिताती ॥५॥ निवृत्ति पूर्णता घेऊनि उद्धारु । सेविला उदारु हरिराणा॥६॥

२३९. **तंव आनंदला हरि परिपूर्ण लोटला** । मुक्ताई लाधला प्रेमकवळु ॥१॥ चांगयाचे मुखीं घालीत कवळु । आपण गोपाळु दयासिंधु ॥२॥ दिधलें तें घेई पूर्णते तूं होई । सप्रेमाचे डोहीं संतजन ॥३॥

नामया विठया नारया लाधलें । गोणाई फावलें अखंडित ॥४॥ राहीरखुमाई कुरवंडी करिती । जिवें वोंवाळिती नामयासी ॥५॥ निवृत्ति खेंचर ज्ञानदेव हरि । सोपान झडकरी बोलाविला ॥६॥

२४०. **काला तंव निकट श्रीरंग समीप आले ।** भक्तांचे सोहळे पुरवितु ॥१॥ वेणुनादीं आला एकत्र पैं जाला । दहींभातु झेला झेलीतुसे ॥२॥ तोचि कवळु घेतु नामयासी देतु । ज्ञानासि भरीतु पूर्णतोषु ॥३॥ निवृत्ति सोपान कालवले कालीं । खेंचराची धाली तहानभूक ॥४॥

२४१. **वैष्णवांचा मेळ सकळ मिळाला ।** विठ्ठलनामेंकाला पंढरीसी ॥ १ ॥ हरिनाम विनट हरि उच्चारीत । सप्रेमें डुल्लत भक्तजन ॥ २ ॥ चालिला सोपान ज्ञानदेव निधी । मुक्ताई गोविंदीं तल्लीनता ॥३॥ निवृत्ति खेचर परिसा भागवत । आनंदें डुल्लत सनकादीक ॥४॥

२४२. **पाडुरंग हरि माजी भक्तजन ।** कैसें वृंदावन शोभतुसे ॥१॥ ब्रह्मादिक लाठे विमानें अंबरीं । काला तो गजरीं पंढरीये ॥२॥ सनकादिक देव देहुडापाउलीं । गोपाळ वाकुली दाविताती ॥३॥ पुंडलिक नाचे देवमुनि सर्व । भीमातीरीं देव प्रगटले ॥४॥ ज्ञानदेव सोपान विसोबा खेंचर । नरहरी सोनार नाचताती ॥५॥ निवृत्ति मुक्ताई चांगदेव गाढा । हरीचा पवाडा झेलिताती ॥६॥

२४३. **आपुलेनि हातें कवळु समर्पी ।** ब्रह्मार्पण मुखीं ब्रह्मरूपें ॥१॥ सोपान सांवता निवृत्ति निधान । यासि जनार्दन कवळु देतु ॥२॥ ब्रह्मपद हरि बाह्य अभ्यंतरीं । सर्वत्र श्रीहरि दिसे तया ॥३॥ देऊनि हस्तक पुशी पीतांबरें । पुसतसे आदरें यथाविधि ॥४॥ राहीरखुमाइ कासवी तुसार । अमृत पाझर सर्वांघटीं ॥५॥ निवृत्ति खेंचर सोपान सांवता । हरि कवळु देतां तृप्त जाले ॥६॥

२४४. **चांगया लाधलें नामया दिधलें ।** विठया फावलें हरिकृपा ॥१॥ प्रेमाचें पुतळे भीमातीरा आले । जयजयकार केले हरिभक्तीं ॥२॥ वैकुंठ आपण भक्तांमाजि खेळे । पुंडलिक लीळे खेळतुसे ॥३॥ निवृत्ति निवाला आनंदें नाचतु । उन्मनीं भरितु ज्ञानदेव ॥४॥

---

# नामसंकीर्तनमाहात्म्य.

२४५. न जाणती कळा कुसरी गोपाळा । नाम हें मंगळा अच्युताचें ॥१॥ हेंचि मज द्यावें सप्रेम आपुलें । ध्यातुसें पाउलें एवढ्यासाठीं ॥२॥ न मगे नेणे कांहीं याविण आणिक । सप्रेमाची भूक तृष्णा करी ॥३॥ समर्थाचे घरीं कांहीं नाहीं उणें । अखंड प्रेम देणें कृष्णनामीं ॥४॥ इतुकेंचि दातारा पुरवीं माझें कोड । यावीण काबाड भार नेघें ॥५॥ निवृत्ति सप्रेम संजीवनी मूळ । स्मरतां काळवेळ नाहीं नामीं ॥६॥

२४६. भावभक्ति प्रेम दया शांति क्षमा । अखंडित प्रेमा असों द्यावा ॥१॥ सर्वभूतीं भजन करावें सर्वथा । रामनाम कथा आरंभाव्या ॥२॥ आपपर देहीं विचार करावा । हरिनामें दोहावा सर्वांरूपीं ॥३॥ निवृत्तीचें जाप्य आनु नाहीं चित्तीं । रामनामें तृप्ती सदा असे ॥४॥

२४७. जनीं जनार्दन हाचि भावो दृढ । अवघेंचि गूढ नारीजना ॥१॥ जडमूढ तरती हरिनाम छंदें । एकानाम पदें वैकुंठ त्या ॥२॥ सत्वर उच्चार रामनाम चित्तीं । संसारखंती नाहीं तया ॥३॥ निवृत्ति सत्पद इच्छित सर्वदा । भिन्न भेद कदा नाहीं चित्तीं ॥४॥

२४८. हरि प्रेम नित्या ज्यासी पैं वसे । सर्वघटीं दिसे हरि आम्हां ॥१॥ रामकृष्णमाळा नित्य जप करी । तयासी संसारीं सुख आहे ॥२॥ अंतींचिये वेळे रामनाम जोडी । वैकुंठ परवडी तया नरा ॥३॥ निवृत्ति अखंड हरिध्यान चित्तीं । संसार समाप्ति जाली तया ॥४॥

२४९. नाम मुखीं सदा तोचि पैं भाग्याचा । तयासी यमाचा धाक नाहीं ॥१॥ रामराम हरि सर्वकाळ वसे । तेथेंचि वसे बसे हरी ॥२॥ हरिध्यान वसे अखंड पैं सर्वदा । न पवे तो आपदा इये जनीं ॥३॥ निवृत्ति समता हरिभजन करी। सर्वत्र कामारी ऋद्धिसिद्धी ॥४॥

२५०. आशा पिपाशा नेघों पैं चित्तीं । एका नामें तृप्ति सर्वकाळ ॥१॥ रामराम नाम आम्हांसी अखंड । नेणों पैं पाषांड नानामतें ॥२॥ हरिनाम वाचे सार मंत्र आम्हां । अखंडित प्रेमा वसे चित्तीं ॥३॥ निवृत्ति संचित गयनी पैं सांगे । एका श्रीरंगें जोडी करा ॥४॥

२५१. ज्याचे मुखीं नाम अमृतसरिता । तोचि येकु पुरता घट्

जाणा ॥१॥ नामाचेनि बळें कळिकाळ आपणां । ब्रह्मांडा येसणा तोचि होय॥२॥ न पाहे यम काळ तयाकडे अवचिता। नामाची सरिता ज्याचे मुखीं ॥३॥ निवृत्ति नामांमृत उच्चारी रामनाम ।नित्यता परब्रह्म याचे घरीं ॥४॥

२५२. नित्य नाम वाचे तोचि एक धन्य । त्याचेचि शुद्ध पुण्य इये जनीं ॥१॥ रामनामांकित नित्य नाम वाचे । दहन पापाचें एका नामें ॥२॥ ऐसा जो नित्यता पढतसे नाम । नाहीं तया सम दुजें कांहीं ॥३॥ निवृत्ति अव्यक्त रामनाम जपे । नित्यता सोहपे रामनाम ॥४॥

२५३. **अखंड जपतु नाममंत्र वाचे** । त्याहूनि दैवाचे कोण भूमीं ॥१॥ अमृतीं राहिला त्यासि कायसें मरण । नित्यता शरण हरिचरणा ॥२॥ नाममंत्रराशि अनंत पुण्य त्यासी । नाहीं पैं भाग्यासी तयाहूनी ॥३॥निवृत्ति ह्मणे सार रामनाम मंत्रु । कैचा त्यासि शत्रु जितीं जनीं॥४॥

२५४. **नाम नाहीं वाचे तो नर निर्दैव** । कैसेनी दैव फावेल तया ॥१॥ जपे नाम वाचे रामनाम पाठें । जाशील वैकुंठे हरि म्हणतां ॥२॥ न पाहे पैं दृष्टी कळिकाळ तुज । रामनाम बीज मंत्रसार ॥३॥ निवृत्ति म्हणे नाम जपावें नित्यता। आपणची तत्त्वता होईल हरी ॥४॥

२५५. **नामाचेनि बळें तरिजे संसार** । आणिक विचार करूं नको ॥१॥ नाम जपे वेगीं ह्मणे हरी हरी । प्रपंच बोहरी आपेआप ॥२॥ नित्यता भजन देवद्विज करी । नाम हें उच्चारी रामनाम ॥३॥ निवृत्ति जपतु रामनाम वाचे । दहन पापाचें आपेआप ॥४॥

२५६. **नलगे मंत्रसार न लगति तपें** । रामनाम सोहपें मूळ मंत्र ॥१॥ रामनाम मंत्र जप तूं रे जना । तुटेल यांतना भवमूळ ॥२॥ ज्याचेनि स्मरणें तरली पैं गणिका। वैकुंठ लोका प्राप्त जाली ॥३॥ निवृत्ति ह्मणे नाम हेंचि सार तप । जपकारे अमूप निरंतर ॥४॥

२५७. **वेगु करी मना धरावें पैं सार** । नामचि आचार रामनामें ॥१॥ तरसीरे जना स्मरतां नामावळी । राहसि आढळीं वैकुंठीं रया ॥२॥ सार तेंचि धरी असार तें निवडी । वैकुंठ चढोवढी रामनामें ॥३॥ निवृत्ति म्हणे सिद्ध असतां पैं मंत्रु । रामनामें शत्रु नाशतील ॥४॥

२५८. **नामाचेनि स्मरणें नित्यता पारणें**। तेंवि विठ्ठल नामनाणें पंढरीये ॥१॥ विठ्ठल विठ्ठल मंत्र हेंचि निजशास्त्र। विचारितां सर्वत्र दुजें नाहीं ॥२॥ नामेंविण मूर्ख नित्य पैं तया दुःख । नामें शुकमुख नित्य सदा ॥३॥ निवृत्तीचें जाप्य विठ्ठल नामपाठ। एका नामें पाप कोटि जाय ॥४॥

२५९. **रामनाम नित्य अखंड पैं चित्तीं**। तयाचे पुरती सर्व काम ॥१॥ रामराम नामें तुटती संसार। नाहीं त्या येरझार योनिमाळे ॥२॥ हरिध्यान आह्मां ह्याचि मंत्र थोर। न करी विचार अन्यशास्त्रीं ॥३॥ निवृत्ति अखंड जपतुसे नाम। हृदयीं सप्रेम मूर्ति त्याची ॥४॥

२६०. **हरिवीण दैवत नाहीं पैं अनुचित्तीं**।अखंड श्रीपति नाम वाचे ॥१॥ रामकृष्ण मूर्ती या जपा आवृत्ति। नित्य नामें तृप्ती जाली आम्हां ॥२॥ नामाचेनि स्मरणें नित्य पैं सुस्नात। दुजियाची मात नेणों आम्हीं ॥३॥ निवृत्ति जपतु अखंड नामावळी। हृदयकमळीं केशीराज ॥४॥

२६१. **परापवाद कानीं परनिंदा ह्मणीं**। ऐकतां निजमौनी कृष्ण जप ॥१॥ हरी हरी ह्मणे नायके ते मातु। द्वैत तया आंतु नेघे बापा ॥२॥ दुजियाची निंदा अपवाद सदा। वाचेसि गोविंदा जप करी ॥३॥ निवृत्ति तत्पर नाइके ते शब्द। नित्यता गोविंद जपतसे ॥४॥

२६२. **परनिंदा ह्मणीं परपीडा जनीं**। नित्यता कीर्तनीं हरि जपे ॥१॥ उच्चार पापाचा विभाग ये त्याचा। वेगें हरि वाचा जपे रया ॥२॥ दुजिया पिडणें द्वैत तेंचि जाण। अद्वैत ते खूण हरी एकू ॥३॥ निवृत्ति तटाक सर्व कृष्ण एक। अद्वैत हे लेख ब्रह्म सत्य ॥४॥

२६३. **मीपण कळलें तूंपण सांडिलें**। कल्पने तोडिलें मुळींहुनी ॥१॥ मुळ तें नुगवे फळ तें निमालें । हरि हें घेतलें जीवन हेतु ॥२॥ जालों पैं सरता हरिनाम पाठें । नेतसे वैकुंठे गुरुकृपा ॥३॥ निवृत्ति गयनी नाम नारायणीं । अखंडता ध्वनी रामनाम ॥४॥

२६४. **कामना कामीकु वासना तार्किकु**। रजतम सात्विकु एकरूपें ॥१॥ तें हें कृष्णमय कृष्णनामें बळे। भक्तीभाव निखळे पोखितसे ॥२॥ नित्य ते अनित्य आपणचि सत्य। कार्याकारण कृत्य हरपे जेथें ॥३॥ निवृत्तीचें ध्यान धारणा विसर। सर्व रूपें घर वैकुंठ माझें ॥४॥

२६५. **भवसागर सार तरणोपाव सोपा**। कृष्णनामें खेपा हरती जनां

॥१॥रामकृष्ण मंत्र जनांसि उद्धार।आणिक हे साचार मार्ग नाहीं॥२॥ निष्काम कल्पना आधीं साधीं मना। ऐक्य समीरणा हेंचि करीं ॥३॥ निवृत्ति धारणा गुरुचरण खुणा। ब्रह्मांड त्या खुणा गुरुकृपा ॥४॥

२६६. **नलगती धनें असार संपत्ती।** वायांचि गुंफती वासना रया ॥१॥ सार हरिनाम सार हरिनाम। नित्यता सप्रेम जपों आह्मीं ॥२॥ ध्येय ध्यान स्थिर मनाचा सांठा। नामेंचि वैकुंठा भक्त गेले॥३॥ निवृत्ति तत्पर रामनाम चित्तीं। एकानामें तृप्ति सर्वकाळ ॥४॥

२६७. **शांतीचें भजन क्षमेचा कळवळा।** गोपाळ सकळां देहीं नांदे ॥१॥ आचार पवित्र नामचि पैं पात्र। सांठविलें अक्षर दों अक्षरीं ॥२॥ रूपाचें सगुण निर्गुण दाटलें। नामेंचि आटलें मोहजाळ ॥३॥ निवृत्ति पडळ उडालें तें भान। गयनीनें ज्ञान उपदेशिलें ॥४॥

२६८. **रामनाम मुखीं तो एक संसार।** येऱ्हवीं अघोर नरक रया ॥१॥ संसार नरक रामनाम सार। तरले पामर पतित देखा ॥२॥ अजामेळा ऐसा तरला पतित। नारायण त्वरित आले तेथें ॥३॥ उघडा मंत्र मार्ग गोविंद स्मरणें। रामनामकीर्तन मोक्षपद॥४॥ निवृत्ति संचीत रामनाम महिमा। अवघीच पौर्णिमा सोळा कळीं ॥५॥

२६९. **शून्य साकार घटीं जीव शीव काष्ठीं।** मीपणासि तुटी एक्या-नामें॥१॥ तें हें नाम सोपें रामकृष्णमाळ। यासि काळवेळ नाहीं नाहीं ॥२॥ शून्य हेंही ठाये जीव जाये शिवीं। मन हें माधवीं हारपत॥३॥ निवृत्ति निमग्न शून्याकार घट। गुरुनामें मठ तेथें केला ॥४॥

२७०. **रामराम जप समत्वें साधावा।** अहंकार टाकावा अहंबुद्धी ॥१॥ सुटसी रे नामें आपेंआप संभ्रमें। नित्य नाम नेमें जप तूं जाये॥२॥ देवेंविण नाहीं सर्व शास्त्र बोले। हरिरूपीं बोधले तेचि धन्य ॥३॥ सुखावरी सुख निसंगरे आचरे। केशव निर्धारें तुष्ट सदां ॥४॥ निवृत्ति ह्मणे होईल अगाध। एकनामें गोविंद तुष्ट सदा ॥५॥

२७१. **प्रल्हाद परीक्षिती ध्रुव बाळ म्हणती।** उपमन्यूची गती क्षीरसागरीं ॥१॥ भक्त हे तरले नामाचेनि बळें। कळिकाळासि खेळे दों अक्षरीं॥२॥ आदि अंबऋषी भक्त निजसखा। दों अक्षरीं लेखा केला तेणें ॥३॥ उद्धव अक्रूर आणि तो विदूर। दों अक्षरीं पार

उतरले ॥४॥ हनुमंत दास रामनामें उदास। कळिकाळासी भाष सांगतसे ॥५॥ द्रौपदी सुभद्रा गोपाळ गोपिका। बळिभद्र सखा दों अक्षरीं ॥६॥ नंद तो वसुदेव उग्रसेन राजा। यादव पैं पैजा दों अक्षरीं ॥७॥ निवृत्ति म्हणे ते अक्षर दोनी राम। जपतां पावे धाम वैकुंठींचें॥८॥

२७२. **पुंडलिक सुख सांगतां अशेख**। दिनकाळ हरिख कोंदाटला ॥१॥ तें रूप सेविती मुनिजन साधु। विठ्ठलनामें कंदु तुटे जनां ॥२॥ नित्यता कीर्तन तुटेल बंधन। आत्माराम घन तुष्टेल जना ॥३॥ विवेक वैराग्य ज्ञानाचें सौभाग्य। नित्यता आरोग्य हरिनामें ॥४॥ पर्वणीचें सार विठ्ठल उच्चार। नित्यता आचार विठ्ठलनामें ॥५॥ निवृत्ति घनवट विठ्ठलनाम पेठ। नित्यता वैकुंठ पंढरीये ॥६॥

२७३. **हरिवीण चित्तीं न धरीं विपरीत**। तरताती पतीत रामनामें ॥१॥ विचारूनी पाहा ग्रंथ हे अवघे। जेथें तेथें सांगे रामनाम ॥२॥ व्यासादिक भले रामनाम पाठी। नित्यता वैकुंठीं तया घर ॥३॥ शुकादिक मुनि विरक्त संसारीं। रामनाम निर्धारीं उच्चारिलें ॥४॥ चोरटा वाल्मिक रामनामीं रत। तोही एक सरत रामनामीं ॥५॥ निवृत्ति साचार रामनामीं दृढ। अवघेंचि गूढ उगाविलें ॥६॥

२७४. **सर्वभूतीं दया शांति पैं निर्धारी**। तो योगी साचार जनीं इये ॥१॥ नलगे मुंडणें काया हे दंडणें। अखंड कीर्तनें स्मरे हरी ॥२॥ शिव जाणे जीवीं क्षरला चैतन्य। हें जीवीं कारुण्य सदाभावी ॥३॥ गगनीं सूर्य तपे अनंत तारा लोपे। एकुचि स्वरूपें आत्मा तैसा ॥४॥ उगवला कळीं उल्हासु कमळीं। तैसा तो मंडळीं चंद्र देखा ॥५॥ निवृत्तिमंडळ अमृत सकळ। घेतलें रसाळ हरिनाम ॥६॥

२७५. **गगनीचि तारा वायो वसे सैरा**। गगन गाभारा स्थिर होय ॥१॥ अवचित गगनीं वर्षे पैं संपूर्ण। आपणचि पतन तारा पावे ॥२॥ निवृत्ति तारा त्यापरी विचारा। रामनाम खरा तरावया॥३॥

२७६. **द्वैताची वाढी अद्वैत सुरवाडी**। नामाची परवडी आह्मां घरीं ॥१॥ नाम थोर आम्हां जपूं पैं साचार। विठ्ठल विचार हृदया माजी ॥२॥ निवृत्ति स्वानंदें विठ्ठलीं आनंद। नित्य परमानंद हृदयामाजी ॥३॥

२७७. **अचेत आत्मा चेतविला साचा** । प्रबोध नामाचा रामनामीं ॥१॥ हें सुख साचार निरंतर सर्वां । एकतत्त्वीं भावीं आचरण ॥२॥ निवृत्ति ह्मणे आत्मा हाचि पैं विठ्ठल । नाहीं बहुसाल कर्मकांड ॥३॥

२७८. रूप घ्यावो ध्यानीं आईकों पैं कीर्तनीं । पारणें श्रवणीं नयनाचिये ॥१॥ हृदयीं विठ्ठलु ध्याता निरंतरु । वैकुंठ साचारु प्राणियांसी ॥२॥ अनंत जन्माचें प्रायश्चित्त हरी । विठ्ठल साजिरी ब्रीदावळी ॥३॥ निवृत्ति साधन रूप ध्यान ध्यानीं । मनाची उन्मनि हरिचरणीं ॥४॥

२७९. **ध्यान धरा हरीं विश्रांति नामाची** । विठ्ठलीं साची मनोवृत्ति ॥१॥ ध्यानेंविण मन विश्रांतिविण स्थान । सूर्येविण गगन शून्य दिसे ॥२॥ नलगे साकार विठ्ठल मनोवृत्ति । प्रपंच समाप्ति ती अक्षरीं ॥३॥ निवृत्ति समता विठ्ठल किर्तन । करितां अनुदिन मनमेळे ॥४॥

२८०. **हरिवीण भावो तो वायांचि संदेहो** । हरिदेवा देवो आहे सत्य ॥१॥ हरिवीण वाचे ऐसें जया साचे । नाहीं त्या यमाचे मोहोजाळ ॥२॥ हरिवीण सार नाहीं पैं निर्धार । हरिवीण पार न पविजे ॥३॥ निवृत्ति श्रीहरि चिंतिता निरंतरी । हरि एकु अंतरीं सर्वी नांदे ॥४॥

२८१. **नाममंत्रसार नित्य निरंतर** । येणेंचि संसार तरे जाणा ॥१॥ एकेविण दुजें नाहीं नाहीं सहजें । नाम मुखें भोजे घेईजेसु ॥२॥ निवृत्ति ह्मणे पारु विठ्ठलीं उच्चारु । तयाचा संसारु मोक्षरूप ॥३॥

२८२. **मोक्षाचेनि देठें मोहपाशा गिळी** । कैसेनि गोपाळीं सत्ता होय ॥१॥ मोहाचें मोहन चिंतिता श्रीहरि । बाहिजु भीतरीं अवघा होय ॥२॥ दिनानिशीं नाम जपतां श्रीहरीचें । मग या मोहाचें मोहन नाहीं ॥३॥ निवृत्ति आगम मोहन साधन । सर्व नारायण एकातत्त्वें ॥४॥

२८३. **प्रवृत्ति निवृत्ति या दोन्ही सहज** । जनीं वनीं काज करूनी असती ॥१॥ नारायणनाम जपतांचि दोन्ही । एकतत्त्वींकरणीं सांगिजे गुज ॥२॥ आशेचे विलास गुंफोनि महिमा । तत्त्वीं तत्त्व सीमा निजज्ञानें॥३॥निवृत्ति तत्त्वता मनाचें मोहन।नित्य समाधान रामनामें

२८४. **सम सुखाचें विषम मोहाचें** । द्वैत पापाचें घेसी ह्मणीं ॥१॥

समसेज बाज सर्वत्वरे भोगी । एकरूप जगीं हरी नांदे ॥२॥ स्वरूप सुलभु हरि माझा लाठा । नामेंचि वैकुंठा नेतु असे ॥३॥ निवृत्ति दिवटा सर्वकाळ जपे । वैकुंठ सोपें एक्यानामें ॥४॥

२८५. **नामांमृत पिक हेंचि घेई सुख** । नलगती शोक जन्ममृत्यूचे ॥१॥ रामनामकथा साधि का परमार्था । पावसील पैं हिता नाम घेतां ॥२॥ विश्व हें पैं अंध मायेचें विशद । नेणे अर्थभेद तरुणोपाय ॥३॥ निवृत्ति ह्मणे रूप तें प्रकाशलें दीप । पंढरिसमीप भीमातीरीं ॥४॥

२८६. **हरिविण भाव तो सर्वेचि व्यर्थ** । हरि हा समर्थ भाव थोर ॥१॥ रामकृष्णनाम हाचि थोर उच्चार । भावा भाव सार एका नामें ॥२॥ नित्य नाम घोष उच्चारितां वाचे । यम काळ साचे वंदी तया ॥३॥ निवृत्ति स्मरस्तु रामनाम भाव । सर्व एक देव चाड आम्हां ॥४॥

२८७. **मन गेलें देवीं ध्यान गेलें रूपीं** । राहिलें स्वरूपीं तल्लीन देखा ॥१॥ सुखदुःख नाहीं सुखदुःख नाहीं । नाम मात्र पाहीं हरी बोले ॥२॥ एकतत्त्व सार रामनाम सुख । नलगे ते भूक प्रपंचाची ॥३॥ निवृत्ति सत्वर उच्चारण नाम । वैकुंठधाम तया देहीं ॥४॥

२८८. **एक तत्व हरि असे पैं सर्वत्र** । ऐसें सर्व शास्त्र बोलियेलें ॥१॥ हरिनामें उद्धरे हरिनामें उद्धरे । वेगीं हरित्वरें उच्चारी जो ॥२॥ जपतां पैं नाम यम काळ कांपे । हरी हरी सोपें जपिजेसु ॥३॥ निवृत्ति ह्मणे हरि नामपाठ जपा । जन्मांतर खेपा अंतरती ॥४॥

२८९. **जपतां कुंटिणि उतरे विमान** । नाम नारायण आलें मुखा ॥१॥ नारायण नाम तारक आह्मां । नेणों पैं महिमा अन्य तत्त्वीं ॥२॥ तारिले पतीत नारायण नामें । उद्धरिलें प्रेमें हरिभक्त ॥३॥ निवृत्ति उच्चार नारायणनाम । दिननिशीं प्रेम हरी हरी ॥४॥

२९०. **उपरति मनाची साधन विदेही** । तरिजेल बाही रामनामें ॥१॥ हरिविण सुटिजे ऐसें नाहीं बोलिलें । सर्वही शोधिलें शास्त्र आम्हीं ॥२॥ द्वैताची हे वाढी प्रपंचाच्या घरीं । अद्वैत कामारी भोगिजेसु ॥३॥ निवृत्तीचें सार हरी हरी निर्मळ । साधन केवळ हरिपाठें ॥४॥

२९१. **एकेवीण दुजें नाही पैं सृष्टी** । हें ध्यान किरिटी दिधलें हरी ॥१॥ नित्यता श्रीहरी जनीं पैं भरला । द्वैताचा अबोला तया

घरीं ॥२॥ हरीविणें देवो नाहीं नाहीं जनीं । अखंड पर्वणी हरि जपतां ॥३॥ निवृत्ति साकार हरिनाम पाठ । नित्यता पैं वाट हरिपाठें ॥४॥

२९२. **हरिमार्ग सार येणेंचि तरिजे ।** ये-हवीं उमजे संसार रया ॥१॥ जपतां श्रीहरी मोक्ष नांदे नित्य । तरले पैं सत्य हरिनामें ॥२॥ काय हें ओखद रामनाम अमृत । हरिनामें तृप्त करी रया ॥३॥ निवृत्ति साचार हरिनाम जपतु । नित्य हृदयांतु हरी हरी ॥४॥

२९३. **संसार सुफळ हरिनाम उच्चारितां ।** ये-हवीं मरतां अधोगति ॥१॥ संसार असारु श्रीपाति साचारु । नामेंवीण पारु न पविजे ॥२॥ हरिहरि ह्मणतां उतरले पार । दुर्धर संसार तरले रया ॥३॥ निवृत्तीचा जप हरी हा उच्चार । संसारसागर तारक हरी ॥४॥

२९४. **राम नाम वाचे तोचि एक धन्य ।** त्याचेंचि शुद्ध पुण्य इये जनीं ॥१॥ रामनामांकित नित्य मंत्र ज्याचे । दहन पापाचें एका नामें ॥२॥ ऐसा जो नित्यता पढतसे नाम । नाहीं तया सम दुजें कांहीं ॥३॥ निवृत्ति अव्यक्त रामनाम जपे । नित्यता सोहपें रामनाम ॥४॥

२९५. **सर्वरूपें हरी ऐसें मन करी।** वासना प्रहरी नामपाठें ॥१॥ रामकृष्ण वाड सर्व हें वैकुंट । दिसेल प्रकट निजरूपें ॥२॥ व्रत तप तीर्थ नाम हें अनंत । माजि सामवत आत्मनाथीं ॥३॥ निवृत्ति ह्मणे तें नाम नामनुदे जप । फळले संकल्प रामनामें ॥४॥

२९६. **विश्वीं हा विश्वात्मा क्षरला असे आत्मा ।** अहं बोध रामा दूर करी ॥१॥ भाव धरी जनीं विचरे जनार्दनीं । हरिनाम कीर्तनीं सुख भोगी ॥२॥ येथुनि हें सर्व आकारले भाव । रोहिणीची माव ऐसी आहे ॥३॥ निवृत्ती सागर सेवी पांडुरंग । रंगे हा श्रीरंग सर्व रंगें ॥४॥

---

## संतमहिमा.

२९७. **शांति क्षमा दया सर्वभावें करुणा ।** तोचि नारायणा आवडे दासु ॥१॥ तोचि एक साधु बोलिजे पैं जनीं । निरंतर ध्यानीं कृष्णमूर्ति ॥२॥ जीवशिव एक सर्वत्र चैतन्य । ऐसें जया कारुण्य तोचि धन्य ॥३॥ तोचि एक भक्तु हरिहरि ह्मणे । नित्य नारायणें

तारिजे त्यासी ॥४॥ येउनी जनीं सदा पैं तो विदेही। तारकु सबाहीं सप्रेमळु ॥५॥ निवृत्ति सांगतु भक्तीचा महिमा। करी शांति क्षमा तो विरळा असे ॥६॥

२९८. **हरिदास संगें हरिरूप खेळे**। ब्रह्मादिक सोहळे भोगिताती ॥१॥ संत मुनिदेव सनकादिक सर्व। तींहीं मनोभाव अर्पियेला ॥२॥ पुंडरिकफळ बोललें सफळ। शंकर सोज्वळ प्रेमें डुले ॥३॥ निवृत्ति लोळत चरणरजीं लाठा। माजि त्या वैकुंठा आत्मलिंगीं ॥४॥

२९९. **सोपान संवगडा स्वानंद ज्ञानदेव**। मुक्ताईचा भाव विठ्ठलराज ॥१॥ दिंडी टाळघोळ गाती विठ्ठलनाम। खेचरासी प्रेम विठ्ठलाचें ॥२॥ नरहरि विठा नारा ते गोणाई। प्रेमभरित डोहीं वोसंडती ॥३॥ निवृत्ति प्रगट ज्ञानदेवा सांगे। पुंडलिकसंगें हरी खेळे ॥४॥

३००. **बोळलें दुभतें सर्वांसि पुरतें**। प्रेमाचें भरतें वैष्णवांसी ॥१॥ लोळती चरणीं वैष्णव गोमटे। पुंडलिकपेठे हरी आला ॥२॥ सोपान खेचर ज्ञानदेव लाठा। देताती वैकुंठा क्षेम सदा ॥३॥ निवृत्तीनें हृदयीं पूजिलें तें रूप। प्रत्यक्ष स्वरूप विठ्ठलराज ॥४॥

३०१. **धन्य हा खेचर धन्य हा सोपान**। भक्तीचें जीवन जनक हेतु ॥१॥ धन्य याचें कूळ पवित्र कुशळ। नित्य या गोपाळ जवळी असे ॥२॥ याचेनि स्मरणें नाशती दारुणें। कैवल्य पावणें ब्रह्मामाजि ॥३॥ निवृत्ति ह्मणे परब्रह्म हें साकार। तेथील अंकुर उमटले ॥४॥

३०२. **कमळाच्या स्कंधी गुणी गुढारलें**। वरी आकारलें फूल तया ॥१॥ सुमनाचेनि वासें भ्रमरभुलले। मार्ग पैं विसरले इंद्रियांचा ॥२॥ तैसेहे संत विठ्ठलीं तृप्त। नित्य पैं निवांत हरिचरणीं ॥३॥ नाठवे हे दिन नाठवे निशीं। अखंड आह्मांसि हरिराजा ॥४॥ तल्लिन प्रेमाचे कल्लोळ अमृतांचे। डिंगर हरीचे राजहंस ॥५॥ टाहो करूं घोरु विठ्ठल कीर्तनें। मनाच्या सुमनें हरी पुजूं ॥६॥ निवृत्ति निवांत तल्लीन पैं जाला। प्रपंच अबोला हरिसंगें ॥७॥

३०३. **गयनि गहिवरु कृपेचा उद्गारु**। वरुषला उदारु अमृतमय ॥१॥ तोचि ओघ साचा मुक्ताईसी लाठा। चालिलों वैकुंठा समारंभें ॥२॥ कुंचे गरुडटके टाळ श्रुति हरी। चालिलें गजरीं हरिसंगें ॥३॥ निवृत्ति वैष्णव सोपान खेचर। करिताती गजर हरिनामाचा ॥४॥

# उपदेश.

## जन व मुमुक्षु यांस उपदेश.

३०४. **देहाच्या दीपकीं एकी वस्तु चोख**। असोनियां शोक कां करितोसी ॥१॥ देहभरी आत्मा नांदे निरंतर। असतां हा विचार कां धांवतोसी ॥२॥ तुझें तूं पाहीं आहे तें घेई। एकरूप होई गुरुखुणें ॥३॥ निवृत्तीचें सार हरिरूप सदा। नित्य परमानंदा रातलासे ॥४॥

३०५. **समता धरा आधीं टाका द्वैतबुद्धी**। आपेआप शुद्धि गोविंदीं रया ॥१॥ शम नांदे हरि विषम अघोरीं। निवृत्ति चराचरीं सांगतुसे ॥२॥ शमशेजबाज शम केशिराज। शमेतुष्टे भोज आत्मराज ॥३॥ निवृत्तीचें धन अखंड परिपूर्ण। आपणाचि नारायण तुष्टे सदा ॥४॥

३०६. **देहीं देव आहे हें बोलती वेद**। परि वासनेचें भेद न दवडिती ॥१॥ वासना पैं चोख तेथेंचि वैकुंठ। भावोचि प्रगट होये जनां ॥२॥ नलगती सायास करणें उपवास। नाममात्रें पाश तुटे जनां ॥३॥ निवृत्ति पहातु देहामाजि प्रांतु। देवोची दिसतु सर्वांघटीं ॥४॥

३०७. **सर्व हरि दिसे जनींवनीं वसे**। भव दृश्य भासे भक्तजनां ॥१॥ ऐसें कांहीं करा सहज तें आचरा। जन्मभरोवरा पडों नका ॥२॥ भावना श्रीधर भाविक हरिहर। भजनीं श्रीवर सर्व तुष्टे ॥३॥ निवृत्ति निधान आत्मा हाचि जीवन। भवयुक्त धन भावें पावे ॥४॥

३०८. **परासी परते परनिंदा नको**। सर्व विष्णु एको हेंचि ब्रह्म ॥१॥ यातें पैं निंदितां न पवसी अच्युता। हरिहरि ह्मणतां उद्धरसी ॥२॥ जन ब्रह्म हरि यातें ह्मणें निंदितां। ब्रह्मसायोज्यता न पविजे ॥३॥ निवृत्ति तत्पर सर्व लेखी आप। वासना संकल्प रामकृष्ण ॥४॥

३०९. **दुजियाची निंदा दुजेपण सदा**। द्वैत तें गोविंदा नावडे रया ॥१॥ दुजेपणा भिन्न सर्व जनार्दन। ब्रह्म सनातन पावसी रया ॥२॥ वाया द्वैतभाव दुजिया छळणें। ब्रह्म हें येसणें ठाव नेदी ॥३॥ निवृत्ति ह्मणे तो नर येथें गुंफला। द्वैताचा गोविला योनिमाळे ॥४॥

३१०. **अपशब्द कानीं पडतांचि द्वैत**। नाम हें अच्युत नये रया ॥१॥ परनिंदा पीडा करितांचि मूढा। पडिलासि वेढा योनिमाळें ॥२॥

आपस्तुति नको आपपर एको। विष्णुपणें लोपो भान तुझें ॥३॥ निवृत्ति सत्वर द्वैत हें निरसी। अद्वैत समरसीं दिधला असे ॥४॥

३११. **आपपर शून्य आपीं करी लीन।** आपपर जाण हरी असे ॥१॥ करितां उपाधि द्वैत तें उपजे। तया अधोक्षजें नुद्धरिजे ॥२॥ दुजिया सौजन्य दुजेपण सांडी। अद्वैत पैं मांडी सुखगोष्टी ॥३॥ निव्रृत्ति साकार परासि अद्वैत। परे परमांमृत गोपवेषें ॥४॥

३१२. **वासनेचें द्वैत सांडुनि परतें।** अद्वैता अरुतें भोगी हरी॥१॥ दुजियाची सृष्टि नाहीं नाहीं भिन्न। सर्व नारायण बिंबलासे ॥२॥ आत्मरूपें जन मानी कारे मूढा। होसी माजिवडा ब्रह्मामाजि ॥३॥ निव्रृत्ति ह्मणे द्वैत सांडी सांडीं कथा। अद्वैत अच्युता नित्य सेवीं ॥४॥

३१३. **पितृ मातृ निंदिता द्वैत हेंचि खोटें।** अर्चन गोमटें एको विष्णु ॥१॥ निंदिता पितरांसि नपवे हृषीकेशी। योनीचे माळेसि गुंफसील ॥२॥ वित्त शाठ्य करी प्रपंचाचरण। पितृ जनार्दन न पावसी॥३॥ निवृत्ति ह्मणे नरु द्वैताचा पामरु। अद्वैतीं सुरवरु नाहीं रया ॥४॥

३१४. **कल्पना मासोळी भवजाळ जळीं।** पाशाचिये जाळीं गुंतताहे ॥१॥ मायाजाळ गोंवी भवसिंधु दावी। मन हें माधवीं गोंवी जनां ॥२॥ विषयाचें पोखणें पाहातां तेथ शून्य। ह्मणी हें तूं मन जाऊं देसी ॥३॥ निव्रृत्ति साधन मन हें आवर। गुरुचरणीं स्थिर बिढार धरी ४

३१५. **भवार्णव हेतु काय सांगो मातु।** कल्पना हे तंतु छेदीयेला ॥१॥ नाहीं आह्मां ठावो नाहीं आह्मां गांवो। वासना संदेहो बुडलासे ॥२॥ मनाचें सुमन हरिचरण स्थान। जन जनार्दन यया हेतु॥३॥ निव्रृत्ति निरोपण ब्रह्म हें साधन। गुरुकृपा खूण हिता आली॥४॥

३१६. **आगम निगम सर्व सर्वोत्तम।** दिनदिशीं राम सेवीतसे ॥१॥ आत्मा गोड हरि आह्मां चाड धरी। अरिते संहारी आह्मांमाजी ॥२॥ नेघो हरिविण दुजें तेथें भिन्न। सांगितली खूण गुरुराजें ॥३॥ निवृत्ति गयनि प्रसाद उन्मनी। निरंतर ध्यानीं रामनाम ॥४॥

३१७. **कल्पना काजळी कल्पिलें कवळी।** कैसेनि जवळी देवो होय ॥१॥ टाकीं हे कल्पना दुरित वासना। अद्वैत नारायणा भजकारे ॥२॥ मोहाच्या जीवनीं नको करूं पर्वणी। चिंती कां आसनीं

नारायण ॥३॥ निवृत्ति अरुवारु कृष्णनाम पैं सारु । कल्पना साचारु हरी जाला ॥४॥

३१८. **भाग्येविण नसे जनां भाव वसे** । तेथें सर्व दिसे हरि माये ॥१॥ फळलें अमूप कृष्णनाम तप । उच्चारितो खेप हरे जना ॥२॥ नंद ते यशोदा देवकी मुकुंदा । वसुदेव सदा भाग्यनिधी ॥३॥ निवृत्ति संपूर्ण गुरुमुखें खुण । भाग्येंविण जाण नये मुखा ॥४॥

३१९. **निःसंदेह हरि भावयुक्त करी** । भजन निर्धारी सत्वशीळ ॥१॥ रज तम खंडी वासना हे मुंडी । चित्त हें अखंडी हरिपंथी ॥२॥ साधन हरिपंथु हाचि निज हेतु । गुरु मुखें मातु ऐशी असे ॥३॥ निवृत्तीचें धन हरि आत्मा जाण । हरि हाचि पूर्ण जनकु रया ॥४॥

३२०. **सुखदुःख कांहीं भजनप्रवाहीं** । मायामोह पाही हरि रया ॥१॥ हरिरूपीं सुख हरिरूपीं दुःख । हरिरूप शोक आत्मा माझा ॥२॥ साकार निराकार सर्व हा आचार । हरिरूप सार भजनभाव ॥३॥ निवृत्तीचें ज्ञान हरिरूप ध्यान । मनाचें उन्मन हरिरूपीं ॥४॥

३२१. **पितृपिता हरि पूर्वज पुरातनु** । नाम नारायणु पांडुरंग ॥१॥ तो ध्यायिजे जनां अद्वैत वासना । द्वैताची भावना दुरी करी ॥२॥ वेदार्थाचा अर्थ पहातां समर्थ । तोचि हा भरींत कृष्णराजु ॥३॥ निवृत्तीचा जपु गयनी समीप । सर्व कृष्णरूप गुरु माझा ॥४॥

३२२. **द्वेषितां अच्युता द्वेषता पूर्णता** । नपवे अनंता भाव त्याचा ॥१॥ भावेंशील काज भावें अधोक्षज । भावें सकळ काज सफळ होय ॥२॥ भाविक भजन भाविक पूजन । तेथें जनार्दन तुष्टतसे ॥३॥ निवृत्ति करुणा भाव नारायणा । सर्व जनार्दना अर्पियेलें ॥४॥

३२३. **पितृगोत माता भजन स्वभावता** । जन्मोनि अनंता प्रिय होसी ॥१॥ तोचि भजनपंथ सुगम समर्थ । नित्यता अनंत तृप्त असे ॥२॥ पितृमाता विष्णु एक भाव प्रश्नु । दिननिशीं कृष्णु न विसंबे रया ॥३॥ निवृत्ति सादर कृष्ण परात्पर । माता पिता सार आह्मां होये ॥४॥

३२४. **कैवल्य देहीं आत्मा असोनि हिंडसी** । गर्भवासा येशी नाना जन्मीं ॥१॥ मन करीं एकट आत्मा करीं सुभट । आपेंआप वैकुंठ एकातत्वें ॥२॥ या रूपें चिंतितां आत्मरूपें पाहतां । तत्त्वींतत्त्व समता

मिळोनि जाये ॥३॥ निवृत्ति सधर एकतत्वीं विचार। मन मार्ग साचार हारपला ॥४॥

३२५. **क्षेमाचा विस्तार क्षेत्रज्ञ वृत्ति**। अवघीं हे क्षिती एकरूपें ॥१॥ शांति दया पैसे क्षमा जया रूप। अवघेंचि स्वरूप आत्माराम ॥२॥ निंदा द्वेष चेष्टा या अभिमान भाजा। सांडुनियां भजा केशवासी ॥३॥ निवृत्ति तिष्ठतु एकरूप चित्त। अवघींच समस्त गिळियेलीं ॥४॥

३२६. **तिमिर पडलें प्रपंच भासे**। झाकोळला दिसे आत्मनाथ ॥१॥ हरिवीण दुजें चिंतितां निभ्रांत। अवघेंचि दिसत मायाभ्रम ॥२॥ सांडूनि तिमिर सर्व नारायण। हेंचि पारायण नित्य करीं ॥३॥ निवृत्ति सज्जन अवघा आत्माराज। एकतत्वबीज जपा लाहो ॥४॥

३२७. **दिसे वरिवरि नाम अवघें वैकुंठधाम**। जपतो शिव वर्म रामनाम ॥१॥ तें रूप समरस गोकुळीं हृषीकेश। नंदाघरीं गोपवेषें हरि खेळे ॥२॥समाधिधनधाम वैकुंठ हरिसम। योगियां पूर्ण काम हृदयीं सदा ३ निवृत्तीनें कथिलें गुरुगयनी प्रसादेंसकळ हा गोविंद आत्माराम ४

३२८. **भक्तिज्ञान वैराग्य तिहींचें शोधन**। जनीं जनार्दन हेंचि खरें ॥१॥ भक्तीविण देव नपवे सावेव। रोहिणीची माव तैसा दिसे ॥२॥ वैराग्यें तापलें ब्रह्मांड देखिलें। वासनें मुंडिलें निःसंदेहें ॥३॥ निवृत्ति ज्ञानार्क विज्ञान सम्यक। भावशीळ देख जनीं इये ॥४॥

३२९. **लटिका संसार वाढविसी व्यर्थ**। विषयाचा स्वार्थ ह्मणें करीं ॥१॥ नको शिणों दुःखें कां भरसि शोकें। एकतत्त्वें एकें मना लावीं ॥२॥ लावीं उन्मनी टाळी टाळिसी नेई बाळी। अखंड वनमाळी हृदयघटीं ॥३॥ निवृत्ति चपळ राहिला अचळ। नाहीं काळ वेळ भजतां हरी ॥४॥

३३०. **गगनीं अभ्र चाले चंद्र असे निश्चळ**। पृथ्वीतळीं बाळ चाले ह्मणे ॥१॥ भ्रमाचें भुलीव आलेंसे पडळ। प्रत्यक्ष केवळ डोळियांसी ॥२॥ असें तें न दिसे नसे तें अभासे। विषयांच्या विषें घारलेंसे ॥३॥ निवृति कवळ भ्रमाचा सांडिला। अखंड ध्यायिला हृषीकेश ॥४॥

३३१. **मोक्षमुक्ती चारी एकतत्त्व हरी**। बाहिजुभीतरीं हरि करी ॥१॥ तराल स्वभावें एकाएक देवें। एक हरी भावें ऐसा कीजे॥२॥

टाका हें पैं द्वैत अद्वैत सिद्धांत। मोक्ष मार्ग हेत एकातत्त्वें ॥३॥ निवृत्तीचा मार्ग एक रूपें सांग। नाहीं पैं पांग कल्पनेचा ॥४॥

३३२. **गगनींचा ईश गगनीं समरसे**। अवचिता काळपाश टाकी-तुसे ॥१॥ न लोटे पैं निशी कैंचा अहर्निशी। काळाचे कवेसि जनु आहे ॥२॥ निवृत्ति ह्मणे जन नेणतां पतन। हरिचरणीं मन स्थिर राहे ॥३॥

३३३. **देवेवीण ठावो नाहीं रये मही**। आत्मप्रकाश पाहीं बिंबलासे ॥१॥ वासना संगु करिते पांगु। जिवशिव भंगु कल्पनेचा ॥२॥ सर्व जीवशिव हाचि धरा भाव। हारपला सर्व हरी रूपीं ॥३॥ निवृत्ति तारक हरिरूप एक। हाचि एक विवेक एकतत्त्वीं ॥४॥

३३४. **ज्ञानाचिया गोष्टी सांगतो चावटी**। भाव नाहीं पोटीं ते काय करूं ॥१॥ भावबळें देव भावबळें देव। भक्तीचा स्वभाव ऐसा असे ॥२॥ जनां उपदेशी जनीं हृषिकेशी। आपण भक्तीसी दुऱ्हावितु ॥३॥ निवृत्ति ह्मणे भक्तिभाव हा सफळ। तेथें अद्वैत कृपाळ बिंबलेंसे ॥४॥

३३५. **मी माझें रोकडें केलें फाडोवाडें**। ब्रह्मांडा एवढें ढिसाळ थोर ॥१॥ मी माझें टवाळ अवघाचि गोपाळ। मी तूं हें सोज्वळ ब्रह्मरूप ॥२॥ मीपण उतरे तूंपणत्व नुरे। वेगीं विठ्ठल धुरे शरण जावें ॥३॥ निवृत्ति ह्मणे मीतूंपणें सगळा। तुजमाजि गोपाळा रहिवासु ॥४॥

३३६. **समता वर्तावी अहंता खंडावी**। तेणेंचि पदवी मोक्ष-मार्ग ॥१॥ क्षमा धरीं चित्तीं अखंड श्रीपति। एक तत्त्व चित्तीं ध्या-ईजेसु ॥२॥ नाम हाचि मंत्र नित्य नाम सार। दुसरा विचार घेऊं नको ॥३॥ अन्य शास्त्रें भजतां नाहीं पैं मुक्तता। हरिनाम गातां मुक्ति रोकडी ॥४॥ नित्य सुख ध्यावें नामचि अनुभवावें। तरिच सुख पावावें इहींलोकीं ॥५॥ निवृत्ति भजन नित्य अनुष्ठान। एक-रूपध्यान मनीं ध्यातु सदा ॥६॥

३३७. **क्षमा सम नेम हाचि परिपूर्ण**। राम होई तूं निष्काम निःसंदेह ॥१॥ तूंचिरे साचार होसील पूर्णता। निर्गुणी समता नाहीं जैसी ॥२॥ व्योमामाजीं अभ्र जातसे सरळ। त्यासी अळुमाळ दृश्य नव्हे ॥३॥ निवृत्ति ह्मणे नव्हे हें तैसें चोख। अंतरबाह्य वेष आत्मरूपें ॥४॥

३३८. **दीपाची कळिका दीपींचि सामावे**। तैसा जिवशिव

वोळखीवोजी ॥१॥ दीप आहे देहीं तयाचे हे प्रकाश । त्याचेनि सावकाश हरी भजे रया ॥२॥ न मिळे आयुष्य न मिळे घटिका । देह क्षण एका जाईल रया ॥३॥ निवृत्तीचा दीप दीपाचिये मुसे । आटोनि सौरसें एक जाला ॥४॥

३३९. **भेदूनि ब्रह्मांड आणियेली कळा** । नित्यता सोहळा हरिप्रेमें ॥१॥ हरि धरा चित्तीं मन मारा मुक्ती । प्रपंचसमाप्ति हरिपाठें ॥२॥ विश्रांतिशीं स्थान आसनीं शयनीं । हरिध्यानपर्वणी पुरे आह्मां ॥३॥ निवृत्तिसागर हरिरूप नित्य । सेविला तो सत्य दो अक्षरीं ॥४॥

३४०. **जाणिवेचेनि पैसे वासना हे हिंडे** । आनान ब्रह्मांडें शोधिताहे ॥१॥ तैसें नको जनां निरंतर वासना । वैकुंठ भजना करी जो रया ॥२॥ जाणीवनेणीव अवघा श्रीअनंत । नेणोनि उचित हरि भज ॥३॥ निवृत्तीचे तट भजन अविनाश । भजनेंचि पाश तुटे रया ॥४॥

३४१. **संसार भ्रमें भ्रमले हे जीव** । नेणती हे माव रोहिणीची ॥१॥ जाईल हा देह सरेल आयुष्य । आपेंआप भविष्य उभें राहे ॥२॥ वेगु करा आधीं रामनाम चिंतना । जंव नाहीं पाहुणा काळ आला ॥३॥ सर्वत्र श्रीराम ऐसा करा वाचे । सुटतील मोहाचे मोहपाश ॥४॥ तिमिरपडळ निमाली पैं दृष्टी । प्रपंच हे सृष्टि दिसतुसे ॥५॥ निवृत्तीचें सार रामकृष्णनाम । वैकुंठ परम सर्वकाळ ॥६॥

३४२. **आकारी दिसे निराकारी वसे** । तोचि हृदयीं दिसे अरे जना ॥१॥ नाहीं तो आहे न दिसे ना पाहे । अवघा होउनि राहे तन्मयता ॥२॥ स्वरूप उखर मनोमन सार । एकतत्त्व निर्धार हरी नांदे ॥३॥ निवृत्तीची खूण अवघेंचि होणें । एका नारायणें भरलें दिसे ॥४॥

३४३. **परंपरा भक्त उद्धरिले प्रेमें** । सांडिलें दुर्गमें संसारिकें ॥१॥ नसतें भवभय होतें जें मानसीं । स्मरतां नाम त्यासी नाहीं केलें ॥२॥ पाहतां तुझें नाम रूप दृश्य नोहे । तो भक्तालागीं होय कृष्णठसा ॥३॥ निवृत्तीचें नाम रूप निराकार । कृष्ण हा साचार गयनी कृपा ॥४॥

३४४. **एकरूपें दिसे भेदरूप भासे** । ज्ञानियासी कैसें एकतत्व ॥१॥ तत्त्वता श्रीहरी एक असे सर्व । सांडूनी देहभाव पूर्ण पाहा ॥२॥ देवेंविण कोठें रितें नाहीं सर्वथा । संपूर्ण पुरतां हरी आहे ॥३॥ निवृत्तीची खूण एकतत्वरूपें । पाहातां सोहपें गुरुखुणें ॥४॥

---

## ज्ञान.

३४५. **उन्मनी अवस्था लागली निशाणी** । तन्मयता ध्यानीं मुनीजनां ॥१॥ मन तेथें नाहीं पहासीरे कांहीं । सर्व हरी डोहीं बुडी देका ॥२॥ मनाची कल्पना देहाची भावना । शून्य ते वासना हरिमाजी ॥३॥ निवृत्ति ह्मणे सर्व हरिपिक पिकलें । ज्ञानासी लाधलें गुरुकृपा ॥४॥

३४६. **सनकसनंदन भक्त अंतरंग** । हरिरूपें सांग पूर्ण झाले ॥१॥ तेथील उद्‍बोध उद्धार पारुषे । सर्व हाची दिसे हरी आम्हां ॥२॥ बुद्धिबोध नाहीं क्षमारूप सर्व । तेथें देहभाव अर्पियेला ॥ ३ ॥ निवृत्ति निःसंग सुलभ श्रीरंग । टाकिला उद्वेग कल्पनेचा ॥४॥

३४७. **ध्येय ध्याता ध्यान ज्ञेय ज्ञाता ज्ञान** । दृश्य द्रष्टा भान हारपती॥१॥ पूज्यते पूजक पूजन स्वभाव । अंतीं ब्रह्ममेव ब्रह्मामाजी॥२॥ तेची हे धारणा तर्क सर्व पूर्णा । विवेकही खुणा सहज स्थिती ॥३॥ निवृत्ति धारणा ब्रह्म सनातना । नित्य नारायणा चिंतितुसे ॥४॥

३४८. **श्रुतिशास्त्र वेद यांसि नाहीं भेद** । भेदवादी द्वंद्व वेगळा पडे ॥१॥ वेगळे भाविता वेगळाची होये । ब्रह्मासि न साहे तेथींचा मळु ॥२॥ माळेसी वेंगिला राहाटी गोंविला । तो कैसा सुटला बोलों आह्मीं ॥३॥ निवृत्ति साधन न करा हा विश्वास । गुरुविण पाश न तुटती ॥४॥

३४९. **सर्व हरि ब्रह्म वेदादिकमतीं** । श्रुतीही बोलती तेणें पंथें ॥१॥ ब्रह्मामाजि जयो ब्रह्मांड उदयो । ब्रह्म हें स्वयमेवो आत्माराम ॥२॥ शास्त्रें समवाय उपनिषदें गाती । चैतन्याची सृष्टी ब्रह्ममय ॥३॥ निवृत्ति निरोपण सर्व नारायण । हरिविण दिन रिता नाहीं ॥४॥

३५०. **भक्तीचें महिमान भक्तांसि फळलें** । दीनकाळ केलें ब्रह्मार्पण ॥१॥ ब्रह्मार्पणें राम संतोषरूप जाला । ब्रह्मरूप केला आपण ऐसा ॥२॥ सर्वब्रह्म राम वेदादिक शब्द । आपण गोविंद सर्वांघटीं ॥३॥ निवृत्तीनें ब्रह्म देखिलें परिपूर्ण । माजि सनातन ब्रह्मसुखें ॥४॥

३५१. **विनट विठ्ठला प्रकृति अबोला** । सतत संचला नेणो हरी ॥१॥ मोहें वेटळला पाहे चहूंकडे । प्रपंच गडबडे लोळतुसे ॥२॥ निवृत्तिदेवीं प्रपंचु पैं सोडिला । प्रकृति अबोला ब्रह्मडोहीं ॥३॥

३५२. **तंत आणि वितंत त्यामाजि मथित** । नाद उमटत स्वानंदाचा ॥१॥ सोहं बीजतत्व गुरुनाम मंत्र । ज्ञानी उपासित हरिराज ॥२॥ मेदुनी कुंडलिनी गोल्हाट निकट । आत्माराम पेठ पांडुरंग ॥३॥ निवृत्ति ह्मणे मी सर्वस्व होईन । हरी हा भरीन पूर्ण देहीं ॥४॥

३५३. **गोविलीं चरणीं टाकिली सांडणी** । विषय पोखणी दुरी ठेली ॥१॥ पाहाट पाहाली ब्रह्में उगवली । दिननिशीं जाली एकरूप ॥२॥ नाहीं तारा ग्रह नाहीं हे मेदिनी । सर्व जनार्दनीं बिंबलेंसे ॥३॥ निवृत्ति निकट ब्रह्म सर्व घोट । अवघा निघोट राम आह्मां ॥४॥

३५४. **देहाचि दिवटी अखंड पैं सतेज** । चंद्रसूर्य भोज नाहीं तेथें ॥१॥ नाहीं तेथें रवि नाहीं तेथें चंद्र । अवघाचि महेंद्र एकतत्त्वें ॥२॥ दीपकोंचि दीपक विस्तार अनेक । अवघाचि त्रैलोक्य एकतत्त्वें ॥३॥ निवृत्ति संपन्न एकतत्त्व सेवी । सर्वत्र गोसावी दिसे आम्हां ॥४॥

३५५. **व्यर्थ हा प्रपंच विस्तारला साचा** । पाहातां आहाचा फुकट रया ॥१॥ सर्व घटीं हरि क्षरोनियां घरीं । वैकुंठ कामारी भोगीतुसे ॥२॥ यासी नाहीं द्वैत आपणचि अद्वैत । सर्वरूपीं संमत एकतत्वें ॥३॥ निवृत्ति प्रतिमा वयत्रयसा व्योमा । प्रपंच गरिमा नाहीं तेथें ॥४॥

३५६. **निराकारी घर आकारलें व्यर्थ** । सांगतां परमार्थ न बुझे हरी ॥१॥ काय करूं माये कैसा हा गोवळू । सरळ सुकळु नाहीं ह्मणे ॥२॥ देहाचा दीप कीं नाहीं म्हणे माया । तेजाकारें छाया हाचिं घेतु ॥३॥ निवृत्तीचें सार प्राणापानीं स्थिर । मनें चराचर आराधिलें ॥४॥

३५७. **प्रथम अक्षर क्षरलेंसे साचार** । तेंचि चराचर बिंबलेंसे ॥१॥ अर्जुनीं क्षरला अक्षर संचला । विश्वरूपें अबोला एकतत्त्वें ॥२॥ आत्मा हा अविट बिंबलासे नीट । स्मरतांची पैं वैकुंठ देतु आम्हां ॥३॥ निवृत्ति प्रतिमा अक्षरीं दिन व्योमा । एकतत्त्वीं सीमा ध्यायेजेसु ॥४॥

३५८, **काया हे ब्रह्मांड ठसावले पिंड** । जीव जीवनीं अंड एका तत्वें ॥१॥ आत्मा हा चरांचरीं व्यापक कुसरी । एकतत्व निर्धारी क्षरलासे ॥२॥ घटमट व्यापिलें आपेंआप संचलें । कल्पनें बुडालें संकल्प रया ॥३॥ निवृत्तीचें निराळ जीवन पैं सकळ । प्रत्यक्ष गोपाळ घटीं दिसे॥४॥

३५९. **परिपूर्ण ब्रह्में विज्ञानेंसी ज्ञान** । योगियाचें ध्यान आत्मज्योति ॥१॥ आत्माराम सार दृश्य द्रष्टा विचार । नाम संकेत धीर

निरंतर ॥२॥ ध्येयाचें पैं ध्यान मनाचें उन्मन । भक्तासी पावन वैकुंठीचें॥ ३॥निवृत्ति ह्मणे भक्तां स्वानंद जीवन। ब्रह्मसनातन सर्वांघटीं॥४॥

३६०. **ज्याचेनि सुखें चळत पैं विश्व** । नांदे जगदीश सर्वांघटीं ॥१॥ त्याचें नाम हरी त्याचें नाम हरी । प्रपंच बोहरी कल्पनेची॥२॥ शांति त्याची नारी प्रकृति विकारी । उन्मनि वोवरी हृदयांतु ॥३॥ निवृत्तिदेवीं धरिली निर्गुणी । शांति हे संपूर्णी हरिप्रेमें ॥४॥

३६१. **गगनींचा घन जातो पैं वारेन**। अवचिता पतन अधोपंथें ॥१॥ अधउर्ध्व हरि भाविला कुसरी । प्रपंच बाहेरी आपेंआप ॥२॥ निवृत्ति ह्मणे जन हरीचें स्वरूप । काळाचें पैं माप हरिनामें ॥३॥

३६२. **अव्यक्ताचे घरीं व्यक्त पैं नांदे**। मायेचेनि छंदें जग दावी ॥१॥ गगनीं अभ्रपडळ वायो संगें येत। तैसें तें निभ्रांत मेघवृष्टी॥२॥ अद्वैत संचलें द्वैताचा आचार । मायेचा घरचार वोडंबरी ॥३॥ निवृत्ति देवीं धरिली माया हे असार । प्रपंच परिवार निर्दाळिला ॥४॥

३६३. **एकेवीण पाहा न दिसे द्वैत** । एकी हेची मात वेदशास्त्रीं ॥१॥ वेद शास्त्र सांगे आह्मां हा श्रीरंग । या नाहीं भंग आत्मपणें ॥२॥ आनंदैक सुख यासी नाहीं मोहो । भूतबाधा ग्रहो नामेंचि तारी ॥३॥ निवृत्ति म्हणे पिता सकळतत्त्व रहितु। वेदशास्त्रीं दृष्टांतु पहा तुह्मीं ॥४॥

३६४. **एकेवीण तत्व नाहीं पैं सृष्टी** । विश्वरूपें भेटी अर्जुनासी ॥१॥ त्या रूपें वेधिलें काय करूं सये । एक रूप होय कृष्णराजा ॥२॥ निरसे पैं द्वैत अद्वैत श्रीहरी । अवघा घरोघरीं हरी नांदे ॥३॥ निवृत्ति परिवार एकतत्त्व दिवटा । एक्यारूपें वैकुंठा नेतु आम्हां ॥४॥

३६५. **नाहीं दिनमान नाहीं तेथ रात्री** । अवघेंचि गोत्रीं लावियेले ॥१॥उदो अस्तु ठेला वेदांसि अबोला । श्रुतीचा संपला अनुवादु ॥२॥ तेथील तारक ब्रह्म निजसुख । केलासे विवेक सनकादिकीं ॥३॥ निवृत्ति गयनी लाविली उन्मनी । पावले निर्वाणीं ब्रह्मपद ॥४॥

३६६. **विश्वामाजी अक्षर क्षरलें साचार**। त्या रूपा आधार पुससी काई ॥१॥ आपणची विश्व आपणचि विश्वेश । जेथें द्वेषाद्वेष मावळले ॥२॥ निवृत्ति म्हणे तें रूप संतासमीप। ध्याती आपेंआप वोसंडत॥४॥

३६७. **आकार निढळी साकार मंडळी** । एकु वनमाळी क्षरलासे ॥१॥ पंच ब्रह्मछाया पंच ब्रह्ममाया । एकु जाये विलया एक संगें ॥२॥

ऐसिये तत्त्वें होताती परत्वें । धरुनियां सत्य आहे भाव ॥३॥ निवृत्ति दिवटा उमगुनियां वाटा । पंढरी चोहटा देखिला हरी ॥४॥

३६८. **प्रकृतीचेनी घाये घायवट नव्हे** । आत्माराम सोये आत्मकळिके॥१॥कळिका उन्मनी गोल्हाट कवळी । सत्रावळीचे जवळी आत्मा स्वामी ॥२॥ हे खुण घेई सोपानाजवळी । मनाची काळजी उरों नेदी ॥३॥ निवृत्ति ह्मणे ज्ञान सोपान सांग । विकल्पाचा पांग नाहीं नाहीं॥४॥

३६९. **काळिकेसी ज्योति सामावली तेजीं** । तैसा हरी हा सहजीं सर्वगतु ॥१॥ सर्वत्र भजन हरी हेची खूण । हरी हा प्रमाण दों अक्षरीं ॥२॥ नित्य मुक्त एक आत्मतत्व दीप । हरी हा संकल्प करीजेसु ॥३॥ निवृत्ति सर्वदा हरिभजन दाट । नित्यता वैकुंठ अखंडित ॥४॥

३७०. **एकतत्त्व हरि अवघी सृष्टि त्याची** । वासना मोहाची जाली असे ॥१॥ तत्त्व तें श्रीहरी अद्वैतकुसरी । ब्ह्मांड वोवरी क्षरलासे ॥२॥ त्रिपुटी त्रिगुण सत्वरजसार । नामेंचि वेव्हार तुटे रया ॥३॥ निवृत्ति समता हरी प्रेमगुण । कृष्ण हेचि ध्यान मनामाजी ॥४॥

३७१. **पीतांबर दीपडें दीपकाळिका श्याम** । शिव आत्माराम प्रेमतनु ॥१॥ ब्रह्मांड धवळलें दिसे दशदिशा । ब्रह्मचि सहसा ब्रह्मपणें ॥२॥ न दिसे भानमान दृश्याचा अनुमान । आपणचि पूर्ण तदाकारें ॥३॥ निवृत्ति निर्विकार मनोमय साचार । सर्व हा आकार ब्रह्मरूपें ॥४॥

३७२. **शून्य हें पुशिलें निरशून्य बिंबलें** । ब्रह्म उगवलें तेजाकार ॥१॥ कळिसि कळिते वासना आकळीते । दिनकाळ हरितें सेवितुसे ॥२॥ माजिठा श्रीहरि दिसे परोपरी । घटमठसरी एकु शोभे ॥३॥ निवृत्ति दाटुगें गुरुमुखें कळलें । सर्वत्र गोपाळें केलें मज ॥४॥

३७३. **करुणाकल्लोळणी अमृताची खोटी**। भरलीसे सृष्टि हरीच्या नामें ॥१॥ सर्व ब्रम्ह आत्मा वेद बोले सीमा । हरि परब्रह्म रामकृष्ण ॥२॥ हरिविण ठावो न दिसे सर्वत्र । हरिविण परत्र नाहीं नाहीं ॥३॥ निवृत्तीचें घर गयनी साचार । त्यामाजि उच्चार हरि आह्मां ॥४॥

३७४. **जेथें पाहे तेथें व्यापिलें अनंतें** । तयाविण रितें कोण ठाये ॥१॥ गगनेंविण ठावो नाहीं जैसा रिता । तैसा या अच्युताविण कांहीं ॥२॥ तेथें माझ्या चित्ता करी रहिवासु । न करी उदासु ऐसीयातें ॥३॥ निवृत्तीनें मन ठेविलें चरणीं । नामाची निशाणी अखंडित ॥४॥

॥ श्रीविठ्ठल ॥

# श्रीज्ञानदेवमहाराज.

## श्रीहरीच्या सगुण-निर्गुण स्वरूपाचें वर्णन.

१. **रूप पाहतां लोचनीं** । सुख झालें वो साजणी ॥१॥ तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ॥२॥ बहुता सुकृताची जोडी । ह्मणुनि विठ्ठलीं आवडी ॥३॥ सर्व सुखाचें आगर । बापरखुमादेविवर॥४॥

२. **अनुपम्य मनोहर** । कांसे शोभे पितांबर । चरणीं ब्रिद्राचा तोडर । देखिला देवो ॥१॥ योगियाची कसवटी। दावितसे नेत्रपुटीं। उभा भीवरेच्या तटीं । देखिला देवो ॥२॥ बापरखुमादेविवरु । पुंडलिका अभयकरू । परब्रह्म साहाकारू । देखिला देवो ॥३॥

३. **सत्य ज्ञानानंत गगनाचें प्रावर्ण** । नाहीं रूप वर्ण गुण जेथें ॥१॥ तोहारे श्रीहरी पाहिला डोळेभरी । पाहते पाहणें दुरी सारोनियां॥२॥ ज्ञानदेव ह्मणे ज्योतीची निजज्योती । तेहे उभी मूर्ति विटेवरी ॥३॥

४. **बरवा वो हरि बरवा वो**। गोविंद गोपाळ गुण गरुवा वो ॥१॥ सांवळा वो हरि सांवळा वो। मदनमोहन कान्हो गोवळा वो ॥ध्रु०॥ पाहतां वो हरि पाहातां वो। ध्यान लागलें या चित्ता वो ॥२॥ पढिये वो हरि पढिये वो । बापरखुमादेवीवरु घडिये वो ॥३॥

५. **तुज सगुण ह्मणो कीं निर्गुणरे** । सगुण निर्गुण एकु गोविंदुरे ॥१॥ अनुमाने ना अनुमाने ना । श्रुति नेति नेति ह्मणती गोविंदुरे ॥ध्रु०॥ तुज स्थूळ ह्मणों कीं सूक्ष्मरे । स्थूळसूक्ष्म एकु गोविंदुरे ॥२॥ तुज आकारु ह्मणों कीं निराकारुरे । आकारु निराकारु एकु गोविंदुरे ॥३॥ तुज दृश्य ह्मणों कीं अदृश्यरे । दृश्यअदृश्य एकु गोविंदुरे ॥४॥ निवृत्तिप्रसादें ज्ञानदेव बोले। बापरखुमादेविवरु विठ्ठलुरे ॥५॥

६. **त्रिभंगी देहुडा ठाण मांडूनियां माये** । कल्पद्रुमातळीं वेणु वाजवितु आहे ॥१॥ गोविंदु वो माये गोपाळु वो । सबाह्य अभ्यंतरीं अवघा परमानंदुवो ॥२॥ सांवळें सगुण सकळां जिवांचें जीवन । घनानंद मूर्ति पाहतां हारपलें मन ॥३॥ शून्य स्थावर जंगम व्यापुनि राहिला अकळ । बापरखुमादेविवरु विठ्ठलु सकळ ॥४॥

७. **पांडुरंगकांती दिव्य तेज झळकती** । रत्नकीळा फांकती प्रभा ॥ अगणित लावण्य चरणीं पुंजाळलें । न वर्णवे तेथींची शोभा ॥१॥ कानडा हो विठ्ठलु कर्नाटकु । येणें मज लाविलें वेधीं ॥ खोळ बुंथी घेऊनि खुणाची पालवी । आळविल्या सांधुनेदी ॥२॥ शब्दें-वीण संवादु दुजेवीण अनुवादु । हें तव कैसेंनि गमे ॥ परेहि परतें बोलणें खुंटलें । वैखरी कैसेनि सांगे ॥३॥ पाया पडूं गेलें तंव पा-उलचि न दिसे । ऊभाचि स्वयंभु असे ॥ समोर कीं पाठीमोरा न कळे । ठकचि पडिलें कैसें ॥४॥ क्षेमालागीं मन उतावीळ माझें । म्हणवूनि स्फुरताती बाहो ॥ क्षेम देऊं गेलें तव मीचि मी एकली । आसावला जीव राहो ॥५॥ बापरखुमादेविवरु हृदयींचा जाणुनी । अनुभवु सौरसु केला ॥ दृष्टीचा डोळा पाहों मी गेलीये । तंव भीतरीं पालटु झाला ॥६॥

८. **चिदानंद रूप चेतवितें एक**। एकपणें गुणागुणीं दावी अनेक ॥१॥ आदि अंतीं गुण सर्वत्र निर्गुण । गुणासी अगुण भासतीना ॥२॥ कैसें जालें अरुपीं गुणीं गुणवृत्ती । सगुण पाहतां अंतरलें गती ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु नंदानंदनु । आदिअंतु एकु पूर्ण सनातनु गे माये ॥४॥

९. **तुरे कांबळा डांगेवरी विषाण वेणु घेऊनि करीं** । वैज-यंति रुळे कैशी वक्षस्थळावरी ॥१॥ गोविंदु वो पैल गोपाळु माये । सुरतरु तळवटीं देखे कसा उभा राहे ॥ध्रु॥ आडात्रिपुंड्र शोभत द्द-मिळ भारेंसि जे जात । नागर केशरीचीं पुष्पें कैसा खोप मिरवत ॥२॥ हिरिया ऐशा दंतपाक्ति अधर पोंवळ वेली । श्रवणीं कुंडलें ब्रह्मरसाचीं वोतलीं ॥३॥ विश्वाचें जीवन तें म्यां सार देखियेलें । योगी ध्याती ध्यानीं ब्रह्म तेंचि गोकुळासि आलें ॥४॥ आजि धन्य

धन्य जालें राया कृष्णासि देखिलें। निवृत्तिमुनिरायप्रसादें ध्यान हृदयासि आलें ॥५॥

१०. **सुंदर सुरेख वोतिलें**। परब्रह्म तेज फांकलें। तें व्योमीं व्योम सामावलें। नयनीं वो माय ॥१॥ कमलनयन सुमन फांकलें। त्या परिमळा आथिलें मकरंदीं वो माय ॥२॥ संकोचला संसार। पारुषला व्यवहार। ब्रह्मानंद अपार। जहाला वो माय ॥३॥ मधुर वेदवाणी। न पवे ज्याच्या गुणीं। तें ठकावलें निर्वाणीं। नेति मुखें वो माय ॥४॥यापरतें बोलणें। न बोलणें होणें। तें म्यां आपुल्या अंगवणें। केलें वो माय ॥५॥ ऐसियातें वोटी। लागलें तयाचे पाठी। रखुमादेविवरा भेटी। विठ्ठलीं वो माय ॥ ६ ॥

११. **देव आहे जैसा तैसा नेणवे सहसा**। भांबावला कैसा विश्वजनु॥ तया रूप ना रेखा लय ना लक्षण। ते प्रतिमेंसी आणून वासना रूपें ॥१॥ देव सर्वगत निराळा अद्वैत। तया मूर्तिमंत ध्याय जनु॥ तिहीं देवासि आकारु जेथुनि विस्तारु। तो ध्वनि ओंकारु त्या आरुता॥ तेथें नाद ना बिंदु कळा ना छंदु। अक्षय परमानंदु सदोदितु ॥२॥ अवतरे तैसाच नव्हे होय तें न संभवे। आहे हें आघवें लाघव रया॥ तो येकवट एकला रचला ना वेचला। आदिअंतीं संचला अनंतपणें॥ पृथ्वी आप तेज वायु आकाश। हीं सकळही हारपती प्रळयांतीं॥ तीं निरशून्य निरूपम निरंजन निर्वाण। ते दशा पाषाण केंवि पावती ॥३॥ पाहतां या डोळा परि न दिसे कांहीं केल्या। व्यापुनियां ठेला बाहिजु भीतरी॥ तो पदपिंडा अतीतु भवभावविरहितु। बापरखुमादेविवर विठ्ठलु हृदयांतु रया ॥४॥

१२. **पैल सुखाचेनि माये सुकाळु**। नवल पाहिजे हो गोपाळु। म्हणोनि योगयाग तप साधन। व्रत दान उद्यापन। पंचाग्नि गोरांजन अनुष्टान। परि पद निर्वाण नकळे हें ॥१॥ तुझ्या नामाचेनि आनंदें। गातांवातां जोडसी विनोदें रया ॥ध्रु०॥ या गोंवळेंनि जग। न दिसे जगपण भाग। पाहेंपां सकळीं योग। तुझा तूंचि ॥२॥ अर्धुनि पाहे दृष्टी। तंव तुझ्यापायीं पडे मिठी। आवडी नोसंडी गांठी। तुझिया पायाची ॥३॥ आतां जरी निरुतें। तूंचि आत्मा

तूंतें । सुखी सुखाचेनि निजप्राप्ति रया ॥४॥ तुझें स्वरूप अदृश्य । तो मुनिमानसींचा प्रकाश । इंदु तूं पूर्णांश । चैतन्यघन ॥५॥ बापरखुमादेवीवरा । विठ्ठला पाहतां उघडा डोळा । दाविलें निधान रया ॥६॥

**१३. लाउनि मनगणीची दोरी** । विपरित तयाची कुसरी । अकळू न कळे श्रीहरी । अवघड वोडंबर तुझें ॥१॥ अष्टदळकमळाची वोवरी । विपरीत तयाची कुसरी । एकविस खणांचे उपरी । बाहीजुकां हरी दाखविली ॥ ध्रु० ॥ तेथें रात्रीं दिवस नेणिजे । सोहं प्रकाश सहजे । नाचविसी पंचभूतें वोजे । कवतुक तुझें तूं पाहसी ॥२॥ भानु निसियेचा कुसावा । येक राहिलें याचिया आशा । येक ह्मणति अढळ धुरु कैसा । तयाचा भरंवसा त्यांसि नाहीं ॥३॥ ऐसीं तयाचीं बोलणीं । अंगीं राहिलीं खेळणीं । साही पावठणी करूनि । सातावरि घातु मांडिला ॥४॥ करीं घेऊनि आळवणी । करूं नेणें वोवाळणी । बापरखुमादेविवरा विठ्ठला चरणीं । चौघी जणी निमालिया ५

**१४. एकांति बाळा** । कीं सोहंसुखशयन वेळा । पाहे चरणकमळा । सुंदराचे ॥ तेथें अरुण उदेला । कीं सुमनीं प्रगटला । कमळणी जाला । अंतरीं विकासु ॥ तें चरण कमळ केवळ । भक्ता आळिउळ । सेविती सकळ । योगिजन ॥ तेणें तृप्त जालें । कीं हृदयीं वोसंडलें । ह्मणोनि वाहावले । ज्ञानडोहीं ॥ तोचि ते परमानंद गे माय ॥१॥ न संगवे माय परा पारुषली । दोंदिल दृष्टी जाली देखणेंपणें ॥ मनाचा अंकुर उगवीच मुराला । तो कृष्णचि होउनि ठेला अनुभविया ॥ध्रु०॥ तये पदांर्घ्रीचे रज । तेणें तृप्ति वो सहज । वरि त्रिवेणी ऊर्ध्ववज्र । मज पाहतां ॥ तंव ते रेखा । वरि सखोल देखा । त्यावरी वोळले पियूषपाणी ॥ तियेचेनि मागें । उद्धरणें जगें । ह्मणोनि संतसंगें । तया सोई ॥ ते दोहीं भागीं । विस्तारलें जगीं । ह्मणोनि तया भागीं । चरणांगुष्ठ ॥ दृष्टीचा डोळा । न निवडेच बाळा । तेथें जाला एकवळा । मुनिजनां गे माये॥ २॥तेथें बिंबलीं नखें । कीं विवळणी विशेखें । काळेपणाचेनि द्वेषें । वाहावली पुढां ॥उगमींच संचले । कीं वियोगें वाहावले । पुनरपि जडले । कृष्णपदीं । गंगा अंगुष्ठधार । कीं वांकीचा बडिवार । तेथें सप्तही स्वर । उमटताती ॥ स्वरूपीं रमली ।

ह्मणोनि अधोमुख जाली । शोभती घाघुरली । पायीं प्रभावळी गे माये ॥३॥ तंव ते निजानंद भरितें । नेणती आणिकांतें । विसरली आपणातें । हास्यवदनें ॥ ह्मणती नेति नेति गर्जना । कीं माणिका खेवणा । घोव्या अनुमाना । बाळसूर्यो ॥ पोटरिया निवाळा । कीं उभलिया सरळा । जानुद्वय सोज्वळा । उच्च स्तंभ ॥ उंच युगळ कटीं । माज सामावे मुष्टीं । सोहंभाव समदृष्टी । दोहीं भागीं गे माये ॥४॥ वरि वेढिला पिंवळा । कीं भिरवे सोनसळा । कीं कल्पतरु फुलला । नाभिस्थानीं ॥ तेथें वेधु गोपिबाळा । कीं अंतरीं सांवळा । पालवी मेखळा आभिळाखिया ॥ तेथें मदनु गूढपणें । रतिशयें रमणें । दुजे अनुभउ अनुभवणें । न निवडे कही ॥ सखोल नाभिमंडळ । तें ब्रह्मस्थान केवळ । कैसें पाहाले विवळ । तेथें जयामाजी गे माये ॥५॥ रोमराजवेळा । कीं वेणी एकवळा । दावी निराळा । उदरामध्यें ॥ हृदय निर्मळ । तेथें ध्येय ध्यात केवळ । वरि चरणकमळ । द्विजोत्तम ॥ वैजयंति माळा । शोभतसे गळां । उभलेनि वक्षस्थळा उभारली ॥ सरळ बाहुदंड । न कळे कानवड । अंगोळिया धडफुड । खुणा दावितो गे याये ॥६॥ ऐशा खुणा दावितसे एका । तंव दावी अनेकां । अंगोळिया देखा । दशावतारी ॥ नखांची मंडणी । तेथें तेज तारांगणी । होत असे प्रवणी । त्रिभिर द्वैत ॥ शुक्रपक्ष । कीं अंतरी लक्ष । सारूनियां साक्ष । दशादिसवीं ॥ एकाएकीं संचरे । कीं माजि घरीं दुसरे । स्वयें येसरे । नवल चोज गे माये ॥७॥ तेथ सानुसानु स्वर । दोहिलें अंबर । हास्यवदन सुंदर । पावया छंदें ॥ निमासुरा नेटका । न कळे ब्रह्मादिका । वेधुनि गोपिका मोहियेलें जग ॥ समदृष्टी नासापुटीं । नेत्र द्वय निघाले भेटी । रविशशि कोटी । लोपले तेथें ॥ मना मारुनि मेळा । कीं कुंडलें शोभे किळा । तेथें जाला एकवळा । योगिजनां गे माये ॥८॥ व्योमींचा मणी । तया तळीं सहस्रफणी । तो लाधला निर्वाणीं । आराधितां ॥ शेष वर्णितां श्रमला । ह्मणोनि शरण आला । शयन होउनि ठेला । तया तळीं ॥ ऐसी सुमन सेजा । कीं मवाळपण बरविया वोजा । तेथें रातली रमा भाजा । न निवडे कही ॥ ऐसा झाला एकवळा । शेष

ह्मणे दैव आलें फळा । आतां पाहेन सुनिळा । काय सेज माजी ॥९॥ ऐसयाचें ध्यान । जरि हें न करी मन । तरीच पतन । जन्ममरण ॥ चिंता सारी फेडीं । कीं उभारूनियां गुढी । स्वयें सुखाचिया आवडी । कां सांडितासी ॥ आतां करूं पाहे ध्यान । तरि सहजचि उन्मन । ह्मणोनि समाधान । होय जीवा ॥ तीर्थ व्रत तप दान । जरी न करी हें मन । तरी सहजचि साधन । गोपिनाथु ॥१०॥ तीर्थी जातां सायासीं । तूं काय एक देसी । ह्मणोनि स्तविलासी । बहुतांपरी ॥ तंव परापश्यंती मध्यमावैखरी । या युक्तिनो बोलविसी ॥ निवृति ह्मणे लीळा । विश्वव्यापक निराळा । पाहें उघडा डोळां । परब्रम्ह ॥ ज्ञानदेवा मीपणीं । निवृत्ति ऐक्य चरणीं । सरो दुजेपणीं । हांव जीवा ॥११॥

**१५. नभ नभाचेनि सळे** । क्षोभु वाहिजे काळिंदी जळें। सासिन्नले जगाचे डोळे । तें रूप पाहावया ॥ भलतैसी हांव । मना न पुरे तेथींची थाव । लावण्यसिंधु सिवा सांडुनि जातो गे माये ॥१॥ सुलभ गे माये परमात्मा । मन मुरोनि देखणेपणा उरी । याचि कारणें उभा भिवरेतीरीं । अनुपम्य जगाची थोरी गे माये ॥धृ०॥ काळिंदी जळाचा भोंवरा । कीं माजी वेढूनि इंदिरावरा । माळ बांधोनियां मधुकरा । मधें रोमामाजी ॥२॥ सकल सिद्धींचा मेळा । तेंवि विभूति शोभे भाळा । मुगुटीं रत्नकिळा ॥ लिंग अनुपम्य गे माये ॥३॥ क्षीरसागरींचें निवांत सुख । असो हें निमासुरें मुख । श्रीयेचे मनोहर देख । टवकारलें दों भागीं ॥ पहावया ऊरूंची शोभा । सकळ तेजाची प्रभा । तेथें तारांगणें कैंचीं नभा । लेइलागे माये ॥४॥ कटावरी ठेवूनि हात । जनां दावी संकेत । भवजलाब्धीचा अंत । इतुलाची ॥ सम चरणींच्या खुणा । उभा पंढरीचा राणा । तो आवडे जनांमना । दुर्लभ गे माये ॥५॥ कैवल्याचा गाभा । कीं ब्रह्मविद्येचा वालभा । निकटपणाचिया लोभा । कैसा उभा असे ॥ देवा पायींची वीट । तेचि माये नीट । वरि येउनि भीमातट । वोळग दावी गे माये ॥६॥ नेति नेतिचेनि बिरारे । उभऊनियां श्रीकराकरें । शृंगारा-

चेनि पडिभरें । चराचरें वोळगती ॥ हा मेखळेचा मध्यमणी । उदो केला ग्रहगणीं । मध्य नायकु तरणी किरणीं । विराजितु गे माये ॥७॥ आमुची हृदयींची श्रीमूर्ति । घेऊनि विठ्ठलवेषाची बुंथी । आतां चाळविसी किती । बापा पालटू नेघे ॥ बापरखुमादेविवरा विठ्ठला । त्वां मजशीं कां अबोला धरिला । जीवीं जीव आहे उरला । तो निघों पाहे ॥८॥

**१६. वेद प्रमाण करावया गोकुळासि आला ।** कीं नाटळीचा कुवांसा जाला । ब्रह्म आणि गोवळु । ब्रह्मादिकां वंद्यु । ऐसा निगमु पैं लाजविला ॥ गणिका स्वीकारी राहो मांडला । कीं दशरथ पतनीं चुकविला । एका तें म्हणे जागा । एका तें म्हणेरे निजा । तैसा मुचकुंदापैं काळयवनु आणिला रया ॥१॥ विरोचनसुत । बळी बांधोनि जेणें । निगड निबद्ध गजा सोडविलें । एकाचीं बालकें काळापासूनियां हिरे । एका बाळाचें बाप विदारिले । शिशुपाळासी जैत देऊनियां शेखिं पाहेपां आपणचि जिंकिलें रया ॥ध्रु०॥ गुरुदुर्वास याचिये भक्ति आणि त्याचियेचि रथीं । देविरुक्मिणीसहित स्वादु चालिविला । तो तेणें मानें फुंदो पाहे तंव कोलतिया भेणें त्रैलोक्य हिंडविला । पैज सारूनि हातीं सुदर्शन वसविलें कीं भीष्मपण साचू केला । जितुकाचि कौरवा तितुकाचि पांडवां अचोज हा अमुला रया ॥२॥ जमदग्नी जनकाचा बोल भूमीं न पडावा । हा ठावो वरि पितृभक्तीची आवडी । जेणें साचपणा कारणें माता वधिली । कीं पुराणें खोंचिलीं तोंडीं ॥ असुरदैत्य संहारितां बापु तयांचीं पातकें दवडी । प्रजासि रायाची आण रायासी कवण नेमु हे तो संततपणाची प्रौढी रया ॥३॥ या परि चराचरींचें दानव गिंवसूनि पुसिले परोपरी । तंव यादवांसि अंबुलेपणाची आस जाली थोरी । प्रभास क्षेत्रीं अवाधियातें केली एकसरी । देवकी पुतना नोळखिजे वैरभक्तीसी एकिची वोवरी । पवनु काय हा पंथु शोधूनियां चाले समर्थु करिल तें उजरी रया ॥४॥ या गोविंदाची माव । हे तों ब्रह्मादिकांसि कुवाडें । तो हा मायेचेनि साचपणें न घेपवे । प्रकृतीचे गुण ते याचिये गांवींचे तो करील तें अनुचित बरवें ॥ लाघवि-

याचे भ्रमु लाघवीच जाणे यासि कांहीं नवल नव्हे । बाप रखुमादेवीवरु जाणितला तरि उकलेल हें आघवें रया ॥५॥

१७. साति बारी दोन्ही आपणचि होऊनी । सुरतरु माझारीं ओळगे ॥ तळीं त्रिभंगी मांडूनि ठाण घेऊनि मेघाचे मान । विजु एकी वेढून बरवे गर्जतुगे माये ॥१॥ नवलावोगे माये न्याहाळितां कैसे मनाचे नयन उमळताती । तीही एक दृष्टि जिव्हा लाभती तरी सुलभु देखतां बोलतीगे माये ॥धु०॥ पाहो याचे पाय । शंभूचिया माथां माये । सासिन्नली चंद्रदाहे गंगेतें ॥ तेथ असुराचीं शिरें । येथ सकळ शरीरें । तोडराचेनि बडिवारे । गर्जतुगे माये ॥२॥ तेज सांवळें । रूप लाधलें परिमळें । अनंगाचेनि सळें । कासें कासियेला ॥ तो पालउ पांढर गळे । होतुका जगाचे डोळे । दुरूनियां सुनिळें । रोविलेंगे माये ॥३॥ उपानिषधाचा गाभा । माजी सौंदर्याची शोभा । मांडिला दो खांबा । तैसा दिसे देखा ॥ वेगळालिया कुंभस्थळा । परि हातु सरळा । पालटु बांधिला माळा । मेखळा मिसेंगे माये ॥४॥ भलतेउती वाहे न वाहे नदी । जेंवी स्थिरावे अगाधीं । जैसी पुंजाळता हे मांदी । दोंदीं वेदाची ॥ वरिलिया वक्षस्थळा । नुपुरे स्थानींचा डोळा । मागून निघे कमळा । नव्हे रोमराजी ॥५॥ लावण्य उदधी वेळा । तेंचि पैं वैजयंती माळा । वरी शोभतसे सोहळा । साकारवेचा ॥ ह्मणे प्रेम पुष्कळां । थडिये लाभे सकळां । नयनसुखाच्या सुकाळा । जग मेळवितुगे माये ॥६॥ भोंवतीं तारांगणें पुंजु । माजी अचळ सुरिजु । आला वक्षस्थळा उजु । कैसा दिसे देखा ॥ जेवणें न अंगें । उभऊनि श्रीकरायोगें । योगनादातटीं रिगे । नभु दुमदुमितवो माये ॥७॥ इंद्र धनुष्य काढिलें । तया तळीं बहुडलें । तेंचि कुरळी वेढिलें । समाधिसुख देखा ॥ आरीचा गुणु । श्रुतीगर्भी समवर्णु । दोहीं स्वरीं गोडी वेणु । जग निववीतुवो माये ॥८॥ या वेधितां कांहींच नुरे । रूपा आलें हेंचि खरें । वरी दाविता हें माजिरें । गोपवेशाचें ॥ तमावरि हातियेरे । रविकाज काईयेरे । तैसा रखुमादेविवरें । विरें घेतलेंगे माये ॥९॥

१८. मदनमूर्ति विश्वीं अळंकारली । ते डोळयां असुमाय जाली ।

पाहतां मनाची वृत्ति नुपुरे तेथिंची सोय। तेथें भरोनि वोसंडली गे माये ॥१॥ अभिनव रूप कैसें मना अगोचर अरूप रूपासि आलें। तें हें कल्पद्रुमातळीं ठाण मांडूनि देहुडें। तेणें आनंदघनें निववितेंगे माये ॥धु०॥ चिदानंदाची मांदुस किंचिद्घन चिदाकाश। तेजःपुंज प्रकाश चरणीं शोभा॥ निडारलें दृष्टी पाहतां रूपाचा एकवळा। कैसा साकार सोहळा भोगीतसे गे माये ॥२॥ सकळ तीर्थें आर्तलीं। तीं ऋषिवृंदें घेऊनि बैसलीं। पावन झालीं चरणांगुष्ठीं॥ वांकी तोडरु गजरीं। गर्जतुसे नानापरी। तो श्रुतिनादु अंबरीं। सांठवलागे माये ॥३॥ उपनिषदाचा गाभा। परि हा देहुडा पाउलीं उभा। जानुजघनींच्या प्रभा। नभ धवळलें॥ सुरंग सोनसळा। वरी वेढिला पिंवळा। त्यावरी गांठियला मेखळा। रत्नखचितगे माये ॥४॥ हा जगडंबरु जगदाभासु। कीं ठसावला आभासु। नाभिकमळीं प्रकाशु। चतुरानना॥ पाहतां तेथींची हाव। मना न पुरे तेथींची धांव। ह्मणउनि सगुण ध्यान। करीतुसेगे माये ॥५॥ ब्रह्मांडाचिया कोडी। रोमरंध्रीं उतरडी। मदन सांडुनियां प्रौढी। उदरा आला॥ सुघटित वक्षस्थळ। निरोपम केवळ। वरी पदयुगुळ। द्विजोत्तमगे माये ॥६॥ चहूं पुरुषार्थांचें साधन। तोंचि आयुधें मंडन। बाहीं बाहुवटे मंडण। मंडण जालें॥ वीर कंकण मनगटीं। कांडोवाडी मुद्रा दाटी। कैसा अलोहित नखें बोटीं। वेणु वाहे वो माये ॥७॥ ब्रह्मरसें घनु आतला। कीं सुधारसु मुराला। तोचि नादु सुस्वर आला। पावया छंदें। अधरींचें अमृत। पिकलेंसे ब्रह्मरसु। तेणें जाला सौरसु। गोपिजनांगे माये ॥८॥ नयनींचे तारे दो पक्षीं प्रेम पुरे। द्वैताद्वैत एकसरे। ठकलें ठेलें॥ कुंडलाचिये दीप्ती। लोपला गभस्ती। सुखस्वरूपाची शांति। येणें सुखे गे॥ माये ॥९॥ आतां पाहतां पाहतया दृष्टी नपुरे। ध्यातां तरी मनचि नुरे। आंत बाहेरी पुरे। व्यापूनि ठेलें। मावळलिया दृष्टी पाहतां देखणें ठसावले। निर्गुण गुणासि आलें सदोदित गे माये ॥१०॥ आतां हा कोंवि पाहावा पाहतयेचि दृष्टी। मन मनेंचि दिधली मिठी।

तेथील ते गोडी रूपा आली । ह्मणे निवृत्ति । ज्ञानदेवा पाहें चित्तीं । आतां जागृतीच्या अंतीं । सुखशांति रया ॥११॥

१९. **ब्रह्मादिकां आठकु तो** । शिवध्यान ध्यानकु तोगे बाई ॥१॥ गौरी जाप्य सहस्रनामीं तो । पुण्यपावन त्रैलोक्य तो गे बाई ॥२॥ रखुमादेविवरु तो । सहजपूर्ण ओघ तोगे बाई ॥३॥

२०. **सर्वांदि सर्वसाक्षी तो** । विश्वंभर स्वल्विद तो गे बाई ॥१॥ आनंद आनंद तो । प्रबोधा प्रबोध तो गे गाई ॥२॥ रखुमादेविवरु तो । विटेवरी उभा तो गे बाई ॥३॥

२१. **श्रुतीस्मृति वचन तो**। गुह्यागुह्य तो गे बाई ॥१॥ जागता निजता तो । निज चेवाविता तो तो गे बाई ॥२॥ परात्पर तो । रखुमादेविवरु तो गे बाई ॥३॥

२२. **निजगुजा गूज तो** । मोहना मोहन तो गे बाई ॥१॥ बोधाबोध बोधविता तो । द्वैताद्वैत अद्वैत तो गे बाई ॥२॥ रखुमादेविवरु तो । सर्वादि सर्वेश्वरु तो गे बाई ॥३॥

२३. **जरासंदुमल्लमर्दनु तो** । गजपित्राहटणुतो गे बाई ॥१॥ कुब्जकपान तो । सुदाम्या अनुसंधान तो गे बाई ॥२॥ रखुमादेविवरु तो । कंसचाणुरमर्दन तो गे बाई ॥३॥

२४. **कांहीं नव्हे तो** । अमूर्तां मूर्त तो गे बाई ॥१॥ सहजा सहज तो । सहज सुखनिधान तो गे बाई ॥२॥ रखुमादेविवरु तो । पुंडलिकवरद तो गे बाई ॥३॥

२५. **निज ब्रह्म ब्रह्म तो** । ब्रह्मादिकां वंद्य तो गे बाई ॥१॥ अचिंतचिंतन तो । सारासार गुह्य तो गे बाई ॥२॥ बाप रखुमादेविवरु विठ्ठलु तो । जनीं वनीं कृपाळु तो गे बाई ॥३॥

२६. **सारंगधरु तो** । चक्रा आधारु हरि तो गे बाई ॥१॥ सुलभा सुलभु तो । आटकु नटके तो गे बाई ॥२॥ रखुमादेविवरु तो । द्वैताद्वैतातीत तो गे बाई ॥३॥

२७. **विश्व भुलवी योगमाया तो** । गोकुळीं रहिवासु तो गे बाई ॥१॥ वसुदेवकुमरु तो । देवकीनंदनु तो गे बाई ॥२॥ रखुमादेविवरु तो । शुकादिकां चिंतन तो गे बाई ॥३॥

२८. **पैल गोल्हाटमंडळ तो** । त्रिकुटा वेगळा तो गे बाई ॥१॥ सहजबोधीं अनुभव तो । परमतत्त्वीं अनुराग तो गे बाई ॥२॥ रखुमादेविवरु तो । ब्रह्म विटेवरी तो गे बाई ॥३॥

२९. **राम बरवा कृष्ण बरवा** । सुंदर बरवा बाइयांनो ॥१॥ केशव बरवा माधव बरवा । गोपाळ बरवा बाइयांनो ॥२॥ बाप रखुमादेविवरु त्रिभुवनीं गरुवा । विठ्ठलु बरवा बाइयांनो ॥३॥

३०. **आतसिकुसुमकोशशामघनु** । तुळशीवृंदावनामाजि मुनीमनोपद्मदळविशाळजिरे आयो ॥ ध्रु० ॥ जलधीशयन कल्लाळजीवनु । बापरखमादेविवरु विठ्ठलु घनानंदुमूर्ति ॥१॥

३१. **निळिये मंडळीं नीळवर्ण सांवळी** । तेथें वेधलिसे बाळी ध्यानरूपा ॥१॥ वेधु वेधला निळा पाहे घननीळा । विरहणी केवळा रंग रसनें ॥२॥ नीळवर्ण अंभ नीळवर्ण स्वयंभ । वेधें वेधु न लभे वैकुंठींचा ॥३॥ ज्ञानदेव निळी हृदयीं सांवळी । प्रेमरसें कल्लोळीं बुडी देत ४

३२. **नीळवर्ण रजे नीळवर्ण बुझे** । निळिमा सहजे आकारली ॥१॥ नीळ प्रभा दिसे नीळपणें वसे । निळिया आकाशे हारपलें ॥२॥ निळेपण ठेलें निळिये गोविलें । निळेपण सोविळें आह्मां जालें ॥३॥ ज्ञानदेवीं निळा परब्रह्मीं गोंवला । कृष्णमूर्ति सांवळा हृदयीं वसे ॥४॥

३३. **निळिये पेरणी निळियेपणीं खाणी** । गुणाचीं लेणीं कृष्णवर्ण ॥१॥ नवलाव गे माय नवल चोज । निळीं निळिमा काज आकारलें ॥२॥ नीळवर्ण तनु नीळवर्ण गुणू । निळी निळिमा पूर्णू हृदयीं नांदे ॥३॥ ज्ञानदेवीं लीला मन मनीं निवाला । निळिये अवलीला हरपला ॥४॥

३४. **निळें हें व्योम निळें हें सप्रेम** । निळेपणें सम आकारलें ॥१॥ नीळवर्ण ब्रह्म नीळवर्ण कर्म । निळवर्ण आश्रम गुरु देखे ॥२॥ निळेपणें वर्तों नीळपणें खातों । निळेपण पहातों निळेपणें ॥३॥ ज्ञानदेव आला नीळवर्ण शाळा । निळपण गोंवळा रातलीये ॥४॥

३५. **निळिये रजनी वाहे मोतिया सारणी** । निळेपणें खाणी सांपडली ॥१॥ आंगणी चिंतामणि जळधरु सिंपणी । अमृतसाजणी जीवनकळा ॥२॥ सुमनाचे शेजे विरहिणी विराजे । शयनीं सुलजे आरळ सेज ॥३॥ माजयानें हटीं मुखकमळ टेंकी । निळिये अव-

लोकीं कृष्णमूर्ति ॥४॥ कमळणी आमोद सुस्वाद मकरंद । चंदनाची अभेद उटी अंगीं ॥५॥ कर्पूरपरिमळे दिव्य खाद्य फळें । ठेऊनि सोज्वळें वाट पाहे ॥६॥ मन तो निळिये गोविंदाचिये सोसे । विरहिणी पाहे वाटुलि ऐसे ॥७॥ ज्ञानदेवी निळिये वाटुनि गोविंदीं । कृष्ण निळिये पदीं ठाव जाला ॥८॥

३६. **निळिये सारणी वाहे मोतियाचें पाणी** । चिंतामणी अंगणीं पेरियेला ॥१॥ कैसा हा भाव करूं गोंविला संसारू । कृष्णसंगें धुरंधरू तरलों आह्मी ॥२॥ हिरियाची खाणी दिव्य तेज मणी । सांपडला अंगणीं सये मज ॥३॥ सूर्यकर रश्मी चंद्र अहं मस्मी । प्रकट झाल्या रश्मी जेथुनियां ॥४॥ कल्पतरु चोखु चिंतामणी वेखु । मनामाजि हरिखु देखियेला ॥५॥ ज्ञानदेवी वल्ली विद्युल्लता सलीलीं । फळपाकें दुल्ली दुभिनल्या ॥६॥

३७. **सुनीळ गगना पालटु** तैसा दिसे अंगीं नटु । कृष्णीं बाणलासे नीळवर्णुगे माये ॥१॥ यमुनेच्या पाबळीं तनु घेउनि सांवळी । पांवा वनमाळी वातु आसे ॥२॥ पांवयाचेनि नादें कृष्णाचेनि वेधें अमुतघनु वोळला । आकाश वोळुनी वर्षाव झाला ब्रह्मरसपूर आलारे ॥३॥ कान्हा अति सुंदर वदनारविंद आळी सेविती अनिवाररे आयो ॥४॥ चंदनादिटिळकुलल्लाटीं जया साजे मोर विसांवेटीरेआयो । सुरतरुकुसुमें कबरीं भाररे कुंडलें झळकति कपोळींरे आयो ॥५॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलुरे । त्रिभुवनजनमोहन रे आयो ॥६॥

३८. **काळेपणाचा आवो अंबरीं बाणला** । तो एकु दादुला देखियेला डोळां ॥१॥ काळें मनुष्य मानव जालें । अरूप रूपा आलें गोविंदपणें ॥२॥ रखुमादेविवरु विठ्ठलु सोहधरु । त्यानें माझा वेव्हारु बहु काळें नेलागे माये ॥३॥

३९. **मन मुरडोनि डोळां लेइलें** । काळेपणें मिरवलें रूप त्याचें ॥१॥ बरवें रूप काळें अमोलिक । ह्मणोनियां सांगतसे शुद्ध भावें ॥२॥ रखुमादेविवरु अगाध काळें । ह्मणोनि सर्वत्र व्योम अर्पियलें ॥३॥

४०. **नवाहूनी परतें तेराहूनि आरुतें** । अंबरेंहूनी परतें काळें दिसे ॥१॥ तेथें सातही मावळलीं पांचांहूनि परते । बहुकाळें निरुतें

देखिलें डोळां ॥२॥ तेथें सत्रावी दुभते योगिया पुरतें। बहुकाळ निरुतें सारासार देखा ॥३॥ बापरखुमादेविवरु अभोक्ता भोगिला। काळेपणें जाला अमोलिक ॥४॥

४१. **सांवळेचें तेज सांवळें बिंबलें**। प्रेम तें घातलें हृदयघटीं ॥१॥ निरालंब बाज निरालंब तेज। चित्तरस निज निजतेजें ॥२॥ आदिमध्यअंत राहिला अनंत। न दिसे द्वैताद्वैत आत्मा रया ॥३॥ ज्ञानदेवीं सोय अवघाचि सामाय। सुखदुःख माय आह्मां नाहीं ॥४॥

४२. **सांवळियाचें तेज सांवळा श्रीहरी**। शेजबाजवोवरी ब्रह्मांडाची ॥१॥ गृहदारा दिनमणि तेज देऊनि मेदिनी। मेरूप्रदक्षणि आप होये ॥ धृ० ॥ ऐसा हा सांवळा सतेज साजणी। म्यां आपुल्या आंगणीं देखीयला ॥२॥ ज्ञानदेवा साजण सांवळिये प्रभेचें। मी माझें मोहाचें हरिरूप ॥३॥

४३. **नवल देखिलें कृष्णरूपीं बिंब**। सांवळी स्वयंभ मूर्ति हरीची ॥१॥ मन निवालें निवालें समाधान जालें। कृष्णरूपें बोधलें मन माझें ॥ २ ॥ बापरखुमादेविवरु सांवळा सर्व घटीं। चित्त चैतन्यें मिठी घालितें खेवों ॥३॥

४४. **हरपली सत्ता मुराली वासना**। सांवळाचि नयना दिसतसे ॥१॥ काय करूं माय सांवळा श्रीकृष्ण। सांगितला प्रश्न निवृत्तीनें॥२॥ बापरखुमादेविवरु सांवळीये तेज। सेजबाज निज कृष्ण सुखें ॥३॥

४५. **चतुरपणें चतुराननु पैं भागला**। शिवुपणें शिवरूपु पैं जाहला॥१॥हरिपणें हरि अंग रिघाला। या तिहींचा मेळा न दिसे गे माये ॥२॥रखुमादेवीवरु तिहीं गुणां वेगळा। शक्ति नव्हे दादुला गे माये॥३॥

४६. **चंचळ चांदिणें सोमविणें भासलें**। तेज निमालें रविबिंबेविणें ॥१॥ जगत्रजीवनु ह्मणे जगासी कारण। तें अणुप्रमाण तेथें दिसे ॥२॥ बापरखुमादेविवरु अणुप्रमाण भासला। सगुण निर्गुण जाला बाईये वो ॥३॥

४७. **स्वर्ग जयाची साळोंखा**। समुद्र पाळी पिंड देखा। शेषासारिखी बैसका। जो आधार तिहीं लोकां ॥१॥ लिंग देखिलें देखिलें। त्रिभुवनीं विस्तारलें ॥२॥ मेघधारीं तपन केलें। तारापुष्पीं

वरी पूजिलें । चंद्रफळ ज्या वाहिलें । वोवाळिलें रविदिपें ॥३॥ आत्मनैवेद्य समर्पिले । ब्रह्मानंदीं मग वंदिलें । ज्योतिलिंग मग ध्याईलें । ज्ञानदेवीं हृययीं ॥४॥

४८. **मूळ ना डाळ शाखा ना पल्लव** । हा कैसा देव आला घरीं ॥१॥ निर्गुणपणें उभा सगुणपणें शोभा । जिवांशिवां प्रभा दाविताहे ॥२॥ नकळे याची गती नकळे याची लीळा । आपिआप सोहळा भोगितसे ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे न कळे याची थोरी । आपण चराचरीं नांदतसे ॥४॥

४९. **ज्ञानविज्ञान हरि नांदें आमुच्या घरीं** । बाह्यजु अभ्यंतरीं जाला देव ॥१॥ काय सांगूं माय त्रिभुवन धाय । पाहतां न समाय नाना रूपीं ॥२॥ चढत्या वाढत्या गोष्टी प्रगट दिसे घटीं । नानारूपें वैकुंठीं नेऊनि घाली रया ॥३॥ ज्ञानदेवा गोडी हरिपदीं आवडी । प्रवृत्तीची थडी उलंडिली ॥४॥

५०. **विज्ञानाचें ज्ञान अज्ञानीं घनवट** । ज्ञानें अज्ञान नीट लाविलें दिसे ॥१॥ मी तूं हे मात हरपले दृष्टांत । हृदयीं हृदयस्थ निजतेजे ॥२॥ साकार निराकार शून्याशून्य दिठा । रूपीं रूपवाटा हरि माझा ॥३॥ बापरखुमादेविवरु हृदयस्थ घटीं । बिंबोनि उफराटी कळा दिसे ॥४॥

५१. **सारासार दोन्ही** । न दिसती नयनीं । अवचिता गगनीं बिंबलासे ॥१॥ लोपले रविशशि । तेज न माये आकाशीं । मेघःश्यामें मेघाशीं । लपविलें ॥धु०॥ दिव्य रूप तेज । तीव्र ना तेजबीज । कुंडलि विराजे । लोपलें सूर्यो ॥२॥ ज्ञानदेवा ध्यान । मनाचेंही मन । हरिचरण स्थान । दृढ केलें ॥३॥

५२. **स्वरूपीं पाहतां बिंबीं बिंब उमटे** । मेघःश्याम दाटे बुंथी मनीं ॥१॥ चित्त वित्त हरि जाला वो साजणी । अवचिता आंगणीं म्यां देखियला ॥२॥ सांवळा डोळसु चतुर्भुज रूपडें । दिसे चहूंकडे एकतत्व ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे द्वैत निरसूनि बाही । एका रूपा सोयी बाही तरशील ॥४॥

५३. **मनाचा भाव माझा खुंटला हरिध्यानें** । अवघेंचि येणें

मनें काळापिवन केलें ॥१॥ लघु ह्मणों तरी सूक्ष्महि नव्हे । सूक्ष्म ह्मणों तरी अगाधही नव्हे । या काळियाची जालि गे माये ॥२॥ बाप रखुमादेविवरु सुनीळ नीळ काळा । अवघ्या सहित गोपाळा बुडी दिधली गे माये ॥३॥

५४. **ज्याचें गुणनाम आठवितां मनाचि नाहीं होय** । अनुभवाचे पाय पुढें चालती ॥१॥ निर्गुणगे माय गुणवंत जाला प्रतिबिंबीं बिंबतसे चैतन्याचे मुसे । प्रति ठसावत तें वृंदावनीं ब्रह्म असेगे माये ॥२॥ बापरखुमादेविवरु डोळसु सांवळा । द्वैत अद्वैत सोहळा भोगविगे माये ॥३॥

५५. **ऐसा अवतार नरहरिस्तंभामाझारी**। भक्तांपरोपरी धरी रूपें ॥१॥ धरुनियां महत्त्व झाला नृसिंहरूप । वेदशास्त्रांसी अमूर्त मूर्तीस आला ॥२॥ बापरखुमादेविवरु नरहरी अवतारु । वर्ण शारङ्गधरु निजरूप ॥३॥

५६. **दोही बाही संतांची सभा**। सिंहासनीं उभा श्रीविठ्ठल ॥१॥ गाती नारद तुंबर प्रेमें । हरीचीं नामें गर्जती ॥२॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु उभा । त्रैलोक्याची शोभा शोभतसे ॥३॥

---

## श्रीपंढरीमाहात्म्य.

५७. **आनंदाच्या ताटीं अमृताची वाटी** । विवेक तारूं घोटीं रसनाबळें ॥१॥ तें हें रूपडें रूपस विठ्ठल । पुंडलिकें बहुसाल प्रार्थियेलें ॥२॥ तारावया जन व्हावया पावन । जडमूढ अज्ञान हरिपाठें॥३॥ कर्म धर्म करितां शिणली येतां जातां । मग पुंडलिकें अनंता प्रार्थियेलें ॥४॥ येउनियां श्रीहरी भीमेच्या तीरीं । सुदर्शनावरी पंढरी उभविली ॥५॥ अमरतरुवर तीर्थ सरोवर । वेणुनादीं श्रीधर खेळताती ॥६॥ बागडे गाती हरी वाकुल्या कुसरी । तेथें पुंडलिक परोपरी स्तवन करी ॥७॥ धन्य पंढरीनगरी फावली चराचरीं । धन्य जो भूमीवरी दृष्टीभरी हरी देखे ॥८॥ ज्ञानदेवा बीज विठ्ठल केशिराज । नव्हे हें नवल चोज प्रत्यक्ष हरी ॥९॥

५८. **न चलति शब्द खुंटलें पैं वाद** । एकतत्त्व भेद नाहीं रूपा

॥१॥ तें रूप पंढरी क्षरलें चराचरीं । माझें माझ्या घरीं बिंबलेंसे ॥२॥ बापरखुमादेविवरु पुंडलिका वरु । निळियाचा आगरु पंढरीये ॥३॥

५९. **दुजें द्वैत सांडी एकतत्व मांडी** । अद्वैत ब्रह्मांडीं पैसु कीजे ॥१॥ तें रूप पंढरी पुंडलिका द्वारीं । मुक्तिमार्ग चारी वश्य रया ॥२॥ अनंतीं अनंत ओतिलें संचित । वैकुंठ अद्‌भुत उभें असे ॥३॥ ज्ञानदेवीं ध्यान मनमौन्य चरण । आपणचि मग्न तेथें जाले ॥४॥

६०. **एकी ह्मणे भाव धरूं नेदी मौन** । तेथींचें वो ज्ञान मज सांगे ॥१॥ एकीनें सांगितलें दुजीनें परिसिलें । प्रपंच पुसलें तेणें रूपें ॥२॥ तें घरटीं कडी सोकरीं बागडी । सोहं कथा उघडी पंढरीये ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे निवृत्तीस मनें । नयनांसी पारणें देखतांची ॥४॥

६१. **तत्त्वें तत्त्व धरी कोहंभाव होकरी** । सोहं सोहं करी कोण सये ॥१॥ सोकरी पुंडलिकु ज्ञान पुण्यश्लोकु । विठ्ठलीं त्रैलोक्यु उद्धरिलें ॥२॥ सखी जाय तेथें भाव बळिवंत । प्रपंच देहांत नाहीं तुज ॥३॥ ज्ञानदेव पुसे निवृत्ति सौरसें । पुंडलिकें कैसें पुण्य केलें ॥४॥

६२. **जयातें पाहतां परतला आगमु** । निगमा नाकळे दुर्गुमु । सिद्धसाधक निरुतें वर्मु । न पडे ठायीं सर्वथा ॥१॥ तें या पुंडलिका ओळलें । प्रेम प्रीतीनें घोळलें । भक्तिमातेनें चाळविलें । आधीन केलें आपणया ॥२॥ जें माये अविद्ये वेगळें । गुणत्रया नातळे । काळें गोरें ना सांवळें । निर्धारिता नेणवे ॥३॥ जें द्वैताद्वैताहूनि परतें । जें सुखातें वाढवितें । योगी लक्षीं लक्षित ज्यातें । परि नेणवे सर्वथा ॥४॥ जें रूपा अरूपा वेगळें । सहस्रनामांहूनि आगळें । परम कृपेचें कोवळें । क्रियाकर्माविरहित ॥५॥ जें ब्रह्मरसाचें गोठलें । तें पंढरिये प्रगटलें । बापरखुमादेविवरु विठ्ठलें । नामें आथिलें चोखडें रया ॥६॥

६३. **जन्मोजन्मींच्या सायासीं** । विठ्ठल लाधला पुंडलिकासी ॥१॥ पूर्वा पुण्य केलें वो माये । विटे लाधले या विठोबाचे पाये ॥२॥ बापरखुमादेविवरु आहे । तया तीर्था केधवां जाती पाये ॥३॥

६४. **आनु नेणें कांहीं** । विठ्ठलु स्मरें देहभावीं ॥१॥ पुंड-

लिका हें चिंतन । ह्मणोनि विटेवरी हें ब्रह्म ॥२॥ रखुमादेविवरु शाहाणे । विठ्ठलु पाहुणे पुंडलीक ॥३॥

६५. **तळवे तळवटीं असे** । विटें फावलें अनयासें ॥१॥ आह्मां न संडवे पंढरी । विठ्ठलराज विटेवरी ॥२॥ जानु जघन बरवे दिसे । तें देखोनि मन उल्हासे ॥३॥ पदकमळ जोडिलें । तेथें मुनिजन रंगले ॥४॥ कासे कासिला पितांबरु । चरणीं ब्रिदाचा तोडरु ॥५॥ नाभीकमळीं जन्म असे । ब्रह्मादिकां अपैसे ॥६॥ हस्तकडगे बाहुवटे । विठोबा शृंगार गोमटें ॥७॥ अंगीं चंदनाची उटी । तें देखोनि मन संतुष्टी ॥८॥ गळां वैजयंती माळा । मणीमंडित वक्षस्थळा ॥९॥ कानीं कुंडलें झळाळ । श्रीमुख दिसतें वेल्हाळ ॥१०॥ वदन सकुमार गोजिरें । जैसे पोवळिवेल साजिरे ॥११॥ दंतपंक्ति झळाळ । जैसी माणिकाची कीळ ॥१२॥ नाशिक मनोहर दिसे । जैसें वोतिलेंसे मुसें ॥१३॥ लोचन बरवें विशाळ । श्रवणीं कुंडलें झळाळ ॥१४॥ टिळक रेखिला मृगनाभीचा । बाप राजा मन्मथाचा ॥१५॥ माथां मुगुट झळाळित । बाप पुंडलिका न्याहाळित ॥१६॥ निवृत्तिदास शरणांगत । विठ्ठला चरणींचें आरत ॥१७॥

६६. **क्षीर सागरीचें निजरूपडें** । पाहतां पारखिया त्रिभुवनीं न संपडे । तें उभें आहे वाडेकोडें । पुंडलिकाचे आवडी ॥१॥ मेघश्याम घेउनियां बुंथी । जयातें श्रुती पैं वानिती ॥ कीं तें पुराणासी वाडे । तें पंढरिये उभें असे कानडे गे माये ॥२॥ आवडीच्या वालभें गोजावले गोजिरें । पाहतां साजिरें त्रिभुवना एक गे माये ॥३॥ जें सकळ मंगळदायकाचें प्रेम आथिलें । कीं ब्रम्हरसाचें वोतिलें घोसुलें ॥ ब्रम्हविद्येचें सार मथिलें । देखा सकळ आगमींचें संचलें । कीं बापरखुमादेविवरु विठ्ठल नामें मढिलें । श्रीगुरु निवृत्तीनें दिधलें प्रेमखुण रया ॥४॥

६७. **नेणो विठो मार्ग चुकले** । उघडे पंढरपुरा आले । भक्तें पुंडलिकें देखिले उभे केले विटेवरी ॥१॥ तो हा विठोबा निधान । ज्याचें ब्रह्मादिकां ध्यान । पाउलें समान । विटेवरी शोभती ॥२॥ रूप पहातां तरी डोळसु । सुंदर पाहतां गोपवेषु । महिमा वर्णितां

महेशु । जेणें मस्तकीं वंदिला ॥३॥ भक्ति देखोनि लांचावला । जाऊं नेदी उभा केला । निवृत्तिदास ह्मणे विठ्ठला । जन्मोजन्मीं न विसंबे ॥४॥

६८. **हें नव्हे आजिकालिचें** । युगां अठ्ठाविसांचें । मज निर्धारितां साचें । हा मृत्युलोकुचि नव्हे ॥ हाचि मानिंरे निर्धारु । येर सांडिंरे विचारु । जरी तूं पाहासि परात्परु । तरि तूं जायें पंढरियें ॥१॥ बाप तीर्थ पंढरी । भूवैकुंठ महीवरी । भक्त पुंडलिकाचे द्वारीं । कर कटावरी राहिला ॥२॥ काशी अयोध्या अवंति कांति । मथुरा माया गोमती । ऐशीं तीर्थें इत्यादिकें आहेती । परि सरी न पवती पांडुरंगीं ॥३॥ हाचि मानिंरे विश्वासु । येर सांडिंरे हव्यासु । जरि तूं पाहासि वैकुंठवासु । तरि तूं जायें पंढरियें ॥४॥ आड वाहे भीमा । तारावया देह आत्मा । पैल थडीय परमात्मा । मध्य राहिला पुंडलिकु ॥५॥ या तिहींचें दरुशन । प्राण्या नाहीं जन्ममरण । पुनरपि आगमन । येथें बोलिलेंचि नाहीं ॥६॥ पंढरी म्हणजे भुवैकुंठ । ब्रह्म तंव उभेंचि दिसताहे नीट । या हरिदासासी वाळुवंट । जागरणासी दीधलें ॥७॥ ह्मणोनि करा करारे क्षीरापति । नटा नटा कीर्तनवृत्ति । ते नर मोक्षातें पावती । ऐसें बोलती सुरनर ॥८॥ हें चोविसा मूर्तींचें उद्धरण । शिवसहस्रनामासी गहन । हेंचि हरिहराचें चिंतन । विश्ववंद्य हे मूर्तीतें ॥९॥ तो हा देवादि देव बरवा । पांडुरंग सदाशिवाचा निज ठेवा । बापरखुमादेविवरु पंचविसावा । चोविसा मूर्ति वेगळा १०

६९. **पंढरीचे वाटे अनंत घडती याग** । वैकुंठींचा मार्ग तेणें संगें ॥१॥ जप तप अनुष्ठान क्रिया कर्म धर्म । हें जाणताती वर्म संतजन ॥२॥ भक्तिमार्ग फुकटा आनंदाची पव्हे । लागलीसे सवे पुंडलिका ॥३॥ दिंडी टाळ घोळ गरुडटकियाचे भार । वैष्णवांचे गजर जिये नगरीं ॥४॥ तिहीं लोकीं दुर्लभ आमर नेणती । वृक्ष होऊनी पुढती सेविताती ॥५॥ सनकादिक मुनी ध्यानस्त पैं सदा । ब्रह्मादिकां कदा न कळे महिमा ॥६॥ ज्ञानदेव निवृत्ति पुसतसे कोडें । पुंडलिकें केवढें भाग्य केलें ॥७॥

७०. **कल्पना वृक्षासि देखिलें** । चिंतामणीस चिंतिलें । कामधेनुसी आपेक्षिलें । जीण्या जिवविलें तेंचि हरिरूप पंढरियें ॥१॥ धन्य

कुळ धन्य जन्म । जयासि पंढरीचा नेम । चित्तीं अखंड विठ्ठल प्रेम । ते धन्य भक्त भूमंडळीं ॥२॥ तोचि तीर्थरूपसदा । तया दोष न बाधिती कदा । जो रातला परमानंदा । तेथें सर्व सिद्धी वोळंगती ॥३॥ ऐशीं वेदशास्त्रीं पुराणीं । जो रातला नामस्मरणीं । धन्य तया तीर्थ पर्वणी । धन्य वाणी तयाची ॥४॥ पंढरीसी कीर्तन करी । पुंडलिकासी नमस्कारी । विठ्ठल चरण अंतरीं धरी । धन्य जन्म तयाचा ॥५॥ सकळ कुळाचा तारकु । तोचि जाणावा पुण्यश्लोकु । पांडुरंगीं रंगला निशंकु । धन्य जन्म तयाचा ॥६॥ त्यासी अंतीं वैकुंठप्राप्ती । ऐसें शुकें सांगितलें परीक्षिती । जे जे हरिचरणीं भजती । ते ते पावती वैकुंठ ॥७॥ नामें स्फुंदत नाचत रंगणा । प्रेम विठ्ठल चरणीं । सर्व सुख खाणी । बापरखुमादेविवरु विठ्ठल ॥८॥

७१. **जोडुनियां जोडी जेणें हुंडारिली दुरी** । भिकेची आवडी तया नावडे पंढरी ॥१॥ करंटे कपाळ ज्यांचें नाम नये वाचे । सदैव सभाग्य तोचि हरीरंगीं नाचे ॥२॥ आपण न करी याला दुजियासि जावो नेदी । विषयाचा लंपट शिकवी कुविद्या कुबुद्धी ॥३॥ ऐसें जे जन्मोनि नर भोगिती अघोर । न करिती तीर्थयात्रा तया नरकीं बिढार ॥४॥ पुंडलिकें भक्तें तारिलें विश्वजनां । वैकुंठींची मूर्ति आणिली पंढरपुर पाटणा ॥५॥ कायावाचामनें जिवें सर्वस्वें उदार । बापरखुमादेविवरा विठ्ठलाचा वारिकर ॥६॥

७२. **वाजतसे बोंब कोण्ही नायकती कानीं** । हरिहरि न म्हणती तया थोर जाली हानी ॥१॥ उठा उठा जागा पाठीं भय आलें मोठें । पंढरीवांचुनी दुजा ठाव नाहीं कोठें ॥२॥ तापत्रय अग्नीचा लागला वोणवा । कवण रिघे आड कवण करी सावाधावा ॥३॥ देखोनि ऐकोनि एक बहिर अंध जाले । विषयाचे लंपट बांधोनि यमपुरीस नेले ॥४॥ आजा मेला पणजा मेला बाप मसणां नेला । देखत देखत नातु पणतु तोही वेडा जाला ॥५॥ व्याघ्र लासी भूतंये लागतील पाठीं । हरिभजन न करितां सगळें घालूं पाहे पोटीं ॥६॥ संतसंग धरा तुह्मी हरिभजन करा । पाठीं लागलसे काळ दांत

खातों करकरां ॥७॥ बापरखुमादेविवरा विठ्ठला शरण । भावे न निघतां न चुके जन्ममरण ॥८॥

७३. **शरीर हें स्थळ । मळानिर्मळाचें मूळ** । पाहोनि चोखाळ । आदिपुरषांसी ॥१॥ जन्म मरणाच्या उचटुनि पेडी । मग तये बिंवडीं ज्ञान पिके ॥२॥ पंढरीचें पिक नसमाये अंबरीं । तें शेत सोकरी पुंडलिकु ॥३॥ ऐहिक्य परत्र दोन्ही शेताचीं आउतें । मुंड मुंड तेथें कुळवाडिये ॥४॥ उचलुनि पेंडी कासिया समुळीं । मग पुण्यकाळीं ओलवले ॥५॥ गरुडटके दोन्ही शेताची बुजावणी । दश कुडपणीं नामघोष ॥६॥ एकवीस स्वर्गांचा घालूनियां माळा । मग ते गोपाळामाजि खेळे ॥७॥ जये शेतीं निवृत्ति भीतरे । तये शेतीं साजे पुरे । राउळीं निदसुरे । दंडिजती ॥८॥ रात्री दिवस तुम्हीं हरिचरणीं जागा । तेणें तरालगा भवसागरू ॥९॥ अठराही बलौतें तें केलें धडौतें । खळें दान देते सनकादिकां ॥१०॥ ज्ञानदेव ह्मणे जगदानीं पिकला । पुरोनि उरला पंढरिये ॥११॥

७४. **विवेक नदीये बैसोनी** । सांगड सत्वाची बांधोनी ॥१॥ एक पंढरी वैकुंठ । येर वाउगे बोभाट ॥२॥ चारी वेद विवादती । पुराणें साक्ष देती ॥३॥ बोले निवृत्तीचा दास । संत गर्जती पाप नाश ॥४॥

७५. **वाराणशी यात्रे जाईन** । प्रयाग तीर्थ पाहीन । त्रिवेणिये स्नान करीन । परि मी वीट नव्हेन ॥१॥ विठोबा पाईंची वीट । मी कईंबा होईन ॥धृ०॥ गोदावरी यात्रे जाईन । बारा वरुषाचें फळ लाहीन । अब्जकतीर्थीं स्नान करीन । परि मी वीट नव्हेन ॥३॥ मल्लिकार्जुन यात्रे जाईन । श्रीशैल्य शिखर पाहीन । पाताळगंगे स्नान करीन । परि मी वीट नव्हेन ॥४॥ मातापुर यात्रे जाईन । सह्याद्री पर्वत पाहीन । गहनगंगें स्नान करीन । परि मी वीट नव्हेन ॥५॥ कोल्हापुरीं यात्रे जाईन । महालक्ष्मी पाहीन । विशाळतीर्थीं स्नान करीन । परि मी वीट नव्हेन ॥६॥ एका अंगुष्ठीं तप करीन । पृथ्वीपालाचि लाहीन । देह कर्वतीं देईन । परि मी वीट नव्हेन ॥७॥ बहुता पुण्यांच्या सायासीं । चरण जोडले विटेसी । निवृत्ति दासु ह्मणे परियेसी । परि मी वीट नव्हेन ॥८॥

७६. **त्रिपुटीं भेदुनी मनाच्या मौळीं**। तें आलें भूमंडळीं पंढरिये ॥१॥ नाम लाधलें नाम लाधलें। पुंडलिकें केलें खेवणें देखा ॥२॥ समर्थाचे पाथीं भोजन जालें। पंचामृत घेतलें धणीवरी ॥३॥ बाप रखुमादेविवरु विठ्ठलेंसी तृप्ती । यथार्थ भाविता कळों येईल चित्तीं ॥४॥

७७. **पातेजोनि खेंवासि आणिलें** । येणें आपणिया समान मज केलें गे माये ॥१॥ पाहें पा नवल कैसें वितलें । मन उन्मनीं उन्मन ग्रासिलें ॥२॥ पाहें पा येणें रखुमादेविवरा विठ्ठलें। पाहे पा राहणें पंढरपुरीं केलें ॥३॥

७८. **जें येथें होतें तें तेथें नाहीं**। ठाईंच्या ठाईं हारपलें ॥१॥ घरींच्या घरीं जाली चोरी। आपणावरी आळु आला ॥२॥ पंढरपुरीं प्रसिद्ध जाणा। पुरविल्या खुणा ज्ञानदेवा ॥३॥

७९. **आकानिकेळेचिकनामातु**। कारले धनिगे मरुळादने ॥१॥ चलुवाने चलुवाने पंढरिराया चलुवाने। यंल्ले दौनर्कबारन्ने ॥२॥ पुंडलिकने भक्तिगे बंदा। रखुमादेविवर विठ्ठलुने ॥३॥

८०. **माझे जिवींची आवडी** । पंढरपुरा नेईन गुढी ॥१॥ पांडुरगीं मन रंगलें। गोविंदाचे गुणीं वेधलें ॥२॥ जागृति स्वप्न सुषुप्ति नाठवे। पाहतां रूप आनंद साठवे ॥३॥ बापरखुमादेविवरु सगुण निर्गुण। रूप विटेवरी दाविली खुण ॥४॥

८१. **अवघाची संसार सुखाचा करीन**। आनंदें भरीन तिन्ही लोक ॥१॥ जाईनगे माय तया पंढरपुरा। भेटेन माहेरा आपुलिया ॥२॥ सर्व सुकृताचें फळ मी लाहीन। क्षेम मी देईन पांडुरंगीं ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलेशीं भेटी। आपुले संवसाटी करुनि ठेला॥४॥

---

## बुद्धिरूपी सखीशीं संवाद.

८२. **येऊनि वऱ्हाडिणी बैसल्या टेकी**। कोण तो नोवरा नाहीं वोळखी ॥१॥ मी कवणाची मज सांगा कोण्ही। वऱ्हाड आलिया वऱ्हाडिणी ॥२॥ कवण ते वरमाय कवण तो वरबाप। कवण तो नोवरा कवण तो मंडप ॥३॥ वऱ्हाड नव्हे स्वप्न गे माये। बापरखुमादेविवराचे वेगीं धरावे पाये ॥४॥

८३. **एकी धावे सुनाट एकीनें धरीलें बेट** । एकीनें शेवट साधियेला ॥१॥ कोणे तत्वीं हरि कैसी यासि परी । नांदे कवणे घरीं सांगिजेसु ॥२॥ सखी सांगे बाई भावो धरीं देहीं । एकारूपा सोयी येईल घरा ॥३॥ बापरखुमादेविवर विठ्ठल अवचितां । निवृत्ति समता सांगितलें ॥४॥

८४. **येरी ह्मणे भेद सृष्टी दाविती शब्द** । तत्वीं तत्व बोध कोठें गेले ॥१॥ सखी ह्मणे बाई आकाराची सोय । तुज मज काय इयें देहीं ॥२॥ चपळता सांगों उष्णता घोटी । घोटुनियां होटी समब्रह्मीं ॥३॥ ज्ञांनदेवीं तट भाग्य जैं उत्कट । तैं हे वाक्पट पडती दृष्टी ॥४॥

८५. **सखी ह्मणे बाई समपण तें कैसें** । येरी ह्मणे देश हिंडूं नको ॥१॥ आधीं शोधीं आप मग पाहीं दीप । कोहं सोहं रूप दवडी दुरी ॥२॥ त्रिपुटीं झोंबों नको मायावी सकळ । अवघा सरळ हरी आहे ॥३॥ ज्ञानदेव बुझवी बुझे ज्ञानधारण । तुज मज सौजन्य येणें न्यायें ॥४॥

८६. **सांग सखिये बाई मज हें न कळे** । कैसा हा अकळे समतेजें ॥१॥ भाव दृढ धरीं चित्ताची लहरी । प्रकृति कामारी सत्रावीची ॥२॥ येरी म्हणे वाजट झाली हो पुराणें । समरस जाणे कोणे घरीं ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे आदिमध्य समता । सुखें पहातां चढे हातां४

८७. **सखीप्रती सखी आदरें करी प्रश्न** । जीव शिव पूर्ण कैसा दिसे ॥१॥ सखी सांगे मात उभयतां ब्रह्म । नाहीं हो विषम हरीवीण ॥२॥ सूर्यप्रकाश मही घटमठीं समता । तैसा हा उभयतां बिंब एका ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठल जिवाचा । व्यापक शिवाचा शिवपणें ॥४॥

८८. **सखी सांगे सार शांति क्षमा दया** । प्रपंच विलया बरळ पोशी ॥१॥ सखी ह्मणे एका दुजी ह्मणे अनेकां । अनेकीं सिंम्यका गुरुगम्य ॥२॥ सावध निबंध आध्याचा उकल । रसनेचा पालव रसना तोयें ॥३॥ ज्ञानदेव सांगे रखुमादेवी जप । अगम्य संकल्प एक दिसे ॥४॥

८९. **सम्यक् करीं शांति बैसें एके पातीं** । क्षेमेसि निवृत्ति वाड करीं ॥१॥ ऐसा हा उपदेश सखी सांगे जीवास । ह्मणी कासावीस होसी बाई ॥२॥ सज्ञानी विज्ञान ज्ञानीं ज्ञानपण । अन्वयीं शोधून पाहा लक्षीं ॥३॥ ज्ञानदेवीं शिवा उन्मनि रिघावा । हरीचा विसावा सर्वांघटीं ॥४॥

९०. **ममता पुसे सये शिवींजिवा ठाये** । पूर्णता पान्हाये कोणे घरीं ॥१॥ एक सखिये पुससी बाईये । परब्रह्म समाये पुंडलिका ॥२॥ नाहीं यासी ठावो संसार पैं वावो । एकतत्व रावो घरीं वसे ॥३॥ बापरखुमादेविवरु उदारु बोळला । विश्वजनपाळा ब्रीद साजे ॥४॥

९१. **अष्टदळ पाहे पद्म नेत्र दाहे** । सोहं मंत्र कोहं ठाकी दुरी ॥१॥ आडवीं आडव रूपाचा बरव । सखिये तो राव रामराणा ॥२॥ उपरती साधि प्रपंची अवधी । गुणें गुण उद्बोधी शेजे सये ॥३॥ ज्ञानदेवीं लपे विज्ञान हारपे । काळ यम मापें न बाधिती ॥४॥

९२. **चित्तींचें चैतन्य रूपींचे अनुकार** । रूप असे साचार नयनांमाजि । तेजाचें तेज दीपीं कळिका सामावे । दीपक माल्हावे तेज तेजीं ॥१॥ काय सांगो सखिये तेज पैं अढळ । इंद्रियें बरळ देखतांची ॥२॥ घनदाट रूपीं एकरूप तत्त्व । दीपीं दीपसमत्व आप दिसे । निराकार वस्तु आकार पैं अपार । विश्वीं चराचर बिंबलीसे ॥३॥ प्राणप्रिया गेली पुसे आत्मनाथा । कैसेनि उलथा गुरुखुणें ॥४॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलीं उपरति । रूपीं रूपदीप्ति एक जाली ॥५॥

९३. **प्राणासवें सखी आत्मा हा बिंबला** । सर्वगुणी निमाला याच्या वृत्ति । ध्यान गेलें ठायां मन गेलें सुखा । नयनीं नयनसुखा अवलोकीं ॥१॥ तेंचि सखी रूप बोळखे स्वरूप । विश्वीं विश्वरूप एका तेजें ॥२॥ द्वैत पैं न दिसे अद्वैत सुरवाडु । एक दीपें उजेडु सर्वां घटीं ॥३॥ विराल्या कामना अमूर्त परिपाठीं । चैतन्याची दृष्टी उघडली रया ॥४॥ सखी ह्मणे सुख प्राणासि भुललें । आत्मपणें मुकलें काय करूं ॥५॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलें रूप । दाऊनि स्वरूप एक केलें ॥६॥

९४. **प्राणाची पैं सखी पुसे आत्मयासी** । ईश्वरीं ध्यानाची वृत्ति गेली ॥१॥ पांगुळल्या वृत्ति हारपली भावना । निमाली कल्पना

ब्रह्मीं रया ॥२॥ हें सुख साचार सांगे कां विचार । आत्मयाचें घर गुरुखुणें ॥३॥ चेतवितें कोठें गुंफलें सगुण । निर्गुणीं पैं गुण समरस ॥४॥तें सुख अपार निळीये वेधलें । कृष्णरूप हें देखिलें सर्वांरूपीं ॥५॥ या ध्यानीं गुंफलें मनामाजि वेख । द्वैतभानसुख नाठवे मज ॥ अद्वैत घरकुलें गुणाचें पैं रूप । मनामाजि स्वरूप बिंबलें रया ॥६॥ विस्मृति गुणांची स्मृति पैं भजना । दृष्टादृष्ट जनां ब्रह्मरूप॥७॥याचेनि सुलभें नाठवे संसारु । ब्रह्मची आकारु दिसत असे ॥८॥ वेगी सांग ठसा कोण हें रूपडें । कृष्णचि चहूंकडे बिंबलासे॥९॥बापरखुमादेविवरु विठ्ठल सखी । कृष्णरूपीं सुखी तनु जाली ॥१०॥

९५. **तत्त्वतां पैं तत्त्व धरितां नये हातां ।** मग ममतेची चिंता तयासि पुसे ॥१॥ बाई कोणे घरीं सांगे वो जिवित्व । परेचें परतत्त्व कोणे घरीं ॥२॥ सखी सांगे गोष्टी बाईये रूप वो धरीं । आपणाचि घरीं सांपडेल ॥३॥ निवृत्तीनें खुणें सांगितलें ज्ञान । रखुमादेविवरु ध्यान विठ्ठल वरदा ॥४॥

---

## श्रीनिवृत्ती व श्रीज्ञानदेव यांचा संवाद.

९६. **संसारसातें आलों मी पाहुणा ।** दिस दोन्ही आनंदा पाहावयासी ॥१॥ तंव त्याचेनि तेजें झडपिलें मज । मजमाजि काज होऊनि ठेलें ॥२॥ चित्त जंव निवडी तंव आपणहि पळे । अवचिता जवळी येतु असे ॥३॥ जाऊं पाहे परता तव नेतु असे पंथा । वैकुंठींच्या कथा आपण सांगे ॥४॥ एकरूप दिसे तव सभोंवता आपण । अवघा नारायण ज्ञानदेवा ॥५॥

९७. **विश्वरूप पाहे तंव सभोंवतें रूपडें ।** पाहे चहूंकडे तोचि दिसे ॥१॥ काय करूं सये कैसा हा देव । माझा मज भाव एकतत्वीं ॥२॥ सम तेज पाहे तव एकचि वो तेज । ॐकार सहज निमाला तेथें ॥३॥ मुळींची मूळ खुण न संपडे सर्वथा । व्यापयिलें चित्ता तेजें येणें ॥४॥ स्वानुभव दिवटी उजळूनि जंव पाहीं । तंव एक बिंब दाही दिशा दिसे ॥५॥ ज्ञानदेव निवृत्ति हे खूण पुसत । सांगावें त्वरित गुरुराजें ॥६॥

९८. **अरे स्वरूपाकारणें विश्वरूप घेतलें** । सगुणें झांकिलें निर्गुण रया ॥१॥ तत्त्वीं तत्त्व कवळी उगवे रविमंडळी । अवघीच झांकोळी आपल्या तेजें ॥२॥ द्रष्टाचिये दीप्तीं दृश्यचि न दिसे । समरसी भासे तेज त्याचें ॥३॥ तत्स्वरूपीं नांदे चित्स्वरूपीं भासे । ॐकारासरिसें तदाकार ॥४॥ प्रेमकळीं ओतलें सप्रमळीत तेज । तेथें तूं विराज ज्ञानदेवा ॥५॥

९९. **स्वामीचे कृपेनें चिद्घन ओळलें** । रसातळ पाल्हेलें ब्रह्मतेजें ॥१॥ कृपाळु श्रीगुरु ओळला सर्वत्र । आपेआप चरित्र दृष्टी दावी ॥२॥ ॐकाराचें बीज समूळ मातृकीं । दिसे लोकां लोकीं एकतत्त्वीं ॥३॥ विकारीं साकार अरूपीं रूपस । दावी आपला भास आपणासहित ॥४॥ सर्वांग समतेज ऐसा हा चोखडा । पाहतां चहूंकडा दिव्य तेज ॥५॥ ज्ञानदेव ह्मणे निवृत्तीशीं पुशिलें । सत्रावी दोहिले पूर्ण अंशीं ॥६॥

१००. **अरे अरे ज्ञाना ज्ञान उघडें बोलसी** । तुझा तूंचि होशी हरी ऐसा ॥१॥ आपुलें तें झांकी पर तें दावी । पश्यंतिये भावीं मध्यमे राहें ॥२॥ तत्त्व तेंचि धरीं रजो गुण चारी । पंचमा आचारी सांपडती ॥३॥ षड्रसी भोक्ता हरिरूप करी । सप्तमा जिव्हारीं कळा धरीं ॥४॥ अष्टमा अष्ट सिद्धी अष्टांग नेमेशीं । तें जीवेंभावेंसी तूंचि होसी ॥५॥ नवमा नवमी दशमावृत्ती । एकादशीं तृप्ती करी ज्ञाना ॥६॥ ऐसा तूं एकादश होईं तूंरे ज्ञाना । द्वादशीच्या चिन्हां सांगो तुज ॥७॥ निवृत्ति द्वादश गुरुसेवनीं भाष्य । एकविध कास घाली ज्ञाना ॥८॥

१०१. **अरे अरे ज्ञाना ज्ञान हे निवृत्ति** । देहीं देहा उपरती तुज प्राप्त ॥१॥ अर्थावबोध अर्थुनि दाविला । ज्ञानिया तूं भला ज्ञानदेवा ॥२॥ सोहं तत्व साधलें प्रमाण सर्वत्रीं । उभयतां गात्रीं प्रेम तनू ॥३ बिंबीं बिंब रसीं उपरम देखिला । प्रपंच शोखिला तुवां एकें ॥४॥ विष्णुनाम मंत्र सोहं तेज दिवटा । उजळून चोहटा शुद्ध केला ॥५॥ निवृत्तीचा शिष्य ज्ञानदेवीं भाष्य । शांति समरस बोध उतरे ॥६॥

१०२. **ऐसें हें अंडज सांगितलें देवें**।सांगोनियां भावें गिळीयेलें

॥१॥ गिळिला प्रपंच समाप्ति इंद्रियां। वैष्णवीं हे माया बिंबाकार ॥२॥ निरशून्य शून्य साधूनि उपरम। वैकुंठीचें धाम हृदय केलें ॥३॥ जिव शिव शेजे पंक्तीस बैसली। पंचतत्वांची बोली नाहीं तेथें ॥४॥ तत्त्वीं तत्त्व गेलें बोलणें वैखरी। वेदवक्ते चारी मान्य झाले ॥५॥ ज्ञानदेव ह्मणे निवृत्ति तुष्टला। सर्वांगें दीधला समबोध ॥६॥

१०३. परेसी जंव पाहें तंव दिसे हें अरुतें। तळीं तळाखालतें विश्वरूप ॥१॥ दिव्य चक्षुदृष्टि निवृत्तीनें दिधली अवघीच बुझाली विष्णुमाया ॥२॥ शम दम कळा दांत उदांत। शांतितत्वता मावळत उपरमेसी ॥३॥ रयनि दिनमणी गगनासगट। अवघेची वैकुंठ तया घरीं ॥४॥ उद्भट कारण केलें हो ऐसें। तुष्टोनि सौरसें केलें तुम्हीं ॥५॥ ज्ञानदेव शरण निवृत्तीच्या चरणां। कांसवीचा पान्हा पाजियेला ॥६॥

१०४. सार सप्तमीसि हारपली निशी। दशवे द्वारेसीं उभा राहे ॥१॥ तेथें तूं सावध अवघाचि गोविंद। देहीं देहाभेद करूं नको ॥२॥ इंद्रियांच्या वृत्ति दशवे द्वारीं गति। देहगेहउपरति होईल तुज ॥३॥ विस्तारीं विस्तार गुण गुह्य सार। एकाएकीं पार सार धरीं ॥४॥ विकृति विवर प्रकृति साचार। तत्वाचा निर्धार समरसीं ॥५॥ निवृत्ति सांगे ज्ञाना एक तूं करी। तरी तूतें कामारी होईल चित्तें ॥६॥

१०५. सूक्ष्म साध्य काज सांगितलें स्वामी। धृति धारणा क्षमीं हारपल्या ॥१॥ सूक्ष्म सख्य नेलें विश्वरूप देहीं आलें। प्रपंचेसि मावळलें तिमिर रया ॥२॥ विशेषेंसि मिठी दिधली शरिरें। इंद्रियें बाहिरें नाईकती ॥३॥ ऐसें हें साधन साधकां कळलें। चेतवितां बुझाविलें मन माझें ॥४॥ उतावेळ पिंड ब्रह्मांडा साहित। नेत्रीं विकाशत ब्रह्मतेज ॥५॥ ज्ञानदेव विनवी निवृत्तीस काज। हरपली लाज संदेहेंसी ॥६॥

१०६. अरे अरे ज्ञाना झालासि पावन। तुझें तुज ध्यान कळों आलें ॥१॥ तुझा तूंचि देव तुझा तूंचि भाव। फिटला संदेह अन्यतत्वीं ॥२॥ मुरडुनियां मन उपजलासि चित्तें। कोठें तुज रितें न दिसे रया ॥३॥ दीपकीं दीपक मावळल्या ज्योती। घरभरी वाती

शून्य झाल्या ॥४॥ वृत्तीची निवृत्ति आपणासकट । अवघेंची वैकुंठ चतुर्भुज॥५॥निवृत्ति परमानुभव नेमा । शांति पूर्ण क्षमा ज्ञानदेवो ६

१०७. **अवेवी सावेव सम साम्य बुद्धी** । शांति दया सिद्धी प्रगटल्या ॥१॥ वोळली हे कृपा निवृत्ति दयाळा । सर्व रोम पाल्हाळा प्रेमांकुर ॥२॥ दिवसाचें चांदिणें रात्रीचें ऊष्ण । सांगितला प्रश्न निवृत्तिराजें ॥३॥ सोहंसिद्धमंत्रें प्रोक्षिला संसार । मरणाचि येरझार खुंटियेली ॥४॥ चित्तवित्तगोत आपण पैं जाला । देहीं देह गेला भाव माझा ॥५॥ ज्ञानदेवा रसिं स्नान दान गंगे । प्रपंचेसी भंगे विषयजात ॥६॥

१०८. **आदिमध्यअंत तुजमाजि बिंबे** । ब्रह्मीं ब्रह्म थांबे लवण जळीं ॥१॥ तैसें झालें ज्ञाना उन्मनीं उलथा । प्रपंच चळथा उडालिया ॥२॥ रिगु निगु काज जालें तुझें घर । अवघाचि संसार कळला आम्हां ॥३॥ गोप्य गुजराज उमजलासे हरी । दिसे अभ्यंतरीं आत्माराम ॥४ ॥ न दिससी ज्ञाना देहीं तुझ्या राम । घेतला विश्राम ऐसें दिसे ॥५॥ निवृत्ति निवांत समरसें पाहात । अवघाचि दिसत देहीं विदेह ॥६॥

१०९. **निज तेज बीज नाठवे हे देहो** । हारपला मोहो संदेहेसीं ॥१॥ काय करूं सये कोठें गेला हरी । देहीं देह मापारी हरी जाला ॥२॥ विदेह पैं गंगा पारुषली चित्तीं । चिद्रुपीं हे वृत्ति बुडीयेली ॥३॥ गुरुलिंगीं भेटी निवृत्ति तटाक । देखिलें सम्यक् समरसें ॥४॥ दत्तचित्तवृत्ति ज्ञेयज्ञानकळा । समाधि सोहळा विष्णुरूपीं ॥५॥ ज्ञानदेव गाय हरिनामामृत निवृत्ति त्वरित घरभरी ॥६॥

११०. **सुखीं सुख मुरे तेथें कोण झुरे** । जळीं लवण विरे तैसें जालें ॥१॥ ज्ञान तें विज्ञान प्रपंचेसि भान । तेजोरूप गगन बिंबलें दिसे ॥२॥ आत्मा आत्मरूप परमात्मा समीप । कोटि कोटिरूप एकलेंचि दिसे ॥३॥ नानातेजीं भासे प्रपंचीं प्रकाशे । विरुळा समरसें ध्याये त्यासी ॥४॥ ऐसें जालें तुज प्रगटलें निज । कांसवीचें बीज अंकुरलें ॥५॥ निवृत्ति निजबोध आनंदादि कंद । शाखाद्रुम भेद हरि जाला ॥६॥

**१११. आत्मरूपीं रूप रंगलें सहज** । रिगो निजगुज सतेजिलें ॥१॥ तेज बीज बिवड पेरिलें निवाडे । उगवलें चोखडें ब्रह्मरूप ॥२॥ शांतीची गोफण उडविला प्रपंच । धारणा आहाच स्थिर केली ॥३॥ वेटाळिलें धान्य खळेदान दिठीं । दिधलें शेवटीं भोक्तियासी ॥४॥ देते घेते जीवे नुरेचि शेखीं । शिवमेव खोपी समरसीं ॥५॥ ज्ञानदेव ह्मणे निवृत्ति उदारा । ऐसा एकसरा तुष्टलासी ॥६॥

**११२. खळेदान देसी भोक्तया सांपडे** । ऐसें तुवां चौखडें रूप केलें ॥१॥ ज्ञान तेंचि धन ज्ञान तेंचि धान्य । जालेंरे कारण ज्ञानदेवीं ॥२॥ तळवटीं पाहे तंव रचिलें दान अपार । वेदवक्ते साचार बुझावले ॥३॥ साचार आठरे भासासी । उपरति भूसि निवडली ॥४॥ मोक्ष मुक्ति फुका लाविली तुवां दिठी । तुझा तूं शेवटीं निवडलासी ॥५॥ निवृत्ति प्रमाण केलें तुवां ज्ञाना । ब्रह्मींब्रह्म अगम्या रातलासी ॥६॥

**११३. रवितेजाकिरण फांकलि पा तेज** । उडेरे सहज तिमिर रया ॥१॥ तैसा तूं गभस्ति निवृत्ति उदारा । उगवोनि चराचरां तेज केलें ॥२॥ तेजीं तेज दिसे अव्यक्ताचा ठसा । उमजोनि प्रकाशा न मोडे तुझा ॥३॥ चंद्रोदयीं कमळें प्रकाशिलीं सितें । तैसें तुझें भरितें करीं आह्मां ॥४॥ वृत्तीची निवृत्ति देखिली म्यां तुझी । हरपली माझी चित्तवृत्ति ॥५॥ ज्ञान ऐसें नांव ज्ञानदेवा देसी । शेखीं तुवां रूपासी मेळविलें ॥६॥

**११४. आत्मतेजें तेज रवितेज बिंबें** । जीव शिवीं बिंबे ज्ञान तेजें ॥१॥ तैसें तुज ज्ञान जालेंरे हें काज ॥ केशवीं विराज चित्त जोडे ॥२॥ समाधीचें रूप रूपासि आलें काह्या । पसरुनी बाह्या देतीं क्षेम ॥३॥ प्रवृत्ति निवृत्ति दोहींची तटाक । उतरलासि एक सिंधोदकें ॥४॥ क्षीर नीर हरी जाला असे स्वादु । अवघाची गोविंदु नानादेहीं ॥५॥ निवृत्तिसंपत्ति आलिया पैं हातां । तत्वीं तत्व निमथा उलथा तूं ॥६॥

**११५. देहधर्मीं काज गुरुराज चित्तीं** । तरीच या संपत्ती फळद होती ॥१॥ तैसें तुझें ध्यान करितां उद्धट । सांपडली वाट वैकुंठीची ॥२॥ ज्ञेय ज्ञाता ज्ञान ध्येय ध्याता हरी । समरसें श्रीहरी तत्त्व जालें

॥३॥ पृथ्वी आप तेज गगनाकृति वायो । फिटला संदेहो ये जन्मींचा ॥४॥ उपदेश द्रष्टा जरि असे श्रेष्ठ । तरीच भाग्य विनट विष्णुरूपीं ॥५॥ ज्ञानदेवीं सिद्धी साउली श्रीहरी । गुरुकृपा करीं कुरवाळिलें ॥६॥

११६. **अनुपम्य तेजें धवळलें ब्रह्मांड** । विश्वरूपीं अखंड तदाकार ॥१॥ रसीं रस मुरे प्रेमाचें स्फुंदन । एकरूपीं घन हरी माझा ॥२॥ नाद आणि ज्योति परिपूर्ण आम्हां । परेसि माहात्मा उजेडला ॥३॥ जाला अरुणोदयो उजळलें सूर्यतेज । त्याहूनि सतेज तेज आलें ॥४॥ हारपल्या रश्मी देहभाव हरी । रिद्धि सिद्धि कामारी जाल्या कैशा ॥५॥ निवृत्ति उपदेश ज्ञानियां लाधला । तत्वीं तत्त्व बोधला ज्ञानदेव ॥६॥

११७. **त्रिपदा चतुष्पदा गायत्रीस्मरण** । त्याचें विस्मरण हरिप्रेमें ॥१॥ निवृत्ति सांगे हरीनामगंगे । जालासि सर्वांगें गंगोदक ॥२ पाणिपाद चित्तवृत्ति हे बुडाली । देहीं देहा गेली प्रीति सदा ॥३॥ चक्षुद्वय तेज हरिरूपीं बिंब । पृथ्वीतळ अंभ हरि दिसे ॥४॥ सुलज्ज निर्लज्ज मेघवर्ण शाम । सांवळा सप्रेम गुणग्राह्य ॥५॥ थोडेनि आतुडें सडेनि पदार्थें । येतु असे अर्थें हृदयामाजी ॥६॥ नाममंत्र रूप इतुकेन संकेत । देतुसे अर्थ दीनाचा दाता ॥७॥ बापरखुमादेविवरु विनत सोपारा । मरणाच्या येरझारा दूर केल्या ॥८॥

११८. **आधींच तूं ज्ञान वरी जालें उन्मन** । हरी हें जीवन हृदयीं आलें ॥१॥ स्थिरावलें ध्यान ज्ञानाचिये वृत्ति । विज्ञानसंपत्ति साधलिया ॥२॥ अंधकारपट नासला समतेज । रामरूपीं पैज दीपज्ञान ॥३॥ संतशांत शांति उलथीचा ठसा । कृष्णरूपीं दिशा तेजोतेज ॥४॥ अलक्ष लक्षिते अगोचर पर । तेथेंही गव्हर संचलें असे ॥५॥ ज्ञानदेव सुखी जालीसे विश्रांति । परमानंद चित्तीं निरंतर ॥६॥

११९. **अमर रस द्वंद्व विसरला भूक** । त्याहूनि एथें सुख अधिक दिसे ॥१॥ जंववरि भूली तंववरी बोली । समुद्रींचि खोली विरळा जाणे ॥२॥ आशापाश परि निवृत्ति तटाक । पडियेले ठक चिद्रुपरूपीं ॥३॥ प्रकाश हरीचा प्रकाशला देहीं । नेणतीच कांहीं मूढजन

॥४॥ ऐलतीरीं ठाके पैलतिरीं ठाके । तेथें कैसेनि सामर्थ्यें पाहों आतां ॥५॥ जाणिव शाहाणिव तूंचि निवृत्ति देवा । हरी उभय भावा ज्ञान देसी ॥६॥ ज्ञानदेवा शांति उन्मनि रहस्य । हरिरूप भाष्य करविलें ॥७॥ बापरखुमादेविवर विठ्ठल हृदयीं । आलिंगितां बाही भ्रमर जाला ॥८॥

१२०. **ऐकें तूं ज्ञान सुख विश्रांति रूपा** । हरिरूप दीपा पाहे ऐसा ॥१॥ चित्तवृत्तीचिया आदिमध्य अंतीं । रूपींरूप आनंदीं समरसें ॥२॥ निवृत्ति सांगे ज्ञाना योगाची धारणा । जीवशीव करणा चक्षु दृढ करी॥३॥

१२१. **साध्यसाधनकाज निवृत्तीचें गुज** । केशव सहज सर्वभूतीं ॥१॥ रामकृष्ण मंत्रें प्रोक्षियेलीं गात्रें । हरिरूप सर्वत्र क्षर दिसे ॥२॥ गुरुगम्य चित्त जालें माझें हित । दिननिशीं प्राप्त हरि आह्मां ॥३॥ पूर्णिमाप्रकाशचंद्र निराभास । हरी हा दिवस उगवला ॥४॥ चकोरें सेवीति आळीउळें पाहाती । घटघटा घेती अमृतपान ॥५॥ ऐसें हें पठण ज्ञानदेवा जालें । निवृत्तीनें केलें आपणा ऐसें ॥६॥

१२२. **पहाते पहाणें पहातां निरुतें** । पाहिलिया तेथें तेंचि होय ॥१॥ तोचि तो आपण श्रीमुखें जाण । आणिक साधन नलगे कांहीं ॥२॥ भानुबिंबेवीण निरसलें तम । ज्ञानदेवी वर्म सांगितलें ॥३॥

१२३. **सकळ तीर्थें निवृत्तीच्या पायीं** । तेथें बुडी देईं माझ्या मना ॥१॥ आतां मी न करीं भ्रांतीचें भ्रमण । वृत्तीसी मार्जन केलें असे ॥२॥एकार्णव जाला तरंगु बुडाला । तैसा देह जाला एकरूप ॥३॥ बापरखुमादेविवरें विठ्ठलें नवल केलें । तारूं हरविलें मृगजळीं ॥४॥

१२४. **देहभाव ठेवावे योगभाव सेवावे** । हें बोलणें जाणणें सोय नव्हेगे माये ॥१॥ जिजे मरिजे ऐसें नाहीं आमुते । सांगों कोणातें तुज वांचुनी ॥२॥ देंठीहुनि सुटलें जीवनासी आलें । बापरखुमादेविवरें ऐसें केलेंगे माये ॥३॥

१२५. **विश्रांतीचें स्थान कोण रूप आह्मां** । ऐसा हा महिमा सांगा स्वामी ॥१॥ चित्त नेईं चित्ता चेत नेईं तत्त्वा । कर्म परतत्वा हारवी रया ॥२॥ हें तत्त्व सांगे ज्ञानदेवा निवृत्ति । संसार पुढती नाहीं बापा ॥३॥

१२६. **निजाचें तेज कीं तेजाचें निज** । तेथील तें गुज सांग मज ॥१॥ ब्रह्म तें कायी ब्रह्म तें कायी । ब्रह्म तें कायी सांगा गोसावी ॥२॥ ब्रह्म सदोदित असे सर्वभूतीं । म्हणउनि सांगे जनांप्रती ॥३॥ ब्रह्म ऐसें नामयानें जाणिलें । हृदयीं धरिलें प्राणलिंग ॥४॥ बापरखुमादेविवरु हृदयीं प्रगटला । निवांत राहिला ज्ञानदेवो ॥५॥

१२७. **सोंग संपादणी एका रूपें करी** । आत्मा घरोघरीं वर्ततुसे ॥१॥ माय सांग आम्हां कोण सुख ब्रह्मा । तुम्हां आम्हां समा कोण्या रूपें ॥२॥ चेतनें चेतवी बुद्धितें पाचारी । कल्पना मापारी निवृत्ति ठायीं ॥३॥ज्ञानदेव दिवटा विठ्ठलीं रमला । संसार अबोला एकातत्त्वें॥४॥

१२८. **परब्रह्मीं वस्ति कोण्या रूपें करूं** । सकळ हें भरूं आत्मतत्त्वें ॥१॥ देहाचा दीप कीं समत्व पैं ज्योती । एकरूपें वाती सर्वांरूपीं ॥२॥ तें रूप सांगा निवृत्ति उदारा । संसार एकसरा तया माजि ॥३॥ समान निघोट क्षेमत्त्वें अवीट । श्रीगुरूनें वाट सांगितली ॥४॥ ज्ञानदेवी घर वस्तीसी बिढार । तळींवरी साचार एक तत्व ॥५॥

१२९. **आकारीं नाहीं तें निराकारीं पाहीं** । निराकारीं राही शून्याशून्य ॥१॥ जेथें शून्यचि मावळलें तेथें काय उरलें । हेंचि सांगे एकें बोलें मजपासीं ॥२॥ शून्य कासया पासाव जालें शून्य तें कवणें केलें । हें सांगिजोजी एक्या बोलें गुरुराया ॥३॥ आपण शून्याकार कीं आपण निराकार । आकार निराकार मूर्तिमंत दाऊ ॥ आकार निराकार ये दोन्ही नाहीं तेंचि तूं पाहीं आपणापें ॥४॥ जेथें अनुभवचि नाहीं तेंचि तूं पाहीं । स्वानुभवीं राहीं तुझा तूंचि ॥५॥ जेथें चंद्र सूर्य एक होती तेथें कैंचि दिनराती । ऐसें जे जाणती ते योगेश्वर ॥६॥ कर्माकर्म पारुषलें देवधर्म लोपले । गुरुशिष्य निमाले जाले क्षीरसिंधु ॥७॥ तेथें गोडीवीण चाखणें जिव्हेवीण बोलणें । नेत्रेंविण पाहणें तेंचि ब्रह्म ॥८॥ हातीं घेऊनियां दिवटी लागिजे अंधारापाठीं । अंधार न देखे दृष्टी उजियेड्ड तो ॥९॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु देखणा । दृश्यद्रष्टेपणा माल्हावले ॥१०॥

---

# सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथप्रसादानें प्राप्त झालेली स्थिति.

**१३०. कापुराचे काळिवर अनळाचा मरगळा** । भेदून द्वैताचा सोहळा कैंवि निवडों पाहे ॥१॥ बोलु अखरीच वळला भीतरी नाहीं आला । तो कैंवी विठ्ठला पावेजी तुह्मां ॥२॥ मन बुद्धीसी जें आय तयासी जें वेद्य । कळिकाळा कवळेना संधि जोडुनि जाये ॥३॥ वाचाळपणें परा येत्रो नल्हाये दातारा । अनुभवो भीतरा बाहेजु वेडावला ॥४॥ निरयदृष्टी ती खोली येऊनी राहे बुबळीं । लवण थाव घेऊनी जळीं केविं निवडो पाहे ॥५॥ निवृत्तिदासु तेथें निवृत्ति करुनी यातें । श्रीगुरुनिवृत्तिनाथें फुढें केलें ॥६॥

**१३१. व्यक्ताव्यक्त दिठी घालूनि कल्पांता** । कल्पना नुरेचि तेथें आतां ॥१॥ पाहाणियाचा प्रपंचु पाहता । निमाला कवणा बोलु ठेऊं आतां ॥२॥ दुजें म्हणों जाय तंव मी माजी हारपे । न वर्णवे तुझी सत्ता रया ॥ गोडियेचें गोडपण गोडी केविं मिरवी । तुजमाजी असतां ते वेगळीक रया ॥३॥ निशीं जागरणीं निमाला कीं तंतुचि तंतीं आटला । रसीं रसु दुणावला तुझ्या ठाईं ॥४॥ तेथें कल्पनेसी मूळ विरोनियां पाल्हाळ । तैसें उभय संदीं तूं विदेही रया ॥५॥ यालागीं बापरखुमादेविवरु विठ्ठलु उदारु दिठीचे दिठीं माजी अंजन । सुखीं सुख दुणावलें चौघां पाडिलें मौन्य । येणें निवृत्तिरायें खुणा दाऊनियां सकळ । डोळयांविण दिठी प्रबळ रया ॥६॥

**१३२. अनुभव खुण मी बोले साजणी** । निरंजनीं अंजन लेईलें अंजनीं ॥१॥ गुरुमुखें साधन जालें पैं निवृत्ति । तत्त्वसार आपणचि जाला निवृत्ति ॥२॥ बापरखुमादेविवरा विठ्ठल कृपा चित्तीं । पुंडलिका साधिलें प्रेम तत्त्वार्थीं ॥३॥

**१३३. पदोपदीं निजपदा गेलें वो** । कर्म संचित सकर्म जालें वो ॥१॥ तेथें आपुले नाठवे कांहीं वो । आपआपणा न पडे ठाईं वो॥२॥ श्रीगुरुप्रसादें ज्ञान बोधु झाला वो । नव्हे तें ठाउकें पडिलें माय वो॥३॥

**१३४. इवलेंसें रोप लाविलें द्वारीं** । त्याचा वेल गेला गगना-

वरी ॥१॥ मोगरा फुलला मोगरा फुलला । फुलें वेंचितां अतिभारु कळियांसि आला ॥२॥ मनाचिये गुंती गुंफियेला शेला । बापरखुमादेविवर विठ्ठलीं अर्पिला ॥३॥

१३५. **प्रकृतीचें पूजन प्राप्तीविण जाण** । प्राप्ति सिंचन दोन्हीं वांया गेलीं ॥१॥ पूजन कवणा करूं सिंचन कवणा करूं । नाहीं नव्हे तें धरूं गुरुमुखें ॥२॥ रखुमादेविवरु गुरुमुखा भ्याला । होता तो लपाला नाहीं ते ठाईं ॥३॥

१३६. **जन्मा आवर्ती येरझारी फिटली** । ब्रह्मसमदृष्टी जाली गुरुमुखें ॥१॥ भागल्याचा सिणु भागल्यानें नेला । भाग्योदय जाला भाग्येंविण ॥२॥ रखुमादेविवरु भाग्यें जोडला । जोडोनी मोडला कांहीं नव्हतेपणें ॥३॥

१३७. **दृश्यादृश्य नातळे स्थूळ प्रपंचभान** । तेथें मायेचें कारण हेत नाहीं ॥ ह्मणोनि ज्ञान विज्ञान कल्पना लक्षण । तेथें सुखासि सुख जाण भोगिताहे ॥१॥ नामावांचुनि संवादें निवृत्ति अभेद पदें । निज भजनीं स्वानंदें नवल पाहे ॥२॥ तेथें दिवस ना रात्रीं सर्वहेतुविवर्जितु । स्वयंभासक तूं नवल त्याचें ॥३॥ चिन्मय ना चिन्मात्र वेद्य सर्वगत । स्वसंवेद्य साक्षभूत । आपणवासी ॥४॥ स्वसंवेद्य सन्मुखता भेदु नाहीं आतां । भक्ति आणि परमार्थी हेंचि रूप ॥५॥ निवृत्ति प्रसादें संपर्केसी बोध । नीच नवा आनंद ज्ञानदेवा ॥६॥

१३८. **अंतरींच्या सुखा नाहीं पैं मर्यादा** । यापरि अगाधा होऊनि खोल ॥१॥ तेथें गोविंदु अवघाचि जाला । विश्व व्यापुनियां उरला असे ॥२॥ बाह्यअभ्यंतरीं नाहीं आपपर । सर्व निरंतर नारायण ॥३॥ मीपण माझें न देखे दुजें । ज्ञानदेवो ह्मणे ऐसें केलें निवृत्तिराजें ४

१३९. **लेउनि अंजन दाविलें निधान** । देखतांचि मन मावळलें ॥१॥ ऐसिया सुखाचे करूनियां आळें । बीज तें निर्मळ पेरु आतां ॥२॥ ज्ञानाचा हा वाफा भरूनियां कमळीं । सतरावी निराळी तिंबतसे ॥३॥ निवृत्तिप्रसादें पावलों या सुखा । उजळलिया रेखा ज्ञानाचिया ॥४॥

१४०. **मी माझें अद्वैत द्वैत होउनि ठेलें** । सद्गुरु एका बोलें ठेविलें

ठायीं ॥१॥ द्वैत गिळी अद्वैत मेळीं । चित्ताची काजळी तोडी वेगीं ॥२॥ ज्ञानदेव म्हणे निवृत्ति उदार । दीपीं दीप स्थिर केला सोयी ॥३॥

१४१. **अनंत अनंतापरी देखतां तो अंतरीं** । हृदयाभीतरीं मज निवावितो माये ॥१॥ चाळवी चक्रचाळ अलगट गोपाळ । यानें केला सुकाळ सहज सुखाचा वो माये ॥२॥ सांगवी ते सांगणी उमगूनि चक्रपाणी । त्या निर्गुणाचे रहणी मी रिघालें वो माये ॥३॥ भ्रांतिभूली फेडुनियां निवृत्ति । रखुमादेविवरुविठ्ठलीं गती जाली वो माये ॥४॥

१४२. **पंचविसा वेगळें महत्तत्त्व बोलिजे** । तें मज अंगविजे ऐसें निवृत्तीं केलें वो माये ॥१॥ सहज बोधें बोधलें न विचारी आपुलें। ह्मणोनियां मुकलें अवघ्यांसी वो माय ॥२॥ पांचाहूनि परती मी जाहालिये निवृत्ति । चिदानंदीं सरती स्वरूपीं वो माये ॥३॥ ऐसें जाहलें चांग अचिर देवांग । रखुमादेविवरें पांग फेडिला वो माये ॥४॥

१४३. **सत्व रज तम प्रकृति अपारा** । याही भिन्न प्रकारा हरी रया ॥१॥ दिसोनि न दिसे लोकीं व्यापारी । घटमठ चार्‍ही हरी व्याप्त ॥२॥ स्वानुभवें धरी अनुभवें वाट । तंव अवचित बोभाट पुढें मागें ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे न कळे याची लीला । ते निवृत्तीनें डोळां दाविली मज ॥४॥

१४४. **देखिले तुमचे चरण** निवांत राहिलें मन । कासया त्यजीन प्राण आपुलागे माये ॥१॥ असेन धणीवरी आपुले माहेरीं । मग तो श्रीहरी गीतीं गाईनगे माये ॥२॥ सकळही गोत माझें पंढरिसी जाण । बापरखुमादेविवरा विठ्ठलाची आण ॥३॥

१४५. **तृप्ति भुकेली काय करूं माये** । जीवनीं जीवन कैसें तान्हेजत आहे ॥१॥ मन धालें परि न धाये । पुढत पुढती राजा विठ्ठलु पाहे ॥२॥ निरंजनीं अंजन लेईजत आहे । आपुलें निधान कैसें आपणाचि पाहे ॥३॥ निव्रत्ति गार्हस्थ्य मांडलें आहे । निष्काम आपत्य प्रसवत जाये ॥४॥ त्रिभुवनीं आनंदु न माये गे माये । आपेआपु परमानंदु वोसंडतु आहे ॥५॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलुगे माये । देहभाव सांडुनि भोगिजत आहे ॥६॥

१४६. **सांवळा सकुमार लावण्य त्रिभुवनीं** । अवचिता आंगणीं

देखिला रया ॥१॥ आळवितां नयेची सचेतनीं अचेत । भावेंचि तृप्त माझा हरी ॥२॥ अज्ञानी न दिसे ज्ञानी येऊनि उभा । विज्ञानेसी शोभा दावी रया ॥३॥ ज्ञानदेवा सार सांवळिये मूर्ति । निवृत्तीनें गुंति उगविली ॥४॥

१४७. **श्रीगुरुसारिखा असतां पाठिराखा** । इतरांचा लेखा कोण करी ॥१॥ राजयाची कांता काय भीक मागे । मनाचिया जोगे सिद्धि पावे ॥२॥ कल्पतरुतळवटीं जो कोणी बैसला । काय वाणी त्याला सांगिजोजी ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे तरलों तरलों । आतां उद्धरलों गुरुकृपें ॥४॥

१४८. **ब्रह्मीं ब्रह्म होणें हें तो कठीण सांगतां** । आब्रह्मीता जयाचिया सत्ता विस्तारले ॥१॥ सांगतां नये सांगावें तें काय । तेथील हे सोय गुरुखुणा ॥२॥ मन हें अमोलिक जरी गुंपे अमूपा । तरिच हा सोपा मार्ग रया ॥३॥ बापरखुमादेविवरु ब्रह्मविद्येचा पुतळा । तेथील हे कळा निवृत्तिप्रसादें ॥४॥

१४९. **परे पडे मिठी तेथें बोलणेंचि तुठी** । आवडी गिळुनियां आतां जिवें नाहीं तुटी ॥१॥ सांगिजे बोलिजे तैसें नव्हेगे माये । सुमरीं मारिलें येणें श्रीगुरुरायें ॥२॥ निवृत्तिदासा सन्निधान दुरी । आवडी गिळुनि आतां जिवे नाहीं उरी ॥३॥

१५०. **समसुखें शेजे निजोनियां काज** । साधिलेंसे बीज निवृत्तिरायें ॥१॥ पृथ्वीतळ शय्या आकाश प्रावरण । भूतदया जीवन जीव भूत ॥२॥ निजीं निज आली हारपल्या कळा । ब्रह्मानंद सोहळा गुरुशिष्यीं ॥३॥ ज्ञानदेवी काज निरालंब रूप । तळिवरी दीप सतेजला ॥४॥

१५१. **साकारु निराकारु वस्तु सद्‌गुरु आमुचा**। तेणें या देहाचा केला उगऊ ॥१॥ उगविलें उगविलें मायेतें निरसिलें। एकत्व दाविलें त्रिभुवन रया ॥२॥ सत्रावी दोहोनी इंद्रिया सौरसु । गुरुमुखें उल्हासु भक्ति महिमें ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे मी नेणता प्रपंचीं । तोडली मोहाची पदवी आम्हीं ॥४॥

१५२. **अमित्य भुवनीं भरलें शेखीं जें उरलें** । तें रूप आपुलें

मज दावियलें वो माय ॥१॥ आतां मी नये आपुलिया आसे। तुटले सायास भ्रांतीचे वो माय ॥२॥ मंजुळ मंजुळ वायो गती झळकती। तापत्रयें निवृत्ति निर्वाळिलें वो माय ॥३॥ वेडावलें एकाएकीं निजधाम रूपीं। रखुमादेविवरु दीपीं दिव्य तेज वो माय ॥४॥

१५३. **शुद्धमतीगती मज बोळला निवृत्ती**। त्यानें पदीं पदीं प्रीति स्वरूपीं वो माय ॥१॥ आतां मी जाईन आपुलिया गांवा। होईल विसावा सुखसागरीं वो माय ॥२॥ पाहतां न देखे आपुलें कोणी नाहीं। निजरूप पाही अनंता नयनीं वो माय ॥३॥ हा रखुमादेविवरु गुरुगम्य सागरु। न करीच अव्हेरु माझा वो माय ॥४॥

१५४. **आपुलें कांहीं न विचारितां धन**। निर्गुणासी ऋण देऊं गेलें ॥१॥ थिथें होतें तें निध सांठविलें। विश्वासें घेतलें लक्षवित ॥२॥ ऐसा हा निवृत्तिप्रसादु फळासि आला। निर्फळ केला मज निर्गुणाकारें ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु साच ह्मणोनि रिघालों। तेणें नेऊनि घातलों निरंजनीं ॥४॥

१५५. **चौदा भुवनीं चौघां भुलविलें**। वेव्हार नासिले स्मृति व्यालोंगे माये ॥१॥ अवघे धन देऊनि मज निधन केलें। ऋण मागावया धाडिलें नये ते ठायीं ॥२॥ ऐसें श्रीनिवृत्ति शब्दें अगाध जालें। माझें मीपण गेलें धन देखा ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु साक्षी। तो मज पारखी घेऊनि गेला ॥४॥

१५६. **अवघड तें एक घडलें माझ्या अंगीं**। तींहीं ऋण चौघीं मज देवविलें॥१॥ ज्यासि दिधलें त्यासी नांव पैं नाहीं। जया रूप नाहीं त्यासी ऋण देवविलें ॥२॥ निवृत्ति गुरूनें अधिक केलें। निमिष्यमात्रीं दाविलें धन माझें ॥३॥ येणें रखुमादेविवरु विठ्ठलें होतें तें आटिलें। सेखी निहाटिलें निळारंभीं ॥४॥

१५७. **मायाविवर्जित जालें वो**। माझें गोत तें पंढरिये राहिलें वो ॥१॥ पतिव्रता मी परद्वारिणी। परपुरषेंसी व्यभिचारिणी ॥२॥ सा चारी चौदा जाली वो। सेखीं अठरा घोकुनी राहिलें वो ॥३॥ निवृत्ति प्रसादें मी गोवळी वो। माझा भावो तो विठ्ठलु न्याहाळीवो ॥४॥

१५८. **प्राण जाये प्रेतें न बोले चित्रींचे लेप न हाले**। तैसें दृश्य

द्रष्टा दर्शन त्रिपुटी वो करी हे शब्दची वाउगे ठेले रया ॥१॥ आतां आपणिया आपण विचारी । शेखीं प्रकृति ना पुरुष निर्धारी ॥२॥ आतां प्रेताचे अळंकार सोहळे । कां शब्दज्ञानें जे डौरले । दीपने देखती कांहीं केलें । ऐसें जाणोनियां सिण न मनीं ती प्रतिष्ठा भोगिती भले रया ॥३॥ बापरखुमादेविवरुविठ्ठल देखतांचि जे बोधले ते तेणें सुखें होऊनि सर्वात्मक जे असतांचि देहीं विस्तारलें । येणें निवृत्तिरायें खुणा दाऊनी सकळ। बोलतां सिणु झणे होईल रया ॥४॥

**१५९. पृथ्वी आडणी आकाश हें ताट** । अमृत घनवट आप तेज ॥ नित्य हें जेवितां तेज प्रकाशत । सर्वांलि गोमटी ब्रह्मद्वारें ॥१॥ जेवणार भला जेउनियां धाला । योगि जो निवाला परमहंस ॥२॥ चांदणा वोगरु दिसे परिकरु। नवानित घातलें व्योमीं बरवें ॥ निळिये परवडि शाक जालें निकें । अंबट घाला तिखें प्रेम तेथें ॥३॥ गंगा यमुना तिसरीये सागरीं । ह्मणौनि प्रकारी क्षीर जाली ॥ सोज्वळ ब्रह्मतेजें साखर सांजोरी । जेवितो हे गोडी तोचि जाणे ॥४॥ इडा क्षीर घारी पिंगळा मूळ वरी । त्यामाजि तिसरी तेल वरी ॥ सुषुम्नेचे रुची तूर्या आतुडली । अहिर्निशि जाली जेवावया ॥५॥ सितळ भिनला चंद्र अंबवडा । सूर्य जो कुरवडा खुसखुसित ॥ तया दोहीं संगें भाव हेचि मांडे । मग जेवा उदंडें एक चित्तें ॥६॥ पवित्र पापडु मस्तकीं गुरुहस्त । ह्मणउनि अंकित तयातळीं ॥ सौरसाची गोडी जयासी लाधलीसे । उपदेशितां जालीं अमृतफळें ॥७॥ कपट वासनेची करुनियां सांडई । शेवा कुरवडई गोमटी किजे । गुरुचरणीं लाडु करुनियां गोडु । मग जेवी परवडी योगिराजु ॥८॥ गुरुपरमार्थें ग्रासुनियां भूतें । क्षेम अवकाशातें आच्छादुनि ॥ जेवणें जेवितां ध्वनि उठे अंबरीं । तें सुख अंतरीं प्रेम वाढे ॥९॥ षड्साची उपमा देऊं ह्मणों जरी । ब्रह्मरसापरतें गोड नाहीं ॥ येणें दाहिभातें जेवणें हें जालें । तिखटही आलें प्रेम तेथें ॥१०॥ अमृत जेविला अमृतें आंचवला। सेजे विसावला निरालंबीं । मन हें तांबूल रंगलें सुरंग । नव जाये अभंग कव्हणीकडे ॥११॥ कापुर कस्तुरी शुद्ध परिमळु । गोडियेसि गुळु मिळोनि

गेला ॥ सुमनाचि मूर्ति सुमनीं पूजिली । सुमनीं अर्चिलि कनकपुष्पीं ॥१२॥ ऐसें नानापरीचें जेवण जालें । बापनिवृत्तियोगियानें वाढिलें ॥ ज्ञानदेव ह्मणे धणिवरी जेविलों। बापरखुमादेविवरें विठ्ठलें सुखिया केलों१३

**१६०. अनुभवें अनुभवु बोधा बोध आथिला** । निःशब्दीं निःशब्द नादावला ॥१॥ माझा श्रीगुरु ब्रह्म बोलणीं बोलवीतु । तेथील संकेतु कोण्ही नेणें ॥२॥ निवृत्तिप्रसादें म्यां ब्रह्माचि जेविलें । ब्रह्म ढेंकरी पाल्हाईलें नेणोनियां ॥३॥

**१६१. रूप सामावलें दर्शन ठाकलें** । अंग हारपलें तेचि भावीं ॥१॥ पाहों जाय तंव पाहाणया वेगळें । ते सुखसोहळे कोण बोले ॥२॥ जेथें जाय तेथें मौन्यचि पडिलें । बोलवेना पुढें काय करूं ॥३॥ सारिता ना संगम ओघ ना भ्रम । नाहीं क्रिया कर्म तैसें झालें ॥४॥ जाणों जाय तंव जाणणिया सारिखें। नवल विस्मयें कवणा सांगों ॥५॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलाचि अंगीं । निवृत्तिरायें वेगीं दाखविला ॥६॥ तोचि सबरा भरितु रूपनामरहितु । अपरंपार मी तूं निच नवा ॥७॥

**१६२. मीतूंपण विकल्प मावळला मूळीं** । दोही माजी बळी कवण पाहो । पाहातां पाहणें द्रष्टत्व ग्रासिलें । स्वरूपचि उरलें कवणा पाहों ॥१॥ बोलों नये ऐसें केलें वो माय येणें । बोलतांचि गुणें आठऊ नाहीं ॥२॥ आठवितां विसरु संसार नाठवे । हे खुण स्वभावें बोलत्याचा । बोलतां बोलणें ठकाचि पडलें मुळीं । स्थूळींचा स्थूळीं प्रकाश झालागे माये ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु उघडा । निजबोधीं निवाडा ऐसा झाला । निवृत्तिरायें खुण लेऊनि अंजन । दाऊनि निधान प्रकट केलें ॥४॥

**१६३. मजमाजी पाहतां मीपण हारपलें** । ठकलेंचि ठेलें सये मन माझें ॥१॥ आंत विठ्ठलु बाहेर विठ्ठलु । मीचि विठ्ठलु मज भासतसे ॥२॥ मीपण माझें नुरेचि कांहीं दुजें । ऐसें नाहीं केलें निवृत्तिराजें ह्मणे ज्ञानदेवो ॥३॥

**१६४. देखोनी पूजावया गेलें द्वैतभावो** । तेथें एक उपदेशी श्रीगुरुरावो ॥१॥ द्वैतभावो नाशिला माझा द्वैतभावो नाशिला ।

पूजा उद्वंस केला तें ब्रह्ममय ।।२।। रखुमादेविवरु देखण्या वेगळा देखिला ।। सगुण निर्गुण जाला बाईये वो ।।३।।

१६५. **दीपप्रकाश दीपीं सामावला कळिके सामावली ज्योती ।** ज्योति सामावोनि बिंब हारपलें तैसी जाली स्वयें स्थिती । संचित प्रारब्ध दग्ध पटन्यायें हे दृश्यभ्रांति । देहो जावो अथवा राहो फिटला संदेहो मृत्तिकेचि कायसि खंती रया ।।१।। रूप पाहोनियां दर्पण ठेलें शेखीं अभास दृष्टि राहिला । न पाहतां मुख जाणें तो आपण तैसा अनुभव जाला रया।।२।।या प्रपंचाचें कवच सांडुनि बाहेरी अविद्या दृश्य संहारी । पदीं पद ग्रासुनि ठेलें जें बुडोनि राहिलें अंतरीं । चैतन्याचें मुसें हेलावत दिसे जेंवि तरंगु सागरीं । कूर्माचिये परि आंगाचि आवरी तो स्थिर जाला चंद्र करी रया ।।३।। तेथें जाणणें निमालें बोलणें खुंटलें जेवि जीवनीं जीवन मिळालें । दश दिशा भरुनि दाटलें किं सुख सुखासि भेटो आलें । ज्ञानदेव म्हणे आह्मां जितांचि मरणें । कीं कोटी कोटी जिणें ऐसें निवृत्तीनें केलें रया।।४।।

१६६. **चातकाची तृषा मेघें पुरविली ।** ब्रह्मस्तनीं पान्हाईली बाईये वो ।।१।। निवृत्तिप्रसाद माझ्या मुखीं सूदला । प्रेमरसें धारा फुटल्या दोहीं पक्षीं ।।२।। बाप श्रीगुरु तेणें मज अफाविलें । अवघें ब्रह्म दाविलें ज्ञानदेवा ।।३।।

१६७. **ऋणाचेनि मिसें निर्गुण आलें आपैसें ।** तेणें मज सर्वस्वें ठकियेलें ।।१।। घेऊनि गेला माझें धन । केलें पैं निर्वाण मना देखा ।।२।। त्यासि वोळखिना अनोळखी । दृश्य ना अदृश्य ऋण म्यां सादृश्य दिधलें देखा ।।३।। निवृत्तिप्रसादें इतुकें पै जालें । रखुमादेविवरु विठ्ठलें मज गोवियेलेंगे माये ।।४।।

---

## श्रीविठ्ठलप्रसादानें प्राप्त झालेली स्थिति.

१६८. **बावनाचे संगती द्रुम भावें रातले ।** सेखीं आपुलिया मुकलें जातीकुळा ।।१।। लोहाचे सायास परिसेंसि फिटले । तैसें मज केलें गोवळ्यानें ।।२।। मेघजळ वोळे मिळे सिंधुचिया जळा । तैसा

नव्हे तो वेगळा एक होऊनि ठेला ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलीं नुरेचि कांहीं । उत्तम मध्यम ठाईं व्यापूनि असे ॥४॥

१६९. **जें ब्रह्मीं पाहतां मन न सिरे कोठें** । ऐसियाचे पेठे मज उभें केलें ॥१॥ नावाडा श्रीरंगु जाहला हाळुवारु । तेणें पावविला पारु ब्रह्मविद्येचा ॥२॥ श्रीगुरुविण सर्व शून्य हेंचि मी जाणें । तेथिचिये खुणें निवृत्तिराजु ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलीं अनुसंधान । रात्रिदिन लीन ब्रह्मस्थिति ॥४॥

१७०. **नवांची खाणी दहाव्यानें शोकिली** । अकराव्यानें जाली देशधडी ॥१॥ तें ब्रह्मपंथीं माखलें ब्रह्मपंथीं माखलें । मरोनि जागृत जालें मन गे माये ॥२॥ अवघें अंबर माझें तिंबलें । ब्रह्मरसें पिळिलें वो रंग नव्हे ॥३॥ सारवियोगें माझें कर्म बुडालें । निष्कर्म जालें म्हणोनि नातळे ॥४॥ जागृति स्वप्न सुषुप्ति बुडाली । रखुमादेविवरें सहित गिळिली ॥५॥

१७१. **ब्रह्माची पुतळी मीचि पैं जालों** । ब्रह्मचि लेईलों अंजनगे माय ॥१॥ ब्रह्माचि सुख ब्रह्मपदीं पावलों । ब्रह्मसुखीं निवालों निजीं निज देखा ॥२॥ बापरखुमादेविवरु ब्रह्मपदीं सामावला । मजसहित घेउनि गेला निजपुटीं ॥३॥

१७२. **सिद्ध सांडूनि निजबोधा गेलें** । निजबोधु मुकलें ब्रह्मभुली ॥१॥ आठवेना माझें पूर्वजन्मग्राम । अवघाचि श्रम माझा हिरोनियां नेला ॥२॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलें वेडावलें । आपणासहित मज ब्रह्मीं बुडाविलें ॥३॥

१७३. **मन हें राम जालें मन हें राम जालें** । प्रवृत्ति ग्रासुनि कैसें निवृत्तीसी आलें ॥१॥ श्रवण कीर्तन पादसेवन कैसें विष्णुस्मरण केलें । अर्चन वंदन दास्य सख्य आत्मनिवेदन केलें ॥२॥ यम नियम प्राणायाम प्रत्याहार संपादिलें । ध्यान धारणा आसन मुद्रा कैसें समाधीसी आलें ॥३॥ बोधीं बोधलें बोधितां नये ऐसें जालें । बापरखुमादेविवरु विठ्ठलें माझें मीपण हारपलें ॥४॥

१७४. **देखावया लागी जव अनौतें पाहिलें** । तव तनु मनु त्रिभुवनी व्यापिलें गे माये ॥१॥ नवलावो जालें जग हरिच होऊनि

ठेलें । आठऊं विसरलें काय करूं ॥२॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलें साच केलें । लोह परिसेंसि झगटलें तैसें जालेंगे माये ॥३॥

१७५. **नेणते ठायीं मन पाहों गेलें**। तंव मनाचि पावलें जागृतीये माये ॥१॥ जागृती अंतीं स्वप्न देखिलें । जागृती स्वप्न दोन्ही हरपलें ॥२॥ रखुमादेविवरु मरणधरणा भ्याला । तेणें मज दाविला तेजोमय ॥३॥

१७६. **मन मारुनियां मुक्त पैं केलें**। मीपण माझें नेलें हिरोनियां ॥१॥ मज लाविला चाळा लाविला चाळा । विठ्ठलुचि डोळां बैसलासे ॥२॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु लाघवी भला । आपरूपीं मज केला सौरसु ॥३॥

१७७. **अगाधपण माझे अंगीं बाणलें**। वरपडें देखिलें मृत्तिका लिंग ॥१॥ त्यासि चैतन्य नाहीं गुण नाहीं । चळण नाहीं गुण रूप नाहीं ॥२॥ माझ्या शरीरीं ज्योतिलिंग उगवलें । अगाध कवळिलें हस्तेंविण ॥३॥ बापरखुमादेविवरु ज्योतिलिंग विश्वनाथ । तेणें माझा मनोरथ पुरविलागे माये ॥४॥

१७८. **अकरावरी सातवें होतें**। सातवें कोठें मावळलेंगे माये ॥१॥ सहस्राची भरोवरी जालीगे माये । लय लक्षीं पाहे तंव चोजवेना २रखुमादेविवरु दोन्ही घेतलीं । विरूनि टाकिलीं ब्रह्मडोहीं ॥३॥

१७९. **नेत्र लाउनि मनासी जंव पुसों जाय**। तंव देवें नवल केलेंगे बाईये ॥१॥ देवें नवल केलें देवें नवल केलें । शेखी सांगतां लाजिरवाणें ॥२॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलें । माझें बाह्यअभ्यंतर व्यापिलें ॥३॥

१८०. **चैतन्य चोरूनि नेलें चित्त माझें सवें गेलें**। पाहे तंव तन्मय जालें गे माये ॥१॥ देवें नवल केलें मन माझें मोहिलें । विसरु तो आठऊ जालागे माये ॥२॥ यासी जाणावयालागीं अनुउते पाहे । तंव त्रिभुवन तन्मय जालेंगे माये ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलरायें । माझें सबाह्याभ्यंतर व्यापिलेंगे माये ॥४॥

१८१. **हस्ती घोडे हरण सिंहाडे** । तैसें हें गुजराती लुगडें गे माये ॥१॥ पालव मिरवित जाईन । शेला पदरीं धरूनि राहीन ॥२॥

बापरखुमादेविवरु विठ्ठलु सांवळा। तेणें मज माजिठा दिल्हा साउला ३॥

१८२. **एकतत्व साधि तंव हारपलों तेथ** । मज पाहतां येथ मी नाहीं ॥१॥ काय करूं सांगा कैसा हा आकळे। एकतत्वीं मिळे हृदयींगे बाईये ॥२॥ संपादनीं नट नटोनियां हरि। एकरूपें करी आपण्या ऐसें ॥३॥ ज्ञानदेवीं चित्त तत्वसार हारी। चित्तानु लहरी झेपावली ॥४॥

१८३. **आपुलेनि भारें श्रीरंग डोलत गेलें**। तंव अवचितें पाचारिलें पाठिमोरें ॥१॥ माझें चैतन्य चौरिलें चैतन्य चौरिलें। अवघें पारुषलें दीन देहें ॥२॥ बापरखुमादेविवरु दिनानाथ भेटला। विठ्ठल विठ्ठल झाला देह माझा ॥३॥

१८४. **उन्मनि अवस्था लागली निशाणी** । तन्मयता ध्यानीं मुनीजनां ॥१॥ मन तेथें नाहीं पहासीरे तें काई। सर्व हरीडोहीं बुडी दे कां ॥२॥ मनाची कल्पना देहाची भावना। शून्य ते वासना हरिमाजी ॥३॥ निवृत्ति म्हणे सर्व हरिपीक फळलें। ज्ञानासी लाधलें हरिकृपा ॥४॥

१८५. **तुजमाजी विरावें तुज गिळूनि राहावें** । तुझें रूप पाहावें रूपेंविण ॥१॥ तूतें अवघें गुज म्यां सांगावें। वाचेविण बोलावें निःशब्दाकारें ॥२॥ रखुमादेविवरु वाचे विनविला। प्रसन्न जाला ब्रह्म दाऊनी ॥३॥

१८६. **कमळावरी कमळ ठेवुनी उल्हाटे**। कमळीं कमळ उफराटेंगे माय ॥१॥ वासना निरसलिये वासना निरसलिये। ब्रह्मकमळीं उगवलीयेगे बाईये ॥२॥ कारण कामातें करुनि आवैतें। महाकारण तें गगना परौतें गे बाईये ॥३॥ बापरखुमादेविवर विठ्ठल तेजसु। ब्रह्मकमळीं दाविता प्रकाशुगे बाईये ॥४॥

१८७. **निरखित निरखित गेलिये**। पाहें तंव तन्मय जालिये ॥१॥ उन्मनीं मन निवालें। सांवळें परब्रह्म भासलें ॥२॥ रूप येवोनियां डोळां बैसलें। पाहें तंव परब्रह्म अवतरलें ॥३॥ बापरखुमादेविवरें विठ्ठलें। मुस ओतुनियां मेण सांडिलें ॥४॥

१८८. **सदैवपण आलें गोपाळातें देखिलें**। लक्षा एका जोडलें

अमित्य गुणीं वो माय ॥१॥ दैन्याचे सांकडीपासूनि वेगळावलें । पैं जवळी बैसाविलें आनंदपदीं वो माय ॥२॥ जागृतिशेवटीं निद्राभुली जुठी । मायेसी म्यां मिठी दिधली वो माय ॥३॥ मागुती नको परतणी या शरीरीं उरवणी । प्रपंचाची काहाणी निमाली वो माय॥४॥ सदोदित भरलें त्या तिहीं गुणां वेगळें । तें अगणित वर्षलें प्रेमघरीं वो माय ॥५॥ सबराभरित भरला या देहाभावा वेगळा । रखुमादेविवरु जवळी जोडला वो माय ॥६॥

१८९. **निरालंब स्तंभ घातला निजयोगु** । साही वेगळेसि वो माय ॥१॥ आणिकां न कळे तें त्रिगुणां वेगळें । तें मज गोवळें दाविलें वो माय ॥२॥ दुर्घट घडतां न वर्णवे योग्यता । मज पुढारी वो माय ॥३॥ खुणा जरी बोलों तरी मौन्य पडलें । तें परब्रम्हीं उघडलें दिव्यचक्षु वो माय ॥४॥ तो चिदानंदु पुतळा रखुमाई जवळा । सोईरा सकळांसहित वो माय ॥५॥

१९०. **दिप दिगांतरीं दिपीं पाहतां** । परेहूनि परंता तो देखिला वो माय ॥१॥ पाहीन मी आतां निरंजन स्वरूपता । त्यानें मज तत्वतां वोजाविलें वो माय ॥२॥ देहाचा दिवा उजळूनि ज्ञानज्योती। परपुरुषीं निवृत्ती झाली वो माय ॥३॥ कवळुनि भेटी प्राणेंसि देईन मिठी । मी निःशब्देंसी गोष्टी सांगेन वो माय ॥४॥ निजभावें निरोपिला सच्चिदानंदपदीं । मग मज परमानंदीं गोष्टी जोडली वो माय ॥५॥ ऐसें मीं अनुसरलें यानें आपंगिलें । रखुमादेविवरु विठ्ठलें वो माय ॥६॥

१९१. **दीनपण दवडूनि दिनानाथें मेळविलें** । तें येणें गोवाळें केलें रूप नवल वो माये ॥१॥ पाहतां पारणीं फिटली चक्षूंचीं । सर्व आवडीची कोथळी लाधली वो माये ॥२॥ आतां असो हें भरोवरी सांगणें या शरीरीं । उगवले अंतरीं दृष्टीचिया वो माय ॥३॥ सहज अंगवणें निजगूज पाहाणें । ते आनंदें निर्गुणें नयनीं प्रकाशलें वो माय ॥४॥ डोळाची वाढिले परब्रह्म फळलें । त्या सुखाचे निमाले सांगणें वो माये ॥५॥ गुण गिऱ्हाईक जोडला अमोल मोलें घेतला । रखुमादेविवर विठ्ठला वो माय ॥६॥

**१९२. जन्माचें व्याज आपणचि गिळिलें ।** मुद्दलाचा ठावो नाहीं ऐसें केलें ॥१॥ ऋणाईत नव्हे हा निर्गुणासि समंधु । येणें परमबोधु बोधविला ॥२॥ ऐसी आपुली साक्षी कवणें पैं द्यावी । निवृत्ति म्हणे कांहीं ठायीं न ठेवीची ॥३॥ बापरखुमादेविवरें केला घातासि घातु । आपुला लक्षाचा लाभु वरी दिधला ॥४॥

**१९३. दुरुनि येक ऋण मागावया आलें ।** माझें मीं पाहिलें तंव कांहीं नाहीं ॥१॥ भीतरील माझीं पंचरत्नें नेलीं । स्वस्वरूप वाहवलीं मध्य गिळियेलें ॥२॥ निवृत्ति बोधें मीं बोधलें । सांगतें वाहवलें सर्वस्वेंसी ॥३॥ ऐसा रखुमादेविवरुविठ्ठलु आपण पुढारला । माझा निर्वाळा केला संसारींचा ॥४॥

**१९४. सत्राविये कोठडिये माजी निक्षेपिलें ।** एकी केलें धन तें बाविसे नेलें पातेजोनि ॥१॥ आपण नेणतां ऋण घ्यावयासी गेलों । तंव तंव सर्वस्वेंसी बुडालों परोपरी देखा ॥२॥ मंत्र सांगितला माझ्या कानीं । जाणोनि ज्ञानविज्ञानीं वेडावलों ॥३॥ ऐसें रखुमादेविवरा विठ्ठलाच्या बोला । पातेजलों सर्वस्वासी ठेलों प्राङ्मुख ॥४॥

**१९५. चौ तेरा आह्मी चौसष्टीचे भागे सांचिलें ।** तें एका ऋणाईतें घेतलें वोळखीविण ॥१॥ आपुलें अकरावें एक सोईरें जाणा । तेंही पैं तयासि मिळोनि ठेलें ॥२॥ आतां मी चौघांपाशीं जाईन तिहींचि नागविलें पाहीं । तेथें कांहीं नाहीं ऐसें ह्मणितलें ॥३॥ ऐसा देहाचा दिवाळखोर दुसऱ्यासी घेऊनि गेला । तेणें मज दाखविला अद्वैत पारु ॥४॥ सहस्रापरि कांहीं धरियेली जरी । ज्ञानमूढें तरी कायि जाणती ॥५॥ ऐसा बापरखुमादेविवरु विठ्ठलु मध्यावर्ती भला । तेणें उगाणा केला परावृत्त होऊनियां ॥६॥

**१९६. पांचासहित लयातीत जालिये वो ।** प्रेम भक्ति अनुसरलें काळ्या रुपासी ॥१॥ ठायींचाची काळा अनादि बहु काळा । म्हणोनि वेदा चाळा लाविलागे माये ॥२॥ बापरखुमादेविवरें जन्मावेगळें केलें । म्हणोनि भाज जालें बाईयेवो ॥३॥

**१९७. अकल्पित द्रुम आजि संयोगें घडलें ।** अपार आपणातें विसरलेंगे माय ॥१॥ महुरलें महुरलें मन माझें मोहरलें । भक्ति-

फळासि कैसें आलेंगे माय ॥२॥ देंठींहुनि सुटलें पुढति कैसें जीवनासि आलें । बापरखुमादेविवर विठ्ठलें ऐसें केलेंगे माये ॥३॥

१९८. **चतुर्देहाची भरणी पुरली** । एकाएकीं देखिली निजतनु ॥१॥ त्याचें नांव गोवळु फिटला काळ वेळु । जाला सकळु सकळांसहित ॥२॥ ऐसा बापरखुमादेविवरु सुंदरु । तेणें माझा वेव्हारु खंडियेला ॥३॥

१९९. **संसार तुकलिये वेव्हार मुकलिये** । घराचारा पारुषलिये काय सांगों ॥१॥ माझें जिणेंचि बुडालें माझें जिणेंचि बुडालें । विठ्ठलें कुडें केलें काय सांगों ॥२॥ बापरखुमादेविवर विठ्ठलें । सहज मोलेंविणें विकत घेतलें ॥३॥

२००. **जीवन कैसें तान्हेजत आहे** । मन धालें परि न धाये ॥१॥ पुढती पुढती राजा विठ्ठल पाहे । निरंजनी अंजन लेईजत आहे ॥२॥ आपुलें निधान आपण पाहे । निवृत्ति गाऱ्हाणें मांडलें आहे ॥३॥ बापरखुमादेविवर विठ्ठलाचे पाये । विसंबतां क्षण माझा जीव जाऊं पाहे ॥४॥

---

## एकविध.

२०१. **काय करिसी सकळ देवांचें वैभव विलास** । माझिया स्वामीविण ते अवघे उद्वस रया ॥१॥ तपन त्या कमळा कमळीं विकासु । सुकवि मयंकु काय करिसी अरे बा सुधांशु ॥२॥ साताही वारांचे दिवसु एकियाचि सुरिजे । तैसें सर्वां सर्वपण माजीये न श्रीराजे ॥३॥ सर्वज्ञ सुंदर देव होतुकां भलतैसे । परि जडातें चेष्टविते आणिकां पैं नसे ॥४॥ जया नांव नाहीं रूप चिन्ह कांहीं । नामरूप चिन्ह स्वयेंचि पाही ॥५॥ बापरखुमादेविवरु आहे तैसाचि पुरे । काय करिसी आणिकां देवांचीं गोवारें रया ॥६॥

२०२. **पूर्वदिशे भानु उगवला नळनी** । कमळणी कमळीं विकासु केला । उष्णकरु अस्तु जाला सीतकरु प्रवर्तला कमळणी संकोचु केलागे बाईये ॥१॥ पढियंते मानसीं बहुवसे । असे दुरी तें जवळीच वसे रया ॥२॥ दोलक्षीं सोम अंबरीं । त्याचे गुण उमटती सागरीं । आंबसे कळाहीनु येरु दिसे अंधारीं । तैसा समंधु ये शरीरीं

रया ॥३॥ गगनीं वोळलीं घनुचरें तेणें क्षितीवरी नाचती मयूरें । सोम शीतपणें कळा मिरवी अमृत घेवों जाणती चकोर रया ॥४॥ वोळलीं स्वातीचीं अंबुटें तें तत्त्व झेलिती शुक्तिका संपुष्टें । येरें नक्षत्रें वरुषती निकटें काय जळ तयाचें वोखटें रया ॥५॥ चातकु चंद्रातें चिंतितु । तो तयाचे मनोरथ पुरवितु । बापरखुमादेविवरुविठ्ठलु तो मी सदा असे हृदयीं ध्यातु रया ॥६॥

२०३. **पतीचा जिव्हाळा ह्मणोनि सासुऱ्याचे साहिजे ।** येऱ्हवीं हें वाविजे चामाची मोट ॥१॥ न पाहे वास न धरी मनीं आस । वांया निकण भुस काय उपणिसी ॥२॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलुचि पुरे । चाड नाहीं आह्मां दुजेविण ॥३॥

---

## उपासना.

२०४. **देहाचेनि दीपकें पाहे जों सभोंवतें ।** तंव अवचितें तेंचि ध्यान केलें ॥१॥ निराकारींची वस्तु आकारा आणिली । कृष्णीं कृष्ण केली सकळ सृष्टी ॥२॥ लय गेलें ध्यानीं ध्यान गेलें उन्मनीं । नित्य हरिपर्वणी सर्वारूपें ॥३॥ आनंद सोहळा हरी रूपीं आवडी । कृष्ण अर्धघडी न सोडी आह्मां ॥४॥ बापरखुमादेविवरु विठ्ठल अभये । भयांचें पैं भय हरपे कृष्णीं ॥५॥

२०५. **स्वप्नींचें सुख मी पहावया गेलें ।** तंव स्वप्नीं स्वप्न ठेलें येरा विस्मोगे माये ॥१॥ काय सांगो निदसुरी कवळलें संसारीं । करितां येरझारी येणेंचि छंदें ॥२॥ सुषुप्तीचें सुख जागृती जाणती । तरी परतोनि मागुती कासयातें ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु राणे रावो । ऐसा जाणोनि तयाचा भावो ठाकियला ॥४॥

२०६. **वोल्हावलें मन परतोनि पाही** तंव प्रपंच दिसे अया गेले। पिटुनि बाह्य वैराग्याची गुढी उभऊनि ह्मणे म्यां जिंकिलें ॥ आपपर न दिसे शेखीं चरणीं स्थिरावलें । जळतरंग लहरी सरिता संगम जीवनीं जीवन ऐक्य ठेलें रया ॥१॥ तेंचि ब्रह्मज्ञान बोधितां पाहतां । सगुण निर्गुण आतां भेदु नाहीं । वाउगाचि शिणसी विचारी मानसीं । वायां कल्पना करूनि दाहीदिशीं रया ॥२॥ ह्मणोनि पटीं

तंतु ओतप्रोत होतु । तैसे विश्वजात ब्रह्मीं असे ॥ सतीं कल्पिसि भेद सगुण निर्गुण द्वंद्व । तेणें कल्पने न प्रत्यया नये । सर्वस्वें उदासीन होईं तूं निश्चय जाण एक सगुणींचि काय न लभे रया ॥३॥ आह्मां सगुण निर्गुण समान । नेणो जन्म जातक भान । दृश्य द्रष्टा दर्शन त्रिपुटीं नलगे । महावाक्यादि शब्द तत्वमस्यादि बोध हेही आह्मां सकळ वाउगें रया । बापरखुमादेविवरु विठ्ठलु चिंतितां । सुख सगुणींच जोडे येणें अंगें रया ॥४॥

२०७. **आजि संसार सुफळ जाला गे माये** । देखियले पाय विठोबाचे ॥१॥ तो मज व्हावा तो मज व्हावा । वेळोंवेळां व्हावा पांडुरंग ॥२॥ बापरखुमादेविवरु न विसंबे सर्वथा । निवृत्तीनें तत्वतां सांगितलें ॥३॥

२०८. **अवघाची संसार सुखाचा करीन** । आनंदें भरीन तिन्ही लोक ॥१॥ जाईनगे माये तया पंढरपुरा । भेटेन माहेरा आपुलिया ॥२॥ सर्व सुकृताचें फळ मी लाहीन । क्षेम मी देईन परब्रह्मीं ॥३॥ बापरखुमादेविवरा विठ्ठलाची भेटी । आपुलिये संवसाठीं घेऊनि राहे ॥४॥

२०९. **विठ्ठलयात्रे जाति वो माये** । त्याचे धरीन मी पाये ॥१॥ विठोबा माझें माहेर । भेटेन बुद्धि परिकर ॥२॥ रखुमादेविवर विठ्ठलें । मन ठेउनि राहिलें निर्धारें ॥३॥

२१०. **या अमरामाजी येखादा वोळगों म्हणे** तरी तो ठावो ठाकितां अतिदुस्तरू । भूमंडळींचें राज्य वोळगों म्हणे तंव तेथें न लभे अवसरू । निःसंग होउनि यतिधर्म चाळूं म्हणे तरी भिक्षेसी पडे विचारु । निःप्रपंच हातीं टाळ दिंडी घेऊनियां वोळगे तो हरिहरुरेरे ॥१॥ हरीचे विद्यावंत जालोंरे आम्ही जाऊनि पंढरपुरीं राहिलों । कळिकाळाच्या माथां पाय देऊनियां वैकुंठ भुवनासि गेलोंरेरे ॥धु॥ अष्टांगयोगें शरीर दंडूं पाहे तंव येवढें कैचें कष्टसाधन । लय लक्ष लावूनि गुरुमंत्र जपों म्हणों तरी स्थिर नव्हे अंतःकरण । तल्लीन होऊन हरिकथा आयिकों म्हणों तरी ठार्यांचेचि बाधिर श्रवण । कुदंड वाचे हरिहरि म्हणतां फुकासाठीं चुके पतनरेरे ॥२॥ चहूं वे-

दांचे गव्हर धांडोळितां वेडावलीं साही दर्शनें । शून्य स्थावर जंगम सर्वत्र व्यापून असणें । जळीं स्थळीं काष्टीं पाषाणी सरिसें या दृष्टी पाहाणें । ऐसियातें सेवितां अविद्या लोपे मा विश्वास मानिला मनें ॥३॥ जयाचिये वोळगे जातां आडकाठीच नाहीं भीतरी गेलिया मान पाविजे । अरोधें विरोधें समतुल्य देणें न मगतां अभरा होईजे । तो क्षणामाजी दे तें नसेरे कल्पकोटि ऐसिया धुरे कां दुऱ्हाविजे । ऐसियाचे गांवींची सुखवस्तीचे पुरे मा बहूत काय अनुवादिजेरेरे ॥४॥ ऐसा वैकुंठपुरपति पुंडलिकाचिये भक्ती अमूर्त मूर्तीस आला । भक्तां अमरपद देतुसें अवळीला नामें यमलोक विभांडिला। जिहीं जैसा भाविला त्या तैसा पाल्टु दाविला परि । अणु एक नाहीं वेंचला । बापरखुमादेविवरु विठ्ठलु आम्हां गीतीं गातां जोडलारेरे ॥५॥

---

## संतमहिमा.

२११. **अखंड हरि वाचेसी** । जरी सुकृताची राशी । तरीच हरि ये मुखासी । धन्य जन्मासी तो आला ॥१॥ देखतां ज्याचे चरण । यम जातसे शरण । ऐसें सुकृताचें वर्णन । कवणें करावें तयाचें ॥२॥ तोचि एक साधु देखा । नित्य पुसावें त्या विवेका । तो कांहीं न धरी शंका । हरिनाम ह्मणतसे ॥३॥ ज्ञानदेवी निजसूत्र । तोचि धन्य शुद्ध पवित्र । हरिवांचूनि त्याचें वक्त्र । नेणें आणिक दुसरें ४

२१२ **आनंदले वैष्णव गर्जती नामें** । चौदाही भुवनें भरलीं परब्रह्में ॥१॥ नरोहरि हरि नारायणा । सनकसनंदनमुनिजनवंदन ॥२॥ गातां वातां नाचतां प्रेमें उल्हासें । चराचरींचे दोष नासिले अनायासें ॥३॥ हरी मनीं हरी चित्तीं हरी अंकु शरीरीं । तयातें देखोनि हरि चाऱ्ही बाह्या पसरी ॥४॥ अंघ्रिरेणु ज्याचा उद्धरितो पतिता । प्राकृत वाणी केविं वर्णूं हरिभक्तां ॥५॥ तीर्थीं पावन धर्म जिहीं केला धडौती । कैवल्यकल्पद्रुम ते त्रिजगतीं ॥६॥ मत्स्यकूर्मादिक ज्याचे महिमेसी आले । धन्य वैष्णव तेज रविशशिसी पाहालें ॥७॥ बापरखुमादेविवरा पढियंती जया तनु । तया संताचरणीं स्थिर होका मनु ॥८॥

२१३. **श्रवणें कीर्तनें जाले ते पावन** । सनकादिक जाण परम भक्त ॥१॥ जाली ते विश्रांति याचकां सकळां । जीवीं जीवनकळा श्रीमूर्तिरया ॥२॥ पादसेवनें आक्रूर जाला ब्रह्मरूप । प्रत्यक्ष स्वरूप गोविंदाचें ॥३॥ सख्यपणें अर्जुन नरनारायण । सृष्टि जनार्दन एक-रूप ॥४॥ दास्यत्व निकट हनुमंतें केलें । म्हणोनि देखिले रामचरण ॥५॥ बळि आणि भीष्म प्रल्हाद नारद । बिभीषणावरद चंद्रार्क ॥६॥ व्यास आणि वसिष्ठ वाल्मिकादिक । आणि पुंडलिक शिरोमणी ॥७॥ शुकादिक योगी रंगले श्रीरंगीं । परिक्षितीचा अंगीं ठसावलें ॥८॥ उद्धव यादव आणि ते गोपाळ । गोपिकांचा मेळ ब्रह्मरूप ॥९॥ अनंत भक्त राशी तरले वानर । ज्ञानदेवा घर चिदानंदीं ॥१०॥

२१४. **संत भेटती आजी मज** । तेणें जालों चतुर्भुज । दोन्ही भुजा स्थुळीं सहज । दोन्ही सूक्ष्मीं वाढल्या ॥१॥ आलिंगनीं सुख वाटे । प्रेम चिदानंदीं गोठे । हर्षें ब्रह्मांड उतटे । समुळ उडे मीपण ॥२॥ या संतांसी भेटतां । सरे संसाराची व्यथा । पुढता पुढती माथां । अखंडित ठेवीन ॥३॥ या संतांचें देणें । कल्पतरुहूनि दुणें । परिसा परीस अगाध देणें । चिंतामणि ठेंगणा ॥४॥ या संतांपरीस उदार त्रिभुवनीं नाहीं थोर । मायबाप सहोदर । इष्टमित्र सोईरे ॥५॥ कृपाकटाक्षें न्याहाळिलें । आपुल्यापदीं बैसविलें । बापरखुमादे-विवरें विठ्ठलें । भक्तां दिधलें वरदान ॥६॥

२१५. **अकार उकार मकार करती हा विचार** । परि विठ्ठल अपरंपर न कळे रया ॥१॥ संताचे संगति प्रेमाच्या कल्लोळा । आ-नंदें गोपाळांमाजि खेळे ॥२॥ बाळे भोळे भक्त गाताती साबडें । त्यांचें प्रेम आवडे विठोबासी ॥३॥ बापरखुमादेविवरु परब्रह्म पुतळा तेथिल हे कळा निवृत्ति जाणे ॥४॥

२१६. **शर्करेची गोडी निवडावया भले** । साधु निवडिले सत्संगती ॥१॥ सत्संगें प्रमाण जाणावया हरी । येर ते निर्धारीं प्रपंचजात ॥२॥ भानुबिंब पाहा निर्मळ निराळ । अलिप्त सकळ तैसे साधु ॥३॥ ज्ञानदेव हरी जपोनि निर्मळ । सदा असे सोज्वळ निवृत्तिसंगें ॥४॥

२१७. **भाग्याचा उदयो कीं दैवाची गति** । मज जोडली संगती सज्जनांची ॥१॥ माझें मीच भांडवल घेउनियां निगुती । लाभाची गति श्रीविठ्ठलु ॥२॥ देशदेशाउरा न लगेची जाणें । ठायींच जोडणें एक्या भावें ॥३॥ खेपखेपांतर अनेक सोशिलें॰। मुद्दल उरलें लेखा चारी ॥४॥ मुद्दल देउनि वाणेरा फेडिला । उत्तीर्ण झाला दोही पक्षीं ॥५॥ चौघे साक्ष ठेवुनि अंतरीं। वेव्हार ज्ञानेश्वरीं खंडियेला ॥६॥

२१८. **सोळा कळि चंद्र पूर्णिमे पूर्ण बोधु** । संतजनां उद्‌बोधु सागरन्यायें॥१॥नित्यता पूर्णिमा हृदयीं चंद्रमा । आलिंगन मेघश्यामा देतु आहे ॥२॥ ज्ञानदेवा मोहो निःशेष निर्वाहो । रूपीं रूप सोहंहो एका तेजें ॥३॥

२१९. **आवेगे ज्ञानजननी ज्ञाना आईगे** । ज्ञाननाथेगे ज्ञानें काम धेनु तूं माझीयेगे॥१॥ज्ञानाई तूं माय माझीगे। ज्ञानाई तूं बाप माझागे ॥२॥ ज्ञानाई गुरुदेव ज्ञान ध्यान । साधन परत्रपावन ॥३॥ इह तुज वांचून आन मज कोणगे । बाई नुपेक्षीगे ज्ञानबहिणी ॥४॥ राउळींचे कऱ्हे हारपले हाटीं । माणूसप्रति झाडा घेताती वोठी ॥५॥ नवल विपरीत देखिलें सृष्टीं । माणुसप्राते झाडा घेताति वोटी ॥६॥

२२०. **कुंचे पताका झळकती** । टाळ मृदंग वाजती । आनंदें प्रेमें गर्जती । भद्रजाती विठ्ठलाचें ॥१॥ आले हरीचे विनट । वीर विठ्ठलाचे सुभट । भेणें जाहले दिप्पट । पळति थाट दोषांचे ॥२॥ तुळसीमाळा शोभती कंठीं । गोपीचंदनाच्या उटी । सहस्र विघ्नें लक्ष कोटी । बारा वाटा पळताती ॥३॥ सतत कृष्णमूर्ति सांवळी । खेळे ज्याचे हृदयकमळीं। शांति क्षमा तया जवळी। जीवेंभावें अनुसरल्या ॥४॥ सहस्र नामाचें हातियार । शंख चक्राचे शृंगार । अति बळ वैराग्याचें थोर । केला मार षड्वर्गा ॥५॥ ऐसें एकांग वीर । विठ्ठलरायाचें डिंगर । बापरखुमादेविवर । तींहीं निर्धारीं जोडिला ॥६॥

२२१. **कुंचे पताकाचे भार** । आले वैष्णव डिंगर । भेणें पळती यमकिंकर । नामें अंबर गर्जतसे ॥१॥ आले हरिदासांचे थाट। कळिकाळा नाहीं वाट। विठ्ठलनामें करिती बोभाट । भक्तां वाट सांपडली ॥२॥ टाळ घोळ चिपळिया नाद । दिंडी पताका मकरंद । नाना बा-

गडियाचे छंद । कवच अभेद नामाचें ॥३॥ वैष्णव चालिले गर्जत । महावीर ते अद्‌भुत । पुढें यमदूत पळत । पुरला अंत महादोषा ॥४॥ निवृत्ति संत हा सोपान । महावैष्णव कठीण । मुक्ताबाई तेथें आपण । नारायण जपतसे ॥५॥ ज्ञानदेव वैष्णव मोठा । विठ्ठलनामें मुक्तपेठा । स्नान दान घडे श्रेष्ठा । वैकुंठ वाटा संत गेले ॥६॥

२२२. **पूर्वजन्मीं सुकृतें थोर केलीं** । तीं मज आजि फळासि आलीं ॥१॥ परमानंदु आजि मानसीं । भेटी जाली या संतांसीं ॥२॥ मायबाप बंधु सखे सोयरे । यांतें भेटावया मन न धरे ॥३॥ एक एका तीर्थाहूनि आगळें । तयामाजि परब्रह्म सांवळें ॥४॥ निर्धनासि धनलाभु जाला । जैसा अचेतनीं प्राण प्रगटला ॥५॥ वत्स विघडलियां धेनु भेटली । जैसी कुरंगिणी पाडसा मिनली ॥६॥ हें पियुषापरतें गोड वाटत । पंढरिरायाचे भक्त भेटत ॥७॥ बापरखुमादेविवर विठ्ठलें । संत भेटतां भवदुःख फिटलें ॥८॥

२२३. **आजी सोनियाचा दिनु** । वर्षे अमृताचा घनु ॥१॥ हरी पाहिलारे हरी पाहिलारे । सबाह्याभ्यंतरीं अवघा व्यापक मुरारी ॥धु०॥ दृढ विटे मन मुळीं । विराजीत वनमाळी ॥३॥ बरवा संत समागमु । प्रगटला आत्मारामु ॥४॥ कृपासिंधु करुणा करु । बापरखुमादेविवरु ॥५॥

---

## नामसंकीर्तनमाहात्म्य.

२२४. **दसविये द्वारीं वोहट पडिला** । नेणता पैं गेला पाहावया ॥१॥ अवचिती वाट सांपडली पंथें । ब्रह्मनाम तेथें आलें हातां ॥२॥ ज्ञानदेवा गीती निशाणी नाम । समाधि संजिवनी तारक हरी ॥३॥

२२५. **भावाचेनि बळें घेतलें वैकुंठ** । हरिनाम नीट वैकुंठ मार्ग ॥१॥ सोपें हो साधन साधावयालागीं । नलगे उपाधि नाना मतें ॥२॥ ज्ञानेसहित ज्ञान विज्ञानेसि धन । वृत्तीचें समाधान निवृत्ति करी ॥३॥ शांति दया क्षमा करुणानिधि प्रेम । नेउनि परब्रह्म भावें मिळती ॥४॥ ज्ञानदेवो सांगे भावो मिनला गंगे । सुस्नात सर्वांगें हरी गंगा ॥५॥

२२६. **आलिया जवळा भक्तिसुख देखे** । पालव पोखे वाणिव

भोगी ॥१॥ तें सुख आम्हां विठ्ठलचरणीं । निवृत्ति करणी व्यासाचिये ॥२॥ जप तप ज्ञान क्रिया कर्म धर्म । रामकृष्ण नेम गुरुभजनें ॥३॥ ज्ञानदेवो ह्मणे संसार निरसी । अखंड मानसीं विठ्ठल हरी॥४॥

२२७. अभाव संगती नाना भूत व्यक्ती । संसार पंगती मेळवी त्यासी ॥१॥ हरिनामें शोक करी अभाव कामारी । यातें दुरी करी हरिपाठें ॥२॥ संताची संगती वेदश्रुतींची मती । घेउनियां हातीं ब्रह्मशास्त्र ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे नारायण नाणें। घेउनि पारखणें भक्तिपेठे४

२२८. यश कीर्ति वानु नेणें मी वाखाणूं । रामकृष्ण आम्हां सणू नित्य दिवाळी ॥१॥ नरहरि रामा नरहरि रामा । पुराणपुरुषोत्तमा हरि गोपाळा ॥२॥ या नेमीं अक्रूर बोधला परीक्षिति उपदेशिला । अर्जुनासि जाला साहाकारी ॥३॥ ज्ञानदेव म्हणे नामेंविण जो नरु । तो होय भूमिभारु ये संसारीं ॥४॥

२२९. प्राप्तीविण फळ केंवि लाहे प्राणी । जैसा चातक धरणीं उपवासु ॥१॥ वोळलिया मेघु सावधु बोभाये । बिंदुमात्र घेई जीवन देखा ॥२॥ तैसें केंवि घडे संसारिया चित्तें । प्राप्तीच्या अर्थातें साहे संत ॥३॥ सगुण निर्गुण समरस आहे । विरुळा येथ साहे समता बुद्धी ॥४॥ जंववरी समान शांति बुद्धि हे ठेली । तंववरी हे भूली बोली कैसी घडे ॥५॥ दिन काळ पळपळ स्मरण नामाचें । विरुळा या मंत्राचें करी पठण । ज्ञानदेव ह्मणे नामया हें तूं गा जाणसी । भजन केशवासी तूंचि तुझा ॥६॥

२३०. कापुरीं परिमळु दिसे वो अळुमाळु । हळु हळु सुढाळु पवनपंथें ॥१॥ पवनीं न माये पवनही धाये । परतला खाय आपणासी ॥२॥ मुखवात नाहीं तरतसे बाहीं । नांवें दिशा दाही आप घोषें ॥३॥ ज्ञानदेवा मौन्य नामाचें तारण । तारक हरिवीण दुजा नाहीं ॥४॥

२३१. श्रवण त्वचा चक्षु जिव्हा घ्राण । दशहि इंद्रियें जाण हरीच्या ठायीं ॥१॥ अवघा हा गोविंदु अवघा हा मुकुंदु । अवघा हा विठ्ठलु भरला दिसे ॥२॥ पतीतपावन नामें दिनोद्धारण । स्मरलिया आपण वैकुंठ देतु ॥३॥ ज्ञानदेव म्हणे हें पुंडलिक जाणे । अंतकाळीं पेणें साधीयेलें ॥४॥

२३२. अनंत नामाचें पाठांतर । रामकृष्णनाम निरंतर । सर्व सुखाचें भांडार । हरि श्रीधर नाम वाचे ॥१॥ हरिनाम गजर खरा। येणें तूं तरसील सैरा । जन्म जुगाच्या येरझारा । खंडती एक्या हरिनामें ॥२॥ अनंत तीर्थांचे मेळ । साधलिया हरीनाम कल्लोळ । पूर्वजांसहित अजामेळ । उद्धरिला सहपरिवारें ॥३॥ कोटिजन्मांचे दोष । हरतील पातकें जातील निःशेष । अंतीं होईल वैकुंठवास । कोटि कुळांसी उद्धार ॥४॥ हें योगियांचें निजजीवन । रामकृष्ण नारायण । येणें जगत्र होय पावन । हरिस्मरण जिवांसी ॥५॥ ज्ञानदेवीं घर केलें । हरी ऐसें रत्न सांठविलें । शेखीं कोटिकुळां उद्धरिलें । हरिहरि स्मरिलें निशीदिनीं ॥६॥

२३३. पदपदार्थसंपन्नता । व्यर्थ टवाळी कां सांगतां । हरिनामीं नित्य अनुसरतां । हें सार सर्वार्थी ॥१॥ हरिनाम सर्व पंथी । पाहावें नलगे ये अर्थी । जे अनुसरले ते कृतार्थी । भवपंथा मुकले ॥२॥ कूळ तरलें तयांचें । जीहीं स्मरण केलें नामाचें । भय नाहीं त्या यमाचें । सर्व ग्रंथीं बोलियेलें ॥३॥ नलगे धन नलगे मोल । न लगति कष्ट बहूसाल । कीर्तन करितां काळ वेळ । नाहीं नाहीं सर्वथा ॥४॥ हरि सर्व काळ अविकळ । स्मरे तो योगिया धन्य केवळ । त्याचेनि दर्शनें सर्वकाळ । सुफळ संसार होतसे ॥५॥ ज्ञानदेवी जप केला । मन मुरडुनि हरि ध्याईला । तेणें सर्वांगीं निवाला । हरिच जाला निजांगें ॥६॥

२३४. सर्वव्यापक सर्व देहीं आहे । परि प्राणियांसि सोय नकळे त्याची ॥१॥ परमार्थ तो कडु विषय तो गोडु । तया अवघडु संसार ॥२॥ नामाचें साधन जिव्हे लावी बाण । तया अनुदिन जवळी असे ॥३॥ धारणा धीट जरि होय विनट । तया प्रेमें वैकुंठ जवळी असे ॥४॥ सुलभ आणि सोपारें केलेंसे दातारें । आह्मीं एकसरें उच्चारिलें ॥५॥ ज्ञानियासि ज्ञान ज्ञानदेवि ध्यान । कलिमल छेदन नाम एक ॥६॥

२३५. तिहीं त्रिगुणीं वोतिलें । त्रिपुटिसी गोंविलें । आणुनी बांधिलें । चर्मदेहीं ॥१॥ न सुटतां शिणताहे । भवति वास पाहे । प्रपंच मोहताहे । काय करूं ॥२॥ कृष्णनाम मंत्रु सुटे । विषय

प्रपंचु तुटे । मोहनमुद्रा निघोटे । वैकुंठ रया ॥३॥ सावधपणें विरुळा । जाणें तेथिंचि कळा । विज्ञानपणें सोहळा । निमथा गातूं ॥४॥ ज्ञानदेव सांगतु । हरिपंथें मुक्तिमातु । एकतत्व सांगातु । जनींवनीं ५

२३६. **अळुमाळु सोय रातलीची धाय** । सत्वतेजीं माये एकतत्वीं ॥१॥ तें तत्वसाधन मुक्तामुक्त घन । कृष्णनाम पूर्ण तेजीं माये ॥२॥ सोकरी पापपुण्या ठायीं आपा । आयुष्याच्या मापा हरि धांवे ॥३॥ ज्ञानदेव गीत गातसे नित्य । कृष्णकृष्ण सत्य इतुकें सार ॥४॥

२३७. **जन्मजन्मांतरीं असेल पुण्यसामुग्री** । तरिच नाम जिव्हाग्रीं येईल श्रीरामाचें॥१॥ धन्य कुळ तयाचें रामनाम हेंचि वाचे । दोष हरतील जन्माचे श्रीराम म्हणतांची ॥२॥ कोटीकुळाचें उद्धरण मुखीं राम नारायण । रामकृष्ण स्मरण धन्य जन्म तयाचें ॥३॥ नाम तारक सांगडी नाम न विसंबे अर्धघडी । तप केलें असेल कोडी तरिच नाम येईल ॥४॥ ज्ञानदेवीं अभ्यास मोठा नामस्मरण मुखावाटा । पूर्वज गेले वैकुंठा हरिहरि स्मरतां ॥५॥

२३८. **अढळ सप्रेम उपरति पेवो** । हरिहरि घेवो तारक नाम ॥१॥ संवगडे वागणें हरीपंथीं चालों । हरि हरि बोलों दिननिशीं॥२॥ पाहाते निमते सरे हंसिगती । हरीची पंगती जेऊं बैसो ॥३॥ ज्ञानदेव सांगे रामकृष्ण आशा । संसार पिपाशा दुरी करी ॥४॥

२३९. **कापुराचें कलेवर घातलें करंडा** । शेखीं नुरेचि उंडा पाहावया ॥१॥ मा ज्योति मेळे कैसा उरेल कोळिसा । भावें हृषिकेशा भजतां ऐसें ॥२॥ ज्ञानदेव म्हणे वासना हे खोटी । नाम यज्ञें मिठी दिधलिया विरे ॥३॥

२४०. **सुकुमार वेल्हाळ रूपें पैं सुंदर** । तोचि पैं आगर नंदाघरीं ॥१॥ अवघ्या सुख देतु अवघ्या विदटे । अवघेची पेठे हरिनाम ॥२॥ यापरि आगरु कृष्णनाम ठसा । वोतला सरिसा भाग्ययोगें ॥३॥ बापनिवृत्तिराज उपदेशिती आह्मां । ज्ञानदेवा महिमा नामें आला ॥४॥

२४१. **ज्याचेनि तेजें तेजस रविग्रह** । त्याचेनि मोह निरसती १॥ तें नाम परिकर कृष्णचि सुंदर । वैकुंठींचें घर आम्हीं केलें

॥२॥ जपतां नाम स्मरतां पैं हरिहरि । प्रपंच बोहरी कृष्ण-नामें ॥३॥ निवृत्ति सांगे ज्ञाना कृष्णचि नयना । सर्वी सर्वत्र पान्हा कृष्णरूपें ॥४॥

२४२. **समरसें घटु विराला विनटु** । एकरूपें पाटु गेला सांगसी ॥१॥ कृष्ण कृष्ण वाट सांपडली नीट । जिव्हेसी घडघडाट इंद्रियेंसहित ॥२॥ मनाच्या मोवनीं समाधीच्या ध्यानीं । चिंतिला पद्मासनीं आत्मराजु ॥३॥ ज्ञानदेवा चित्त कृष्णध्यानीं रत । जन्म-जरामृत्यु हारपली ॥४॥

२४३. **सर्वत्र समान भावयुक्त पूर्ण** । धृति धारणा घन वर्ते जया ॥१॥ सामान्यत्व हरी समसेज करी । वित्त वित्त घरीं हरि-पाठें ॥२॥ आकार निराकारीं त्रिपथ शेजारीं । हरी भरोवरी घेतु विरुळा ॥३॥ ज्ञानदेवा जिणें अवघें ज्ञान होणें । विज्ञानीं राहणें गुरुकृपा ॥४॥

२४४. **सांवळिये तेजीं भक्ति पसु वोल** । इंद्रियां सरण रज चरण रजीं ॥१॥ निवालों वो माये अमृतरसनें । रामनामपेणें वैकुंठीं-चें ॥२॥ आळवितां सगुणनिर्गुणरूपडें । वचनें फाडोवाडें हातां येत ॥३॥ ज्ञानांजन लेवों ज्ञानदेवी निज । निवृत्तीनें गूज सांगितलें ॥४॥

२४५. **समाधि साधन संजीवन नाम** । शांति दया सम सर्वभूतीं ॥१॥ शांतीची पैं शांति निवृत्ति उतारू । हरिनाम उच्चारु दिधला तेणें ॥२॥ शम दम कळा विज्ञान सज्ञान । परतोनि अज्ञान नये घरा ॥३॥ ज्ञानदेवा सिद्धि साधन अवीट । भक्तिमार्ग नीट हरिपंथी ॥४॥

२४६. **परोसि परतें स्वरूप या हरीचें** । भक्तिमार्ग साचे विरुढे रूप ॥१॥ चला जाऊं पाहूं आत्मराज घटीं । नामें नेतु तटीं वैकुंठी-चिया ॥२॥ समाधि विधान हरिपाठगुण । उगीयाची मौन असिजे रया ॥३॥ ज्ञानदेव निवृत्ति पुसों जाय भाव । तंव तेणें स्वयमेव दाविले डोळां ॥४॥

२४७. **त्रिभुवनींचें सुख एकतत्त्व विठ्ठल** । नलगे आह्मां मोल उच्चारितां ॥१॥ विठ्ठल उघडा मंत्र कळिकाळा त्रास । घालुनियां कांस जपों आधीं ॥२॥ सत्वर सत्वाचे जपती नामावळी । नित्यता

आंघोळी घडे रया ॥३॥ बापरखुमादेविवरु जिव्हाळा हृदयीं । जीवाचा जीव ठायीं एक पाही ॥४॥

२४८. **कांरे स्फुंदतोसी कांरे स्फुंदतोसी** । न भजतां विठ्ठलासी नरकीं पडसी ॥१॥ पुण्यपाप बाधा न पवसी गोविंदा । पावशील आपदा स्मर परमानंदा ॥२॥ पुण्य करितां स्वर्ग पाप करितां भोग। नाम जपतां सर्वांग होईल पांडुरंग ॥३॥ देहीं आत्मा जंव आहे तंव करूनियां पाहें । अंतीं कोणी नोव्हे धरीं वैष्णवाची सोय ॥४॥ जाईल हें आयुष्य न सेवीं विषयविष । पडतील यमपाश वेगीं करी सौरस ॥५॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलीं मन चरणीं गोंवीं । हारपला देहभावीं जालासे गोसावी एकरूपें ॥६॥

## नाममाला.

२४९. **सहज कर्मभक्ति घडावया कोडें** । ज्ञानधन निवाडें नाम जपों ॥१॥ नाम मात्र नमन ज्ञानधन पूर्ण । रामनामें कर्ण भरूं रया ॥२॥ सत्वाचे सागरीं उतरों पैलथडीं । रिती अर्धघडी जावों नेदों ॥३॥ ज्ञानदेवा चित्त अवघें धन गोत । रामनामें तृप्त सकळ जीव ॥४॥

२५०. **सकळमंगळनिधी** । श्रीविठ्ठलाचें नाम आधीं ॥१॥ ह्मण कांरे ह्मण कांरे जना । श्रीविठ्ठलाचें नाम वाचे ॥२॥ पतीतपावन साचें । श्रीविठ्ठलाचें नाम वाचे ॥३॥ बापरखुमादेविवरु साचें । श्रीविठ्ठलाचें नाम वाचे ॥४॥

२५१. **आरंभीं आवडी आदरें आलें नाम** । तेणें सकळ सिद्धि जगीं जालें पूर्ण काम ॥१॥ रामकृष्ण गोविंद गोपाळा । तूं माय माउली जिवीं जिव्हाळा ॥२॥ तुझियेनि नामें सकळ संदेहो फिटला। बापरखुमादेविवरा श्रीविठ्ठला ॥३॥

२५२. **सोनयाचा दिवस आजि अमृतें पाहाला** । नाम आठवितां रूपीं प्रगट पैं झाला ॥१॥ गोपाळारे तुझें ध्यान लागो मना । आनु न विसंबे हरि जगत्रजीवना ॥२॥ तनु मनु शरण विनटलों तुझ्या पाईं । बापरखुमादेविवरा वांचूनि आनु नेणें कांहीं ॥३॥

२५३. **अष्टांगयोगें न सिणिजे** । यम नेम निरोध न किजे रया

॥१॥ वाचा गीत गाईजे । गातां वातां श्रवणीं ऐकिजे रया ॥२॥ गीताछंदें अंग डोलिजे । लीला विनोदें संसार तरिजे रया ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु नामें । जोडे हा ऊपावो किजे रया ॥४॥

२५४. **अंडज जारज स्वेदज उद्भिज आटे** । हरिनाम नाटे तें बरवें ॥१॥ जो नाटे तें नाम चित्तीं । रखुमादेवीपति श्रीविठ्ठलाचें ॥२॥ शरीर आटे संपत्ति आटे । हरिनाम नाटे तें बरवें ॥३॥ बापरखुमादेविवराचें नाम नाटे । युगें गेलीं परि उभा विटे ॥४॥

२५५. **रामनामा वाटा हेचि पैं वैकुंठ** । ऐसी भगवद्गीता बोलतसे ॥१॥ अठरा साक्षी साही वेवादत । चौघाचेनि मतें घेईन भागु॥२॥ शेवटिले दिवसीं धरणें घेईन । बापरखुमादेविवरा बळेंचि साधीन॥३॥

२५६. **कर्म आणि धर्म आचरिजे जयालागीं** । साधक सिणले साधन साधितां अभागी ॥१॥ गोड तुझें नाम विठो आवडलें मज । दुजें विचारितां मना वाटतसे लाज ॥२॥ भुक्ति आणि मुक्ति नामापासीं प्रत्यक्ष । चाऱ्ही वेद साही शास्त्रें वदताती साक्ष ॥३॥ बापरखुमादेविवरा तुझी आण । काया वाचा चित्त चरणीं डुललें गाहण॥४॥

२५७. **प्रेमाचा जिव्हाळा नाम मुखाशीं आलें** । सार्थक पैं जालें संसाराचें ॥१॥ केशव नाम सार विठ्ठल उच्चार । राम निरंतर हृदयीं वसे ॥२॥ पाहतां हा भाव लीळा तो विग्रह। तेथींचा अनुभव विरळा जाणे ॥३॥ बापरखुमादेविवरु पाहतां विस्तारु । नामाचा बडिवारु न बोलवे ॥४॥

२५८. **रामकृष्ण नामें ये दोन्हीं साजिरीं** । हृदय मंदिरीं स्मरा कांरे ॥१॥आपुली आपण करा सोडवण संसारबंधन तोडा वेगीं ॥२॥ ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण माळा । हृदयीं जिव्हाळा श्रीमूर्तिरया॥३॥

२५९. **आठविता विसरलें आपुलिया गोता** । हरिनामें त्वरिता मोक्ष जाला ॥१॥ त्याचें नामचि त्वरित प्रल्हादें केलें प्रसन्न । तेणें संजिवन जाले त्याचे देह ॥२॥ बापरखुमादेविवरु नृसिंहरूपें देखे । दैत्य हरिखे धरी जानु ॥३॥

२६०. **विठ्ठल नाम नुच्चारीसी** । तरी रवरव कुंडीं पडसी ॥१॥ विठ्ठल नाम उच्चारीं । आळसु न करीं क्षणभरी ॥२॥ विठ्ठल नाम

तीन अक्षरें । अमृतपान केलें शंकरें ॥३॥ रखुमादेविवरा विठ्ठलें । महापातकी उद्धरिले ॥४॥

२६१. **भ्रम धरिसी या देहाचा** । विठ्ठल ह्मणें कां रे वाचा ॥१॥ पडोन जाईल हें कलेवर । विठ्ठल उच्चारीं पा सार ॥२॥ रखुमादेविवरू अभयकरु । मस्तकीं ठेविला हा निर्धारु ॥३॥

२६२. **विठ्ठल विठ्ठल न ह्मणसी** । पुनरपि पडसी गर्भवासीं॥१॥ अंतकाळीं स्मरें । स्मरें विठ्ठल राणा ॥२॥ रखुमादेविवरु निर्धारी । पडों नेदी चराचरीं ॥३॥

२६३. **एक मूर्ख नेणती** । नाम हरीचें न घेती । मुखें भलतेंचि जल्पती । ते पावती अधःपंथा ॥१॥ नामेंविण सुटका नाहीं । ऐसी वेदशास्त्रीं ग्वाही । जो वेद मस्तकीं पाही । ब्रह्मयानें वंदिला ॥२॥ नित्य नामाची माळा । जिव्हे घे तूं गळाळा । तो नर कर्मा वेगळा । ऐसें बोलती पुराणें ॥३॥ नयनीं श्रवणीं हरी । आणिक काम न करी । तो साधु भक्त निर्धारीं । हरिचा आवडता ॥४॥ ज्ञानदेवीं पाहिलें । हरिनाम साधुनी घेतलें । तें समाधीस केलें । पुष्पशयनीं आसन ॥५॥

२६४. **नाममाला घे पवित्र** । अंतीं हेंचि शस्त्र । राम हा महामंत्र । सर्व बाधा निवारी ॥१॥ भवकर्मविख । रामनामीं होय चोख । हरेल भवव्यथादुःख । पुढें सुख उपजेल ॥२॥ माळा घालीं हेचि गळां । घे अमृताचा गळाळा । होईल वैकुंठीं सोहळा । रामकृष्ण उच्चारणीं ॥३॥ ज्ञानदेवीं माळा केली । सुखाची समाधि साधिली । जिव्हा उच्चारणी केली । अखंड हरिनाम ॥४॥

२६५. **समाधीचें साधन** । तें रामनाम चिंतन । चित्ता सुखसंपन्न । हर्ष जीवनीं केला ॥१॥ कोटी तपाचिया राशी । जोडती रामनामापाशीं । नाम जपतां अहर्निशीं । वैकुंठपद पाविजे ॥२॥ हेंचि धुरुसी आठवलें । उपमन्यें हेंचि घोकिलें । अंबऋषीनें साधिलें । रामकृष्ण उच्चारणीं ॥३॥ पांडवांसि सदा काळीं । कृष्ण राहिला जवळी । ज्ञानदेव हृदयकमळीं । तैसाचि स्थिरावला ॥४॥

२६६. **निरंतर ध्याता हरी** । सर्व कर्माची बोहरी । दोष जाती

दिगंतरीं । रामकृष्णउच्चारणीं ॥१॥ जप तीर्थ हेंचि नाम । जपव्रता हेंचि नेम । ऐसें धरोनियां प्रेम । तोचि भक्त तरेल ॥२॥ जीव शिव एक करी । शांति क्षमा जरी धरी । त्यापाशीं नित्य श्रीहरी । प्रत्यक्ष आपण उभा असे ॥३॥ ज्ञानदेव म्हणे नित्य । त्याचें वचन तेंचि सत्य । त्याचें वचन सर्व कृत्य । सिद्धी पावेल सर्वथा ॥४॥

२६७. **जन्म जरा दुःख बाधा** । स्मरतां नाहीं गोविंदा । ऐसा जयासि नित्य धंदा । तोचि सदा सुखरूप ॥१॥ धन्य कुळ धन्य याती । धन्य जन्म पुढती पुढती । भक्तिवीण नाहीं गती । मुखीं हरिनाम उच्चार ॥२॥ विश्वीं विश्व जो व्यापकु । तोचि माझा हरि एकु । त्यासी भक्तिवीण साधकु । नोळखे पैं दुर्बुद्धि ॥३॥ ज्ञानरंजनीं रंजला । ज्ञानबोधें उपजला । ज्ञानदेवीं हरी सेविला । निरंतर सर्वकाळ ॥४॥

२६८. **संपत्तिविपत्तिदुःख** । हरेल अवघा शोक । वेगीं करूनियां विवेक । हरिस्मरण करीं ॥१॥ मंत्र यंत्र सूत्रधारी । सिद्ध साध्य तोचि हरी । नित्य जपोनि वैखरी । आप्तता करी हरीसी ॥२॥ ध्यान मन एक चित्त । अलक्ष लक्षी अच्युत । न सांगे हिताची मात। अखंड जपे हरिनाम ॥३॥ ज्ञानदेवें जप केला । मग समाधीस बैसला । नाम घेतां बोध जाला । देव आला हृदयासी ॥४॥

२६९. **देवाविण शून्य मुख** । नाम न घेतां नाहीं सुख । अंतीं होईल रे दुःख । नाम नसतां मुखीं ॥१॥ राम कृष्ण गोविंद । हरि माधव परमानंद । नित्य ऐसा जयासि छंद । तोचि सुलभ गर्भवासीं ॥२॥ अनंत नाम निरसून । एक मार्ग तोचि मान्य । जेणें जोडे नित्य सौजन्य । तोचि रामकृष्ण उच्चारीं ॥३॥ ज्ञानदेवें अनुमानलें । मग भक्तिसुख साधलें । रामकृष्ण उच्चारिले । जे तारक तिहीं लोकीं ॥४॥

२७०. **प्रेम जयाचें कथेवरी** । तोचि धन्य ये चराचरीं । राम कृष्ण निरंतरी । मुखीं आवडी जपतसे ॥१॥ धन्य धन्य तोची वंशी । धन्य धन्य माता कुशीं । धन्य धन्य काळ तयासी । रामकृष्ण म्हणतांची ॥२॥ ऐसें धन्य जन्म तयाचें । धन्य धन्य पुण्य साचें ।

त्यासी भय कळिकाळाचें । नाहीं जन्म घेतालिया ॥३॥ एवढा महिमा नामाचा । धन्य जो राम उच्चारी वाचा । धन्य जन्म तयाचा । ज्ञानदेव ह्मणे ॥४॥

२७१. **नाम प्रल्हाद उच्चारी** । तया सोडवी नरहरी । उचलुनि घेतला कडियेवरी । भक्तसुखें निवाला ॥१॥ नाम बरवया बरवंट । नाम पवित्र आणि चोखट । नाम स्मरे नीळकंठ । निजसुखें निवाला ॥२॥ जें धुरुसी आठवलें । तेंचि उपमन्यें घोकिलें । तेंचि गजेंद्रा लाधलें । हित जालें तयांचें ॥३॥ नाम स्मरे अजामेळ । महापातकी चांडाळ । नामें जाला सोज्वळ । आपण्यासहित निवाला ॥४॥ वाटपाडा कोळिकु । नाम स्मरे तो वाल्मिकु । नामें उद्धरिले तिन्ही लोकु । आपणासहित निवाला ॥५॥ ऐसें अनंत अपार । नामें तरले चराचर । नाम पवित्र आणि परिकर । रखुमादेविवराचें ॥६॥

२७२. **जें शंभूनें धरिलें मानसीं** । तेंचि उपदेशिलें गिरिजेसी ॥१॥ नाम बरवें बरवें । निज मानसीं धरावें ॥२॥ गंगोदकाहूनी निकें । गोडी अमृत जालें फिकें ॥३॥ सीतळ चंदनाहुनी वरतें । सुंदर सोनियाहूनी परतें ॥४॥ भुक्तिमुक्तिदायक । भवबंधनमोचक ॥५॥ बापरखुमादेविवरें । सुलभ नाम दिधलें सोपारें ॥६॥

२७३. **भक्तीचें तें ज्ञान वाचे नारायण** । दया ते संपूर्ण सर्वांभूतीं ॥१॥ ज्ञान नारायण ध्यान नारायण । वाचे नारायण सर्वकाळ ॥२॥ संसारग्रामीं नाम हाचि सांठा । पावाल वैकुंठा नामें एकें ॥३॥ गोविंद गोपाळ वाचेसी निखळ । पद पावाल अढळ अच्युताचें ॥४॥ नामेंचि तरले शुकादिक दादुले । जडजीव उद्धरले । कलीयुगीं ॥५॥ स्मरण करीतां वाल्मीक वैखरी । वारुळा भीतरीं रामराम ॥६॥ सर्वांमाजी श्रेष्ठ पुण्य भू वैकुंठ । विठ्ठल मूळपीठ जगदोद्धार ॥७॥ निवृत्ति निरोपण ज्ञानदेवा ध्यान । सर्वत्र नारायण एकरूप ॥८॥

२७४. **कर्माचिया रेखा नुलंघिती अशेषा** । म्हणोनि विशेषा केशवसेवा ॥१॥ रामकृष्णमाळा घाला पारे गळां । अखंड जीवनकळा राप जपा ॥२॥ करावा विचार धरावा आचार । करावा परिकर रामनामीं ॥३॥ सकळांचा सकळी त्यांतें तूं आकळीं । जिव्हा हे

वाचाळीं रामरतीं ॥४॥ रिघें शरण तुज नाहीं मरण । ठाकिसी चरण श्रीविठ्ठलाचे ॥५॥ निवृत्तिप्रसादें जोडे विठ्ठलनामें घडे । ज्ञान; देव बागडे पंढरिये ॥६॥

२७५. **नाम पवित्र आणि परिकरु** । कल्पतरुहुनी उदारु । ते तूं धरीं कां रे सधरु । तेणें तरसी भव दुस्तरु ॥१॥ नरहरी नाम उच्चारीं । तेणें तरसी भवसागरीं ॥धृ०॥ जपें न लाहसी तपें न लाहसी । क्रियें षट्कर्मे न पवसी । नामें एकेंरे पावसी । स्वर्गीं अमृत पान ॥२॥ क्षीर गोड ऐसें ह्मणसी परि तेथेंही वीट असे । नाम उच्चारितां वाचे कोटि जन्माचें पातक नासे ॥३॥ मन मारुनियां सायासीं । परि तेथेंही अवगुण असे । नाम उच्चारितां वाचे सकळिक ध्यान डोळां दिसे ॥४॥ बापरखुमादेविवरा विठ्ठलाचे विपायें नाम आलें वाचे । जळती डोंगर कल्मषाचे भय नाहीं कळिकाळाचें ॥५॥

२७६. **यमधर्म सांगें दूता** । परिसावी निजकथा । जेथें रामनाम वार्ता । तया देशा नव जावें ॥१॥ नाम महादोषां हरण । नाम पतीत पावन । नाम कलिमलदहन । भवबंधनमोचक ॥२॥ जये देशीं नाम वसे । नाम श्रवणीं विश्वासे । गाती नाचती उल्हासें । झणीं पाहाल तयांकडे ॥३॥ जये ग्रामीं हरिपूजन । जये नगरीं हरिकीर्तन । तेथें गेलिया बंधन । तुह्मी पावाल त्रिशुद्धीं ॥४॥ जये देशीं गरुडटका । कुंचे ध्वज आणि पताका । जेथें संतजन आइका । तया देशा नवजावें ॥५॥ आणिक एक ऐकारे विचारु । जेथें रामनामाचा गजरु । तेथें बापरखुमादेविवरु । तयाबळें नागवती ॥६॥

२७७. **तत्वमस्यादि वाक्य उपदेश** । नामाचा अर्धांश नाहीं तेथें । ह्मणोनि नामसंकीर्तन करितां जवळी जोडलासि आतां । क्षणु भरी न विसंबे जिवाचिया जीवना रया ॥१॥ नामें निजधीर गर्जती वैष्णव वीर । कळिकाळ यमाचे भार पळाले तेथें ॥२॥ ह्मणोनि नाम वज्रकवच तोचि निर्गुणाचा अभ्यास । पाहेपां स्वयें प्रकाश विचारूनी । ऐसें सुंदर रुपडें हृदयीं धरिलें आतां । पाहातां केंवि होये पुर्णयोनि रया ॥३॥ ऐसा सकळां अकळ कळला । हृदयीं धरिला समताबुद्धी । बापरखुमादेविवरु विठ्ठलु चिंतितां।तुटली जन्माची आधि व्याधि रया ॥४॥

२७८. **अशौचिया जपों नये** । आणिकांतें ऐकों नये । ऐसिया मंत्रातें जग बिहे । त्याचें फळणें थोडें परि क्षोभणें बहु । तैसा मंत्रराज नव्हेरेरे ॥१॥ नारायण नाम नारायण नाम । नारायण नाम झणत्कारे रे ॥ध्रु०॥ बाह्य उभारावी त्यावरी काहाळ लावावी । गातिया ऐकतिया उणीव येवों नेदावी । उत्तमापासुनि अंत्यजवरी । मुक्तीची सेल मागावीरेरे ॥३॥ काय करील यागें न सिणावें योगें हें तों व्यसनचि वाउगें । नरहरि नरहरि उदंडा वाचा ह्मणाल तरि कळिकाळ राहेल उगेरेरे ॥४॥ चरणीं गंगा जन्मली अहिल्या उद्धरली नामें प्रतिष्ठा पावली गिरिजा । सकळिकां साधना वरिष्ठ हें नाम मा मनीं भाव न धरी दुजारेरे ॥५॥ तीर्थीं भजिजाल अमरीं पूजिजाल तुमचिया भावासारिखा देवो होईल । बापरखुमादेविवरु विठ्ठलु तुमचा ऋणवई ह्मणतां नलजैलेरेरे ॥६॥

२७९. **जिव्हेच्या निडळी नामाक्षराची बोळी** । कान्हो वनमाळी या बोजा ॥१॥ लेहोन घाली पान-पुसती जैसी । भलतिये रसीं बुडी दे कां ॥२॥ माझे डोळसमजी सुनिळ सहजी । होय तूं बिजीं बाहुलिये ॥३॥ ऐसि वाचा दृष्टी नामरूपें आथिली । वासनेवरी वहिली उठो दे कां ॥४॥ तुझें उठिलेंपण आम्हां होवावें निकें । तरी गोसावी पाइकेंसि यावें किजी ॥५॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु आंतु बाहेरी सुखें । तरी तुजसी म्यां एकें नांदावें किजी ॥६॥

२८०. **रसने बोरसु मातृके वो माये** ॥१॥ रमणिये माये रमणिये । रामनामांमृत रस पी जिव्हे ॥२॥ निवृत्तिदासाप्रिय । माय रमणिये माय रमणिये ॥३॥

२८१. **सकळ धर्मांचें कारण** । नामस्मरण हरिकीर्तन । दया क्षमा समाधान । संतजन साधिती ॥१॥ निजधर्म हा चोखडा । नाम उच्चारु घडघडां । भुक्तिमुक्तीचा संगवडा । हा भवसिंधुतारक ॥२॥ लावण्य मान्यता विद्यावंत । सखे स्वजन पुत्रकलत्र । विषयभोग वयसा व्यर्थ । देहासाहित मरणांतीं ॥३॥ जें जें देखणें सकळ । तें हें स्वप्नींचें मृगजळ । म्हणोनि चिंती चरणकमळ । रखुमादेविवर विठ्ठलाचें ॥४॥

२८२. **माझ्या कान्हाचें तुम्हीं नांव भरी घ्यावो** । हृदयीं धरोनि यासी खेळावया न्यावो ॥१॥ भक्तांकारणें येणें घेतलीसे आळी । दहा गर्भवास सोशी वनमाळी ॥२॥ कल्पनेविरहित भलतया मागे । अभिमान सांडुनी दीनापाठी लागे ॥३॥ शोषिली पुतना येणें मोडियेले तरू । आळी न संडी बापरखुमादेविवरु ॥४॥

२८३. **सार सार सार विठोबा नाम तुझें सार** । ह्मणोनि शूळपाणी जपताहे वारंवार ॥१॥ आदि मध्य अंतीं निजबीज ओंकार । ध्रुव प्रल्हाद अंबऋषी मानिला निर्धार ॥२॥ भुक्तिमुक्तिसुखदायक साचार । पतीत अज्ञान जीव तरले अपार ॥३॥ दिवसेंदिवस व्यर्थ जात संसार । बापरखुमादेविवर विठ्ठलाचा आधार ॥४॥

२८४. **हरि आलारे हरि आलारे** । संतसंगें ब्रह्मांनदु जालारे ॥१॥ हरि येथेंरे हरि तेथेंरे । हरिवांचूनि न दिसे रितेंरे ॥२॥ हरि पाहींरे हरि ध्याईरे । हरिवांचूनि दुजें नाहींरे ॥३॥ हरि वाचेरे हरि नाचेरे । हरि पाहातां आनंदु साचेरे ॥४॥ हरि आदींरे हरि अंतींरे । हरि व्यापकु सर्वांभूतींरे ॥५॥ हरि जाणोरे हरि वानारे । बापरखुमादेविवरु राणारे ॥६॥

२८५. **रामकृष्ण गोविंदाचें नामस्मरण वाचे** । घडिये घडिये साचें ध्यान श्रीविठ्ठलाचें ॥१॥ एकनाम आठवितां दुतां पडियेली चिंता । नाम आनंदें गातां पाविजे सायुज्यता ॥२॥ तिहीं लोकीं नाम थोर वेदशास्त्रांचें सार । सगुण निर्गुणाकार निज ब्रह्म सार ॥३॥ बापरखुमादेविवरु कृपाळु उदारु । नामस्मरणें पारु उतरी हा निर्धारु ॥४॥

२८६. **पन्नास अक्षरीं करिसी भरोवरी** । शेखीं तुझें तोंड तुज वैरी रया ॥१॥ या परी नामाची वोळ हे मांडुनी । संसार दवडुनि घालीं परता ॥२॥ रकारा पुढें एक मकार मांडी कां । उतरसी समतुका शुंभूचीया ॥३॥ बापरखुमादेविवरा विठ्ठलु हृदयीं । आपुली आण वाही त्रिभुवनीं रया ॥४॥

२८७. **सकळ नेणोनियां आन** । एक विठ्ठलुचि जाण ॥१॥ पुढती पुढती मन । एकला विठ्ठलुचि जाण ॥२॥ हेचि गुरुगम्याची

खूण । एक विठ्ठलुचि जाण ॥३॥ बुझासि तरि बूझ निर्वाण । एकला विठ्ठलुचि जाण ॥४॥ हेचि भक्ति हेंचि ज्ञान । एकला विठ्ठलुचि जाण ॥५॥ बापरखुमादविवरा विठ्ठलाचि आण । एक विठ्ठलूचि जाण॥६॥

२८८. **आपुलेंनि रंगें येती होती साजणी** । तंव एकें वनवासीं आळंगिलेंगे माये ॥१॥ बोलेना बोलों देईना । तेथें पाहणें तें अवघे पारुषलेंगे माये ॥२॥ आपुलें केलें कांहीं नचले वो आतां । बापरुखुमादेविवरा विठ्ठला देखतां ॥३॥

२८९. **गाते श्रोते आणि पाहाते**। चतुर विनोदि दुश्चिते । सोहंभावीं पूर्ण ज्ञाते । या सकळांतें विनवणी ॥१॥ करा विठ्ठलस्मरण । नामरूपीं अनुसंधान । जाणोनि भक्तां भवलक्षण । जघनप्रमाण दावितो ॥२॥ पुंडलीकाच्या भावार्थी । गोकुळींहुनी जाला येता । निजप्रेमभक्ति भक्तां । घ्या घ्या आतां ह्मणतसे ॥३॥ मी माझें आणि तुझें । न धरीं टाकीं परतें ओझें । भावबळें फळती बिजें । बापरखुमादेविवरु विठ्ठलीं ॥४॥

२९०. **निजानंद हें पैं ब्रह्म** । ऐसें जाणती योगी वर्म ॥१॥ विठ्ठल विठ्ठल स्मरे मना । चुके संसारदर्शना ॥२॥ रखुमादेविवरावांचुन । कवण पुरविल जिवींची खुण ॥३॥

२९१. **शिव भवानी उपदेशी प्राणप्रिये** । निजमानसीं ध्याये परमानंदु पाहे ॥१॥ रामु सखा हरि रामु सखा । रामु सखा हरि रामु सखा ॥२॥ सहस्र नामावरी कळसु साजे । तोचि तो अंतरीं बाहिजु भीतरीं ॥३॥ हेंचि निजधर्म हेंचि निजकर्म । हेंचि परब्रह्म वर्म हेंचि एकु ॥४॥ जिवांचें जीवन मनाचें मोहन। सुखाचें साधन भक्तिज्ञानाचें अंजन ॥५॥ बापरखुमादेविवरु सुलभु साकारु । अर्धमातृका अक्षरु चिदानंदु सुख थोरु ॥६॥

२९२. **सदा परिपूर्ण** । तो हा जनार्जन । नित्य जपतां नारायण। कोटि याग घडतील ॥१॥एवढा महिमा नामाचा । काय मंत्र जपसील वाचा । जो विठ्ठल म्हणे तो दैवाचा । ऐसा ब्रह्मा बोले पूर्वी ॥२॥ तो नित्यकाळ पंढरी । आणि देव तेहतीस कोटी । वृक्ष जाले निरंतरीं । उद्धार करावया कुळाचा ॥३॥ एवढें क्षेत्र पांडुरंग।

तेथें उद्धरिलें हें त्रिजग । आनंदत ब्राह्मण याग । कोटिकुळें उद्धरती ॥४॥ कीर्तन केलीया वाळवंटी । घेतां वैष्णवांची भेटी । होईल संसाराची तुटी । चरणरज वंदितां ॥५॥ तुळशीच्या माळा । घालितां हरिदासाच्या गळां । तो न भिये कळिकाळा । त्यासी जिव्हाळा हरिविठ्ठल ॥६॥ पंढरीसी जाऊं ह्मणती । तयांकडे यम न पाहती । तयांचे पूर्वज उद्धरती । म्हणती वैकुंठा जाऊं आतां ॥७॥ देव जाणे ऐसा । तोचि हरिदास भरंवसा । ज्ञानदेव म्हणे परियेसा थोर पुण्य तयाचें ॥८॥

२९३. **विठ्ठलु नाहीं जये शरीरीं** । वाया कांगा जन्मले संसारीं । विठ्ठलु नाहीं जये नगरीं । तें अरण्य जाणावें ॥१॥ विठ्ठलु नाहीं जये देशीं । स्मशान भूमी ते परियेसी । रविशशिवीण दिशा जैसी । रसना तैसी विठ्ठलेंवीण ॥२॥ विठ्ठलावेगळें जितुकें वर्म । विठ्ठला वेगळा जितुका धर्म । विठ्ठला वेगळें बोलती ब्रह्म । तितुकाही श्रम जाणावा ॥३॥ सच्चिदानंदघन । पंढरिये परिपूर्ण । कर ठेवोनियां जघन । वाट पाहे भक्तांची ॥४॥ विठ्ठलेंविण देवो ह्मणती । ते संसार पुढती पावती । विठ्ठलाविण तृप्ती । नाहीं प्रतीविठ्ठलेंविण ॥५॥ श्रीगुरुनिवृत्तीनें दिधलें । तें प्रेम कोणे भाग्यें लाधलें । बापरखुमादेविवर विठ्ठलें दिधलें । ऐसें केलें ज्ञानदेवा ॥६॥

२९४. ॥ **ॐनमोभगवतेवासुदेवाया** ॥ **वो**ाडियाणा बंदु देहुडा घालुनि लागसील पा**वो** । **वो**तप्रोत मना सांडुनि धरिसी अहंभा**वो** । ॐकार बिंदुचा न पवसि ठा**वो** । **वो**ळगे वोळगे कृष्णद्वारावतिये रा**वो** ॥१॥ ॐनमोभगवतेवासुदेवाया । द्वादशाक्षरी मंत्र न जपसि काह्या ॥२॥ **ना**गिणि उत्सोहं नवहि द्वारें निरोधु**न** । **ना**डित्रयामाजि सुषुम्नासंचर**ण** । **न** साधे हा मार्ग ऐसे बोलती मुनिज**न** । **न**रहरि चिंतनें अहर्निशि मुक्तिस्था**न** ॥२॥ **मो**डिसि करचरण तेणें पावसी अंत स**मो** । **मो**हो तृष्णा न तुटे ब्रह्मविद्या केविं ग**मो** । **मो**ठा हा अन्यावो जे हरिचरणीं नाहीं न**मो** । **मो**क्षाची चाड तरी मुकुंदीं मन र**मो** ॥३॥ **भां**बावसी ह्मणे हें शरीर कर्दळीस्तं**भ** । **भ**स्म क्रमि विष्ठा उभें आहे तों सुशो**भ** । **भा**विता किटकी जाली भृंगी

तिया क्रामिलें नभ। भावें भाक्ति सुलभ वोळगा वोळगा पद्मनाभ ॥४॥ गति मती इंद्रियें जव आहेती समयोग। गणित आयुष्य न पुरे जंव हे न वचे भंग। गमला हाचि योग जे अनुसरावा श्रीरंग ॥ गरुडध्वज-प्रसादें निस्तरिजे भवतरंग ॥५॥ वनिं सिंह वसतां गजीं मदु केवीं धरावा। वन्हिदग्धबीज त्यासि अंकुर केंवि फुटावा। वज्रपाणी कोपलिया गिरीं उदधि केविं लंघावा। वदनीं हरि न उच्चारा तेणें संसार केविं भुंजावा ॥६॥ तेज नयनींचा भानु जेणें तेजें मीनले ते। त्याचे मानसिचा चंद्रमा तो सिंपोते अमृतें। त्याचे नाभिकमळीं ब्रह्मा तेणें सृजिलीं सकळही भूतें। तें विराटस्वरूप वोळखावें विष्णुभक्तें ॥७॥ वाताघातें फुटे गगनीं मेघाचा मेळावा। वारिबिंदु पद्मिणिपत्रीं केवीं हो ठेवावा। वानराच्या हातीं चिंतामणी केविं द्यावा। वासुदेव चिंतनें तोचि कल्मशा उठावा ॥८॥ सूक्ष्म स्थूल भूतें चाळिताहे परमू हंसू। शूळपाणी देवोदेवि जयाचारे अंशु। शुभाशुभीं कर्मीं न करि नामाचा आळसु। सुखें निरंतरी ध्याई ध्याई हृषिकेशु ॥९॥ देव होऊनी उदार भक्तां देतो अमरपदें। देता न ह्मणे सानाथोर वैरियासि तेंचि दे। देहे सार्थक अंति वासुदेव अघ छंदें। देखा अजामेळ उद्धरिला नामें येणें मुकुंदें ॥१०॥ वाडा सायासि मनुष्यजन्म पाववा। वियाला पुरुषार्थ तो कां वायां दवडावा। वाचामनें करुनि मुरारी वोळगावा। व्रतें एकादशी करूनि परलोक ठाकावा ॥११॥ या धनाचा न धरी विश्वास जैशी तरुवर छाया। यातायाती न चुके तरी हे भोगिसील काह्यां। या हरिभजनेंविण तुझें जन्म जातें वायां। यालागीं वैकुंठनाथाच्या तूं चिंती पारे पायां ॥१२॥ इहींच द्वादशाक्षरीं ध्रुव अढळ पद पावला। प्रल्हाद रक्षिला अग्निशस्त्रापासुनि जळा। बापरखुमादेविवरु विठ्ठलु तुह्मी ध्यारे वेळोवेळां। तो कळिकाळापासुनी सोडविल अवलीला ॥ १३ ॥

---

## देवापाशीं प्रेमाचें भाषण.

२९५. तुज पासाव जन्मलों हरी पुढती सामावलों तुझ्या उदरीं। तुझिया व्यापकपणें चाले सत्कर्माची दोरी। सायीखडियाचें बाहुलें

कैसें हावभाव धरी । सूर्यकांत वेधें अग्नीच प्रसवे सहजे समंधु ऐसा धरी रया ॥१॥ तुझें तुज देवा सांगतां निकें। समर्थंसि केविं बोलावें रंकें ॥धु०॥ अहंकार महदादि भूतें तेणें गुणेंसि आलीं तें चैतन्य-नयनीं अधिष्ठिलीं। सर्व शरिरीं वायो व्यापिला कीं पृथ्वीसि मिळोनि आकाशा भरोवरी जाली । ते हे स्थूळ लिंग कारण तिहीं तत्त्वेंसी प्रकृति अथिली रया ॥२॥ सर्व होणें तुज एकाचें । दुजेपण तेथें आणावें कैचें ॥धु०॥ चंद्रमा मनःचक्षुसूर्योदिशाश्रोत्रः अकार उकार मकार प्रणवो । मन बुद्धि चित्त अहंकार ब्रह्मा विष्णु महेश राजस तामस सात्विक माया ब्रह्मींचा दावी पा उपावो । तुजवेगळें काय आहे तें सांग पां तरि मज कां ह्मणवितासि जिऊ रया ॥३॥ जेथें पाहें तेथें तूंचि दिससी । लपोनियां अबोला कासया धरिसी ॥धु०॥ रसना रस सेवावे हे तो जीव आत्म्याची स्थिती । श्रवणीं ऐकणें कीं नेत्रीं देखणें हे तो तुझीच नाद श्रुती । घ्राणासि परिमळ घेणें कीं हस्तपादादिकां चळणगती । हे तों तुझींच पांचै तत्त्वें तरी तूं मज कां भोगवितोसि यातायाती रया ॥४॥ लाजेसि ना तूं देवा माझें ह्मणतां । संन्याशासवें कैंचीरे कांता ॥धु०॥ इंद्रियें दारुणें जीव आत्मयासी हे तो सुखदुःख प्राप्ती । तेणें हें कारण कीं आत्मा पावे यातायाती । इंद्रियें दंडून तप जें करावें ऐसें बोलती वेद श्रुती । साहीजणांसि तो वेवाद लाविला हे तो तुझीच करणी सांगती रया ॥५॥ दुजेंविण एकला खेळतो स्वारी । कवणातें जय कवणा आली हरी ॥धु०॥ अंगें ब्रह्म जालासि उत्पत्ती करावया सृष्टी। ते समयीं ते रचिली विषयांची कसवटी। ऐसे तुझें वालभ मिर-ऊं जाय सृष्टीं । तंव सुखदुःख लागतसे पाठीं । येथें काय माझा अपराध जाणसी तरि शस्त्रेंसि मान निवटीं रया ॥६॥ सगुण रचना वोजा विस्तारिली । भुजंगी व्याली तिची काय झाली पिलीं ॥धु०॥ वेद प्रमाण करावया कारण कीं कृष्णमूर्तिची बुंथी घेणें । अनंत-ब्रह्मादिकांसि आदि वंद्य तो तूं राखसी गौळियाचीं गोधनें । अंब-ऋषीकारणें गर्भवास साहिले कीं अजामिळादिकांसि उद्धरणें । वैरियां भक्तां येकिचि मुक्ती मा समर्थु नाहीं येणें मानें रया ॥७॥

अनंत ब्रह्मांडे घडिसी मोडिसी । अकर्तेपणें जैसा तैसा अससी ॥ध्रु०॥ एक वीरा माय मारावी कीं गणिका उद्धरावी हे कवण प्रवृत्ती । दशरथपिता रौरवीं कीं वैरिया सायुज्यता मुक्ती । कर्मभ्रष्ट पांडव सरते केले कीं अज्ञानासि मोक्षप्राप्ती । शास्त्रें पुराणें वारूं जाय तंव अधिक पडतसें गुंती रया ॥८॥ सुताचें गुंडाळें उगवीं पा वहिलें । खडूनियां सांडी देवा एकाचि बोले ॥ध्रु०॥ मिथ्या हा प्रपंच कीं दर्पणींचें दुजे जळीं बिंब प्रकाशे । एक साचें दुजें दिसे तैसेंचि दुसरें कां प्रतिभासे । लटिकें ह्मणों जाय तंव तेथें मन कां विश्वासे । सगुण निर्गुण हे तों तुझीच माया तुझी तुजमाजी दिसे रया ॥९॥ अर्धनारी सोंग पाहतां निकें । साच लपऊनि दावितो लटिके ॥ध्रु०॥ सिद्धासी साधन हे तों कष्टचि वायांविण । अनंत प्रत्यक्ष जाणोन कायसें परिमाण । स्वयंभासि प्रतिष्ठा करणें हें तों देखतचि अज्ञानपण । निजबिंबामाजी प्रतिबिंब बिंबलें तैसें सगुण निर्गुण तुजमाजी रया ॥१०॥ सहजसिद्ध तें तूं आपणपैं पाहीं । बाहिजु भीतरी ये दोन्हीं नाहीं ॥ध्रु०॥ विश्वरूप अळंकारलें कीं मुसें आटली भांगारें । अथवा घटमटादिकीं अभावीं परिपूर्ण असिजे अंबरें । उदकीं पडिला कारिमरा तो नागवे निरा तो न सरे । दुसरेपणें तैसा आदि मध्य अंतीं हृदयींचा जाणोनि पूर्णबोधेविण द्वैत न सरे रया ॥११॥ सच्चिदानंदरूप तत्वता । लटिकेंचि बंधन बंधना मुक्ता ॥ध्रू०॥ ह्मणसी माझा संकल्प फळला तरि म्यां दुःख नाहीं इच्छिलें । अवघा तुझा खेळ बहुरूप असें विस्तारलें । जाणसी तें करी देवातें तुझें तुज पुढा सांगितलें । तेथ काय माझा अपराध देखसी तरी देह कां नाहीं खांडिले ॥१२॥ पुरे पुरे आतां जड जालें जिणें । उरी नाहीं देवा लाजिरवाणें ॥ध्रु०॥ ऐसीं इंद्रियें वासनेसी आणीजती ते तुझी तुजमाजी सामावती । समस्त जीव हे तो तुझे आकारलें येरी ते लटकीच भ्रांती । जाणसी तें करीं देवा तेचि तें सांगों किती । दग्धबीज तरु बीजीं सांमावला तैसा तुजमाजी श्रीगुरुनिवृत्ति रया ॥१३॥ ऐक्य जालें तेथें नित्य दिवाळी । सहज समाधि तेथें कायसिरे टाळी ॥ध्रु०॥

२९६. **सर्व जीव तूं जालासी आपण** तरी निरय आरदा भोगि-

ताहे कवण । परमात्मया तुमचें अविनाश स्वरूप तरी येवढें कां कष्ट साधन । तूं अंतरीं परब्रह्म सांवळें ह्मणोनि जगत्रय व्यापिलें या ध्यानें । ह्मणोनि तुमचा पुत्र जालों स्वामिया जगाधिन कां केलें माझें जिणें रया ॥१॥ तूं बाप ह्मणतां मी लाजिलों लाजोनि माघारा ठेलों। एकीकडे काळ एकीकडे संसार मध्येंची वाटे मी ठेलों । ऐसिया संनिधि तुज जवळी येवों पाहे तंव तुझीया देवपणा भ्यालों ॥२॥ नादबिंदापासाव शरीर जन्मलें असाध्य करूनी वरी साक्ष देऊनी मदामांसामाजी वाढविलें । कर्मदेह वेचुनी सत्य सुकृतालागि उपजविलें तरी हें दैन्य दारिद्र कां भोगाविलें । तुझिया बापपणा बोलु लागला तरी मज पुत्रसें वांया ह्मणितलें रया ॥३॥ आयुष्याची गणना करूनियां प्रमाण वरी मनुष्य देह ऐसें नाम ठेविलें । तें आयुष्य कां स्वामी दों ठायीं वाटिलें । अर्ध रात्रीचे अर्ध दिवसाचे निरय सत्व वेचिलें । पैल समर्थाचें बालक रंकें गांजिलें त्याचें थोरपण तें काय जालें रया ॥४॥ बांधोनी जन्म आह्मांकडे भोगविसी आपणया मायबापा ह्मणविसी । विश्व प्रसवला या जगासी तरी आधारु आहे ऐसें अनुवादसी । जत्र जीव तत्र शिव हें तों नये माझिया मनासी । पैल कीटकिये मृंगिये जैसी जाले तैसें कां न करिसी आह्मांसीरे ॥५॥ अल्प दोषासाठीं आह्मांतें दंडिसी येवढें कैचें मंत्रसाधन जे भक्ति करूनि निरसूं तयासी । तुज देखतां काळ शरीर फाढफाडूं भक्षिताहे कणव कां सांडिली ऐसी । जठर सीणसीणु फुटतील देवां वायां कष्टविसिल आह्मांसिरे ॥६॥ दर्पणीं पाहतां येकचि दिसे तेथें अनुसारिखें कांहीं न दिसे । रविबिंब उगवलिया किरणीं प्रकाश आस्तु जालियावरी कांहीं न दिसे । तैसे गुरुशिष्य संवादु सोहं बोध ऐक्य जालें अभ्यासें । याहूनि जाणसी तें करि वेळोवेळां आतां सांगों मी तें कैसें रया ॥७॥ यमा जाचितां कांहीं नुरे यालागीं मुनि सेविती वनवासु । खवणीक खपणीक लुंचनीक वसैत भटभराडे धाकें करिती आगम संन्यासु । योग साधावया वनवास सेविती करिती पवनअभ्यासु । इंद्रियें दंडुन परतोनि भृगस्थान न

पवतीच खंडु पानरसु रया ॥८॥ जळींचा तरंगु जळीं निमाला तो अनुठाया वेगळा नाहीं गेला । तैसा तुजमाजी दातारा मध्यें कां हा प्रपंच वाढविला । तूं देव आम्ही प्राकृत मनुष्यें हा आगमु कां गमला । मज पाहतां हें अवघेंचि लटिकें जैसें असेल तैसें सांग पां उगला ॥९॥ लवण पाणीयासी कीं पाणी लवणासी ऐक्य जालियाविण निवडेना गुणासि । लोहो लागलें परिसीं तें उठिलें कनकेंसी बापरखुमादेविवरा विठ्ठला परियेसी । आजिपासून ये तरी तुझीच आण पुढती न घाली न निघें गर्भवासीं रया ॥१०॥

२९७. **देखोनि हांव बांधे तें तंव नाहीं होये** । आहे तें कही न जायरे बापा । असें तें दिसों नये नाहीं तें घेवों पाहे थोर काजेविण विटंबिलें कैसें रया ॥१॥ शिव शिव लटिकेंचि शिणले । येणें लटिकेंनि बहु श्रमविलें । साच तें लटिकें लटिकें तें साच लिंगा हे खुण जाण रया ॥२॥ आपुली प्रतिष्ठा पूज्य जे होती । ईहीं गुणीं आह्मां उपहति बापा । मनाचा फाळका फाळुनि केला बाउला तोचि तो खेळवूं किती रया ॥३॥ आपुले युक्तीचे वाति वेऱ्ही गिवसीतां त्या पदार्थाचे पोटीं लपती रया । तें सांडुनियां अभिप्रायाचें बळ निजतत्वीं तें केवीं निवती रया ॥४॥ निज लाळा लिंपोनि जुन्या हस्ति श्वान चघळूनि करितसे गोड रया । तैसा जातिविशेषें निरसे म्हणोनि पुरवुनि करितसे कोड रया ॥५॥ हातां पायांचा निखळ स्त्रीपुरुषांचा एक मेळ । देह ऐसा यातें ह्मणती बापा आपण पैं जगा प्रतीति मानवपणें हें तंव चिळसवाणें रया ॥६॥ मायबापें आडनांवें त्यांचिया वोसंगा । निघों म्हणों तरि आपुलिये साउलिये कां न बैसावें रया ॥७॥ प्रजाचें पोसिलें पुढें पाइकाचें रक्षिलें । इंद्रियांचें वोळगणें तें काळाचें खेळणें । जगीं राय बोलिजति आतां गोसावी कवणातें म्हणावें रया ॥८॥ मृगजळ तंव मृगजळींच भरतें देखोनि धांवणें तंव सीणणें । या परि ह्मणी करिसि सदाशिवा जगा प्रतीति पावउनि झकणें रया ॥९॥ आतां असो हा बोलु तूं एक गोसावी साच येतुलेनि आम्हां उजरीकोटि स्वप्न एक चेईलिया । कैचें ज्ञानदेव म्हणे ऐसें करी रया ॥१०॥

२९८. **तूं विष्णु ह्मणोन हें जगाचि केवळ** । येर सकळीक मजशीं सहोदर । तेणें कारणें गोत्रेंसि येकोपजिवीं आह्मां न संडवे कोडें रया । माहेरावांचूनि आन कांहीं नेणें । माहेर तें उपजवी तरंगाचें जीवन । तोय वरी सामावे वेगळालें असिजेल केविं रया ॥१॥ उदरीं सिनार घरदारीं सिनार सिनार दृश्य द्रष्टा । करी त्या मायबापाचेनि उद्वेगें । मी तो सांगोनियां आलों तुझिया पोटा रया ॥२॥ अंगें ब्रह्म झाला तें तुवां वो जाणितलें । परि तो आविये घायतळीं सुदला । ते तूं मजलागीं नेणसीच माउलिये आपुठे पान्हाये वाडविलें रया ॥३॥ तंवाचि मी जालों परि उदर न भेदीत जननीये जोडले ना वाटी । चक्षु पक्ष निघाले मज तुझाचि वाहाणी ह्मणोनि सामावलों तुझ्या पोटीं रया ॥४॥ ऐशापरि तुह्मां सम सरिसा जालों परि तो नामें वोळखिजे । मी तो बाळ कीं मी तो वृद्ध ऐसें अनन्यपणें लोक कीजे रया ॥५॥ चेवो तरि स्वप्न स्वप्न तरि चेवो माय पुता नेणें ऐसें माझें तुझें । आपलें आपण ह्मणतां लाजिजे नमो नमो तुज व्याली वांझे रया ॥६॥ आयुर्वित भव विभव जगीं जिवा निढळीं लिहिलें । अलक्ष तें मज नेणतया अजंगमा लागुनि पुसोनि घातलें मूळ सानु रया ॥७॥ दृष्टिभेणें रूपा नये काळा भेणें नामाची सोय सांडियेली । तुझ्या रूपीं सर्व रूप स्वरूप होउनियां दिठी उतरिलिया परि रया ॥८॥ आपुलें वित्त आपणा देखतांचि शांकिजे त्या विभागाची केउती परी । बापरखुमादेविवरा विठ्ठला तूं येक सचराचरीं रया ॥९॥

२९९. **सर्वगत निर्धारितां आत्मा एक** चराचरीं तेथें तंव नाहीं दुजेयाची परी । चारी खाणी चारी वाणी चौऱ्यांयशीं लक्ष जीव योनी मी अपत्य तुमचें अवधारीं । तुझिये भेटीलागीं रोडेलों दातारा हे तनु होतसे संकीर्ण भारी । जवळीच असतां भेटि कां न दिसी थोर शिणविलों वोरबारीं रया ॥१॥ तुजविण मी कष्टलों दातारा कष्टोनि क्षेदक्षीण जालों । संसारश्रम लिविधतमें मार्ग सिद्धचि चुकलों । उपजोनियां बुद्धि येऊं पाहे तुझे शुद्धी तंव द्वैतसंगें भांबावलों रया ॥ध्रु०॥ मागील कष्ट सांगतां दुर्घट नको नको ते आठवण ।

सुखदु:खें प्राण पिडला गा बापा गुणत्रयें ओझें जडपण । भव विभव निरय आपदा ऐसें ऐकिलें आनेआन । तूं हे जीव तरी भोगितां हे कवण हे आकळितां वाटे विंदान रया ॥२॥ वेळावेळ भावाभाव बोलतां अवचितां चोरटा काम उठी । तुज देखतां अनादि वाटे पडे वधापरी धैर्य धांवणें न करिसी गोष्टी । तुझिये दृष्टी शरीर काळ फाडफाडूं खातो कवण काकुलती तया ना तुज तुटी । ऐसें विपरीत नवल वाटे ये सृष्टी रया ॥३॥ ऐसा न कळतां भरंवसा मी हिंडे दाही दिशा हें तंव मन जालेंसे पिसें । असोयी जातां अपायीं पडिजे श्वास उच्छ्वास पाळती सरिसे । वय वित्तांचा अंत घेउनि नाडळेपण परत्र पथ नकळे भरंवसें । कर्म वाटे आड गर्वें रिगतां तंव विघ्नचि उदैलें अपैसें रया ॥४॥ ऐसी माया मोहाची भुलवणी घालुनि कीं बापा लाविलें अविचार कामा । उपाधि वळसा नाथिला धिंवसा जड केला शुद्ध आत्मा । मी तूं कवणाचें विंदान न कळेचि ऐसी नित निगुति सीमा । तर्कबीज कैसें सांपडलें वर्म मा हाचि भावो कल्पिला आम्हां रया ॥५॥ ऐसा वाउगाचि सोसु पुरला गा बापा परि तूज न पडसी ठाउका । साही दरुशणां अठरा पुराणां वेवादु नाहीं खुंटला । आपुलाला स्वमार्गु संपादितां केउतां जासी गावींचा गावीं । विश्वास नाहीं चित्ता ये देहीं ऐसियासी कीजे कायि रया ॥६॥ ऐसा जन्मोनि कां उबगलासी मायबापा कणव कां सांडिली ऐसी । रंका काळाचेनि धाकें सत्कर्मी अनेकें विश्रांति नाहीं या जीवांसी । समर्थपणें वेगळें घातलें तरि दैन्य दारिद्र कां भोगवितासी । आपुलें ह्मणतां न लजसी देवा तरि सांगपां माव आहे कैसी रया ॥७॥ समुद्रांचें जळ घेऊनि मेघ वरुषती मेदिनीं तें कां मागुतें मिळे सागरीं । आकाशा पासाव उत्पत्ति वायु हिंडे दशदिशीं परि तें ठायींच्या ठायीं राहणें जालें । जळींहूनि तरंग अनेक उमटती परि ते जळींचे जळीं निमाले । स्वप्नसंगें परदेशा गेले तरी जागृती ठायीं संचले रया ॥८॥ ऐसा तुज पासाव सगुण स्वरूप जन्मलों गा देवा आतां कैसेनि वेगळा निवडे । लवण पडिलें जळीं कीं कर्पूरासि तुरे काजळी तैसें भावार्थ प्रेम चोखडें ॥ ज्ञानदेव ह्मणे रुक्मिणीरमणा देई क्षेम वर्म न बोले फुडें । निवृत्तिप्रसादें खुंटला अनुवादु फिटलें सकळही सांकडें रया ॥९॥

**३००. आदि पुरुषा जय विश्वंभरिता नानापरि तुझा खेळु ।** जया ब्रह्मगोळु कल्पकोडी गडी मोडिता नलगे वेळु । वेदपुराणें मत्सरें भांड़ती बहुते करित होती कोल्हाळु । होय नव्हे ऐसी भ्रांतिसी गुंतली तयासि तूं आकळु गा ॥१॥ तुझें नाम बरवें तुझें नाम बरवें। हरि वोळगों आपुल्या साच भावें ॥धु०॥ गायत्री पासाव वोळलें क्षीर करणी पासाव विस्तारु । दूध दहीं ताक नवनीत आगळे चहूंचा वेगळा पडिभरु । जो ज्या विषयें पाढिये तोचि मानिती थोरु । सांठवण करितां एकवट नव्हे तैसा भक्तिआचारू ॥२॥ कवणा एका राया बहुत पैं सेवक त्यासि दिधला वेगळा व्यापारु । आपलाले ह्मणिये सुचित राहाटतां मान करील अपारु । समर्थाचा मोहो जाणोनि वेगळा करूं नये तयासि मत्सरु । साभिलाषपणें वर्णतां देखेल शिक लाविल हा निर्धारु ॥३॥ कव्हणा एका राया बहुत पैं लेंकुरें आळविती नानापरी । एकें पाठीचीं एकें पोटीचीं एकें वडिलें एकें धाकटीं सेखीं सारिखाचि मोहो करी । द्वैतभेदु जया नव्हे संवादु सेखीं तयासि तो निर्धारी गा ॥४॥ सागरींचे तरंग आनेआन उमटती तेतुले अवतार होती । शिव केशव उंचनीच आगळे कासियानें मानावी भक्ति । परमात्मया सौरसें तेचि हे मानली विश्वमूर्ति । बापरखुमादेविवरा विठ्ठला परियेसी ज्ञानदेवो करिताहे विनंती गा ॥५॥

**३०१. यम नियम पाप पुण्य आम्हांसी** आपण भलतोंचि करिसी । तुझिया थोरपणा बिहुनि असावें कवणें शंकावें रायासी । प्रत्यक्ष जगीं बाटली नारी तिचें स्मरण लोकांसी । पुराणें डांगोरा पिटिताती हें पतिव्रता पण तयेसी ॥१॥ आवडे तें करिसी देवा कवण करी तुझा हेवारे ॥धु०॥ बहुता परी·उणें ऐकिजे पांडवा सांगो या गोष्टी । पांचापासुनि जन्मले पांचैजण येक पत्नीच्या पोटीं । गोत्रवध करुनि राज्य करिती विश्वासि वंद्य शेवटीं । जन्मेजया ऐसें बोलिला सत्य तो पापिया जाला कुष्टी ॥२॥ प्राण जाई तंव बोभाइला तुज पतन तया दशरथा । गणिका एक पाखिरु पोखिलें होतें पाचारिलें प्राण जातां । कीं तयेसी ऊर्ध्वगति ऐसीं बोलती पुराणें कासया न मिळे पाहतां । बोलणें खुंटलें तुजपासीं देवा वे-

व्हारु नाहीं सर्वथा ॥४॥ तपाचा जो राशी पुण्यपणें थोर । तीर्थरूप सर्वां तीर्थांमंलाचा अवतार । देव आणि शकती सूर्य तैसा विचारितां । तो मांडव्य ऋषि वाहिला सुळीं एक ऊजाला वधिता। पुत्रा पाचारिलें पापियें दुर्जनें तो वैकुंठी आजामेळु सरतारेरे ॥५॥ यज्ञ मुखीं अवदानें देती त्या करिसीं वांकडें तोंड । लोणी चोरावया जासी घरघरीं उघडिसी त्यांचीं कवाडें । छप्पन कोटि यादव संगती हे तुझे ते त्वां केले शापावरपडे । कोळियानें तुज विंधिलें पायीं त्यासी सायुज्यता कोडेंरे ॥६॥ अष्टांगयोगें शरीर दंडिलें तुजलागीं जाली पिसी। पुत्रदाराधन सांडूनियां जन हिंडताती वनवासी । घाती वाती पूजिती तूंतें त्यांसि निजपद सायासीं । विष पाजूं आली पूतना राक्षसी सायुज्यता देणें तियेसि रया ॥७॥ वारया मोट बांधेल कोण आकाशा कुंप कायसा । सूर्यापुढें दिवा लाऊनियां चालणें वाऊगाची शिण जैसा। विचित्र तुझें रूप अव्हेरून जासी सर्वज्ञा । ज्ञानदेव ह्मणे देवादिदेवा जग भांबावलें ऐशीया मावा रया ॥८॥

३०२. देवा तुज नेणतांना कांहीं न सांभाळितां नानायाति धरुनी धाविन्नलों । धावतां धावतां पुढें सुनाट देखिलें त्याचि पाउलीं मागुती मुरुडलोंजी सुंदरा ॥१॥ आलों भक्तिशाळे अतौता तेथें कांहींएक गौरव गमलें । जेणें वेषें आहे तेणें तुजजोगें नव्हे मग ऐसें कांहीं एक गुंथावें केलेंजी सुंदरा ॥२॥ असो येणें औटहातें काई होईल ह्मणौनि एकचि वेळां उगविलें । आब्रह्म सकळैक जग आपणापैं तुज एकलागीं आणियेलें हो सुंदरा ॥ ३ ॥ आतां अवघा तुज डोळां पाहेन दातारा तुज आलिंगीन अवघाची बाहीं । अवघा मुखीं तुजसी .बोलत आहें न ध्याईजे मा चालिली अवघाचि पायींजी सुंदरा ॥४॥ आतां अवघा वेळु अवघेपणें तुज अवघीयातें गिळूनि ठेलों । तुझिये भक्तीची चवी जों लागली तंव अवघेपणा उबगलोंजी सुंदरा ॥५॥ पाहतां दर्पण परता नेलिया दुजेपण रिघे पाहाते भागीं । ऐसें आदि मध्य अवसान जाणोनि अवचितां जडिनलों तुमच्या अंगीं हो सुंदरा ॥६॥ आतां तुज पावेन कवणे दशे नातळसी दुजेपणा केला हो तूंपण नाहीं । तेथें मीपण

कैचें होतेंनि मिळणें तें गेलें ठाइंच्या ठाईंजी सुंदरा ॥७॥ ऐसा न जेविलाचि जेविला कीं जेविलाचि भुकेला तृप्तातृप्त दोन्ही नाहीं। बापरखुमादेविवर विठ्ठला वरपडा जालों ऐसियाशी कीजे काईजी सुंदरा ॥८॥

३०३. तो आपुलिया चाडा कोटिगर्भवासा येतां श्लाघिजे। तुझिया गोमटेपणा पकडलों दातारा हें बोलणें बोलतां लाजिजेजी सुंदरा ॥१॥ तुमतें देखिलिया हें मन मागुतें मोहरेना। वज्र द्रवे परि मन न द्रवे हाचि विस्मो पुढत पुढती जी सुंदरा ॥२॥ ऐसें स्थावर जंगम स्थापिलें कीं आपुलें वालभ केलें। तूतें देखिल्या त्रिगुणपरें ऐसें कोणें निष्ठुरें घडविलेंजी सुंदरा ॥३॥ म्हणौनि तुजमाजी विरावें कीं देवा तूंचि होऊनि राहावें। बापरखुमादेविवरा न बोलावें परि बोलें हें स्वभावेंजी सुंदरा ॥४॥

३०४. चंद्रा पूर्णिमे पूर्ण शोभा। कळा तुटलिया कैची तेथें प्रभा ॥१॥ तैसा कां गा निकुरवृत्ती करिसी। सर्वां ठायीं विभांडिसी गा देवा ॥२॥ कापुरें दृत्तीसी रुसणें केलें। तरि सांगपा कवणाचें काय गेलें ॥३॥ तरंगु निमालिया जळसागरु। सागरासि नाहीं दुसरा उपचारु ॥४॥ शिरा शरिरा एक वंकीं जैसी। आतां तुझ्या पायीं आह्मां पाइकी तैसी गा देवा ॥५॥ रखुमादेविवरा विठ्ठला राणे राया। मी न बोलें तरि बोलें काजा तुझिया गा देवा ६

३०५. ह्मणोनि तुझें रूप देखिलिया दिठी। जयसच्चिदानंदपदेंसी मिठी। ओंकारेंसी त्रिपुटी न साहे तो तूं सगुण जगजेठी। या दृष्टिचेनि सुखें माये हृदयीं भासलें रूप। शेखीं पाहतां कां आह्मां चाळविसी रया ॥१॥ आतां सेवेलागीं सेवा करणें कोणाच्या अंगें। स्वामीपणें जगीं होउनि ठेलें ॥२॥ तें सांवळिये प्रमाण न दिसे अनु आन। शेखीं ध्यानीं विरालें तें मन गे माये। रूप खुंतलें पण पाहाचि हा संपूर्ण तेथें द्वैताद्वैतपण हारपलें रया ॥३॥ आतां बुद्धियोग इंद्रियांचा तो तूं गोपवेष साचा। भक्तियोगाचा सौरसु दाविसी आतां। बापरखमादेवीवरा विठ्ठलाच्या पायीं सुख। तेंच दरुशन एक जालें रया ॥४॥

**३०६. आपुलिये खुणें आपणपा दावी ।** कीं सगुणबुंथी चोख मदवी । ऐसा सुंदर गोपवेष । कीं तत्त्वमस्यादि सौरसु जेथें श्रुति नेति नेति ठेल्या पायीं । तो तूं सगुण निर्गुणी निजानंदें सहजचि कळे विदेहीं रया ॥१॥ एक म्हणतां दुजें नाहींरेरे तेथें शून्य तूं सांगसी काई । निरशून्य तें असतां सगुण तें निराळलें तेथें हे कल्पना काई रया ॥२॥ नामरूपछंद गोडी ऐसी इंद्रियांची आवडी । परतोनि पाहे घडिघडी तोचि तूं । तेथें आठऊ ना विसरू परी तोचि गा तूं । थोरु ऐसा निर्धाराचा धीरु धरी । ऐसें जाणोनियां जरी सांडी मांडी करिसी । तरी पावसी कोण येरझारी रया ॥३॥ तोचि तूं जगदात्मा विसावा क्षण घडि न विसंबावा । हाचि होऊनि रहावा प्राण माझा । म्हणोनि धीरु धीरु बापरखुमादेविवरु । विठ्ठला आतां । प्रपंचीं न गुंते साचे आम्हां जितांचि मरणें कां मेलिया कल्पकोडी धरी या निवृत्तिची आंत रया ॥४॥

**३०७. डोळयाची निशी कोणें काढिली ।** कीं रविबिंबा हारीं कोणें आणिली ॥ कीं कालिमा पाठी प्रकाशु तरि चंद्र हा नव्हे चकोरां पारणें । फिटलें विकासित कमोदिनी चंद्र हा न दिसे सेखीं नवलावो हे तुझी बोली रया ॥१॥ तूं आर्त चंद्रमा चकोरें आह्मीं। तृप्त झालों तुझ्या नामीं रया ॥ध्रु०॥ जाणाचिया सुजाणा। कीं जीवाचिया जोवना। जिवलगा सोईरिया निधाना गा ऐसा । तो तूं प्रकृतिपरु न कळे तुझा विचारु । साचारी वेवादती दाही दिशा । ऐसेंचि लाघव कोणा दाविसी दातारा । बोलु ठेविसी कोणा कसा रया ॥३॥ आवडी माजी लागे हे गोडी । नाम रसनेसि सुखनिजकीर्ति हे गाढी । कीं तुझा स्वरूपतंतु लागो या मना। अंतरींच्या जीवना अगा तूंचि ॥४॥ लक्षालक्ष संभार नातुडे हा विचार ह्मणोनि श्रुति नेति नेति । तो तूं येकलाचि नट ना देखिलासि दातारा न कळे तुझी हेही स्थिति । ह्मणौनि सांडिमांडी करूं नको मना सगुण जोडे तें करी प्रीति रया ॥५॥ यालागीं मनोंसि बोध चाळावा कीं जोडलेपणें पाहावा । कीं कोणाहि या मावा इंद्रियांचिया । सकळ इंद्रियेंसी नगर कोंदलें दशदिशीं विस्तार । ह्मणौनि तुझें रूप अनावर कोणें धरिजे

दातारा । बापरखुमादेविवरा विठ्ठला धिरा उघडा । डोळां देखिजे निधान तंव मार्ग सोपा रया ॥६॥

३०८. **मंगळमूर्ति तूं किं मनाचिया लावण्यवाणा** । वेधी वेधक तूं सहजगुणा । सगुण निर्गुण न कळे तुझें विंदान । कैसें आपचि पर दाटुन रिगसी । तेथें नवलाव वर्णूं काय कोणा रया ॥१॥ वर्णितां तुझे गुण मना मौन्य पडे । कळिकाळ बापुडें काय करील आह्मां ॥२॥ ध्यानमूर्ति तुझी मनें अळंकारली मनामाझारि संचरली । संचरतां इंद्रियें समानपदीं तुजविण न दिसे आन बोलीं । तेथें भिन्नाभिन्नपर्णी कोणा पाहों दातारा दिठी सुखाचेनि सुखें स्थिरावलीं रया ॥३॥ बापरखुमादेविवरविठ्ठलें कीं आनंदाचे ओळले ठेले। वोतप्रोत सघन नावेक नुरे कांहींएक केल । तुझें तुज गाऱ्हाणें किती देऊं दातारा बोलवितां नव्हे भलें रया ॥४॥

३०९. **तुझी सेवा करीन मनोभावें वो** । माझें मन गोविंदीं रंगलें वो ॥१॥ नवसिये नवसिये माझे नवसीयेवो ॥ पंढरिचे दैवतें विठ्ठलें नवसिये वो ॥२॥ बापरखुमादेविवरें विठ्ठलें वो । चित्त चैतन्य चोरुनि नेलें वो ॥३॥

३१०. **तुझी गुण कीर्ति ऐकोनि आर्ते मन उचंबळलें** । आलिंगना धाविन्नलें उतावेळ ॥१॥ तनु मनु विगुंतलें मन वाचा गुंतलें । मी माझें विसरलें दर्शन गे माये ॥२॥ उतावेळपणें भुजादंड उचलले । नेणोनि ठकले ठेले रूप पाहातांचि बाईये ॥३॥ पातिया पातें नलगे पाहाणें तेंचि ठेलें । तैसें बापरखुमादेविवरें विठ्ठलें केलेंगे माये ॥ ४ ॥

३११. **तुझे पवाडे सांगतां तुजपुढें** । मुक्तीचीं कवाडें उघडती ॥१॥ नाहीं जातिकुळ म्यां तुज पुसिलें । मन मावळलें देखोनियां ॥२॥ तुझें तुज पुसतां लाजिरवाणें । तरि हांसती पिसुणें प्रपंचाची ॥३॥ उगवितां भलें कीं नुगवितां सांपडलें । ज्ञानदेवो बोले निवृत्तीसी ॥४॥

३१२. **फळाचें बीज कीं बीजाचें फळ** । ह्मणोनि पत्र पुष्प मूळ चोजवेना ॥१॥ ऐसि हे रचना नकळे गा देवा । सिद्धांतु अनुभवा

साक्ष देतो ॥२॥ मृत्तिकेची पृथ्वी कीं पृथ्वीची मृत्तिका । या गति अनेकां चोजवेना ॥३॥ बापरखुमादेविवरु निरंतरीं । बाह्यअभ्यंतरीं नांदुतसे ॥४॥

३१३. **आकार स्थूल नाशिवंत** । हे तरी जाईल भूमि आंत । तयावरि हरि चालत । तेणें होईल कृतकृत्य॥१॥ देहो जावो अथवा राहो पांडुरंगीं दृढ भावो ॥२॥ दुजा गुण आपीं मिळे । तरि मी होईन गंगाजळे । हरि अभिषेक अनुदिनीं । सुखें सर्वांगावरी खेळे ॥३॥ तिजा गुण तेजरूप । तरी मी होईन महादीप । हरि रंगणीं दीपमाळा । दीप उजळीन समीप ॥४॥ वायु व्यापक चौथा गुण । तरि मी विंजणा होईन । हरि अष्टांगें निववीन मना । ऐशा दृढ धरिन खुणा ॥५॥ आकाश पांचवा गुण । तरी मी प्रासादीं राहेन । बापरखुमादेविवरा अखंड तुझें अनुसंधान ॥६॥

३१४. **भुक्ति मुक्ति कारणें न घालीं तुज साकडीं** । हें तों ठायींचीच जोडी । कांहीं जोडिली असे तूज नेणतां हें तुझेंचि दळवाडें ऐसें जाणोनि फुडें न बोलें दातारा ॥१॥ सलिलीं तरंग तरंगीं सलिल । निवडूनियां कोण वेगळें करील ॥२॥ उपाधिभेदें भूमि झाली क्षिती ऐसें विचारितां चित्तीं अनु न देखे । इतुलालें जीवपण तूज मज दातारा वेगळेंचि नाहींरे गोवळ्या ॥३॥ दर्पणाचें दुजेपण दर्पण जंववरी तें काय वेगळाल्या व्यापारीं ठेवूं येईल । नाम घेऊनि ठेले हेम अळंकारु । इतुलाले अंतरु तुज मज रया ॥४॥ वाहटुळीची धांव केवढा वेळु आकाशीं । सहज स्वभावें निमे अपैसी । गगनावरि जातां नलगे पाल्हाळ । तैसें तुज मज सकळ ऐक्य रया ॥५॥ गगना वेगळा घटु केविं निपजे दातारा यापरी सर्वेश्वरा तूं मी एक । बापरखुमादेविवरु विठ्ठलु भोगिया । येरी असतु वावुगिया गोठी रया ॥६॥

३१५. **अगुणाचिया समंधा गुणसंबंध करू** । नकळे हा वेव्हारू लोकांमाजी । हा नाटकु विंदाणी न कळे याची करणी । अटोनि अंतःकरणीं रिघों पाहे ॥१॥ सर सररे परता गुणाचिया गुणा । निजसुखनिधाना तूंचि एकु ॥२॥ तुझ्या गुणागुणीं वेधलीं मुनिवृंदें । मा-

नसाचिया छंदें वर्तसी तूंचि । आपुलें निज सोंग भुलविलें जयासी । अखंड मानसीं जवळी आहे ॥३॥ ऐसा हा नवलावो विस्मो हा वाटला । भाव हा गळाला काय सांगों । रखुमादेविवरु विठ्ठलु हृदयीं वसे । बाह्यअभ्यंतरीं केंव्हां वेगळा नव्हे रया ॥४॥

३१६. **तुझिया गुणासाठीं लागलों भजनापाठीं** । तुझी सगुण-गोठी हृदयीं वसे ।मी ह्मणें तें जीवन कीं निर्गुण चैनन्यघन ।व्याप्य व्यापक स्थान दुजें नाहीं । विश्वाकारें जगडंबरला जो श्रुति नेति नेति ह्मणोनि ठेला । हेंची भावें विचारी भलें । परि दृष्टी सगुण हृद-यींचि हे खुण परी न विसंबे तुझीया पायां रया ॥१॥ तूं एकुची एकला बाहिजु भीतरीं । कोणा द्वैतपरी सांगों बापा ॥धु०॥ ह्मणोनी परापर स्थूळसूक्ष्म विचार । तो तुझा सगुणची आधार मज वाटे । ह्मणोनि ते तुझी बुंथी हेचि उरो आह्मां स्थिती । कीं द्वैताद्वैत भ्रांती न लगे मना ॥३॥ ते तुझेनि सुखें पडिपाडे आणि हें मनची स्वयें उजाडे । जेथें थोडें बहू न निवडे ऐसें जालें । तेथें आपुलिये अंगा विसर पडो ठेलें । शेखीं सोंगची तुझें दुणावलें रया ॥४॥ या मनाचीं भ्रांती फेडावया तो तुझा सगुणभाव मज गोड लागे । पाहाते पाहा-णियामाजि स्वयेंची विस्तारलासी कीं देखणेंची तेणें होऊनी अंगें । त्रिपुटीसहित शून्याशून्य निमाले ॐकार मार्गही हे नचले । रखुमादेविवरु विठ्ठलें उदारें । सुख भोगिजे येणें अंगें रया ॥५॥

३१७. **काळां पैं गोवळु काळासि आलोट** । नामामृतें पाठ भक्ता देहीं ॥ नित्य सुख आम्हां तपांचिया कोडी । न लगती पर-वडी व्रतें तीर्थें ॥१॥ सुलभ सोपारा सर्वांघटीं अससी । साधुसंगें दिससी आह्मां रया ॥२॥ चैतन्याशेजारीं मन पैं मुरालें । सांवळें सानुलें हृदयघटीं ॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलराज । निवृत्तीनें बीज सांगितलें ॥३॥

३१८. **अवघां डोळां तुज म्यां पाहावें** । अवघां श्रवणीं तुजचि ऐकावें॥१॥अवघी मूर्ति तुजपें ध्यावें। अवघां चरणीं तुझ्या पंथीं चाला-वें ॥२॥ रखुमादेविवरु अदट दाविला। माझ्या देहीं वाढला ब्रह्माकारें ३

३१९. **व्योमाचा पालऊ शिरेंविण पांगुरलें** । मस्तकेंविण तुर-

बिलें सुमन वो ॥१॥ सुखाचें सुख निजसुख नव्हे । नव्हे तें होय म्यां गिळिलेंगे माये ॥२॥ नेणोनि शाहाणे झाले चौघेजण । अठरांसी खुण बाणली माये ॥३॥ रखुमादेविवरु जीवनीं जीवनु । त्याहून माझें मनु परतें देवा ॥४॥

३२०. **कांहीं न करिजे ते तुझी सेवा** । कांहीं न होसी तें तूं देवा ॥१॥ नेणिजे तें तुझें रूप । जाणिजे तितुकें पाप गा देवा ॥२॥ स्तुति करणें ते तुझी निंदा । स्तुति जोगा नव्हेसि गोविंदा ॥३॥ बापरखुमादेविवरा विठ्ठला । एवढा साभिलाषु कां दाविला ॥४॥

३२१. **निमीष नलगे मन वेधितां** । येवढी तुझी स्वरूपता ॥१॥ विठोबा नेणों कैसी भेटी । उरणें नाहीं जिवेसाठीं ॥२॥ उरलें उपाधि कारणें । तें त्वां नेमिलें दरुशनें ॥३॥ निवृत्तिदासा वेगळें । सांगावया नाहीं उरलें ॥४॥

३२२. **पावलोंजी ह्मणे देखिलें जें देखणें** । गेली आधीं तेणें दृष्टि माझी ॥१॥ उचललिया बाह्या क्षेम देईन तया । गेली माझी माया देहत्यागें ॥२॥ आनंदें स्फुंदत येती अश्रुपात । अगा गुरुनाथ देव राया ॥३॥ निवृत्तिदास ह्मणे तुतें जिवें वोवाळिलें । शिर निरोपिलें तुझ्या चरणीं ॥४॥

३२३. **तुझेनि बळें मांडली फळी** । तुवां जवळी असिलें पाहिजे ॥१॥ ऐसियें झुंजी घालिसी मज । काकुळती तुज नाहीं आतां ॥२॥ रणभूमी आला रणवट घातला । पाहो जों लागला न देखे कांहीं ॥३॥ ज्ञानदेवो ह्मणे उफराटें पाहाणें । खुंटलें येणेंजाणें येचि भेटी॥४

३२४. **पाहे पां ध्वजेचें चिरगूट** । राया जतन करितां कष्ट ॥१॥ तैसा मी एक पतीत । परि तुझा मुद्रांकित ॥२॥ मसीपत्र तें केवढें । रावो चालवी आपुल्या पाडें ॥३॥ बापरखुमादेविवरदा । सांभाळावें आपुल्या ब्रिद्रा ॥४॥

---

## करुणा.

३२५. **मी माझें करूनि देह चालविसी वायां** आतां जेथींचा तेथें निमोनि जाय ऐसें कीजे देवराया ॥१॥ जंव जंव गोड तंव तंव

जाड । जाड गोड दोन्ही नको रया ॥२॥ त्रिगुणवोझें जडपण रचुनि लोटूनि देसी महापुरीं । आवर्त वोळसा पडिलिया मग तेथें कैंची असे उरी रया ॥३॥ ऐसें लटिकेंचि गार्‍हाणें देवों मी किती । तंव तुज नये काकुलती । बापरखुमादेविवरा विठ्ठला म्यां तुजमाजी घेतली सुति रया ॥४॥

**३२६. परिमळाची धांव भ्रमर ओढी** । तैसी तुझी गोडी लागो मज ॥१॥ अविट गे माय विटेना जवळी । आहे परि भेटेना ॥२॥ तृषा लागलीया जीवनातें ओढी । तैसी तुझी गोडी लागी या जिवा ॥३॥ बापरखुमादेविवरा विठ्ठलीं आवडी गोडियेसि गोडी मिळोन गेली ॥४॥

**३२७. रंगा येईंवो ये रंगा येईंवो ये** । विठाई किठाई माझे कृष्णाई कान्हाई ॥१॥ वैकुंठवासिनी वो जगत्रजननी वो । तुझा वेधु माझे मनीं वो ॥२॥ कटीं कर विराजित । मुगुटरत्नजडित । पीतांबरु कासिला । तैसा येई कां धांवत ॥३॥ विश्वरूप विश्वंभरे कमळनयने कमळाकरे वो । तुझें ध्यान लागो बापरखुमादेविवरे वो ॥४॥

**३२८. पडलें दूर देशीं मज आठवे मानसीं** । नको नको हा वियोग कष्ट होताती जिवासी ॥१॥ दिनु तैसी रजनी मज जालिये माये । अवस्था लावूनी गेला अझुनी कां नये ॥२॥ गरुडवाहना गंभिरा येईंगा दातारा । बापरखुमादेविवरा श्रीविठ्ठला ॥३॥

---

## देवापाशीं मागणें.

**३२९. तुज जाणावया जाय देवा** । तंव आठवे इंद्रियांचा हेवा । मनें करूनियां ठेवा । स्थान एक निर्मिलें ॥१॥ मग इंद्रियें भजती मना । अल्प जाली पैं वासना । स्वरूप देखावया नयना । मन नयन एकरूपें ॥२॥ तुझें ध्यान आवडे कान्हा । रूप न्याहाळीं नयना । निजीं निरंतर वासना । कृष्ण ध्यानीं तत्पर ॥३॥ ऐसें तुझें रूप चोखडें । मनें निवडिलें पैं कोडें । जें योगियां न संपडे । ध्यानरूपीं रया॥४॥ या रूपाचा सोहळा देईं । हेंचि मागतुसे पाहीं । आणिक नमगे गा कांहीं । तुजवांचोनी स्वामिया ॥५॥ जरी स्वार्थ करूं कल्पनेचा ।

तरि हाचि विस्तारू प्रपंचाचा । काय यासि वर्णूं वाचा । तूं दीनाचा स्वामी होसी ॥६॥ नको हा संसार व्यर्थ । भक्ति ज्ञान वैराग्य परमार्थ । हाचि देईं मनीं स्वार्थ । नलगे अर्थ मायेचा ॥७॥ माझ्या मनें ध्यान केलें । रूपीं रूप हिरोनि घेतलें । थितें मीपणहि नेलें । मज आपुलें ह्मणावें ॥८॥ गोंवीं विज्ञान पदवियें । ज्ञानाग्नि दावीं मांडवीये । दृश्य द्रष्टा सर्वज्ञ सोये । अवघा होये दातारा ॥९॥ विश्व हें तूंचि क्षरलासि । आत्मा जगदाकारें होसी । सर्वेचि क्षरलें मोडिसी । तदां शेखीं एकत्व ॥१०॥ बापरखुमादेवीवर ध्यान । वृत्तिसी साधलें पूर्ण । ज्ञानदेव म्हणे निधान । विठ्ठलीं मन स्थिरावलें ॥११॥

३३०. **आल्हादपण काय सांगशी देवा** । मन बैसें भावा तैसें करीं ॥१॥ हा घोडा हा राऊत करुनियां दावा । मग पदीं बैसवा ब्रह्माचिये ॥२॥ मी डोलेन आनंदें तुमचेनि प्रसादें । रत्न जेंवि अंधें देखियेलें ॥३॥ करा तत्वीं सौरसु म्हणे निवृत्तीदासु । जेथें रात्री दिवसु अथिचिना ॥४॥

३३१. **शहाणियाची दासी होईन कामारी** । तो अनुसरु तेथें नव्हेरी । चित्तासारिखा मिळो गोंवळु रानींचा । तो मज मेरु कनकाचागे बाईये ॥१॥ लक्ष असो त्या मूर्खाचे गोठी परि तो नाणावा माझिये दृष्टी । कर्पूराची राशी कुल्लाळ नासीं । कवण साहे त्याची तुटी गे माये ॥२॥ अविंधे मोतिये तेजें सुढाळें सोहरूं जाणे ते शहाणे । टाकियाच्या घायीं पाषाण विंधिती तैसें त्या मूर्खाचें जिणें गे बाईये ॥३॥ चंदनाच्या दृतीं वेधिल्या वनींच्या वनस्पती । परि तो वेळु न वेधे चित्तीं । उदकामाजी जैसी कां पाषाणाची वस्ती । तैसी त्या मूर्खाची संगती गे बाईये ॥४॥ भ्रमरु काळा भोगी पुष्पयाती सकळा । तेथें हैसा येवो नेदावा जवळा । परिसु पाषाणाचा परि तो गुणें आगळा । तैसा वैष्णव मिळो मज दुबळागे माये ॥५॥ ऐशा सकळ कळा भोगिसी । नंदरायाचा गोंवळु ह्मणविसी । बापरखुमादेविवरा विठ्ठला तुज । न विसंबें अहिर्निशी रया ॥६॥

३३२. **नामरूपीं प्रीति कीं ध्यानीं सगुण मूर्ति** । हेचि तुझी यश कीर्ति जाणोनियां ॥ हृदयीं तुझें रूप मुखीं नाम घोष । नैवेद्य

प्रसाद जठरीं आम्हां ॥ निर्माल्य मस्तकीं वंदू तुमचे चरण । हाचि अच्युता तुमचा महिमा रया ॥१॥ अखंड नाम वाचे हेंचि तप साचें । तेंचि स्वरूप दिसें हृदयीं तुझें ॥२॥ तृझें नाम निर्धारितां हेंचि गा तप आतां । काया वाचा मनें न विसंबे तत्त्वतां । म्हणौनि आसनीं पंथीं शयनीं जड पडो भलतैसें परि नाम न संडी अनंता । जीवाचिया जीवना सगुणगुणनिधाना हेंचि प्रेम देईं निज भक्तां रया ॥३॥ बापरखुमादेविवरा विठ्ठला आनंद सुखाचिया वोवरा । पाहें तंव भरला दशदिशां दुसरा न दिसे सोयरा । तेविं गुण नामकीर्ति तेचि आम्हां मूर्ति हृदयीं न विसंबे दातारा । येणें निवृत्तिरायें खुणा दाऊनि सकळ आतां जोडलासी माहेरा रया ॥४॥

**३३३. भेटी जाली धुरेसीं** । पालट जाला या जीवासी । लोहो लागलें परिसेसीं । तें सुवर्ण जालें ॥ ऐसा गुणागुणाचा दाता । तो विश्व व्यापिलेंरे अनंता । काय पाहतोसि आतां । विमानीं वाट पाहातुसे ॥१॥ तरि मी गुंतलों दातारा । येऊनियां संसारा ॥धु०॥ नट घेऊनियां अंवगणीं । करूं नेणे संपादणी । एकत्र जालें लवण पाणी । तें मिळोनि गेलें ॥ ऐसा बहुतां गुणांचा दाता । तो विश्व व्यापिलेंरे अनंता । काय बा पाहातोसि आतां । आपुल्या सारिखें करीं बापा ॥२॥ चंद्र चकोरां नावडे । सेखीं होणार तेंचि घडे । वृथा वेंचितासि खडे । परिस ह्मणोनि ठेविसी ॥ आतां असो हा डांगोरा । शरण रिघें रखुमादेविवरा । अरे अरे विठोजी दातारा । नवजे घरा आणिकांच्या ॥३॥

**३३४. आठवी तंव तूंचि जवळिकें नाठविसि तरी निजसुखें ।** आठव ना विसरु पाहे तंव सगुणचि हृदयीं एक रया ॥१॥ तुझ्या नामाचा आठऊ रूपाचा आठऊ ध्यानाचा आठऊ असो मना ॥२॥ विसरु पडो संसाराचा आठऊ हो तुझिया रूपाचा । येथें नाम रूप ठसा हृदयीं राहो ॥ जिवाचिया जिवलगा माझिया श्रीरंगा । गोडी घेऊनियां द्वैत नाहीं पाहो रया ॥३॥ बापरखुमादेविवरा विठ्ठला सगुणीं सुमनीं गुंफिलें । प्रीति आवडे तों कोंदाटलें सुमनीं हें विरालें ॥४॥ जाली नामरूपीं ऐक्यभेटी । नामरूप सार जाणोनि जीवन संसारा जाली तुटी रया ॥५॥

३३५. **कितिये स्तुति स्तवनें स्तविती स्तोत्रें विधिगुणें** । विधि ते कर्म करणें परि नेणती मार्गु । अकर्मी विकर्मी जगीं शब्द ह्मणती। हा ब्रह्म कर्माचा भागु । शेखीं ब्रह्मकर्म तो योग चुकलें पंथ शेखीं ब्रह्म तें तूंचि आतां । सगुण हृदयीं धरुनि । अनु नातळे वाणी रया ॥१॥ तुझा गोपवेश हृदयीं सौरसु मज सुखाचें सुख निजप्रेम देई रया ॥ ध्रु० ॥ ह्मणोनि यज्ञ यज्ञादिकें तपें व्रतें अटणें। बहुविधि अनेकें पंचाग्नि गोरांजनें । सुखें करिती विधी द्वादश अग्नि जळवास । ऐसा धरुनि हव्यास परि ते चुकले कार्यसिद्धि । तुझें भजन सगुण मज प्रिय गा दातारा । अनु न लगती मजलागीं आधि रया ॥३॥ बापरखुमादेवीवरा उदारा सोईरा । सगुण गुणाचिया निर्धारा गुंतल्या येसीं । मना पुरली हांव विश्वीं अळंकारला देव कीं दिठी न विकारें अनुध्यासीं । येणें निवृत्तिरायें खुणा दाऊनि सकळ सुखीं सुखवोनि ठेलें निजध्यासीं रया ॥४॥

३३६. **मन हें लोधलें प्रपंचा विसरलें** । मीपण गेलें तुजमाजी । तू आह्मां गोसावी सुखादि क्षेम न ठेवी । आपली सुखपदवी देई भागू । तेथूनि वेगळें होतां प्राण जाईल आतां । नामाचा न व्हावा वियोगु रया ॥१॥ तुझें नाम ध्यान कीर्तन आतां । न विसंबे सर्वथा तुझिया पायां । पायापासूनि वृत्ति माथां चढे । हृदयीं धरिलासि सबाह्य रया ॥२॥ ऐसिये वृत्ति ध्याना ध्यावो कां माझें मन । होय तुज समान मीपण नाहीं । अनंत गोंवळू अलुगटु दावितासी नेटपाटु काय वानूं तुझी सुरपदवी । ठाण त्रिभंगीं देखोनी देवढें सुंदर आठवू विसरु हा नाहीं रया ॥३॥ तोचि तूं आतां वेगळेपणें पाहतां । इंद्रियांची सत्ता वर्तविता । कीं परतोनि पाहातां प्रपंच निमाला । तुजमाजी तेथें नातळे द्वैतभावो । बापरखुमादेविवरा विठ्ठल पाहातां। पाहणें निमोनियां उरे सत्ता रया ॥४॥

३३७. **परतोन पाहासी न बोलसी आम्हांसी** । तुझींया रूपासी नांव नाहीं ॥१॥ सागतां नवल पाहतां बरळ । मायामृगजळ देखियेलें ॥२॥ ज्ञानदेवो म्हणे उफराटिये दृष्टी । परतोनियां भेटी देई क्षेम ॥३॥

३३८. **राज्य पद गाढा पदपाद नसतां ।** हरिनामीं वसतां सर्व-पद ॥१॥ पदाभिमानु कांहीं तोही देहीं नाहीं । आला गेला ठायीं न संपडे दृष्टी ॥२॥ ब्रह्मानंद आशापाश तोडीं । दाऊनी उघडी मूर्ति आह्मां ॥३॥ ज्ञानदेवीं सोहं मंत्राचें आवर्तन । मदमत्सरभान विरालें देहीं ॥४॥

३३९. **होरे तूं विठ्ठला होरे तूं विठ्ठला ।** होरे तूं विठ्ठला होरे तूं गोपाळा । क्षेम देईं रे वेल्हाळा ॥१॥ तुज पाहतां भुलली पैं चित्ता काय करूं मी आतां येईं पंढरीनाथा ॥२॥ पिसुणें परावीं मज काय करावीं । तुजची आठवीं श्रीचरण दाखवीं ॥३॥ तुजविण वेल्हाळा कैं सुखसोहळा । रखुमादेविवरा विठ्ठला शेजे नलगे डोळां ॥४॥

३४०. **माझिये हृदयीं बुंथी ते डोळ्यां सगुणप्रीति ।** वाचे नाम संपत्ति ऐसेंचि असो । म्हणोनि तुझें नाम आवडे हेंचि प्रेम न विसंबें वर्म निजध्यास रया ॥१॥ श्रवण नाम गोडी श्रवण नाम गोडी । हीच आवडी देईं मना ॥२॥ तुझिये सगुण बुंथीचा वासु व्हावा माझ्या हृदयीं ऐसा निज सुखाचिया निजध्यास । तुझिये आवडी अनुसंधान तुझिया स्वरूपीं मन डोळां बैसो। कां ध्यान हेंचि रूप हेचि निज आवडी देईं कां दातारा चुकवीं येरझारा गर्भ-वास ॥३॥ म्हणौनि रखुमादेविवरा विठ्ठला उदारा भावें जोडलासि आह्मां । श्रुतिपुरागें वर्णिती नेति नेति तुझा महिमा । तुझें नाम रूप सुंदर हचि निरंतर देईं आह्मां सर्वोत्तमा रया ॥४॥

---

## ज्ञान.

### स्वस्थितीसंबंधानें उद्गार.

३४१. **एकतत्त्व बाही उतरला भक्त ।** द्वैतदशा विरक्त पाहातां ठेली ॥१॥ द्वैताची काजळी क्रोधु दशा पाजळी । नाहीं ते उजळी तमदृष्टी ॥२॥ जंववरी कामना आसक्त मोहो । तंववरी ग्रहो कल्पनेचा ॥३॥ ज्ञानदेवा चित्तीं आनंदमय हरी । द्वैताची कामारी नाईके कानीं ॥४॥

३४२. **आदि मध्य प्रांत टाकोनि वासना** । करूं हरिध्यान सोहंभावें ॥१॥ दिवसा कामान रात्रीचा बाडिवारु । हरिसहपरिवारु जाला आह्मां ॥२॥ जातीची विजाती नाहीं पैं कुळधर्म । कुळींचा कुळकर्म हरी आह्मां ॥३॥ ज्ञानदेव सांगे वेदशास्त्र थोर । सांगतसे विचार आह्मां तुह्मां ॥४॥

३४३. **अवघ्या बाहीं ग्यां व्योम कवळिलें** । अवघा हृदयीं अरूप धरिलें ॥१॥ अवघेपणें मी त्याचीच जालें । तेंचि पावलें तदाकारें ॥२॥ कांहीं नसोनियां कांहीं एक जालें । अवघाचि शोखिला ब्रह्मरसु ॥३॥ रखुमादेविवरु अवघाचि धरिला । अवघाचि गिळिला अवघेपणें ॥४॥

३४४. **तनु चोरिली कोठें मी पाहों** । भूक लागली काय मी खावों ॥१॥ पाहणें नाहीं काय पाहों । ध्येय नाहीं काय ध्यावों ॥२॥ भिंत नाहीं काय चित्र लिहो । चित्र सरलिया तया नाहीं ठावो जी देवा ॥३॥ निवृत्तिदास ह्मणे कैसें हो काई । रखुमादेविवरा विठ्ठला ध्यायीं ॥४॥

३४५. **तुडतालेवांचूनि अवस्था काईसी** । दुजे तरी बोलों कवणासिगे माये ॥१॥ अनुमानालागीं नुरिजे उरी । सांगतां लोकाचारी लाजिजे ॥२॥ अबोलणेंसी बोलणें विनोदें । बापरखुमादेविवराविठ्ठला गुणनिधि ॥३॥

३४६. **मन सुमन घालूनि माळा** । करूनि सकळा गळां पूर्ण वो माये ॥१॥ आउट पिठींची दुरुगुळी घातली । तेथें दोघें एुजे बैसविली वो माये ॥२॥ तेथें अद्वैत रूप परोपरी वासु । करूनियां सायासु वैराग्यज्ञाने वो माये ॥३॥ ऐसा हृदयमंदिरीं दुर्गादेवी अंतरीं । रखुमादेविवरु निर्धारी वो माये ॥४॥

३४७. **दुधावरली साय निवडुनि दिधली** । तैसी परी जाली आह्मां तुह्मां ॥१॥ घालोन ब्रह्म उद्गार सब्रह्मे । अनुदिनीं प्रेमें डुल्लतसे ॥२॥ नाठवे आशा देहावरी उदास । मीतूंपण भास चोजवेना ॥३॥ रखुमादेविवर विठ्ठलीं मुरोनि राहिला । तो आनंदु देखिला संतजनीं ॥४॥

३४८. **जगासि गवसणी ब्रह्मरूपें देखिली** । ते मी अंतरीं पांगुरलों अंतरामाजी ॥१॥ अंतरींचें सुख अंतरीं निमालें । अंतर बैसाविलें ब्रह्मपदीं ॥२॥ बापरखुमादेविवर ब्रह्मपदीं देखिला । मजमाजी सामावला अद्वैतपणें ॥३॥

३४९. **करीं वो अद्वैत माला केलें इसन्यों सहिंवर** सिद्ध पुरासि गयो । बोलु नाहीं तया दादुला भवसागरीं न सरत कीयो ॥१॥ मान्हा वऱ्हाडिणी नवजणी सांगातिणी सवें बारा सोळा । अनुहात तुरे वाजोनि गगनीं जगीं जया सोहळा । मान्हा पतीपर्यंत त्यालें दोखि वो जग जाया आंधला ॥२॥ बाप दिन्हो ज्या घरीं त्या लेवो नाहीं । जाति ना कुळ त्यान्हा पालऊ धरि गयो तंव तो सूक्ष्म ना स्थूळ ॥३॥ बिहति बिहति मी गयो तंव त्यान्हें माले धरी वो हातीं । पाठिमोरा वरु वोलख्या त्यान्हें मी बैसे पाठी ॥४॥ निरंजनीं मंडप घाल्यावो । लग्नेविण जाया पाणिग्रहण ब्रह्माक्षरीं । बोलीनें तंव त्यान्हे नेत्रीं दिन्ही वो खुण ॥५॥ पांचजणी सावधान म्हणीयादो । आशा सवती अडधरे । जननिक करंडिये देहे समाविन त्यान्हे माल्हे दिन्हे चिर ॥६॥ याचि सखिया मान्हीया येरा वो चौघीजन्हे । मिले सुमले येकी करोलीले । जासो यापरी चालविजे सुघरवासु ॥७॥ जान्हे सेजे मीं पहुडन्यावो तंव तो नपुंसक वो । जाया इंद्रियांविण जान्हा विस्तारु तो पुरुष जगीं कैसा वो जाया ॥८॥ सोहं वो घरदारीं नांदतां मी वो लाधन्यो येक पुत नाराज तोही योगिया चालवाव्या इसने भिवो जाया वांझ ॥९॥ पांच तान्हीं वो पांच पारिठी पांच वो सत्य मान्हां पोटीं । अझुनी मी करणकुमारी वो परपुरुषेंसी नाहीं जाया भेटी ॥१०॥ मज चौघे दीर भावे राखती चौघी वो नणंदा आटिती । तेणें मज लागलें पिसें । बाईये वो तत्त्वमसी डोळां लेती ॥११॥ ज्यानें माझें मन सुखी जाया निरालंबीं निरंतरीं । राणे रखुमाई भ्रतार श्रीकृष्ण तो म्यां दिठा वो अंतरीं ॥१२॥ दशदिशा दाही देहीं जाण दस वो अकरावें मन । बारा सोळा मान्हा सखिया येचिवो मानी निजसज्जन ॥१३॥ करीं वो कांकण शिरीं बासिंग दाखडाव्या

पंढरपुरासि गयो । बापरखुमादेविवरु विठ्ठलु त्याचे चरणीं समरस गयो ॥१४॥

३५०. **मी माझें मोहित राहिलें निवांत** । एकरूप तत्त्व देखिलेंगे माय ॥१॥ द्वैताच्या गोष्टी हरपल्या शेवटीं । विश्वरूपें मिठी देतु हरी ॥२॥ छाया माया काया हरिरूपीं ठाया । चिंतीतां विलया एक तेजीं ॥३॥ ज्ञानदेवा पाहा ओहंसोहं भावा । हरिरूपीं दुहावा सर्वकाळ ॥४॥

३५१. **प्रथम नमूं तो गुरुदेवो** । जेथें निमाले भावाभावो । अनादि स्वरूप स्वयमेवो । तो आदिदेवो नामियेला ॥१॥ जें हें मनाचें पैं मूळ । जेथें द्वैताचा दुष्काळ । स्वरूपीं स्वरूप केवळ । तो अढळ नमियेला ॥२॥ हें जग जेणेंसि संचलें । परी कोठेंही नाहीं नाडलें । जेविं हालिया अंतराळें । तैसा सर्व मेळे असतांही ॥३॥ ऐसा सर्वा-अतीत । परी ऐसा जगभरीत । कनक कांकणीं रहात । तैसा अविकृत निरंतर ॥४॥ जो मन बुद्धिसी अगोचर । तोचि झाला चराचर । हा आत्मसुखाचा विचार । अपा विस्तार केला जेणें ॥५॥ तो जाणावा ज्ञप्तिरूप । निवृत्तिनाथाचें स्वरूप । एकदंत नामें ज्ञानदीप । बोध स्वरूप ज्ञानदेवा ॥६॥

३५२. **मी तूं प्रवृत्तीसी आलें** । समग्र गिळिलें वासनेसी ॥१॥ नाहीं त्यास मेरु कैचा विवेकु । जनवन लोकु ब्रह्म दिसे ॥२॥ उजे-डली शांति मावळली निशी । अवघा ब्रह्मरसीं पाजळलें ॥३॥ ज्ञान-देवा चित्तीं क्षमाचि उपजली । प्रवृत्ति सामावली निवृत्ति रया ॥४॥

३५३. **दुरी ना जवळी त्रिभुवन मंडळीं** । तें मनाचा मुळीं बै-सलेंसे ॥१॥ पाहतां न दिसे भानुप्रकाशें । येऱ्हवी तें असे मशकीं रया ॥२॥ बोलों जातां जेणें जिव्हाचि खादली । पाहातां पाहातां नेली चर्मदृष्टी ॥३॥ दांतेविण जेणें स्थूलदेह खादले । शस्त्रेंविण छेदिले लिंगदेह ॥४॥ त्वंपदीं सिद्ध निवृत्ति लाधलें । गुरुलक्षीं हारपलें द्वैतभान ॥५॥ निवृत्तिदासा तुह्मीं बहूत न बोला । रखुमादे-विवरा ध्याइजेसु उगला ॥६॥

३५४. **अधिक देखणें तरी निरंजन पाहाणें** । योगराज विनवणें

मना आलें वो माये ॥१॥ देहबळी देउनि साधिलें म्यां साधनीं। यानें समाधानीं मज जोडलें वो माये ॥२॥ अनंगपण फिटलें मायाछंदा सांठवलें। सकळ देखिलें आत्मस्वरूप वो माये ॥३॥ चंदन जेविं भरला अश्वत्थ फुलला। तैसा म्यां देखिला निराकार वो माये ॥४॥ पुरे पुरे आतां प्रपंचा पाहाणें। निजानंदीं राहणें स्वरूपीं वो माये ॥५॥ ऐसा सागरु रखुमादेविवरु। विठ्ठलीं निर्धारु म्यां देखिला वो माये ॥६॥

३५५. **पंधरयाची खाणी अनर्घ्य रत्नाचें पाणी**। तें निरंजनीं वनीं शोभतसे वो माय ॥१॥ गुणांची लावणी लाविली गगनीं। निरंजनीं निर्गुणीं आथिले वो माय ॥२॥ पूर्णानंद सच्चिदानंदकंदु- तो निरंजनीं स्वादु आळवितो माय ॥३॥ लक्ष कोटी एकला अनंतगुणी जाहला। तो अंगें अंगवला निजस्वरूपीं वो माय ॥४॥ ब्रह्मरसें भरला दाही दिशा व्यापिला। आनंदु सच्चिदानंदीं वोसंडला वो माय ॥५॥ ऐसा सुखसंवादु सागर भरला। रखुमादेविवरा विठ्ठला वो माय ॥६॥

३५६. **पुरे पुरे वो आतां जिणें निमालें**। मज निरंजनीं आफाविलें गोवळें वो माय ॥१॥ आणिकांची चाड न लवावो मातें। एकल्या अनंतें मज बरवें केलें वो माय ॥२॥ तें परदीपीं उजळलें अंधारें फेडिलें। कोडें कवतिकें जोडलें स्वरूप वो माय ॥३॥ आतां मी वेगळावलें पांचाहुनी जाहालें। परब्रह्म जोडलें किरु वो माय ॥४॥ ऐसा जगजीवनु जोगावला जगमूर्ति देखिला। तो जगदेश्वरु फळला निरंजनीं वो माय ॥५॥ भुक्तीभरीं निडारला निजानंदु घनावला। रखुमादेविवरु स्थिरावला हृदयीं वो माये ॥६॥

३५७. **अमित सूर्य प्रकाशले तेज उदयो जाहाले**। ज्ञानज्योति फांकले दुणावोनि वो माय ॥१॥ दामोदर नामें मना बांधिलें दावें। निरंजन ह्मणावें आपणा वो माय ॥२॥ गुणचि नाहीं त्यासी काय लाऊं गुण। अतीत निरंजन देखिला वो माय ॥३॥ डोळां जरी पाहों तरि वो डोळियासि आरुवारु। सेऊं ह्मणों तरि पारु न कळे खेवावो माय ॥४॥ आतां असो हव्यासु लागला निजध्यासु। निरं-

जनीं नईरसु करीतसे वो माय ॥५॥ आतां आहे तैसा असो माझ्या हृदयींच वसो । हा रखुमादेविवरु विठ्ठलु वो माय ॥६॥

३५८. **ठसावली देहीं परब्रह्ममूर्ति** । सोहं शब्दीं गती प्राप्त जालीवो माय ॥१॥ सहजीं सहज स्थिती जाली वो माय ॥ध्रु॥ विरालीं अष्टांगें देखोनि गोमटें । पाहातां प्रेम फुटे पातीं श्रमती वो माय ॥३॥ अष्टभुजांचिया रिघालिये खेवा । तंव विश्वाचा बाहुवा देखिला वो माय ॥४॥ नसमाय लेवविंतां लेईजे कैसेंनि । निरंजन अंजनीं लेईले वो माय ॥५॥ हे भुली सांडूनि भुलवि परमबोध बोधवी । तोहा रखुमादेविवरु विठ्ठल वो माय ॥६॥

३५९. **थोकलें पांचा गुणीं तनुमनासहित** । त्या निजतत्त्वीं प्रीत निमालें वो माय ॥१॥ साही संवादले चौथे अनुवादले । पुरोनि उरलें म्यां देखिलें वो माय ॥२॥ कापुराची भांडुली परिमळें भरली । दीपीं उजळी रूपनाश वो माय ॥३॥ तेथें नाहीं ल्याया रूप ना छाया । ऐसी ज्योति कर्पूराचिया उजळल्या वो माय ॥४॥ तेथें नाहीं उरवणी एकला एकपणीं । देखतांचि नयनीं उमळला वो माय ॥५॥ ऐसी जाली प्राप्ती खुंटली मागिल गती । रखुमादेवीपती जोडला वो माय ॥६॥

३६०. **टपपरी धरिला मनोवेगें बांधला** । तो ठेंगणाचि जाहाला अनिवाड वो माय ॥१॥ समाधी ध्यान निजध्यासिं आरुढलें । तंव अवघेंचि पारुषलें अभावा वो माय ॥२॥ हा असो जैसा तैसा हृदयमंदिरीं ऐसा । परपुरुषीं अपैसा अनुसरलें वो माय ॥३॥ बरवा देखोनि न्याहाळीं दिव्य कांति झळाळी । परब्रह्मीं दिवाळी चहूंदिशांची वो माय ॥४॥ त्यानें निवाला मनु भेटला जगजिवनु । तो आनंद सुख गहनु उचंबळे वो माय ॥५॥ हा निरालंब वोळला भक्तिभावें मिळाला । रखुमादेवि दादुला विठ्ठल राणा वो माय ॥६॥

३६१. **पाहातां सप्त पाताळें एकविसांवेगळें** । तें विरंजन आगळें खुंटलें डोळांगे माय ॥१॥ पांवा वाहे तलालोरी नादु उमटे अंबरीं । तया सुखसागरीं बुडालें वो माय ॥२॥ सुखसंवादु लागला जिवनीं जिवनु भेटला । भेटी देऊनि गुंतला मनोमंदिरीं वो माय

॥३॥ आतां न सोडी न राहे आणिकु न पाहे । तंव हाचि लवलाहें मिळाला वो माय ॥४॥ आवडीं रिघालें घर आपुलें । सहजीं सामावलें स्वरूपीं वो माय ॥५॥ वैराग्यभक्ती ज्ञानाची माउली । ते रखुमादेविवर विठ्ठलीं भेटला वो माय ॥६॥

३६२ **जनीं वनीं हरि आहे निरंतरी** । बोलिली वैखरी व्यासमुखें ॥१॥ जगजीव ईश्वर क्षरला चराचर । लक्षालक्ष पार अलिप्तपणें ॥२॥ चहूं देहां ग्रासी व्याला तत्त्वें तत्त्वेसी । हरी वैराटेसी एक वृक्ष ॥३॥ ज्ञानदेवो म्हणे वृक्षही वृक्ष न होणें । असोनि नसणें सुमनीं जैसें ॥४॥

३६३. **सुवेळेची शेज अवेळे घातली** । प्रवृत्ति मोहिली निसंदेह ॥१॥ मोहें न खुटलें ममते तुटलें । एकरसीं भरलें तत्त्वीं तत्त्व ॥२॥ प्रपंचाचें घरीं दिसतें कारण । अवघे निराकारण तत्त्वीं तत्वमय ॥३॥ बापरखमादेविवर त्रिपुटीं न दिसे । रसीं रस भासे हृदय दीपीं ॥४॥

३६४. **जुगादीचें जुग युगादीचें युग** । लक्षाआदि लक्ष मावळलें गे माये ॥१॥ मावळल्यावीण भ्रांति जाल्या कोण्ही । निजब्रह्माची खाणी ठायीं न पडेगे माये ॥२॥ बापरखुमादेविवर निघोनि घेतला । निर्गुणचि जाला तया सहितगे माये ॥३॥

३६५. **आत्मा आंगें प्रसिद्ध देखिला** । अंतर्बाह्य अलिप्त व्यापला ॥१॥ देखिजेसें नाहीं देखिलें ह्मणती काई । देखणें तेंही देखतुसे ॥२॥ रूपरेखा नाहीं लक्षावा कवणें ठायीं । लक्षीं लक्षितांही परतल्या दृष्टी ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे आनंद होईल पूर्ण । अनुभवें तेचि खुण देखतसे ॥४॥

३६६. **गगन डोळां भासलें तें वाहाटुळीनें कवळिलें** । तेथें कांहीं एक उगवलें रूप अरूप वो माये ॥१॥ पूर्ण पीठिका टाकुनी मायास्तंभ उभउनी । निजानंदीं माळा घालुनी तंव तो वरिला वो माये ॥२॥ हा कामीं कामरंजनु गुणाहि निर्गुण । पाहातां परिपूर्ण तरी तो सहज वो माये ॥३॥ हा पुरोनि उरला नयनीं वोसंडला । बापरखुमादेविवरा विठ्ठला । तरी तो वरिला वो माये ॥४॥

३६७. **चौ दारवंटा ओलांडूनि वोजा** । अंतरीं आत्मकाजा बोधिलें वो माय ॥१॥ आनंदाच चक्षु उघडी पातीं । शब्दां निशब्दां अतीति मी जाहालिये वो माय ॥२॥ पांगुळें इंद्रियें ग्रामु संवादें आत्मारामु । तो ईश्वरु पूर्णकामु मज भेटवा वो माय ॥३॥ तेथें गोरस जाहालें ज्ञाना अंतरीं वोजावलें । सदैवपण आलें मज वो माय ॥४॥ पाहतां ठेंगणें डोळे न्याहाळितां आगळें । तें पदप्राप्ती वेगळें सगुणनिर्गुण वो माय ॥५॥ ऐसा हा दिपीं दीपपरनायकू । रखुमादेविवरु एकु जोडला वो माय ॥६॥

३६८. **गगन डोळां भासलें** । तें बाहुलीनें कवळिलें । कांहीं एक उरलें रूप अरूपीं वो माये ॥१॥ पूर्वपीठिका सांडूनि मायास्तंभ लंघुनी । निजानंदीं माळ घालूनि म्यां वरिलें वो माये ॥२॥ जो कामिक कामिनी निरंजन निर्गुणीं । पाहातां पूर्णापूर्णीं पूर्ण सहज वो माये ॥३॥ हा भरोनियां पुरला नयनीं वोसंडला । रखुमादेविवरु विठ्ठला मिळाली वो माये ॥४॥

३६९. **नव्हे त्याची दुराशा म्यां सांडिली वो आस** । ज्ञानवैराग्यभक्तिसार वोळला वो माय ॥१॥ सच्चिदानंदघनु आनंदें ओळला । मग मज फावला हा विठ्ठल वो माये ॥२॥ संभोग वोवरीं होतिये निदसुरी । योगिणी खेचरी मज जागविलें वो माये ॥३॥ ऐसा हा गोगिराजु तो विठ्ठल मज उजू । बापरखुमादेविवर देऊं ठेलें वो माय ॥४॥

३७०. **दृष्टीचें गुज सच्चिदानंद सहज** । तें चक्षूच्या अंतरीं निज निरोपिलें वो माये ॥१॥ अनुवादु खुंटला एकपणें एकला । संबंधु तुटला मागिलाचा वो माय ॥२॥ पुरती दृष्टी पूर्ण ब्रह्मींच भासली । त्या सुखा दोंदुली वाढलीवो माय ॥३॥ अवलोकितां न अवलोकवे बोलिजे तैसा नव्हे । हा रखुमादेविवरु भावें माथिला वो माय ॥४॥

३७१. **ब्रह्मपदाची प्राप्ति उमगेल दृष्टी** । परम चैतन्याचे पोटीं विश्वंभरू वो माय ॥१॥अवघाचि देखिला अवघा मालयला । देखोनि निवाला जीवगे माय ॥२॥ कापुराची पुतळी कर्पुरदिपु पाजळी।

तैसी मी त्याच्या मेळीं जाहलें वो माय ॥३॥ तेथें रूप ना छाया त्रिगुण ना माया । रखुमादेविवराचिया उपाया उपायें वो माय॥४॥

३७२. **अंजनीं अंजन साधिलें निधान** । द्वैताद्वैतघन विज्ञानेसीं ॥१॥ सारिलेंसे द्वैत अद्वैत सकळ । निर्गुण निर्मळ निवळलें॥२॥ साध्य साधक वस्तु आलिया पैं हातां । मुरडोनि पाहतां वस्तुमय ॥३॥ ज्ञानदेवी साध्य अज वस्तूचें । देहीं देह साचें नुरे तरी ॥४॥

३७३. **न चुकतां चुकलें** संसार वाटे भांबावलें । अवचितें पडलें ज्ञानपेठे वो माये ॥१॥ माझा निवृत्ति तूं सारा लाधला विकरा । गिन्हाइक पुरा विठ्ठल गे माये ॥२॥ कांहीं नाहीं उरलें प्रेम वो माये ॥३॥ हा पुरोनियां उरला निजानंदु सांवळा । रखुमादेविवरु जोडला कष्टीं वो माये ॥४॥

३७४. **न गणवे परिमाणें न बोलवे अनुमानें** । तो सहज निर्वाणीं ज्ञानें फळला वो माय ॥१॥ मुक्ताची साउली मजवरी पडली । ढेसी ढेसी वोल्हावली अमूर्तधारी वो माये ॥२॥ तेथें एक नवल वर्तलें वो साजणी । सांगतां मिठी मौनी पडली वो माय ॥३॥ ऐसा परोपरी फळला दिव्यरूपें फावला । तो रखुमादेविवरु जोडला वो माय ॥४॥

३७५. **आपला गुणग्राम सांडोनियां गेलिये** । निवांत राहिलिये निर्गुणीं वो माय ॥१॥ परोपरी पाहतां सर्वरूपीं गोपाळ । तो मजपाशीं परि वेळ न लगतां वो माय ॥२॥ अनुवाद खुंटला सर्वांगें भेटला । गुणग्राम तुटला सहज वो माय ॥३॥ ऐसें म्यां रूप आपुलें आपणचि केलें । रखुमादेवीवरें विठ्ठलें वो माय ॥४॥

३७६. **पुरे जरी ह्मणों तरी अमित्य पुरला** । पुरोनियां उरला तेज:पुंज वो माय ॥१॥ ज्ञानाचे खाणीं माणिकें निर्वाणीं । लाधलें मी निर्गुणीं निरालंब वो माय ॥२॥ आत्मत्वाचिया परी खेवणिलीं भूषणें । तें मीं आवडीचें लेणें लेइलें वो माय ॥३॥ हा सुजड्ड जडला विटेसि लाधला । त्या रखुमादेविवरा विठ्ठला मी न्याहाळीं वो माय ॥४॥

३७७. **ज्ञानाचें गरोदर वाढलें परपुरुषें** । व्यभिचारिणी ऐसें म्हणितलें वो माय ॥१॥ नव्हे व्यभिचारिणी नाहीं मज कोणी ।

पाहातां निर्वाणीं सहज जोडलें वो माय ॥२॥ निवृत्ति पुराडला देहेभाव चोखाळला । अंगेंसि मर्दिला ब्रह्मरसु वो माय ॥३॥ आतां उजरणी येई भ्रांती नलगे माझ्या चित्तीं । उजरणी सहज गतीं जाली वो माय ॥४॥ आतां असो हें बोलणें दुजें नाहीं सांगणें । चिदानंदघन तेणें वाढलें वो माय ॥५॥ ऐसा देखणिया देखिला निजगुप्त प्रकाशला । तो रखुमादेविवरु मज फावला वो माय ॥६॥

३७८. **जाणोनि नेणपण अंगीं बाणलें ।** नेणोनियां जाणपण सहज नेणवलें वो माय ॥१॥ आत्मज्ञानाची गति जाली वो निवांत । प्रबोधतत्त्व मी पावलों वो माय ॥२॥ पाचारिलें अवस्था स्वभावें जाहल्या । म्हणोनि विसरला देहभाव माय ॥३॥ गुरुमुखें जैं जोडे तैं फिटे सांकडें । रखुमादेविवर कोडें कवतिकें वो माय ॥४॥

३७९. **अंजनीं संपूर्ण ठेऊनियां जन ।** ज्ञानी ज्ञानघन निरालंबीं ॥१॥ आदि मध्य आंतु दिसोनियां दिसे । पाठीं पोटीं वसे निघोट रया ॥२॥ श्रवण नयन जाति गोतपण । जिवशिवा खूण आत्मपणें ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे वाच्य वाचक योगें । हरिवीण वाउगें नाहीं रया ॥४॥

३८०. **ज्ञानें ध्यान पटीं तंतु पैं मनाचा ।** हरिरूप वाचा सारीपाठ ॥१॥ स्वरूप कामारी वाग्पुष्पें चारी । विरुळा मापारी जाणे खूण ॥२॥ त्रिगुण सवडी घालुनि उलथी । एकरूप पंक्ति जेवि नरु ॥३॥ ज्ञानदेवी घर तत्वतां निर्गुण । परेचें संपूर्ण घर केलें ॥४॥

३८१. **मृत्यूचेनि मापें जे जे गेले प्राणी ।** तयाची शिराणी यम करी ॥१॥ यम नेम धर्म आह्मां नाहीं कर्म । अवघेंची ब्रह्म होउनि ठेलों ॥२॥ द्वैतभाव ठेला अविनाश संपन्न । आपेंआप जनार्दन येईल घरा ॥३॥ ज्ञानदेव म्हणे काज सरलें संसारीं । चारीही मापारी गिळूनि ठेलों ॥४॥

३८२. **स्वरूपीं पाहातां लक्षलिही घेतां ।** अरूप अनंता गुणीं नाहीं ॥१॥ कैसेंनि स्वरूप प्रकाशें पैं दीप । एकीं एका सोप आकळे कैसें ॥२॥ नाहीं पा आधार आधारासि निर्धार । परेसि परेपार परम तत्त्वं ॥३॥ ज्ञानदेव घरीं पश्यंती वोवरी । वेदश्रुती घरीं दीप केले ॥४॥

३८३. **लवण पवन जळापासाव धीर ।** पावन समीर रवी तया

॥१॥ तेज दीप्तीं आत्मा इंद्रियां प्रकाशी । अमरसुनी ग्रासी दिव्य तेज ॥२॥ पंचक दशक तत्वता विचारी। एकरूपें सरी ग्रास त्याचा ॥३॥ ज्ञानदेवा जप हरी आत्मा माझा । चिंतितां नील जाये तूं वेगीं ॥४॥

३८४. **सायुज्य सदन श्यामाचिये घरीं** । हृदय कल्हारा श्यामतनु ॥१॥ सचेत अचेत नित्यता विरक्त । असोनि अलिप्त जन्ममरण ॥२॥ नारायण साध्य साधक साधिता । विग्रह पूर्णता आंगीं लागो ॥३॥ ज्ञानदेवी मौनीं गुणग्रास धाम । सर्वत्र आराम हरी माझा ॥४॥

३८५. **मोहाचें मोहाळ सांगितलें एकी** । पाहतां परिपाकीं मोहाळ नाहीं ॥१॥ मोहिलेंची दिसे मोहामाजी रसें। नसोनियां भासे तदात्मक ॥२॥ बिजीं बिज हरी दिसोनि अविट । विटोनियां नीट कळिका फाके ॥३॥ बापरखुमादेविवरा अबोला सबळे। अवघेंचि निवळे गुरूकृपा ॥४॥

३८६. **एकी ह्मणे ग्रह दुजी ह्मणे मोह** । एकीनें सोहं सांगितलें ॥१॥ कोहं वाचे वारी सोहं मतें सारी । वैकुंठींची दरी उघडली ॥२॥ ककार भेदिला मकार शोधिला । ॐकार निमाला तये स्थानीं ॥३॥ ज्ञानदेवीं ओहं सोहं गिळिलें पैं कोहं । नाहीं आह्मां मोहं कल्पनेचा॥४॥

३८७. **दुजेपणींचा भावो आम्हां नाहीं ठावो** । सर्वी सर्व देवो आकारला ॥१॥ कैसें याचें करणें सांग आम्हां माय । कामधेनु होय कल्पनेची ॥२॥ नित्यसुखवेधें वेधली कामना । कृष्णीं कृष्णनयना एक तेजें ॥३॥ निवृत्ति साचार ज्ञानदेवीं आचार । कृष्णाचि परिवार क्षरलासे ॥४॥

३८८. **अवघेंचि मनें दोहीलिया धेनु** । प्राणापानीं प्राणु निवविला ॥१॥ तें रूप परब्रह्म प्राणें प्राण सम । करुनियां नेम जपों आह्मीं ॥२॥ नेणों धूर्ति उर्ति कैंची हे प्रवृत्ति । कृष्णोंचि समाप्ति सर्व करूं ॥३॥ निवृत्तीचें तारूं कृष्णीं कृष्णसुख । ज्ञानदेवा चोख दिधलें नाम ॥४॥

३८९. **निर्गुणाची छाया सगुणीं बिंबली** । तत्त्वीं तत्त्व गेली अनुठायां ॥१॥ निश्चळीं निश्चळ नलगे अळुमाळ । तत्वता अढळ ते

वेगळेची ॥२॥ नातळतां पंथीं शब्दाचा सुहावा । परेसहित दोहावा भरला दिसे ॥३॥ ज्ञानदेवीं रम्य दिसोनि न दिसे । निराकारीं भासे तदाकार ॥४॥

३९०. **दिपाचेनि तेजें पैस घेतीसे माया** । जाय सांगावया द्वैतभावो ॥१॥ द्वैत नाहीं अद्वैत नाहीं । ठाईंच्या ठायीं एकतत्वीं ॥२॥ तैसे रसमय तेज स्नेहार्णव बीज । छाया मोहबीज न बिंबत ॥३॥ बापरखुमादेविवरु वोतली ये कळा। न दिसोनि सोंविळा दिसे हरी ॥४॥

३९१. **सगुणींच्या रातीं निर्गुणीं दिवटा** । सांगती चोहटा वाग्पंथ ॥१॥ वागेश्वर हरी वाचेचा वाचक । आधीचाही अर्क दीपतेजें ॥२॥ साकारीं निराकार बिंबीं बिंब अवतार । अवघें माजिघर बिंबलेंसे ॥३॥ बापरखुमादेविवरु ॐतत्सदाकार । निवृत्ति निर्धार माजीवटा ॥४॥

३९२. **सातता वसोनी मायेसी पर** । विज्ञान हें घर जीवीं वसे ॥१॥ ज्ञानी वसे विज्ञानी न दिसे । बिंबीं बिंब रसें समता शांति ॥२॥ आपीं आप रस जनवन दारा । विज्ञान उभारा भावी दिसे ॥३॥ बापरखुमादेविवरु उभारण हरी । दिपु माजिघरीं ठेविला असे ॥४॥

३९३. **वृत्तीचा उच्छेद मनाचा निग्रह** । धारणा विग्रह तेजतत्त्वीं ॥१॥ बिंबामाजि बिंब हरपलें स्वयंभ । मायेचा पैं लोभ अरता जाला ॥२॥ नाहीं तेथें छाया मायेचा विलास । घरभरीं पैस दीपीं रया ॥३॥ बापरखुमादेविवर ज्ञानदेवा धन । वस्तूची विवरण तेजाकारें ॥४॥

३९४. **ज्योतिस ज्योती मेळऊनी हातीं** । तंव अवचिती झोंबिन्नली ॥१॥ अद्वैत पाहतां न दिसे गुणमेळु । गुणा गुणीं अडळु ठाउका नोहे ॥२॥ शून्याहि परता आदि अंतु नाहीं । तो असोनियां देहीं धांवो सरे ॥३॥ बापरखुमादेविवरु विसरला धांव । हरिरूप भाव दीपकळा ॥४॥

३९५. **आदि मध्य अंत सर्वसम हरी** । घटमठचारी भरला दिसे ॥१॥ देखिलागे माये अलक्ष लक्षितां । शांति पक्षवाता समबुद्धि ॥२॥ भावबळें घन अलोट अभंग । चित्संगें भंग

प्रपंचाचा ॥३॥ ज्ञानदेव बोले नित्य नाम प्रेम । तेथेंचि विश्राम हरिचा असे ॥४॥

३९६. **कापुराची सोय कापुरींची माय** । परतोनि धाय नेघे तैसी ॥१॥ असोनि नसणें सर्वत्रीं दिसणें । हरि प्रेम घेणें पुरे आम्हां ॥२॥ सुखरूप जीव असतांचि शिव । हारपले भाव विज्ञानेंसी ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु सुखाचा । तरंगुही नांवाचा परतेचिना ४

३९७. **अंतरींचा विस्तारु ब्रह्मीं पाल्हायिला** । तेथें एक मनु सिद्ध साधकु भला ॥१॥ तेणें केलें अनारिसें केलें अनारिसें । पाहों गेले सरिसें हारपलेंगे माये ॥२॥ तेथें ऋग्यजु:साम भुललें । तें माझ्या ठायीं फुलले ब्रह्ममय ॥३॥ रखुमादेविवर अंतरब्रह्मीं तरंगु जाला । ब्रह्मउदधी सामावला मज घेऊनि मायं ॥४॥

३९८. **निर्गुणाचे हातीं व्यवहारु पडिला** । दाईजपणा मुकला साभिलाषें ॥१॥ निरंजन वनीं धरीन मुरारी । भाग अभ्यंतरीं घेईन देखा ॥२॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु सोवळा । भागा मज आला हरिहरु ॥३॥

३९९. **एक भान गिळूं दुजें द्वैत उगळूं** । कासेवीचा मेळूं गिळूं सगळा ॥१॥ पोटभरू येणें वैकुंठीचें पेणें । सेवासुख जाणें कृष्णसुखी ॥२॥ डोंगर सगळे मायेचे मोकळे । प्रपंचा नाकळे पाहें तूं ॥३॥ ज्ञानदेवा साध्य ज्ञानाचें उपाध्य । येर तत्व बोध्य मुक्त कैचें ॥४॥

४००. **ध्यान धारणा मंत्र साधन** । त्रिकाळीं जपन अजपा सिद्धी ॥१॥ नटकेचि अटकु ठाईंचेंचि निर्गुण । मज कवणें ठाईं घेउनि गेलें ॥२॥ देश वाढले दिश आटले । चहूं द्वारें कोंदलें ब्रह्मतेज ॥३॥ रखुमादेविवरु अठांगीं आगळा । सप्तधातु वेगळा ब्रह्मउदधि ॥४॥

४०१. **विश्वाचें आर्त माझ्या मनीं प्रकाशलें** । अवघेंचि जालें देहब्रह्म ॥१॥ आवडीचें वालभ माझेनि कोंदाटलें । नवल देखिलें नभाकारगे माये ॥२॥ बापरखुमादेविवरु सहज निटु जाला । हृदयीं नटावला ब्रह्माकारें ॥३॥

४०२. **अनुभव जाला प्रपंच बुडाला** । आपुला आपण देखिला सोहळा गे माय ॥१॥ आपण जाणतां आपण मी जालिये । आप-

णापैं विसरलिये नेहटीं वो माये ॥२॥ आपुला ह्मणोनि अवघा आलिंगिला । देखिला अवघेपणें वो माय ॥३॥ ऐसें जाणोनि ठकलें ठकोनियां ठेलें । रखुमादेविवरें विठ्ठलें वो माय ॥४॥

४०३. दुजेपणाचा भावो माझिये ठाउनि जावो । येर सकाळिक वावो म्यां त्यजियेला ॥१॥ माझें मीच जाणें अनु कांहीं नेणें ॥ अनुभवियें खुणें संतोषिलें ॥२॥ माझा मीचि श्रोता माझा मीचि वक्ता । माझा मीचि दाता त्रिभुवनीं ॥३॥ एकल्यानें एकला अनंतरूपें देखिला । दुजेपणा मुकला ज्ञानदेवो ॥४॥

४०४. योगिया दुर्लभ तो म्यां देखिला साजणी । पाहतां पाहतां मना नपुरेचि धणी ॥१॥ देखिला देखिला माय देवाचा देवो । फिटला संदेहो निमालें दुजेपण ॥२॥ अनंतवेषें अनंतरूपें देखिलें म्यां त्यासी । बापरखुमादेविवर खुण बाणली कैसी ॥३॥

४०५. नादबिंद कळा ज्योति स्वरूपीं विलया जाती । श्रुति नेति नेति ह्मणती जेथें ॥१॥ नाहीं मज चाड सकळ उपाधी । एका मंगळनिधि वांचूनियां ॥२॥ श्रीरामीं रमतां मनु निवडितां नये तनु ॥ सुखश्री सांगतां सिणु हारतु असे ॥३॥ पदापिंडा दाटणी रुपानिरूपा निरंजनीं । विठ्ठला चरणीं ज्ञानदेवो ॥४॥

४०६. अद्वैताची झडपणी ब्रह्मीं निमाली । तन्मय तत्त्वतां ब्रह्मींच मुराली ॥१॥ परतोनि पाहणें परतोनि पाहणें । नाहीं त्या ठाया जाणें रूपेंवीण ॥२॥ बापरखुमादेविवरु रूपेंविण देखिला । आठकु ठाकला द्वैताकारें रया ॥३॥

४०७. पाहातां वटाचा विस्तारु कैसा । शाखा फुटलिया कळिया तैसा ॥१॥ सांगा लपणें तें काय जालें । वट विस्तार दोही हारपले ॥२॥ विशुद्धचक्रीं मेरु हा नेडे । तेथें परदीपीं साहित्य जोडे ॥३॥ बापरखुमादेविवरा विठ्ठला । मनोमानसीं तयां सामावला ॥४॥

४०८. जाणों गेल्यें तंव जाणणें राहिलें । पाहों गेलिये तंव तेंचि जालेंगे माये । इंद्रियांसहित चित्त ठकलेंचि ठेलें । मी माझें विसरलें स्वयें भाव ॥१॥ ऐकोनि देखोनि मन होय अंधळें । परतोनि मावळे नाहीं तेथें ॥२ ॥ अविद्या निरसली माया तुटली । त्रिगुण साउली

तेथें रूप कैचें । चांग विचारिलें विवेकें उगवलें । ज्ञान हारपलें तयामाजी ॥३॥ मुकियाचे परी आनंदु भीतरीं । अमृत जिव्हारीं गोड लागे । बापरखुमादेविवरु विठ्ठलु जाणे । संत ये खुणें संतोषले ॥४॥

४०९. **माझें स्वरूप म्यांचि शृंगारिलें** । निर्वाणीं म्यां केलें लयाकार ॥१॥ आपुली सोय वाढवावया गेलें । तंव आपणाचि जालें आपण्याठायीं ॥२॥ सहज गुणाचें निर्गुण वो केलें । माझें म्यां पाहिलें मन मावळुनी ॥३॥ तीन चारी मिळोनि येके ठायीं घातली। बापरखुमादेविवरा विठ्ठलीं फावलीं ॥४॥

४१०. **येकी सांगें मातु येकी सांगें रेतु** । तो कोण दृष्टांतु साखिये सांगें ॥१॥ बाई येक सरें नाहीं पैं दुसरें । निवृत्ति दातारें सांगितलें ॥२॥ पांचांची मिळणी साही चक्रपाणी । दशमाची कहाणी येकादश ॥३॥ ज्ञानदेवी सार चौ वेदीं पार । येकतत्त्वीं विचार विज्ञानेंसी ॥४॥

४११. **सुखादि सुख तें जालें अनमीष** । पाहाणें तेंचि एक पारुषलें ॥१॥ काय सांगु मातु वेगळीच धातु । जिवा हा जिवांतु व्यापुनि ठेला ॥२॥ नचले नचले कांहीं कौटाल कामान । देहींच विंदान रचिलेंगे माये ॥३॥ बापरखुमादेविवरें विठ्ठलें निटें । वायांविण विटे मिस केलें ॥४॥

४१२. **आस्वादु स्वादु ये दोन्ही नाहीं** । तेरावें पाही साहवा ठायीं ॥१॥ तेथें सातवें पंचाक्षरीं जपणें । संहार होणें तमोरूपें ॥२॥ रखुमादेविवरु शुद्धसत्वेंवीण । शुद्धबुद्ध मी जाण जालेंगे माये ॥३॥

४१३. **बारावें वरतें तेरावें हारपलें** । चौदावें देखिलें चौडोळां ॥१॥ चौघांची भाज मी नहोनियां गेलें । तंव अनारिसें महाकारण देखिलें ॥२॥ बापरखुमादेविवरु भूतजाता वेगळें । पराहूनि परतें पांगुळलें ॥३॥

४१४. **कापुराचें भांडें म्यां ब्रह्मरसें भरिलें** । घ्राणीं निमालें परिमळे सहित ॥१॥ तेथें परिमळु नाहीं स्वादु पैं नाहीं। सुखदुःख नाहीं कांहींचि नाहीं ॥२॥ रखुमादेविवरेंसि ठक पडिलें कांहींच नाहीं । चौघे स्वभावें बोलताती ॥३॥

४१५. **पाचांची वाट पाचांसवें गेली** । येरासि जाहली देशधडी ॥१॥ अकरावें होतें धरूनियां नेलें। बारा तेरा गिळिलें धन माझें ॥२॥ रखुमादेविवरु चुळु पैं घोटिला । निधन जाहला शुद्धपणें ॥३॥

४१६. **आस पुरऊनि आस पुरवावी** । ऐसी भूक मज लागों द्यावी ॥१॥ तें अनुपम्य कैसेंनि सांगावें । जीवा चोरूनि भोगिजे तें जीवें ॥२॥ दृष्टी कीर होय जरि निकें । द्रष्टा होय वेडा जयाचेंनि सुखें ॥३॥ ज्ञानदेवो ह्मणे करुनियां निकें । विठ्ठल परमात्मा भेटेल या फावेतें ॥४॥

४१७. **मनाचि वाती लाऊं गेलीये ज्योती** । ते अवघीच प्राप्ति ज्योतिरूपें ॥१॥ तेथें ब्रह्म गर्भा आलें ब्रह्म गर्भा आलें । लय लक्ष उरलें बाईयेवो ॥२॥ रखुमादेविवरु अप्रमेय देखिला । तोही इच्छितां हारपला माझ्या ठायीं ॥३॥

४१८. **अष्टही अंगें नवही व्याकरणें** । सप्तही त्वचा भेदोन गेलें गे माय ॥१॥ तेथें वेदां वाट न फुटे । वेदां वाट न फुटे । येरासी कैंचें पुरपुढेगे माये ॥२॥ रखमादेविवरु मज फावला । देखोनि वोरसला पर पाहीं ॥३॥

४१९. **जतनेलागीं जीवन ठेविलें** । स्वस्वरूपीं हारपेलं ज्ञान-पंथीं ॥१॥ माझी दोन्ही सामावली माझी दोन्ही सामावली । निज-ब्रह्मीं गुंडिली मनेंसहित ॥२॥ अवघा कोल्हाळ एकनिष्ट जाला । ब्रह्मरसीं बुडाला निवडेचिना ॥३॥ रखुमादेविवरु जगाचें जीवन । त्याचेंही मीपण गेलें विठ्ठलनामें ॥४॥

२२०. **स्मरों कैसेंनी विस्मरों कैसेंनी** । दोहिपरि मज अटी रया ॥१॥ पाडु पाडिला विषम ठायीं । देतां घेतां नुरेचि कांहीं ॥२॥ रखु-मादेविवरु विठ्ठलु नेणिजे । तंव तोचि तयासि अठावी रया ॥३॥

४२१. **कूटाकूट अतीं कूटस्थ पैं जालें** । अशेष उरलें त्या वेगळें गे माय ॥१॥ गुणा भ्यालें ह्मणोनि निर्गुण पैं जालें । तें निराकार आ-थिलें माझ्या अंगीं ॥२॥ बापरखुमादेविवरु अधउर्ध्व वेगळें । अर्धमा-तृका सामावलें अशेष परेसहित ॥३॥

४२२. **एकांतींचें गुज पुसों गेलिये सये** । मी माझी नाहीं त्यासि

कीजे वो काये ॥१॥ ऐसी भेरी निवाडे सांगिजे कोणापुढें । मनासी सांकडें पाडिलें रया ॥२॥ सुलभ सुकुमारु रूपें मनोहरु । रखुमादेविवरु परेही परता ॥३॥

४२३. **चातकेंविण लक्ष अंतरींच ठसलें** । तेथें एक वोळलें ब्रह्म मेघ ॥१॥ तें जीव अमृत जीवास जालें । त्याहुनि एक आगळेंगे माय ॥२॥ रखुमादेविवरु हातेंवीण स्पर्शलें । चक्षुविण देखिलें निज ब्रह्मगे माये ॥३॥

४२४. **तें अवघेंचि नव्हे नव्हे अवघेंचि होय** । आवघ्याविण सोय आणिक असे ॥१॥ अवघे ह्मणिजे तें व्योमाकार दिसे । त्याहुनि परतें असेगे माय ॥२॥ रखुमादेविवरु परता पाहावया गेलें । परतें पराहूनि देखिलें गे माये ॥३॥

४२५. **तनुमनुधनें पूज्य पैं केलें** । आत्मलिंग पूजिलें बाईयेवो ॥१॥ तंव निराकार देखिलें निराकार देखिलें । मी पूजनलिंग तिन्हीं हारपलें ॥२॥ रखुमादेविवरु निजलिंग विवळलें । आवघी अवघे ठायीं सामावलें बाईये वो ॥३॥

४२६. **सगुणाची सेज निर्गुणाची बाज** । सांवळी विराजे कृष्णमूर्ति ॥१॥ मन गेलें ध्याना कृष्णचि नयनीं । नित्यता पर्वणी कृष्णसुखें ॥२॥ हृदयपरिवारीं कृष्ण मनोमंदिरीं । आमुच्या माजघरीं कृष्ण बिंबें ॥३॥ निवृत्ति निघोट ज्ञानदेवा वाट । नित्यता वैकुंठ कृष्णसुखें ॥४॥

४२७. **आहे तें पाहीं नाहीं तें कांहीं** । ठायींच्या ठायीं हरपलें ॥१॥ नाहीं आह्मां काज नाहीं आह्मां चोज । आमुचें निज गोविंदराज २ बापरखुमादेविवरु आनंद सोहळा । ब्रह्मानंदकळा भोगीतसे ३

४२८. **निर्गुणाचा पालऊ लागला** । लय लक्षीं हारपला देह माझा ॥१॥ वायांविण गेलें वांयावीण गेलें । अवघी बुडालें ब्रह्मेसाहित ॥२॥ रखुमादेविवरु विठ्ठलु मालाथिला । निजपद पावला जिऊ शिवीं ॥३॥

४२९. **कोटीची भरोवरी सरोनी गेली शरीरीं** । संसाराची उरी कांहीं नुरेचिगे माय ॥१॥ लक्षाचा लाभ मज घडलागे माय । कवणें उपायें चरण जोडले वो ॥२॥ चिंतनीं चिंतितां काय चिंतावें । तें

अवघेंचि मनीं रूप गिळावेंगे माये ॥३॥ बापरखुमादेविवरु देहेंवीण आलंगिला । तो समर्थ माल्हाथिला बाईये वो ॥४॥

**४३०. मी बोल बोलें तो गेला कवण्या ठायां** । हें पुसों आलें लवलाह्मां वो । कव्हणि न सांगति मागूं धावें काह्या । आतां लाजिलें ऐशा स्नेहागे माये ॥१॥ चला कांवो मज आडोनी रूप पाहोंया कां माझें मजलागुनी । वेडावलें मज देखुनी शेखीं मी माझें गेलें हारपोनिगे माये॥२॥मी बोला मज आंतु कीं बोल मजआतु मुसें मुरालें रूप रूपांतु । बापरखुमादेविवरु विठ्ठलासि एकांतु आतां पुरला अंतु दुजेपणागे माये ॥३॥

**४३१. आह्मीं संन्यास घेतला** । देहादिकांचा त्याग केला ॥१॥ आह्मी संन्यासी संन्यासी । सदा राहों एकांतेंसी ॥२॥ चित्तचतुष्टय निरसिलें । अज्ञाना तिळोदक दिधलें ॥३॥ ज्ञानाचि विज्ञान आलें हातां । आह्मां नाहीं शरीरीं ममता ॥४॥ ब्रह्मांहमास्मि शुद्धज्ञान । तेथील सांडिला अभिमान ॥५॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु हृदयीं । तोचि सबाह्यअभ्यंतर ठाईं असे रया ॥६॥

**४३२. माझी प्रकृति निष्कृति जाली** । ब्रह्मीं सामावली बाईये वो ॥१॥ देहेंविण ब्रह्म देखें देहेंविण ब्रह्म देखें । तेणें निर्गुण राखे रोखावलें ॥२॥ जाणतां ह्मणोनि नेणतां पैं गेलें । शेखीं आपणातें विसरलें बाईये वो ॥३॥ रखुमादेविवरु नेणोनि जाणितला । जाणपणें निमाला माझ्या ठायीं ॥४॥

**४३३. समर्थ सोयरा बोळावा केला** । परि मार्गु गमला सुखाचा बाईये ॥१॥ भय आमुचें गेलें न व्हावें तें जालें । तो चोरुचि वोळखी जाली बाईये ॥२॥ लक्षाचा लाभु जोडला ठावो । रखुमादेविवरु विठ्ठल नाहो ॥३॥

**४३४. काळा लपंडाई काळेरात्री खेळे** । मी सवें वेधिली जाय काळ्याछंदें ॥१॥ काळेंनिळें हें अभ्र भासलें । ऐसें रूप देखिलें निर्गुणाचें ॥२॥ ऐसा हा सांवळा माझिये दृष्टी माल्हाथिला । उजरूनि गेला हा विठ्ठलुगे माये ॥३॥ ऐसें भुलविलें जाण काळेपणें आपणें । रखुमादेविवरु जाणें येर कांही नेणें ॥४॥

४३५. **अद्वैत येणें अद्वैतपणें सांडिलें** । थितें होतें तें माझें ठायीं पैं गेलें ॥१॥ नाहीं तेंचि पाहावया वायांविण गेलें । तंव पाहाणेंचि जालें बाईये वो ॥२॥ बापरुखुमादेविवरु जुनाट जुनघडा । तोहि म्यां सांडिला अरूपसंगें ॥३॥

४३६. **मन वाचा बंदु निर्वाणीं घातलें** । निर्माण होतें माझे ठायीं माल्हाथिलें ॥१॥ चंचळ मन ब्रह्मीं निश्चळ जालें । अवघेंचि निमालें ब्रम्हार्पणीं ॥२॥ रखुमादेविदरु विठ्ठलु उघडा । व्योम पांघुरे फुडां देखों निघाले ॥३॥

४३७. **पंचबाणें माझें हृदय भेदलें** । पांचेविण पावलें च्याऱ्ही सांडूनियां ॥१॥ सकळै माझें गोत मुसे आलें । ब्रह्मरसें जालें बाई-येवो ॥२॥ बापरखुमादेविवरु ब्रह्मरसे विवळला । मजसहित निमाला ब्रह्मरूपींगे माये ॥३॥

४३८. **साता व्योमापरतें पाहों गेलें** । तंव पाहणेंचि जालें ब्रह्म उदधी ॥१॥ साट मोट माझी मोट बांधिली । नेऊनि टाकिली निर्गुणींगे माये ॥२॥ बापरखुमादेविवरु पंचविसावा देखिला । तोही खुंटला तये पंथीं ॥३॥

४३९. **चक्राकार चक्ररूप चक्रधरू ह्मणवी** । पाहतां अंतरीं न दिसे कांहीं ॥१॥ पाहातां पाहातां मी पर ठाया गेलें । तेथें एक देखिलें महद्भूत ॥२॥ रखुमादेविवरु महद्भूता वेगळा । त्याहूनि तो मनीं मानलागे माय ॥३॥

४४०. **कवतुक पाहावया निरंजना गेलीये** । तंव निराकार जालें बाईये वो ॥१॥ अकरासहित पांच पांचीं मावळलीं । आदि अंतीं उदयो जालीं तेजाकारें ॥२॥ रखुमादेविवरु परतोनि देखे । तोही पारुषे तिये ठायींगे माये ॥३॥

४४१. **शृंगार करूनि हरिनाम तांबूल गुरुअंजन लेउन डोळां** । भातारु होता तो निःशब्दीं खिळिला परतोनि माघारीं ठेलिये ॥१॥ काम निदसुरा कामिनी जागे कांहीं के विपरित गमे । भोगल्याच्या ठायीं निशब्दीं खिळिला आपआपण्यातें रमे ॥२॥ पति पद्मिणीविणें गर्भ संभवला सवेंचि प्रसूत जाली । तत्वबोध उपजला तेणें गुढी

उभाविली ॥३॥ तया पुत्राचेंनि सुखें सर्वहि विसरलें देहभावा पडला विसरु। बापरखुमादेविवरु विठ्ठलीं तेथें आगिकाचा नव्हे संचारुगे बाईये ॥४॥

---

# उपदेश.

## वेषधाऱ्यास उपदेश.

४४२. **शरीर वरिवरि कां दंडिसि** जंव वारिलें न करी तुझें मन। जळीं नेत्र लाउनि ठोकती अविंशा लागोनि तैसें नको नको बकध्यान रया ॥१॥ चित्त सुचित्त करीं मन सुचित्त करीं। न धरीं तूं विषयाची सोय। वनीं असोनी वनिता चिंतिसि तरि तपचि वाउगें जाय रया ॥२॥ त्रिकाळ स्नान करिसी तीर्थजळीं परि नव-जाती मनींचें मळ। तुझियानि दोषें तीर्थ कुश्चित्त जाली जैसी त्या रजकाची शीळ रया ॥३॥ आतां करिसि तरी चोखटच करी त्यासी साक्ष तुझें मन। लटिकें न झकवसी तऱ्ही देव दुऱ्हा होसी बापर-खुमादेविवरा विठ्ठलाची आण ॥४॥

४४३. **मतमतांतरें रचूनियां ग्रंथु** ज्ञानव्युत्पत्ति जंव जाली नाहीं आत्मप्रतीत। ये सकळाचि ज्ञानें विषयासक्तीचेनि अनुमानें तेणें केविं तुटे संसृती। अंतरींचा स्फुलिंग जाज्वल्य जाणतां काम क्रोधाचिया उपपात्ति। बाह्य दीक्षा उदंडी आणुनियां तेणें केविं होय ब्रह्मप्राप्ति रया ॥१॥ सुढलेपणें करिसी विषयत्याग तेणें अंतरीं होय अनुराग। परतोनि तरीच पावशी ब्रह्म भाग रया ॥२॥ आपुलेनि रूढपणें ग्रंथाचे विज्ञानें संपदा मिरविती ज्ञातेपणें। अंतरीं आशापाश विखार भरणें जगीं संतता मिरवणें। येणें ज्ञानें म्हणसी मी वंद्य जगीं कीं उपासनाद्वारें मुक्त होणें। पालट केलियासाठीं सिणो नको बापा जेविं गंधर्व नगरीं वस्ती करणें रया ॥३॥ योलागी दंभ दर्प सकळ प्रतिष्ठादि भ्रांति धनदारा विषयासक्ती। ऐसा अहंममते ज्ञातेपणा-चेनि अहंकारें तेणें केविं होय आत्मप्राप्ति। जंव येणें देहें विनीतता शरण गेला नाहीं संताप्रती। बापरखुमादेविवर विठ्ठलु चिंतितां। सर्व सुखाची होय निजप्राप्ति रया ॥४॥

४४४. **तोंडें जाले संन्यासु** । भोगावरी धावे हव्यासु ॥१॥ ते नेणती ब्रह्मरसु । वायां होती कासाविसु ॥२॥ ब्रह्मकर्मातें साधू जाती। वायां चुकली तुझी भक्ति ॥३॥ सर्वत्र आपणची ह्मणती । अभक्ष भक्षण करिती ॥४॥ तोंडीं दंभ माया धंदा । शरण रिघेंरे गोविंदा ॥५॥ चुकले विठ्ठला उदारा । बापरखुमादेविवरा ॥६॥

४४५. **विटंबुनि काया दंड धरी करीं** । हिंडे घराचारी नवल पाहें । असमाधानी विषयीं विव्हळ । तरी केवळ दंड काजा काई ॥१॥ सिद्धचि असतां कां गा विटंबिसी । नव्हेचि संन्यासी तूं जाण कैसा॥२॥निजाश्रमींचे वास संकल्पासी त्यागी । सर्वस्वें वैरागी तोचि संन्यासी । संगीं असंगता तोचि जाण संन्यासी । स्वरूप तयापाशीं जवळी आहे ॥३॥ बापरखुमादेविवरु उघडाचि संन्यासी । तोचि पूर्ण भासीं भरला असे । निवृत्तिरायें खुणा दाखविला निरुता । तो जाणण्या परता सदोदितु ॥४॥

## संसारतापानें तप्त झालेले प्राणी बाह्य वेषधारी साधूंचा आश्रय करितात त्याचा परिणाम.

४४६. **तापत्रयिं तापलीं गुरूतें गिवसिती** भगवे देखोनि ह्मणती तारा स्वामी । तंव ते नेणोनि उपदेशाची रीती आतां न उपदेशिती ठकले निश्चितीं तैसें जालें ॥१॥ संत ते कोण संत ते कोण । हे जाणवि खुण केशविराजा ॥२॥ कोणी एक प्राणी क्षूधेनें पिडिले । ह्मणोनि दोडे तोडूं गेले । खावों बैसे तों नुसधिरूपीं उडे । ठकले बापुडे तैसें झालें ॥३॥ कोण्णी एक प्राणी प्रवासें पीडिला । श्नेहाळु देखिला बिववातु । तयाचें श्नेह लावितां अंगीं । सुजला सर्वांगीं तैसें जालें ॥४॥ कोही एक प्राणी पडिला झडीं । ह्मणोनि गेला पैल तो झाडी । खा खात अस्वली उठलि लवडसवडी नाक कान तोडी तैसें जालें ॥५॥ ऐशा सकळ कळा जाणसी । नंदरायाचा कुमर ह्मणविसी बापरखुमादेविवरु विठ्ठलीं भेटी । पडालि ते न सुटे जिवेंसी ॥६॥

## खऱ्या त्यागाचें वर्म न कळतां बाह्य गृहादि त्याग्यास उपदेश.

**४४७. घरदार वोखटें त्यजूं म्हणसी तरी शरीरा येवढें जाड ।** मायबाप वोखटीं त्यजूं म्हणसी तरी अहंकार आविद्येचें कोड । बंधु सखे त्यजूं म्हणसी तरी काम क्रोध मद मत्सर अवघड । बहिणी पाठीच्या त्यजूं म्हणसी आशा तृष्णा मायाचें बंड रया ॥१॥ त्यजिलें तें काय कासया म्हणिजे सांग पा मजपाशीं ऐसें । जया भेणें तूं जासी वनांतरा तें तंव तुजचि सरिसें रया ॥२॥ स्त्री वोखटी त्यजूं म्हणसी तरी कल्पने येवढी भोक्ती । पुत्र अपत्य त्यजूं म्हणसी तरी इंद्रियांसि नाहीं निवृति । सकळ गणगोत त्यजूं म्हणसी तरी हे अष्टधा प्रकृति । आवघेंचि त्यजूं पाहे म्हणसी तरी मना नाहीं निज शांति रया ॥३॥ अवघींचि तुज जवळी दुमदुमित असतां वरीवरी मुंडिसी कां करिसी विटंबना । सहज संतोषें असोनि जैसा तैसा परि तो सदगुरु पाविजे खुणा । आपुले आश्रमीं स्वधर्मीं असतां सर्वत्र एकुवि जाणा । बापरखुमादेविवरुविठ्ठलु इतुकिया साठीं नेईल वैकुंठभुवना ॥४॥

**४४८. प्रपंचाचें जगड्वाळ दुस्तर जरी मानिसी ।** त्याग करूनि केउता जासी । जें जें त्यागिलें तें तें तुजमाजी । त्यागिलें तें काय सांग आह्मांसी । तुझें तुजाचि माजि प्रपंचेंसि तूं सर्वांमाजी व तैसी । ऐसें जाणोनियां कां विटंबिसी बापा । टाकूनि केउता जासी रया ॥१॥ मनेंसि विचारीं निर्धारूनि योग करीं । तुझें तुजमाजि अरे आतां विचारीं बापा । अरिमित्रसम होऊनि मन हें शुद्ध होयतेंचि तूं होऊनि राहें जाण बापा ॥२॥ बाह्य त्यागिसी तरी तो त्यागुचि नव्हे पालटिसी तरी ते विटंबना । धरिसी तरींचि तो बंधु मोक्ष मागता हे जडपणा । तरि गेलिया जड तो मोक्षचि नव्हे साचा चुकलासि उगाणा। वृत्तिशून्याकारें अवलोकितां तंव तेणें नव्हे तुज वस्तुज्ञान । ऐसें जाणोनि कां सिणसीरे बापा । हेचि धरुनि राहें निजखुण रया ॥३॥ ह्मणोनि आतां इतुकें करीं । साच तें हें

धरीं तुझें मन होय तुज अधिकारी। तैं सर्वही त्याग तुज फळती बापा। जैं एकचि होऊनि निर्धारी नलगे सिणणें दंडणें येणेंचि आश्रमभावें ऐसेंचि मनें निर्धारीं। बापरखुमादेविवरु विठ्ठलु चिंतितां सर्व प्रपंचाची जाली बोहरी। निवृत्तिरायें खुणा दाऊनि सकळ। निजीं निजाचे निज निर्धारी रया ॥४॥

४४९. **आलियाचा संतोष गेलियाची हानी**। नाहीं त्याचा अतिशो वेंचे त्याची काहणी। ऐसे संकल्प विकल्प देहीं वरिवरि मुंडिलिया होय काय। तरि बहुरूप्याच्या ठाईं काई काई नटु नसे रया ॥१॥ आधीं भितरीं दंडावा पाठीं बाहिजु मुंडावा। नाहीं तरी योग भांडिवा कां करिसी रया ॥ध्रु०॥ मागितलीया भीक जरि होय निर्दोष। तरि सणिये रजक काय न मगती। देवपणें फुग धरिसील गाढा। तरी वायांवीण मूढा सिंतरलासी ॥२॥ थिगळी घालोनि गळां म्हणसी न भियें काळिकाळा। तरी काय कर्मावेगळा क हो पहासी। योगिया ह्मणिजे कैसा भीतरीं काश्मिरी जैसा। मीनालिया पदार्थासरिसा होउनि मिळे ॥३॥ हृदयीं नाहीं जालेपण क्रोधें भवंडिसी लोचन। अंगीं भस्मउधळण राख राखेल काई। खरु लोळे उकरडां काय परत्राचिया चाडा। तैसा मठीं बांधोनि मूढा। वर्म चुकलासी ॥४॥ तीर्थ व्रत जपस्नान। वाउगें कारिसी ध्यान। ऐसें करितां आनेआन मार्ग चुकलासी। शुद्ध करूनियां मन सेवीं निवृत्तीचे चरण। विठ्ठल विठ्ठल म्हण नाहीं तरी नाडलासी ॥५॥

४५०. **येणेंचि आश्रमें नित्यनैमित्तीक कर्में**। वर्णाश्रमधर्म त्यागून कोठें जासी ह्मणोनि येकचि विचारी बापा। जेणें सार्थक होय संसारासी। विकल्प नको धरूं शुद्ध करीं अंतर धरुनि राहें या सगुणासी रया ॥१॥ आवडी धरुनी गोडी घेई का ध्यानीं। परतोन मग योनि नाहीं तूज ॥२॥ सांडीं सांडीं त्याग नास्तिकाचें मत नलगे करणें अटणें। नानाविधि वाउगे जड कां सिणवणें। केंवि मन होय शुद्धी। एकलेंचि मन करूनि स्वाधीन। सगुणींचि काय सिद्धि नलभे रया ॥३॥ ह्मणोनि येकाकारवृत्ति सगुणीं बैसली। प्रीतिंचि निर्गुणींचि आर्ति जाण संपदा। त्याची सांडि मांडि न करीं

निरुतें चित्तीं धरीं । स्वस्वरूपीं असे सदा । बापरखुमादेविवरु विठ्ठलु चिंतितां । सुख सगुणींचि जोडे आनंदु रया ॥४॥

४५१. **कां सांडिसी गृहाश्रम** । कां सांडिसी क्रियाकर्म । कासया साडिसी कुळींचे धर्म । आहे तें वर्म वेगळेंची ॥१॥ भस्मउधळण जटाभारू । अथवा उदास दिगंबरू । न धरीं लोकांचा अधारू । आहे तो विचारू वेगळाचि ॥२॥ जप तप अनुष्ठान । क्रिया कर्म यज्ञ दान । कासया इंद्रियां बंधन । आहे तें निधान वेगळेंचि ॥३॥ वेदशास्त्र जाणीतलें । आगमी पूर्ण ज्ञान झालें । पुराण मात्र धांडोळिलें । आहे तें राहिलें वेगळेंचि ॥४॥शब्दब्रह्में होसी आगळा म्हणसि न भियें काळिकाळा । बोधेंविण सुख सोहळा । आहे तो जिव्हाळा वेगळाचि ॥५॥ याकारणें श्रीगुरुनाथु । जंव मस्तकीं न ठेवि हातु । निवृत्तिदास असे विनवितु । तंव निवातु केविं होय ॥६॥

## मनास उपदेश.

४५२. **अरे मना तूं वांजटा** । सदा हिंडसी कर्मठा । वायां शिणशीलरे फुकटा । विठ्ठल विनटा होय वेगीं ॥१॥ तुझेनि संगें नाडले बहू । जन्म भोगितां नित्य कोहूं । पूर्व विसरलें ॐहुं सोहुं । येणें जन्म बहूतांसी जाले ॥२॥ सांडि सांडि हा खोटा चाळा । नित्य स्मरेंरे गोपाळा । अढळ राहारे तूं जवळा । मेघश्याम सांवळा तुष्टेल ॥३॥ न्याहाळितां परस्त्री । अधिक पडसी असिपत्रीं । पाप वाढिन्नलें शास्त्रीं । जप वक्त्रीं रामकृष्ण ॥४॥ बापरखुमादेविवर । चिंतीं पां तुटे येरझार । स्थिर करीं वेगीं बिढार । चरणीं थार विठ्ठलाचें ॥५॥

४५३. **अरे मना तूं पापिष्टा** । किती हिंडसी रे नष्टा । सैरा सिणसी रे फुकटा । विठ्ठलविनटा स्थिर होईं ॥१॥ येणें पैलपार पावसी । तूं अनिवार नावरसी । तुझेनि संगें नाडले ऋषी । तूं तंव अपभ्रंशीं पाडिशी । म्हणोनि गुरूसी गेले शरण ॥२॥ न सोडीं हरिचरण । नाहीं नाहीं जन्ममरण । अविट सेवीं नारायण । तेणें मी तूं पण एक रसि ॥३॥ ज्ञानदेव शरण हरी । मन हिंडे चराचरीं । न सोडी चरण अभ्यंतरीं । नित्य श्रीहरी हृदयीं वसे ॥४॥

४५४. **श्रवण घ्राण रसना त्वचा आणि लोचन** । हें तों दैन्याचीं द्वारें वोळगसी । यांचें यांसीचि न पुरे तुज पुरविती काय । यालागीं धरिजेसु आपुली सोयरे बापा ॥१॥ अरे मनारे अरे मनारे । न संडी न संडी हरिचरण कमळारे ॥२॥ स्वप्नींचें धन तें धनचि नव्हे । मृगजळीचें जळ तें जळचि नव्हे । अभ्रींची छाया ते साउली नव्हे । ऐसें जाणोनियां वेगीं धरिजेसु आपुली सोयरे रया ॥३॥ तूं जयाचा तेथोनि जिवीं जितासी । त्या श्रीहरीतें रे नोळखसी । बापरखुमादेविवरा विठ्ठला चिंतिसी । तेणें पावसि तूं सुखाचिया राशी रया ४

४५५. **आजि लाजलें तुमच्या पायीं** स्तुति करुं काई । हेंचि तुह्मां पाहीं विनवीतसे ॥१॥ निवृत्ति बाप निवृत्ति माये । निवृत्ति पाहें विवळलिये ॥२॥ देखणें देखिलें तेंचि होई पां रे मना । निवृत्तिचरणीं स्थिर राहीं पां रे ज्ञाना ॥३॥

४५६. **ध्येय ध्याता हे दोन्ही नाहीं** । तेथें ज्ञेय ज्ञाता उरे काई ॥१॥ अरे मना परापर परतें पाहीं । तें तूं स्वयें आपण पाहीं रे मना ॥२॥ रखुमादेविवरा विठ्ठलाची आण । जरी बुझसी तरी तूंचि निर्वाण ॥३॥

४५७. **सुख आपलें आपण तों पाहें** । रूप आपुलें आपण ध्यायरे मना ॥१॥ लक्ष निवृत्तिचरणीं धीरु राहें । भेदुभ्रम सांडीं सावध होये ॥२॥ बापरखुमादेविवरु एकचि पुरे । जाणतिल या सर्व सुख मोहरे ॥३॥

## जनांस उपदेश.

४५८. **तैं सत्वरजतमें** धुतलिया आशा । वेगीं त्या निराशा फळेंवीण ॥१॥ तैसें हें टवाळ हरिविण पाल्हाळ । कैसेंनि मायाजाळ निरसे रया ॥२॥ त्रिकुटीचे पेठे वानवसा दिठा । वैकुंठ चौहटा पिकला रया ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु साजिरा । मार्गीं मार्ग एकसरा नामें तारी ॥४॥

४५९. **स्वप्नींचेनि सुखें मानिताति सुख** । घेतालिया विख जाईल देह ॥१॥ मोलाचें आयुष्य दवडितोसि वायां । माध्यान्हींची

छाया जाय वेगीं ॥२॥ वेग करीं भजनां काळ यम श्रेष्ठ । कैसेंन वैकुंठ पावसील ह्मणें ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठल उभा । सर्वत्र घटीं प्रभा त्याची आहे ॥४॥

४६०. **बुद्धिमात चित्त धन वित्त गोत** । निजानंदें तृप्त करीं रया ॥१॥ नैश्वर्य ओझें ऐसें तूं बुझें । वायां मी माझें ह्मणसी झणीं ॥२॥ सांडीं सांडीं मात उभया दुरित । हरिविण हित घेवों नको ॥३॥ ज्ञानदेवा गीत जाले असे सांग । वेगीं श्रीरंग पावेल तुज ॥४॥

४६१. **कर्पूर अग्नीसी स्वदेहा नाशी** । चंदनीं मासी न थरे देखा ॥१॥ घ्राणाची कळिका भ्रमर रुंजीका तेथील झुळुका रुंजी करीं॥२॥ मोतियाचा चारा राजहंसा सैरा । दुजिया पाखिरा कामा नये ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे घेती ते शाहाणे । येर ते पाहुणे यमाचे रया ॥४॥

४६२. **शाहाणे सिंतरे व्याहाणे मोहरे** । भणंग धुरें आतुडे कैसें ॥१॥ या अवचित्या गोष्टी भाग्यें होय भेटी । प्रालब्ध सृष्टीं भोग देत ॥२॥ येत जात वाटा शरीरीं भरे फांटा । मदमत्सर ताठा भ्रमकुळीं ३ ज्ञानदेवो ह्मणे या खुणे मी नेणें । पंढरीचे राणे उगविती ४

४६३. **दीपीं दीप सामावे तेथें कैचा विचारु** । राहिला निर्धारु नाना मत्ता ॥१॥ जें जेथें होतें तेंचि तेथें नाहीं । परतोनि काई पाहातोसि ॥२॥ मौन्याचिये मिठी सगळेंचि नाहीं । तैसा इंद्रियें दाही चोजवेना ॥३॥ ज्ञानदेवो बोले सामावलें मन । मग नायकती कान तेथील कथा ॥४॥

४६४. **एका पांडुरंगें नव्हेचि पैं जोडी**। दया गेले ठायां मज आला रहावया । मत्सर गिळावया कुलासहित ॥१॥ क्षमा गेली परती अहंकार सांगती । ते वोढूनियां नेती अघोराशी ॥२॥ गति ह्मणे मी थोरी प्रवृत्ति निघाला घोरी । राहों न शके घरीं निवृत्ति तेथें ॥३॥ ज्ञानदेवो सांगे असे मज पांडुरंगें। लक्ष्मीये रिघे शरण आडवा ४

४६५. **विष्णुवीण मार्ग घेसील अव्यंग** । तरी वायांचि सोंग करणी तुझी ॥१॥ येऊनि संसारा वायांचि उजिगरा । कैसेनि ईश्वरा पावशी हरी ॥२॥ नरदेह कैचें तुज होय साचें । नव्हेरे देहींचें सुख तुज ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे शरण रिघणें । वैकुंठीचें पेणें अंतीं तुज ॥४॥

४६६ **मृगजळाच्या जळीं चाळिसी जळचरें**। कैचें जळ तेथें कोठें मत्सरें ॥१॥ नाथिलिच खटपट करील किती । गगनींचीं सुमनें तुरंबिसि मस्तकीं ॥२॥ वांझेचिया सुता रचसिल मारे । कैचा पुत्र तेथें कायि संव्हरे ॥३॥ कोल्हैरींचे वारु आणिसिल सावया । कैचा राऊत कोणा जिंकिसील रया ॥४॥ ऐशीं नाथिलींचि नाटकें आचरसी किती । ज्ञानदेव ह्मणे सहजे निवृत्ति ॥५॥

४६७. **मृगजळाचे डोहीं मारिसील जळचरें**। कैचें जळ तेथें कैचें मत्स्यरे ॥१॥ लटकीच खटपट लटकीच खटपट । लटकीचि खटपटरे साळोबा ॥२॥ वांझेचिया पुता घालसिल मारे । तेथें कैचा पुत्र मृत्यु कोणा संहारे ॥३॥ रोहिणीचे वारु आणिसी सावया । कैचे वारु काय जुंझसील वायां ॥४॥ स्वप्नींचिया धना बांधिसि कळांतरा। कैचें धन काय होसी व्यवहारा ॥५॥ निवृत्तिप्रसादें ज्ञानदेव म्हणे । स्वप्नींचें सुख तें साळया जाणे ॥६॥

४६८. **परदीपींहूनि सूक्ष्म मार्गें** आलासी पवन वेगें। बिंदुनियां नवमासवरि । पेणें केलें मातापुरीं सोहं सोहं परी परतेसिना ॥१॥ निर्लज्जारे तुज शिकवूं किती । न गमे दिनराती बळिया देवो ॥२॥ त्या येऊनियां वाटा तुज ऐसें गमलें । कोहं कोहं ठेले प्रकाशत ॥ पुसुनीयां तळवरी सूतलासी मळ घोरीं । क्षुधा आड उरी आदळली ॥३॥ ऐशीं बाळपणीं सांकडीं बहु ठेलीं झडाडी । सडाडा वोसंडी शांति सैरा ॥ तारुण्याचेनि भरें वित्तविषयचोरें । बांधिलासि संसारें हालों नेदिती ॥४॥ ऐसा वोस मार्ग पुढें अवला वेळु पाहला । वारितां वारितां निघाला मारिजसी ॥ पुढें पडलिसे वाट ते ऐकरे बोभाट । परतले धायवट अर्धजीवें ॥५॥ ऐसे पायाळ पुढें गेले पांगूळ मागें ठेले। पैल तीर पावले परम तत्वेंसी ॥ ॥६॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु सैरारे सावधु । ज्ञानिया प्रसिध्दु उपदेशितु ॥७॥

४६९. **बहुता वऱ्हाडा आलीसी बाळा**। हांसती लोक परी न संडी चाळा ॥१॥ एकाचें खाये एकासि गाये । लाज नाहीं तिसी सांगावें काये ॥२॥ वऱ्हाडियांच्या भुलली सुखा । सुख भोगितां

पावली दुःखा ॥३॥ नाथिलें पुसे भलत्यासि रुसे । ज्याचें लेणें लेऊनि थोर संतोषें ॥४॥ क्षणाचा सोहळा मानिलें हित । आपस्तुति परनिंदेचें गीत ॥५॥ कवणाचें वऱ्हाड भुललीसी वायां । शरण रिघें रखुमादेविवरा नाह्या ॥६॥

४७०. **आउट हात आपुले आपण होतासी** । येर तें सांडितासी कवणावरी ॥ ऐसेंनि सांडिसी तरी थोडें तें सांडी । कां सकळैक मांडी तेणें सुखिया होसी रया ॥१॥ कळिकाळ ते आपण प्रभा अनुकोण । करितां दीपें लाजिजे घरामाजी घरकूल करूं पाहासी ॥ तें दैन्यचि वाउगें येर सकळैक तूं आहासी रया ॥२॥ पृथ्वी येवढा घडु लाघे यावा । मा गगना भरूं जावें अनाठायां ॥ अस्ति नास्ति दोन्ही येकेंचि पदीं । आकाशाची भरोवरी घटे केविं कीजे रया ॥३॥ धांवतां धांवतां वेगें तुजचि तूं आड रिगें । पाय खोंवितु खोंवितु मार्ग ठाके काई ॥ जा सलट जा वाहीं त्याची सवा पाहीं । वायां तूं हांवे जासी रया ॥४॥ जागणें न काय जन्मलासी निजलेनि काय निमालासी । स्वप्नें काय केलासि तडातोडी ॥ ऐसा जाणत नेणत जेथींचा तेथें । आभासत असे तूंचि तूं भल तेथें रया ॥५॥ आपला आरोहणीं लावूं पहातोसि निशाणी । तरी सांगेन ते वाणी लाविजेसु ॥ श्रीगुरुनिवृतिनाथा चरणकमळीं । पाखोवीण होय अळिया ह्मणे ज्ञानदेव ॥६॥

४७१. **उपजोनि संसारीं आपुला आपण वैरी** । मी माझें शरीरीं घेऊनि ठेला ॥ या देहातें ह्मणे मी पुत्र दारा धन माझें । परि काळाचें हें खाजें ऐसें नेणतु गेला ॥१॥ कामक्रोधमदमत्सराचेनि गुणें । बांधला आपण नेणे भ्रमित जैसा ॥ मिथ्या मोह फांसा शुक नळिके जैसा । मुक्त परि अपैसा पळों नेणें ॥२॥ जळचरु आमिष गिळी जैसा कां लागलासे गळीं । आपुआपणावें तळमळी ॥ सुटिका नाहीं तैसें आरंभीं विषयसुख गोड वाटे इंद्रियां । फळपाकीं पापिया दुःख भोगी ॥३॥ राखोंडी फुंकितां दीप न लगे जयापरी । तैसा शब्द ब्रह्मकुसरी ज्ञान न पवे ॥ व्रत तप दान तीर्थ भजन वेंचिलें । पोटा दंभाच्या खटपटा सिणतु गेला ॥४॥ मृगजळाची नदी दुरूनी देखोनि

धांवे। परी गंगोदक न पवे तान्हेला जैसा॥ तैसें विषयसुख नव्हेचि हित। दुःख भोगितो बहुत परि सावधान नव्हे ॥५॥ परतोनि न पाहे धांवतो सैरा। करितो येरझारा संसारींच्या ॥ ज्ञानदेव ह्मणे बहुतां जन्मांचा अभ्यासु। तरीच होय सौरसु परब्रह्मीं ॥६॥

४७२. **चौऱ्यासिं लक्ष योनी क्रमुनिं सायासी।** नरदेहा ऐसें भांडवल पावलासी ॥ जतन करींरे गव्हारा न भजें न भजें या संसारा। बीज सांडूनि असारा वायां झोंबतोसी ॥१॥ हातींचिया लागीं भूमि चाळितोसी। आप नेणतां तूं पर काय चिंतिसी॥ मन एक स्वाधीन तरी खुंटलें साधन। सर्व सुखाचें निधान हरि पावसी रया ॥२॥ तृणें पशु झकविले ते क्षीरातें विसरले। तैसा विषय पाल्हाळें निज चुकलासी॥ कोटि युगें जन्मवरी येतां जातां येरझारीं। दुःख भोगिसि दुर्धरीं रया ॥३॥ पुत्र कलत्र भवविभव विचित्र। होय जाय सूत्र तूं आप न म्हण ॥ तुझा तूंचि नाहीं ऐसें विचारूनि पाहीं। चेतवि चोरिलासी वेगीं सावध होई रया ॥४॥ तुज नाथिलाचि धिंवसा आस्तिक्यपणाची आशा। असते सांडुनि आकाशा वायां झोंबतोसी ॥ दिवस आहे तों धांवावें नाहीं तरी फुटोनि मरावें। मृगजळ हें अघवें पाहे पां रया ॥५॥ स्वप्नीं साचाचि जोडे थोडें ना बहुत हातां सांपडे। तुटलें प्रीतीचें कुवाडें ऐसें जाणोनियां ॥ शरण जाई निवृत्ति तो सोडवील संसृति। बापरखुमादेविवरा विठ्ठलाचे भक्ति रया ॥६॥

४७३. **उपजलें देह बाळपणें गेलें।** तुझें तुजचि देखतां तारुण्यपण मत्सरें आटिलें ॥ आतां वृद्धपणीं कायिसि अंगवणी रया ॥१॥ कवण्यागुणें चुकीसाठीं पडली कासया भ्रमलोसि गव्हारा। सिद्धचि सांडुनि आनेआन जल्पसी तरी न चुकती तुझ्या येरझारा रया ॥२॥अजागळाचे अजस्तन। तेथें कैचें अमृतपान। तैसें काय करिसी वाउगें चिंतन। पदपिंडा जागृति कारण। तरी तयांचिये चरणीं स्थिर ठेवीं मन रया ॥३॥ जीवनजळीं ब्रह्मकमळ विकासलें। आतां पाहें पां तयाचा मेळुरे। ऐसी जीव चिंता तुजवांचुनियां कवण करील आमुचा सांभाळु रया ॥४॥ जीवनजळीं ब्रह्मकमळ

विवळे। तैसे वाट पाहतां सिणले माझे डोळे॥ नको नागवे हा संसार नको नागवे हा संसार । तूं तंव निवांत निराळा रया ॥५॥ ऐसा जगाचा जीवनु अमूर्त मूर्ति लेईला डोळां । बापरखुमादेविवरा विठ्ठला वांचूनि कोण पुरविल सोहळा रया ॥६॥

४७४. **संसारयात्रा भरली थोर** । अहंभावें चळे हाट बाजार ॥ कामक्रोध विके मद मत्सर । धर्मलोपें अधर्मे वेव्हार ॥१॥ यात्रा भरली जनीं देवीं विन्मुख प्राणी । विषयाची दाटणी भ्रांति आडरे ॥२॥ एकीं मीपणाच्या मांडिल्या मोटा । अहंभावाच्या गोणिया सांडिल्या चोहाटा ॥ एकीं गाढवावरी भरली प्रतिष्ठा । तऱ्हि तृप्ती नव्हे दुर्भरा पोटा ॥३॥ एक पंडितपण मिरविती श्रेष्ठ । एक ज्ञान विकुनि भरिती पोट ॥ हिंसेलागीं वेद करिताती पाठ । चौऱ्यांशीं जीवां भोंवतसे आट ॥४॥ अज्ञानभ्रांतीचीं भरलीं पोतीं । सुवस्तु सांडूनि कुवस्तु घेती ॥ सुखाचेनि चाडे सुखाचि प्रीती । अमृत सांडुनि विष सेविती ॥५॥ शांति क्षमा दया न धरवें चित्तीं । विषयावरी थोर वाढविली भक्ति ॥ जवळी देवो आणि दाही दिशा हिंडती । स्वधर्म सांडुनि परधर्मी रती ॥६॥ ऐसे जन विगुंतले ठायीं आत्महिताचि शुद्धिचि नाहीं । नाशिवंत देह मानिला जिहीं तया तृप्ति जालि मृगजलडोहीं रया ॥ श्रीगुरु निवृत्तीनें नवल केलें । देखणेंचि अदेखणें करूनि दाविलें ॥ मी माजी देवो यानें विश्व व्यापिलें । बापरखुमादेविवरें विठ्ठलें रया ॥७॥

४७५. **संसारा येऊनी लागले फांसे** । गुंतला आशा मायामोहें ॥१॥ न खंडे न तुटे कर्माची बेडी । अनुभवेंविण तोडी तो योगिया ॥२॥ कर्माची सांखळी पडली असे पायीं । गुरुमुखें खुणें उगऊं पाहीं ॥३॥ ज्ञानदेवो म्हणे तुझे कृपेवीण न तुटे फांसा । निवृत्तानें कसा उगविला ॥४॥

४७६. **द्वीपोद्वीपींचे पक्षी मेरुतळवटीं उतरले** । रत्न म्हणोनि त्या स्फटिकासी झेंपावले ॥१॥ राजहंस ते भ्रमले हो पाषाण चुंबिती । आडकालिया चाचू मग मागिल आठविती ॥२॥ एक श्रीकृष्ण तें विसरले ऐसें ज्ञानदेव बोले । मूर्खासि संगति करितां शाहणे सिंतरले ॥३॥

४७७. **असे तें न दिसे** । दिसे तें नाहीं हो । तयापरि दिसेंदिस जुगें जाती पारंपार ।। ऐसें जाणत जाणत तुझें चित्त कां भ्रमित । अझुनि न राहासी निवांत तरि भलें नव्हे ।।१।। सांडी माया मोह द्वंद्व दुराशा । ज्यालागीं शिणसी तें तुजसी उदासा ।।२।। स्वप्नींचें धन तें धनचि नव्हे । मृगजळींचें जळ तें जळचि नव्हे ।। अभ्रींची छाया ते छायाचि नव्हे । तैसें विषय सुख नव्हे नव्हे रया ।।३।। स्पर्शे मातंग दीप्तीं पतंग । नादें मृग घ्राणें भृंग रसनें मीन ।। या पांचांही विषयीं पांचही मारिले सेखीं निर्धारूनि पाहातां । पांचही तुजपाशीं तुज कैंवि निकें होईल रया ।।४।। कापुराचिये मसी मेघ माखिन म्हणसी । कापुर कां वायां जाळितोसी क्षण एका ।। तेथें कापुर ना मसी उफका सिण कोठें पाहसी रया ।।५।। उपजतांचि देह मृत्युच्या तोंडीं । मी माझें म्हणतां न लजसि रया ।। शरण जाई त्या निवृत्ति तो तारील संसृति । बापरखुमादेविवर विठ्ठलाचिये भक्ति रया ।।६।।

४७८. **मी माझें म्हणतां संसारीं गुंतलें** । तंव परत्र परतेंचि राहिलें ।। हें ना म्हणउनि तया झोंबिन्नलें । तंव सिद्ध सिद्ध सिद्ध हातींचें गेलें ।।१।। पुढीला चुकला मागिला मुकला । तैसी परी जाली मातें ।। आपआपणातें गोंवी । तरी बुद्धिदोष ठेवी कवणातें रया ।।२।। आतां एक बुद्धि आठवली गेलें तें परतेना मागुतें । बापरखुमादेविवर विठ्ठलु ध्याईजे तरी सकळिक होई आपैतें ।।३।।

४७९. **स्वप्नींचेनी धनें भरोनियां लाहे** भला वेव्हार करूं पाहसी । मुद्दलुची नाहीं तेथें काळांतर कैचें धरणें अधरणें घेतासी । लटिकिया साठीं संसार दवडोनी ठकूनी ठकलासी रया ।।१।। कवण नागवितो कां नागवसी वेडावलेपणें ठकसी । तूंची चोरोनी तुझें त्वांची नेलें आतां गाऱ्हाणें कवणा देसी रया ।।२।। पृथ्वी आप तेज वायु आकाश हे सहज परम गुण अंशअंशा आले । येणेंची कष्टें व्यवहार करितां कोठें काय सांठविलें । विचारूनि पाहें तुझें त्वांचि नेलें आतां तुजमाजि हारपलें रया ।।३।। पुत्र कलत्र संपत्ती देखोनी संतोष मानिसी । घडि येकामाजी नासोनी जाईल

जैसें कां अभ्र आकाशीं । बापरखुमादेविवरु विठ्ठलुची हृदयीं असतां कां नाडलासी रया ॥४॥

४८०. **जंव या वायूचा प्रकाश** तंव या भांडियाचा विश्वासु । वायो निघोनियां गेला ठाईंचाच जाला उदासु रया ॥१॥ काळाचें भातुकें शृंगारिलें कौतुकें । जातसे तें देखें परी न चले कांहीं ॥२॥ ठाईंचेचि जाणार कीं नव्हे राहणार यासी जतन ते काई । जेथील तेथें निमोनियां गेलें उपचार नचलेचि कांहीं ॥३॥ हें काळाचें भांडें कीं अवघेंचि लटिकें जैसें आहे तैसें सांगेन पुढती । बापरखुमादेविवरु विठ्ठलुचि सकळहि जीवांचा सांगाती रया ॥४॥

४८१. **जंववरी जाड नव्हे उजाड नाहीं काढावया प्राणा** । मग मूढा पडसी संसार सांकडा कांहीं करीं आपुला उवेढा रया ॥१॥ जाडरे जाड शेवटीचा धंद पाडियेलेंसि भवकुंडा । एकीकडे जन्म एकीकडे मरण न निमेचि धंद कुवाडा रया ॥२॥ थिल्लरींचें जळ मथितरे मिना जंव न तपे आतपु हा परिमळु । जंव हा आयुष्य वोघू न सरे तंव टाकी आगाधु पुढें आहे हाल कल्लोळु रया ॥३॥ भाड्याचें घर किती वाढविसी रे गव्हारा । दिनु गेलिया काय पंथु आहे । ऐसें जाणोनियां वेगीं ठाकी लवलाहें । बापरखुमादेविवरा विठ्ठलाचे पाय रया ॥४॥

४८२. **दुजेपणाचा भावो वायां वाढविसी गव्हारा** । उतराई या देहा कैसा होसील ॥ दुजेपणें पाहसी तरि देहीं देवो पाहीं । सेखीं दुजेपण नाहीं तूंचि येकला रया ॥१॥ भ्रांति पडलिया मना नेणसी । सुख ब्रह्म चुकलासि वर्म अरे मुढा ॥२॥ ते कल्पिलिया नकळे गुरुकृपें वेगळें । वायांविण उगलें कां धांवतोसि सैरा ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु जन्मोजन्मीं वोळगिला अससी । तरि ते खुण पावसी निभ्रांत रया ॥४॥

४८३. **कानीं घालुनियां बोटें नाद जे पाहावे** । न दिसतां जाणावें नऊ दिवस ॥१॥ भोंवया पाहातां न दिसे जाणा । आयुष्याची गणना सात दिवस ॥२॥ डोळां घालोनियां बोट चक्र जें पाहावें । न दिसतां जाणावें पांच दिवस ॥३॥ नासाग्रीचें अग्र न

दिसे नयनीं । तरी तेचि दिनीं म्हणा रामकृष्ण ॥४॥ ज्ञानदेव ह्मणे हें साधूचें लक्षण । अंतकाळीं आपण वेगीं पाहा ॥५॥

४८४. **चोराचिया संगें क्रमितां पैं पंथ** । ठकूनियां घात करितील ॥१॥ काम क्रोध लोभ घेऊनियां संगें । परमार्थासि रिघे तोचि मूर्ख ॥२॥ बांधोनियां शिळा पोहुं जातां सिंधु । पावे मतिमंदु मृत्यु शीघ्र ॥३ देह गेह भ्रांति सोडुनियां द्यावें । साधन करावें शुद्ध मार्गें ॥४॥ ज्ञानदेव ह्मणे तरीच साधेल । नाहीं तरी चळेल मध्यभागीं ॥५॥

४८५. **जंववरीरे तंववरी जंबुक करी गर्जना** । जंव त्या पंचानना देखिलें नाहीं बाप ॥१॥ जंववरीरे तंववरी वैराग्याच्या गोष्टी । जंव सुंदर वनिता दृष्टी देखिली नाहीं बाप ॥धु०॥ जंववरीरे तंववरी मैत्रत्व संवाद । जंववरी अर्थेसि संबंध पडिला नाहीं बाप ॥२॥ जंववरीरे तंववरी युद्धाची मात । जंव परमाईचा पूत देखिला नाहीं बाप ॥३॥ जंववरीरे तंववरी समुद्र करी गर्जना । जंव अगस्ती ब्राह्मणा देखिलें नाहीं बाप ॥४॥ जंववरीरे तंववरी बाधी हा संसार । जंव रखुमादेविवरु देखिला नाहीं बाप ॥५॥

४८६. **दुर्लभुरे दुर्लभुरे दुर्लभु संसारु तुम्हीं कां नेणां** । आहारनिद्रेसाठीं दवडितां माणुसपणा ॥१॥ आड ना विहिरी बावि ना पोखरणी । सरिता ना सागर कल्पतरू रानोरानीं ॥२॥ बावो याची खुण ज्ञानदेवो जाणे । तयाचें करणें तैं अधिकचि होणें ॥३॥

४८७. **वोजावलिया वोढी** वोढी पाडीजे ते नाहीं । ऐसें विचारूनि पाहीं आपुले मनीं । मग राहिजे सुतत्व निर्वाणीं ॥१॥ दुर्लभ दुर्लभ संसार त्यांत दुर्लभ माणुसपण । ये जन्मीं नोळखसी । पशु होऊनी जन्मसी । मग तुज सांगेल कवण रया ॥२॥ जंव देहीं आहे देवो तंव या वेदे त्याच्या लाह्या । मग तुज रात्री जाईल जड भारी । बापरखुमादेविवरु विठोजी पंढरपुरीं । तो वोळगे वोळगे जन्मवरी॥३॥

४८८. **वेदवाणी चांग स्मरतां स्मरण** । नित्य नारायण हृदयीं वसे ॥१॥ तेथिल गव्हर जाणतो विरुळा । ब्रह्मीं ब्रह्मकळा साधुमुखें ॥२॥ जाप्य जप होम विधि विधान हरि।हृदयीं श्रीहरि न कळे मूढा ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे श्रीहरि हृदयस्थ । ऐसी आहे भाष वेदशास्त्रीं ४

४८९. **कामारिकरुणा करुणार्णव झोंबे** । करुनियां बिंबे अलिप्तपणें ॥१॥ कामधाम हरि ब्रम्हार्पण करी । आपणचि कामारी होये हरी ॥२॥ चक्षुपक्षपादयुगळ अधिष्ठान । हरिवीण श्रवण करूं नको ॥३॥ ज्ञानदेव सोहं मंत्र तंत्र ध्यान । मनाचें उन्मन हरिपायीं ॥४॥

४९०. **नाद भेद सिद्ध अवघेचि विरुद्ध** । जेणें तुटे भेद तेंची जपें ॥१॥ सुताचिये गुंजे सुतचि पैं माजे । हरिचरणांबुजें निवडितां ॥२॥ रुक्मिणीचा नाहो हाचि पैं उगवो।प्रपंच ते वावो जावो परता ॥३॥ ज्ञानदेवा चित्त हरी गोत वित्त । विज्ञान उचित ज्ञानघनें ॥४॥

४९१. **चिंतिलें अपैसें पाविजे सायासें** । तरी कामा नसे सायास या ॥१॥ देखणें स्वप्नींचें भुररें मायेचें । भ्रमित देहाचें हरिवीण ॥२॥ आयुष्याचे पेठे संसाराचे तट । गुरुविण वाट कैंची रया ॥३॥ त्रिपुटिसी वर्ते वैकुंठ सरतें । प्रेमेंविण भरितें कैसें येत ॥४॥ ज्ञानदेवीं घर केलें पैं सपुर । संसार येरझार हरिचरणीं ॥५॥

४९२. **धरसील तरी हातीं लागे बापा** । सांडसील तरी जाईल दिगंतरा ॥१॥ जतन करिरे जिवाचिया जिवा । सांगतसे ठेवा जुगादीचा ॥२॥ निवृत्ति निरोप बुझे आपेंआप । आधि पुत्र मागें बाप जन्में रया ॥३॥

४९३. **निर्जिवां दगडांची काय करिसि सेवा** । तो तुज निर्दैवा देईल काय ॥१॥ कवणें गुणें भुलीपडली गव्हारा । तीर्थाच्या माहेरा नोळखिसी ॥२॥ अष्टोत्तरशें तीर्थें जयाच्या चरणीं । तो तुझ्या हृदयभुवनीं आत्मारामु ॥३॥ देव जवळीं असतां जासी आना तीर्था । मुकलासि आतां ह्मणे ज्ञानदेवो ॥४॥

४९४. **या पिकलिया अमृताची गोडी** । केंवि जाणती इतर जन । वाचा बोलिजे सेवितां निवे प्राणुगे माये ॥१॥ सुखाचा साचा केंवि बोलिजे । जिवातें जिवू केंवि सुईजे ॥२॥ अमृतकराचे रश्मी चकोर सेविती । तें सुख कोण कैसें बोलिजे रया ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु भेटलिया । तें सुख कोण कैसें सांगिजे रया ॥४॥

४९५. **सुंदरु राजसु सकुमारु बिंदुलें न साहे ज्यासी** । स्वबुद्धि अळंकारला पराग्रासुनि ठेला मौन्य पडलें या शब्दासी ॥ पाहों जाय तंव

पाहाणें ग्रासी नवलावो काय या सुखासी । न अवलोकवे मना अवधारूनि ध्यानीं आतां न विसंबे तुझिया पायासी रया ॥१॥ हेम अळंकारु भेदु हा काय सगुणीं निर्गुणीं आहे तैसे गुण । गुळाचेनि अंगें गोडीपणें पाहातां न निवडे आतां मी काय करूं ॥२॥ ह्मणोनि मन समावेश करणें तुझें तुजमाजी घालणें । येणें तुज अळंकारणें मध्यमणी ॥ मन चतुष्टय पदीं पदक तेंचि बैसका चौखट मन मनीं रुतलें ठेलें । आवडीचेनि अभ्यासें कोंदालिया दाही दिशा ह्मणोनि प्रीति धरीं सगुणीं रया ॥३॥ उभारलेनि सिडे जेथें स्वराज्य तारूं न बुडे । ऐसें घडे वाडें कोडें तेंचि कीजे ॥ जेथें मनासि कवण स्वप्नीं राज्य रक्षी जाण । आपुलें पारिखें नेणिजे म्हणोनियां आतां बापरखुमादेविवरा विठ्ठला शरण जाईजे रया ॥४॥

४९६. **सुढाळ ढाळाचे मोतीं** अष्टै अंगें लवे ज्योति । जया होय प्राप्ति तोचि लाभे ॥१॥ हातींचें निधान जाय मग तूं करिसि काय । पोळलियावरि हाय निवऊं पाहे ॥२॥ अमृतें भोजन घडे कांजियानें चूळ जोडे । मग तये चरफडे मिती नाहीं ॥३॥ अंगा आला नाहीं घावो तंव ठाकी येक ठावो । बापरखुमादेविवर विठ्ठलु नाहो ॥४॥

४९७. **सकुमार साखर कापुरें घोळिली** । गोडी परिमळु दोन्ही उरली ॥१॥ मित्रत्व करा जीवहूनि वेगळें । पढियंते आगळ प्रेम जाण ॥२॥ तरुमाजी जैसा एक चंदनु । राहिला वेधुनि वनस्पती ॥३॥ बापरखुमादेविवरु जीवींचा जिव्हाळा । कांहीं केलिया वेगळा नव्हेगे माये ॥४॥

४९८. **स्वप्नींचा घाई विवळे साचें** । चेईलिया वरी ह्मणे मी न वाचे ॥१॥ जन कैसें माया भुलले । आपलें हित चुकले ॥२॥ आपींआप देखिलें । परतोन पाहे तों येकलें ॥३॥ आपींआप असे । मी काय जालोंसें लोकां पुसे ॥४॥ सकळहि शास्त्रें पढीनले । नुगवेचि प्रपंचीं गुंतले ॥५॥ बापरखुमादेविवरा विठ्ठलें । कैसें गुरुमुखें खुणा उगविले ॥५॥

४९९. **वहिलिया येईरे सौरभ्य घेऊनि जाईरे** । तिया इया जि-

वित्वाच्या लाह्यारे भ्रमरा ॥१॥ सुमनाचें जीवन विरुळे विपायें । वियोगु जालिया केहीं न साहेरे भ्रमरा ॥२॥ येर सकळिक पाल्हाळरे । बापरखुमादेविवरु सुखाचें निधान रे भ्रमरा ॥३॥

५००. **सुखाचिया गोठी आतां किती हो करणें** । सुखें सुख अनुभवणें ऐसें करी ॥१॥ पढियंते बाईये गुणेंविण हातां नये । साचेविण सये तेथें आवडी कैंची ॥२॥ कैसेनि कीजे मनासी रक्षण । भावासी बंधन केवीं घडे ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलुचि पुरे । सुखीं सुख मुरे ऐसें करी वो बाईये ॥४॥

५०१. **हे पृथ्वी तुझे लंकेसि आधारुरे रावणा** ते तो अपराधें बाधकेविण आणिली । नेणो किजी वान्नर पद्में देखतांचि रविशशी गिळिले रया ॥१॥ विरोध न कीजे विरोध न कीजे पाडू न पाहतां मागें करिसी तें नव्हेरे रावणा । प्राणुचि पारखा जालारे गव्हारा जिणें केविं सिद्धि जाईलरे रया ॥२॥ दों भूतांचि दशा जाणोनिरे रावणा तयाचा आगम सागरीं रिघाला । तयाच्या गडे गड मेळउनि सापें डाव शिळीं बांधला ॥३॥ हनुमंत वायूचेनि मिसें तो आधींची पाईकी करी । तयाचेनि रोखें हीं रतलीं पंचभूतें उभा राहासि काशावरिरे रावणा ॥४॥ आकाश तेंचि अवकाश भीतरि आत्माराम आवेशला तुजवरी । तया ह्मणोनि बाणजाळ घातलें येरें कवली वरच्या वरीरे रावणा ॥५॥ आतां तुज देहो कैंचारे रावणा आत्मा तोचि राम जालारे । बापरखुमादेविवरविठ्ठलें ना जुंजतां तें काये केलेंरे रया ॥६॥

५०२. **चुकलीया चुके** आपादिलिया भलें होय । तरी दुःख दारिद्र भोगी कवण । तरी अवघेचि विश्व कां सुखी नव्हे रया ॥१॥ ह्मणोनियां भ्रम सांडी नाथिला । जें जें कांहीं करीन ह्मणसी होणार तें होईल । न होणार तें नव्हेल । तूं फुकाचि कां वाळीसी रया ॥२॥ होणें न होणें निढळींच्या अक्षरीं । वोरबार करसील काह्या । पाईक वोळगे अष्टौप्रहर सेखीं दैव तंव आणील ठायां रया ॥३॥ देखणें डोळां ऐकणें कानीं । जिव्हे कडु रस मधुर वाणी श्वासोच्छ्वास हे जयाची करणी । अनुभवी जाणती ज्ञानी ॥४॥ नाथिलाचि धिंवसा करूं

पाहासी । दुराशा जवळि असतां । आकाशा झोंबतोसी । आतांचें चिंतिलें आतांचि न पविजे । पुढें कोण जाणे काय पावसी रया ॥५॥ उपजत देहे मृत्युमुखीं पडलें । मी माझें करिसी किती । उठीं उठीं जागें आपुलिया हिता । बापरखुमादेविवरा विठ्ठलाची करीं भक्ति रया ॥६॥

५०३. **परियेसी गव्हारा सादर** । कर्में निर्वंश झाले सगर । भिल्लें विंधिलें शारंगधर । जाला पुरंदर सहस्र नयन ॥१॥ कर्में मन्मथ जालासे राख । कर्में चंद्रासि घडला दोष । कर्में भार वाहती कुर्मशेष । कर्में खरमुख ब्रह्मा देखा ॥२॥ कर्में वासुकी लंके दिवटा । कर्में हनुमंता उदरीं कांसोटा । कर्में शुकदेव गर्भीं कष्टा । पाताळवाटा बळी गेला ॥३॥ कर्में दशरथ वियोगें मेला । कर्में श्रीराम वनवासा गेला । कर्में रावण क्षयो पावला । वियोग घडला सीतादेवी ॥४॥ कर्में दुर्योधनादि रणीं नासले । कर्में पांडव महापंथें गेले। कर्में सिंधुजळ शोषिलें । नहुष जाला सर्प देखा ॥५॥ कर्मातें शंभु मानी आपण । किती पळसिल कर्माभेण । बापरखुमादेविवरा विठ्ठला शरण । केलीं कर्में निवारी नारायण ॥६॥

५०४. **त्रिभुवना परतें दाविसी दुरी** । आधीं तूं आपुली शुद्धी करीं । उदयो अस्तु कवणिये घरीं । पिंडा माझारीं सांग बापा ॥१॥ जागृतीमध्यें कवण जागत । सुषुप्तीमध्यें कवण निद्रिस्त । दोघे भ्रमलिया स्वप्न देखत । जीव कीं मन सांग पा रे ॥२॥ जागृति वरून काढी चेतना । सुषुप्तिमध्यें रिघता ज्ञाना । दोन्ही चेईलिया जाणता स्वप्ना । मग अनुवादती कवण ॥३॥ इंद्रियें सूत्र दारें दाटलीं । जागत होतीं तीं काय झालीं । सांग पा कवणे ठाईं लपालीं । मग मिळालीं कवणे ठाईं ॥४॥ शब्दातें नाइकती श्रवण । पहात पहात डोळे जाले हीन। नासाग्रीं ठेवूनियां सुमन । परि नेणती परिमळा ते ॥५॥ पाहेंपां येथें अनुवादु काइचा । मी माजि हारपली खुंटली वाचा । ज्ञानदेव ह्मणे सद्गुरु साचा। अढळपदीं बैसविलें ॥६॥

५०५. **वृंदावनीं वनमाळी** । खेळे गोपींसी धुमाळी । मदनमेचूची नवाळी । रसाकाळीं मनोहर ॥१॥ तयाचे करीं पां स्मरणु ।

आळसु न करीं अंतःकरणु । भीतरलीया सुमनपणु । निहारण होईल ॥२॥ बरवेपणाचेनि मिसें । देवातें वाणि या सौरसे । जडत्व फिटेल तया सरिसें । रसनें ऐसें चुकों नको ॥३॥ तरी तूं हा देवो न्याहाळीपां । पिसाटपण फिटेल बापा । पावन होसी परमस्वरूपा । नेत्रीं ऐसा चुकों नको ॥४॥ वेगीं क्षेम देऊनियां निविजे । ऐसें दैव कैं लाहिजे । जरी तो हृदयीं ध्याईजे । तैं पाविजे अंगसुखा ॥५॥ मन भ्रमर येकी हेळा । जैसे पावे पदकमळा । बापरखुमादेविवरा विठ्ठला । होईल जवळा सौरसु ॥६॥

५०६. **वायूनें वळावें धूमें मिळावें अभ्रें पाणिये गळावें** । आकाश पोकळ ह्मणोनि क्षोभा जाऊं नये । निज चेईलया केउतें पळावें रया ॥१॥ निराळ निराळ सहज तें निराळ तें क्षीरचातका दुभे । एक धरूनि येरे सकळिक वावो मा काय काय तेथें नलभे रया ॥२॥ स्तन ना वाहे जयाचिये माये तें बाळक केहीं न धायेरेरे । दृष्टी ओळणें तेंचि क्षीर जालें कासवीचें गोत्र पाहेंरेरे ॥३॥ केळि पोकळ ह्मणोनि सांडिसील ह्मणें तंव फळवरी निवांत राहेंरेरे । नाहीं नाहीं ह्मणोनि थरारिसि ह्मणें नाहीं तें तेथेंचि पाहींरेरे ॥४॥ रत्नाचिया आशा घात जाला तया राजहंसा ह्मणें भुलों नको ते सारेरे ॥ द्रोणाचेनि नांवें मातिये सळ चढे होई त्या कोळिया ऐसारेरे ॥५॥ बापरखुमादेविवरु हृदयींचा जागता सांडुनि अनु सुखाची कायसी चाड । सिद्धाचि सांडुनी अनेआन जल्पसी तरि सहजचि पडिलेंसि द्वाड रया ॥६॥

५०७. **शब्द निर्गुण भावावें** थितिया सगुणासि कां मुकावें वेद द्रोही व्हावें कां ऐसें कां किजे । कर्म उच्छेदु करून अहंब्रह्म ह्मणत तिथिया सुखासि आंचविजे । कर्मचि ब्रह्म ऐसें जाणोनि दातारा हृदयीं सगुण धरुनि राहिजे रया ॥१॥ जवळीं असतां सांडी मांडी करिसी । वायां सिणसी तुझा तूंचि रया ॥२॥ मुळीं विचारितां मन देह तंव कर्माधीन तेथिचें संचित क्रियमाण प्रारब्ध पाही । तें ठेऊनि जडाचिया माथां कीं वेगळें होऊनि पाहतां हें तंव तुज नातळे कांहीं । ऐसें निरखूनी पाहतां सगुण धरूनि आतां मग तुज

विचारितां भय नाहीं ॥३॥ हा तंव कल्पनेचा उभारा। मनाचा संशय दुसरा। जेणें घडे येरझारा जन्मांतर। म्हणोनि ऐसें कां सोसावें। एकचि धरूनि राहावें। येणें चुकती येरझारा। तेचि प्रीति जागृति स्वप्न आणि सुषुप्ति। ऐसाचि हो कांवो थारा। बापरखुमादेविवरु विठ्ठलु चिंतिता। सुख अंतरीं जोडेल सोयरा ॥४॥

५०८. **बरवीं पाउलें पाउलें** । सुंदर सकुमार पाउलें ॥१॥ शीतळ हरिचीं पाउलें। गोमटीं हरिचीं पाउलें ॥२॥ शिवासि उपदेशिलें। तेंचि प्रल्हादें स्मरिलें ॥३॥ उपमन्या प्रसन्न जालें। तेंचि गजेंद्रें चिंतिलें ॥४॥ अहल्येसि उद्धरिलें। तेंचि द्रौपदिये धांविन्नलें ॥५॥ यशोदेनें वोवाळिलें। तेंचि गोवर्धनीं रंगलें ॥६॥ शकटा अंगीं जें उमटलें। तेंचि बळिपृष्ठीं शोभलें ॥७॥ शिवें शक्तिप्रती कथिलें। धर्मराजें तें पुजिलें ॥८॥ बापरखुमादेविवरा विठ्ठलें। तें विटेवरी दाविलें ॥९॥

५०९. **लक्ष लावुनि त्रिपुटीं ठाण त्रिभंगीं चोखडें** । सगुण सांवळें ह्मणोनि प्रीत मना ॥ तें देखतांचि पडे मिठी दृश्यातें निवटी। मना गाठीं विरोनि ठेली ॥१॥ जवळिल निधान सांडूनि सिणसील बापा। तरि जन्मांतर न चुके बिजे रया ॥२॥ कल्पना काळीमा वेगळी त्यागी। अभावाचा मोडी थारा ॥ आशा दासी करून नातळे कोठें। नावेक मन करीं स्थिर ॥ सगुणीं धरूनि प्रीती। मना हेचि आस्था। तरि उणीव नये संसारीं रया ॥३॥ मन हें मूर्तिमंत कीं निर्गुण भासत। पाहतां नाहीं भेदार्थ इंद्रियांसी ॥ आपलें म्हणोनि एके वृत्ति भजतां। बापरखुमादेविवरु विठ्ठलु ध्यातां हृदयीं सुखें रया ॥४॥

५१०. **षड्चक्रीं कुंभार घडीतसे माती**। तैसें आम्हां किती चाळविसी ॥१॥ रातीचा दिवसु कीं दिवसाची राती। वावधाणी वाती लावितोसी ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे अवघेंचि मृगजळ। सांडुनि पाल्हाळ नित्य ध्याई ॥३॥

५११. **चातकाचें जिवन घनु तरि तो सये एका धिनु** । आला वेळु भुलावणु जैसा नळिनिसि नाहीं भानु ॥१॥ चंद्रासवें चकोर

मिळोनियां पूर्णिमेसि विरोधु मांडिला । तो योगु निर्मिळ ह्मणोनि तो प्रसंगु विपाईला वेळा रया ॥२॥ तैसें माणुसपण सहज तनुवरी देवाचा वारा स्वाधिनु । तैसा बापरखुमादेविवरु विठ्ठलु न विसंबावा एकु क्षणु ॥३॥

५१२. **सुख श्रृंगार सुहावा** । मिरवतो हरि समाधाना बोधुरे ॥१॥ हरिचें सुख गिति गातां । समाधान बोधुरे ॥२॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलुरे । आठवितां समाधान बोधुरे ॥३॥

५१३. **दीप दीपिका शशी तारा होतुका कोटिवरीरे** । परि नसरे निशि नुगवे दिवसु दिनकरनाथें जियापरीरे ॥१॥ नुद्धरिजे नुद्धरिजे नुद्धरिजे गोपाळेविण नुद्धरिजे ॥ध्रु०॥ नगर भ्रमतां जन्म जावो परि प्रवेशु एक्या द्वारेंरे । तैसा यजिजो भजिजो पुजिजो परि उकलु नंदाकुमरुरे ॥२॥ सर्वावयवीं शरीर सांग परि विरहित एका जिवेंरे । तैसा धिक् तो श्रोता धिक् तो वक्ता जो वाळिला विठ्ठलदेवेंरे ॥३॥ गळित शिर हें कलेवररे उदकेंविण सरिता भयंकररे। रविशशीवीण अंबर तैसें हरिविण जिणें तें असाररे ॥४॥ अंत:करणीं रुक्मिणीरमणु परि त्या श्वपचाहि बंधन नघडे नघडेरे । येरु यति होका भलतैसा परि तो भवाग्निहूनि न सुटे न सुटे न सुटेरे ॥५॥ शिखिपक्षी पत्रीं डोळे जेविं अकाळ जळद पटळरे । तैसीं गोकुळपाळकबाळेंवीण कर्में सकळ विफळरे ॥६॥ यम नियम प्राणायाम प्रत्याहार हे सकळउपाय परि अपायरे । जंव तमाळनीळ घन: सांवळा हृदयीं ठाण मांडूनि न राहेरे ॥७॥ मी उत्तम पैलहीनु भूतीं द्वेषाद्वेष ठेलेंरे । केलेंनि कर्मे उफकां निपजे सुख तें दुरी ठेलेंरे ॥८॥ आतां असोत हे भेदाभेद आम्ही असों एक्या बोधेंरे। बापरखुमादेविवर विठ्ठल निवृत्तिमुनिराय प्रसादेंरे ॥९॥

५१४. **मलयानिळ शीतळू पालवीं नये गाळूं** । सुमनाचा परिमळु गुंफितां नये ॥१॥ तैसा जाणा सर्वेश्वरु ह्मणों नये सानाथोरु । स्वरूपाचा निर्धारु कवण जाणे ॥२॥ मोतियाचें पाणी भरतां नये वो रांजणीं । गगनासि गवसणी घालितां नये ॥३॥ कापुराचें कांडण काढितां नये आड कण । साखरेचें गोडपण पाखडतां नये

॥४॥ डोळियांतील बाहुली करूं नये वो वेगळी । सखी म्हणुनि साउली धारितां नये ॥५॥ विठ्ठलरखुमाईचे भांडणीं कोण करी बुझावणी । निवृत्तीचें चरणीं शरण ज्ञानदेव ॥६॥

५१५. **सकुमार साकार परिमळें आगळें** । कर्पूर परिमळें घोळीयेला ॥१॥ मित्रपणें करा मधुर आळुमाळा । मधुकर गोपाळा हृदयीं धरा ॥२॥ भवतरु भवमूळीं भवमूळ छेदन । तेंचि अंगीं चंदन लाविजेसु ॥३॥ बापरखुमादेविवरु सुकुमारु आगळा । वेदश्रुती बाळा वेधलिया ॥४॥

५१६. **सुकुमार सुरस परिमळें अगाध** । तयाचा सुखबोध सेवीं आर्धी ॥१॥ मना मारी सुबुद्धि तल्लीन मकरंदीं । विषय उपाधी टाकीं रया ॥२॥ रखुमादेविवरु गुणाचा सुरवाडु । मन बुद्धि निवाडु राजहंसु ॥३॥

५१७. **बोलतां बोलु मावळला तो मावळोनि उरला** । तरि हा भावो केविं गमलारे बापा ॥ कीं इंद्रियांचा भोगु खुंटला कीं समंधियाचा ठावो निमाला । कीं वर्णावर्णुभला विचारु नाहीं ॥ तैसें आपुलेंचि करणें आपुलेंचि नवल । खेळया होउनि दावी रया ॥१॥ तपें अनेक विधी करावीं हे मनाची आधी । करितां करणें सिद्धि नव्हे यासी ह्मणोनि वाउगाचि वळसा पडे या धिंवसा । तैसा कल्पनेचा फांसा मायाबंधु ॥२॥ ऐसीयाच्या पाठी कां होसी हिंपुटी । नलगे तुज सुखाचा स्वादु या गोष्टी येणें ऐसेंचि विचारी । एकुचि धीर धरी न लगे या द्वैतासाठीं रया ॥३॥ ह्मणोनि डोळियांचें देखणें लाघव तो देखणा जाणे । तेथें आपपर पिसुणें न देखे कांहीं ॥ तें शब्देंवीण बोलतां निःशब्दें ये हातां । ऐसा उपावो करी कांहीं ॥ जोडिलिया धना वाढी बहु असें । तेथें वेचलें न दिसे कांहीं ॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु चिंतितां । सुखाचेनि सुखें राही ॥ निवृत्तिरायें खुणा दाउनियां । सकळ पुनरपि येणें नाहीं ॥४॥

५१८. **ये सातें आलिया वोळंगा सारंगधरु** । नाहीं तरि संसारु वायां जाईल रया ॥१॥ कवणाचे मायबाप कवणाचें गणगोत । मृगजळवत् जाईल रया ॥२॥ विषयाचें समसुख बेगडाची बाहुली ।

आभ्राची साउली जाईल रया ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे पाहतां पाहिलें। स्वप्नींचें चेईलें जाईल रया ॥४॥

५१९. **रुणुझुणु रुणुझुणुरे भ्रमरा** । सांडीं तूं अवगुणुरे भ्रमरा ॥१॥ चरणकमळदळुरे भ्रमरा । भोगीं तूं निश्चळुरे भ्रमरा ॥२॥ सुमनसुगंधुरे भोंवरा । परिमळ विद्गदुरे भोंवरा ॥३॥ सौभाग्य सुंदरुरे भ्रमरा । बापरखुमादेविवरुरे भ्रमरा ॥४॥

५२०. **आनुंदुरे आजि आनुंदुरे** । सबाह्य अभ्यंतरीं अवघा परमानंदुरे ॥१॥ एक दोन तीन चारी पांच सहा । इतुकें विचारूनि मग परमानंदीं रहा ॥२॥ सातवा अवतार आठवा वेळोवेळां । बापरखुमादेविवरु विठ्ठलु जवळा ॥३॥

## मुमुक्षूस उपदेश.

५२१ **सुखसोज्वळ मोतियाचें लेणें** । दिधलें जाई जणें बाईये वो ॥१॥ देशी नाहीं देशाउरी नाहीं । हाटणीं नाहीं तें पाटणीं नाहीं ॥२॥ लक्षाचेनि लाभें जोडलें निधान । बापरखुमादेविवरा विठ्ठलु जाण ॥३॥

५२२. **अनुभव रहणीविण कायसें श्रवण** । गर्भ अंधु नेणे रत्नकिरण ॥१॥ गेले मेले काय सांगाल गोष्टी । स्वयें आत्मज्ञानी घाला परमात्मीं मिठी ॥२॥ जीवा जीवन अंतरीं बाहेजु निर्धारीं । सर्व निरंतरीं पूर्ण भरित ॥३॥ बाह्यजु प्रवृत्ति अंतरीं निवृत्ति । उभयतां गति एक आहे ॥४॥ प्रसूतिकाळीं व्याली वांझ आपत्यजवळी । वांझ क्रीडा विनोदें रळि खेळतसे ॥५॥ अनुभव रहणीविण जाला भगवा दिगांबरु । जैसा नग्नवरु हिंडे हाटाबिदीं ॥६॥ तीर्थक्षेत्र व्रत दान यागादिक साधन । अनुभव रहणीविण शून्य धिक् गेले ॥७॥ सगुण निर्गुण पाहीं या दोहिंमाजि होऊनि राहीं । तरी निवसि ठाईंच ठायीं अरे जना ॥८॥ सगुण निर्गुण पाहीं जया पासूनि । ते राहे अनुभउनी येर वाउगेंचि रया ॥९॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलेंसि एकांतु । द्वैताद्वैताची मातु उरेचिना ॥१०॥

५२३. **स्वरूपावबोधु बोधु कां फावला** । इंद्रियीं डवरिला प्रेम-

भावो॰॥१॥ जाणते निवाले नेणते गुंतले । भजनेंचि गोंविले विसर जावो ॥२॥ शांतता समता निवृत्ति उदारु । वर्षोनी उद्धारु देतु असे ॥३॥ ज्ञानदेवा धीर घटमठीं सामा । अधऊर्ध्व व्योमा हरी दिसे ॥४॥

५२४. **सायुज्यसदनीं ज्ञानाचा उद्गार** । विज्ञानें अमर पावताहे ॥१॥ साधनबाधन धन गोत वित्त । हरिविण हित मनीं नाहीं ॥२॥ मार्गींचा कापडी धरूनियां वोढी । ईश्वरीं उघडी उडी घाली ॥३॥ ज्ञानदेवा सिद्धी साधन सपूर । कलेवर कापूर मुरालेंसे ॥४॥

५२५. **आवो कमळनयनीं चांदिणें भासिलें** । तयामाजी एक निराकार देखिलें ॥१॥ देहीं नव्हे तेंहीं नव्हे । कांहीं नव्हे तोचि पैं होय ॥२॥ बापरखुमादेविवरु नव्हताचि पैं जाला । होऊनियां फावला फावो सरला गे माये ॥३॥

५२६. **मेरुपरतें एक व्योम आहे** । तेथें एकु पाहे तेजःपुंजु ॥१॥ तेज नव्हे तेजःपुंजू नव्हे ॥२॥ शितळ नव्हे शांतही नव्हे ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलही नव्हे । नव्हे तो होये चतुर्देहेंविण ॥४॥

५२७. **पाहतां पाहणें दृश्याही वेगळें** । तें कैसें आकळे ब्रह्मतेसि ॥१॥ पाहे तेंचि पाही नाहीं तें काई । गयनीच्या पायीं तूंची होसी ॥२॥ स्वरूपीं रमता हृदयस्था आप । तयाचें स्वरूप आदि मध्यें ॥३॥ बापरखुमादेविवरु सगुणी नमाये । निर्गुण दिसताहे जनीं वनीं ॥४॥

५२८. **त्रिपुटी उलटु निर्गुणी अरुता** । पाहातां दृष्टांता भेदु नाहीं ॥१॥ भेदु अभेदु अवघाचि गोविंदु । बिंबे बिंब छंदु हरि लीळा ॥२॥ नाहीं आला गेला शब्द पैं दृष्टांतें । दृश्यादृश्य भूतें एकतत्त्वीं ॥३॥ बापरखुमादेविवरु अर्धउर्ध्व शेज । वेगीं तूं उमज अरे रया ॥४॥

५२९. **व्यक्ताचे अव्यक्तीं पाहतां पैं न दिसे** । आपींआप रसें व्यक्त हरी ॥१॥ बाहेजु भीतरीं आदिमध्य ऊर्ध्व । हृदयीं सन्निध बिंबलासे ॥२॥ ऐसीये दशे ते अव्यक्त भुंजसी । मी माझ्या मोहासि सांडी रया ॥३॥ बापरखुमादेविवर व्यक्त व्यक्ती अव्यक्त । अवघें संचित हरी आहे ॥४॥

५३०. **नित्यता समाधि असोनि पैं साधी ।** मायेची शुद्धि पुसे रया ॥१॥ साधन विधान पुजा अनुष्ठान । नित्यता कीर्तन सोहंभावें ॥२॥ स्मरण विलास तत्त्वीं तत्त्व हाला । उपदेशु बोला बोलों नये॥३॥ ज्ञानदेवा सिद्धि नित्यता समृद्धि। जीवशिवबुद्धि समाधि त्याची॥४॥

५३१. **पाहोनियां दिठी नवजाय भूली ।** मायेची घरकुली खेळतुसे ॥१॥ माया मन पाही मायेसीही पर । परते सत्वर निमिष्य नाहीं ॥२॥ खेळतां बाहुली स्वप्राचि वर्तवी । रावोरंक दावी भेदबुद्धी ॥३॥ बापरखुमादेविवर अभेदु हे अभिन्न । हरिरूपीं लीन जीवशिवीं ॥४॥

५३२. **अहंते न पाहें नाहीं तेंची पाहें** । भुलिसवें जाय काय करूं ॥१॥ सोहंभावें सोकरी कोहं भावें हो करी । पाहें दुरीच्या दुरी एकतत्वीं ॥२॥ आदि हें माजिठें रूपीं रूप पैठें । असोनियां द्रष्टे न पाहें भुली ॥३॥ बापरखुमादेविवर भुलिभुलरे हरी । माजिठा श्रीहरी आपरूपें ॥४॥

५३३. **जनवन हरि न पाहतां भासे ।** घटमठीं दिसे तदाकारु ॥१॥ फिटती भुररे धुम उठी तेज । अक्षरीं उमज गुरुकृपें ॥२॥ खुंटलि मुक्ति राहिले अव्यक्तीं । एकरूप ज्योती तदाकार ॥३॥ ज्ञानदेव क्षर अक्षर उमजे । बापरखुमादेविवर हृदयीं विराजे ॥४॥

५३४. **दिव्य औषधीची वार्ता** ऐकोनीयां कानीं व्याधी टाकी तनु । घालियाचें सुख भुकेला जेविं जाणे कैसें निवे त्याचें मनु रया ॥१॥ सुखाचा अनुभव कैसेनि जाणावा । भेटिचें आर्त सकळांसही सारिखें होईजे देखा ॥२॥ आपण झालिया जागा नलगे सांगावें । बापरखुमादेविवर विठ्ठल भेटलिया । तरि तुझीं तुटतील सकळिक विंदानें रया ॥३॥

५३५. **सर्वांग देखणें हाचि भावो जाण ।** येर निकारणें वायां वोझें ॥१॥ शक्तीचा पडिभरु वाहासिल वायां । श्रीगुरुपाया शरण जाई ॥२॥ नसंडी वेदसिंधु सांडी मांडी कर्म । उपाधीचा धर्म करूं नको ॥३॥ बापरखुमादेविवरदेखणा सर्व दृष्टी । तेथें प्रपंच गोष्टी मुरालिया ॥४॥

५३६. **संसारकथा प्रपंच चळथा** । मनाचा उलथा विरुळा जाणे ॥१॥ होतें तें पाहीं नव्हे तें घेई । द्वैतबुद्धि ठायीं गुंफों नको ॥२॥ चित्तवृत्ति ध्यानीं मनाची निशाणी । भ्रमभेद कानीं ऐकों नको ॥३॥ ज्ञानदेव गंगा निःसंगाच्या संगा । पावसी अभंगा भेदरहित ॥४॥

५३७. **येथें तेथें दुरि तो नांदे मंदिरीं** । आत्मा चराचरीं एकपणें ॥१॥ ऐसा पाहें दृष्टि चैतन्याची सृष्टि । तरि सुदर्शन घरटीं आपेंआप ॥२॥ जात जात पणें प्रपंच शोधणें । गाळूनियां गगन हंस घेई ॥३॥ ज्ञानदेव संधी साधूनियां सिद्धि । छपनाची संधी टाकुनि गेला ॥४॥

५३८. **शांति क्षमा दया निवती निर्विंग** । होउनी सर्वांग आत्माभोगी ॥१॥ नाहीं अंतरूप सर्वही चैतन्य । चिदानंदघन बिंबलेंसे ॥२॥ मायीकवृत्तीचा झणीं धरिसी संग । इंद्रियांचा पांग सांडी रया ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे कल्पना काजळी । दिपीं दीपमेळीं पाजळी वो जगीं ॥४॥

५३९. **असार घेईंजे सार पारखुनियां विचार** । जेणें तुटे येरझार मरणजन्मीं ॥१॥ तें रूपस रूपडें पाहतां न संपडे । हृदयीं सांपडे ज्ञान गोष्टी॥२॥सांगता अनुमान अद्वैत सार पूर्ण । ज्ञानाज्ञानी सज्ञान विरुळा जाणे ॥३॥ ज्ञानदेव सोपान सांगितलिया संपन्न । हरितत्त्व अनुप्रमाण लाधे पूर्ण पुण्यें ॥४॥

५४०. **निर्मिला म्हणसी परेचा विस्तार** । तेथें हा विचार वायांविण ॥१॥ पर नाहीं तेथें अरुतें कैंचें । आदिमध्य साचें कळिका हरी ॥२॥ नाहीं तें सन्मान विकृति उपरमु । त्या दिपीं दीप समु शेजेबाजे ॥३॥ बापरखुमादेविवरु परेसि परता । हा विचारु अरुता दिसे भान ॥४॥

५४१. **सज्ञानी पाहतां अज्ञानी तत्त्वता** । अज्ञानी अमृता सद्गुरु जाणे ॥१॥ गुरुगम्य सत्ता शिष्य होय सरता । पूर्णीं पूर्ण हातां ब्रह्म येत ॥२॥ आदि मध्य घर हरीचा शेजार । हरिविण थार नाहीं कोठें ॥३॥ ज्ञानदेवीं चित्त गुरु धर्म चित्त । अवघें जिवित हरी केला ॥४॥

५४२. **मनाची सृष्टि स्वप्न वर्तवी दृष्टी** । अळंकारलें उठी गंधर्व-नगर ॥ तेथिचिये राणिवेसाठीं कां भ्रमु धरितासि पोटीं । जेथें पाहातां पाहणें नुठी तोचि होई ॥ ह्मणोनि देखणीया जवळीके कीं दृष्टिविण सुके । तैसें स्वानुभवें स्वानुभव मावळे ज्याच्या ठायीं ॥ ते अवस्थे-विण दृष्टि गोचर होई वेगीं । ते देखणेचि दृष्टि विठ्ठल रया ॥१॥ तुझें तूंचि विंदान जाणोनि पाहीं । आपेंआपवीण विचारु नाहीं ॥२॥ म्हणोनि एकमेक मज आठवे आठवेचि विस-रोनि फावे । पैं देहद्वयभाव विरोनि जाय ॥ तेथें पदत्रयाची मांडणी कीं तत्त्वत्रयाची वाणि । या पांचांतें जेथ न फावे ॥ कर्मेंद्रिया ज्ञानेंसी ज्ञानेंद्रिये जो नेमेसी । तंव ते विस्मो करूनि पाहे ॥ सुखस्वानुभवादुःख प्रकाशलें तें सुख केविं फावे । याचिया गुणागुण न गुंतिजे हृदयीं सुखावोनि तेचि तूं राहें रया॥ ३॥मग आंगें शेजबाज कीं हे बाह्येंद्रियांचे उपभोग मानिसी साच । जरी सोंग स्वप्नींचें असे ऐसें जाणतां सिदसुरा होसी दातारा या स्वप्नींच्या वोरबारा बापा वोथरसि कांपा ॥ म्हणोनि बापरखुमादेविवरुविठ्ठलु उघडे डोळांचि निधान देखिजे तंव मार्ग सोपा । म्हणोनि जेथींच्या तेथें पाहतां याविण नाहीं दुजें । वायां खटपट करिसी बापा रया ॥४॥

५४३. **शून्याशून्य धार शून्यशेजे हरी** । शून्यामाजि घरीं बिंबलासे ॥१॥ आधीं आप पाहीं शून्याशून्य देहीं । मग उमजोनि ठायीं घेईजे सुखें ॥२॥ शून्य ते काई शून्याशून्य पुशिलें । हृदय-स्था जालें कोण्या गुणें ॥३॥ बापरखुमादेवीवर विठ्ठल अवघा । शून्याशून्य वेगा ज्ञानघन ॥४॥

५४४. **शांति दिसे ओहं पर दिसे सोहं** । क्षमा हे कोहं कारुण्य सदा ॥१॥ स्नेहाची दिवाळी फेडूनि काजळी । या दीपें वोवाळी जीवशिवीं ॥२॥ ज्ञेय ज्ञाता ज्ञान दृश्याद्रष्टा दीपीं । रूपीं रूपास्थिति अंकुरलीसे ॥३॥ बापरखुमादेवीवर विठ्ठल साच । मी माझें आहाच वायांवीण ॥४॥

५४५. **साउमा जंव जाये तंव हृदयींच आहे** । चित्त विकासुनी पाहें चित्तामाजी ॥१॥ तंव चतुर्भुज हरि हृदयमंदिरीं । तया नमन

करीं विज्ञानेसी ॥२॥ शांति धरुनि बाही आपेआप पाही । नमनीं निर्वाही न्याहाळिला ॥३॥ ज्ञानदेवा रूप बिंबोनी समीप । प्रपंच-दुःख रूप सुख जालें ॥४॥

५४६. **औट हात चर्म देह बांदवडी ।** त्रिगुणाची घडी नुगवे रया ॥१॥ सोकरितां धाया काय करील माया । श्रीगुरुच्या थायां विरुळा जाणे ॥२॥ सोहंकरा सोहंकरा हरि पोकारा । वायांच मायेचा वारा भरूं नका ॥३॥ सप्तद्वीप पृथ्वी नव खंडें देव । स्वर्ग-भोगभाव राणिव व्यर्थ ॥४॥ ज्ञानदेवीं सार हरिपंथ पार । एक-तत्त्व उच्चार तिहीं लोकीं ॥५॥

५४७. **दीपकेमाजि दीपक दीसी सतेज ।** बिंबोनि सहज बिंबीं व मिळे ॥१॥ बिंब नाहीं पाहासील काई । ठायींच्या ठायीं होऊनि राहीं ॥२॥ सर्वीं सर्वरस समरसोनी आहे । उभारुनी बाहे वेद सांगे ॥३॥ ज्ञानदेव निजीं निजोनि सहज । देहींचा निर्लज्ज रुसला सये ४

५४८. **जिणें देउनि देहीं निःशंक होईजे ।** मां मरणें मरण तयासि ह्मणिजे ॥१॥ जिणें तें काई मरणें तें काई । जिणें मर दोन्ही चोजवेना ॥२॥ सिंधु बुडवुडा क्षणामाजि आटे । सिंधु बुड-वुडा कांहीं तें नाटे ॥३॥ बापरखुमादेविवराच्या पायीं । ज्ञानदेवो पाही मरण जाणें ॥४॥

५४९. **सायखडियाचें बिक ।** अचेत करी परीपाक । जनदृष्टीचें कवतुक । स्फुरे वेगीं ॥१॥ तैसें हें देहरूप जालें । न होतेंचि होणें आलें । तंव सद्गुरु जाणितलें । येथीचें रया ॥२॥ सतधनि म्हणे गुरु । जत सांभाळी विवरु। ऐसेंनि तुज वोगरु । वाढिला ब्रह्मीं ॥३॥ निराकार अलिप्त वसे । शरीरीं असतुचि नसे । एकतत्त्व मनोद्देशें । हृदयीं ध्यायें ॥४॥ सोडीं रसाची सोये । नको भुलों माया मोह । सत्रावी दोहतु जाये । जीवन भातें ॥५॥ ज्ञानदेव म्हणे श्रीगुरु । ऐसा सांगति विचारु । मग ब्रह्मीं चित्तानुसारु । निरोपिला सर्व ॥६॥

५५०. **आपीं आप माये तेजीं तेज समाये ।** पवनीं पवन माये पृथ्वी जाये ॥१॥ हंस कोठें गेला तूं पाहो विसरला । भ्रमेंचि भुलला कोहं शब्दें

॥२॥ सांडीं तूं रे जाती होईं रे विजाती । येणें रूपें समाप्ती प्रपंचाची ॥३॥ ज्ञानदेवा घर विठ्ठल आचार । वेगीं पर पार हंसपावे ॥४॥

५५१. **अनंतीं अनंत तत्त्वता तंव एक** । विरुळा जाणे एक बिंबताहे ॥१॥ एका तेजीं बहु बहु तेज दृष्टी । एकतत्त्व सृष्टि मेळु शिवीं ॥२॥ तर्कांचाही तर्क विवेक सकळ । तेणेंविण गोपाळ आकळेना ॥३॥ ज्ञानदेव जाणे प्रसाद निवृत्ति । मौन्याची मुक्ति वाट आहे ॥४॥

५५२. **स्वभावें विचरतां मही** । सम ब्रह्म दिशा दाही । एकु एकला असे पाहीं ! सर्वांघटीं बाईये ॥१॥ दुजें द्वैत हेतु सांडी । एकतत्वसार मांडी । हरिविण इये पिंडीं । नाहीं वासु वो माये ॥२॥ काय सांगों याच्या गोष्टी । अवघा दिसे हाचि सृष्टी । विश्वरूप स्वरूप किरीटी । अर्जुना दिठीं दावियलें ॥३॥ ज्ञानदेवीं दीप उघड । उजळुनी केलासे वाड । माया देवीं आह्मां नाहीं चाड । अवघा गोड हरी आह्मां ॥४॥

५५३. **बाहिजु भीतरीं भीतरलेपणा उरी** । उरी उरैल साचारी जेणें निवविजे ॥ तेथचिया सारा मुसें मुसुल्या आकारा । सोय सांडू नको येरझारा चुकतील ॥१॥ सहज भक्तिसुख पावसी । जाणु असतां कां नेणु होतासी । मागिलीं ये तुटीसाठीं । लाभु ये खेपेचा मनुष्यपणाचेनि मापे घेईजेसु रया ॥२॥ येकवटु वटवटाच्या पोटीं । बिजीं बिजा आंतवटु आपण पैं । तिहीं रजीं रजु सरे सरोनियां जें उरे तैसें एकसरां धुरें तूं अनुसरें पां ॥३॥ रविरश्मीचिया तेजा । कवण बैसविलिया वोजा । कैशा सांगती त्या गुजा सामवेलपणें ॥ जळीं तरंगू भेदु तैसा परमात्मा परमानंदु । ऐसा सांडूनि गोविंदु ह्मणें विलया जासी ॥४॥ जळें जळ पियीजे तेथें काय उरें दुजें । ओघें ओघुचि गिळिजे बाप सागरापोटीं ॥ सिंधु नेणे अव्हांटा नदीचिया वाटा । तैसा करीलरे हरि सांठा तुज आपणामाजि ॥५॥ तेथें जगचि परतलें जग जगपणा मुकलें । मोहो अभावीं उरलें उरतां ठायीं ॥ तेथें सिंधुचि अवघा अवघेपणें नये मागा । यापरी लागवेगा हरी पावसी रया ॥६॥ ऐसे सुखाचे सोहळे माजी सुख प्रेमवोळे । कवण

सुख बोले सुख सुकाळे मातलें तें ॥ तेथें मी तूं सरे सेखीं भक्त तोही नुरे शिवीं शिव विरे मोहरे जालया रया ॥७॥ अमृतीं अमृता गोडी बोल बोलतां बोबडी । पुण्य मनोधर्मीं गुढी उभारिली जेणें ॥ अमर वोघाचेनि वोघे अफाविजे जिवलगे । बापरखुमादेविवरा । विठ्ठलासंगें सांपडलें ॥८॥

५५४. **दृष्टीचें सुख अंतरीं देख** । ओंकार अरुष बोलताती ॥१॥ नादुलें ऐकसीं बिंदुलें न देखसी । कोंदलें चौपासी सांवरेना ॥२॥ तें आतु ना बाहेरीं आणि अभ्यंतरी । एकलेंचि निर्धारीं वसतसे ॥३॥ उफराटिये दृष्टी निवृत्तीच्या शेवटीं । ज्ञानदेवा भेटी होउनि ठेली ॥४॥

५५५. **सांगेन तें ऐक दाविन तें पाहें** । या मनाचि मूळ सोय आठवीं पां ॥१॥ आठवितां तूं तया ठकासिल कैसा । सांजवेळें लाहोसि उदो कां जैसा ॥२॥ बुडोनियां राहीं आनंदसागरीं । आठवितां असे जन्मवरी रया ॥३॥ पडतासि दृष्टी निवृत्तीच्या चरणीं । मा ज्ञानदेवो मनीं धरुनि ठेला ॥४॥

५५६. **जिता जिणें लागे गोड परत्रि ते अवघड** । आवधियाहुनि तनु वाड मरण भलें ॥१॥ जिता मरिजे मरोनियां उरिजे । इतुलें जाणिजे तरि जपणेंचि नलगे ॥२॥ बापरखुमादेविवरा विठ्ठलाच्या पायीं । ज्ञानदेव पाहीं मरण सांगे ॥३॥

५५७. **देखणें देखाल तरी हरे मन** । सामावलें जीवन मुक्तरत्न रया ॥१॥ भला भला भलारे ज्ञाना । निवृत्ति आपणा दावियेलें ॥२॥ गुरुमुखें ज्ञान पाविजे निर्वाण । तें निवृत्ति ह्मणे ज्ञाना पावसील ॥३॥

५५८. **सकळहि कळा बिंबोनि निराळें** । तें तूं घेउनि उगलें राहें रया ॥१॥ तें तत्त्वता तत्त्व घेईका एकत्त्व । या मना महत्त्व देउनियां ॥२॥ निराळ निराकार पाहे तें अपरंपार । तें तूं परात्पर होउनि राहें ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु सकळहि कळा प्रकाशकु । तोचि सर्व व्यापकु जाणोनि राहीं ॥४॥

५५९. **जगत्र धांवताहे सैरा म्हणोनि धांवसी** । थोर कष्टलासी वायांविण ॥ धांवोनि जावोनि काय करिसी । सहज अहर्निशी

भेटी नाहीं ॥१॥ जीव जाणवेना जीव जाणवेना । जिवाचें वर्म तें चोजवेना ॥२॥ जिवाशिवा दोन्ही भिन्न भेदु नाहीं । विचारूनि पाहीं हृदयामाजी । जिऊ सर्वाठायीं असे योगिया न दिसे । कुडी सांडूनि वसे कवणे ठायीं ॥३॥ जिऊ जैसाचि आला तैसाचि गेला । तो कोठें सामावला जाणतेनो ॥ ज्ञानदेवो म्हणे जिऊ कोठें गेला । जिवा जन्म जाला कवणे ठाईं ॥४॥

५६० **भलें बोलोनि दाविलें मज** । आत्मज्ञान सांगेन तुज ॥१॥ मनाचा प्रकाशु थोरु । मनेंचि ब्रह्म उजियेडु ॥२॥ निवृत्ति सेवियेला सुघडु । तेणें मज जाहाला ब्रह्माचा पाडु ॥३॥

५६१. **आपणासि आपण उपदेशु कीजे** । गुरुमुख बुझिजे तेंचि तूं ॥१॥ मी तें कवण हें तूं जाण । बुझें निर्वाण तेंचि तूं ॥२॥ सिद्धचि सांडूनि निघसी अनानी ठायीं । तूं रिघेंपां सोई संताचिये ॥३॥ जें तपाव्रताचे ठायीं तें येथेंचि पाहीं । परि तें ठाईंच्या ठाईं म्हणे ज्ञानदेवो ॥४॥

५६२. **पाहणे पाहाते सांडुनि निरुते** । पाहिलिया त्यातें तूंचि होसी ॥१॥ तोचि तूं आपण तत्त्व तें तूं जाण । नलगे साधन आन कांहीं ॥२॥ भानुबिंबेवीण भासलें तम । ज्ञानदेव धर्म अनुवादला ॥३॥

५६३. **तूं तो माझें मी तो तुझें** । ऐक्य जालें तेथें कैंचें दुजें ॥१॥ तूं हो मी गा मी तो तूं गा । अज्ञानें बापुडीं नेणती पैं गा । ॥२॥सगुण होतें तें निर्गुण झालें । सगुण निर्गुण एकचि जालें ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे परतूनि पाहीं ।जीवाचा जिवनु कवणीये ठायीं ॥४॥

५६४. **अमोलिक रत्न जोडलेंरे तुज** । कांरे ब्रह्मबीज नोळखसी ॥१॥ न बुडे न कळे न भीये चोरा । ते वस्तु चतुरा सेविजेसु ॥२॥ ज्ञानदेवो ह्मणे अविनाश जोडलें । आणुनि ठेविलें गुरुमुखीं ॥३॥

५६५. **पढियंतें कीरु जाणसी तरि** तो ठावो दृष्टीसी दुरी । सिंहुरी मोकारेविण प्रतिबिंबासी चेतना लाहे ऐसें कीजे रया ॥१॥ आवडी वेचुनियां डोळियां पुढें रितां कां रिगतासी । तूंचि तूं सर्वांभूतीं ऐसें जरि जाणसी तरि साचे भेटी केउता जासी रया ॥२॥ अरे हा दुजेविण खेळु मांडिला हरिजैत अनुठायीं नाहीं । बापरखुमादेविवरा विठ्ठला तुज जाणतयासि काय जाणणें रया ॥३॥

५६६. **मन मुरे मग जें उरे ।** तें तूं कांरे सेविसिना ॥१॥ दिसतें परि न धरवे हातें । तें संतातें पुसावें ॥२॥ तेथींची खुण विरुळा जाणे । निवृत्ति प्रसादें ज्ञानदेवो ह्मणे ॥३॥

५६७. **व्रतें तपें तीर्थें तंवचि वरी गर्जती ।** जंव देखिलें नाहीं तुवां तूंतें ॥ जेथें वेदा मौन्य पडे श्रुति नेति नेति म्हणोनि बहुडे । तें सुख वाडेंकोडें भोगिजेसु ॥१॥ नाहीं आपण पैं सौरसु कां करिसी हव्यासु । लटिकाचि मायाभासु मिथ्या भ्रमु ॥ सिद्धचि असतां करिसी साधनाची चाड । सुख सांडुनी दुःख वाड भोगितासी रया ॥२॥ या विश्वायेवढा जगडंबरु पसारा । देखोनियां सैरा मन धांवे तुझें ॥ मृगजळ देखोनि मृगें आलीं टाकोनि । जीवन म्हणौनि तान्हा फुटोनि मेलीं ॥३॥ आतां तुज नलगे कष्टावें जें असेल स्वभावें । नेमिलें देवें तें न चुके ब्रह्मादिकां ॥ उमप सांडूनि करिसी दैन्याचे डोहळे । निधान देखोनियां डोळे वायां झांकूं नको ॥४॥थोडें हें सांडीं परौतें बहुत तें घेईजे अरौतें । जें चाळितें तूंतें आणि विश्वातें ॥ मागें जें केलें तें अवघे यांतुचि निमाले । आतां पाहतां तुझियेनि बोलें बंधमुक्त रया ॥५॥ पुत्र कलत्र वित्त हा तो मिथ्या मोहो । आतां आपुलासाचि वावो मानेल तुज ॥ नखापासूनि शिखा व्यापूनियां आहे । बापरखुमादेविवरु विठ्ठलु हृदयींचा ध्यायिं सुखें रया ॥६॥

५६८. **नाहीं तें तूं काय गिळिसी ।** आत्मा वोळखोनि होय तत्त्वमसी ॥१॥ सांडी सांडी सगुणाची भ्रांती । तूंचि निर्गुण आहासी तत्त्वमसी ॥२॥ रखुमादेविवरु विठ्ठलु पंढरीयेसी । कांहीं न व्हावा अवघा होसी ॥३॥

५६९. **पाहाणेंचि पाहासी काय पाहणें तेथें नाहीं ।** पाहाणेंचि पाहीं पाहणें रया ॥१॥ खुंटलें बोलणें बोलीं बोला । बोलुचि मौन्य ठेला मौन्यामाजि ॥२॥ बापरखुमादेविवरा विठ्ठलाचिये खुणें । अनुभविया बोलणें पारुषलें ॥३॥

५७०. **पिंड निर्माण जीवकळा सरिसी ।** गति प्रवेशीं कैसी जाली ॥१॥ तेथींची रचना न कळे हो देवा । अनुभवाचा ठेवा

काढुनी पाहें ॥२॥ वरपंगाचें लेणें लेवविसी जाईजणें । परी घरांतील ठेवणें नुमगसी ॥३॥ अणुचें प्रमाण न साहे डोळां । कैसा मुक्तीचा सोहळा घेवों पाहसी ॥४॥जळीं नांदला तो तरंगीं उमटला । मिळोनियां गेला सागरासी ॥५॥बापरखुमादेविवरा विठ्ठला उदारा । ज्ञानाचा वेव्हारा होई बापा ॥६॥

५७१. **कापुरा अग्नि स्नेह जाला** । मी नाहीं तेथें काय उरला ॥१॥मी नाहीं तेथें कवणिये ठायीं । देखत देखत पाही भुललासी ॥२॥ बापरखुमादेविवर विठ्ठलीं खुण । जाणते जाणती ते अनुभाविये ॥३॥

५७२. **स्वप्नाचेनि भ्रमें धरिसी स्थुलाकृति** । परि सिद्धि नव्हे सत्य त्याच्या पायीं । कारण महाकारण लिंग आणि चतुष्टय । हे शाब्दिक उपाय बोलों ठाती ॥१॥ येक नाहीं तेथें दुजें कायिसें । देहद्वय पाहातां दुजें न दिसे ॥२॥ तेंचि ते संकल्प स्थूळ नैश्वर्याचें भान । त्या ह्मणती कारण नवल पाहीं । महाकारण लिंगदेह शाब्दिकीं धरिला । तो शास्त्रज्ञीं पाहिला अर्थी साही ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलुचि देहीं । अवस्थातीत पाहीं तोचि एक । निवृत्तिरायें अंजन लेवऊनि पायाळा । निजसदन तें विश्व जालें ॥४॥

५७३. **बोधलिया अंजनासी पायाळू हा काय** । निधान जवळी आहे परि शब्द नेणें ॥ परादिकां वाचा मौन पडिलें जाण । तेथें पायाळाची खुण कोण लेखी ॥१॥ सुखाचा संवाद आपण्यामाजी पाहीं । देहींचा देहीं विदेही होऊनि ठेला ॥२॥ अविकल्पवृत्ति भानु संकल्पें हा नातळे । कर्म तया न मिळे करिजे कोणें ॥ बापरखुमादेविवरु कर्ता कर्म न पडे कांहीं दृष्टी । वायांचि भ्रमें बांधलासी सृष्टी रया ॥३॥

५७४. **श्रुतीं सांगितलें उपनिषदीं अनुवादलें** । आह्मां लाधलें निरुतें वर्म ॥ अनुभवें गोविंदु करितां अनुवादु । परब्रह्म आनंदु तरि तें नव्हे ॥१॥ बोलिजे तें नव्हे दाविजे तें नव्हे । गुरुमुखीं पाहावें परमानंदें ॥२॥ अरूप परि बरवें दिसे । भीतरीं कैसें विनवीतुसे॥३॥ अनुभविया प्रति बोलिजे लक्षण । ज्ञानदेवें खुण सांगितली ॥४॥

५७५. **निर्गुणाची वार्ता सगुणीं मांडिली** । सगुण निर्गुण दोन्ही एकरूपा आलीं ॥१॥ सगुण नव्हे तें निर्गुण नव्हे । गुरुमुखें चोजवे जाणितलेंपां ॥२॥ रखुमादेविवरु साकारु निराकारु नव्हे । कांहीं न-होनि होये तोचि बाईये वो ॥३॥

५७६. **प्रकाशें देखिलें त्याहुनी वेगळें** । नाहीं तें धरिलें सोहं मार्गे ॥१॥ या मार्गापंथीं तूं तुझें नाहीं । बिंब हारपलें तें तत्त्व पाहीं ॥२॥ बीजाचा प्रकाश तुझा तूं नेणसी । हारपलें मन हें दाही दिशीं रया ॥३॥ पुराणप्रसिद्ध निवृत्ति लाधलें । गुरुमुखें लक्षीं चोजवलें रया ॥४॥

५७७. **आलाडु आडु पालाडु आडु मध्यें वाहे पाणी** । तिहीं संधि खेळु मांडिला सितादेवि राणी ॥१॥ सुखाति चांदिणें राती । बहुतें खेळती येकु देखो ॥२॥ खेळतां खेळतां नवल पाहे देखणा खिर खाये । सांपडे तें कोण्हा न संगे भोग्या शिवोन राहे ॥३॥ भोगिया सिवोन उतरला डायीं । ज्ञानदेव सांगे निवृत्तीच्या पायीं ॥४॥

५७८. **एक पाहातां दुजें गेलें** । शेखीं पाहातां सर्व शून्य जालें ॥१॥ पाहातां तयाचा विचारु । निवृत्ति जाणे तो श्रीगुरु ॥२॥ एक मूळ एक आदि । शून्य मांडिली उपाधी ॥३॥ निवृत्तिदासाचें बोलणें । जाणा मीपणा उमाणें ॥४॥

---

## बाळक्रीडा.

५७९. **गोकुळीं कमळ विस्तारलें साचें** । ध्यान श्रीधराचें करावया । यमुनेच्या पाबळीं मूर्ति देखिली सांवळी । चिदाकाशींची वोतली प्रेमतनुगे माय ॥१॥ आवडीचें वालभ ब्रह्म पुंजाळलें । गोपवेषें गाई राखे । कांबळीची बुंथी घेऊनि कल्पद्रुमातळीं । त्रिभंगी ठाण मांडियलेंगे माय ॥ध्रु०॥ योगमायेचेनि विलासे उभा देहुडा पाउलीं । तेथें दीप्ति जे उदेली तेजाकारें ॥ अंगुष्ठीं अंगुष्ठ स्थापिलें मूळपीठ । सुनीळनभाचेनि काळीवटे अंगोळियागे माय ॥२॥ शेष गुढारी विसंचला कीं भूमि पांवो ठेविला । तोचि विन्यस्त उभारला तेजःपुंज ॥ कुंकमपिंजरिचेनि सळे मा पर्वती रातोत्पळें । त-

ळवाचे रंग बाहुळे पाऊलीं श्लाघेगे माये ॥३॥ चरणकमळीं कमळा कैसी विराजली बाळा । तेथें जाला एकवळा ये कमळीं कमळा ॥ ध्वजवज्र अंकुश रेखा चरणीं वोळलीं पीयुषा । नखें सरळीं देखा काळेपणाचेनिगे माये ॥४॥ घोटी सुनीळ निरावकाशें काश पाहातां भासलासे । जानुजघन प्रकाशें नभ धवळलें ॥ कासे कसिला सोनसळा खवे आला मध्यस्थळा । रत्नजडित मेखळा शोभतसेगे माय ॥५॥ द्वितीय कमळीं प्रजापती कीं रोमराजी झळकती । तेथें उपनली दीप्ति काळीं त्रिवळीची ॥ उदरवक्षस्थळ द्विजपद निर्मळ । स्तनचंद्र पोकळी ढिसाळ काळिमा जैसींगे माय ॥६॥ उदधीचेनि प्रेमसळें आपाद वैजयंती माळे । वरी शोभताती सोहळे सगुणाचे ॥ दशनदीप्ति झळाळी रत्नकिळा मागों आली । दिसे हनुवटी बुजाली प्रभेचेनिगे माय ॥७॥ प्रणवाचा मरिगळा पूजनासि आला भाळा । तुर्येसहित त्रिपुंड्र टिळा अर्ध ऊर्ध्व मात्रीं ॥ अभिनव महाकारणीं । पवनपंचकाचीं खेंवणीं । कुंडलें पेरावाणी कर्णीं ढाळ देतीगे माय ॥८॥ माथां मोर पिसावेठीं गंडस्थळीं पडे दीप्ति । स्वयें विस्मित श्रीपती तेजःपुंजगे माये ॥ तरुघोंस खोंविले शिरीं वेणु ठेऊनि अधरीं । नंदरायाचा खिल्लारी वोज काय सांगोंगे माये ॥९॥ सप्तरंध्री सप्तस्वर चाळी अंगोळिया मनोहर । मुद्रिका शोभती साकार । रत्नजडितगे माये ॥ तिया वेणुचिया किळा । गोपि वेधल्या सकळा । अवघिया जाल्या पैं काळ्या। कृष्णरूपेंगे माय ॥१०॥ ऐसा नटनाट्य वेषधारी। सहित संवगडे वारिधारी। कैसा त्रिभंग कुसरी। उभा असेगे माय॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु सुखाचें निधान । तें म्यां हृदयीं संपूर्ण सांठविलेंगे माये ॥११॥

५८०. भक्तिचिया चाडा गोकुळासी आला । त्याशी गौळणी म्हणती वाल्हा दुल्हागे माये ॥ आवडीच्या सुरवाडे परब्रह्म सुरवाडे । त्यासीं गौळणी खेळविती लाडें कोडेंगे माये ॥१॥ गोजिरिया कान्हो अपछंद मत्ता पाउली रंगे रंगनाथा । दृष्टीचिया डोळां सुख निवडेना मागुतें ते वाचा वर्णावी केंवि आतां रया ॥धु०॥ अठुले लोळिया ढाळ देती कानीं मुक्तें खेवणी हरि खवणिलीं । अंतरिंचिया

सुखा प्रगट दाविती देखा । ललाटीं झळकती रेखा रत्नजडित पत्रें माथांगे माय ॥२॥ युगबंदु दिधला तैसा दोंदिलु मिरवला । नाभिकमळीं प्रकाश जाला परमेष्ठी ॥ कटितटीं कडदोरा साजे त्या सुंदरा । लोण उतरूनी पुरां वेदु मानसीं वसेगे माय ॥३॥ श्रुतिचेनि समागमें पाउलें गोजिरीं । घागुरलीं प्रेम नेपुरें कैसी वोप देती ॥ अंदु वाकी नेवाळे पाय करीती बेंबिले । मुनिजनांचे सुखसोहाळे पुरवितसे गे माय ॥४॥ ऐसा आपुलिये लीळे आपणासींच खेळे । गौळणी भरुनियां डोळे कैशा पाहाताती ॥ अवघें कृष्णरूप भरलेंसे मानसीं । बापरखुमादेविवरेंसी मिळोनि गेल्यागे माये ॥५॥

५८१. **जटिल धुळधुसिर दोंदिल डोळसु** अंगणीं बाळचंद्र खेळतां दिसे ॥ तें देखोनियां यशोदा माया पसरोनियां बाह्या । तें क्षेम सांगावया वाचा कैची ॥१॥ वालभतें ब्रह्म गोकुळीं आनंदें । गोळियाच्या छंदें खेळतां दिसे ॥धु०॥ थुरथुर चालत भूमी पाय ठेवित । आंतु बाहिर दावित यशोदे माय ॥ तो नित्य पूर्ण ह्मणे कडे घे कांवो माय ॥ स्तनपान दे कासये वोसंगा घेउनी माये ॥२॥ दोनी चारी कणिका वक्रारविंदीं देखा । तें मुखमय का माहेर होता ॥ तें उचलोनि कपोळीं स्नेहें चुंबिती गौळणी । मांजयाची सिरयाणी ध्यानीं मुनिजनांगे माय ॥३॥ विश्व प्रतिबिंबाचें बिंब तो कान्हया वो साजणीं । त्यासी वोसंगा घेउनी गौळणी स्तनपान देती ॥ सवेंचि कासाविस होती मा साचचीं कान्हया नाहीं तेथें यशोदा ते कैची ॥४॥ वेदशास्त्रा पुराणा आणि यज्ञतप दाना । श्रुति धांडौळितां मना ठावो नुरेचि ॥ मां मां ह्मणोनि गौळणी अंगोळिया धरिती । मां विस्मयो करिती चोज अचोजगे माय ॥५॥ ब्रह्मादिकां लक्षां नये कल्प गेले युगे युगे । तो गौळणिया वोसंगा निघालागे माय ॥ तें बाळ भावाचें कीं संत देवाचें । नवर्णवे वाचे दिपोदिपींवो माय ॥६॥ सांवळा सुजेडु कीं सुधेपरिस गोडु । तो या डोळ्यां उजियेडु डोळसु तो । त्यानें एकें घेइजे देइजे एके पुजिजे । मां प्रीतिचेनि माजे नेणिजे दुजेगे माय ॥७॥ हारवी कांई आपुलेपण न सांडितां गांवोगांवीचा होतु जातु । तैसा गोकुळीं गोपिनाथु

सकळ जनांगे माय ॥ कृष्ण परब्रह्म पुतळा कीं आनंदाची कीळा । तो हा भोगितां हे लीळा मदनाची गे माय ॥८॥ एक पावलों ह्मणती ते कांहींच नेणती । अनुसरलिया हातांतळीं पावा पावा ह्मणे निवृत्तिदासु हरी बापरखुमादेविवरु विठ्ठलु करील तें निकेंगे माय ॥९॥

५८२. **योगियां मुनीजनां ध्यानीं** । तें सुख आसनीं नयनीं ॥१॥ हरी सुख फावलेंरे ॥धु०॥ गोकुळींच्या गौळिया । गोपी गोधना सकळा ॥२॥ बापरखुमादेविवर विठ्ठलें । तें सुख संवगडिया दिधलें ॥३॥

५८३. **पावया लुब्ध झाल्या पाबळा** । गाई परे वळारे कान्हो ॥१॥ विसरल्या चार विसरल्या पार । तल्लीन साचार कृष्णमूर्ति ॥धु०॥ पाणिया निघाल्या गाई चरती कळंबा ठाईं । हांकितसे लवलाहीं सवंगडा ॥२॥ ज्ञानदेवीं गाई हाकितु पावे सोई । हरिनाम दोही सत्राविये ॥३॥

५८४. **गायी चालिल्या वनाप्रती** । सवें पेंधा चाले सांगातीं ॥१॥ वळि गोवळिया कान्होबा । यमुने पाण्या नेईं तूं बा ॥ ध्रु० ॥ पांवया छंदें परतल्या गाई । विसरल्या चारा तल्लीन ठायीं ॥२॥ ज्ञानदेव सवें सवंगडा लाठा । गाई हांकितो गोठणा तटा ॥३॥

५८५. **माथे टेंकित बाह्या पसरित** । डांगाचे आधार घेती ॥धु०॥ एक ह्मणती आम्हीं उचचिला पर्वत । बहुत मिळोनि काय नव्हतीरे ॥१॥ बाहे कडाडित मनगटें लचत । म्हणोनि उठिले अवघेरे ॥२॥ तयामाजि असतां न दिसे बाप । समर्थ थोर तुझी मावरे ॥३॥ काळु आतुडे परि वेळु नातुडे । म्हणोनि रक्षिलें सकळांरे ॥४॥ बापरखुमादेविवर विठ्ठल साच । म्हणोनि रक्षिलें आम्हांरे ॥५॥

५८६. **कल्पद्रुमातळीं ब्रह्म पुंजाळलें** कैसें दिसतें सुनीळ तेजगे। मज पाहातां वेणु वेदध्वनि नाद उमटताती सहजगे बाई ये ॥१॥ आनंदें गोपाळ गोधनें राखे सीतळ यमुनेच्या पाबळीं । कर्मकाठी वरी घेऊनियां वळत्या देतुसे पांचाच्या मेळिंगे बाइये ॥धु०॥ ऐसा जिकडे तिकडे उभा राहोनि बाहो । हाणतो थोपे तयांचिया कर्मा होतिसे निवृत्ति । काय पुरविल येवढें तपगे बाइये ॥२॥ गोवळेपणाचेनि वेषें अमरीं सेविजे ऐसें बोलताति सवंगडे । येरुनि येराचिया

उच्छिष्टा झोंबती नेणों तया काय जोडेगे बाइये ॥३॥ मुनिजनां स्तावितां संतोष न पवे तो हुमलि घेतां हांसे । ब्रह्मादिकां बोलाची अक्षरें कोण जाणे प्रेम कैसें गे बाइये ॥४॥ ऐसा साहिदर्शनां वर्णितां पवाडु नाहीं । आणि गोवळेपणें वेष नवल सागों मी कायी । बापरखुमादेविवर विठ्ठलु सेविलिया । वांचूनि नेणवे केलिया कांहींगे बाईये५॥

५८७. **नागोठणीं गोपाळ वळतिया देतो** । कीं आनंदली गोधनें ऐकोनि वेणुध्वनी तत्त्वतां । तुझी सांवळी सुंदर बुंथीं न विसंबे क्षणभरी तेंवि सुखीं सुख पाहतां निजचित्तारया ॥१॥ आनंदल्या मनें पहा तूं निधान । जवळिल्या दिजध्यानें सांडूं नको ॥ ध्रु० ॥ ह्मणोनि कल्पनेचा उबारा मन संधीचा संधु भागु अनुसराया गोठणींचया । दुर्लभ शक्ति ते गोपवेषें नटले चैतन्य मांदुसेचें परांदिकां नव्हे निजशक्ति रया ॥२॥ ह्मणोनि रखुमादेविवरु सद्‌सुखाची निजवोल पाहें मीतूंपणा नातळे तो ऐसीयाचि बुंथीं सखोल । निवृत्तिरायें खुणा दाऊनि सकळ निज चैतन्य पाहे निखळ रया ॥३॥

५८८. **हरि प्रेम सरोवरीं** । क्रीडति ये मदन कुहरीं । प्रेम सरोवरींये ॥१॥ चांदिणें निर्मळ । चंदनें धवळतिये । पैल वृंदावनीं वासुगा गोविंदु खेळतिये ॥ध्रु०॥ प्रकृति भक्ति परमातु मातु मा परमहंसु । ज्ञानदेवो ह्मणे निवृत्तिदासु ॥२॥

५८९. **गोंवळेपणाची बुंथी घेउनियां भेष** । रिझविशी मानस यशोदेचें ॥१॥ त्या सुखें ब्रह्मांड थोडेंपां तियेसी । दुग्ध पैं मागशी बाळपणें ॥२॥ ऐसें मोहियेलें जगभक्त अंतरंग । भावाचें सुरंग प्रेमबोधें ॥३॥ मज मानसीं सुख तुझ्या रूपीं वोलावा । सर्वेंद्रियें दोहावा तुझ्या नामीं ॥४॥ जन हे विव्हळ तुजविण अविचार । गुंपले साचार माया मोहें ॥५॥ आतां ऐसें करीं तुज मज सरोभरी । प्रपंच केसरी होई रया ॥६॥ बापरखुमादेविवरु सोपारा पैं निळा । निवृत्तीनें कळा सांगितली ॥७॥

५९०. **लक्ष लावुनि अंतरीं** कृष्णा पाहती नरनारी । लावण्यसागरु हरि परमानंदु ॥१॥ छंदें छंदें वेणु वाजे त्रिभुवनीं घनु गाजे । उतावेळ मन माझें भेटावया ॥२॥ ब्रह्मविद्येचा पुतळा

गाई राखितो गोंवळा । श्रुति नेणवे ते लिळा वेदां सनकादिकां ॥३॥ भूतग्रामींचा परिशु तापत्रयाचा करीं नाशु । आड धरुनि गोपवेषु वत्सें राखे ॥४॥ रासक्रीडा वृंदावनीं खेळे इंदुवदन मेळे । उद्धरी यदुकुळें कुळदीपकें ॥५॥ निवृत्तिदासाचा दातारु बापरखुमादेविवरु । भक्तां देतो अभयकरु क्षणक्षणांमाजी ॥६॥

५९१. **गुणें सकुमार सावळें दोंदील** पहाती पां निराळें केवीं वोळलेंगे माय । सुखें चैतन्याची बुंथी वोतली ब्रह्मादिकां न कळे ज्याची थोरीव । तो हा गोवळियाच्या छंदें क्रीडतु साजणी नवल विंदान न कळे माव रया ॥१॥ डोळां बैसलें हृदयीं स्थिरावलें मन नुठी तेथून कांहीं केल्या ॥ ध्रु० ॥ सच्चिदानंद पदीं पदातें निर्भेदीं। निजसुखाचे आनंदीं माये क्रीडतुसे ॥ तो हा डोळियां भीतरीं बाहिजु अभ्यंतरीं। जोडे हा उपावो किजो रया ॥२॥ गुणाचे पैं निर्गुण गंभीर सद्सुखाचे उद्गार । जें प्रकाशक थोर सकळ योगाचे ॥ आनंदोनी पाहें पां साचे मनीं मनाचि मुरोनि राहे । तैसें बापरखुमादेविवरा विठ्ठलें कीं मुसेमाजि अळंकार मुराले । श्रीगुरुनिवृत्तीनें दाविलें सुख रया ॥३॥

५९२. **परब्रह्म सांवळें गोपवेशें निराळें** । हृदयकमळीं स्थिरावलें काय सांगों ॥ कायावाचामनें पाहें जों पाहणें । तंव नवलाव होय निर्गुणरया ॥१॥ नामरूपीं गोडी हेचि आवडी आतां । न विसंबे सर्वथा तुजलागीं ॥ध्रु०॥ जगड्वाळ प्रपंचभान हें तुज नातुडे हन। वायां भोगिसी जाण कारयाचें ॥ तुझीची बुंथी तुजाचि न कळे याचें चोज। केविं वर्णिसी सहज गुणें रया ॥२॥ ह्मणोनि दृष्टि चोरुनि पडे मिठी । मन चोरूनियां पुढतापुढती तुजचिमाजि ॥ बापरखुमादेविवरा विठ्ठला उदारा येणेंचि नाहीं त्रिशुद्धि । येणें निवृत्तिरायें खुणा दाऊनियां सकळगुणीं गुणातीत तुटली आधी रया ॥३॥

५९३. **मदनमूर्ति तूं डोळ्यां आसुमाय जालासी** । सखीं कामिनिचेनि पक्षें तीं पुराणें पिशाच करिती रया ॥१॥ गोजिरिया गुण निधाना । बापा गुंतल्यापणाचिया साठीं॥ वेदविदेही विचारितां तेथें। आगम काढिती आटी रया ॥ध्रु०॥ सायुज्यता जालीया मग साद-

श्यपण तेथें लोपे । अवयव अळंकार मुरालिया तेथें दृष्टि परमार्थ थोपे रया ॥२॥ तत्त्वपणाचेनि समरसें तेथें पुरोनि उरे तें शेष । बाप रखुमादेविवरु विठ्ठलीं गगनीं नक्षत्र पडे नुरेचि तेथ रेख रया ॥३॥

५९४. **सांगाति आमुचियारे** । विद्गद पांवया छंदेंरे ॥१॥ नाचे विनोदें कान्हारे ॥ विद्गद पांवया छंदेंरे ॥२॥ निवृत्तिदासा प्रियोरे । विद्गद पांवया छंदेंरे ॥३॥

५९५. **वृंदावनीं आनंदुरे** । विठ्ठल देवो आळवितिरे ॥१॥ गोपाळ रचलेरे । विठ्ठलदेवो आळवितिरे ॥२॥ निवृत्ति दासा प्रियोरे । विठ्ठल देवो आळवितिरे ॥३॥

५९६. **काळिये रात्रींचा चंद्रमा कीं सांवळीं बुंथी आह्मां** । काळिये वेळीं ते सीमा नवलावो । सुनीळ काळिये भरु मेघःशाम सांवरु । तोचि नवलाहो हा धीरु रया ॥१॥ आतां काळिये दिनु मज न स्मरेवो कांहीं । तुझें तुज पाहीं गाऱ्हाणें रया ॥धु०॥ ह्मणोनि यमुना कालिंदीजळ सांवळें । योगिया शून्यातीत तटीं मिळे । सुखिया सुखाचेनि कल्लोळें देखतसे ॥२॥ दिठि सांवळा भरु खुंतलासे मज नाठवे द्वैत काज रया ॥३॥ येणें सुख चैतन्य डोळयां होकां मिळणी । कीं नेत्रीं नेत्र उन्मळणीं तटस्थपणें ॥ हा सर्वांग अंग प्रत्यांग होउनियां जेथ विचारती मुनिजनांचीं मनें । तो हा रखुमादेविवरु पाहतां दिठीं आतां पुनरपि नाहीं येणें रया ॥४॥

५९७. **भोंवरीं सांडूनि पांव ठेविरे गोपाळा** । नाच चिदानंदा सुख होईल सकळां ॥१॥ रंगु रंगलारे रंगु रंगलारे। आदि मध्य अंत त्रिगुणविरहित विश्वीं प्रकाशलारे ॥२॥ रंगु रंगला सुरंग जाला। पहिलिये रंगीं निवृत्ति भला ॥३॥ सुखीं सुख मुरे प्रेमें चिदानंद उरे । बाप रखुमादेविवरु विठ्ठलुरे ॥४॥

५९८. **तुझिये निढळीं कोटि चंद्र प्रकाशे** । कमल नयन हास्य वदन हांसे ॥१॥ हालकारे कृष्णा डोलकारे । घडिये घडिये घडिये गुज बोलकारे ॥२॥ उभा राहोनियां कैसा हालवितो बाहो। बाप रखुमादेविवरु विठ्ठलु नाहो ॥३॥

५९९. **कोंवळे ढुसढुसित मोतियांचे घड** । शृंगारिलें गूढ जया

लेणीं ॥१॥ बैसोनियां रथीं सुरनर खेळती । देखोनिय पशुपति वेडावला ॥२॥ युक्ति खुंटली वासना निमाली । कळां पैं बैसली पद्मासनीं ॥३॥ होय कीं नव्हे ज्ञानदेव पुसती । आठवितां निवृत्ति भेटी होये ॥४॥

६००. **पांवया छंदें तल्लीन गोविंदें** । नाचती आनंदें गोपाळ कैसे ॥१॥ यमुनेच्या तीरीं गाई चारी हरी । गोपाळ गजरीं आनंदले ॥२॥ ठायीं ठायीं मातु पेंधा पैं नाचतु । वाकुल्या दावितु हरी छंदें ॥३॥ ठाईं ठाती उभ्या विसरल्या माया । हाकितु लवलाह्या कृष्णहरी ॥४॥ ज्ञानदेवा जिवीं कृष्ण चिरंजिवी । गोपाळ रंजवी प्रेमभक्तां ॥५॥

---

## रूपकें.

### गाईच्या रूपकानें हरीचें वर्णन.

६०१. **आधीं चरे पाठीं प्रसवे** । कैसी प्रतिदिनीं गाभासी जायेरे । विउनियां वांझ झालीरे । ती उन्हाळां मासां वोळलीरे कान्हो ॥१॥ दुहतां पान्हा न संवरेरे । पैल पर्वता सुटले झरेरे कान्हो ॥२॥ मोहें चाटावयाच्या चाडारे । दोहीं तयावरी पडेरे । वत्स देखोनि उफराटी उडेरे । तया केलिया तिन्ही वाडेरे कान्हो ॥३॥ तिहीं त्रिपुटीं हे चरतां दिसेरे । तिहीं वाडियां वेगळी बैसेरे । ज्ञानदेव ह्मणे गुरुतें पुसारे । ते वोळतां लयलक्ष कैसेंरे कान्हो ॥४॥

६०२. **गायी तिचें निरंजनीं वाडेरे** । तीसवें तिन्ही पाडेरे । तिनें दैत्य मारिले कुवाडेरे । गाईचें सांगतां बहूत पवाडेरे कान्हो ॥१॥ ते सांग पां धेनु कवण रे । तिसी नाहीं तिन्ही गुणरे कान्हो ॥२॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलुरे । ते उभी पुंडलिकाचे द्वारींरे कान्हो ॥३॥

६०३. **तिही त्रिपुटी तिचे वाडेरे** । सवालक्ष चरावया जायरे । ते दैत्यापाठीं हुंबरत लागेरे । भक्ता घरीं दुभे सानुरागेंरे कान्हो ॥१॥ तिचें नाम शांभवी आहेरे । तिची रूपरेखा ते कायरे कान्हो ॥२॥ येकी चौमुखी गाय पाहेंरे । तिचा विस्तार बहू आहेरे । तिच्या नाभिकमळीं जन्म वासु सांगेरे । तिसी आदि पुरुषु बापमायरे कान्हो

॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु पाहींरे । ते भक्तां ओळली आहेरे । ते दोहतां भरणा पोहेरे । चारी धारा वर्षत आहेरे कान्हो ॥४॥

६०४. **काळी कोसी कपिला धेनुरे ।** तिचें दुभतें काय वानूं रे । तिसी बापमाय दोन्ही नाहींरे । ते असक्रिया वेगळी पाहेंरे कान्हो ॥१॥ ती अखरींच चेरेरे । सर्वसाक्षी वरती जायरे कान्हो ॥ ध्रु० ॥ पैल येकी सहस्रमुखीरे । तिहींहूनी येकी आहेरे । तिचीं नांवें अनंत पाहेंरे । तिसी बापमाय कोणरे कान्हो ॥३॥ बापरखुमादेविवरी विठ्ठली पाहेरे । ते पुंडलिकाचे द्वारीं जायेरे । तिचें दुभतें अपरंपाररे । तें दुभतें सहस्रधारीरे कान्हो ॥४॥

६०५. **आगरींचे क्षीर सागरीं पैल डोंगरीं दुभते गायरे ।** दोहों जाणे त्याचें दुभतें जेवित्याची मेलि मायरे ॥१॥ कान्हो पाहालेंरे कान्हो पहालेंरे नवल विपरित कैसें । जाणत्या नेणत्या ज्ञांसा पैं चतुरा लागलें पिसें ॥२॥ पाणियानें विस्तव पेटविला । वारियानें लाविली वाती । आपें आप दीप प्रकाशला । तेथें न दिसे दिवस रातीरे ॥३॥ खोकरीं आधन ठेविलें । तेथें न दिसे माझी भाक । इंधनाविण पेटाविलें । तेथें चुलि नाहीं राख ॥४॥ जाणत्या नेणत्या ज्ञांसा । पैल चतुरा बोलिजे त्याळां । निवृत्तिप्रसादें ज्ञानदेव बोले ढिवर पडिले जाळीं ॥५॥

६०६. **साई खडियातें देखोनियां माते ।** तैसा संसारातें येत रया ॥१॥ सोय ध्यान उन्मनि पांचांची मिळणी । सत्रावीचे कानीं गोष्टी सांगे ॥२॥ दुभोनियां खडाणि नैश्वर्य ध्यान गगनीं । चेतलिया मन क्षीर देत ॥३॥ ज्ञानदेवीं समभाव त्रिगुणी नाहीं ठाव । आपेंआप राणिव साई खडिया ॥४॥

---

## टिपरी.

६०७. **भवाब्धिसागरीं मांडिली टिपरी** परि अनुहात वाजे गजरू वो ॥ ताळक छंदें उमटती पदें वरि टिपरें टिपरीं गाजेवो ॥१॥ टिपरिया घाईं गोपाळ भाई ॥ घुळघुळ पाईं नादु वाजे वो ॥२॥ ताळकछंदें वेगुआल्हादें टिपरीनादें वाजती वो ॥ सांडुनि ओहं धरिलें सोहं तयासि टिपरें साधली वो ॥३॥ औटहात भूमिका नीट

तालछंदें टिपरी धरी वो ॥ विरुळा जाणे एथींचे खुणे टिपरें वाजे शिरीं वो ॥४॥ एकटसंगें टिपरें वेगें ध्वनि गगनीं गाजे वो ॥ बापरखुमादेविवर टिपरी गाजती घाई जाली टिपरियाजोगी वो ॥५॥

## हमामा.

६०८. **हमामारे पोरा हमामा** । घुमरी वाजे घुमामा ॥ध्रु०॥ घुमरिचा नाद कानीं । घुमरी घालूं रानीं । रानीं सीतळ छाया । मेली तुझी माया । मायेचें घर दुरी । तुज मज कैंची उरीरे पोरा ॥१॥ उरी नाहीं तुज । मजसी मांडिलें झुंझ । झुंझी अहंकार ढळे । कल्पना समूळ गळे । गळतां गळतां पाहिली । कान्होबा चरणीं राहिली । कान्होबा पाहे दिठी । तुज मज पडिली मिठीरे पोरा ॥२॥ मिठी मिठी करी पाहासी । आतां कोठें राहासी । राहतां ठावो येकु । फटितो तुझा लेंकु । लेंकु गाई राखे । बाप गोरसु चाखे । चाखतां घेतली गोडी । तोचि फांसा तोडींरे पोरा ॥३॥ पोरा ऐक माझी गोठी । राग धरीं न पोटीं । रागें काम नासे । अहंकारें बोंचा वासे । वासिले रावणें डोळे । भेणें द्वैत कंस पळे । पळतां पळतां लागला पाठीं । तुज मज आतां गांठीरे पोरा ॥४॥ पोरा गोठी करी ऐसी । संतांसि मानेल तैसी । बापरखुमादेविवरु ध्यासी । तरि वरिल्या गांवां जासीरे पोरा ॥५॥

६०९. **हमामा घाली बाळा** । सांडीं खोटा चाळा । फोडिन तुझा टाळा । वाकुल्या दाविन काळा ॥१॥ हमामारे पोरा हमामारे ॥ध्रु०॥ हमामा घालीं बारे । अंगीं भरलें वारें । चाखतीं पिकलीं चारें । जाऊं वरिल्या द्वारेंरे पोरा ॥२॥ हमामा घालीं नेटें । सांडीं बोलणें खोटें । आतां जासिल कोठें । कान्होबाचें बळ मोठेंरे पोरा ॥३॥ हमामा घालीं सोई । सांभाळीं सवा दोहीं एक नेमें तूं राहीं । तेथें बहु सुख पाहींरे पोरा ॥ ४ ॥ हमामियाचा नादु वाजे ॥ अनुहातें कोंपर गाजे । बापरखुमादेविवरु विठ्ठलु राजे । रत्नजडित मुगुट साजेरे पोरा ॥५॥

## फुगडी.

६१०. **फुगडी फूगे बाई फुगडी फू** । निजब्रह्म तूं गे बाई परब्रह्म तूं गे ॥१॥ मन चित्त धू । विषयावरी थू ॥२॥ एक नाम मांडी । दुजा भाव सांडी ॥३॥ हरि आली रंगीं । सज्जनाचे संगीं ॥४॥ सकळ पाहें हरी । तोचि चित्तीं धरी ॥५॥ नमन ललाटीं । संसारेसि साटी ॥६॥ वाम दक्षिण । चहूंभुजीं आलिंगन ॥७॥ ज्ञानदेवा गोडी । केली संसारा फुगडी ॥८॥

## गौळणी.

६११. **दुडिवरी दुडी गौळणी साते निघाली** । गौळणी गोरसु म्हणों विसरली ॥१॥ गोविंद घ्यावो दामोदर घ्यावो । तव तव बोलति मथुरेच्या वो ॥२॥ गोविंद गोरसु एकचि नांवा । गोरसु विकूं आलें तुमच्या गांवा ॥३॥ बापरखुमादेविवर विठ्ठलेंसी भेटी । आपले संवसाटी करूनि ठेली ॥४॥

६१२. **द्वैताद्वैत विरहित गौळणी** । अमृत दुडिया भरोनियां सांजवनींगे माये ॥ आभिनव करूनियां शृंगारु माथां गोरसाचा भारु । आजि निघाल्या विकरा करूं मथुरे हाटा ॥ प्रेम उचंबळलें चित्तीं हंसें चाले हंसगति । पुढें सखिया खेळती जिवीं जिवलगा ॥ दृष्टीं फिटला संदेहो लागे कांबळीचा सोवो । तंव माझारीं कृष्णदेवो स्वरूपीं दिसे ॥१॥ नवलावगे नवलावगे देखियेला ॥ध्रु०॥ दृष्टीं देखिला लोचनीं लाजिलीये विरोनि । मागति खुंटलिसे मनीं पांगुळलें ॥ सरले नेत्रांचें देखणें श्रुतिश्रवण ऐकणें । चित्त चोरियलें कान्होनें चैतन्यींवो ॥ निमिख खुणाविलें मज हें तंव घडलें सहज । बिंबीं बिंबतसे निज हे जीव हाचि जाला ॥ आतां नाहीं मज उरी हा तंव बाह्यजु भीतरीं । अवघीं अंतरलीं दुरी गेलें मनुष्यपण ॥३॥ याचिये वो भेटी पडिली संसारासी तुटी । शब्द मावळला गोष्टी तो मी काय सांगों ॥ ऐसा कैसा हा दानी करूं नेदितां बोहणी । सुखासाठीं सांजवणी केलें रूपातीत ॥ आजि करोनी विकरा रिघु नपुरे जाव्या घरां । नुरे कल्पनेसी थारा सरले लिंग देह ॥ मी तंव वेधलिये त्यासी सर्वेचि जालिये तत्वमसि । गुज लपवावें मानसीं तुम्ही सखीयांनो ॥४॥

याचिया लागल्या अभ्यासें गेलें मीपणाचें पिसें। केलें आपलिया ऐसें या इंद्रियांसहित ॥ पूर्ण चैतन्य भोगिलें हें तंव दुजें निमालें। देहीं अखंडित ठेलें होतें जैसें ॥ आलिंगुनियां अंतरीं रिगु न पुरे बाहेरी। निर्विकाराच्या शेजारीं प्रेम दुणावत ॥ बापरखुमादेविवर विठ्ठलेसी भेटी। आजि संसारा संसाटी घेउनि गेला ॥५॥

६१३. **सांवळीये निळी भुलली एकी नारी**। परेचा वो घरीं शुद्धि पुसी ॥१॥ सांगगे बाइये कवणे घरीं नांदे। कैसें या गोविंदें हिंडविलें ॥२॥ चहूं मार्गीं गेलें न संपडे वाट। मग चैतन्याचा घाट वेंघालिये ॥३॥ ज्ञानदेवीं समाधि स्थान पैं विठ्ठल। अवघा चित्तीं सांडल हारपला ॥४॥

६१४. **त्वचेचिया राना धाडूं नको मना**। तेथें नंदाचा कान्हा डोळा घाली गो आईयो ॥१॥ गाईचा गोंवळा यमुनेचा पाबळा। घरी माझा अचुळा मग मी पळालिये गो ॥२॥ ताकपिरी गोंवळी केली मजसीं रांडोळी। भावे नारली मग मी पळालिये गो ॥३॥ गळा गुंजमाळा गांठी डांगा मोरविसा वेठी। सोकरु लागें पाठी नंदरायाचा गो आई यो ॥४॥ एक्या करें धरी बिजा करें वेढारी चुंबन दे हरी मग मी पळालियेगो ॥५॥ ऐसी पळत पळत गेलिये कान्होनें मोहिलिये। माझी मीचि जालिये मग मी समोखिलिये गो ॥६॥ तुना चार लागते गोर तुना बोर लागते गोर। तुना नाहीं माझी चार माझी आईयो गो गो ॥७॥ पूर्वपुण्य फळलें देह मुक्त जालें। बापरखुमादेविवर विठ्ठलें ऐसें केलें गो आईयो ॥८॥

६१५. **ठाकुनि आलिये तुजपासीं**। थिते मुकलिये मनुष्यपणासी ॥१॥ भलें केलें विठ्ठला पिकें भरला साउला। घरींचीं कोपतीं सोडीं जाऊं दे वहिला ॥२॥ संसार साउला माझा पालटुनि देसी। तरी मी होईन तुझी कामारी दासी ॥३॥ संसार साउला माझा पालटुनि देसी। बापरखुमादेविवरा विठ्ठला गुणराशी ॥४॥

६१६. **मे दुरार्थ कर जोडु**। तान्हो सेवा न जाणुं ॥१॥ मन्हारे कान्हा मन्हारे कान्हा। देखी कां न गिणारे मन्हा कान्हारे ॥२॥ तन्हा मराठा देश। मन्ही बागलाणी भाष ॥३॥ धटि पटि विजार। खंडे भाले तरवार। बापरखुमादेविवरु जाण। ऐसे मन्हा कान्हा ४

६१७. **जळधराच्या धारीं सिंधुजळ जयापरी** । पुरेनियां उरे महीवरीरे गोवळा ।। तें जें शोकलें काई आणावया गेलें । तैसी नवल तुझी कुसरीरे गोंवळा ।।१।। चाळा लाउनि गोवितोसी दाउनियां लपसी । लपोनि केऊता जासी तैसी माव न करीं आह्मांसिरे गोवळा ।।२।। वायु काय वोखट चांग विचारूनी वाजे । तयाविण कवण ठावो असे । तो आपुलिया चाडा करी कोडिवरी येरझारा । सेखीं गगनीं सामावला दिसेरे गोंवळा ।।३।। आकाश तेंचि अवकाश तुज-माजि हें विश्व कीं तूं विश्वीं अससी । बापरखुमादेविवरा विठ्ठला न बोले । तुझें वर्म बोलतां निकरा झणें जासीरे गोंवळा ।।४।।

६१८. **लेंकुरें नसतील काय घरोघरीं** काय न विये ते माया । परि हे दशा वेगळी नवाईहो । हा न ये त्या आधीं जीव निघों पाहे । आला तरी उरों नेदि कांहीं जाय तरी जाये डोळे तळमळितां ठाये । लांचावला जिऊ राहेंगे बाईये ।।१।। तमाळनिळें चांदिणें वो वारि वोवराल आपुलीयेस बये । हें मूळदृष्टी पुढें रिघोनियां झाडा घेत आहे । येणें कान्हयें कासाविस केलेंगे माय ।।२।। नेणों कैसें बाळसें डौरलें डोळां डोळसे । माजि महुजता हे हांसे भोळिवेच देखिलियाचि पुरे ।। घालुनि दृष्टीचें भुररें । मग तें हृदयीं वावरे । इच्छावसेगे माये ।।३।। थुरथुर करितु शक्ति भोळी वाचा-ळवतु । मुद्गुलें गुणें बोलतुगे माये ।। असावतु सावळिया प्रभा डोळसु नभाचा गाभा । कटीं कर ठेउनियां उभा हेंचि जाणगे बाईये ।।४।। पाहों याची नवलपरी बरवेपणाची हाउली वरी । दृष्टिकर झोंबवी यासि कवण वारी ।। आम्हींच साहातों अळी परी हे चुबडी भली । रिघोनियां आड घाली । अंगकांतीगे माये ।।५।। पहा वो याचा खेळु आमचें नासे कोपो तरी खदखदां हांसे । जी जी बाळा म्हणों तरी रुसे वो ।। राहों नेदी सुखें न ऱ्हाये निमिष एके । वारा कां गोडी सेविखे कान्हो दिठीचें माये ।।६।। आतां येईल म्हणोनि सांपडऊं द्वारें । आडऊं तंव झळाळित दिसताहे उजियेडें ।। भितरीं-च्या भितरीं लांबा धुमाळु चाचरु । मांडी कामा पाडीं आवारुगे माय ।।७।। गाऱ्हाण्याचेंनि मिसें गौळणी उचंबळता हे ब्रह्मरसें । वान-

वसे चोपसें कृष्णाचेनि ॥ मालाथून एक मोहरे देवपण धाडिलें अनुरे । भावो कीं देवो बैसवाल धुरें पुसे निवृत्तिदासु ॥७॥

६१९. **आधारचक्रीं निवणें मांडिलें** कैसा डेरिया उपचार केला । तिन्ही संयोग गोमटें घुसळण रविबजो मेरु वो । तेणें आणिलें समयातें तेथें गुरुवचन लाधलें निरुतें वो ॥१॥ वियापात्रें गौळणी मंथन करूं ब्रह्मज्ञानी वो । चाल निज निज पंथें कैसें नवनीत आणिलेंसे हाता वो ॥धु०॥ गुरुउपदेशें रवि धरी अर्धऊर्ध्व मांजिरी पांचै प्राण मथन केलें निरुतें वो । ईडा पिंगळा कुंडळणीया ब्रह्मसूत्र दोरु तो आणिया वो। उभी राहोनि गगनीं अनुहातें अंबर गर्जे वो ॥२॥ मन एकतत्त्वीं करीं वो चित्त दृढ धरी वो । तयामाजि न विसंबे कांहीं वो । ऐसा गोरसु चोखटु मोलेंविण येतसे फुकटु । यासि न वेचे कांहीं चित्त बैसे समरसें ठाई वो ॥३॥ गौळणी गोमटी हातीं कसवटी क्षीरा निरा निवाडा करीं वो । मेघडंबर न विसंबे तेथें घुसळितां थेंबु जो नुसळे वो । जन पडलेंसे धंदा गोरसा गोडी नेणती अंधे वो ॥४॥ काय हे नगरी गौळणी गोरसु । पुकारी नवहि दारवंटे सांडूनि वो । दशवेद्वारीं पातली कैसी विनटली गोविंदीं वो । दंभ विकरा जाला अधर्म धर्म लोपला वो । अवघी काया झांकुळली बापरखुमादेविवरा विठ्ठलीं वो ॥५॥

६२०. **ज्ञान हेंचि गाय दुध दुहिलें** भरणा दोहीं तया जाणा हातु नाहीं ॥ ठेविलें अग्निवरी अग्नि नाहीं भीतरीं । तापलें पडिभरी साय नाहीं ॥१॥ गौळणी चतुरे झडकरीं । जाय मथुरे विकरा करी ॥धु०॥ दहियामहियाविण घातलें विरजण । मांडिलें घुसळण रवियेवीण ॥ करिती मंथन वरी आलें जीवन। एकलें आणून काढूं पाहे ॥२॥ आलें गिऱ्हाईक न विकी तूप ताक । नेणती विवेक गोरसाचा ॥ दहियामहियाच्या करुनी घागरी । लटकी उबरा उबरी काय करूं ॥३॥ ज्ञान हे घागरी वाईयेली शिरीं । गोरस भीतरीं दाखवितों ॥ एके हातें सावरी झांकी तयावरी । चोखटिव करी गोरसाची ॥४॥ तंव मार्गी जातां एकी पुसे गौळणी । परि बैसले दानीं किं नाहीं वो ॥ त्यासी नेदी मी दान जाईन मी आ-

पण । प्रत्यक्षा प्रमाण काय करूं ॥५॥ ऐसी पाराजवळीं गेली तंव शब्दें वोळखिली । जावों दे गा वहिली उसिरु जाला ॥ या निर्वाणींच्या बोला सुखिया संतोषला । निरोप दिधला गौळणिसी ॥६॥ ऐसी पावली मथुरा क्षण न लगे विकरा । सर्वेचि एकसरां उफखा झाला ॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु ग्राहिकु । मानसीं गोरसु ज्ञानेंसि मिळोनि गेला ॥७॥

६२१. **चालतां लवडसवडी** । बाहुली मुरडली । माथां गोरसाची दुरडी । जाय मथुरे हाटा ॥ सर्वेची विचारी जिवीं । महियातें सादावीं । तंव तो अवचिता पालवी । नंदानंदनु ॥ पाहेपां सुखाचेनि मिसें । झणीं करी अनारिसें । तेव्हां उरलें तें कैसें । माझें मनुष्यपण ॥ विनवी सखीयातें आदरें । तुह्मीं गुह्याचीं भांडारें । अघटित घडिलीं या शरीरें । प्रगटीत न करा साजणी वो ॥१॥ काय करणें वो काय करणें वो ॥धु०॥ देखोनी सांवळा तनु । लुब्धला माझा मनु । लागलेंसे ध्यानु । द्वैत निवडे ना ॥ डोळां भरूनियां बाळा । देखे श्रीरंगु सांवळा । वेधे वेधल्या सकळां । गोपी गोविंदा सवे ॥ ठेला प्रपंचु माघारा । भावो भिनला दुसरा । पडिला मागिल विसरा । कैचें कैचें आपुलेपण ॥ सहज करितां गोष्टी । पाहातां पडिली मिठी । जाली जन्मेंसाठीं । सखियेसाजणी वो ॥२॥ ऐसी सोसितां सोसणी । सखी झाली विरहिणी । आजि मथुरा भुवनीं । मज गमेल कैसें ॥ सरलें सांजणें विकणें । निवांत राहिलें बोलणें । पूर्ण गोरसा भरणें । माथा त्यजूनियां ॥ जाली अकुळांचें कुळ । तनु जाते बरळ । फिटलें भ्रांतीपडळ । दोन्ही एक जालीं ॥ बापरखुमादेविवरीं । अवस्था लाऊनि पुरी । भावें भोगूनी श्रीहरी । मन मुक्त साजणी वो ॥३॥

६२२. **रांगतु रंगणीं चोरितु लोणी धांवोनि धरिती गौळणी** । बांधाति चरणीं देति गाऱ्हाणीं यशोदे साजणी । दधि घृत भक्षून तमालनीळें नवल केलें साजणी ॥१॥ कृष्ण आळिवा आळिवा । परतोनि मातें दावा ॥धु०॥ कृष्णा कान्हा मधूसूदना कामिनी मनमोहना । योगिध्याना हरस्मरणा गोपी ध्याना मानिती कान्हा बोलती यमुना॥२॥ नेणवसी नेणवसी । अकळुतु नाकळसी ॥धु०॥ इंद्रनीळा श्रुतीजन किरळा

सुरीजन घनसांवळा। कंठी माळा कौस्तुभ गळां प्रीति तुळसी दळा कासे सेला सोनसळा उभा बळीभद्रा जवळा ॥३॥ कृष्ण सांवळा डोळसु। सहज परमहंसु ॥धु०॥ सदानंदा श्रीमुकुंदा श्रीहरी परमानंदा आनंदकंदा। अभय प्रल्हाद पावक नादा धेनु लुब्धा गोपाळा गोविंदा ॥४॥ कृष्ण आमुचा आमुचा। खेळिया गौळियाचा॥धु०॥कर्पूरगोरा मनस्थिरा पुराणा गुण गंभीरा विरादिविरा महावीरा। पांडव दळ साहाकारा मथुरा नगरा कौंसासुरा। शिक्षा लाविली चाणुरा अती सुंदरा तूं पेढारा बापरखुमादेविवरा ॥५॥ जाणितलें जाणितलें। माझें मज दिधलें ॥धु०॥

६२३. **कान्हया गोवळु वारिलें न करी** । दसवंती सांगे नंदा अवधारीं ॥ चौघी माया शृंगार करिती। तेथें विघ्नेश्वरु जाले मुरारी ॥१॥ आनंदें दोंदिलु नाचे गदारोळें पायीं घागुरलि नेवाळें ॥ चर्मचक्षु पडले वेगळे। काह्नानियां ज्ञानचक्षु दिधलें डोळेगे बाईगे ॥२॥ गौळणी दाहा बारा मिळोनि सोळांची टोळी। एकी ह्मणती यातें उभाचि कवळु मा काय करिल ते गौळणीगे बाईये ॥३॥ आणिकी एकी साचा बोले त्या उपरी असे त्या नागिणी। काय सांगों तिचेविण बहुसाल ते राहिलीसे भाजुते धरूनी ॥४॥ तंव मुक्ता दोन्ही आलिसे धांवोनि ह्मणती कृष्णा तूं निघ येथुनि। तीन नानावि तुह्मां पाठींच लागतील औठावे राहें धरूनि ॥५॥ गौळणी ह्मणती बाळा कान्हया वेल्हाळा। सांडी या मना चाळारे। ऐसें ऐकोन बापरखुमादेविवरें विठ्ठलें पवनु गिळितया वेळारे ॥६॥

## पाळणा.

६२४. **आकारेंविण पाळणा पहुडलें** । निराकार म्हणोनि वोसणाईलें ॥१॥ जो जो जो जो बाळा निराकार पाळणा। व्योमीं व्योमाकारीं झोंप घेईं ॥धु०॥ चौदा निःशब्दीं जागृत केलें। एकविसीं हालवूनि बाळ उठविलें ॥३॥ बापरखुमादेविवरु निजीं निजविलें। कांहीं नव्हे ऐसें कांहीं ना केलें ॥४॥

६२५. **पाळण्याची परी सांगेन आतां** । पाळण्या सान्हुलें देहें-

विण बोभातें ताता ॥१॥ तेथें जनकु नव्हे जननी नव्हे । बाळक नवे होये माझेविण ॥२॥ तेथें तेल सारूनि अभ्यंग केला । बाळक पुसिला अंबरवर्णें ॥३॥ बापरखुमादेविवरु अनुभवित जाले । ते निजरूप पावलें परब्रह्मीं ॥४॥

६२६. **अठरा दिगांतीहुनि पाळणा आणविला** । तेथें एक निर्गुण बाळ पहुडला ॥१॥ बाळापें हें नाहीं बाळापें हें नाहीं । अंगुष्ट पेउनि घेई निरालंबीं ॥२॥ निरालंबीं स्वाद आळवी ब्रह्मीं । तेथें एकु बाळ बोभाये निरंजनीं ॥३॥ बापरखुमादेविवरु अनादि अंतीं । त्याहुनि परती मज गति केली ॥४॥

६२७. **पांच पाट्या नव खिडकिया** । पाळणा पहुडया निरंजनीं ॥१॥ एकवीस सहस्र श्वास हुंकार घाली । माया ते मारिली ज्ञान-रूपी ॥२॥ तेथें निरंजन नाहीं कांहींचि नाहीं । तेथें निःशब्द उठती पाहीं ॥३॥ बापरखुमादेविवरु बाळका घेऊनि गेला । मरोनियां जाला जितपणेंगे माय ॥४॥

६२८. **शून्य नाहीं निरशून्य नाहीं** । तेथें पाळणा पाहीं लाविये‌ला ॥१॥ जातिविण बाळ उपजलें पाहीं । तेथें परिये देते माय तेही नाहीं ॥२॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलीं पाळणा नाहीं । तेथें मी बाळ पाहीं पहुडलों ॥३॥

## विरहिणी.

६२९. **तुजविण येकली रे कृष्णा न गमे राती** । तंव तुवां नवल केलें वेणू घेऊनि हातीं । आलिये तेचि सोय तुझी वोळखिली गती ॥१॥ नवल हें वालभरे कैसें जोडलें जिवा । दुसरें दुरी ठेलें प्रीति केला रिघावा ॥ध्रु०॥ पारुरे पारुरे कान्हा झणें करिसी अव्हेरू । तूं तंव हृदयींचा होसी चैतन्य चोरू । बापरखुमादेविवरा विठो करि कां अंगिकारू ॥३॥

६३०. **मज तुरंबा कां वो जिये तिये** । जेणें वेधें हरी सोयरा होये । मज लावा कां वो चंदन ऐसिये परीचे । जे लाविलियाचि अनादि पुसोनि जाये वो ॥१॥ मज करा कां वो माये कांहीं एक ।

जेणें करणें ठाके अशेख । सरा कां वो मज आडुनि मज पाहों द्या । आपुलें मुखगे माये ॥२॥ मज शृंगारा कां वो तयां जोगी । पुढती अंग न समाय अंगीं ॥ या मना पासोनी पढिये तो गोंवळु । तोचि तो जिव्हारीं भोगीनगे माये ॥३॥ देह पालटा वो तया-साठीं । वरच या देईन अवघी सृष्टी । बापरखुमादेविवरा विठ्ठल संयोगीं । तोचि तो त्यागुन भोगीगे माय ॥४॥

६३१. कृष्णें वेधिली विरहिणी बोले । चंद्रमा करितो उबारागे माय । न लवा चदंनु आंगीं न घाला विंजणवारा । हरिविणें शून्य शेजारुगे माय ॥१॥ माझे जिवींचे तुम्ही कां वो नेणां । माझा बळि-या तो पंढरिराणा वो माय ॥२॥ नंदनंदनु घडी घडी आणा । तया-वींण न वाचति प्राणा वो माये ॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु गोविंदु । अमृत पान गे माय ॥३॥

६३२. घनु वाजे घुणुघुणा । वारा वाजे रुणुझुणा । भवतारकु हा कान्हा । वेगीं भेटावा कां ॥१॥ चांदवो चांदणें । चापेवो चंदनु । देवकी नंदनु । विण नावडे वो ॥२॥ चंदनाची चोळी । माझें सर्व अंग पोळी । कान्हो वनमाळी । वेगीं भेटावा कां ॥३॥ सुमनाची सेज । सितळ वो निकी । वोले आगिसारिखी । वेगीं विझवा कां ॥४॥ तुम्हीं गातसां सुस्वरें । ऐकोनि या उत्तरें । कोकिळें वर्जावें । तुम्हीं बाईयांनो ॥५॥ दर्पणीं पाहातां । रूप न दिसे आपुलें । बाप-रखुमादेविवरें विठ्ठलें । मज ऐसें केलें ॥६॥

६३३. पांचा दामांचा धोंगडा नेसेन । उरली मोट ते मी जे-विनगे बाईये ॥१॥ कामारि कामारि कामारि होऊन । या गोपा-ळाचें घर रिघेन गे बाईये ॥२॥ त्याचा उंबरा उसिसा करीन । वरि वेर-झार मी सारीनगे बाईये ॥३॥ निवृत्ति ज्ञानदेवा पुसतिल वर्म । त्यासि कामीन पुरेनगे बाईये ॥४॥

६३४. सांवळें परब्रह्म आवडे या जिवा । मनें मन रिणिवा घर केलें ॥१॥ काय करूं सये सांवळें गोंवित । आपेंआप लपत मन तेथें ॥२॥ बापरखुमादेविवरु सांवळी प्रतीमा । मनें मनीं क्षमा एक जालें ॥३॥

६३५. **सांवळिये बुंथी सांवळिया रूपें** । सांवळिया स्वरूपें वेधियेलें ॥१॥ काय करूंगे माये सांवळें न सोडी । इंद्रिया इंद्रिय जोडी एकतत्वें ॥२॥ कैसें याचें तेज सांवळें अरुवार । कृष्णीं कृष्ण नीर सतेजपणें ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे निवृत्तीचे खुणे । सांवळेंची होणें यासी ध्यातां ॥४॥

६३६. **निरंजन वना गेलिये साजणी** । तेथें निर्गुणें माझ्या मनीं वेधियेलें ॥१॥ सुखाची अति प्रीति जाहालीगे ब्रह्मीं । श्रीगुरु निवृत्ति मुनी जाहलेंगे माय ॥२॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु सहज सांवला । निर्गुण दाविला विसुरागे माये ॥३॥

६३७. **मन मुरडूनि घातलें मनातें** । थोरु मारु तेथें होत असे ॥१॥ पुरे पुरे वो आतां जिणें तें केउतें । येणें वो पंढरिनाथें वेधियेलें ॥२॥ नचले नचले कांहीं करणें कामान । याचें पाहाणेंचि विंदान कामानिया ॥३॥ बापरखुमादेविवरा विठ्ठलासी भेटी । संसारासी तुटी जालीगे माये ॥४॥

६३८. **निळियेच्या निशीं विरहिणी पिशी** । शेंजबाजे कैशी आरळ शेजे ॥ १॥ कृष्णसंगें वाली विव्हळ जाली निळी । चंदन अंगीं पोळी विरहज्वरें ॥२॥ ज्ञानदेव प्रेम निळारूप रूपसें सोहळा । कृष्णवेधें वेधली बाळा भली वसे ॥३॥

६३९. **निळिये निकरे कामधेनु मोहरे** । निळेपणें सरे निळे नभीं ॥१॥ घुमत घुमत निळेमाजि मातु । निळेपणीं देतु क्षेम कृष्णीं ॥२॥ निळिये सागरीं निळे निळेपणें सुंदरी । रातलीसे हरि विरहिणी ॥३॥ ज्ञानदेव सांगे निळियेचे बागे । निळसंगें वोळलेगें निळीमाजी ॥४॥

६४०. **येणेंरूपें पाहावासी तरि असुमाय होसी** । माझ्या मना नाकळसी सांवळ्या ॥१॥ सगुणपणाची तुझी पडिलिसे मिठी । केली जीवासाठीं सांवळ्या । वेधला जिऊ माझा सिकवाल काई । सगुणें ठाई वेधियेलें ॥२॥ ये अंगणीं अवचिता देखिला बोलता । कोण ऐसा निरुता न कळेगे माय । सगुण म्हणोनि धरूं नेलें पालवीं । तंव नवलपणाची ठेवी प्रगट केली ॥३॥ आंतु बाहेरी कांहीं नकळे

वो मज । आपआपणिया चोज वाटोनि ठेलें । बापरखुमादेविवरें माझें मीपण चोरूनि नेलें । आपणा ऐसें केलें बाईयावो ॥४॥

६४१. **जीवाचिया जीवा प्रेमभावाचिया भावा** । तुज वांचूनि केशवा अनु नावडे ॥१॥ जीवें अनुसरलिये अझूनी कां नये । वेगीं आणावा तो सये प्राण माझा ॥२॥ सौभाग्यसुंदरु लावण्यसागरु । बापरखुमादेविवरु श्रीविठ्ठलु ॥३॥

६४२. **मी माझें ह्मणतां ठकाचि ठेलिये** । आपुले जाति कूळ विसरुनि गेलिये ॥१॥ गुणाचा दुकाळ पडिला देशीं । निर्गुणासि कैसी रातलिये ॥२॥ बापरखुमादेविवर विठ्ठलु सये । सेजारासी नये काय करूं ॥३॥

६४३. **पेंडारा दाऊनियां थोकसी** । देखिलें पण केविं जाये अंग लपाविसी । तरी वेधा काय करिसी । मा शाहाणपण तुझें नव्हेरे गोंवळा ॥१॥ आम्हीं येकविध जीवें तुंवा केलें आधातुरें वर्षावो वोसरलिया वोल्हासु जाय तैसी न होत प्रेमळ उखरे गोंवळा ॥२॥ देठीं गुंफलिया फुलें डाळलिया आहाच तंव कांहीं न दिसेरे । परि घ्राणा इंद्रियांच्या अंगसुखा समर्थ कोण असेरे गोंवळा ॥३॥ या बोला मानवोनि बापरखुमादेविवरें विठ्ठलें दिधलें आपआपाणियातें । तैंपासुनि तें लपणेंचि पारुषलें उभा पंढरिये येणें वेषेंरे गोंवळा ॥४॥

६४४. **अवचिता परिमळु झुळकला अळुमाळु** । मी म्हणे गोपाळु आलागे माये । चांचरती चांचरती बाहेरी निघालें । ठकचि मी ठेलें काय करूं ॥१॥ मज करा कां उपचारु अधिक ताप भारु । सखिये सारंगधरु भेटवा कां ॥धु०॥ तो सांवळा सुंदरु कासे पीतांबरु । लावण्य मनोहरु देखियेला ॥ भरलिया दृष्टी जंव डोळां न्याहाळी । तंव कोठें वनमाळी गेलागे माये ॥३॥ बोधुनि ठेलें मन तंव जालें आन । सोकोनि घेतले प्राण माझेगे माये ॥ बापरखुमादेविवरु विठ्ठल सुखाचा । तेणें कायामनेंवाचा वेधियेलें ॥४॥

६४५. **पैल तो गे काऊ कोकताहे** । शकुनगे माये सांगताहे ॥१॥ उडरे उडरे काऊ तुझे सोन्यानें मढीन पाऊ । पाहुणे पंढरी-

रावो घरा कैं येती ॥२॥ दहिंभाताची उंडी लाविन तुझ्या तोंडीं जीवा पढिये त्याची गोडी सांग वेगीं ॥३॥ दुधें भरूनि वाटी लावीन तुझे वोंठीं । सत्य सांगें गोठी विठो येईल कायी ॥४॥ आंबया डाहाळीं फळें चुंबी रसाळीं । आजिचेरे काळीं शकून सांगें ॥५॥ ज्ञानदेव ह्मणे जाणिजे ये खुणें । भेटती पंढरीराणे शकुन सांगें ॥६॥

६४६. **आजि शुभ लवे लोचनु** हरिखें सांगताहे शकुनु स्वप्न देखिलें सुंदरी । अळंकार लेवावा चंदन चर्चावा जाति जुती पार्यातिकें शेंवती करा आइती सेजारीं । शेला काढा मेचुचा हा दिन दैवाचा । सोहळा तो आमुचा मंदिरींगे माय ॥१॥ गुढिया उभवा मखरें शृंगारा भेटी होईल आळंगी । स्फुरण आलें बाहीं क्षेमालागीं पाहीं काचोळी न समाये अंगीं गे माय ॥२॥ जिवीं जीव सुंदर त्याचेनि साचार तो मज भेटवा सुखाचा विसावा । सुमनें उकललीं नित्य दे माळी उचित करि तया भावा । आजि वेळु कांवो लाविला नेणों पंथीं सीणला बुझाऊं जाऊं त्याच्या गांवागे माये ॥३॥ हृदयीं निर्भर प्रेम वोरबार माझे चित्तीं राहो एक्य मज । दुजिये वस्तुलागीं रुत जाय माधवी मन्मथ करिताहे वोज । ऐसी तेथवरी जाईन सुखाची होईन नाचेन आनंदाचे भोजेंगे माय ॥४॥ ऐसा विपरीत लाघवीं लपे सर्वेंचि दावी वासिपे चौके । अभ्यासें अंतर पडलें येणें तरि मी त्यजीन जिणें ह्मणोनि विनवितसे चतुर सुरेखे । रात्रीचा ठायीं देख मेघःशाम बोलला अंबरींगे माये ॥५॥ ऐसिये निवांत मूर्ति ऐकोनि ठेली श्रुती । आकर्षोनि चित्त चैतन्य भरोनि ठेले लोचन । ध्यानीं विसर्जिलें मन परमात्मया रामा तूं एक लाघवी सावेव पावलें ज्ञान । बापरखुमादेविवरा विठ्ठला सुमन संयोगीं आजी सत्य जालें माझें स्वप्नगे माये ॥६॥

६४७. **गुणाचेनि आटोपें आकारलें ब्रह्म** । भक्तभाग्य सम आले मूर्ति ॥१॥ चैतन्य परिपाठी ठसा घडलासे साकार । कृष्णाचि आकार गोकुळीं रया ॥२॥ त्या रूपें वोधिलें काय करूं गे माये । नाम रूप सोय नाहीं आम्हां ॥३॥ सबाह्य सभोंवतें चतुर्भुज सांवळें । सर्वभूतीं विवळे कृष्णरूपें ॥४॥ हारपले आकार कृष्णाचि क्षरला । वेदांसि

अबोला श्रुतीसहित ॥५॥ ऐसें परब्रह्म सांवळें दैवत आमुचें । आतां आम्हां कैचें क्रिया कर्म ॥६॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु दैवत । मनें घर तेथें चरणीं केलें ॥७॥

६४८. **सांवळी प्रतिमा घेउनि सकुमार** । खेळत सुंदर गोकुळीं रया ॥१॥ त्या रूपें वेधिलें काय करूं माय । अवघें निर्गुण होय पाचारीतां ॥२॥ मीपणा ठाव नुरेची पैं सर्वथा । प्रपंचाची कथा ब्रह्म जाली ॥३॥ बापनिवृत्तिराजे दावितातो खुणा । नाम नारायणा पाठ कीजे ॥४॥

६४९. **त्रिभुवनिंचें सुख पाहावया नयनीं** । दिनरात्रीं धणी न पुरे माझी ॥१॥ विटेवरी सांवळा पाहातां पैं डोळां । मन वेळोवेळां आठवितु ॥२॥ सागरीं भरीतें दाटे तैसें मन उल्हाटे । वाट पाहों कोठें तुझी रया ॥३॥ बापरखुमादेविवरु पूर्ण प्रकाशला । कुमुदिनीं विकासला तैसें जालें ॥४॥

६५०. **मायबापें आमुचीं विठोबा रखुमाई निजाची** । त्याचिये गांवींचीं कोण्ही येतु न्यावया ॥१॥ माझा विसावा माहेर वो पंढरपूर ॥ध्रु०॥ ऐशी वाट पाहातसे जरु । ये सासुरा आमुची बहु वाहरु । काम क्रोध मद मत्सरू । मज आठिती दीरु ॥३॥ अहंकार खेदिताहे भावा । दंभ प्रपंच या जावा । येरुन येरा घालिती हेवा । आपुल्या सवा ओढितसे ॥४॥ आवो चिंतेवोही निके वोढाळे । तुज मज ठायींचें वेगळें । वोढूनि नेसी आपुल्या बळें । तुझ्या सळें नांदतसे ॥५॥ आशा लागलीसे सर्पिणी । ग्रासूं पाहातसे पापिणी । रामनामाचिया ध्वनी । आइकों नेदीये श्रवणीं ॥६॥ माझें सत्वबळारथी । धीरु धर्मु हा सांगाती । संतीं सांगितलें निवृत्ती । तरी मी जीवें वांचालिये ॥७॥ ऐसी दगदगल्यें सासुरवासा । विठोबारखुमाई माझा कुवासा । निवृत्ति दासु तयाचा । जन्मोजन्मीं वोळगणा ॥८॥

६५१. **पैल विळाचिये वेळीं** । आंगणीं उभी ठेलिये । येतिया जातिया पुसे । विठ्ठल केउतागे माय ॥१॥ पायरऊ जाला संचारु नवल । वेदें विंदान लाविलें म्हणे विठ्ठल विठ्ठल ॥२॥ नेणें तहान

भूक । नाहीं लाज अभिमान । वेधिले जनार्दनीं । देवकीनंदनगे माय ॥३॥ बापरखुमादेविवरु जिवींचा जिवनु । माझे मनिंचे मनोरथ पुरवीं कमळ नयनुगे माये ॥४॥

६५२. **यातिकुळ माझें गेलें हारपोनि** । श्रीरंगावांचूनि आनु नेणें ॥१॥ किती वो शिकवाल मज वेळोवेळां । मी तंव गोवळा रातलिये ॥२॥ अष्टभोग भोगीतां मातें नाहीं चाड । भक्तिप्रेम गोड लेईलेंगे माय ॥३॥बापरखुमादेविवरु जीवींचा जिव्हाळा । कांहीं केलिया वेगळा नव्हेगे माय ॥४॥

६५३. **ज्याचिये आवडी संसार त्यजिला** । तेणें कां अबोला धरिलागे माये । पायां दिधली मिठी घातली जीवें गांठी । साऊमा नये जगजेठी उभा ठेलागे माये ॥१॥ भेटवा वो त्यासी चरण झाडीन केशीं । सगुणरूपासि मी वो भाळलिये ॥२॥ क्षेमालागीं जीउ उतावेळ माझा । उचलोनि चारी भुजा देईन क्षेम ॥ कोण्या गुणें कावो रुसला गोवळु । सुखाचा चावळू मजसी न करीगे माये॥३॥ ऐसें अवस्थेचें पिसें लाविलेसें कैसें । चित्त नेलें आपणिया सरिसेंगे माये ॥ बापरखुमादेविवरें लावियेलें पिसें । करूनि ठेविले आपणिया ऐसेंगे माये ॥४॥

६५४. **देऊनियां भेटी मजसी न करी गोठी** । लांचावला जीउ पाठी न राहे वो ॥ निष्ठुर म्हणो तरी अपंगीतो मातें । व्यापूनि जीवातें उरी उरवितो ॥१॥ तो दाखवावो माये धरिन त्याचे पाये । तयालागीं जीऊ आहे उतावेळु ॥२॥ भेटीचेनि सुखें मनचि होय मुकें । तें रूप देखें परि बोलवेना ॥ सगुण गुणाचा म्हणोनि घातली मिठी । तंव तो आपणिया समसाठीं करूनि ठेलें ॥३॥ काय नेणों कामाण कैसें वो जालें । चित्त चोरूनि नेलें गोवळेनें ॥ बापरखुमादेविवर विठ्ठलें अंग लपवूनि । चैतन्य चोरुनि नेलेंगें माये ॥४॥

६५५. **सुख शेजारीं असतां कळी जाली वो पहातां** । देठु फेडुनि सेवतां अरळ केलें ॥१॥ अंगणीं कमळणी जळधरू वोले वरी । वाफा सिंपल्यावरी वाळून जाये ॥२। मोतियाचें पाणी वाहे निळिये सारणी । सगुणाची लावणी लाऊनि गेला ॥३॥ अंगणीं वोळला मोतें

वरुषला । धन्य दिवसु जाला सोनियाचा ॥४॥ चोरट्या मधुकरा कमळीं घेतलासे थारा । मोतियांचा चारा राजहंसा ॥५॥ अंगणीं बापया तूं परसरे चांपया । असुवीं माचया भीनलया ॥६॥ वाट पाहे मी येकली मज मदन जाकळी । अवस्था धाकुली म्हणो नये ॥७॥ आतां येईल म्हूण गेला वेळु कां लाविला । सेला जो भिनला मुक्ताफळीं ॥८॥ बावन चंदनु मर्दिला अंगीं वो चर्चिला । कोणें सदैवें वरपडा जाला वो माये ॥९॥ बापरखुमादेविवरु माझे मानसींचा होये । तयालागीं सये मी जागी सुती ॥१०॥

६५६. **प्रभा कळिकादीप शून्याकार हें स्वरूप ।** मुनिजनमानसींचें सुख येकलेपणें ॥ बिंब अर्धबिंब अर्धमातृका तुर्या नातळे ज्यासी भानु तो दिठी केविं धरावा । गुणातीत निर्गुणीं जे सहजीं सहजची सगुणीं विखुरेरया ॥१॥ आपआपणिया पडे माय विसरु । मज आवडे तो नंदाचा कुमरुगे माये ॥२॥ ह्मणोनि डोळियाचे अंजन आणि मेघःशाम बुंथीचें ध्यान । निडारलें वृत्ति नयन पाहों जावो ॥ तेथें तें अनुमतें नलगे मतांतरें भावें देखणा होय देवोरया ॥३॥ डोळ्याचा डोळसु विचरे हा परेशु तोचि परमात्मा सर्वीं असे ॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु उघडा पुरविला सौरसुगे माय ॥ आह्मां जितांचि मरणें किं मेलिया कल्पकोटी जिणें । निवृत्तीनें दाविलें परेशु रया ॥४॥

६५७. **पंढरपुरींचा निळा लावण्याचा पुतळा ।** विठा देखियेला डोळां बाईयेवो ॥१॥ वेधलें वो मन तयाचिया गुणीं । क्षणभर न विसंबे विठ्ठलरुक्मिणी ॥२॥ पौर्णिमेचें चांदिणें क्षणक्षणां होय उणें । तैसें माझें जिणें एका विठ्ठलेंविण ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलुचि पुरे । चित्त चैतन्य मुरे बाईये वो ॥४॥

६५८. **सुखाचिये गोठी सुख आलें भेटी ।** तया लाभासाठीं जीव वेचिलागे माय ॥ तंव अवचितें सगुणरूप भरलेंसें नयनीं । बोलतां अंगणीं म्यां वो देखियेलें ॥१॥ जिवाचा जीऊ माझा भेटवा यादवराजा । उचलल्या चारी भुजा देईल क्षेम ॥२॥ न करा उपचार न रंगे हें मन । दृष्टिपुढें ध्यान ठसावलें ॥ आवडी गिळूनि येणें सुख विहरोनि ठेलें । चित्त माझे गोविलें गोवळेनीं ॥३॥ आतां

भरोवरी उरवितां नुरे उरी । आनंदें अंतरीं कान्हो संचरला ॥ बापरखुमादेविवरु विठ्ठल निर्गुण । तो सुखाची सांठवण गिळूनि ठेला ॥४॥

६५९. **भेटिसी गेलिये तंव तेचि जालिये** । भुललि ठेलिये मज न कळे कांहीं ॥ परतलिये दृष्टी जंव मागुता न्याहाळी । तंव काळी ना सांवळी मूर्ति चोजवेना ॥१॥ काय सांगो माय न कळे तयाची सोये । येणें मनाचें मोडुनि पाये वेधियेलें ॥२॥ आंतु बाहेरी कैसी भरलेनि रंगें । क्षेम देऊं गेले अंगें तंव तो जडूनि ठेला ॥ वारितां नावरे काय सांगो माय गोठी । करूनि ठेला साठीं जीवित्वेंसी ॥३॥ आशेचिये हावे तंव तो परताची धांवे । निराशेसी पावे वेळु न लागतां । बापरखुमादेविवरु विठ्ठलीं उपावो । ज्ञानदेवा भावो निवृत्तिपायीं ॥४॥

६६०. **जागृती पुसे साजणी** । कवण बोलिलें अंगणीं । निरखितां वो नयनीं । वृंदावनीं देखियला ॥१॥मनिं वेधु वो तयाचा । पंढरीरायाचा ॥२॥ स्वप्न सांगे सुषुप्ती । असे ममता हे चित्तीं ॥ विठ्ठल होईल प्रतीती । मग गर्जती तुर्ये ॥३॥ मज बोलों नये ऐसें केलें । मन उन्मनीं बोधलें । बापरखुमादेविवरु विठ्ठलें । थितें नेलें मीं माझें ॥४॥

६६१. **मनें करुनि कुटिल उकलुनि शृंगारे** । ते लावण्याच्या अपारें पडिलें वो माये ॥१॥ माझें कुटिलपण गेलें कुटिळपण गेलें । गोविंदें वोजाविलें निजरूप वो माये ॥२॥ बापरखुमादेविवरु माझें कुटिळ फेडूं आला । विटेवरी मालाथिला निजरूपें वो माये ॥३॥

६६२. **माझी शंका फिटले** । लाजा सांडिले । आवघे घातलें । मज निरसुनियां ॥१॥ अठरा भार वनस्पती । सुरवर वोळंगती ॥ देवोदेवि आदिपती । कृष्ण काळागे माये ॥२॥ ऐसा कृपानिधि सांवळा । कीं बापरखुमादेविवरु गोंवळा ॥ त्याचा मज चाळा । बहु काळ गे माये ॥३॥

६६३. **शामाचिया घरा वासना पैं नेती** । मनें मन गुंती तये रूपीं ॥१॥ बिंबाचें रूपस छाया पै घनदाट । दिननिशीं अविट शामतेज ॥२॥ तें रूप देखिलें कोण्या भाग्ययोगें । निवृत्तिप्रसंगें आह्मां घरीं ॥३॥ दिठिवेचेनि वोपें सानुलें स्वरूप । मुराली वालिप कल्पनेची ॥४॥

सांठवले आकार इंद्रियांच्या वृत्ती । शामतेजें दीप्तीं धवळलें ॥५॥ निराशा संचली आशा पैं हे सार। अनारीं अमर तनु जाली ॥६॥ बाप रखुमादेविवर विठ्ठलीं गळालें । ब्रह्मसुख सोहळे आह्मां घरीं ॥७॥

६६४. **कासयाची चाड मज नाहीं वो साजणी** । एकल्या निर्गुणीं वेधियेलें वो माये ॥१॥ पवन वेगाचेनि अंतरलें तुझासी । आतां मागुती वो कैसी परतेन वो माये ॥२॥ ध्यान धारणा तनु मनु करणें । ठेवियेलें ठेवणें गोपाळ चरणीं वो माये ॥३॥ ऐसें भुल-वणीं भुलविलें नयनीं । रखुमादेविवर चिंतनीं वो माये ॥४॥

६६५. **आजिवरी होतें मी मोकाट** । तंव डोळे फुकट मोडा तुह्मीं ॥१॥ समर्थाचे अंगीं पडले अवाचिती । तुह्मां ऐसि किती चाळविली ॥२॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलाचि घरवात जाले । जन्म-वरी एकांत करुनि ठेले ॥३॥

६६६. **मीपण मोझें हारपलें**। शेखीं ठकचि विशेखीं पडिलें बाई-ये ॥१॥ काय सांगो तुह्मां कैचा हा गोंवळु । न म्हणे दिन वेळु आम्हां घरीं ॥२॥ नवल पैं केलें बुडविलें सगुण । आपणाचि निर्गुण होउनि ठेला ॥३॥ बापरखुमादेविवरु जीवन आमुचें । नाहीं पैं साचें कुळकर्म ॥१॥

## सौरी.

६६७. **कर्मास्तव झालों सौरा** । गेलों पंढरपुरा । संतसनकादिकां मेळीं डौर वाईला पुरा ॥१॥ चाल रामा घरा करूं प्रपंचेसि वैरा॥ ०॥ द्वैतभाव कल्पना खोडी सांडी याची आशा । विठ्ठलनाम हेंचि सार जिव्हे प्रेमठसा ॥२॥ अद्वैत भरिन मन मारीन तोडिन भवपाशा । क्षमा दया धरीन चित्तीं सर्वभूतीं महेशा ॥३॥ ज्ञान ज्ञेय हाचि विचार सर्वमय हरी। दुजेपण न पडे दृष्टी एकपण घरोघरीं ॥४॥ वासना खोडी वेगीं टाहो करीन रामनामें। पुंडलिक पेठ संताचें माहेर तेथें नाचन मनोधर्में ॥५॥ विज्ञान हरि आपणाचि क्षरला दुजेपणें छंदु थोरु । निष्काम स्वरूप सूत्रधारी खरा एकरूपें हरिहरू ॥६॥ त्रिकाळ ध्यान त्रिकाळ मन हर हारपले जेथ । पुरली मनकामना वैकुंठ प्रकट आपणाचि नाथ

॥७॥ देहुडा पाउलीं वेणु वाहे विटेवरी नीट । वोळली कामधेनु युगें अठ्ठाविस वाट ॥८॥ एक वृक्ष क्षरला आपणाचि जग सर्वघटीं आत्मारामु । ज्ञानदेवो ह्मणे आह्मां पंढरपुरीं जाला विश्रामु ॥९॥

## अंबुला.

६६८. **विचारितां देहीं अविचार अंबुला** । न साहे वो साहिला काय करूं ॥१॥ सखि सांगे गोष्टी चाल कृष्णभेटी । आम्ही तुम्ही शेवटीं वैकुंठीं नांदो ॥२॥ येरि सांगे भावो जावें वो प्रवृत्ति । तंव वरि गती येता नये ॥३॥ ज्ञानदेवो प्रवृत्ति निघालिया तत्परा । हरि आला सत्वरा तया भेटी ॥४॥

६६९. **न गमे हा संसारु म्हणोनि केला भ्रतारु** । लोक अनाचारु म्हणती मज ॥१॥ चंचळ जालियें म्हणतील मज । कवणा सांगूं हें जिवांचें गूज ॥२॥ बापरखुमादेविवरा विठ्ठला वांचुनि नेणें। सतत राहणें याचे पायीं ॥३॥

६७०. **अद्वैत अंबुला परणिला देखा** । दुसरा विचार सांडिला ऐका ॥१॥ सांडिणी सांडिला पैं घराचारु । दुसरा विचारु नाहीं केला ॥२॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलेंसी घराचार । ठकला व्यवहार बाईयांनो ॥३॥

६७१. **अंबुला माहेरीं भोगी धणीवरी** । मग तया श्रीहरी सांगो गूज ॥१॥ माझें सुख मीच भोगीन । क्षेमेंसि निगेन अंगोअंगीं ॥२॥ सांडुनि कुळाचार जालियें निर्लज्ज । तुह्मी काय मज शिकवाल ॥३॥ रखुमादेविवरु विठ्ठल मातापिता । मी त्याची दुहिता सर्वांगणीं ॥४॥

६७२. **जियेचा अंबुला रुसुनियां जाये** । तयेचें जीवित्व जळोगे माय ॥१॥ आह्मी रुसों नेणों आह्मी रुसों नेणों । अंबुलिया रुसों नेदूंगे बाईये ॥२॥ ज्याच्यानि अंगें जोडला हा ठावो । रखुमादेविवरु नाहो बुझाविला ॥३॥

६७३. **अष्टभावें भोगितां न पुरे धणी** । देह उगाणी केली देखा ॥१॥ अंबुला निघाला अंबुल्या गांवा । मी वो तया सवा जातू असें ॥२॥ रखुमादेविवरु लागलासे चोरु । मार्ग बुडविला घराचारु ३

६७४. **दुरळु अंबुला केलागे बाई** । ब्रह्मादिकां तो न पडे ठाईं ॥१॥ हालों नये चालों नये । सैरावैरा कांहीं बोलों नये ॥२॥ अंबुला केला धावे जरि मन । बुडती बेताळीस जाती नाक कान ॥३॥ मागील केलें तें अवघेंचि वावो । बापरखुमादेविवरु विठ्ठलु नाहो ४

६७५. **सुची अंबुला ज्ञान घराचारु** । भक्ति हे साकारु आवडली ॥१॥ काय सांगू माय निर्गुण अंबुला । शून्यीं मिळाला नाहीं ठाईं ॥२॥ रखुमादेविवरु साकार अंबुला । मज पर्णू आला बाई येवो॥३॥

६७६. **अंबुला विकून घेतली वस्तु** । घराचार समस्तु बुडविला ॥१॥ उठोनि गेलिये अज्ञान म्हणाल । म्यां तंव कैवल्य जोडियेलें ॥२॥ अंबुला सांडुनि परावा केला । संसार सांडिला काय सांगों ॥३॥ रखुमादेविवरें मज पर्णुनि नेलें । सुखाचि दिधलें काय सांगों ४

६७७. **सगुण अंबुला निर्गुण पैं जाला** । घराचार समस्त बुडविला ॥१॥ आशा हे सासु असतां बुडविली । शांति माऊली भेटों आली ॥२॥ रखुमादेविवर विठ्ठलेंसि चाड । अद्वैतेंसि माळ घेऊनि ठेलें ॥३॥

६७८. **अंबुला होता तो लेंकरू जाला** । घराचार बुडविला बाईयांनो ॥१॥ ह्मणी अकुळी ह्मणाल उणें । तुह्मी जाणते जाणा परमार्थ खुणें ॥२॥ रखुमादेविवरे विठ्ठलें भोगियेलें । लंपट जाहालिये सहजानंदीं ॥३॥

६७९. **स्वरूपाचेनि भानें बिंब हें ग्रासिलें** । परि खुण न बोले काय करूं ॥ रूपाचा दर्पण रूपेंविण पाहिला ॥ द्रष्टाहि निमाला नवल कायी ॥१॥ जिकडे जाय तिकडे दर्शन सांगाती ॥ उदो ना अस्तु हे नाहीं द्वैतास्थिति ॥२॥ पूर्वबिंब शून्य हे शब्दचि निमाले ॥ अनाम्याचेनि भले होतें सुखें ॥ त्यासी रूप नांव ठाव संकल्पें आणिला । अरुपाच्या बोला नाम ठेला ॥३॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलुचि एक ॥ भोगी समसुख ऐक्यपणें ॥ अदृश्य अंबुला जागतां निवविजे ॥ परि सेज स्वभावीं दुजें नाहीं रया ॥४॥

६८०. **सुखाचा निधि सुखसागर जोडला** । ह्मणोनि काळा दादुला मज पाचारिगे माय॥१॥ प्रेम नव्हाळी मज झाली दिवाळी ।

काळे वनमाळी आले घरागे माय ॥२॥ बापरखुमादेविवर पुरोनि उरला सबाह्यजु भरला माझे हृदयींगे माये ॥३॥

६८१. **वऱ्हाड न होतां होतों खेळेमेळे** । लग्न लागलें कवणें दृष्ट वेळे ॥ तेथुनि अंबोला चालवितो मातें । कैसेनि येथें निस्तरावें ॥१॥ मौनेंचि घरवात कराविंयाची । चाड नाहीं मज या जिवाचिगे माय ॥२॥ आया बायांनो ऐका वो न्यावो । येकांती सदा वसताहे नाहो ॥ अंगभोगा नाहीं ऐसा दुरावो । गरुवार होतसे हाचि नवलाहो ॥३॥ एखादे वेळे मजचि मारितोसि । लाजा मी सांगो कोणापासी ॥ राग आलिया आवघेया ग्रासी । ऐसी अति प्रीति आह्मां दोघांसी ॥४॥ ह्मातारा असला काय माय । रूप ना वर्ण हात ना पाये ॥ तरुणि आपुलें रूप ना साहे । क्षणभरी या वेगळी न राहे ॥५॥ पिसुणा देखतां बुझाविलें माये । बुझावणी माझी शब्द न साहे ॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु पाहे । पाहातें पाहाणें जालेंगे माय ॥६॥

६८२. **अवचित वरपडी जालिये अंबुलिया** । लाजिले आपुलिया सकळ गोता ॥१॥ एकांतीचें सुख भोगी आपुलिया सरीसी । दोहींचि सरसी गती झाली ॥२॥ बापरखुमादेविवर विठ्ठल लाधला । मज घेऊनि गेला बाईये वो ॥३॥

६८३. **अंबुला विकुनी पवित्र झाली** । पोटींचीं बाळें कौतुकीं मारिलीं ॥१॥ पापा वेगळी मी जाले वो नारी । विठ्ठला घरीं नांदतसे ॥२॥ आशा तृष्णा नणंदा मारिल्या । शेजारीं राहविल्या संतसंगें ॥३॥ बापरखुमादेविवर विठ्ठल भोगिला । मज पैं लाधला गुणेविण ॥४॥

६८४. **पांचही वऱ्हाडी पांचा ठायीं बोळविली** । येरा दिधली मिठी देखा॥१॥ आंबुलियाचें सुख माझें मी भोगी। सेवेशीं रिघे अंगोअंगीं॥२॥बापरखुमादेविवरु विठ्ठल जोडला।वेव्हारा मुकला बाईये वो ३

६८५. **गरुवार जाली अंबुला व्याली** । व्येउनिया मेली माझ्या ठाईं॥१॥ जेथें ठाव ना ठेवणी निघाली कोनी । तेथें सुईणी हात नाहीं २ बापरखुमादेवीवरा विठ्ठलीं शेजबाज । सहज सहजाकार अंबुला देखा। ३।

## पाईक.

६८६. जालोनि पाइकें गोवीपण जिंकें । परि स्वामिया सेवक साचा होय ॥ एकएकेंविणें स्वामीसेवकपण । मिरविती हे खूण स्वामी जाणे ॥१॥ पाईक काय स्वामी स्वामिया काय पाईक । असतां एके एक दोन्ही नव्हती ॥२॥ स्वामीचें काज पाईकपणें वोज । करिसां होय चोज पैं गा ॥ बापरखुमादेविवरा विठ्ठलासि वोळगतां । पाईका स्वामी असतां निवृत्ति ऐसा ॥३॥

६८७. एकुचि एकला जाला पैं दुसरा । एकीमेकी सुंदरा खेळविती ॥१॥ माझिये कडिये तान्हा तुझिये कडिये कान्हा । देवकी यशोदा स्विमो करिती मना ॥२॥ बापरखुमादेविवरु आवडे मना । जगत्रजिवनु कान्हा बाईयांनो ॥३॥

६८८. पाईका मोल नाहीं देसील तें काई । पाईक न मागें कांहीं भोगजात ॥१॥ देसील तें काई न देसील तें काई । पाईक न मागें कांहीं तुजवांचानी ॥२॥ बापरखुमादेविवर विठ्ठलाच्या पायीं । पाईका मोल नाहीं तैसें जालें ॥३॥

६८९. आणिक पाईक मोलाचे तुझे । तैसें नव्हे माझें पाईकपण ॥१॥ न मगे वही मोल जीवन भातें । तें द्यावें मातें पाईकपण ॥२॥ बापरखुमादेविवरा गोसांविया । पाईकपण मी पायां जोडलेतीं ॥३॥

६९०. देह दंडुनि पाईक अनुरसला जीवें । तव स्वामियाचें गूज हातासि आलें ॥१॥ पाईकपणें गेलें स्वामि होऊनि ठेले । परि नाहीं विसरलें स्वामियातें ॥२॥ पाईकपण ऐसा आठवुचि नाहीं । स्वामीवांचुनि कांहीं जाणेचिना ॥३॥ बापरखुमादेविवरु विठोजी उदारु । पाईक तो सचारु स्वामी केला ॥४॥

६९१. जागतां नीज आलें असें हातां । मग पाईक ह्मणवितां लाज वाटे ॥ नव्हे कोणाजोगा नाईकें ह्मणितलें । उणेपणें आलें पाईकपणा ॥१॥ पाईक शुद्धमति स्वामिया विवेकी । वेव्हारु लोकिकीं चाळीतु असे ॥२॥ निदसुरा होता तों जागसुदा जाला । स्वामियें आणिला आपणापाशीं ॥३॥ पाईकपणें गेलें सन्निधान जालें । स्वामी एका बोलें निवांत ठेला ॥४॥ मागावें तितुकें खुंटलें तेथें । न माग-

तां आपणांतें जाणितलें । बापरखुमादेविवरा विठ्ठला प्रसादें । पाईक परि अभेदें उरला असे ॥५॥

## घोंगडी.

६९२. **आठवितां नुपरे मोविता न मोववे** । सांगतां न सांगवे गुण त्याचे ॥१॥ परतलिया दृष्टि काळा देखिला जगजेठी । वेणिभागीं पृष्टीं कैसा दिसतु असे ॥ध्रु० ॥ त्या गुणाच्या संगें कैसें अद्वैत जालें । मन ह्मणोनि काळेपण बहु झालें गे माय ॥२॥ पुरेपुरे बुद्धि निमाली वेदवाणी । आतां केवीं वर्णू चक्रपाणी बहु काळें गे माय ॥३॥ द्वादश मंडळें वोवाळुनि आलिये । तंव तंव काळें देखिलें रूपडें त्याचें ॥४॥ अनुमाना नये अनुमाना नये । परतल्या श्रुति चोजवेना ॥५॥ मनें बुडी दिधली दाहीं हारपली । चोवीस म वळलीं अगाध पंथीं ॥६॥ प्रीतीचें पांघरूण काळें घोंगडें । रखुमादेविवरें विठ्ठलें मज केलें उघडें ॥७॥

६९३. **रात्री दिवस वाहातसे चिंता** । केशव धडौता होईन मी ॥१॥ खिरजट घोंगडें फाटकें तें कैसें । वेंचिलें तैसें भोगिजे गा ॥२॥ वित्त नाहीं गांठीं जीवित्वा आटी । उघडी पाठी हींव वाजे ॥३॥ घोंगडें देईल तो एक दाता । रखुमादेविवरा मागों रे आतां ४

६९४. **तुझें घोंगडें ऐकाचि चोख** । दुजे वोळख अमंगळ ॥१॥ दे घडुत न घोंगडें मोठें । खिरपटें जळो देवा ॥२॥ रखुमादेविवरु उदार जाला । धडौता केला ज्ञानदेवो ॥३॥

६९५. **चौऱ्याशीं लक्ष हिंडता हाट** । पुंजे दाट सांपडले ॥१॥ हित ये खेपेसी बरवें जालें । सुरंग घोंगडें हाताशीं आलें ॥२॥ येणें पाडें न माये कोठें । घोंगडें मोठें सांपडलें ॥३॥ मनोरथ पुरलेरे आतां । बापरखुमादेविवरा विठ्ठलाशीं ध्यातां ॥४॥

६९६. **माझिया घोंगडियाव ब्रह्माचा गोंडा** । बाहिरी सांडा बैसावया ॥१॥ संतचरणीं रुळे श्रीरंगीं रंगलें । व्योमाकार मिरवले तेंची देखे ॥२॥ रखुमादेविवरें विठ्ठलें दिधलें । अमोलिक जालें मोलेंविण ॥३॥

६९७. **घोंगडी घेऊनि हाटासि जाये** । पंढरिये आहे वस्ती आह्मां ॥१॥ घोंगडियाचें मोल पैं जालें । चरणीं राहिलें विठ्ठलाचे ॥२॥ घोंगडें येक बैसलें थडी । उभयां गोडी विठ्ठलाची ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे अनुभवी तो जाणे । शहाणे ये खुणें संतोषले ॥४॥

६९८. **काळें ना सावळें धगळें ना पिंवळें** । घोंगडें निराळें लाधलों मी ॥१॥ मागील रगटें झाडिलें आतां । पंढरीनाथा चरणाजवळीं ॥२॥ नवें नवघड हातां आलें । दृष्टी पाहे तंव मन हारपलें ॥३॥ सहस्त्र फुलीवरी गोंडा थोरू । धडुतें दावी रखुमादेविवरु ॥३॥

६९९. **निरालंब घोंगडें अद्वैत पेठे** । तेथ एक भेटे रूपेंवीण ॥१॥ हिरोनि घेतलें हिरोनि घेतलें । मज पैं दिधलें दोषेंवीण ॥२॥ रखुमादेविवरें कामाण केलें । अपकारेंविण उघडें नागविलें ॥३॥

७००. **अद्वैत पेठेहुनी घोंगडें आणिलें** । अमोलिक घेतलें पंढरिये ॥१॥ चौ हातांची भरणी आली । तिये चराचरीं ऐसें नाहीं ॥२॥ रखुमादेविवरु विठ्ठलीं नीट । पांघुरविलें वैकुंठ मज देखा ॥३॥

७०१. **माझें चवाळें रंगाचें बहुतें** । श्रीगुरुनिवृत्तिनाथें दिधलेंगे माय ॥१॥ चवाळें शुद्ध चहूं पालवी । व्योमाकारें वेद प्रसिद्ध पांघुरवी ॥२॥ आतां पराहूनि परमेचूनें । बापरखुमादेविवरा विठ्ठला अंगींचें ॥३॥

७०२. **निरंजना गाई चारूं गेलों** । तंव चवाळें तेथें एक पावलों ॥१॥ मज निर्गुणें आड वारिलें ॥ चवाळें हिरोनि जिणें बुडविलें ॥२॥ बापरखुमादेविवरें इतुकें केलें ॥ माझें चवाळें हिरोनि नेलेंगे माय ॥३॥

७०३. **ब्रह्माचा गोंडा चहूं पावला** । मन पांघुरे उमप भावा ॥१॥ चौ हातांहून आगळें । द्विकारांहूनि वेगळेंगे माये ॥२॥ बापरखुमादेविवरें सुभटें । मज चवाळें दिधलें गोमटेंगे माये ॥३॥

७०४. **चवळयाची सांगेन मातु** ॥ चवाळें पांघुरे पंढरीनाथु ॥१॥ गोधनें चारितां हरि पांघुरला । मज चवळ्याचा त्यागु पैं दिधला ॥२॥ बापरखुमादेविवरु श्रीगुरुराणा । चवाळें पांघुरवी निरंजनागे माय ॥३॥

७०५. **निर्गुण चवाळें आणिलें** । बापनिवृत्तीनें मज पांघुरविलें

॥१॥ चौघे चाऱ्ही पदर ह्मणीतले । पांघुरण झालें सारासार ॥२॥ बापरखुमादेविवरें विठ्ठलें । माझें चोरुनि जिणें उघडें केलेंगे माय ॥३॥

७०६. **तूं माझा स्वामी मी तुझा रंक** । पाहतां न दिसे वेगळिक ॥१॥ मी तूं पण जाऊंदे दुरी । एकाचि घोंगडें पांघरूं हरी ॥२॥ रखुमादेविवरा विठ्ठलराया । लागेन मीं पायां वेळोवेळां ॥३॥

७०७. **जायाची घोंगडी नव्हती निज** । ह्मणऊनि तुज विनवितसे ॥१॥ एक पाहतां दुसरें गेलें । तिसरें झालें नेणो काय ॥२॥ चौथें घोंगडें तेंही नाहीं । रखमादेविवरा विठ्ठला पायीं ॥३॥

७०८. **कान्होबा तुझी घोंगडी चांगली** । आह्मांशी कां दिली वांगली ॥ध्रु०॥ स्वगत सच्चिदानंदें मिळोनि शुद्धसत्वगुण विणलीरे । षड्गुण गोंडे रत्नजडित तुज श्याम सुंदरा शोभलीरे ॥१॥ काम कर्म अविद्या त्रिगुण पंचभुतांनीं विणलीरे । रक्त रेत दुर्गंधी जंतु नरक मुतानें भरलीरे ॥२॥ षड्विकार षड्वैरी मिळोनि तापत्रयानें विणलीरे । नवा ठायीं फाटुनी गेली ती त्वां आह्मांसि दिधलीरे ॥३॥ ऋषि मुनि ध्यातां मुखिं नाम गातां संदेह वृत्ती विरलीरे । बापरखुमादेविवर विठ्ठलें त्वत्पदीं वृत्ति मुरलीरे ॥४॥

## डौर.

७०९. **सभा समस्त साधुसंतांची । महामुनी विरक्तांची** । पंडित पाठक ज्ञानियांची । समस्तांसी विनवणी ॥१॥ या पहिलिया पाहाऱ्यांत । डौरकार सांगेल मात । समस्त रिझाल तुम्हीं संत । ऐका निवांत तुम्ही सर्व ॥२॥ आतां परिसा पांच नाद । पांच नादाचे पांच भेद । पहिला नाद चटपट चटपट । दुसरा खटपट खटपट । तिसरा लटपट लटपट । चौथा फटफट फटफट । पांचवा तळमळ तळमळ ॥३॥ पहिला नाद चटपट चटपट । शिखासूत्र त्यजूनी सपाट । विरजा होमिला दृष्ट । परि अपुट तैसाची ॥४॥ वाया केली तडातोडी । वृथा त्यजिली सूत्रशेंडी । परि विषय वासना न सोडी । उपाधि गाढी श्रीपादा ॥५॥ संन्यास घेऊनी कांचा । जिव्हा शिश्न वेधलें त्यांचा । निटंबु केला बापुडे कायेचा । चटपट

चटपट मनींचें मनीं वसे गा दादेनो ॥६॥ खटपट खटपट । शास्त्रप्रज्ञा अलोट । बांधोनी व्युत्पतीची मोट । सैरा सुनाट धांवती ॥७॥ वादतर्का लागी धावे । भरला विषयाचे हावें । वरिवरि वृंदावन दिसे बरवें । परि अंतरीं कडुवट गा दादेनो ॥८॥ लटपट लटपट । मेळवूनि शिष्यांचा थाट । अद्वैत ज्ञानाचा बोभाट । भरिला हाट जिविकेसी ॥९॥ गुरु लोभी धनमान । शिष्य लोभी अति दीन । दोघांसी लटपट लागली पूर्ण । कोणी कोणासी आवरेना ॥१०॥ ब्रह्मज्ञान जाहलें वोस । पाहिले दुःखाचे दिवस । अंतीं जाले कासावीस । कामपाश समंध गा दादेनो ॥११॥ आतां फटफट फटफट । या नादाची गोठ नीट । वोळगोनी औटपीठ । उर्ध्व पाठ भेदिती ॥१२॥ मन पवन समरसोनी । ब्रह्मरंध्रीं लीन होउनी । हा अभिमान वाहोनी । जालेपणी फुंजती ॥१३॥ तें वोखटें गा डौरकारा । करोनि देहाचा मातेरा । भरूं पाहाती सुषम्ना द्वारा । परि असाध्य खरा तो मार्गु ॥१४॥ ऐसी जालिया ब्रह्मप्राप्ती । शिणतोच अहोरात्रीं । अंति विरोध भगवद्भक्ती । यालागीं बोलती फटफट गा दादेनो ॥१८॥ आतां तळमळ तळमळ । धरणीं पारणीं हळाहाळ । तीर्थयात्रे लागीं चळपळ । घेतलें बळ तपाचें ॥१॥ जपध्यान मंत्रावळी । नाना दैवतें आराधिलीं । शेखीं काळें नरडी चेपिली । दुःखें तळमळी या हेतु ॥१७॥ ऐसे भेद नादाचे । मनीं धरा विवेकाचे । ज्ञानदेव बोले निवृत्तीचें । बोला वाचें हरिनाम गा दादेनो ॥१८॥

## गळति.

७१०. विदेह आत्मलिंगा गुरुकृपेचा तुषारु । पूर्णें पूर्ण भरिला घट्ट हळुहळु विंदु उदारु । वरुषला लिंगावरि तेणें तुष्टला श्रीगुरु । प्रसन्न निवृत्तिराजा ज्ञान देउनि उदारु ॥१॥ यालागीं ज्ञानदेवो नाम गुरुकृपेनें पावलों । असतां इये देहीं संसारा हारपलों । ज्ञानविज्ञान कळो आलें अद्वैतरूप बुझालों । विठ्ठल नाम माझे वाचे तेणें वाग्पुष्प पावलों ॥२॥ नित्य गळति नामें जालीं गेला प्रपंच अनिवारू । उपरती देहीं जाली निमाली वासना संसारू । तपन जालें ब्रह्ममूर्ती दिन-

निशीं साचारू। आठवितां मागिल भावो अवघा पारुषला उदारु ॥३॥ विज्ञानेसि ज्ञान गेलें एकरूप परिचार। ज्योतिमाजि कळिका गेली एकदीप जाला आकार। वृत्ति ते निवृत्ति जाली माया मारुनि केलें घर। निवृत्ति गुरु माझा घट स्थापिला त्या समोर ॥४॥ ज्ञानदेवें घटमठ निरोपिली हरिभक्ती। उडाली पक्षपाती इंद्रिया तेथें नाहीं गती। विराले अभिमान ममता जाली समाप्ती। खुंटलिया उर्मी दाही तपन जालें लिंगाप्रती ॥५॥

७११. आदि आत्मज्योतीलिंगा लांबियेला घटु। स्थावरिलें मायावस्त्र लिंगावरी प्रविष्टु। तपन नाम ध्वनी इंद्रिया केलें सपाटु॥१॥ हळुहळु गळती गळे गळों लागली सकाळें॥ उच्चारितां कृष्णनाम। भेणें पळिजे कळिकाळें ॥ध्रु०॥ त्रिगुण सुटल्या गांठी घटु विराला सघन। पंचतत्वें एके ठाई आत्मा नांदे परिपूर्ण। जिवशिव हारपले एक दिसे चैतन्य। आत्माराम विदेहिया श्रीगुरूनें सांगितली खुण ॥२॥ गळति लागीं अपाय मोठे विरुळा जाणें हेचि खुण। नरदेह अवचितें जो साधकु होय नारायण। परमानंदें गळति गळे पांचहि तत्वें हरपोन ॥३॥ निवृत्ति सखा माझा दीनदयाळु श्रीगुरु। आळंकापुरीं स्थापियेलें। दिधला विठ्ठल उच्चारू। समाधि जीवन माझें वरी अजान वृक्षतरु ॥ जंववरी चंद्रसूर्य तंववरी कीर्तिघट स्थिरू ॥४॥ गाति वाति साधु मुनी छंदु घठ मठीं चित्त। विरेल देहबुद्धि ज्ञानदाता देईल उचित। विज्ञानेसी गोष्टी सांगे ऐसें पद पावत। बापरखुमादेविवरू लांबविला घटु ज्ञानदेव सांगत ॥५॥

## आंधळा.

७१२. पूर्वजन्मीं पाप केलें तें हें बहु विस्तारलें। विषयसुख नाशिवंत सेवितां तिमिर कोंदलें। चौऱ्यांशीं लक्ष योनी फिरतां दुःख भोगिलें। ज्ञानदृष्टि हारपली दोन्ही नेत्र आंधळे ॥१॥ धर्म जागो सदैवांचा जे बा परउपकारी। आंधळ्या दृष्टि देतो त्याचें नाम मी उच्चारीं ॥२॥ संसार दुःखमूळ चहूंकडे इंगळ। विश्रांति नाहीं कोठें रात्रदिवस तळमळ। कामक्रोध लोभ शुनीं पाठीं लागलीं

ओढाळ । कवणा शरण जाऊं आतां दृष्टि देईल निर्मळ ॥३॥ मातापिता बंधु बहिणी कोणी न पवती निर्वाणीं । इष्टमित्रसज्जनसखे हे तों सुखाची मांडणी । एकला मी दुःख भोगीं कुंभपाक जाचणी । तेथें कोणी सोडविना एका सदगुरुवांचुनी ॥४॥ साधुसंत मायबाप तिहीं केलें कृपादान । पंढरिये यात्रे नेलें घडलें चंद्रभागे स्नान । पुंडलिकें वैद्यराजें पूर्वीं साधिलें साधन । वैकुंठींचें मूळपीठ डोळां घातलें तें अंजन ॥५॥ कृष्णांजन एकवेळां डोळां घालितां अढळ । तिमिरदुःख गेलें फिटलें भ्रांतीपडळ। श्रीगुरु निवृत्तिरायें मार्ग दाखविला सोज्वळ । बापरखुमादेविवर विठ्ठल दिनाचा दयाळ ॥६॥

७१३. देवा तुज चुकलों गा । तेणें दृष्टी आलें पडळ । विषयग्रंथीं गुंतलोंसे तेणें होतसें विव्हळ । अंध मंद दृष्टी झाली । गिळूं पाहे हा काळ । अवचित दैवयोगें । निवृत्ति भेटला कृपाळ ॥१॥ धर्म जागो निवृत्तीचा । तेणें फेडिलें पडळ । ज्ञानाचा निजबोधु । विज्ञानरूप सकळ ॥२॥ तिही लोकीं विश्वरूप । दिव्य दृष्टी दिधली । द्वैत हें हरपलें । अद्वैतपणें माउली । उपदेशु निजब्रह्म । ज्ञानांजन साउली । चिद्रूप दीप पाहे । तेथें तनुमनु निवाली ॥३॥ दान हेंचि आह्मां गोड । देहीं दृष्टी मुराली । देह हें हरपलें । विदेह वृत्ति मुरली । विज्ञान हें प्रगटलें । ज्ञेय ज्ञाता निमाली । दृश्य तें तदाकार ममता तेथें बुडाली ॥४॥ प्रपंचु हा नाहीं जाणा । एकाकार वृत्ति जाली । मी माझें हारपलें । विषयांध या बोली । उपरती सद्गुरु बोधु । तेथें प्रकृति संचली । शुद्ध धर्ममार्गें पंथ हातीं काठी दिधली । ॥५॥ वेद मार्गें मुनी गेले । त्याची मार्गें चालिलों । न कळेचि विषयअंधा । ह्मणोनि उघड बोलिलों । चालतां धनुर्धरा । तरंगाकारीं हारपलों । ज्ञानदेवो निवृत्तीचा । द्वैत सर्व निरसलों ॥६॥

## पांगुळ.

७१४. मृत्यलोका माझारी गा एक सद्गुरु साचारु । त्याचेनि गा दर्शनें तुटला हा संसारु । पांगुळा हस्तपाद देतो कृपाळु उदारु । यालागीं नांव त्याचें वेदा न कळे पारु ॥१॥ धर्माचें वरि

घर टाकियलें वा आह्मीं । दान मागों ब्रह्म साचें नेघों द्वैत या उर्मी ॥२॥ विश्रांति विजन आह्मां एक सद्‌गुरु दाता । सेवितां चरण त्याचे फिटली इंद्रियांची व्यथा । निमाली कल्पना आशा इळा परिसीं झगटतां कैवल्य देह जालें उपरति देह अवस्था ॥३॥ मन हें निमग्न जालें चरण-स्पशें तत्त्वतां । ब्रह्मांहंस्फूर्ति आर्धी भावो उमटला उलथा । पांगुळलें गुह्य ज्ञान ब्रह्मरूपें तेथें कथा । अंध मग दृढ जालों नि-माल्या विषयाच्या वार्ता ॥४॥ ऋद्धिसिद्धि दास्य सख्य आपें-आप वोळलीं । दान मान मंद बुद्धि ब्रह्मरूपें लीन झालीं । वोळली कामधेनु पंगु तनु वाळली । पांगुळा जिवन मार्गु सतरावी हे वोळली ॥५॥ पांगुळ मी कल्पनेचा पंगु जालों पैं मनें । वृत्ति हे हारपली एका सद्‌गुरु रूप ध्यानें । निवृत्तीसी कृपा आली शरण गेलों ध्येयध्यानें ॥६॥

७१५. **धर्म अर्थ काम मोक्ष दान मागे श्रीगुरु** । हस्त पाद श-रीर व्यथा पंगु झालों मी पुढारु । तिमिर आलें पुढें मायामोहो उ-दारु । तेणें मी जात होतों मग सहज भेटला सद्‌गुरु ॥१॥ धर्म जागो सद्‌गुरु महिमा जेणें तुटे भवव्यथा । हाचि धर्म अर्थ काम येर तें मी नेघे वृथा ॥धु०॥ एक नाम राम कृष्ण याचें दान देई सद्‌गुरु। वेदशास्त्र मथन केलें परि नव्हेचि पुढारु । शरण आलों निवृत्तिराया तोडीं माया संसारु । पाहातां इये त्रिभुवनीं तुजहुनि नाहीं उदारु ॥२॥ ज्ञानेसहित विज्ञान गिळी मी माझे पांगुळ । वृत्ति हे माझे ठायीं हृदयीं बुझे गोपाळ । शंख चक्र पद्म गदा तुष्टें ऐसा तूं दयाळ। बापरखुमादेविवरें दान देऊनि केले अढळ ॥३॥

७१६. **पूर्वप्राप्ती दैवयोगें पंगु जालों मी अज्ञान** । विषय बुंथी उनियां त्याचें केलें पोषण । चालतां धर्म बापा विसरलों गुह्य ज्ञान। अवचटें गुरुमार्गें प्रगट ब्रह्मज्ञान ॥१॥ दाते हो वेग करा कृपाळुवा श्रीहरी । समता सर्व भावीं शांति क्षमा निर्धारीं । सुटेल विषयग्रंथी विहंगम आचारीं ॥२॥ शरण रिघें सद्‌गुरु त्यां पांग फिटेल पां-चाचा । पांगुळलें आपेंआप हा निर्धारु पैं सा... पनामाजी रूप घाली मी माजी तेथें कैंचा। हरपली देहबुद्धि एकाकार शिवाचा

॥३॥ निजबोधें धवळा शुद्ध यावरी आरूढ पैं गा । क्षीराब्धि वोघ वाहे तेथें जाय पां वेगा । वासना माझी ऐसी करीं परिपूर्ण गंगा । नित्य हें ज्ञान घेई अद्वैत रूपालिंगा ॥४॥ पावन होशी आधीं पांग फिटेल जन्माचा । अंधपंग विषयग्रंथी पावन होशील साचा । पांडुरंग होसी आधी फळ पीक जन्माचा । दुष्ट बुद्धि वेगीं टाकीं टाहो करीं नामाचा ॥५॥ ज्ञानदेव पंगपणें पांगुळली वासना । मुरालें ब्रह्मीं मन ज्ञेय ज्ञाता पुरातना । दृश्य हें लोपलें बापा परती नारायणा । निवृत्ति गुरु माझा लागो त्याच्या चरणा ॥६॥

## आंधळा-पांगुळ.

७१७. **अंध पंगु दृढ जालों मायापडळ भ्रांती** । कर चरण विव्हळ गेले तंव भेटले निवृत्ति । ज्ञान मज उपदेशिलें नेलें अज्ञानक्षिती । वृक्ष एक तेथें होता त्या तळीं बैसविलें रीती ॥१॥ धर्म जागो निवृत्तीचा हरिनामें उत्सावो । कर्म धर्म लोपले माझे माझा फिटला संदेहो । धर्म अर्थ काम पूर्ण दान मान संमोहो । नेघे मी इंद्रियवृत्ति रामकृष्णनामीं टाहो ॥२॥ कल्पना मावळली कल्पवृक्षाचे तळवटीं । चिंता हे हरपली माझी नित्य अमृताची वाटी । मन हें निमग्न झालें नित्य वसे वैकुंठीं । तापत्रयें ताप गेले नाना दोषाचे थाटी ॥३॥ अनंत हें मायामय लोपलें जिवाचिया साठीं । हरपल्या योनीमाळा चिंतामणी कसवटी । सिद्धि बुद्धि समसरल्या जीवशिव एकदाटी । आत्माराम मन जालें एकतत्व शेवटीं ॥४॥ आत्माराम निर्गमलें वेदशास्त्रगुह्यज्ञानें । वासनेचि मोहजाळी ते विराली नाना स्थानें । फुटले नाना घट तुटलीं नाना बंधनें । सुटल्या जीवग्रंथी ऐसें केलें त्या दानें ॥५॥ मोक्ष हे ठेले मागें मुक्तिमार्ग निमाला । वृत्ति हे बुडाली माझी निवृत्ति गळाला पाजीला । सलावी बोलली बाळा आत्माराम दाता जाला ॥६॥ बुद्धि बोध संवगडे साजीव करचरण । नयनीं नयन जाले चक्षु मी समाधान । दिव्य देह अमृत कळा दशदिशा परिधान । सर्व हें ब्रह्म झालें फळद फळलें विज्ञान ॥७॥ निवृत्ति गुरु माझा अंधपण फेडिलों । सर्वत्र दृष्टी जाली एकतत्वीं

राहिलों । निरसली माया मोहो श्रीराम अंजन लेईलों । ज्ञानदेव ज्ञानगंगे निवृत्तीनें बुडविलों ॥८॥

## वासुदेव.

७१८. **बाबा ममतानिशी अहंकार दाट** । रामनामें वासुदेवीं वाट। गुरु कृपें वोळलें वैकुंठ। तेणें वासुदेवो दिसे प्रगट गा ॥१॥ वासुदेवा हरि वासुदेवा । रामकृष्ण हरि वासुदेवा ॥धृ०॥ आला पुंडलिक भक्तराज । तेणें केशव वोळला सहज । दिधलें विठ्ठलमंत्र बीज । तेणें जालें सर्व काज गा ॥२॥ रामकृष्णवासुदेवें । वैष्णव गाताती आंघवें । दिंडी टाळ प्रेमभावें । वासुदेवीं मन सामावे गा ॥३॥ शांति क्षमा दया पुरीं । वासुदेवो घरोघरीं । आनंदें वोसंडेल अंबरीं। प्रेमें डुलें त्रिपुरारी गा ॥४॥ वासुदेवीं ज्ञेय ज्ञान । ध्यानीं मनीं नारायण । वासुदेवो परिपूर्ण । कैसें क्षरलेंसे चैतन्य गा ॥५॥ वासुदेवीं वाहूनि टाळी । पातकें गेलीं अंतराळीं । वासुदेवो वनमाळी । कीर्तन करूं ब्रह्ममेळीं गा ॥६॥ ज्ञानदेवा वासुदेवीं । प्रीति पान्हा उजळी दिवी। टाळ चिपळी धरूनि जिवीं। ध्यान मुद्रा महादेवीं गा ॥७॥

७१९. **घुळघुळा वाजती टाळ** । झणझणां नाद रसाळ । उदो जाली पाहाली वेळ । उठा वाचे वदा गोपाळ ॥१॥ कैसा वासुदेव बोलतो बोल । बाळापोटीं माय रिघेल। मेलें माणूस जीत उठविल। वेळ काळांतें ग्रासील ॥२॥ आतां ऐसेंची अवघे जन । येतें जातें तयापासून । जगीं जग झालें जनार्दन । उदो प्रगटलें बिंबलें भान ॥३॥ टाळटाळीं लोपला नाद । अंगोअंगीं मुराला छंद । भोग भोगितांचि आटला भोग । ज्ञान गिळूनि गात्रा गोविंद ॥४॥ गांवा आंत बाहेरी हिंडे आळी । देवो देविची केली चिपळी । चरण नसतां वाजे धुमाळी । ज्ञानदेवाची कांति सांवळी ॥५॥

## बाळछंद.

७२०. **प्रेमडोहीं मन** । जालें मनाचें उन्मन उपरतीं धरिलें ध्यान। झालें ज्ञान परब्रह्मीं ॥१॥ निमिषा निमीष छंद माझा। बाळछंदो

हा तुझा । वेगीं येईं गरुडध्वजा । पसरूनियां भूजा देईं क्षेम ॥२॥ तुटली आशेची सांगडी । ध्यानें नेलें पैल तडी । सुटली संसाराची बेडी । क्षणु घडी रिती नाहीं ॥३॥ नाठवे द्वैताची भावना । अद्वैतीं न बैसे ध्याना । दिननिशींची रचना । काळगणना छंदें गिळीं ॥४॥ जप तप वृत्ति सहित । निवृत्ति होईन निश्चित । समाधी बैसेन एकतत्व । मुखीं मात नामाची ॥५॥ ज्ञानदेवीं छंद ऐसा । बाळछंद झाला पिसा । दान मागतसे महेशा । दिशादिशा न घली मन ॥६॥

७२१. **अलक्षलक्षीं मी लक्षीं** । तेथें दिसती दोही पक्षी । वेद शास्त्रां हेची साक्षी ॥ चंद्रसूर्या सहित ॥ मागेन स्वानुभव अंगुलें । पांचां तत्वांचें सानुलें । व्यर्थ इंद्रियें भोगिलें । नाहीं रंगलें संतचरणीं ॥१॥ बाळछंदो बाबा बाळ छंदो । रामकृष्ण नित्य उदो । हृदयकळिके भाव भेदो । निवृत्तिसहित शरीर निंदो । नित्य उदो तुझाची ॥२॥ क्षीरसिंधुही दुहिला । चतुर्दशरत्नीं भरला । नेघे तेथील साउला । मज अबोला प्रपंचेंसी । दान देगा उदारश्रेष्ठा । परब्रह्म तूं वैकुंठा । मुक्ति मार्गींचा चोहटा । फुकटा नेघे तया ॥३॥ पृथ्वीतळ राज्यमद । मी नेघें नेणें हेंही पद । रामकृष्ण वाचे गोविंद । हाची छंद तुझ्या पंथें ॥ मंत्रतीर्थयज्ञयाग । या न करीं भागा भाग । तूंचि होऊनि सर्वांग । सर्व संग मज देईं ॥४॥ वृत्तिसहित मज लपवीं । माझें मन चरणीं ठेवीं । निवृत्ति पदोपदीं गोवीं । तूं गोसावी दीनोद्धरण ॥ सात पांच तीन मेळा । पा नेघे तत्त्वांचा सोहळा । रज तमाचा कंटाळा । हृदयीं जिव्हाधा हरी वसो ॥५॥ श्वेत पीत नेघे वस्त्र । ज्ञानविज्ञान नेघे शास्त्र । स्वर्ग मृत्यु पाताळपात्र । नित्य वक्त्र हरी देईं ॥ चंद्रसूर्यमहेंद्रपदें । ध्रुवादिकांचीं आनंदें । तें मी नेघे गा आल्हादें । तुझ्या ब्रीदें करीन घोष ॥६॥ करचरणेंसि इंद्रियवृत्ति । तुझ्या ठायीं तूंचि होती । मी माझी उरों नेदी कीर्ति । हें दान श्रीपती मज द्यावें ॥७॥ शांती दया क्षमा ऋद्धी । हेहि पाहातां मज उपाधी । तुझीचिया नामाची समाधी । कृपानिधी मज द्यावी ॥८॥ बापरखुमादेविवरु तुष्टला । दान घे घे ह्मणोनि वोळला । अजानवृक्ष पाल्हाईला । मग

बोलिला विठ्ठल हरी॥९॥पुंडालिकें केलेंरे कोडें। तें तुवां मागीतलेंरे निवाडें। मी तुज हृदयीं सांपडे। हें त्वां केलें ज्ञानदेवा॥१०॥ ज्ञानदेवें घेतलें दान। हृदयीं धरूनीयां ध्यान। समाधी बैसला निर्वाण। कथा कीर्तन करीतु॥११॥ बाळछंदो बावीस जन्में। तोडिलीं भवाब्धीचीं कर्में। चंद्रार्क तारांगणें। रश्मीं दान घेतला हरी॥१२॥

## कापडी.

७२२. आम्ही कापडीरे आम्ही कापडीरे। पापें बारा वाटा पळती बापडिंरे॥१॥ पंढरपुरींचे आम्ही कापडिरे। उत्तरपंथीचे आम्ही कापडिरे॥२॥ आजि पाहालेंरे आजि पाहालेंरे। संतसंगति सुख जालेंरे॥३॥ समता कावडिरे समता कावडिरे। माजि नामांमृत भरिलें आवडिरे॥४॥ येणें न घडेरे जाणें न घडेरे। निजसुख कोंदलें पाहातां चहूंकडेरे॥५॥ नलगे दंडणेंरे नलगे मुंडणेंरे। नाम ह्मणोनि कर्माकर्म खंडणेंरे॥६॥ दुःख फिटलेंरे दुःख फिटलेंरे। बापरखुमादेविवर विठ्ठलेंरे॥७॥

७२३. ॐ नमो शिवा आदि। कावडि घेतली खांदीं। मिळाली संतमांदी। त्याचे रज रेणु वंदी॥ध्रु०॥ शिवनाम शीतळ मुखीं। सेविं पां कापडियारे। दडदडदडदड दुडुदुडुदुडुदुडु। पळ सुटला कळिकाळा बापुडीयारे॥१॥ गुरुलिंग जंगम। त्यानें दाविला आगम। आधिव्याधि झाली सम। तेणें पावलों विश्रामरे॥२॥ जवळी असतां जगजीवन। कां धांडोळिसी वन। एकाग्र करीं मन। तेणें होईल समाधानरे॥३॥ देहभाव जेथें विरे। तें साधन दिधलें पुरे। बापरखुमादेविवरे विठ्ठलुरे विठ्ठलुरे विठ्ठलुरे॥४॥

## कूट.

७२४. वडाच्या पानीं एक उभविलें देउळ आधिं कळसु मग पायाहो। देव पुजों गेलों तंव देउळ उडालें पान नाहीं तेथें वडुरे॥१॥ चेत जाणा तुह्मि चेत जाणा। टिपरि वडाच्या साईं हो॥२॥ पाषाणाचा देवो पाषाणाचा भक्तु पोहती मृगजळ डोहीं हो। वांझेचा

पुत्र एकु पोहों लागला तो तारी देव भक्तां हो ॥३॥ भवाब्धिसागर नुतरवे ते पडिले रोहिणी डोहीं हो । नसंपडे आत्मा बुडाले संदेहीं ते गुंतले मायाजळीं हो ॥४॥ विरुळा जाणें पोहते खुणें केला मायेसि उपावो हो । बापरखुमादेविवरु विठ्ठल विसावा तेणें नेलें पैल थडि वो ॥५॥

७२५. **चिंचेच्या पानीं एक शिवालय उभविलें** आधिं कळसु मग पायारे । देव पुजों गेलों तंव देऊळ उडालें प्रसिद्ध सद्गुरुराया रे ॥१॥ संतजनां महंतजनां तेथील तें गुज गोडरे । अनुभव अनुभवितां कदाचित सरे पुरेल मनींचें कोडरे ॥२॥ उपजत नोवरी केळवली केळवला नोवरा नोवरी । पितया कंकण करि माता सुंदरी विपरीतगे माय कोडियाची परी ॥३॥ विपरीत कोडें गुरुगम्य काहाणि ऐकें सगुण विरुळा । बापरखमादेविवरु विठ्ठलु पाहतां पाविजे तो सुखसोहळा ॥४॥

७२६. **देहा लाजिलिये शब्दा रुसालिये** । कांसवीचें दूध देऊनियां बुझाविलें गे माय ॥१॥ काय सांगों तिचा नवलावो । महालोभेंविण कैसा येतो पान्हावो ॥२॥ आवसेचें चांदिणें सागों गेलिये । रखुमादेविवरा विठ्ठलीं वरपडी जालिये ॥३॥

७२७. **निशियेचे भरीं भानु प्रतिबिंबीं बिंबला** । बिंबचि गिळुनि ठेला बिंबामाजी ॥१॥ रात्रि सूर्य वाहे दिनु चंद्र जाये । विपरीतगे माय देखियेलें ॥२॥ उदय ना अस्तु तेथें कैचेनि मित्रगुण । आपणाचि दर्पन होऊनि ठेला ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे अनुभवीं तोचि जाणें । संत ये खुणें संतोषले ॥४॥

७२८. **पुरुषेंविण नारी संचरली शरीरीं** । आपण्यावरी आळु आला ॥१॥ काय कोण्या सांगें सिणलीये अनुरागें । पाडिलिये पतिसंगें अवस्थाभूत ॥२॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलु जैसा तैसा । व्यापूनि आकाशा उरला असे ॥३॥

७२९. **अचिंत बाळक सावध जालें** । निशब्दीं बोभाईलें मीचि मीचि ॥१॥ गरोदरेंविण बाळक जालें । माया मारून गेलें निरंजना ॥२॥ तेथें मज एक नवल पैं जालें । पेहें सूदलें निरालंब ॥३॥ छत्तीस अकरा घोंटु पैं घेतला । उदरेंविण भरलें पोट देखा ॥४॥

सहज गुण होतें निर्गुण जालें । भलत्या झोंबलें निराकारें ॥५॥ बापरखुमादेविवरु शून्याहूनि वेगळें । त्या बाळका सामाविलें आपुल्या व्योमीं ॥६॥

७३०. **उजव्या आगें भ्रतार व्याली** । डाव्या आंगें कळवळ पाळी ॥१॥ कवण जाणे कवण हे खूण । कवण जाणे काय त्याला भूषण ॥२॥ दोहीं आंगींचें लेणें आपण ल्याली । ज्ञानदेव ह्मणे विठो आमुची माउली ॥३॥

७३१. **देउळा आधीं कळसु वाईला** । पाहोनि गेलों आपुले दृष्टी ॥१॥ विपरीतगे माये देखियेलें । कांसविचें दूध दोहियेलें ॥२॥ आधीं पुत्र पाठी वांझ व्याली । लेणें लेऊनि ठेले साडेपंधरें ॥३॥ बापरखुमादेविवरु विपरीत सुपरीत जाणे । संत तिये खुणें संतोषतील ॥४॥

७३२. **मज स्वप्न लेवविला शृंगारु** । माझें उदरीं जन्मला भ्रतारु ॥१॥ जागि सुति ना मी निदसुरी । चोळी सुदली तोडूनि गळसरी ॥२॥ लक्षण म्हणे कीं सुलक्षण ह्मणे । येके उदरींच आह्मी दोघे जणें ॥३॥ सोईरिक पडिपाडें समसाटीं । मी वो बैसलें तयाचे पाठी ॥४॥ निपट कैसें आहेवपण । कैवल्या आधीं तेल कांकण ॥५॥ निवृत्ति दास तेथें नाहीं । लग्नमुहूर्त बहुलाठाईं ॥६॥

७३३. **पैल मेरुच्या शिखरीं** । एक योगि निराकारी । मुद्रा लावुनि खेंचरी । प्राणायामीं बैसला ॥१॥ तेणें सांडियेली माया । त्यजियेली कंथा काया । मन गेलें विलया । ब्रह्मानंदा माझारी ॥२॥ अनुहत ध्वनि नाद । तो पावला परमपद । उन्मनीं तुर्याविनोदें । छंदें छंदें डोलतुसे ॥३॥ ज्ञान गोदावरीच्या तीरीं । स्नान केलें पंचाळेश्वरीं । ज्ञानदेवाच्या अंतरीं । दत्तात्रेय योगिया ॥४॥

७३४. **सेजे सुता भूमी पालखा निजतां उसांसया** । गगन पासोडा मेरु कानवडा ते सुख वाड पहुडलया ॥१॥ सहज संभोगु जाणावा । विजया होई मग भोगि राणिवा ॥२॥ कमळणी बाळा गुंफिती माळा । घालिती गळां देव कन्या ॥३॥ तिचिये शेजारीं सतरावी सुंदरी । चंद्रसूर्य दोन्ही चवरी ढाळिती ॥४॥ येकु त्यागी

दुसरा भोगी। तिसरा योगी राजइंद्र ॥५॥ चौथे द्वारीं अतीत तपें। बैसले गुंफे ज्ञानदेवो ॥६॥

७३५. **पर्वतु गोफणिये सोकरू लेंकरूं**। ज्याचेनि तृष्णें आटले सप्तहि सागरू। ज्याचेनि स्वेदें बुडाला मेरू। तयामाजी ने तया मी काय करूं ॥१॥ कैसें नवल चोज जालेंगे माय। खांदीं गंगा चोरू पळतु आहे ॥२॥ जयाचिया अंगावरी वडाचीं झाडें। तो हा मुरकुटावरी बैसला कोडें। विवळा दृष्टि पाहे निवाडें। घ्या घ्या ह्मणोनि ठाकितो पुढें ॥३॥ मनगणिचे तंतीं वोविली धरणी। ते पिसाळ्यानें घेतली खांदा वाहूनि। त्यासी वोवाळिति चौघीजणी बापरखुमादेवि वराची करणी ॥४॥

७३६. **ऐसा गे माये कैसा योगी**। जे ठाईं जन्मला तो ठाव भोगी ॥१॥ माय कुमारी बाप ब्रह्मचारी। एकविस पुत्र तयेचे उदरीं ॥२॥ आचार सांडुनि जालासे भ्रष्ट। माउसिशीं येणें लाविलासे पाट ॥३॥ पितियाचा वेष धरुनियां वेगीं। मातेचें सुख भोगावया लागीं ॥४॥ आणि मी सांगो नवल काई। येणें बहिणी भोगिली एकेचि ठाईं॥५॥ ज्ञानदेव ह्मणे अनुभवी जाणे। अनुभवावांचूनि कोण्हीच नेणें ६

७३७. **सुकलिये गंगे वऱ्हाड आलें**। उतार नाहीं म्हणोन मुरडोनी गेलें। मनगुणिचे तंतीं ओंविलीं धरणी। पिसोळिया ओझें वाईलें रया ॥१॥ तूं ते कवण मी ते कवण। कवण बांधावें तोरण। योगी दिगंबर सन्यासि जे काय। वरमाये हातीं कंकण रया ॥२॥ आप तेज पृथ्वी वायो आकाश। या भासास उटणें केलें। वांझेचिया पुत्रा चोखगी मर्दिलें। ऐसें नवल ज्ञान जालें रया ॥३॥ वरबाप वोहबाप जन्मलेचि नाहीं। तंव नवरा नवरी कवणची काई। बापरखुमादेविवर चिंतितां। तरि तें सुख निवृत्तिपायीं ॥४॥

७३८. **माते आधि कन्या जन्म पावली** तिच्या वऱ्हाडा आंईति केली। पाहों गेलों तये चरण ना नेत्र संपूर्ण लक्षणें वोळखिलीं। नवरा गर्भवासि पहिले नामरसी घटित आहे दोघांसी। याचा अर्थ तुह्मी करा श्रोते हो लग्नेंविण आणिली घरासिरेरे ॥१॥ कवण कवणाचा विचारु करा उपजत पुत्र म्हातारा। युगें गेलीं तया

जाहालिया जन्म ऐसें एक अवधारा ॥२॥ पुत्रें मातेसि पय पाजिलें कीं पितयासी कडे वाहिलें । तुह्मीं ह्मणाल शास्त्रें काय देखिलें तरी उजुचि आहे बोलिलें । साही शास्त्रें अठरा पुराणें यामध्यें नाहीं बोलिलें । शास्त्र गूढ अध्यात्म गूढ वज्र गुढी पाहे ह्मणितलेंरेरे ॥३॥ साहिशास्त्रें शिणलीं भारी परि अर्थ नकळे कवण्यापरी । सुजाण श्रोते कविजन अपार कवित्व करिती लक्षवरी । एक एक अक्षराची जाणिव पाहताती सुजाण श्रोते । कवित्वा कवित्वीं हें काय नवल ज्ञानदेवीं पाहिलें निरुतेंरेरे ॥४॥

७३९. **पति जन्मला माझे उदरीं** । मी जालें तयाचि नोवरी ॥१॥ पतिव्रता धर्म पहाहो माझा । सर्वांपरीं पति भोगिजे वोजा ॥२॥ निर्गुण पति आवडे मज । आधीं माय पाठीं झालिये भाज ॥३॥ मी मायराणी पतिव्रता शिरोमणी । ज्ञानदेवो निरंजनीं क्रीडा करीं ॥४॥

७४०. **काळें ना सावळें** । श्वेत ना पिंवळें । नादबिंदाहून वेगळें । तें कवणरे चांगया ॥१॥ ज्ञानदेव म्हणे जाण कां माझे उमाणे ॥धु०॥ गोडापरिस गोड । गगनाहूनि वाड । चौदाभुवनां ज्याची चाड । तें कवणरे चांगया ॥२॥ ज्ञानदेवो मानवलें । माझें मज सांगितलें । दोहींचे मिळोनि एक जालें । भलें केलें चांगया ॥३॥

७४१. **कैसें बोटानें दाखवूं तुला** । पाहें अनुभव गुरूच्या मुला। नको सोडूं देठींच्या मुळा । सोडीं अंजुळी आपुल्या कुलारे ॥१॥ ज्या ठायीं चळना ढळ । विश्व जयाचे सत्तेनें खेळ । अणुरेणु व्यापक सकळ । तेथें चळ ना अचळरे ॥२॥ जेथें डोळिया दृष्टि पुरेना । तेथें वृत्तीचें कांहीं चालेना । तेथें बुद्धीचा रीघ होईना । तेथें मनाची धांव पुरेना गा ॥३॥ काय पाहशी तूं भोंवतें । येतां जातां जवळीं असतें । तुझ्या पायाखालीं तुडवतें । तुझ्या डोळ्यामध्यें दिसतें गा॥४॥ ही खुण त्वां ओळखुनी घ्यावी । गुरुपुत्रा जाउनी पुसावी । तो नेऊनी तुला दाखवी । सोय सांगितली ज्ञानदेवीं गा ॥५॥

७४२. **अकरा खणावरी मंदीर उभविलें** । तेथें एक देखिलें रुपेंविण॥१॥ त्या न बोलत्यासि बोलावया गेलें । मीही न बोलती झालेंगे

माय ॥२॥ बापरखुमादेविवरेंसि ठकाचि पडिलें । मीचि ठसावलें ब्रह्माकारें ॥३॥

७४३. **कासवीचें तूप जेवी** । आकाश घालिपां पेवीं । वांझेचें बाळ खेळवी । रूदना करी रया ॥१॥ पाहे या नवल चोज । म्यां देखिलें पां मज । गुह्यांचें गुज । जाणरे मना ॥२॥ मृगजळें सागर भला । डोंगरें ओणवा विझविला । समुद्र तान्हेला । जीवनालागीं ॥३॥ ज्ञानदेव ऐसें ह्मणें । कापुराची मैस घेणें । दुधावीण सांजवणें । भरलें दिसे ॥४॥

## गोंधळ.

७४४. **तूं विटेवरी सखये बाई हो करीं कृपा** । माझें मन लागो तुझ्या पायीं हो करीं कृपा । तूं सांवळे सुंदरी हो करीं कृपा । लावण्य मनोहरी हो करीं कृपा । निजभक्तां करुणा करीं हो करीं कृपा ॥१॥ पंढरपुरीं राहिली । डोळां पाहिली । संतें देखिली । वरूनी विठाई वरूनी विठाई । सच्चिदानंद अंबाबाई हो करीं कृपा । उजळकुळ दीपा । बोध करी सोपा । येउनी लवलाहीं येउनी लवलाहीं ॥ ध्रु० ॥ तुझा देव्हारा मांडिला हो करीं कृपा । चौक आसनीं कळस ठेविला हो करीं कृपा । प्रेम चांदवा वर दिधला हो करीं कृपा । ज्ञान गादी दिली बैसावया हो करीं कृपा । वरी बैसविली आदी माया हो करीं कृपा । काम क्रोध मदमत्सर । दंभ अहंकार । त्यांचें बळ फार । सर्व सुख देई सर्व सुख देई ॥२॥ शुक सनकादिक गोंधळीं हो करीं कृपा । नाचताती प्रेम कल्लोळीं हो करीं कृपा । उदो उदो शब्द आरोळी हो करीं कृपा । पुढें पुंडलिक दिवटा हो करीं कृपा । त्यानें मार्ग दाविला निटा हो करीं कृपा । आई दाविली मूळपीठा हो करीं कृपा । बापरखुमादेविवरु । सुख सागरु । त्याला नमस्कारु । सर्व सुख देई सर्व सुख देई ॥३॥

## जोहार.

७४५. **जोहार मायबाप जोहार** । मी कृष्णाजी घरचा पाडेवार । त्याचे घरांतला सर्व कारभार । माझे शिरावर कीं जी माय बाप ॥१॥

कामाजी बाजी हुद्देदार । तेणें रयतेचा केला मार । रयत फार नागविली कीं जी माय बाप ॥२॥ क्रोधाजी बाबा शेखदार झाले । त्याजकडे हुजूरचें काम आलें । तेणें कामाजीचें छळण केलें कीं जी माय बाप ॥३॥ मनाजी बाजी यानें फितुर केला । तेणें करोनि मोठा बखेडा झाला । गांव सगळा नाशिला कीं जी माय बाप ॥४॥ बुधाजी पाटील कायापूरचे । ममताईचे हाताखालचे । त्यांत जीवाजी भुलले कीं जी माय बाप ॥५ या उभयतांचा विचार वागला । त्यामुळें आह्मांस राग आला । बुधाजी आवरीं आपल्या पोराला कीं जी माय बाप ॥६॥ सद्‌गुरुचा मी पाडेवार । निवृत्तीसी असे माझा जोहार । ज्ञानदेवा सफळ संसार झाला कीं जी माय बाप ॥७॥

---

## मदालसा.

७४६. **उपदेश उपरति ज्ञान ध्यान एकनिष्ठ** । विज्ञान तें आटलेंरे दृश्यादृश्य तेथें दृष्ट । आदिअंत हरपला सर्व ब्रह्म एक वाट । नित्य नेम चालतांरे होय वैकुंठ प्रगट ॥१॥ जे जो जे जो निजानंदें आत्माराम प्रसिद्ध । उपदेश ऐकें बाळा मदालसा प्रबोध । उपजोनि संसारींरे एकतत्व तेंचि सिद्ध ॥धृ०॥ द्वैताद्वैत खोडी निःशेष आटली आस । कल्पना हो बुडालीरे सर्व दिसे हृषिकेश । ममता हे समूळ माया हेही न दिसे उद्वस । हारपती स्वयंज्योति ऐसा होईरे उदास ॥२॥ विकृतिभान गाढे तेथें न दिसे बिरडें । इंद्रिय रसना दृढ याचें निरसलें कोडें । मिथ्या हे मोहपाश तोडी व्यसन सांकडें । मानस परिकर हेही शोधी निवाडे ॥३॥ प्रपंच झोंबो नेदी यांचें उठवी धरणें । शरीरजन्म मरण याचें करी कारे पारणें । निवट्टनि सांडीं बापा सर्वभरी नारायणें ॥४॥ मी माझें दुजेपण तेथें वायां घेसी लाहो । निरशी ममता बापा करिं हरिनामें टाहो । शून्य हें भेदी कारे जन्ममरण निर्वाहो ॥५॥ धारणा धीट करी ध्येय पणरे हें सांडी । अखंडता निजसुख कामधामरे मांडी । स्मरतां नामावळी विषय हे शरीर सांडी । क्रूररे नव्हे बापा सदा आत्मा ने ब्रह्मांडीं ॥६॥

त्रिकाळज्ञान गुज अखंड आत्मारे चेतवी । नित्यता हरिकथा विष्णु कृष्ण मनरंजवी । सकळ परिपूर्ण होशी जीव शिवेरे भावी । मन ध्यान एकरूप सर्वदा हरि हा गोसावी ॥७॥ शांति निवृत्ति क्षमा दया सर्व भूतीं भजन । आचरण एकपक्षें सर्वरूपीं जनार्दन । अलक्षसंकल्प भावी सर्व होई नारायण । विसरें कामनारे सेवीं ब्रम्हसनातन ॥८॥ एकट मन करी निवृत्ति धरी निर्वाहो । चेतवितां इन्द्रियांसी आत्मारामें नित्य टाहो । सेवा सुख करी बापा प्रसन्न लक्ष्मीचा नाहो ॥९॥ सुति मांडी नाममात्रें सेवी तत्पर रसना । उपरति तितिक्षारे लय लक्षि ध्यासि ध्याना । हारपेल मी माझें होसील ब्रम्हांड येसणा । जिव्हा हें मन चक्षु करि श्रीगुरु निरोपणा ॥१०॥ तुझा तूंचि निदेहियां आत्मानाथ एकतत्वीं । हारपति इंद्रियेंरे जिवशिव एके पंक्ती । नाहीं नाहीं अन्य रूप स्वयें परमात्मा ज्योती । सुटेल जन्ममरण उपजेल प्रत्यक्ष दीप्ती ॥११॥ आकाश तुज माजी हरपसि परब्रह्मीं । न भजतां इंद्रियांसी हरपति यया उर्मी । बीज तें निरुपिलें सहज राहेंरे तूं समी । दमशम रिगुनिगु याचा दाहोरे संगमीं ॥१२॥ तटाक देहभूमी रेचक कुंभक आगमी । चंद्रसूर्य ऐसे जाणा पूर्ण परिपूर्णरे रमी । लोलुंगता रिद्धिसिद्धी धारणाते मनोरमी । होसील तूंचि सिद्ध गुरुशिष्य सर्वसमी ॥१३॥ राहों नेदी विषयसुख वार्या उद्वेग विस्तार । प्रेमामृत हरिनाम हेंचि सेविंरे तूं सार । भजतां नित्यकाळ तुटे विषयाचार ॥१४॥ उद्भट सुख साधीं जेणें दिसे आत्ममाथ । बिंबामाजी बिंब पाहें सर्व होई तूं सनाथ । निश्चित निराळारे निगम साधीं परमार्थ । धिटिव ऐसी आहे सर्व पुरति मनोरथ ॥१५॥ उष्णातें घोंटी बापासम चांदिणें धरीं । तेथील अमृतमय चकोर होई झडकरी । लक्ष हें परब्रह्मीं सदा पूर्णिमा ते सारी । निवतिल अष्टही अंगें वोल्हावति शरीरीं ॥१६॥ त्रिकाळ ज्ञानकळा येणें साधलेंरे निज । तितिक्षा मनोवेगें नित्य प्रत्यक्ष ब्रह्मबीज । साकार निजघटीं तो प्रगटे अधोक्षज । पर्वकाळ ऐसा आहे गुरुमुखेंरे चोज ॥१७॥ हें ऐकोनियां पुत्र मातें विनविता पैं जाला । उपदेश ब्रह्म लक्षी सर्वत्र केला वो काला ।

सांडिले संप्रधार आत्मा एकत्र वो केला । कैसें हें उपदेशणें वेदांसि अबोला ॥१८॥ ऐकें तूं मदालसे मज बोध आत्मारामीं ऐकतां वो उपदेश बहुत संतोषलों उर्मीं । प्रेमांमृतजीवनकळा वोल्हावतु असे धर्मीं । निःशेष विषये वोते समर्पिलें परब्रह्मीं ॥१९॥ विपरीत माते जालें आप आपामाजि थोर । चैतन्य हें क्षरलेंसे हाचि धरिला वो विचार ॥२०॥ माझा मी गुरु केला मातेचा उपदेश । न दिसे जनवन सर्वरूप महेश । निराकारि एक वस्तु अवघा दिसे जगदीश । हारपले चंद्रसूर्यो त्याचिमाजि रहिवास ॥२१॥ अनंत नाम ज्याचें त्याचा बोध प्रगट । गुरुखुण ऐसी आहे नित्य सेवी वैकुंठ । नेणें हें शरीर माया रामकृष्ण नीट वाट । उच्चारु वो एकतत्व सेवा सुख वो धीट ॥२२॥ हें ऐकोनि मदालसा म्हणे भला भला पुत्रराया । उपजोनि संसारीं रे तोडीं तोडीं विषया । मुक्त तूं अहासी सहज शरण जाय सद्गुरु पाया । आदिनाथ गुरु माझा त्या निवृत्तीसी भेटावया ॥२३॥ तेथूनि ब्रह्मज्ञान उपदेश अपार । समरसें जनींवनीं राज्य टाकीं असार । यामाजि हिंसा तुज द्वेषितारे चराचर । चैतन्य ब्रह्म साचें एकरूपें श्रीधर ॥२४॥ ज्ञानदेव निवृत्तीसी शरण गेला लवलाहीं । हरपली निज काया मन गेलें ब्रह्म डोहीं । निरसली माया मोहो द्वैत न दिसे कांहीं । अद्वैत बिबलेंसे जनवन ब्रह्म पाही ॥२५॥

७४७. **उपदेश अगोचर उपदेशी अगोचर** मदालसा पुत्रालागीं रहीवासु । ध्यानरूप येक करीं सर्वांघटीं महेशु । जातिधर्म लोपिंबा न करीं तूं आळसू । उठि जाय योगपंथें जेथें वैकुंठ निवासु ॥१॥ जे जो जे जो नित्य हरि जनीं वनीं जो आहे । त्याचें तूं ध्यान करीं नित्य तेथेंची राहें । परतोनी येवों नको प्रपंच न पाहें । जठराग्नीं पचों नको वेगीं तूं योगिया होय ॥२॥ जपतप वाचे एक अखंड श्रीराम उच्चार । नित्य धर्म संताचारे हाचि करींरे विचार । संगदोष बोधिती तुज ह्मणोनि होईं खेचर । अतळों नको द्वैतबुद्धि सदा अद्वैत निरंतर ॥३॥ एक लक्ष एक पक्ष एक तत्व हृदयीं । एक ध्यान एक मन त्याचे लागें तूं सोयी । एक

हरि हाचि खरा एका माने तूं राहीं । आणिक जपों नको देवोदेवीं कांहींबाहीं ।।४।। देव तो वैकुंठींचा निरालंबीं रे आहे। निराळ सर्व जीवां ह्मणोनि ध्यातु जाये। जीव हा शिव करी ऐसें करुनि राहे । रामनाम मंत्र ध्वनि कळिकाळ वास न पाहे ।।५।। कोहं हे उपजतां टाकिलें तुवां सोहं। गर्भी होतासि सावध आतां ह्मणतासि हूंहूं । अहंकार जपों नको मन मुंडि संमोहे । एकट मन करिं रामनामीं धरीं भाव ।।६।। शांति करीं जीवशिवीं सर्व क्षरलासे हरी । क्षमा दया बहिणी तुझ्या माया सांडीं भीतरीं । बंधु पिता सखि जणें टाकिं तूं दुरिच्या दुरी । मत्सर हा घेवों नको मद टाकीं हा बाहेरी ।।७।। हरिरूप निखळ आहे योगी जाणती यासि। अंतर तें दुरांतर हें तूं जप मानसीं । कर्म हें ब्रह्म जाण ऐसा होईं समरसीं । तत्काळ होशी योगी संदेह नाहीं त्यासी ।।८।। सत्व रज तमीं गुंफों नको एकतत्त्वीं आहे भाव । नानातत्त्वीं धरिसी व्यर्थ मग तुज न पवे देव । मी माझें वाहों नको व्यर्थ करिसी उपाव । शिणलासि येतां जातां हा तुज नाहीं आठव ।।९।। शरीर हें नव्हे तुझें तरुण बाळरे वृद्ध । जंववरी सावध आहे तंववरी करीं प्रबोध । एकनामीं विष्णुचेरे जाणती तेचि सिद्ध ।।१०।। निःशंक मार्ग चाळी आडकाठी नाहीं तेथें । विहंगमीं चाड धरीं पिपीलिका नेघें हीत । अजप तेथें जपें सदापूर्ण अनंत । न धरीं विकल्प कांहीं उद्धरासि त्वरित ।।११।। कामना चित्तवृत्ति अनुग्रह हे उपदेश । ग्रहभूतपिशाचरे याचा नव्हे तुज त्रास । कळिकाळ पडेल तेथें पावसि परमपरेश । ह्मणें हें पावसील शरीर न करीं न करीं आळस ।।१२।। अंतीं अंत उर्ध्व अध दश दिशा नांदे एक । हरिविण न दिसे कांहीं संत जाणती विवेक । निरसली त्यांची माया हरि भरला दिसे एक । नयनीं दृष्टि चोख जैसा अमृताचा मयंक ।।१३।। योगिया तूंचि जाण योगयाग तपें हरि । न भजे हरिविण उगा नसे क्षणभरी । रामकृष्ण वाचे सदा नित्य जपे निरंतरी । हरि ध्यान ऐसें आहे पुत्रा हेंचि तूं स्वीकारीं ।।१४।। लोपतील मन संग संग भंग सांगडी । अवचिती पडेल कव जन्ममरणाची उडी। न मिळे आयुष्य तुज मनुष्यजन्मअर्ध

घडी । उठिचि उठोनियां जाय तूं तांतडी ॥१५॥ विवेक करिं बाळा पुराणप्रसिद्ध पाहे । वेदशास्त्रें बोलिले हरि हें पाहोनि उगा राहें । योगिये विसावले तेथें दिव्यचक्षु करूनि पाहें । सत्रावी हे संजीवनी उलट करी लवलाहे ॥१६॥ मातृका भेदुनियां षट्चक्रे टाकीं वेगीं । तेथें तूं गुंफों नको चाल विहंगममार्गीं । अनंत सिद्ध गेले ऋषिमुनीच्या संगीं । नारदादि अवधुत ते प्रपंचीं निःसंगी ॥१७ हनुमंत कपिराज भीष्मादिक उत्तम । परीक्षिति प्रऱ्हाद ते पैं जाले आत्माराम । ध्रुव आणि अंबऋषी पावले वैकुंठ धाम । यांचा तूं संग करीं होईंकारे निःकाम ॥१८॥ मदालसा म्हणे पुत्रा ऐसा आहे उपदेश । भाव गर्भींचारे तुज विचरे पृथ्वी निःशेष । सरता होईं संतामाजि चित्तीं ध्याईं हृषीकेश । परब्रह्म तूंचि होसी ऐसें बोलियेले व्यास ॥१९॥ शुकादिक पुत्र ज्याचे तो साक्षात् नारायण । अवतरले मनुष्यवेषें तारियेले अवघे जन । ऐसाचि होईं तूंरे विसरें मीतूंपण । उठी जाये ऊर्ध्व पंथें करिल कृपा हरि आपण ॥२०॥ नाम हें अमृतसिंधु हृदयीं जपें सदाकाळ । नाहीं तुज रोगराई तुज देखोनी पळेल काळ । हरिसि जो विनटला तया नाहीं काळ वेळ । नामधारकाचें तीर्थ वंदीं तीर्थकल्लोळ ॥२१॥ पुत्र म्हणो अवो माते गुरु तूंची जालिसी। नसवे क्षणभरी जपतप मानसीं । हरि हा श्रेष्ट राणा तूंची तारक जीवासी । भवार्णवीं तारियेल म्यां दृढ धरिलें मानसीं ॥२२॥ खेचर बुद्धि केली खेळीनलों चौऱ्यांशीं । खुंटल्या जन्मयोनी पावलों मोक्षसुखाशी । खेचराखेचर माये मी तुझा वो उपदेशी । गुरुगम्यउपदेशिलें शिष्य निवाला मानसीं ॥२३॥

७४८. **उपदेश ब्रह्मज्ञान पुत्रा ऐकरे बीज** । सांडिं सांडिं मायामोहो मुक्त विचरेंरे सहज । आशा मनसा गुंफों नको सोहं धरिकारे नीज । अखंड गुरुचरणीं मौन्य धरिकारे काज ॥१॥ उपदेश मदालसा निजकांरे आधीं । पूर्णबोधें उमजेरे हेंचि साधी समाधी । लटिका हा मायामोह लक्ष लावीं गोविंदीं । सांडिं मांडिं कोहंवेगीं लीन होईं परमानंदीं । जे जो जे जो जे जो बाळा ॥२॥ चौऱ्यांशींलक्ष जीव जन शिणले योगी येतां जातां । विरळा देखों परतला

जो पारुषला पूर्णता । मनबुद्धि एकचित्तें दृढधरी अनंता । उपरति चित्तें करीं सावध होईं त्वरिता ॥३॥ जन्म हें दुर्लभ जाणा मनुष्यजन्म अगाध । ज्ञानध्यान बुझिजे आधीं वरी गुरूचा प्रबोध । तरीच साधेल तुज नाहीं तरी होसी मूढ अंध । नेमिलें आयुष्य वेंचे कोण तोडी भवबंधकंद ॥४॥ नवमास होतासि गर्भीं अधोवदनें दुःखित । तैं होता उमजतुज कारे येथें निश्चित । परतोनि पाहें वेगीं मनीं धरीं अच्युत । तुटेल योनिपंथू मग तूं सर्वातीत ॥५॥ जंववरी माझें माझें मन न संडी तुझें । तंववरी मोहोपाश व्यर्थ धराणिये ओझें विष्ठामूत्र जंतगर्भीं म्यां वाहिलें तुझें ओझें ॥६॥ उठीं पुत्रा सावध होईं मी माझें सांडि धरीं । कोशकिटके जन्मलासि तैसें तूं बा न करीं । आपण्या आपण होसी तुझा तूंचिरे वैरी । जंव नाहीं आलें काळचक्र वेगीं स्मरें मुरारी ॥७॥ इंद्रियें सावध अहाति तंव करीं धांवा धांवी । मग विस्मृति पडेल बुद्धि मग न साधे हरि गोसावी । सर्वघटीं हरि ध्याय मनचक्षु एक भावीं । नारायण नामपाठ वेदशास्त्र अनुभवी ॥८॥ दिननिशीं शरीर तुझें बाळतारुण्यवृद्ध होय । काया हे नव्हे तुझी सांडीं सांडीं ममता माया । निर्गुणरूप हरिहरू त्यासि तूं शरण जाय । सगुणीं झोंबों नको हरिरूपीं तल्लीन राहें ॥९॥ मृगजळ मायापूर व्यर्थ इंद्रियांची झोंबी । कामना लपवी आधीं लय लावी हरिच्या बिंबीं । चक्षें पक्षें मन गोंवी बिरडें घाली निरालंबी । शुद्धबुद्ध तत्व हरि एकतत्त्व नितंबी॥१०॥गुरुगम्य आगमाचें हेंचि तत्व उत्तम । सत्व रज तमीं गूंफों नको मा मार्ग धरी उत्तम । प्राण लपवी प्राणामाजी वासना करी निःष्काम ॥११॥ हेंचि साधन योगियांचें शिवाचें मनोगत । उठोनियां प्रातःकाळीं तनुमनध्यान नित्य । जागरणीं हरिकीर्तना उद्धरसी त्वरित । नाशिवंत शरीर जाण मग तुज न घडे हित ॥१२॥ क्षणां एका शरिर नासे हें तुझें तुज न कुळे । अवचिता येईल काळ झांकतील देखणे डोळे । मग हें नाठवे तुज करि गुरुमेळीं निर्मळ । सांडी मांडी करूं नको टाकिं टाकीं मनींचे सकळ ॥१३॥

व्यर्थरे राहासी येथें पडशील मोहोफांसा । दशदिशा हरि आहे अर्ध उर्ध्व महेशा । मही हे अंथरूण आकाश करीं अवकाशा । या परि विचरेंरे राहाव प्रमाण सरिसा ॥१४॥ तत्व हें एकरूप हरि- विण नाहीं कोठें । द्वैतभाव न धरीं मनीं नीट जाय वैकुंठें । हा मार्ग योगियांचा संत गेले नीट वाटे ॥१५॥ अभक्त गुंपले येथें तेही पाडिले नीट वाटे । सनकादिकां पंथ हाचि सेविला उपजतां । नारदें विचार केला मग न राहे तो निवांता । गोरक्ष बुझला वेगी दृढ कास हनुमंता । अवधूत याचि परी दत्तामाजी पूर्णता ॥१६॥ उन्मनिं साधीबाळा रूप न्याहाळी नयनीं । नासिकीं ठेऊनि दृष्टि खेंचरी मुद्रा निर्वाणी । शरीर हें असों जावों याची न करीं तूं करणी । रामकृष्ण वाचा पाठ हेंचि धरीं निर्वाणीं ॥१७॥ अष्टदळ ह्रदयीं आहे तोचि आत्मा ये करीं । मन बुद्धि वित्त चित्त दिसों नेदी बाहेरी । मातापिता प्राण तुझे तो दा- खविल शरीरीं । स्त्रीपुत्र इंद्रियद्वारा सांडी परति माघारीं॥१८॥मन हें कोंडी पिंडीं तंतू तुटों नेदी याचा । मार्ग हे जिव्हे पारुषरे हरी राम कृष्ण वाचा । रिकामा क्षणभरी पंथ धरी प्रेमाचा । आदि मध्य हरि एकु तोचि ध्यायीं हृदयींचा ॥१९॥ श्रवण स्मरण करी काळ घाली आंकणा । भीष्में साधिलें हरि तो पावला नारायणा । लक्ष्मणें ध- रिली बुद्धि वोळगिला रामराणा । निमिष्य एक न भरतां शरीर सांडिले प्राणा ॥२०॥ हित तेंचि करीं बाळा हरी प्रेमें मन करी । सावधान चित्त आहे तंव हें सर्व दृढ निवारी । भुली पडेल अंतीं तुज मग नाहीं कैवारी । ममतेचें बिरडें फेडी उठे चाले योगरितीं ॥२१॥ ह्मणे माते परियेसी कैसें उपदेशिलें ज्ञान । गुरु हा कोण करूं अवघें दिसे विज्ञान । मज याचें स्मरण झालें सोहं होतें मज ध्यान कोहं हें विसरलों जालें संसार मौन्य ॥२२॥ परतले प्रेमभाव उब्दोध आला धांवया । कळिकाळ न दिसे दृष्टि पापपुण्य रहावया । सभरा- भरित हरि दिसे माझें कैचें उरावया । तूं तंव विदेही माया मदा- लसा मज राखावया ॥२३॥ मदालसा ह्मणे पुत्रा जो उपदेश करुणा ब्रह्म हें जिवीं शिवीं भोगि योनी नारायणा । शांति क्षमा बाणली तुज कैचें उमटलें गुज ॥२४॥ हे स्थिति बाणली ज्यासी तो मी प-

रिपूर्ण योगी । दया मुक्ती जाली दासी नित्य उन्मनीं भोग भोगी। त्याचिया दर्शनें जीव तरतील वेगीं । उठि पुला जाय पंथें जेथें सत्रावी उगी ॥२५॥ मुक्तामुक्त अभयदान मुक्त झाला अनुभवीं राहिली निरालंबी रातलासे सतरावी । मुक्ताई मुक्त ज्ञानें मदालसा नांवानांवी । मुक्तलग उपदेश चांगया दिधला पाही ॥२६॥

७४९. **उपदेश मदालसा देहो निर्मिला कैसा।** आलासी कवण्या वाटां मातेचिया गर्भवासा । जो पंथ वोखटारे पचलासि कर्मकोठा । अविचार बुद्धि तुझी पुत्रराया अदटा ॥१॥ पर्ये दे मदालसा सोहं जोजोरे बाळा । निजध्यानीं निजपारे लक्ष लागों दे डोळा । निज तें तूं विसरलासि होसि वरपडा काळा ॥२॥ नवमास कष्टलासि दहाव्यानें प्रसूत जाली । येतांचि कर्मजाड तुझी मान अडकली । आकांतु ते जननीये दुःखें धाय मोकली । स्मेरे त्या हरिहरा ध्यायीं कृष्णमाउली ॥३॥ उपजोनि दुर्लभुरे मायबापा जालासी । वाढविती थोर आशा थोर कष्टी सायासी । माझें माझें म्हणोनियां झणी वायां भुलसी । होणार जाणार रे जाण नको गुंफों भव पाशीं ।४॥ हा देहो नाशिवंत मळमूत्राचा बांधा । वरि चर्म घातलेंरे कर्मकीटकाचा सांदा । रवरव दुर्गंधीरे अमंगळ तिचा बांधा । स्मरें त्या हरिहरा शरण जाईं गोविंदा ॥५॥ या देहाचा भरंवसा पुत्रा न धरावा ऐसा । माझें माझें म्हणोनियां बहु दुःखाचा वळसा । बहुत ठकियेले मृगजलाच्या आशा । तृष्णा सांडुनियां योगी गेले वनवासा ॥६॥ या पोटाकारणेंरे काय न करिजे एक । यालागीं सोय धरींरे तिहीं भुलविले लोक । ठाईंचें नेमियेले त्याचें आयुष्य भविष्य । ललाटीं ब्रह्मरेखा नेणती ते ब्रह्मादिक ॥७॥ जळींचीं जळचरेंरे जळींचियारे रमती । भुललीं तीं बापुडींरे ते कांहीं नेणती । जंव नाहीं पुरली त्याचि आयुष्यप्राप्ति । वरि घालुनि भोंवराजाळ बापा तयातें गिवसिती ॥८॥ पक्षणी पक्षीयारे निरंजनीं ये वनीं । पिलिया कारणेंरे गेलि चारया दोन्ही । अवचिती सांपडली पारधिया लागुनी । गुंतुनीयां मोहोपाशीं प्राण त्यजिती दोन्ही ॥९॥ मृग हा चारियारे अतिमानें सोकला । अविचार बुद्धि त्याची परतोनि मागुता आला । तंव त्या

पारधियानें गुणीं बाणु लाविला । आशारे त्यजूनियां थिता प्राण मुकला ॥१०॥ अठराभार वनस्पती फुलीं फळीं वोळती । बाविल्या पोखरणीं नदी गंगा वाहती । ज्या घरीं कुलस्त्रिया राज्य राणीव संपत्ती । हें सुख सांडूनियां कासया योग सेविती ॥११॥ हें सुख सांडूनियां कोण फळ तयासी । कपाट लंघूनियां योगि ध्याती कवणासी । योग तो सांग मज कवण ध्यान मानसीं । सर्वत्र गोविंदुरे हृदयीं ध्याईं हृषिकेशी ॥१२॥ इतुकिया उपरि रे पुत्रा घेईं उपदेशु । नको भुलों येणें भ्रमें जिवित्वाचा होईल नाशु । क्षीरा निरा पारखीरें परमात्मा राजहंसु । निर्गुण निर्विकार पुत्रा सेवीं ब्रह्मरसु ॥१३॥ इतुकिया उपरीरे पुत्र मातें विनविता जाला । संसार सोहळा हा थोरा कष्टीं जोडला । पंचभूतें निवती येथें ह्मणोनि विश्रामु केला । वोखटा गर्भवासु कवणा कार्या रचिला ॥१४॥ गर्भींची यातनारे पुत्रा ऐके आपल्या कानीं । येतां जातां येणें पंथें सांगाति नाहींरे कोण्ही । अहंभावो प्रपंचु पुत्रा सांडीरे दोन्ही । चौऱ्यांशीं जीवयोनी प्रवर्तले मुनिजन तत्क्षणीं ॥१५॥ वाहतां महापुरीं रे पुता काढिलें तुज । रक्षिलासी प्रसिद्ध सांपडलें ब्रह्मबीज । मग तुज वोळखी नाहीं कारे नेणासि निज । आपेंआप सद्गुरु कृपा करील सहज ॥१६॥ उपजत रंगणारे पुत्रा तुवां जावें वना । बैसोनि आसनींरे पाहें निर्वाणीच्या खुणा । प्राणासी भय नाहीं तापत्रयाचारणा । मग तुज सौरसू पाहारे परब्रह्मींच्या खुणा ॥१७॥ बैसोनि आसनींरे पुत्रा दृढ होई मनीं । चेतवीं तूं आपणापे चेतविते कुंडलनी । चालतां पश्चिमपंथें जाई चक्र भेदुनी । सतरावी जिवनकळा पाहे आत्मा हा चिंतुनी ॥१८॥ मग तूं देखसी त्रिभुवन स्वर्ग मृत्यु पाताळ । नको भुलों येणें भ्रमें सांडीं विषय पाल्हाळ । आपणापे देखपारे स्वरूप नाहीं वेगळें । परमात्मा व्यापकुरे पाहा परब्रम्ह सांवळें ॥१९॥ इतुकिया उपरींरे पुत्रा ते विनवी जननी । परियेसि माउलीये संतोषलों तत्क्षणीं । इंद्रायणी महातटीं विलासलों श्रीगुरुचरणीं । बोलियेले ज्ञानदेवो संतोषलों वो मनीं ॥२०॥

७५०. श्रीगुरु देवराया प्रणिपातु जो माझा । मनादि मूळ

तूंचि विश्वव्यापका बीजा । समाधि घेईं पुत्रा स्वानंदाचिया भोजा । पालखी प्रौढलिया नाशिवंतरे माया ॥१॥ जागरे पुत्रराया जाईं श्रीगुरुशरण । देह तूं व्यापिलासि चुकवी जन्ममरण । गर्भवासु वोखटारे तेथें दुःख दारुण । सावध होईंकारे गुरुपुत्र तूं सुजाण ॥२॥ मदालसा ह्मणे पुत्रा ऐक बोलणें माझें । चौऱ्यांशीं घरामाजी मन व्याकुळ तुझें । बहुत सिणतोसी पाहातां विषयासी वांझे । जाण हें स्वप्नरूप येथें नाहीं बा दुजें ॥३॥ सांडिरे सांडि बाळा सांडि संसारछंदु । माशिया मोहळरे रचियेलारे कंदु । ह्माङूनि आणिखी नेला तया फुकटचि वेधु । तैसी परी होईल तुज उपदेशें आनु ॥४॥ सत्व हे रज तम तुज लाविती चाळा । काम क्रोध मद मत्सर तुज गोंविती खेळा । यासवें ह्मणें जासी सुकुमारारे बाळा । अपभ्रशीं घालतील मुकसिल सर्वस्वाला ॥५॥ कोसालियानें घर सुदृढ पैं केलें । निर्गमु न विचारितां तेणें सुख मानियेलें । जालेंरे तुज तैसें यातायाति भोगाविलें । मोक्षद्वार चुकलासि दृढ कर्म जोडलें ॥६॥ सर्पें दर्दुर धरियेलारे मुखीं । तेणेंहिरे माशी धरियेली पक्षी । तैसा नव्हे ज्ञानयोगु आपआपणातें भक्षी । इंद्रियां घालीं पाणी संसारीं होईंरे सुखी ॥७॥ पक्षिया पक्षिणीरे निरंजनीं ये वनीं । पिलिया कारणेंरे गेली चारया दोन्ही । मोहोजाळें गुंतलीरे प्राण दिधले टाकुनी । संसार दुर्घट हा विचारु पाहे परतुनी ॥८॥ जाणत्या उपदेशु नेणता भ्रांतीं पडिला । तैसा नव्हे ज्ञानप्रकाशु ज्ञानदेवो अनुवादला । अनुभवीं गुरुपुत्र तोचि स्वयें बुझाला । ऐक त्या उद्धरणा गायक सहज उद्धरला ॥९॥

७५१. **मदालसा म्हणे पुत्रा तूं मुक्त होतासी** । संसारमायामोहें कारे बद्ध जालासी । सिद्ध तें विचारी पां जेणें सुखिया होसी ॥१॥ चेईंतूंरे तानुलिया जाईं श्रीगुरु शरण । देहभावीं व्यापिलासी मग तुज शिकविल कवण । अज्ञानपण सांडूनियां तूं चुकवीं जन्ममरण । गर्भवास वोखटारे गर्भी दुःख दारुण ॥२॥ जागृति आणि निद्रा तुज स्वप्नीं भरु । सुषुप्ति वेळोवेळां तुज पडिला विसरु । तें जंव नेणसिरे तंव तुज नाहीं निर्धारु ॥३॥ देह तव नाशिवंत

तूं कांरे भुललासी । अखंड तें विचारीं पां जेणें सुखिया होसी । दुःख तें आठवींरे गर्भीं काय भोगिसी । जठराग्नी कृमीकुंडीं वेळोवेळां पडसी ॥४॥ कोसलियानें घररे सुदृढ पैं केलें । रिगुनिगु न विचारितां तेणें सुख मानिलें । जाहालें बाळा तुज तैसें यातायाति भोगविलें । मोक्षद्वार चुकलासी सकळही कर्में संचिलें ॥५॥ सर्पे दर्दुर धरियेलारे मुखीं तंव तेणें माशी तोंडी धरियेली शेखीं । तैसा हा मायामोहो तुज कारे नुपेक्षी । इंद्रियें व्यापूनियां संसारीं सुखि दुःखी ॥६॥ मृगरे जळ जैसें हेलावत पैं दिसे । तैसी हे भ्रांति माया तुज नाथिली आभासें । उत्पत्ति प्रळय दोन्ही ये तरी तुज सरिसे । स्थिर होऊनि विचारीं पां आणिक नाहीं बा तैसें ॥७॥ मृग पक्षी कीटकु पतंगु होसी । आक्षेपीं संचररे नाना योनी पावसी । पूर्ण ज्ञानसुख जेणें तें तूं कांरे नेणसी । अविनाश तेंचि तूंरे वायां सबळ कां करिसी ॥८॥ परब्रह्म बाप तुझा इच्छा माया हे तुझी । अंशरे तूं तयाचा सबळ कांरे बुद्धि तुझी । अज्ञान तुज व्यालीं ते नव्हे कारे वांझी बा नव्हेचि कां वांझी । तेणें तूं भुललासी ऐक शिकवण माझी ॥९॥ परतत्वा आणि तुज बाळा नाहींरे भिन्न । अनादि तूं आहेसिरे परि हें न देखे मन । अकर्म कर्म केलें तेणें जालें अज्ञान । निष्कर्म होय जेणें तें तूं करी कांरे ज्ञान ॥१०॥ पुत्र ह्मणे वो माते मी अनादि कैसा । मी माझें जाणता वो मी अज्ञान कैसा । उकलु केविं होय तुज कैंसा भरंवसा । जीवन्मुक्त होय दृष्टि दाखवी तैसा ॥११॥ पापपुण्य दोन्ही मजसवेंचि असती । करणी माते थोर त्याची ते आहे चालती । उकलु केंवि होये होय तें सांग मजप्रती । बुझावि वो माझे माते ऐसी करी विनंति ॥१२॥ केलीं कर्में जरि तुवां न संडिवो पाठी । कवण ते प्रकासील हे विपरीत गोष्टी । उकलु केविं होय ते सांग मजप्रती । जेणें मी दृढ होय ते बुद्धि देई वो लाठी ॥१३॥ अनंत कर्में मातें घडलीं वो मज । तीं तंव न संडिती ऐसें ज्ञान पैं तुज । तरी म्यां काय कीजे केविं पावणें सहज । दुर्घट वाट आहे कैशानि निफजेल काज ॥१४॥ उठी पुता जाई बाळा

तीर्थेंरे.हिंड । साधु आणि संत जेथें असती बा उदंड । तयामाजी आत्मज्ञानी जो कां न बोले वितंड । तो तूं गुरु करिं तो तुज बुझवील प्रचंड ॥ १५ ॥ ज्ञानविज्ञानरे गुरु मुखें बुझसी । विचारूनि अनुभउ आपेंआप जाणसी । जेणें जालें अनंत सिद्ध तें तूं कांरे नेणसी । हरिहर ब्रह्मादिक तेही ध्याती तयासी ॥१६॥ नव्हतां बाळा नादबिंद तैं तूंरे सहज । तेथेंचि तूं होतासि ऐसें ज्ञान पैं तुज । तेथें तूं लीन होईं करीं आपुलें काज । संसार साभिमानें घेईं तेथींचें व्याज ॥१७॥ उपजतां गर्भ अंधु जया नाहीं प्रकाशु । पूर्वी तो योगभ्रष्टु चुकवि गर्भवासु । गुरुवचनीं भजे पुत्रा परब्रह्मीं करि वासु । अमृत सेवि पारे ज्ञणीं होसी उदासु ॥१८॥ तुज ऐसें रत्न बाळा कवणेंरे केलें । आणिक अनंत जीव चराचरं भुतले । तेणेंरे इच्छामात्रें क्षणामाणी रचिलें । तें तूंरे नेणसीच येवढें कैसें चुकविलें ॥१९॥ सांडि बाळा कामक्रोधु हा दुर्जन विचारु । जिहीं तुज अंतरविलें त्याचा करि का संहारु । गुरुचरणीं भजें पुत्रा तो तुज देईल विचारु । अविनाशपद पावशी मग तुज होईल निर्धारु ॥२०॥ सहज यम नेम गुरुकृपारे करी । आसनें प्राणायामु प्रत्याहार उदरीं । धारणा होईल तुज मग ध्यान विचारी । समाधी होई पुत्रा तूं जाण निरंतरी ॥२१॥ षड्चक्रा वेगळेंरे तें जाणिजे कैसें । अनुभवें जाणसीरे तुज सहजें प्रकाशें । तैसा हा ज्ञानयोगु गुरुकृपारे दिसे । अज्ञान निरसूनियां ज्ञान पैं समरसें ॥२२॥ अव्यक्त तिहीं लोकींचें तुजमाजिरे असे । त्रैलोक्य जयामाजि तैं तुज पैं दिसे । अविनाशपद होसी मग अज्ञान नासे । तुजमाजि अमृतरे आपेंआप प्रकाशे ॥२३॥ अव्यक्त अगोचर तुज होईळ निरंतर । इंद्रियें स्थिर होती हे तुझे अंकुर । अविनाशपद होसी मग नाहीं येरझार । अष्टमहासिद्धी जया वोळगति तुझें द्वार ॥२४॥ ऋद्धिसिद्धी मायासिद्धी यासि दिधली । तुर्याचिया उपरिरे ज्ञान उन्मनी देखिली । आशापाश सबळ माया जीवबुद्धि निमाली । गर्भवास चुकलारे कैसी बुद्धि स्फुरली ॥२५॥ संतोषोनि कृपादृष्टी ज्ञान पैं लाधविला । आत्मतत्व बोधु तुज प्रकाशुरे जाला । समरसिं सोहंसिद्धि प्रबोधु निमाला । निवृत्ति प्रसादेंरे ज्ञानदेवो बोलिला ॥२६॥

# ॐकार अक्षर.

७५२. ॐकार अक्षरबीजरे । अमित्य भुवनीं प्रकाशुनि गेलेंरे । तें मकाराचे पोटीं आहेरे ॥१॥ उकाराचा शेंडा पाहींरे । एकविसा मंद्राचळा भेदुनि गेलेंरे । मा वेद बीज वेगळें परात्पर पाहेंरे ॥२॥ मागें बोलिलों तें ज्ञानरे । चोविसा अक्षरीं संध्यावळीं सांगेरे । परी त्या अक्षराचें अमित्य आहेरे ॥३॥ चारि ह्मणों तरी नव्हेरे । साही ह्मणों तरी भूललीं बापुडीं । मा अठरांची दशा ते काईरे ॥४॥ दाहा श्रुती शिऊ बोलेरे । अठरा श्रुति विष्णुचें वचन परि कल्पांतीं अक्षरा न सरेरे ॥५॥ पूर्णापूर्ण ऐसें ब्रह्म बोलतीरे । तेथें पूर्ण अपूर्ण दोन्ही नाहीं । मातें कांहीं बाहीं अक्षररे । तया रूप ना रेखा आहेरे ॥६॥ तेथें त्रिकाळ जतिगति नाहींरे । नाहीं इंद्र चंद्र नाहीं आकाश भूमीरे ॥ नाहीं आप तेज वायो तेथेंरे ॥७॥ तरी वेद अक्षर गिवसावें कैसेंरे । अगणित गुण गेलेरे । सिद्धि ना साधक मंत्र ना तंत्र मा तेथें जटा क्रम पद कैचेंरे ॥८॥ स्थूळ नव्हे सूक्ष्म नव्हेरे । धातु नव्हे मातु नव्हेरे । मा कांहीं नव्हे तें अक्षर होयेरे ॥९॥ पर नव्हे परतर नव्हेरे । जाति नव्हे अजाति नव्हे । मा कांहीं नहोनियां एक होयरे ॥१०॥ बुद्धि नव्हे शुद्धि नव्हेरे । वाट नव्हे घाट नव्हे मा खटाटीत नव्हे । मवाळा मवाळ नव्हे नव्हेरे ॥११॥ साच ना दृश्य नव्हेरे । दृश्य नव्हे मा अदृश्य नव्हेरे । वेदीं बोलिलें तें होयरे ॥१२॥ सप्ततळा तळ नव्हेरे । एकवीस स्वर्गांहूनी आगळेंचि आहेरे । बाविसांहूनी परतें पाहींरे ॥१३॥ तेथें नादु नाहीं बिंदु नाहींरे । नाहीं चक्षु पाद नाहीं कर देहरे । देहादिक चतुर नाहींरे ॥१४॥ भ्रमु नाहीं भुली नाहींरे । तें सतराव्याचे कळे प्रकाशलेंरे । परि तेथें मन न राहे ठायींरे ॥१५॥ आतां सातवें पांचवें बोलें ज्ञानरे । तेथें पांचही नाहीं मा सातही नाहीं । मा तें अक्षर शतसहस्रां वेगळें आहेरे ॥१६॥ मागें चौदा बोलियलीं साचरे । ज्ञानासि विज्ञान जाहालें मा शेखीं बुडाला तो वाधारे ॥१७॥ मागें अक्षरें बोलिलीं बहुतेंरे पिंड ब्रह्मांड जयापासून जाहालें । परगुणीं व्यापिलें ज्ञानविज्ञान सुखरे॥१८॥ सुखादि सुख तें ह्मणोंरे । तरि अमित्य वेदाची वाणी खुंटली । मा परीलक्षा-

लक्ष नये परिमाणारे ॥१९॥ त्रिदशा त्रिदश पंचदशा पंचदश नेणतीरे । तें शतसहस्रांचे शेवटीं आहे नाहीं ऐसें दिसेरे ॥२०॥ आत्मा परमात्मा दोन्ही सखेरे । ऐसें चतुरीं बोलतां लोक भुलविलेरे । परि अनुमाना नये वेगळा आहेरे । ॥२१॥ पासष्टि पुढें अद्वैत नेमुरे । द्वैत ना अद्वैत भेद ना अभेद तें अक्षरझेंपकु तोचि भलारे ॥२२॥ बुझों गेला पाहों गेलारे । तेथें दुसनावना तयांसि जाहालें । त्या ठकाठक मौन्या मौन्य पडिलेंरे ॥२३॥ तेथें जाणोनी नेणे धैं जाहालेंरे । मन इंद्रियां लयो जाहाला । अमित्य तेज ध्वनी उमटेरे ॥२४॥ गगना परतें अक्षर दिसेरे। दिसोन न दिसे तें वेदांचें देखणें। तेथें साहांसी शुद्धबुद्ध परतेरे ॥२५॥ नव्या नऊनव्यासि शून्यरे । ऐसें राधा जंत्र भेदावें कवणें । तें कृष्णावतारीं भेदियेलें पुरुषोत्तमेंरे॥२६॥ आतां नव्या नऊ भाग करींरे । ते अर्जुनामुखीं घालतां भागला । तें अक्षर निराक्षर । अकार उकार मकार मातें वळलेंरे ॥२७॥ सात वेचाळीस घालींरे । पंचविसावें तेथें गुणकारी आटलें निरालंब ना पावलें घटाघटींरे ॥२८॥ तें व्योमाकार रूप नव्हेरे । तेज नव्हे त्रिकुट नव्हेरे। मा गोल्हाट नव्हे । मंडळा मंडळी मंडळा परतेंरे॥२९॥ अमित भुवनें चाकें त्यासिरे । निरालंब अख घालुनियां बैसे । तें तुरंगेंविण अक्षर कैसें चालेंरे ॥३०॥ तें नित्य नव्हे अनित्य नव्हेरे । आकारा खूण गुढारु गुढारीलें । परि त्या विवरीं न दिसे अक्षररे ॥३१॥ बारावें भेदुनियां जायेंरे । तेराव्याचें अग्राअग्रीं दिसे । तें परेहुनि परतें आहेरे ॥३२॥ आठ कोटी लक्षी पाहेंरे । तें मुक्त नव्हे अमुक्त नव्हे मा अक्षर कांहीं नव्हे सिद्ध आहेरे ॥३३॥ पिवळें नव्हे मा पांढरें नव्हे काळें नव्हेरे । रंग रंगाकार नव्हे अनंतध्वनि नव्हे । अक्षर निःशब्दीं निरंजन नव्हेरे ॥३४॥ षष्ठ नव्हे सप्त नव्हेरे । मन नव्हे पर नव्हेरे । तें बुडालें बुडोनी नव्हेरे ॥३५॥ सत्ताविसें एकतिसें दाटूनि पाहेंरे । छत्तिसांचा चौभागीं भागों तरी अप्रमिता । अप्रमीत जाहालेंरे ॥३६॥ सहस्र शून्य सहस्रां ठायींरे । बावन अक्षरीं गुण निवडति । तें कूटस्थ कुटाकुटीं नाहींरे ॥३७॥ मागें बोलिलासि भुःभुकारूरे । स्वर ना भेद सत्य वेद रूप बोलियेलें तूं आ-

पणयातें नेणतां । नेणोनि ह्मणविसी ब्रह्मरे ॥३८॥ विकासलें व्योमा-
काररे । तिन्ही देव तिन्ही वेद जाहाले । मा तरी खुण चुकोनियां
माघारी मागूति मुरडलेंरे ॥३९॥ हा अनुवादु नको बोलेंरे । नष्टा
ह्यातीं निजपद दिधलें। ब्रह्मअन्वयें सोऽहं नको बोलेंरे॥४०॥ वाडा परिस
वाड आहेरे।एकुणसावे अक्षरीं मंत्रा साधुं गेलासी परि तें कांहीं नाहीं ऐसें
जाहालेंरे॥४१॥ रकारीं बोध बोलसीरे। तेथें घटीतेंविघटीतें के न पडेची।
त्या मंडळामंडळीं गुंतलासीरे॥४२॥ नकारु रूप शून्यरे । सहस्राचिये
वाटे एक फांकलें । मातें अक्षरासि भेदु नाहींरे ॥४३॥ यम नेम
काय करिसीरे । गुरुमुखें सांगतां वायां भ्रमलें । आपणपा नाहीं
शुद्धिरे ॥४४॥ भांबाविलें मन बुडविरे । मार्गु ठावा न पडतां उगलें
मध्येंचि बुडोनि गेलेंरे ॥४५॥ गति मति वेदु बोलेरे । सातवी मा-
तृका सहस्रीं वाटियेली । तेथें गुणलयो जाहालारे ॥४६॥ दिधलें
मन पांचा ठायींरे । पांचे पांच भागु विभागु जाहाला । तेथें ब्रह्म-
रसु रसीं मुरालारे ॥४७॥ वासुकीमणी मथन केलेंरे । तिहीं देव तेथें
संध्यावळी ठायीं बुडाले । मातरि सहस्रमुखीं लेखा कायसारे ॥४८॥
साहाव्याचि गोठी वळून पाहेंरे । अगाध ब्रह्माच्या गोष्टीरे । करिती
सत्य ब्रह्म त्याच्या पोटींरे ॥४९॥ ध्याना कल्पितां न पविजेरे ।
आपुला आत्मा शुद्ध चैतन्य देखिल्या तेंचि तें । ब्रह्म ब्रह्माकार
होयरे ॥५०॥ मधुर मधुर अनुभव रसुरे । तेथें संवादु ना गोडि
तिखट ना पैल्यतें अंबर अंबराकाररे ॥५१॥ हिर म्हणिजे ठकार
शून्यरे। पांचवे पुढें बिंदुलें दिधलें। तें नववें पुसूनि जायरे॥५२॥ धिधि
म्हणासि ध्याना अगोचररे । जयाचा एक्याण्णउ मातृका भेदिल्या तें
त्रिपुटा फुटोनि जायरे ॥५३॥ योगि मंत्र येकु साधूरे । आटि जनीं
तेथें उभें राहूनियां । अकराव्याचें तोंड मारींरे ॥५४॥ येणें जाणें
परि नाहींरे । सिद्ध साकार भाविसी काय । मा अयोगायोगु तें
नव्हेरे ॥५५॥ नाठठा भाविसी कायरे । नकारशब्दें नामात्मक
नाहीं । तें नहोनि जायरे ॥५६ पराहूनि परता आहेरे । अ-
मित व्योममंडळें भेदूनि तें । मातृकेचें नांव कायरे ॥५७॥
चेउ आलिया निजसुदा नव्हेरे । निज चेताविलें जागें निजविलें ।

दगदगीं फुटीं घालींरे ॥५८॥ तेथें बावन्न त्रेपन्न सक ह्मणतलेंरे । त्यासि लावावया मा आणिक बंधु नाहींरे ॥५९॥ यासि उपावो नाहीं अपावो नाहींरे । नाही नाहीं तेथें कांहीं तें घेउनि राहींरे ॥६०॥ तत्त्वतत्त्वा भेदु नाहींरे । महतत्त्वाचे सामर्थ्यें जाशील तेथें आपण नाहीं कांहीं नाहींरे ॥६१॥ मा तत्त्वा भेदु नाहींरे । एका शेंडा येका डिरिरे । एकतत्त्व महत्तत्त्वें तळातळ भेदियेलें । वोंकारें भेदियेलें परापररे ॥६२॥ सत्य व्योमा शून्य देई-रे । चौदावें बुडवूनि घालूनि पाहें । मा पुढें वेद बीज सांगेनरे ॥६३॥ जटि ब्रह्मऋषि बोलतिरे । पदपदार्थ कर्म खंडी विखंड । मा त्यासि नकळे त्या अक्षराचे पारूरे ॥६४॥ कर्मकांडीं एक बीज आहे रे । संकल्पीं विकल्पीं एको विष्णु बोलेंरे । परि ब्रह्मार्पण नाहीं ठायीं रे ॥६५॥ एकुपदार्थु बोलेरे । ते चोविसाक्षरी संध्यावळी बीज मिर-विलें । एकु आपो नारायण ह्मणेरे ॥६६॥ एक ध्रुव ध्रुव ह्मणति यजुरिरे । यजन याजन अध्ययन अध्यापन । दान प्रतिग्रहो नाहींरे ॥६७॥ रुकारू म्हणती मूळरे । आब्रह्म म्हणती परतल्या दृष्टि मा साम मागति फळरे ॥६८॥ सप्त लोकीं विरंचि विचरेंरे । शंकरें विश्वाचि प्राहुति केली । हरि करिं ठेवा ठेवींरे ॥६९॥ बोध्य म्हणती निज रूप जाणेंरे । गुण ह्मणति सिध्धु पातलियां । शक्तु म्हणे शक्ति पोटींरे ॥७०॥ कमळें हातिं घेऊनि उभेरे । उदयो अस्तु नमस्कारु करिती । मातें असंकल्पासि न पडे ठावेंरे ॥७१॥ एक शैव ह्मणति शिवज्योतिलिंग पाहेंरे । भगता भागवता न पडेचि ठायीं । मातें पावले निवृत्तीचे पाय प्रसादींरे ॥७२॥ निव्रत्ति ह्मणे सोपाना भलारे । अक्षरांचें वर्म अवघें पूर्णपक्ष जाहालें । तें अक्षर तुह्मांसि भेदलेंरे ॥७३॥ मूळ सांडि शेंडा सांडि रे । न घडतां घटण घटाघटीं केली । तरी ब्रह्म-ब्रह्मीं चोखाळलेंरे ॥७४॥ अचिंतन चिंतन प्यालीरे । ज्ञाना सोपा-नाचा निव्रत्ति चोढळी । तें अक्षर त्रिपर्न्नीं तिन्ही मोडलेंरे ॥७५॥ ब्रह्म समुद्र घोंटिलारे । तृषेक्षुधेवीण पंचप्राण पैं खादलेंरे । तिसा-व्यासि मारिलें तुह्मींरे ॥७६॥ धगधगीत ब्रह्मशस्त्र आहेरे । अमित

ब्रह्माचें तेज प्रकाशित । तेज तेजाठायीं विरेरे ॥७७॥ एक रोम कुपीं उगवलारे । त्याचे अनंत गुण मा अनंत पार मा । तो विष्णु भला भलाभलारे ॥७८॥ ते दोघे कर्मधर्म साधक भलेरे । ते अमित्य भुवनें धांडोळितां भागले । परी ते निर्गुण अक्षराचि नलगे सोयरे ॥७९॥ आदिदेवी माया जालीरे । एक वैष्णवी म्हणती अद्भुती म्हणती । चौथी तिघांसि खायरे ॥८०॥ निरंजनीं एक उभेरे । सिद्ध साधक मा वेदांत बोलिजे । ते रंजना संध्यावळी मायेरे ॥८१॥ अठरावर्ण अठरा न्यातिरे । चहूंची वेदीं सांगितली संमति । ते निरांलबीं नाहीं स्थितिरे ॥८२॥ सुयीच्या अग्रीं दाभण ठेवावेंरे । आमित्य ब्रह्मांडें तयावरी जालींरे । ऐसी निज ब्रह्माक्षरींची नकळे मायारे । मायाकोश आड जालेरे ॥८३॥ ते तेजीं तेज कोंडुनी गेलें । साते सस्वरूप अक्षर कवणे ठायींरे ॥८४॥ चौदा चारि चौदा घालीरे चौदा चौके चौदा वांटूनि गेले । मातें ब्रह्माची वाट कोणरे ॥८५॥ अक्षरा मागें अक्षरसहस्र जालेंरे । लक्षलक्षाची कोडी कोडीची अनंत वाटाघाटी । निघंटीं पाहिल्यारे ॥८६॥ चतुर बुद्धि सांगवलेरे । चतुराननु चौमुखीं खोंचावला । पंचमुख सहस्र मुख खुंटावलेरे ॥८७॥ तळवा घोंटीं जानु नाभि वक्षस्थळीं कंठ शेंडे गेलेरे । शेंडिच्या अग्रीं चौदा भुवनें मावळलीं । ते विराट लया लक्ष गेलारे ॥८८॥ अटत घाटत घटिलीरे । तेथें नादु नाहीं स्पर्श नाहीं । कांहीं नाहीं ते अवघी लया पाहिंरे ॥८९॥ ऐसा उत्पात्ति गोळकु । पिंड ब्रह्मांड गोळकु सांगितलारे । ठाऊकें नव्हे ह्मणोनि बुडालें । त्या अवताराचा काय ठावोरे ॥९०॥ देवऋषि मुनि शुकादिकरे । साही अंगें बोलोनि गेले । मा त्या चहूंचा गड संदेह पडलारे ॥९१॥ तेथें सत्तावन्न सहस्र धातूरे । एक ज्यापासूनि मोवितां भागलें । अमिता मुखीं वर्णितां गेलेंरे ॥९२॥ शून्य वोढिलें निरशून्य भेदिलें पाहारे । देवादेवो दैवतें बोलती । तें ब्रह्मज्ञान सोपाना कर्णपुटीं पेरियेलें ब्रह्मरे ॥९३॥ श्रवणेंविण ऐकिलेंरे । मनेंविण मन बुडालेंरे । मागें गिवसितां गिवसितां स्वस्वरूपीं आहेरे ९४ निवृत्ति ह्मणे ज्ञानसोपाना दोन्ही भागीं राहोरे । संध्यावळी अजपा

मंत्रु साधन । त्यानें उपदेशें तें तें ब्रह्म पाहेंरे ॥९५॥ ह्मणसी मनासी नयन आहेरे । तें मनचि नाहीं मा अवघे ब्रह्मचि पाहीं । मा माझा हस्तातळीं उभें राहारे ॥९६॥ अचिंतन चिंतूं नये । संध्या रागु मंत्र पंचकरणें मथिला । त्या अक्षरासि नाहीं भेदुरे ॥९७॥ तें ब्रह्माब्रह्म साररे । त्रिकुटा वेगळें गोल्हाटा वेगळें । न चुकत चुकलें पाहिंरे ९८ रविसोममाथीं माथा बैसले ते अधरेवीण उदरेवीण सामावलें आहेरे ॥९९॥ चिदप्रचिद तेजा तेज नव्हेरे। अमित भुवनें जयाचेनि आहारळीं । तेथुनि निःशब्दापासुनी वेद जाहालेरे ॥१००॥ ब्रह्मवृक्षव्योमीं फुललारे । त्यासि शाखा ना मूळ मा बीज ना अंकुर । तें अक्षर फळेंवाण फळ देखारे ॥१०१॥ सहस्र खांदियांचें एक झाडरे । जयाचीं विश्वपत्रें विश्वशाखा । मा त्याचा अंगकुपीं एक ब्रह्म फळरे ॥१०२॥ यजुरि एशा एशी शाखा जाहाल्यारे । ऋषीं सप्त शाखा जाण बोलियेले । ते अथर्वण राहे श्याम फळरे ॥१०३॥ ऐसें बोलतां अनंत फळरे । परि त्या अक्षरासि नलगे फूल फळ ज्याचि ते निष्कामीं विष्कर्मीं फळेंविण कैसें फळरे ॥१०४॥ आणिक एक सांगेन गूढरे । त्यासि सोळा ना बारा । नवासि शून्य देतां दहा । अकराहीं शून्य मिळेरे ॥१०५॥ ऐसें छत्तिसा गुणांचें बत्तिसावें वाटारे । मिळाले पंचीकरणीं । मिळाले संध्यावळीं। परि त्या न कळे अक्षराचा भेदुरे ॥१०६॥ एकावन्नें बावन्नें मिळालें सत्तावन्नेंरे । परि तें अक्षर निरंजन निराकार निर्गुण । ऐसें गुणिती पैं ते शाहाणेरे ॥१०७॥ अडतीस पंचविशी पांच मारिंरे । निरशून्याकार भृंगा भेदून गेले रे । मा परि निःशब्दीं परा वाटा पाहेंरे ॥१०८॥ धगधगित एक सुरि होतीरे । ते व्योमाचे पोटीं फोडूनि भेदली । ते अक्षरासि वाहे वाटरे ॥१०९॥ एक आप एक पररे । पिंडब्रह्मांडाचे अक्षरीं निवडलें । सातवें गोल्हाट भेदिलेंरे ॥११०॥ तेथें विजया एकी राणीरे । काळातें खाउनी महाकाळ गिळिला । ब्रह्मवोवरीं तिचें नांवरे ॥१११॥ तेथें एक होता अक्षर सिद्धावळीरे । अंत काळ तप्त मुख जाला । शब्द ने देखे फिरोनी आलारे ॥११२॥ आतां एक सांगेन अमित व्योमावरि फुललेरे ।

त्या अक्षरा बांधुनि बंदेंविण धरिलेंरे । ज्ञान सोपानासि म्यां दिधलेंरे ॥११३॥ ज्ञानज्ञानें भला ह्मणवींरे । सोपान सिद्धिनिधी ब्रह्म पावलारे। तेणें ज्ञाना ब्रह्मबोध जालारे ॥११४॥ अद्वैत पंथ कैसारे । ऐक्यवादु वेद बोलती वचनें।ते मिळणी ब्रह्मींचे सांगेन त्रिसंध्याकाळींरे ॥११५॥ ते वर्ण कवणा न घेपवेरे । अनुभविया अटक खुंटले । मग ते ज्ञानी म्हणती वायांरे॥११६॥ जेथें मौन्यामौन्य साध्य नव्हेरे । पांच माळनि सस्वरूप होतें । मा तोंचि ते अनुभवाची खुणरे ॥११७॥ मनीं शंका धरूं नको कांहींरे । चतुर्देहांसहित मन मावळीं । मा तरि ब्रम्हबीज तूंचि होशीरे ॥११८॥ सा सा सा चौदावरि ठेवींरे । हा भेदु कोणी जाणितला म्हणती । तरी त्यासि मानु मी देईन म्हणति निवृत्तीरे ॥११९॥ आतां एक गुह्य परम गुह्यरे । तें अक्षरां शेवटीं दाही दिशा नाहीं। तें सहस्र लक्षीं गुणीं तें आहेरे ॥१२०॥ हें गुणीता शास्त्र जालें ज्योतिर्षीरे । तें वेदाच्या पोटीं धांडोळित अहाती । त्या अक्षराचा न कळे अंतीं अंतूरे ॥१२१॥ भडभिंग भडभिंग भयानक जालेंरे । परि त्यासि सहस्रासिद्धि सहस्रमुखीं बुद्धि । मा बावन्नअक्षरा वेगळें तें वाढेरे ॥१२२॥ ऐसें अमित्य भुवनाचे साटे मावळलेरे । चंडाहूनि प्रचंड थोटावलें । तें अक्षराचे नकळे पारुरे ॥१२३॥ जैं निःशब्द अंकुर फुटेरे । वायुसी मोवणी आपासि भिजवणी । व्योमाची ठेवणी कवण ठेवींरे ॥१२४॥ मनासि नाहीं मारणीरे । तेजासि नाहीं धरणी। धरूं गेला तो वांयाविण श्रमलारे ॥१२५॥ परि एक निर्वाण सांगेनरे । आम्ही तिघी मा जेथुनी तुषाकारलों । ते जीवनीं जीवन जैसें मिळोनि गेलें । मा तैसी परी जाली आम्हां तुम्हांरे ॥१२६॥

---

## हरिपाठ.

**७५३. देवाचिया द्वारीं उभा क्षणभरी** । तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥१॥ हरि मुखें ह्मणा हरि मुखें ह्मणा ॥२॥ पुण्याची गणना कोण करी ॥३॥ असोनि संसारीं जिव्हे वेगु करी । वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ॥४॥ ज्ञानदेव ह्मणे व्यासाचिये खुणें । द्वारकेचे राणे पांडवां घरीं ॥५॥

७५४. **चहूं वेदीं जाण साहि शास्त्रीं कारण** । अठराही पुराणें हरिसी गाती ॥१॥ मथुनि नवनीता तैसें घे अनंता । वायां व्यर्थ कथा सांडीं मार्गु ॥२॥ एक हरी आत्मा जीवशिवसमा । वायां तूं दुर्गमा न घालीं मन ॥३॥ ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ । भरला घनदाट हरि दिसे ॥४॥

७५५. **त्रिगुण असार निर्गुण हें सार** । सारासार विचार हरिपाठ ॥१॥ सगुण निर्गुण गुणाचें अगुण । हरिवीण मन व्यर्थ जाय ॥२॥ अव्यक्त निराकार नाहीं त्या आकार । जेथोनि चराचर हरिसी भजे ॥३॥ ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं । अनंत जन्मोनी पुण्य होय ॥४॥

७५६. **भावेंविण भक्ति भक्तिवीण मुक्ति** । बळेंवीण शक्ति बोलूं नये ॥१॥ कैसेंनि दैवत प्रसन्न त्वरीत । उगा राहें निवांत शिणसी वायां ॥२॥ सायास करिसी प्रपंच दिननिशीं । हरीसी न भजती कोण्या गुणें ॥३॥ ज्ञानदेव म्हणे हरि जप करणें । तुटेल धरणें प्रपंचाचें ॥४॥

७५७. **योग याग विधी येणें नव्हे सिद्धि** । वायांचि उपाधि दंभ धर्म ॥१॥ भावेंविण देव नकळे निःसंदेह । गुरुविण अनुभव कैसा कळे ॥२॥ तपेविण दैवत दिधल्यावीण प्राप्त । गुजेवीण हीत कोण सांगे ॥३॥ ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात । साधुचे संगती तरुणोपाय ॥४॥

७५८. **साधु बोध झाला तो निरोनिया ठेला** । ठायींच मुराला अनुभव ॥१॥ कापुराची वाती उजळली ज्योती । ठायींच समाप्ती झाली जैशी ॥२॥ मोक्ष रेखे आला भाग्यें विनटला । साधुचा अंकिला हरिभक्त ॥३॥ ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनीं । हरि दिसे जनीं वनीं आत्मतत्वीं ॥४॥

७५९. **पर्वताप्रमाणें पातक करणें** । वज्रलेप होणें अभक्तांसी ॥१॥ नाहीं ज्यासी भक्ति तो पतित अभक्त । हरिसी न भजत दैव हत ॥२॥ अनंत वाचाळ बरळती बरळ । त्या कैसेनि गोपाळ पावे हरी ॥३॥ ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान । सर्वांघटीं पूर्ण एक नांदे ॥४॥

७६०. **संताचे संगती मनोमार्गें गती** । आकळावा श्रीपती येणें पंथें ॥१॥ रामकृष्ण वाचा भाव हा जिवाचा । आत्मा जो शिवाचा रामजप ॥२॥ एकतत्त्वनाम साधिती साधन । द्वैताचें बंधन न बाधिजे ॥३॥ नामामृत गोडी वैष्णवां लाधली । योगियां साधली जीवनकळा ॥४॥ सत्वर उच्चार प्रऱ्हादीं बिंबला । उद्धवा लाधला कृष्णदाता ॥५॥ ज्ञानदेव म्हणें नाम हें सुलभ । सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे ॥६॥

७६१. **विष्णुविण जप व्यर्थ त्याचें ज्ञान** । रामकृष्णीं मन नाहीं ज्याचें ॥१॥ उपजोनी करंटा नेणें अद्वैत वाटा । रामकृष्णीं पैठा कैसेनि होय ॥२॥ द्वैताचि झाडणी गुरुविण ज्ञान । तया कैचें कीर्तन घडेल नामीं ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे सगुण हें ध्यान । नामपाठ मौन प्रपंचाचें ॥४॥

७६२. **त्रिवेणी संगमीं नाना तीर्थें भ्रमी** । चित्त नाहीं नामीं तरि तें व्यर्थ ॥१॥ नामासि विन्मुख तो नर पापिया । हरिविण धांवया नपवे कोणी ॥२॥ पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मिक । नामें तिन्ही लोक उद्धरती ॥३॥ ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरीचें । परंपरा त्याचें कुळ शुद्ध ॥४॥

७६३. **हरि उच्चारणीं अनंत पापराशी** । जातील लयासी क्षणमात्रें ॥१॥ तृण अग्निमेळें समरस झालें । तैसें नामें केलें जपतां हरी ॥२॥ हरि उच्चारण मंत्र हा अगाध । पळे भूतबाध भेणें तेथें ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे हरि माझा समर्थ । न करवे अर्थ उपनिषदां ॥४॥

७६४. **तीर्थ व्रत नेम भावेंविण सिद्धि**। वायांचि उपाधी करिसी जना ॥१॥ भावबळें आकळे येऱ्हवीं नाकळे । करतळीं आंवळे तैसा हरी ॥२॥ पारियाचा रवा घेतां भूमीवरी। यत्न परोपरी साधन तैसें ३ ज्ञानदेव ह्मणे निवृत्ति निर्गुण । दिधलें संपूर्ण माझ्या हातीं ॥४॥

७६५. **समाधी हरीची समसुखेंवीण** । न साधेल जाण द्वैतबुद्धी ॥१॥ बुद्धीचें वैभव अन्य नाहीं दुजें। एक्या केशीराजें सकळ सिद्धी ॥२॥ ऋद्धि सिद्धि निधी अवघीच उपाधी। जंव त्या परमानंदीं मन नाहीं॥३॥ ज्ञानदेवीं रम्य रमलें समाधान। हरीचें चिंतन सर्वकाळ ४

**७६६. नित्य सत्यामित हरिपाठ ज्यासी** । कळिकाळ त्यासी न पाहे दृष्टी ॥१॥ रामकृष्ण उच्चार अनंत राशी तप । पापाचे कळप पळती पुढें ॥२॥ हरि हरि हरि हा मंत्र शिवाचा । म्हणती जे वाचा तया मोक्ष ॥३॥ ज्ञानदेवा पाठ नारायण नाम । पाविजे उत्तम निजस्थान ॥४॥

**७६७. एक नाम हरी द्वैत नाम दुरी** । अद्वैत कुसरी विरळा जाणे ॥१॥ समबुद्धि घेतां समान श्रीहरी । शम दमा वैरी हरि झाला ॥२॥ सर्वांघटीं राम देहादेहीं एक । सूर्य प्रकाशक सहस्त्ररश्मीं ॥३॥ ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा । मागिलिया जन्मा मुक्त झालों ॥४॥

**७६८. हरि बुद्धी जपे तो नर दुर्लभ** । वाचेसि सुलभ रामकृष्ण ॥१॥ रामकृष्ण नामीं उन्मनी साधिली । तयासी लाधली सकळ सिद्धी ॥२॥ सिद्धि बुद्धि धर्म हरिपाठीं आले । प्रपंचीं निवाले साधुसंगें ॥३॥ ज्ञानदेवीं नाम रामकृष्ण ठसा । येणें दशदिशा आत्माराम ॥४॥

**६६९. हरिपाठ कीर्ति मुखें जरी गाय** । पवित्राचि होय देह त्याचा ॥१॥ तपाचे सामर्थ्ये तपिन्नला अमुप । चिरंजीव कल्प वैकुंठीं नांदे ॥२॥ मातृ पितृ भ्राता सगोत्र अपार । चतुर्भुज नर होऊन ठेले ॥३॥ ज्ञान गूढ गम्य ज्ञानदेवा लाधलें । निवृत्तीनें दिलें माझ्या हातीं ॥४॥

**६७०. हरिवंश पुराण हरिनाम संकीर्तन** । हरिवीण सौजन्य नेणें कांहीं ॥१॥ तया नरा लाधलें वैकुंठ जोडलें । सकळही घडलें तीर्थाटन ॥२॥ मनोमार्गें गेला तो येथें मुकला । हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य ॥३॥ ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी । रामकृष्णीं आवडी सर्वकाळ ॥४॥

**७७१. वेदशास्त्र प्रमाण श्रुतीचें वचन** । एक नारायण सार जपा ॥१॥ जप तप कर्म हरिविण धर्म । वाउगाचि श्रम व्यर्थ जाय ॥२॥ हरिपाठें गेले ते निवांतचि ठेले । भ्रमर गुंतले सुमनकळिके ॥३॥ ज्ञानदेवी मंत्र हरिनामाचें शस्त्र । यमकुळ गोत्र वर्जियेलें ॥४॥

७७२. **नाम संकीर्तन वैष्णवांची जोडी** । पापें अनंत कोडी गेलीं त्यांचीं ॥१॥ अनंत जन्माचें तप एक नाम । सर्व मार्ग सुगम हरिपाठ ॥२॥ योग याग क्रिया धर्माधर्म माया । गेले ते विलया हरिपाठें ॥३॥ ज्ञानदेवीं यज्ञ याग क्रिया धर्म । हरिविण नेम नाहीं दुजा ॥४॥

७७३. **काळ वेळ नाम उच्चारितां नाहीं** । दोन्ही पक्ष पाहीं उद्धरती ॥१॥ रामकृष्ण नाम सर्व दोषां हरण । जड जीवां तारण हरी एक ॥२॥ नाम हरी सार जिव्हा या नामाची उपमा त्या दैवाची कोण वानी ॥३॥ ज्ञानदेवा सांग झाला नामपाठ । पूर्वजां वैकुंठ मार्ग सोपा ॥४॥

७७४. **नित्य नेम नामीं ते प्राणी दुर्लभ** । लक्ष्मीवल्लभ तया जवळी ॥१॥ नारायण हरी नारायण हरी । भक्ति मुक्ति चारी घरीं त्यांच्या ॥२॥ हरिवीण जन्म तो नरकाचि पैं जाणा । यमाचा पाहुणा प्राणी होय ॥३॥ ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड । गगनाहूनि वाड नाम आहे ॥४॥

७७५. **सात पांच तीन दशकांचा मेळा** । एकतत्त्वीं कळा दावी हरी ॥१॥ तैसें नव्हे नाम सर्व मार्गा वरिष्ट । येथें कांहीं कष्ट नलगती ॥२॥ अजपा जपणें उलट प्राणाचा । तेथें ही मनाचा निर्धारु असे ॥३॥ ज्ञानदेवा जिणें नामेंविण व्यर्थ । रामकृष्णीं पंथ क्रमीयेला॥४

७७६. **जप तप कर्म क्रिया नेम धर्म** । सर्वांघटीं राम भावशुद्ध ॥१॥ न सोडीं रे भावो टाकीं रे संदेहो । रामकृष्णीं टाहो नित्य फोडीं ॥२॥ जाती वित्त गोत कुळ शीळ मात । भजें कां त्वरित भावनायुक्त ॥३॥ ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं । तेणें वैकुंठभुवनीं घर केलें ॥४॥

७७७. **जाणीव नेणीव भगवंतीं नाहीं** । उच्चारणीं पाहीं मोक्ष सदा ॥१॥ नारायण हरी उच्चार नामाचा । तेथें कळिकाळाचा रीघ नाहीं ॥२॥ तेथील प्रमाण नेणवे वेदांसी । तें जीव जंतूंसी केंवि कळे ॥३॥ ज्ञानदेवा फळ नारायण पाठ । सर्वत्र वैकुंठ केलें असे ॥४॥

७७८. **एकतत्त्व नाम दृढ धरीं मना** । हरिसि करुणा येईल तुझी ॥१॥ तें नाम सोपारे रामकृष्ण गोविंद । वाचेशीं सद्गद जपे आधीं

॥२॥ नामापरतें तत्त्व नाहींरे अन्यथा । वायां आणिका पंथा जाशी ह्मणी ॥३॥ ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरीं । धरोनी श्रीहरी जपें सदा ॥४॥

७७९. **सर्व सुख गोडी सर्व शास्त्र निवडी ।** रिकामा अर्धघडी राहूं नको ॥१॥ लटिका व्यवहार सर्व हा संसार । वायां येरझार हरिवीण ॥२॥ नाम मंत्र ज़प कोटी जाइल पाप। कृष्णनामीं संकल्प धरुनि राहें ॥३॥ निजवृत्ति काढीं सर्व माया तोडीं । इंद्रियां सवडी लपों नको ॥४॥ तीर्थव्रतीं भाव धरीं रे करुणा। शांति दया पाहुणा हरी करीं ॥५॥ ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवी ज्ञान । समाधि संजीवन हरिपाठ ॥६॥

---

# अभंग-माला.

## योग.

७८०. **निर्गुणाचे रंगीं रंगलें हें मन ।** सांवळें सगुण ब्रह्म तेंची ॥१॥ मताभिमानी ऐसा विश्वास न धरिती । वचनीं निर्गुण सगुण दोन्ही भिन्न असती ॥२॥ असिपदीं जैसें तत्पद तें नाहीं । सांवळें ब्रह्म पाहीं तैसें असे ॥३॥ निवृत्तिदास ह्मणे चांगया ब्रह्म तेंचि खरें। सांवळें निर्धारें जाण रया ॥४॥

७८१. **डोळांची पाहा डोळां शून्याचा शेवट ।** निळबिंदु नीट लखलखित ॥१॥ विसावों आलें पातलें चैतन्य तेथें । पाहे पा निरुतें अनुभवें ॥२॥ पार्वतिलागीं आदनाथें दाविलें। ज्ञानदेवा फावलें निवृत्तिकृपा ॥३॥

७८२. **शून्याचा शेवट डोळा पाहा निराळा ।** निळबिंदु सांवळा प्रकाशला ॥१॥ ब्रह्म ज्योतिरूप विसावलें जेथ । अनुभव साद्यंत पहा तुह्मीं ॥२॥ ऐसें कैलासनाथें सांगितलें पार्वती । ज्ञानदेवा निवृत्ति तेंचि सांगे ॥३॥

७८३. **चहूं शून्याचा भेद कैसा पहावा देहीं ।** ब्रह्मरंध्रीं निसंदेहीं निजवस्तू ॥१॥ सांवळें सकुमार बिंदूचे अंतरीं । अर्धमात्रेवरी

विस्तारलें ॥२॥ त्रिकूट श्रीहाट गोल्हाट तिसरें । औठपिठादी सारे ब्रह्मांडासी ॥३॥ स्थूल सूक्ष्म कारणी माया । महाकारणाच्या ठायीं रिघ करा ॥४॥ निवृत्ति ज्ञानदेव उभयतांचे बोल । आकाश बुबुळीं पाहा असे ॥५॥

७८४. **आकाश जें दिसे दृष्टिचिया पोटीं** । शून्यत्वासी घोटीं चैतन्यांत ॥१॥ अर्थ पाहतां सांकडें ऐकतां । कैसें करूं आतां निवृत्ति सांगे ॥२॥ सांगतांचि गुज देखिलें नयनीं । हिंडताती मौनी याची लागीं ॥३॥ ज्ञानदेवाचा अर्थ कूटस्थ परिपूर्ण । पूर्णही अपूर्ण होय जेथें ॥४॥

७८५. **सहस्रदळ ब्रह्मरंध्र ज्याचें घर** । सत्रावी निरंतर वसे जेथें ॥१॥ रक्त शुभ्रवर्ण निळा पीत दिसे । दृष्टी शुद्ध असे तयांमध्यें ॥२॥ फार किती सांगों सज्ञान तुह्मीं जन । अर्थ हा समजोन मौन्य धरा ॥३॥ गुह्याचें ही गुह्य निवृत्तीनें दाविलें । मीच याचाहो बोलें बोलतसें ॥४॥

७८६. **आकाशाचा शेंडा कमळ निराळें** । त्यासी चार दळें शोभताती ॥१॥ औट हात एक अंगुष्ट दुसरें । पर्वार्ध मसुरे प्रमाण हें ॥२॥ रक्त श्वेत शाम निळवर्ण आहे । पीत केशर हे माजी तेथें ॥३॥ तयाचा मकरंद स्वरूप तें शुद्ध । ब्रह्मादिकां बोध हाची जाहला ॥४॥ ज्ञानदेव ह्मणे निवृत्तिप्रसादें । निजरूप गोविंदें जनीं पाहतां ॥५॥

७८७. **ब्रह्मांडाचे भुवनीं कमळ तें सुंदर** । पाकोळ्या साचार चार तेथें ॥१॥ औट हात स्थूळ अंगुष्ट । सूक्ष्म पर्वार्ध कारण जाण रया ॥२॥ महाकारण मसुरामात्र सदोदित । ब्रह्मरंध्र साद्यंत वसतसे ॥३॥ चहूं शून्यवर्ण देह चार पहा । कृष्ण नीळ शोभा विकासली ॥४॥ ज्ञानदेव ह्मणे आतां फार ह्मणों काय । सहस्रदळीं निश्चय आत्मा असे ॥५॥

७८८. **त्रिगुणाचें मूळ सत्रावीचें सार** । उन्मनीचें बीज जाण रया ॥१॥ शून्य ब्रह्म पूर्ण चक्षूचे अंतरीं । निर्विकार निरंजन तोचि तें गा ॥२॥ सूर्य चंद्र दोनी प्रकाशले साजिरे । त्रिकुट संचरे ठसा ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे निवृत्तिप्रसादें । राहारे निजबोधें निरंतर ॥४॥

७८९. **मनें मुरऊनी करीं राज रया** । प्रणवासी सखय। साक्ष होई ॥१॥ देहीं स्थानमान विवरण करीं आधीं । पिंडींची हा शुद्धि प्रथम करीं ॥२॥ औट हात हा देह ब्रह्मांड सगळें यांत । तयाचा निश्चित शोध करा ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे विवरण करीं वेगें । निवृत्तीच्या संगें साधिलें हेंचि ॥४॥

७९०. **चहूं शून्याआरुतें महाशून्यापरुतें** । सर्वांसी पहातें तेंची तें गा ॥१॥ दिसे तेंही शून्य पहा तेंही शून्य । देहामाजी निरंतर भिन्न रूप ॥२॥ शून्य निरशून्य दोन्ही हारपलीं। तेथूनि पाहिली निज वस्तु ॥३॥ ध्येय ध्यान ध्याता निरसुनी तिन्ही । झालों निरंजनीं अति लीन ॥४॥ ज्ञानदेव ह्मणे अनुभवी तो जाणे । गुरुमुखें खुण सांगितली ॥५॥

७९१. **शून्य शोधिलें नाहीं जेणें** । काय विवरण केलें तेणें । अज्ञानपणें फुगणें । गाढव जीणें पशूचें ॥१॥ वर्णाकृति शून्याचार । हा नाहीं ज्या विचार । न घडे न घडे साक्षात्कार । जाण सर्वथा तया नरा ॥२॥ आधीं शून्याची शोधणी केली । मग सद्वस्तु प्राप्ति झाली । अमृत वेळाची बोली । बोलतां नये ॥३॥ आधीं शून्य तें शुभ्रवर्ण । मध्यें श्वेत रचिलें जाण। अर्ध्य शून्य तें ताम्रवर्ण। प्रत्यक्ष जाण दिसतसे ॥४॥ महाशून्याचा वर्ण निळा । अव्यक्त तेजाचा ओतिला गोळा । ग्रासूनी ठेला भूगोळा । योगी डोळां पाहती ॥५॥ ऐसें शून्याचें नाहीं ज्ञान । तंववरी अवघेंच अज्ञान । जनीं अवघा जनार्दन । अज्ञान सज्ञान काय बोलूं ॥६॥ ब्रम्ह ज्ञानाची किल्ली । सांगितली एकेंच बोलीं । निवृत्तिराजें बोलविली बोली । तेंची बोलीं बोलिलों ॥७॥

७९२. **अव्यक्त मसुराकार पूर्वार्ध संचलें** । लक्षा सरीसें झालें लक्षासी पैं ॥१॥ अव्यक्त देखणें देखण्या आलें व्यक्त । पहातां व्यक्त अव्यक्त दोनी नाहीं ॥२॥ जागृतीच्या ठायीं निजतो सहस्र-दळीं । बिंदूच्या समेळीं उच्चार होतो ॥३॥ ज्ञानदेव शरण निवृत्तीच्या चरणा । समजुनी खुणा तटस्थ झाले ॥४॥

७९३. **सत्रावीचा खेळ लक्षवेना कवणा** । ब्रह्मादिकां जाणा

अगम्य तें ॥१॥ रात्रंदिवस मन चपळत्वें धांवतें । तेंही सत्रावीतें नपवेची ॥२॥ सत्रावी अगम्य विधि हरिहरां । लक्षूं पहातां बरा गोविंदु गे ॥३॥ ज्ञानदेव दर्शन सत्रावीचें घेतां । उन्मनी ठसवी निवृत्तिराज ॥४॥

७९४. **आकाशाची गुंफा अंत नाहीं जिचा ।** शोध करा तिचा सर्वभावें ॥१॥ अनंत ब्रह्मांडाचा खेळ जिच्या योगें चाले । चांग्यासी मिनलें तया ठायीं ॥२॥ गुंफेच्या आधारें चंद्र सूर्य चालती । विश्रांतिसी येती तये जवळी ॥३॥ ज्ञानदेव नयन धरितां समभावें । सोहं स्वरूप भावें लाधलेंसे ॥४॥

७९५. **षट्चक्रें बंद निघुनियां गेलीं ।** पाहों जों लागलीं तया गांवा ॥१॥ निरंजन सभराभरीत वस्तू कोंदली । साक्षत्वासी आली आत्मदशा ॥२॥ वृत्ति झेंपावली आनंद झाला सैरा । सत्रावी येरझारा करी जेथें ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे लक्ष लावीं आकाशीं । ब्रह्म पावसि लौकरीं तूं ॥४॥

७९६. **नयनाचे शेजारीं दशवें द्वार बापा ।** एक मार्ग सोपा बोलतसें ॥१॥ आधारीं पवन अपान विराजे । आंगुळें चार साजे तयां ठायीं ॥२॥ मणीपूर चक्र नाभिस्थान कमळ । सहा अंगुळांचा खेळ असे तेथें ॥३॥ वायुचक्र अनुहात हृदय असे एक । प्राणासी निःशंक जेथें नेई ॥४॥ अग्नीचक्र भ्रुवांग शोभतें प्रकाशत्व । प्राणासी उलथावें तयावरी ॥५॥ सहस्रदळीं ब्रह्मरंध्र शोभतसे निळें । प्रकाशाचे उमाळे जेथें असती ॥६॥ ज्ञानदेव ह्मणे ऐका प्राणायाम । या अभंगीं निःसीम अर्थ जाला ॥७॥

७९७. **औटपीठ डोंगरी गाय एक वसे ।** क्षीर सेवितुसे निजयोगी ॥१॥ धाले पूर्वपदीं समान लक्षिती । क्षुधा चाड चित्तीं नाहीं नाहीं ॥२॥ भ्रुवांतरीं लक्ष लाऊनी बैसा ध्यानीं । ऐक्यासी उन्मनी होऊनी रहा ॥३॥ ज्ञानदेव नमितो आदी देवी प्रति । नेत्रीं पाहे ज्योति शुद्धरूप ॥४॥

७९८. **सोहंकारी माया लक्षा आणी देही ।** निरंजनीं पाही मांयाकार ॥१॥ निर्गुण सगुण माया तेची खरी । प्रसऊनी निर्धारीं

वांझ असे ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे मज माया कृपाळु झाली । तिणें उजळली माझी काया ॥३॥

७९९. **आकाशीं मळा लाविला बा एक।** वांझेचें बाळक शिंपितसे॥१॥ अग्नीकुंड मनें बाळकें निर्मिलें। प्रत्ययासी देखिलें मीया लागीं ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे उफराटें पहातां। सर्व सौख्यदाता निवृत्ति एक ३

८००. **पहा त्रिभुवनीं न दिसे बाइये** । नयनांजनीं पाहें आत्मरूप ॥१॥ मन बुद्धि चित्त अंतःकरण जाण । या वेगळें निर्वाण ब्रह्म तेंचि॥२॥ ज्ञानदेवा ब्रह्म लाधलें अवचट। उन्मनीचा घाट चढतांची ३

८०१. **आत्मज्ञान जया न देखा निजदृष्टी** । तया नरा गोष्टी करूं नये ॥१॥ तूर्यारूपें जाण प्रभा हे निःसिम । तया परता राम असे बापा॥२॥ ज्ञानदेवा गुज दाविलें गुरूनें। मनें अनन्यें कल्पितांची ३

८०२. **आत्मा एक बाई स्थिरचरव्यापक** । सृष्टी तैसी देख एकलीच ॥१॥ पंचमहाभूतें व्यापुनी निराळा । सौंदर्य पुतळा काळाबाई ॥२॥ ज्ञानदेव ध्यान धरिलें पुढती । त्रैलोक्याची वस्ती असे जेथें ॥३॥

८०३. **अकारी अर्धमात्रा कवण रीति दिसे** । उकारीही रसे कवणे परी ॥१॥ मकारी संयुक्त झाली कैशापरी । अर्धमात्रेवरी अर्धमात्रा ॥२॥ अर्धमात्रेचा अर्थ अवचटची दिसे । गुरुगम्य सोय जाणती पैं ॥३॥ ज्ञानदेवें अर्थ शोधुनी घेतला । महाशून्यीं संचला निवृत्तीराज ॥४॥

८०४. **शून्य हे चार महा शून्य दिसतसे** । निजरंग वसे सर्व त्यांत ॥ १ ॥ ऐसा रंग जया लाधतांचि पाहीं । मनाची ही सोइ हारपली ॥२॥ ज्ञानदेवाचा बोल बोलण्याचें रूप । निवृत्तिस्वरूप सर्वत्र हें ॥३॥

८०५. **शून्याचें जें बीज योगीयांचें गुज** । स्वानंदाचें निजब्रह्म रया ॥१॥ त्रिगुण त्रिविध तो सच्चिदानंद । शब्दाचा अनुवाद नसे जेथें ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे सद्गुरु जाणती । इतरांची वृत्ति चालेचीना ॥३॥

८०६. **ऐसा योगीराज देखितां अवचट** । उन्मनी लंपट रात्रं-

दिवस ॥१॥ सत्रावीची शिव टाकुनी राहिला । पाहण्यातीत झाला सर्वांठायीं ॥२॥ असिपदीं आनंद प्रियरूप जाण । ध्यानाचें कारण जेथें नाहीं ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे ऐसा योगीराणा । तयाचीया चरणा प्रणिपात ॥४॥

८०७. **एका एक गुज बोलतों निर्वाण** । निवृत्ति चरण आठऊनी ॥१॥ अर्धमात्राक्षरीं अक्षरें पाहाती । अनाक्षरा परती बायांनो ॥२॥ रज तम सत्व याहुनी निराळी । लक्षाही वेगळी निवृत्ति जाणे ॥३॥ ध्येय ध्याता ध्यान परता जिचा खेळ । ज्ञेय ज्ञाता ज्ञान याची साक्ष ॥४॥ सत्‌चित्‌ आनंद ब्रह्मा हरी हर । तेही जिचा पार नेणविती ॥५॥ सलोकता मुक्ती आदी तिन्ही वर । वसतें जें घर योगीयांचें ॥६॥ त्वंपद तत्पद असिपदाचा रंग । त्याचा अंतरंग देखा बाईयांनो ॥७॥ निवृत्ति सोपान मुक्ताबाईची खुण । ज्ञानदेव सघन बोलीली हे ॥८॥

८०८. **उन्मनी संयोगें गोसावी विराजे** । चहू देहांचें ओझें निवारोनी॥१॥सोहंमस्मीचे छंदें परिपूर्ण । विज्ञान हे खुण जेथें नाहीं ॥२॥ चंद्रसूर्याहुनी तेज तें आगळें । अव्यक्तें व्यापिलें अनुभवें॥३॥ अनुभवाची खुण गुरुगम्य जाणती । ज्ञानदेवें विनंति हेचि केली॥४॥

८०९. **नयनाचें अंजन मनाचें रंजन** । ठसा हा सघन बाईयांनो ॥१॥ ॐकार अक्षर अक्षरीं हारपे । अनुभवाच्या मापें मोजुं बापा ॥२॥ बिंदुचें जें मूळ प्रणवाचें फळ । योगियाचे खेळ तेच ठायीं ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे निवृत्तिप्रसादें । स्वरूपाच्या विनोदें बोलिलें हें ४

८१०. **गगनमंडळीं नारी सुकुमार दिसे** । तिन्ही लोक वसे तिचे उदरीं ॥१॥ परादी वाचा तन्मय ते झाली । साक्षीत्वासी आली ब्रह्मरंध्रीं ॥२॥ ज्ञानदेव म्हणे नयनांतील ज्योती । पाहातां वृत्ति हरे विषयांची ॥३॥

८११. **वर मुळें शेंडा खालीं दिसे बानो** । प्रपंचीं रानोरान वृक्ष बारे ॥१॥ त्रिगुणाच्या शाखा उपशाखा बहुत । नाना याती येत पत्रें ज्यास ॥२॥ पक्व फळ अहं सोहं गोडी त्याची । सेवितां जीवाची आस पुरे ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे वृक्ष परिपूर्ण झाला । बीज रूढला जाणीवेचा ॥४॥

८१२. **धांवत धांवत आलों नयनांजनीं** । प्रकाश दिनमणी उणा वाटे ॥१॥ निशी दिवस दोन्ही नाहीं जेथ बारे । अर्धमात्रेवरी लक्ष ठेवीं ॥२॥ अक्षय अक्षर क्षरविरहीत साजे । ज्ञानाचें जें ओझें चालेचीना ॥३॥ ज्ञानदेव चक्षु झाला परेवरी । यापरती बरोबरी नाहीं बापा ॥४॥

८१३. **अंजनाचें अंजन सदोदीत पाहिलें** । पाहाणें होऊनी ठेलें सर्वांठायीं ॥१॥ आतां बोलाबोली नको वा आणिक । बिंदु ती निःशंक ब्रह्म रया ॥२॥ अनुहात उन्मनी ह्मणोनी व्यर्थ काय । मुखीं धरीं सोय ब्रह्मरंध्रीं ॥३॥ ज्ञानदेव म्हणे न बोलें आणिक । डोळीयांची वाल पाहतांची ॥४॥

८१४. **अकार उकार मकार ओंकार** । प्रणव हा साकार सुरेख रे ॥१॥ मसुरामात्र सार योगी ध्याती देहीं । निरंजन पाहीं ब्रम्ह तेंची ॥२॥ ज्ञानदेव म्हणे देह झालें देव । प्रणवची शिवअनुभवें ३

८१५. **पाणियाचें मोतीं ज्योती वसे जेथ** । महाकारण सायंत पाहा तुम्हीं ॥१॥ जागृति स्वप्न सुषुप्ति जेथें उद्भव तीचा । योगी राम ज्याचा अधिकारी ॥२॥ गोल्हाटाचे मुळीं ज्ञानदेव बैसला । सहस्रदळीं शोभला काळा बाई ॥३॥

८१६. **सकार हकारीं नाडी दिसती कैशा**। उलटल्या दशदिशा अमूपची ॥१॥ सूक्ष्म मूळ सर्व बीजाचा उद्भव । हाची अनुभव देहामध्यें ॥२॥ समान जैसा अर्क स्थिरचर एकला । आत्मा हा संचरला तैशा परी ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे याहूनि आणिक । बोलाचें कवतुक जेथ नाहीं ॥४॥

८१७. **दिव्यरूप चक्षु कैशापरी झाला** । ठसा हा उमटला क-वण्यापरी ॥१॥ चहूं देहांचा वर्ण अवर्ण देखिलें । विश्व ग्यां पाहिलें तयामध्यें ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे सर्वांचें जें मूळ । सत्रावी केवळ शुद्धरूप ॥३॥

८१८. **काळा पुरुष तो हा गगनांत जो नांदे** । अनुभवाच्या भेदें भेदला जो ॥१॥ भेदून अभेद अभेदूनी भेद । सच्चिदानंद जेथ

नाहीं ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे तेथें अक्षय राहिला । आत्मा म्यां पाहिला या दृष्टिसी ॥३॥

८१९. **विश्व ब्रह्म भासे ऐक्य येतां देहीं** । अनुहातीं पाहीं अपार नाद ॥१॥ देखिला परी संयोगें व्यापला । विश्व तरीच झाला बाई-यांनो ॥२॥ पिंड ब्रह्मांडाचा विस्तार विस्तारला । माझा मीच झाला कोणपरी ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे या अर्थाची सोय । धरी माझी माय मुक्ताबाई ॥४॥.

८२०. **गुजगुजीत रूप सांवळें सगुण** । अनुभवितां मन वेडें होय ॥१॥ भ्रमर गुंफा ब्रह्मरंध्र तें सुरेख । पहातां कवतुक त्रैलोकीं ॥२॥ आनंद स्वरूप प्रसिद्ध देखिलें । निजरूप संचलें सर्वा ठायीं ॥३॥ ज्ञानदेव म्हणे या सुखाची गोडी । अनुभवाची आवडी सेवीं रया ॥४॥

८२१. **सहस्त्र दळ बिंदु त्यांत तेज दिसे** । तें हो काय ऐसें सांगा मज ॥१॥ जेथ नाम रूप वर्ण नाहीं बारे । तें हें रूप बारे चैतन्य बा ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे अनुभवाची खुण । जाणे तो सुजाण अनुभाविया ॥३॥

८२२. **कोणाचें हें रूप देह हा कोणाचा** । आत्माराम साचा सर्व जाणे ॥१॥ मी तूं हा विचार विवेकें शोधावा । गोविंद हा घ्यावा याच देहीं ॥२॥ ध्येय ध्याता ध्यान त्रिपुटीं वेगळा । सह-स्त्रदळीं उगवला सूर्य जैसा ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे नयनांतील रूप । या नांव चित्पद तुम्हीं जाणा ॥४॥

८२३. **डोळियांत डोळा काळियांत काळा** । देखण्या निराळा निळारूप ॥१॥ ब्रह्म तत्व जाणे ज्योतिरूपें सगळा । ज्योतीही वेगळा ज्योती वसे ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे देवा ऐसी ज्योती । अर्धमात्रा उत्पत्ति सर्वा जीवां ॥३॥

८२४. **सद्गुरु निवृत्ति दिसतो घनदाट** । सुषुम्नीचा घांट वेध-तांची ॥१॥ आत्मा माया शिव शक्तीचें हें रूप । दिसतें चिद्रुप अवि-नाश ॥२॥ ज्ञानदेव चढे ऐसी वाट देख । आकाशीं असे मुख तिचें कैसें ॥३॥

८२५. **परेचे शिखरावरी वस्ती माझी झाली** । समरसें विराली मज माझी ॥१॥ आत्मदशे योगी लक्ष लाविती देहीं । ब्रह्मरंध्र पाहीं सत्पद तें ॥२॥ अणुरेणु शून्य गगना तेजें दिसे । निरंतर वसे निरंतर ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे वृत्ति सहस्रदळीं लावा । मसुरा मात्र बरवा ध्यायी जाई ॥४॥

८२६. **नासिकाचा प्राण कोणी मार्गीं येत** । नाद दुमदुमित अनुहातीं ॥१॥ इंडे पिंगळेचा ओघ सैरा दिसतसे । त्यावरी प्रकाशे आत्म तेज ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे अष्टांग योगियां । साधितो उपाया याची मागें ॥३॥

८२७. **प्रणवाचे भेद उकलावे देहांत** । चंद्राची मी मात सांगतसे॥१॥ सहस्र दळावरी तेज शुद्ध असे । त्या तेजें प्रकाशें चंद्र बापा ॥२॥ उन्मनीचे ध्यासें सहस्रदळ गाजे । पश्चिम मार्गीं बीजें दोन असती ॥३॥ लक्ष लावी ज्ञानदेव एकलाची । शुद्ध ज्योति तोची जाणे एक ॥४॥

८२८. **मन हें लावा हें सालयीं निरुतें** । सहस्रदळा वरुतें परे जवळी ॥१॥ अनुहात नाद ब्रह्मस्थानीं असे । तेथें रूप कैसें सांगा मज ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे तें स्वरूप जो जाणे । त्यासी शरण होणें अनन्य भावें ॥३॥

८२९. **महावाक्यार्थ तें शून्य कैसें बापा** । सत्वर नयनीं पहा आत्मप्रभा ॥१॥ प्रभा शीत उष्ण दोहींचेंही सार । प्रणव हा सारासार आरुता रया ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे सोपानातें ऐसें । निराकार असे आकारेसी ॥३॥

८३०. **दशमद्वार अग्र शून्य सूक्ष्म गगनीं** । जेथ असे उन्मनी अखिल रूपें ॥१॥ द्विविध भाग पिंडीं द्विविध ब्रह्मांडीं । या तीं पडिपाडीं ब्रह्मरंध्रीं ॥२॥ ज्ञानदेव म्हणे शून्यांतील रूप । अनंत ब्रह्मांडें जेथ आहाती ॥३॥

८३१. **जडांतील शुद्धांश कौतुकें रिझाला** । निवृत्तीनें दाविला कृपा करूनी ॥१॥ अनुहात भेद दाविला कृपेनें । सर्व हें चैतन्य गमलें तेव्हां ॥२॥ ज्ञानदेव नयनीं निवृत्तीचे पदीं । आनंद ब्रह्मपदीं एक झाला ॥३॥

८३२. **नवा आंत ओवरी औट पिठा जवळी ।** शून्यातीत काळीं सकुमार ॥१॥ अंगुष्ठ पर्वार्ध मसुरा मात्र दीर्घ । उन्मनीचा मार्ग तेच ठायीं ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे पर्वार्धातील नीर । सर्व हें साचार विश्व दिसे ॥३॥

८३३. **भ्रुवामध्यें तेज चंद्रसूर्यविरहित ।** आदी मध्य अंत संचलेंसे ॥१॥ तुर्यारुपें ते सुषुम्ना प्रकाशली । नवविध अमृतजळीं तया तेजा ॥ २ ॥ ज्ञानदेव वदे अष्टांग योग साध । पावाल ब्रह्मपद याचा भेद ॥३॥

८३४. **पश्चिम मार्गीं खूण बीजें दोन साजिरीं ।** अविनाश ओवरी योगीयांची ॥१॥ त्रिकुट श्रीहाट चंद्रसूर्य जाणा । पश्चिम मार्गीं खूण याची कीं रे ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे बीजें दोन बापा । पाहें आत्मरूपा तेथ बा रे ॥३॥

८३५. **इडा वाम दक्षिणे पिंगला ।** दोहींत या कळा ब्रह्मस्थानीं ॥१॥ प्रणव सैरा बापा धांवे अवघड वाटे । रीघा नवपाटे जीव जीवना ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे हाची कीं रे प्रणव । यापरता अनुभव नाहीं नाहीं ॥३॥

८३६. **प्रणवासी रूप नाहीं कांहीं छाया ।** दशवे द्वारीं मूळमाया असे कीं रे ॥१॥ सहस्रदळीं वृत्ति लावितां निःशंक । मनासी भवासी ऐक्यता तेथें ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे या परतें नाहीं । बोलण्याची सोयी अनुभवी जाणे ॥३॥

८३७. **प्रणवच देह देह हा प्रणव ।** कल्पनेचा भाव कल्पूं नये ॥१॥ अंजनाचें सार तेंच देह बारे । आत्मा परिपूर्ण सारे पाहाती ज्ञानी ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे प्रणव माझा पिता । अक्षर तेच माता याच भेदें ॥३॥

८३८ **पश्चिममार्ग बापा प्रणव कीं हे सांग ।** जेथें असे महालिंग तेजोमय ॥१॥ चंद्रांतील जळ ते सत्रावी केवळ । नादबिंदा कल्होळ गर्भीं झाला ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे देह हा दुर्लभ । त्रैलोकीं सुलभ भजनाचा हा ॥३॥

८३९. **प्रणवाचें आकाश असे सर्वांवरी ।** आकाशीं भरोवरी

प्रणवाची ॥१॥ प्रणव जें गुह्य ऋषि योगीयांचें । सर्वावरिष्ठा साचें वेद आज्ञा ॥२॥ एका वेदांत सिद्धांती प्रणव तो तत्वता । ज्ञानदेव वक्ता सांगतसे ॥३॥

८४०. **प्रणवाचें रूप कोणें देहें देखिलें** । निवृत्तीनें दाखविलें याच देहीं ॥१॥ सकार हकार तूर्या उन्मनी भेद । अभेदुनी भेद केलें मज ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे प्रणवाची खोली । अक्षरांची बोली देह सार ॥३॥

८४१. **अमृताची क्षीर ब्रह्मांडभुवनीं** । पाहाती त्रिभुवनीं नवल झालें ॥१॥ नाद बिंबा भेटी झाली कवण्या रीती । शुद्ध ब्रह्म ज्योती संचलीसे ॥२॥ प्रकृति पुरुष शिव शक्ती भेद । त्याचे शरीरीं द्वंद्व देह जाणा ॥३॥ ज्ञानदेव म्हणे पिंडीं शोध घ्यावा । ब्रह्मांडीं पाहावा ब्रह्म ठसा ॥४॥

८४२. **प्रणवाची शक्ति शिव प्रणवची** । क्षर अक्षर साची प्रणव ते ॥१॥ त्रिकूट श्रीहाट गोल्हाट ब्रह्मरंध्र । प्रणव निरंतर ऐक्य झाला ॥२॥ ज्ञानदेव आपण प्रणव झाला आर्थी । ध्याता ब्रह्मपदीं प्रणवची ॥३॥

८४३. **स्थावर जंगम प्रणव प्रसवला** । आत्मा स्वयें संचला प्रणवा ठायीं ॥१॥ अवस्था भुक्ती मुक्ती प्रणवची जन्मता । अर्ध-मातृके परता प्रणवची ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे प्रणवाचे ठायीं । प्रणवीं प्रणव पाहीं निराळा तो ॥३॥

८४४. **शिवशक्तीचा भेद अर्धनारी पुरुष** । याचा हा सौरस आणा चित्ता ॥१॥ जागृति स्थूल तूर्या महाकारण । हेचि कीर खुण तुझे ठायीं ॥२॥ ज्ञानदेव म्हणे कैसें हें जाणिजे । देहीं नाद गाजे परेवरी ॥३॥

८४५. **निळावर्ण ब्रह्मरंध्र येक निकें** । पहा माझे सखे भाविक हो ॥१॥ उन्मनि सदैव वसे अक्षय पंथें । लाउनियां चित्तें तया ठायीं ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे यापरती खूण । नाहीं ऐसी आण वाहातसें ॥३॥

८४६. **आकाश हें असे माझें शिर बापा** । कर्ण दिशा चिद्रुपा नाद उठती ॥१॥ आधारापासूनी सहस्रदळावरी । निःशब्द निरंतरी

नारीं एक ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे अनुभव ऐसा जेथें । तोचि जीवन्मुक्त संत योगी ॥३॥

८४७. **अग्नीचे पोटीं पुरुष उद्भवला अवचट** । सत्रावी लंपट निशिदिनीं ॥१॥ आधार नाहीं जेथ निराधार वर्तती । निराधार न ह्मणती आपणा लागीं ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे निवृत्तीनें दाविलें । या नयनीं पाहिलें अविनाश ॥३॥

८४८. **सत्रावीचे गांवीं शून्याचा विस्तार** । प्रणव निराकार सदैव असे ॥१॥ पश्चिम पूर्व असे शुक्ल कृष्ण नारी । दैवी आणि आसुरी वेगें शोधा ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे अर्धमात्रा कोणती । मसुरा मात्रा आहे ती दोन्ही भाव ॥३॥

८४९. **सहस्रदळ साजिरें नयनाचे शेजारीं** । अर्ध मातृका अंतरीं चिन्मय वस्तू ॥१॥ ॐकार नादीं कीं नाद ॐकारीं । दैवीं निरंतर प्रणवीं पहा ॥२॥ मकार अर्धमात्रा शून्यांचा निश्चय । आत्मा एक असे स्वयें रया ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे कैवल्याचा दाता । कोण पत्री हे कविता नाहीं ऐसी ॥४॥

८५०. **स्थूलदेह सूक्ष्म कारण तिसरा देह** । चौथा महाकारण देह एक बापा ॥१॥ औट पीठाचे दरीं कर्पूर वर्णावरी । शामाचे अंतरीं महाकारण ॥२॥ महाकारणीं आतुला लक्षाचा पुतळा । उन्मनी हे कळा दैवी वरी ॥३॥ सहस्रदळ तेंच कीं आन नाहीं ऐसें । महा तेज वसे ज्याचे आंत ॥४॥ पश्चिम मार्ग तेथुनी उर्ध्व उंच गगनी । जेथें एक कामिनी एकलीच ॥५॥ मार्ग नाहीं तेथें कोणे रीती जावें । सुषुम्नेवरी वळघावें सामर्थेसी ॥६॥ तेथूनी उर्ध्व छिद्र मुंगी नेत्रातुल्य । त्यांतून उडणें भले चपलत्वेंसी ॥७॥ जडतां वळंघितां बरी नारी आपण एक । नरनारी नपुंसक एक रूप ॥८॥ ज्ञानदेव ह्मणे जो उडुनी जाय तेथ । परब्रह्मींची मात तोचि जाणे ॥९॥

८५१. **सहस्रदळ ब्रह्मरंध्र एके नेत्रीं देखे** । देखणा पारखे ते ठायीं बा ॥१॥ नादीं नाद भेद भेदुनी अभेद । पश्चिम मार्गीं आनंद देखुनी राहे ॥२॥ मन पवन निगम आगम सुरेख । आधार सहस्र-

दळ देख देहीं नयनीं ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे डोळां हा प्रणव। निवृत्तीनें अनुभव मज दिधला ॥४॥

८५२. **सगुण देह बापा निर्गुण माझें शीर** । हा तो भेदाकार कैशापरी ॥१॥ दैवी असुरी पूर्व पश्चिम मार्ग किरे । शून्यांतील सारें चराचर हें ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे भेद ऐक गुरुपुत्रा । नयनीं अर्धमात्रा सर्व जन ॥३॥

८५३. **अनुहत ध्वनी वरि चंद्रमा वर्तुळ**। तेजाचे उमाळे अनंत तेथें ॥१॥ ब्रह्मशिखरीं निराळया मार्गावरी । अविनाश कर्णकुमरी एकलीच ॥२॥ तेथूनी महाद्वार उन्मनीचे वार्ता । त्यावरी चढतां रीग नसे ॥३॥ अणुचें जें अग्र ऐसा तेथ मार्ग । औटपीठीं सवेग जावें वरी ॥४॥ पंचदेव तेथें एकरूपा देखती । औटपीठीं वसती आरुते तेही ॥५॥ तयाचेही वर रश्मिअग्रामधुनी । शुद्ध ब्रह्म निर्वाणी असे तेथ ॥६॥ ज्ञानदेव ह्मणे ब्रह्मांडींचा अंत । नाहीं ऐसी मात बोलतसे ॥७॥

८५४. **आत्माराम देखे सहस्र दळावरी**। उन्मनी हे पाही आरुते तेही ॥१॥ चक्षुचे अंतरीं चक्षु देखे पूर्ण । हेचि कीरे खुण तुझे ठायीं ॥२॥ मी ब्रह्म सोहं ज्ञानपद तें साजिरें । ते ठायीं निर्धारें तुझा तूंची ॥३॥ बाप रखुमादेवीवरा तुझा तूं आपण । सर्व हें चैतन्य तुझे ठायीं ॥४॥

८५५. **औटपीठातळीं तेज गुजगुजीत** । चारी देह तेथ साक्ष पाहा ॥१॥ अवस्था हे चारी संयोगचि एक । शून्य जें निःशंक आत्मज्योती ॥२॥ ज्ञानदेवा बाई निवृत्ति वदविता । त्याचे चरणीं हीताहीत झालें ॥३॥

८५६. **शून्याचें भुवनीं स्वरूप अविनाश** । प्रणवीं पुरुष दिसतसे ॥१॥ निळा रंग देखें सर्वांचें देखणीं। चैतन्य भुवनीं समरस॥२॥ ज्ञानदेवा ध्यान सच्चिदानंदाचें । सर्व ब्रह्म साचे येणें येथें ॥३॥

८५७ **सत्व रज तम शुद्ध सत्व चौथा** । निर्गुणी गुणापरता बाईयानो ॥१॥ स्थूळ देह सूक्ष्म कारणाचे वरी । महाकारण सरी चौथा देह ॥२॥ कैवल्य देह तो ज्ञानदेवें पाहिला । पहाणें होऊनी ठेला चराचरीं ॥३॥

८५८. **आत्मा पूर्णपणीं लक्ष सोहं स्मरणीं ।** लक्षासी उन्मनीं आणा बारे ॥१॥ नरदेहाचें सार्थक सद्गुरुचरणीं । महाकारणासरी चौथा देह॥२॥ज्ञानदेव ह्मणे सद्गुरुकृपेचें। नित्यानित्य कृपें शोध करा ३

८५९. **स्वरूपाचें ध्यानीं निरंजन पाहिलें ।** डोळ्यानें दाविलें चराचर ॥१॥ आतां माझें नयन नयनीं रिघों पाहे । नयना नयनीं राहे नयनची ॥२॥ ज्ञानदेवा नयन निवृत्तिनें दाविला । सर्वां ठायीं झाला डोळा एक ॥३॥

८६०. **नयनांतील रूप जो हें देखे पुरुष ।** त्याचे चरणीं वास असे माझा ॥१॥ नयनांतील ज्योती देखे गुह्यभावें त्याचें स्वरूप भावें वंदावें गा ॥२॥ ज्ञानदेव म्हणे नयनांतील शून्य । देखे तोचि धन्य भाग्यवंत ॥३॥

८६१. **डोळा माझा बाप त्रिभुवना परता ।** जो देखे मुक्तता तोचि लाहे ॥१॥ जीव जंतु कृमी मुंगी नेत्रामध्यें । वास्तव्य गोविंदें केलें पाहा ॥२॥ ज्ञानदेवाचे बोल उघड निर्मळ । जान्हवीचें जळ स्थिर वाहे ॥३॥

८६२. **नयनाचे आंगणीं तुर्येचा प्रकाश ।** उन्मनी उल्हास तयावरी ॥१॥ श्वेत शाम कळा प्रकाश आगळा । स्वयंज्योति बाळा लक्ष लावीं ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे कैसे हे नयन । चैतन्याची शून्य आन नाहीं ॥३॥

८६३. **रक्तवर्ण स्थूळ श्वेत हे सूक्ष्म ।** कारण तें श्याम ऐसें देखा ॥१॥ निळावर्ण देह महाकारण साजिरा । ज्योतीचा मोहरा अलक्ष लक्ष्मी ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे सर्व हें चैतन्य । मन हेंचि धन्य धन्याचेनी ॥३॥

८६४. **औट पिठावरी निरंतर देश ।** तेथ मी जगदीश असे बाई ॥१॥ त्रिकुटाचा फेरा टाकिला माघारां । अर्धमात्रेवरा वरी गेलों ॥२॥ अर्धनारी पुरुष एकरूप दिसे । तेंची ब्रह्म ऐसें जाण बाई ॥३॥ ज्ञानदेवी शून्य नयनीं देखिलें । सर्वत्रीं संचलें शून्य एक ॥४॥

८६५. **ब्रह्मज्ञानी पुरुष तोचि ओळखावा ।** नयनांजनीं पाहावा ब्रह्म ठसा॥१॥ देखतसे देहीं द्वैत भेदातीत । तोची धन्य संत माझे

मनीं ॥२॥ त्याचे चरणोदकीं जान्हवी पवित्र । सहस्रदळावर लक्ष ज्याचें ॥३॥ ज्ञानदेव म्हणे ऐशा योगीयाला । देखतां तयाला नमन माझें ॥४॥

८६६. **निशी दिवस दोघे लोपले ते ठायीं** । निरंजन ते ठायीं लक्षुनी पाहा ॥१॥ रवी शशी ज्याचे तेजें प्रकाशले । नवल म्यां देखिलें एक तेथें ॥२॥ नारी पुरुष दोघे एक रूपें दिसती । देखणें पारुखे तया ठायीं ॥३॥ ज्ञानदेव म्हणे शिव तेचि शक्ती । पाहातां व्यक्तीं व्यक्त नाहीं ॥४॥

८६७. **चैतन्य हें दिसे उघडेया डोळां** । नयनाचा सोहळा निवृत्ति जाणे ॥१॥ मसुरांतील सूक्ष्म अनुभवें दिसे । तेथ तेज असे कवण्या रीती ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे ऐसें तेथ तेज । असे गुजगुजीत निर्मळ तें ॥३॥

८६८. **आकाशाचे ठायीं चंद्र सूर्य तारा** । सूक्ष्माचा फेरा सर्वां ठायीं ॥१॥ बिंदुस्थान तेथें ब्रह्मरंध्र ज्योती । तेथ योगी वसती दिवस रात्र ॥२॥ ज्ञानदेव म्हणे सर्वंची हें शून्य । वस्तु परीपूर्ण सर्वांठायीं ॥३॥

८६९. **अखंड तमासा डोळां देख निका** । काळा निळा पारवा बाईयांनो ॥१॥ सदोदित नयनीं नयन हारपे । निळयाचें स्वरूपें मनीं वसो ॥२॥ अकरा वेगळें नाहीं बा आणिक । माझे नेत्रीं देख शुद्ध ज्योती ॥३॥ ज्ञानोबाची वाणी पूर्ण रूपी घ्यावी । देहींच पाहावी आत्मज्योती ॥४॥

८७०. **शून्याचा उद्भव सांगतों या बोला** । औटपिठीं वहिला सूक्ष्म मार्ग ॥१॥ मनपुराचे वरी द्वादश आंगुळें । तयावरी गेले अव्हाटेनें ॥२॥ आतां तया सदनीं उफराटे मार्गें । वळंघिता सवेग पश्चिम पंथीं ॥३॥ पश्चिमपंथीं नाडी घोष वाहे जीचा । तेथून ध्वनीचा विस्तार गा ॥४॥ ध्वनीचेही वरी शुद्ध तेज असे । चंद्रमा प्रकाशे तेच ठायीं ॥५॥ चंद्राचे वरी एक निराळाच मध्य । त्रियेचें निजबोधें निजरूप ॥६॥ निखिल जें तेज ज्याचेनी अमृत । जीववी देहींत देह दैव ॥७॥ औटपिठातळीं सर्व तें दीसे । सूर्य हा प्रकाशे

तेच ठायीं ॥८॥ ज्ञानदेव ह्मणे मज त्रिकूटाची गोडी । धरितां आवडी ब्रह्म लाभे ॥९॥

८७१. **आतां औठपिठींचा मार्ग एक बाई** । निशिदिनीं पाहीं शोध करा ॥१॥ औटहाट प्रमाण सत्य कीं हें जाण । त्यांतील जें स्थान ऐकें एक ॥२॥ महालिंग स्थान टाळू एके संधीं । तेथें एक सिद्धि तेजोमय ॥३॥ मार्ग तेथ परतले दोहीं भागीं । पश्चिमीं माहालिंगीं मार्ग ऐसा ॥४॥ सत्रावीचे शिखरीं मार्ग एक गेला । तो म्यां देखियेला याच देहीं ॥५॥ महालिंगीं मार्ग अंत नाहीं ज्याचा । शोध करितां वाचा कुंठीतची ॥६॥ ज्ञानदेव ह्मणे हा विचार पाहा । जाणता दाविता विरळा एक ॥७॥

८७२. **आकाशाचे अंतीं प्रणवाचें गुज** । निरंजन बीज साधुं पाहती ॥१॥ सद्रूप चिद्रूप अद्वय एके कळा । संसारीं वाहिला निर्विकार ॥२॥ प्रणवीं बीज अणुरेणु आंत । दशमद्वाराची मात अपूर्व बा रे ॥३॥ बापरखुमादेवी प्रणव निखिल । शब्दाचें पाल्हाळ प्रणवीं रीघे ॥४॥

८७३. **आत्माराम नयनीं निरखुनी देखिला** । निळा रंग ओतिला आदी अंतीं ॥१॥ गोल्हाट त्रिकूट ब्रह्मरंध्रीं वस्तु । तुर्येची ऐसी मातु याच ज्ञानें ॥२॥ ज्ञानदेव ह्मणे सर्वा अंतरीं तूर्या । निवृत्ती योगी वेगीं गुज बोले ॥३॥

८७४. **तूर्येमध्यें माझा अखंड रहिवास** । निवृत्ति ह्मणे अविनाश तूर्या करी ॥१॥ स्थुळदेह निमतां सूक्ष्म उरतां । कारणीं हारपतां कैसें झालें ॥२ ज्ञानदेव म्हणे महाकारणीं नांदे । निवृत्तीनें आनंदें दाखाविलें तें ॥३॥

८७५. **शास्त्रार्थाची वाणी निरंजनीं दिसे** । औटपिठीं वसे निर्विकार ॥१॥ अहं सोहं मग ॐकाराचे देठीं । अहंतेचे शेवटीं सोहं वस्तु ॥२॥ सोहं वस्तू निळी अहं गेलीया । आनंद झालीया महाकारणीं ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे निवृत्तीची आण । या वेगळी खुण आणिक नाहीं ॥४॥

८७६. **मीच माझा डोळा मीच शुन्यांत निळा** । माझा मी

वेगळा तयामध्यें ॥१॥ उफराटी दृष्टी लावितां नयनीं । ते दृष्टीची वाणी किंचित् ऐका ॥२॥ उफराटी दृष्टि देखे उन्मनीवरी । तेव्हां निर्विकारी मीच मग ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे देहा डोळा दिठी । पाहातां सर्व सृष्टि निवृत्ती एका ॥४॥

८७७. **सत्व रज तम त्रिगुण तें ब्रह्म** । अर्धमात्रा निःसीम ॐ-कार हा ॥१॥ सहज हा प्रणव सर्वातीत साजे । मीपणास तेथ ठाव नाहीं ॥२॥ अक्षर कूटस्थ सर्वातीत असे । अक्षर अविनाश ऐसें जाणा ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे सर्वांचे शेवटीं । अविनाश दृष्टी असे कीं रे ४

८७८. **तूर्या तें महाकारण नाहीं नाहीं जेथें** । दर्शनाचे मतें माझा मीच ॥१॥ गोल्हाट त्रिकूट श्रीहाटातीत । महाकारणाची मात जेथ नाहीं ॥२॥ क्षर अक्षर अनाक्षर नाहीं । कूटस्थ सर्वही प्रसवला ॥३॥ ज्ञानदेव म्हणे ऐसें हें पाहातां । निवृत्तीनें तत्वता कथनी केली ॥४॥

८७९. **सुनीळ जें ब्रह्म बिंब सत्रावीचें** । विश्वरूप चैतन्य महा-कारणीं ॥१॥ ब्रह्मज्योतीचिये प्रकाशें करुनी । देखे त्रिभुवनीं एक वस्तु ॥२॥ ज्ञानदेव म्हणे ज्योतीची जे ज्योती । ब्रह्मरंध्रीं वस्ती परमात्मयाची ॥३॥

८८०. **महा तेजा आंत बिंदु कोणे परी** । उष्ण तेजा माझारीं साक्ष पाहा ॥१॥ कुंडलनी ऊर्ध्वमुखें अग्नी सोडी । तयाची हे जोडी संत जना ॥२॥ ज्ञानेश्वर ह्मणे आत्मा यातें जाणे । सुनिळ अनुभ-वणें निवृत्ती पाहा ॥३॥

८८१. **ऐका हा शेवट अभंगमाला झाली** । तूर्या हेच आली प्रत्यया गा ॥१॥ तूर्या तेचि उन्मनी क्षर तें अक्षर । निर्गुण साकार ऐसें देखा ॥२॥ देह तें विदेह महाकारण ब्रह्म । हें निश्चयाचें वर्म ऐसें जाणा ॥३॥ अभंगा शेवट जाणे निवृत्ति एक । त्यानें मज देख कृपा केली ॥४॥ मूर्खासी हा बोध सांगों नये बापा । अभंग कृ-त्याचा लेश नसो हातीं ॥५॥ ज्ञानदेव ह्मणे हें कृत्य हातां नये । माय देऊं नये कोणासही ॥६॥

## अद्वैत.

८८२. **तैंचि ज्ञानियासीं होईजेल मोक्ष** । ज्ञानेश्वर लक्ष लक्षितसे ॥१॥ पहाण्याशी मूळ विचारूनि पहा । मग सुखी रहा निरंजनीं ॥२॥ इवलुसा प्रपंच परि तो बद्ध कीं । सज्ञानी विवेकी न शिवती ॥३॥ पयाचिये कुंभीं पडे बिंदुविष चतुर तयास न घेपति ॥४॥ षड्रस पक्वानें वाढिलीं खापरीं । श्वान शिवे श्रोत्री स्पर्शीतीना ॥५॥ घालुनियां कडें शून्याशीं बांधितां । त्याचिया गणिता न करवे॥६॥सर्वही उपाधि त्यागुनि आकार । राहे ज्ञानेश्वर निजरूपीं॥७॥

८८३. **तेंचि ब्रह्मरूप जाणिजे निश्चळ** । शुद्ध तें निर्मळ मनाहुनी ॥१॥ स्थुळ दृष्टी करूनी जयाशी लाक्षितां । न दिसे तत्वता भास कांहीं ॥२॥ सहज निवृत्ती दास तो उदास । अनुभव सौरस सांगितला ॥३॥

८८४. **मन हें अवघें परब्रह्मीं** । क्रियाकर्मधर्मी अलिप्त तें ॥१॥ देह जावो राहो संबंधचि नाहीं । नामरूप कांहीं न दिसे मज ॥२॥ प्राचिनानें वर्तो जाणो या शरीरीं । जैसा वेठीं करी राबताहे ॥३॥ निर्विकल्प स्थिति हेतु नाहीं आथी । अज्ञानाची बुंथी काढियली ॥४॥ ह्मणे ज्ञानेश्वर उरी नाहीं आन । जाहालों तल्लीन निजरूपीं ॥५॥

८८५. **सगुणीं निर्गुण निर्गुणीं सगुण** । दोन्ही भिन्नपण नसे मुळीं ॥१॥ हेम अलंकार अलंकारीं हेम । मृन्मयेचि धाम धाम तेंचि ॥२॥ किंचित् महत उपाधि कल्पित । मुळीं तें अंशीक एकमेव ॥३॥ इह तेंचि पर पिंड तें ब्रह्मांड । ब्रह्माचि अखंड ज्ञानदेव ॥४॥

८८६. **पिंडचि ब्रह्मांड ब्रह्मांडचि पिंड** । ब्रह्मचि अखंड ब्रह्मरूप ॥१॥ कांहीं भेद नाहीं किंचित् महत् । उपाधि कल्पित स्वाभाविक ॥२॥ अनुभव योगें दोन्हीं जाण सम । नाहींचि विषम अणुभरी ॥३॥ सहजचि सृष्टि जाणा हे घडली । सहजची गेली शेखीं आथी ॥४॥ एकमेव सर्व म्हणे ज्ञानेश्वर । नाहीं भिन्न कीर ओळखतां ॥५॥

८८७. **पाहातें पाहूं गेलों पाहणें विसरलों** । ब्रह्मानंदें धालों देवराया ॥१॥ माझें रूप आतां काय म्यां पाहावें । जांहलों अवघें विश्व मीचि ॥२॥ दुजें नाहीं नाहीं वाहतों तुझी .आण । चौदाही

भुवन एकरूप ॥३॥ तुझें माझें द्वैत तेंही उरलें नाहीं । मुळीं मी हें कांहीं नाठवेचि ॥४॥ एकांतीं एक वर्ते तोचि साक्षात्कार । जाहला ज्ञानेश्वर तेथें लीन ॥५॥

८८८. **जयाचिये ठायीं नाहीं मीतूंपण** । तेचि सनातन एकज्ञानी ॥१॥ धैर्याचें मंडप तेचि स्तंभ जाले । कोंभ जे निघाले परिणामा ॥२॥ क्षेत्रज्ञ सन्यास घेतला श्रीहरी । तेथुनियां दुरी नवजेचि ॥३॥ रायाचि संगती घडतां निमिष । तरी होती वश्य अष्टसिद्धी ॥४॥ धाले तेच पूर्ण कीर ब्रह्मानंदें । ज्ञानेश्वर बोधें बोधीयला ॥५॥

८८९. **अक्षरची ब्रह्म तेंचि तें क्षरलें** । काल्पनिक झालें अनेकत्व ॥१॥ जिवेश्वर खाणी तेथें उमटती । शेखीं तेथें जाती मिळोनियां ॥२॥ ब्रह्म अनुपम्य संवितेशी नये । अनुभव सोय तरी कळे ॥३॥ पाथराची टाकी जरी होय तीख । नये रंध्र शलाख मुक्तिकेशी ॥४॥ सर्वांहुनि पर ह्मणे ज्ञानेश्वर । ब्रह्मज्ञान कीर अगोचर ॥५॥

८९० **वासनेचें बीज भजोंनी टाकिलें** । मानसासी केलें देशधडी ॥१॥ संसाराशी आगी लाविली स्वकरीं । अहंतेशी दुरी दवडिलें ॥२॥ काम क्रोध लोभ मोह दंभ मद । केला याचा छेद ज्ञानशस्त्रें ॥३॥ विवेक वैराग्य बोध क्षमा शांती । राखिली संपत्ति दैविकीजे ॥४॥ राहे ज्ञानेश्वर एकाचि एकट । ब्रह्मरस घोट घोटुनियां ॥५॥

८९१. **मंत्र तंत्र यंत्र सर्वही अबद्ध** । जंव नाहीं शुद्ध अंतःकरण ॥१॥ गुरू शिष्यपण हेंही मायिकत्व । जंव निजतत्व न ओळखी ॥२॥ प्राप्त जरी झाली अष्टसिद्धी जाण । मागुती बंधन दृढ होय ॥३॥ आत्मरूपावीण साधन अन्यत्र । भ्रमासीच पात्र होईजे कीं ॥४॥ सर्व वृत्ति शून्य म्हणे तोचि धन्य । ज्ञानदेव मान्य सर्वस्वेशी ॥५॥

८९२. **नाथिलें अभाळ जेंवीं कां गगनीं** । माया मुळींहुनी तैशी जाहली ॥१॥ ब्रह्मादिक काळ व्याली हे ढिसाळ । आथी रजस्वला इयेपरी ॥२॥ विवर्तक जाली विस्तारिलें जग । नव्हे भिन्न भाग एकमेव ॥३॥ मायोपाधी तेचि जाहले सगुण । येर ते निर्गुण जैसे तैसे ॥४॥ तेंचि निरूपण तोचि सर्वेश्वर । म्हणे ज्ञानेश्वर राजयोगी ॥५॥

**८९३. ऐकरे सुमना बोधीन सुज्ञान** । मायिक बंधन तुटे जेणें ॥१॥ श्रीगुरूचे पाय हृदयीं शिवशी । टाकी प्रतिष्ठेशी जाणिवेचे ॥२॥ नित्यानित्य दोन्ही करींगा विचार । आहे मी हे कीर विचारिजे ॥३॥ जीव शिव भेद कासयाशी जाहले । वळखीं वहिले तिये स्थानीं ॥४॥ मुळीं तुझें रूप हेरें अनुभवणें । ज्ञानदेव ह्मणे ब्रह्म तूंचि ॥५॥

**८९४. जें जें पाहूं जाय सुमनें करूनि** । अदृश्य होऊनि तेंचि लपे ॥१॥ दुजेंचि न दिसे काय आतां करूं । कवणा विचारूं सुख गोष्टी ॥२॥ आपणा आपण विचारिजे आथी । जाहली विश्रांति मीपणाशीं ॥३॥ बाहेर भीतरीं एकमेव दिसे । अन्यथा हें नसे गुरूसाक्षी ॥४॥ ज्ञानेश्वर हे गिळुनियां नाम । ब्रह्मचि स्वयमेव सांठविलें ॥५॥

**८९५. जगामाजी श्रेष्ठ सांप्रदायी नाना** । कीर्ती ते भुवनामाजी फार ॥१॥ आम्ही एक दिन जाणा नाथ पंथीं । निचाहूनी अथी अती नीच ॥२॥ सर्वांचे चरण वंदितसों सदा । श्रेष्ठपण कदा कीरे नसे ॥३॥ नेणोंचि स्वरूप धर्माधर्म कांहीं । निवृत्तीच्या पायीं लीन जाहलों ॥४॥ नाठवेचि कांहीं अन्यथा साधन । ज्ञानेश्वर आन उरेचिना ॥५॥

**८९६. घटु जें जें होय आधींच गगन** । राहे पैं व्यापून वेगळेंचि ॥१॥ मायोपाधी सृष्टि जें जें कांहीं होत । चैतन्य व्यापित त्याची माजी ॥२॥ विवर्तते मी या तद्विवर्त जीव । सृष्टि कारणत्व भोग्यपर ॥३॥ भास चतुष्टयता दोन्ही आनादि । जाहली उपाधी मुळीहूनि ॥४॥ गुरूकृपायोगें ज्ञानदेव खुण । भेदुनि निर्वाण लीन झाला ५

**८९७. त्यागुनि कैलास सर्वही संपत्ति** । स्मशानांत वस्ती रुद्र करी ॥१॥ कासया कारणें ब्रह्म शोधावया । आलों कोठुनियां माझा मीचि ॥२॥ तयाशीही पूर्ण नकळेचि कांहीं । अद्यापि संदेहीं पडियले ॥३॥ हरी ब्रह्मा सूर्य येरा कोण लेखी । नाहींच ओळखी मूळरूपीं ४ ह्मणे ज्ञानदेव वस्तु परात्पर । गुरु कृपे कीर भेदिजेसु ५

**८९८. आत्मरूपीं नाहीं पाठी आणि पोट** । एकचि निघोट जाण-

रया ॥१॥ बाहीर भीतरीं एकचि ते एक । नसे आन देख भेद रया ॥२॥ ठेंगणें नावाड हळू ना ते जड । स्वयेंचि अखंड पूर्ण रया ॥३॥ जाणणें नेणणें दोन्ही तेथें नाहीं । आहे जैसें पाहीं तेंचि रया ॥४॥ सदोदीत शुद्ध ह्मणे ज्ञानेश्वर । नाहींच विकार कीर रया ॥५॥

८९९. **परेहुनिपर वैखरीहुनि दुरी ।** दुरीहुनि दुरी ब्रह्म आहे ॥१॥ केंवि तुज कळे सांग जीव रूपा । वृथा भ्रम बापा करितोसी ॥२॥ आकाशाचें फळ चित्रींच्या नराशी । केंवी प्राप्त त्यासी होईजेल ॥३॥ जेव्हां तूंचि ब्रह्म होउनि राहाशी । तेव्हां वळगशी सर्वगत ॥४॥ हेतु मातु भ्रांति हे तिन्ही गिळून । राहियला मौन ज्ञानदेव५॥

९००. **एकचि मीपणें नागविलें घर ।** ना तरी संसार ब्रह्मरूप ॥१॥ प्रवृत्ति निवृत्ती दोन्ही मुळीं नाहीं । कल्पनेनें पाहीं भ्रमताती ॥२॥ ते एक त्यागितां काय आहे वाणी । कैवल्याशी धनी तोचि होय ॥३॥ जन्म मृत्यु भोग भोगणें यालागीं । टाकोनियां संगी राहीं बापा ॥४॥ ह्मणे ज्ञानदेव मग होशी मुक्त । नव्हेचि आसक्त सर्वथैव ॥५॥

९०१. **भुलणें चालणें ईश्वराशी नाहीं ।** जैसा असे पाही तैसा असे ॥१॥ जरी भिन्नभेद तरी सर्वज्ञत्व । कासया समत्व नाम त्याशी ॥२॥ सूर्याशी प्रकाश सूर्यचि करीत । ईश्वर जाणत ईश्वराशी ॥३॥ आपुली पोकळी आकाशचि जाणे । ईश्वरचि लेणें जग लेई ॥४॥ सहज अभेद वस्तु अगोचर । म्हणे ज्ञानेश्वर तेंचि रूप ॥५॥

९०२. **कवणाची चाड आतां मज नाहीं ।** जडलों तुझ्या पायीं निश्चयेंची ॥१॥ देह जावो राहो नाहींच संदेहो । नकरी निग्रह कासयाचा ॥२॥ बहुत श्रमलों साधन करितां । विश्रांति तत्वता न होयचि ॥३॥ तुज वांचोनियां कवणां सांगावें । कवणां पुसावें अनुभवसुख ४ माता पिता सखा सर्वस्व तूं कीर । ह्मणे ज्ञानेश्वर निवृत्तीशी ५

९०३. **अज्ञाना स्वरूप निज विचारितां ।** संदेह तत्वता घालिताती ॥१॥ कैंचि गा विश्रांति दुर्जनाच्या संगीं । दाटोनियां भोगी नरक दुःख ॥२॥ विषयाकारणें जाहले गुरु शिष्य । अनुभव अभ्यास स्वप्नीं नाहीं ॥३॥ शब्दचि करूनि बोलताती ब्रह्म । अंतरींचें

वर्म नेणतीच ॥४॥ तयाची संगती त्यजी ज्ञानेश्वर। जाहला निर्विकार संतसंगें ॥५॥

९०४. **सेवितां वारुणी देहभास लपे**। बडबडची लपे शब्द नाना ॥१॥ ब्रह्मरस सुख जें कांहीं प्राशिती । तैसेचि हे होती अनुभवें ॥२॥ धाल्याचे ढेंकर निघती होतां सुख। तेवींचि आत्मिक जाणिजेसु ॥३॥ सूक्ष्मीं भासे जें का तेंचि स्थूळीं घडे। पाहतां निवाडें भेद नाहीं ॥४॥ गुरुकृपा योगें ज्ञानेश्वर चूळ। भरियेली समूळ न त्यागितां ॥५॥

९०५. **विक्षेपतां नाना उठती कल्पना**। पासुनियां जाणा शुद्ध व्हावें ॥१॥ तरीच तें ज्ञान हृदयीं ठसावें। नातरीं आघवें व्यर्थ होय ॥२॥ अमृताचें कुंभ सायासें जोडलें। त्यामाजी घातलें विष जैसें ॥३॥ मन हें विटाळ अखंड चंचळ। न राहे चपळ एके ठायीं ॥४॥ ज्ञानदेव ह्मणे गुरूकृपा होतां। लाहिजे तत्वता ब्रह्मसुख ॥५॥

९०६. **कर्मत्याग करितां पावे अधोगति**। भोगितांही मुक्ति पाविजेना ॥१॥ सांडणें मांडणें दोन्हीही त्यागणें । प्राचिनी वर्तणें निर्विकल्पें ॥२॥ सुख दुःख भोग या दोन्ही भोगितां। न धरिजे अहंता सर्वथैव ॥३॥ देह जीव शीव सर्वांसही साक्षी । ज्ञानदेव लक्षी परब्रह्म ॥४॥

९०७. **सिद्धांतींचें सार आत्मा सदोदित**। माया ते कल्पित तद्विवर्त ॥१॥ शीव पूर्ण भक्त जीव अविद्यक। होय पूर्ण चोख आत्मज्ञानें ॥२॥ प्रपंच कल्पिक प्रकृति उपाधी। ईश्वरत्व बुद्धि परमार्थी ॥३॥ ब्रह्म अगोचर ह्मणे ज्ञानेश्वर। नाथिला संसार मुळीं नाहीं४

९०८. **सुख तेथें दुःख दुःख तेथें सुख**। एकी ते अनेक अनेकी एक ॥१॥ देव तेथें भक्त भक्तापाशीं देव। जाणा एकमेव भेद नाहीं ॥२॥ तरू तळीं छाया छाया तेथें तरू। शिष्याठायीं गुरू गुरू शिष्य ॥३॥ कण तेचि भूमी भूमीरूपी कण। भासा ठायीं गुण गुणीं भास ॥४॥ गुरू कृपे खूण वस्तु साक्षात्कार। भेदला ज्ञानेश्वर निवृत्तीचा ५

९०९. **ब्रह्मा विष्णु रुद्र सृजन स्थिति अंत**। करिती महत् जगीं तिन्हीं ॥१॥ सत्त्व रज तम गुण धरुनियां। उपाधी आपुलिया

करिताती ॥२॥ सर्वेही मायिक दिसते रचना । आशा कल्पना इय-परी ॥३॥ दृश्यातीत पर ब्रम्ह परात्पर । ओळखी ज्ञानेश्वर गुरुकृपा४

९१०. **पौर्णिमेच्या दिनीं चंद्र अकळी जाहला** । आमावास्ये ठेला पूर्ण कळी ॥१॥ देखिलेंगे माय विचित्र विलक्षण । जाहलें स्वप्नभान जागृतीशी ॥२॥ मातेचिये पोटीं पिता जो जन्मला । नवलाव जाहला काय सांगो ॥३॥ मश्यकें ओलांडिला स्वयें मेरु-गिरी । दहनाच्या पाटारीं पीक जाहलें ॥४॥ चंचूच्या सांडशें पक्षी घेते पाणी । सिंधुर्शी गिळूनि बैसिन्नला । बाप रखुमादेविवर विठ्ठ-लचि जाणे । परब्रह्म अनुभवणें परब्रह्म ॥५॥

९११. **कळिकेमाजीं जोती समत्वासी आली** । तेचि सामावली दृष्टि ब्रह्मीं ॥१॥ सिंधुमाजी जैसें सैंधव मिळालें । तेंवीं मन झालें ब्रह्मीं लीन ॥२॥ वृक्ष बिजामाजीं जैसा सामावला । बिंदु का आ-टला महींत जेवीं ॥३॥ जीव तोच शिव होऊनियां ठेला । शब्द तो मुराला निशब्दांमाजी ॥४॥ आतां मी तूं कैंचा सर्व एकाकार । जाहला ज्ञानेश्वर स्वयं ब्रह्म ॥५॥

९१२. **पुण्याशी जोडितां पापाचि जोडिजे** । तेणेंचि पाविजे अधोगती ॥१॥ सोमयाग श्रेष्ठ करितां पावन । करावें हनन पशु तेथें ॥२॥ तेचि ते या दोष तयालागीं जन्म । भोगिजेती कर्म पशु योनी ॥३॥ पुण्य तेथें पाप समचि वर्तती । रात्रंदिन आथी जियेपरी ॥४॥ पापपुण्य दोन्ही त्यागुनि निराळा । जाहला स्वलीला ज्ञानदेव ॥५॥

९१३. **केवळ निराभास या जगीं जाहला** । नाहीं आन उरला भास कांहीं ॥१॥ संकल्प विकल्प असती मनाचे । छेदियले साचे भवभ्रम ॥२॥ वासनेचें मूळ टाकिलें खणोनि । जिवित्व गिळूनि शिवरूप ॥३॥ काम क्रोध लोभ दडले ते सहज । केले अति चोज सांगवेना ॥४॥ ज्ञानेश्वर नाम हेही गिळुनियां मुळ अंतीं मायातीत शुद्ध ॥५॥

९१४. **सरिता येऊनियां चढती ब्रह्मगिरी** । परी ज्ञानी न धरी जन्म कांहीं॥१॥चंदनासी होय बाभुळत्व प्राप्ति । परी ज्ञानी न शिवती जन्म कांहीं ॥ २॥ जळाला कापूर मागुता प्रकटे । परी ज्ञानिया न घडे

जन्म कांहीं ॥३॥ वारा वागुरेसी धरूनि कोंडु ये । परी ज्ञानी नसये जन्म कांहीं ॥४॥ ज्ञानी ज्ञानेश्वर मिळोनियां गेला । मरण्या जिण्या झाला वेगळाचि ॥५॥

९१५. **अग्नीच्या पाठारीं पिके जरी पिक** । तरी ज्ञानी सुखदुःख भोगीतील ॥१॥ काळोखामाजी जैसें शून्य हारपे । मायोपाधी लोपे तया ज्ञानी ॥२॥ नक्षत्राच्या तेजें जरी इंदु पळे । तरी ज्ञानी विकळे पुण्यपाप ॥३॥ बापरखुमादेविवर विठ्ठलुराया । घोटुनियां माया राहियला ॥४॥

९१६. **पुण्य जोडुनियां स्वर्गासी जाइजे** । पापाशी सेविजे अधो गती ॥१॥ दानधर्म करी भोग इहलोक । त्रिविधही एक रूप जाण ॥२॥ पांचच विषय त्रिभुवनीं असती । सर्वही भोगिती जीव शीव ॥३॥ दृश्य एक चुळे घोटुनि बैसला । ज्ञानदेव धाला आत्मयोगें ॥४॥

९१७. **दुर्जनाच्या संगें दुर्जनत्व प्राप्ती** । कैंचि त्या विश्रांती साधकाशी ॥१॥ सज्जन संगती करितां तेंचि रूप । आनंदाचा दीप बाणताती ॥२॥ दुर्जनाशी दिसे सर्व सृष्टि बद्ध । न दिसे कांहीं शुद्ध सर्वथैव ॥३॥ सज्जनाशीं भासे विश्व पूर्ण मुक्त । एकत्वीं आसक्त न दिसती ४ सज्जना दुर्जनातीत जे निर्जन । तेथें समजेन ज्ञानेश्वर ५

९१८. **मायिक हे सृष्टि कल्पिक जाहली** । आनादि घडली आणिजेसु ॥१॥ देहभास नित्य नूतन भासती । शुद्ध स्वयंज्योति जुनाटची॥२॥ माया विद्या दोन्ही उपाधी करुनि । जीवशीव दोन्ही भिन्न जाले॥३॥ अनादि अज्ञान बंध नये यासी । गुरू कृपा त्याशी छेदिजे कीं ॥४॥ अनुभव योगें जाणुनि ज्ञानेश्वर । हा भवसागर उरतला ॥५॥

९१९. **जन्ममरणातें नाहींच गणित** । सूर्य जैसा होत उदय अस्त ॥१॥ वासनेच्या योगें न नमे कल्पना । याचि लागीं नाना योनी भोगी ॥२॥ पापपुण्य दोन्ही सांठवीत आहे । असुयेशी जाये अधऊर्ध्व ॥३॥ समत्वें इहींचि जाण जन्म घरीं । आथी ईयेपरी तिन्हींजेसु ॥४॥ त्रिभवनाहुनि राहिला निराळा । ज्ञानेश्वरी लीला निरंजनीं ॥५॥

९२०. **ब्रह्म जयाचिये बोधेंचि पावत** । ते जगीं शाश्वत गुरु-

मूर्ति ॥१॥ शब्दज्ञानें जया गुरु उपदेशिती । नाहीं त्यासी मुक्ति कदां काळीं ॥२॥ संसारीं तरोनि शिष्यासी तारिती । तेचि मानिजेति गुरु एक ॥३॥ कामक्रोध लोभ जे का न शिवती । तेचि ओळखि सद्गुरू जाण ॥४॥ ज्याशी नाहीं भेद ब्रह्मीं एकाकार । ह्मणे ज्ञानेश्वर तोचि गुरू ॥५॥

९२१. **सद्गुरुवांचुनी संसारीं तारक** । नसेचि निष्टक आन कोण्ही ॥१॥ इंद्र चंद्र देव ब्रह्मादिकरूनि । संशयाची श्रेणी छेदिती ना ॥२॥ उघडें परब्रह्म सदगुरूची मूर्ती । पुरविती आर्ती शिष्याचिया ॥३॥ वंचना करिती जन दुष्ट नष्ट । मुख्य श्रेष्ठ श्रेष्ठ वंदिताती ॥४॥ ज्ञानदेव म्हणे गुरूचा मी दास । नेणें साधनास आन कांहीं ॥५॥

९२२. **रजापासुनियां जाहली उत्पत्ति** । सत्त्वगुणीं स्थिति वाढविती ॥१॥ तमोगुणेंकरुनि पाविजे मरण । राहाटती त्रिगुण जगामाजी॥२॥ त्रिगुण त्यजूनि व्हावे निस्त्रैगुण । नाचरावें पुण्य पाप कांहीं ॥३॥ तरीच ब्रम्ह ज्ञान गुरूकृपा प्राप्ति । जिताचि जिवन्मुक्ति ज्ञानेश्वर ४

९२३. **साभिमानें करूनि व्यर्थ कारे फुगशी** । मत्त ऐसा होसी मतिमंदा॥१॥ सर्व ब्रह्मरूप हे खूण ओळखीं । भिन्नपण टाकीं निश्चयेंची ॥२॥ मान अपमान तुज कांहीं नाहीं । तूं तंव विदेही नित्य शुद्ध ॥३॥ प्रारब्धानें देह भोगिताहे भोग । कासयारे सांग भ्रांति तुज ४ साधोनि अपरोक्ष वस्तु सर्वगत । ज्ञानेश्वर ह्मणत राजयोगी ॥५॥

९२४. **जहाला इंद्रशेष तरी आह्मां काय**। नैश्वरी तो पाहे भुललासे ॥१॥ हरिश्चंद्रादिक ब्रह्मादि करून । मायोपाधीन भास जालों ॥२॥ निरंजनीं घेतां ययाचि पैं शुद्धि । एकही अवघी न दिसती ॥३॥ हरिहरादिक हेही सुकल्पिक । इतरांचा लेख कोण करी ॥४॥ गुरूकृपायोगें ब्रह्म ज्ञानेश्वर । तरला संसार भवसिंधु ॥५॥

९२५. **चौदा विद्या जरी पूर्ण अभ्यासिले** । व्यर्थचि जाहले ज्ञानेविण ॥१॥ तीन वीस चारी कळा अनुभाविले । व्यर्थचि जाहले ज्ञानेवीण ॥२॥ अष्टांगादि योग प्रयासें जोडले । व्यर्थचि जाहले ज्ञानेवीण ॥३॥ कर्मधर्मक्रिया नाना आचरले । व्यर्थचि जाहले ज्ञानेवीण ॥४॥ ज्ञानेश्वर ह्मणे ब्रह्म साधियेलें । कीर आथीयले ज्ञानेवीण ॥५॥

९२६. **कासवाच्या परी आत्मा तो या देहीं ।** इंद्रियें जो पाही अवलोकी ॥१॥ सहज प्रकाश आहे तो करीत । स्वयें चेष्टवीत दीपापरी ॥२॥ जाणें येगें कांहीं नाहीं आत्मयाशी । दृष्टत्व तयासी जाणिजे कीं ॥३॥ तद्विवर्त जीव अविद्यक मन । संसार बंधन इयेचेनी ॥४॥ ज्ञानदेव ह्मणे आत्मा शुद्धबुद्ध । नव्हेचि पैं बद्ध कदाकाळीं ॥५॥

९२७. **वेदांत सिद्धांत देतात पैं हाक ।** स्तब्ध ते जंबुक येर शास्त्रें ॥१॥ तेंचि कीं प्रमाण साधनानुक्रम । येर भवभ्रम रूप आथी ॥२॥ ऐकजे तीं शास्त्रें पडिलीं संदेहीं । होय नाहीं कांहीं म्हणुनियां ॥३॥ वेदांतीही भिन्न जाणा पूर्वपक्ष । लक्षितेती लक्ष अती मूर्ख ॥४॥ काय बाहिर्मुख नेणतीच येर । ह्मणे ज्ञानेश्वर राजयोगी ॥५॥

९२८. **पाहणें जें कांहीं त्याशीं मुळीं पाहें ।** मग सुखी राहें योगीराया ॥१॥ मी तूं द्वैत भ्रांति पहारे काढुनि । आत्मा तो गिवसुनि राहे सुखें ॥२॥ अविद्या नाथिली रज्जु सर्पापरी । भासली विचारी अनुभवें ॥३॥ तेव्हां हे उपाधी राहिली सौरस । ज्ञानदेव दास पूर्ण धाला ॥४॥

९२९ **मुक्तत्वाची भ्रांति जे कांहीं धरिती ।** तेचि बद्ध होती निश्चयेंशी ॥१॥ कल्पना इवलुशी जये ठायीं असे । तिये ठायीं वसे अहंकार ॥२॥ देहीं ग्रासुनियां राहती जे सुखी । तेचि ते पारखी आत्मतत्वीं ॥३॥ सर्व ब्रह्मपूर्ण तयाशीच बोध । तयाशीच पद कैवल्याचें ॥४॥ साक्षीरूप पहा धरिती शरीर । तेचि ज्ञानेश्वर पूर्ण योगी ॥५॥

९३०. **गगनाहूनि व्यापक वायुहूनि चालक ।** अग्नीहूनि दाहक आन नसे ॥१॥ ब्रह्म परिपूर्ण तोचि सनातन । स्वयें आनंदघन आन नसे ॥२॥ दृश्याहूनि गोचर इहिहूनि पर । गुरुवीण ज्ञानेश्वर आन नसे ॥३॥

९३१. **सिंहाचें दुग्ध सायासें जोडलें ।** आणुनि पाजिलें मार्जरासी ॥१॥ अमोलिक विद्या धन झाली प्राप्ति । पहावयाची प्रतिती स्वर्शास छेदी ॥२॥ अनेक दीप लाविले दिपाशीं । फुंकुनियां त्यासी

मग सोडी ॥३॥ परीस जोडुनि घालियली भिंती । शिळा घेउनि हातीं फिरत आहे ॥४॥ अमृताचा कुंभ बळेंचि उलंडुनि । कांजिये भरूनि ठेवितसे ॥५॥ अमोलिक देहीं न साधा जरी पर । ह्मणे ज्ञानेश्वर व्यर्थ होय ॥६॥

९३२. **साधूचा महिमा वर्णवेना कांहीं** । ब्रह्मादिक तेहीं वर्णिताती ॥१॥ त्याचिये कृपें मोक्ष जिउनियां । लाधिजे प्राणिया निश्चयेंची ॥२॥ गंगेहूनि थोर संत सुचिश्मत । गंगा शुद्ध होत त्याचे संगें ॥३॥ वडवानळ शुचि परि सर्वही भक्षक । इंद्र पुण्यश्लोक पतन होय ॥४॥ पतीत पावन कृपाळ समर्थ । देताती पुरुषार्थ चारी दीना ॥५॥ बाप रखुमादेविवर विठ्ठलाच्या संगीं । झाला पूर्ण योगी ज्ञानेश्वर ॥६॥

९३३. **मुक्ति पावावया करिजे हरिभक्ति** । तरीच विरक्ती प्रगटेल ॥१॥ विरक्तीविषयीं होतांचि विचार । नित्य हे नश्वर ओळखती ॥२॥ तेव्हां आत्मज्ञान अनुभव होय । अविद्यत्व जाय जिवरूप ॥३॥ शांति क्षमा दया तिष्ठती सहज । न दिसे दृश्य काज जगामाजीं ॥४॥ गुरूकृपा द्वारें लाहिजे पैं सिद्धी । बोलिला विशुद्धि ज्ञानेश्वर५

९३४. **ईश्वर तो देव छाया ते शीव** । प्रती छाया जीव तिन्ही भेद ॥१॥ एक तेंचि सूत्र तिन्हीशी मिळुनि । जाणती ते ज्ञानी आत्मविद ॥२॥ जें अनिर्वचनी तें मूळ प्रकृति । ब्रह्मा ऐशी शक्ति तियेचि पैं ॥३॥ ब्रह्मा विष्णु रुद्र तियेचें पैं अंग । मुळीं सृष्टि जग गोसाविणी ॥४॥ ब्रम्ह तेंचि भास आभास जाहलें । ज्ञानदेव बोले निवृत्ती दास ॥५॥

९३५. **जळवायुवेगें हालत सविता** । मुळीं तो तत्वता स्थिर असे ॥१॥ माया विद्याभास शिव तो बिंबला । जीवरूप ठेला होउनियां ॥२॥ सुख:दुख भोगी जिवाचिये सत्ते । देहीं क्रिया वर्ते स्वाभाविक ॥३॥ अज्ञानें करूनि भुलणें जिवाशी । मुळीं शुद्ध अंशीं शिव चोख ॥४॥ जिवाशी उद्धार करावया कीर । म्हणे ज्ञानेश्वर जाणिजे कीं ॥५॥

९३६. **शून्य निरसुनि दोन्ही निरखिलें** । तेथुनि देखिलें निज-

वस्तु ॥१॥ स्वप्रकाशमय आत्मा सदोदित । सर्वत्र भरीत एकमेव ॥२॥ ध्येय ध्याता ध्यान तिन्ही निरसुनि । झालों निरंजनीं लीन आधी ॥३॥ अहं हे स्वरूप गिळुनियां पाही । देहींच विदेही स्वसंवेद्य ॥४॥ बापरखमादेविवर विठ्ठलाचा दास । झाला समरस परब्रह्म ॥५॥

९३७. **वर्षाकाळीं नदियां पूर्ण भरती** । येऊनि मिळती सिंधुमाजी ॥१॥ ऊष्ण काळीं न्यून आटोनियां गेली । नाहीं खंती केली सिंधु त्यातें ॥२॥ सुखदुःख भोग भोगिता प्राचिनी । अखंड सज्जनीं शांति असे ॥३॥ नाहीं तया भूतीं सर्व ब्रह्म एक । अनुभऊनि सुख भोगिताती ॥४ तत्वमसी बोध आत्मानात्म भेदले । दृश्य विसरले भास आधीं ॥५॥ सज्ञान चेईलें अज्ञान निदेलें । विपरीत केलें सुपरीत ॥६॥ द्रव्य आणि धीर मुळीं एक नीर । झाला ज्ञानेश्वर स्वयंब्रह्म ७

९३८. **सर्वत्र परिपूर्ण सर्वांघटीं वसे** । अभाग्यासी कैसें पडळ आलें ॥१॥ मायेच्या भुलीरें भुलले विश्वजन । जनीं जनार्दन न देखती ॥२॥ आत्माआत्मीं भाविता देहीं । मायेच्या डोहीं बुडालें कैसें ॥३॥ बापरखुमादेविवर सगुणीं नससाये । निर्गुणीं दिसताहे जनवन ॥४॥

९३९. **चोहटा मिष्टान्न जें कांहीं सांडलें** । सुनियाशी झालें सुकाळ पैं ॥१॥ तैसा तो अभक्त वाढीन्नला जगीं । काळ तयालागीं ग्रासितसे ॥२॥ जे का पारंगत श्रेष्ठ भागवत । चळचळां कांपत काळ तया ॥३॥ तयाचिया दृष्टि मोहरा न राहे । धाउनियां जाय अज्ञान तीं ॥४॥ निवृत्तीदासाचा झालों निजदास । वंदिती तयास ब्रह्मादिक ॥५॥

९४०. **उत्तम तें परि उभविलें मनोहर** । दीपकावीण मंदीर शोभा नपवे बापा ॥१॥ घृतेवीण भोजन तांबुलेवीण वदन । कंठेवीण गायन शोभा नपवे बापा ॥२॥ सुंदर आणि रमण जरी होय तरुणी । पुरुषावीण कामिनी शोभा नपवे बापा ॥३॥ दिधल्यावीण दाता श्रोत्यावीण वक्ता । वेदावीण पंडित शोभा नपवे बापा ॥४॥ ज्ञानेश्वर सांगे अनुभवीया अंगें । नुसता बोलें वागे शोभा नपवे बापा ॥५॥

९४१. **वांझेचिये पोरा तिवे झाले लेक** । पारधीशी देख निघाले ते ॥१॥ ऊर्ण तंतु दोरा जाळें केलें त्याचें । डोहीं मृगजळाचे धरिले मच्छ ॥२॥ नेले अंधापाशीं मुके बोले त्याशी । दिलें थोट्या-पाशीं ठेवणें तें ॥३॥ ज्ञानदेव म्हणे केलें अविद्येचें । संतासी तयाचें भय नाहीं ॥४॥

९४२. **शत अश्वमेध घडले जयाला** । तरी ब्रह्म त्याला अगम्य हें ॥१॥ सोमयागाची हे नाहीं ज्या गणना । तरी आत्मखुणा अ-लभ्यते ॥२॥ लक्ष अनुष्ठान त्रिभुवनीं अन्नदान । तरी ब्रह्मज्ञान अतर्क्य हें ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे शुद्ध ब्रह्मज्ञान । पावले हे खूण संतसंगें ॥४॥

९४३. **पूर्वेचा हा भानु उगवेल पश्चिमे** । परी भूमी जन्म नसे आम्हां॥१॥ वांझेचा कुमर दिसेल प्रगट । न दिसे जठर जड दृष्टि ॥२॥ सिंधु येऊनियां मिळे सरितेमाजि । परि आत्मकाजीं क्रिया नको ॥३ पूर्ण ज्ञानदेवा प्राप्त आत्मरूप । त्रिविध हे ताप निरसती ॥४॥

९४४. **लक्ष चौऱ्यांशीं येउनियां प्रती** । कोटी फेरे होती कोटी जीवा ॥१॥ परि हा मनुष्य देहत्व प्राप्ति । लाभ नाहीं हातीं अव-चिता ॥२॥ नवमास मायनें वाहिलें उदरीं । तिजप्रती सोयरी आणीक नाहीं ॥३॥ कामधेनु म्हैशी आणीक दासदासी । धन बहु सायासीं मिळविलें ॥४॥ तुझिया धनाशी नाहींरे बाळका । अंत-काळीं देखा एकलाची ॥५॥ हातींच्या पवित्रा कानाचिया नगा । धावोनियां वेगा हिरोनि घेती ॥६॥ स्तनपान देउनि मोहें प्रतीपाळी । तेही अंतकाळीं दुरी ठेली ॥७॥ आंगींचीं लुगडीं काढा फेडा ह्मणती बांधोनियां देती यमा हातीं ॥८॥ ऐसा हा संसार मायेनें वेष्टिला । म्हणनि दुरावला योगेश्वरा ॥९॥ ज्ञानदेव ह्मणे भली मुक्ताबाई । दाखविली सोयी साची असे ॥१०॥

९४५. **मृत्तिकेची खंती काय करितोसी** । कोण मी नेणशी काय आहे ॥१॥ काय तुज जालें नाथिला संसार । कासयासी भार वाहतोसी ॥२॥ शुद्धबुद्धरूप तूंचि परिपूर्ण । जन्म आणि मरण तुज नाहीं ॥३॥ अविद्येच्या योगें तुज जाण भुली । अनुभउनि किल्ली छेदी आतां४श्रीगुरूच्या कृपें ह्मणे ज्ञानेश्वर।तरसी संसार निश्चयेंशी ५

९४६. **मी देहीं ह्मणतां ब्रह्महत्त्या कोटी ।** घेऊनियां पाठी थापटिती ॥१॥ शुद्ध ब्रह्मीं कैशी कल्पना आरोपी । तोचि एक पापी जगीं होय ॥२॥ नाथिलें अज्ञान करून अनंता । केविं मोक्षपंथा जाईलजे पां ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे दिव्य मी देईन । सद्गुरूची आण स्वयंब्रह्म ॥४॥

९४७. **मोक्ष मेल्या पाठीं आम्हांसी होईल ।** ऐसें जे म्हणतील अतिमूर्ख ॥१॥ दीप गेल्यावरी कैचाजी प्रकाश । झाका झाकी त्यास कासयाची ॥२॥ जंववरी देह आहे तंववरी साधन । करूनियां ज्ञान सिद्ध करा ॥३॥ गृह दग्ध न होतां शिंपीजे उदक । शेखी तो निष्टक काय कीजे ॥४॥ आहे मी हा कोण करावा विचार । म्हणे ज्ञानेश्वर निवृत्तीचा ॥५॥

९४८. **मरण न येतां सावधान व्हारे ।** शोधुनी घ्यारे निजवस्तू ॥१॥ अंतकाळीं जरी करावें साधन । म्हणतां नागवण आली तुम्हां ॥२॥ नाशिवंत देह मानाल शाश्वत । तरी यमदूत ताडितील ॥३॥ काळाचे खाजुके जाणिजे कीं काया । धरूं नको माया सर्वथैव ॥४॥ अमोलिक प्राप्ति होत आहे तुज । धरूनियां लाज हीत करीं ॥५॥ मागुती न मिळे जोडलें अवचट । सायुज्याचा पाट बांधुनि घेईं ॥६॥ ज्ञानदेव म्हणे विचारा मी कोण । ना तरी पाषाण होउनि राहा ॥७॥

९४९. **संसाराचि नाहीं येथें या कारणें ।** नाहींच जन्मणें मरणें कैचें ॥१॥ भास तोही नासताहे कैचें निराकाश । सर्वी समरस परब्रह्म ॥२॥ जागृति या स्वप्न तेचि तें आलें । अंतरीं बिंबलें निश्चयेंशी ॥३॥ शार्वरी प्रकाश कांहींच नाठवे । अदृश्य सुईवे दृश्य जालें ॥४॥ बापरखुमादेविवर विठ्ठल तन्मय । ब्रह्मीं ब्रह्ममय दिसे त्यासी ॥५॥

९५०. **गगनीं भासले अगणीत तारे ।** तेथें मन मुरे वृत्ती सहीत ॥१॥ पर्जन्याच्या धारा भूमिवीण पडे । जेथें बुद्धि उडे समुळची ॥२॥ मसुरे प्रमाण सावळे अनंत । आव्हाकार गणिती तपामाजी ॥३॥ स्वरूपाचा पूर चिदाकाशीं गेला । देखणा राहिला सहजची ॥४॥ ज्ञानदेव ह्मणे स्वखुख रोकडें । निवृत्तीनें पुढें दाखविलें ॥५

९५१. **सुवर्णाचा चुरा शुद्ध पीत दिसे ।** वस्तु हे प्रकाशे तैशापरी ॥१॥ अगणित तारे ओतिले अचळ । अखंड निर्मळ ब्रह्मरूप ॥२॥ निराचिया धारा अभ्रेवीण पडे । देखणा हा बुडे तयामाजी ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे काय सांगूं सुख । मागें पुढें देख निवृत्तीशीं॥४॥

९५२. **ब्रम्हप्राप्ति पूर्ण झाली ज्या नराला ।** अंतर बाह्य झाला प्रकाशाची ॥१॥ बाहेर भीतरीं लावी जैसा दीप । सबाह्य अमूप रूप फांके ॥२॥ अग्निसंगें लोह तत्व थोर नेटे । उभवतो दाटे हुताशन ॥३॥ तैसा ब्रम्हीं लाहे हृदयीं त्रिनैन । बाह्य निरंजन अवघा झाला ४ निवृत्तीचे पायीं ज्ञानदेव लीन । जग जनार्दन निरंतर५

९५३. **सुखाची आवडी घे कां रे गोविंदीं ।** चित्त हें आनंदीं ठेऊनियां ॥१॥ मनाची मोहर लावा की रे नामीं । मनोरथ कामीं गुंतू नका ॥२॥ अकाळित काळ जंव आहे दुरी । तंव तूं श्रीहरी चिंत वेगीं ॥३॥ देहाचा दीपक जंव आहे देहीं । तंव तो निवडुनि घेईं नीक॥४॥ निवृत्ति सोपान ज्ञानदेव ह्मणे । श्रीगुरू ही खूण बुझेतीना॥५॥

९५४. **देव ते कल्पित शास्त्र तें शाब्दिक ।** पुराणें सकळीक बाष्कळिक ॥१॥ बाहुलें तीं जीव सूत्रें तेचि जीव । मिथ्याचि भाव जीव झालें ॥२॥ तेथें कैंचे मुक्त मुळीं नाहीं बद्ध । सर्वही अबद्ध दिसे जेका ॥३॥ अर्कापासुनि निर जैसें का भासत । जग तैसें घडत मिथ्याचि सत्य ॥४॥ ज्ञानदेव म्हणे सावधान होणें । अखंड साधणें परवस्तूशी ॥५॥

९५५. **देव नाहीं तेथें पूजी तया कोण भक्त ।** गुरूशी ठाव नाहीं कोण शिष्याशीं पुसत ॥१॥ सदोदीत ब्रह्म पूर्ण निराकार निर्गुण । भेदाभेद क्षीण तेथें अनुभवी हे खुण ॥२॥ आदि अंत मध्य नाहीं दृश्य द्रष्टा दर्शन । सच्चिदानंदरूप वस्तु सनातन ॥३॥ एक तेचि अनेक झाले अनेक रूपी एक । खुण सांगे ज्ञानेश्वर जगजाणा कल्पक ॥४॥

९५६. **देव देव ह्मणुनि व्यर्थ कां फिरशी ।** निजदेव नेणशी मुळीं कोण॥१॥देवा नाहीं रूप देवा नाहीं नांव। देवा नाहीं गांव कोठें कांहीं ॥२॥ज्ञानदेव ह्मणे भजा आत्मा देवा । अखंडीत सेवा करा त्याची॥३॥

९५७. **अमानत्व स्थिति ते अंतीं कठीण** । येरें जन्म जाण न साधेची ॥१॥ अनापेक्ष सुचि जे का उदासीन । आमानित्व जाण त्यासी लाभे ॥२॥ सहज ज्ञानेश्वरी अखंड समाधी । ग्रासुनि उपाधी राहियला ॥३॥

९५८. **योग तो कठीण साधितां साधेना** । जेणें गा चिद्घना न पाविजे ॥१॥ याची लागीं आतां सांगणें हें तुज । माझें निज-गुज अंतरींचें ॥२॥ इंद्रियें कोंडावीं आवरावें मन । सहज ब्रह्मज्ञान लाधलाशी ॥३॥ जेथें जेथें मन धांवोनियां जाय । तेथें गुरूचे पाय बसवावे ॥४॥ ज्ञानदेव म्हणे होईं तूं निर्गुण । कळेल तुज खुण पूर्ण तेव्हां ॥५॥

९५९. **आमुचिया देवा नाहीं नाम गुण** । नाहीं थानमान रूप-रेखा ॥१॥ नित्य निराकारीं आमुचें भजन । अहंब्रह्म पूर्ण निज-ध्यासें ॥२॥ ज्ञानदेव म्हणे आमिष जोडिलें । निरंजनीं केलें वास आम्हीं ॥३॥

९६०. **कासया प्रतिष्ठा व्यर्थ मानितोसी** । सर्वत्र धरिसी सम-भावें ॥१॥ आत्मयासी जगती अवघाची एकला । जगांत संचला तद्रूपें तो ॥२॥ अणुरेणु तृण काष्ठादि पाषाण । सर्वत्री समान आत्मा तोचि ॥३॥ देह उच्च नीच आत्मा सर्व सम । मानिती विषम मंदमती ॥४॥ भेदाभेद दोन्ही सर्व एकाकार । म्हणे ज्ञानेश्वर पूर्ण योगी ॥५ ॥

९६१. **त्रिवेणीचें स्नान अखंडित करा** । काशीवासीं मरा ज्ञाने-वीण ॥१॥ तया नाहीं गती वस्ती निरंजनीं । भोगी रुद्रयोनी कर्म वसे ॥२॥ लिंगदेहभंग जंव झाला नाहीं । तोंवरी बा पाहीं मुक्ति कैची ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे करावें सुमन । तरीच चिद्-घन पाविजे तो ॥४॥

९६२. **सुवर्णाचें भांडें दुधाचें आधण** । कुसुंबा घालुनि नाश केला ॥१॥ तोडुनि चंदन कर्दळीचें वन । बाभुला रक्षण बैसविलें ॥२॥ उत्तम भूमिका कमाविली पाही । धोत्रा लवलाहीं पेरियला ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे ऐसें न करावें । शरण रिघावें सदुरूशी ॥४॥

९६३. **एक माझी माता दोघेजण पिता** । मज तीन कांता दोघे सुत ॥१॥ चौघे बंधु आणि दशक बहिणी । कन्या झाल्या तिन्ही माझ्या पोटीं ॥२॥ बहिणी भावासंगें खेळूं पैं लागले । विपरीत झालें सांगूं कोणा ॥३॥ ज्ञानदेव म्हणे अघटित घडे । गुरुकृपें जोडे परब्रह्म ॥४॥

९६४. **सद्गुरूसारिखा सोयरा सज्जन** । दाविलें निधान वैकुंठीचें ॥१॥ सद्गुरू माझा जिवाचा जिवलग । फेडियला पांग प्रपंचाचा ॥२॥ सद्गुरू हा अनाथ माउली । कृपेची सांउली केली मज ॥३॥ ज्ञानदेव ह्मणे अवचित घडलें । निवृत्तीनें दिधलें निजबीज ॥४॥

९६५. **ज्ञानप्राप्ती लागीं व्हावें अती नीच** । म्हणवी जो उच्च सिद्ध नोहे ॥१॥ अहंता समूळ करावा कीं त्याग । काम क्रोध मांग शिवूं नये ॥२॥ सात्विक वैराग्य परिपूर्ण शांति । दैविक संपत्ति सांडी केवीं ॥३॥ व्हावें निराभास तरीच ही प्राप्ती । ज्ञानेश्वरा भ्रांति किरे नाहीं ॥४॥

९६६. **सगुण निर्गुण दोन्ही विलक्षण** । ब्रम्हसनातन विठ्ठल हा ॥१॥ पतीत पावन मानस मोहन । ब्रम्ह सनातन विठ्ठल हा ॥२॥ देह ध्याता ध्यान चित्त निरंजन । ब्रह्म सनातन विठ्ठल हा ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे आनंद चिद्घन । ब्रह्म सनातन विठ्ठल हा ॥४॥

९६७. **भ्रमरीच्या ध्यासें भ्रमरीच होय** । कीटकत्व जाय पालटोनी ॥१॥ ब्रह्म ध्यासें स्वयें ब्रह्मचि होईजे । जिवत्व लोपिजे सहजची ॥२॥ किडाळ त्याजिले चोखाळचि नाहीं । आणिक ते पाही अनादीची ॥३॥ जुनाटचि आहे जाणा सोयरिक । माया उपाधिक भ्रमलाशी ॥४॥ विचार करितां सर्व एकाकार । म्हणे ज्ञानेश्वर सत्ययोगी ॥५॥

९६८. **वर्ण ना व्यक्ति आमुप निजतेज** । संताचें तें गूज आत्मरूप ॥१॥ मुक्ताचा सागर भरित दाहि दिशा । पाहि जीवदशा बुडुनि जाय ॥२॥ ते खुण दाविली माझीया नयनीं । चिद्रत्नाचि खाणी उघडली ॥३॥ निवृत्ति प्रसादें ज्ञानदेव लाधला । सुखीयाहो झाला तेणें सुखें ॥४॥

९६९. **नेणण्याचें रूप तेंचि रे अज्ञान** । जाणते तें ज्ञान दोन्ही मिथ्या ॥१॥ पूर्णाची ओळखी मुळीं माया नाहीं । कोण मी हे याहीं शोधुनियां ॥२॥ अनुभव सुख भोगितांना भोग । न होतां अव्यंग भाररूपें ॥३॥ बद्धमुक्त शून्य होसी निराकार । म्हणे ज्ञानेश्वर तत्त्वज्ञानी ॥४॥

९७०. **तिहि शून्यावरती नांदताहे देही** । तोचि ब्रह्मांड गेहीं भरूनि ठेला ॥१॥ जयाचा तो भास बिंबाकार आहे । ते खुण लाहे गुरुपुत्रा ॥२॥ बिंबांचें तें अंग ब्रह्म तें निघोट । वस्तु ते अविट तेजःपुंज ॥३॥ चळेना ढळेना जैसें तैसें तेंचि । उपमा आणिकाची केवीं साहे ॥४॥ बहुजन्मा शेवटीं फळ हें पुण्याचें । आभाग्यासि कैचें प्राप्त होय ॥५॥ अपार अधिष्टानि सत्य ही अभंगी । जाणुनियां वेगी जीवीं धरा॥६॥ज्ञानदेव ह्मणे यापरता नाहीं । उपदेश कांहीं बोलावया ॥७॥

९७१. **नवाचिया माझारी आऊट पिठाशेजारीं** । शून्याची चोवरी सुनिळ प्रभा ॥१॥ जीवदशामय आंगुष्ठ प्रमाण । तयावरी अज्ञान प्रवर्तते ॥२॥ चैतन्याची मूस त्यामाजि ओतली । अव्यक्त देखिली वस्तू तेथें॥३॥ तव तें मसुरे प्रमाण तया नांव महाकारण। गुरुमुखें खूण जाण बापा ॥४॥ ज्ञानदेव ह्मणे यापरतें जाण । नाहीं नाहीं आण निवृत्तीची ॥५॥

९७२. **दृष्टिमाजी रूप लखलखीत देखलें** । अव्यक्त ओळखिलें तेजाकार ॥१॥ सांवळें सुंदर रूप बिंदुलें । मन हें मुरालें तयामाजी ॥२॥ अणुरेणु ऐसें बोलती संतजन । ब्रह्मांड संपूर्ण तया पोटीं ॥३॥ निवृत्तीची खुण ज्ञानदेव पावला । सोयरा लाधला निवृत्ति कृपें ॥४॥

---

## रूपकें.

### कूट.

९७३. **आरेवरी आररे पिंपळावरी पाररे**। खालीं कुंभार वरी चाक भोंवे ॥१॥ डंबडाळकें उंबरासी वाळकें। पिंपळासी काकड्या लागल्यारे ॥२॥ पैल वरले माळीं कोल्हा करड काढी। ससा वळीतो वेठीरे॥३॥ निवृत्तीप्रसादें ज्ञानदेव म्हणे गुरुमहिमा । अनुभववीण जाणतीरे॥४॥

## गौळण.

९७४. **काय सांगू तूतें बाई** काय सांगूं तुतें ॥ध्रु०॥ जात होतें यमुने पाणिया वातत भेतला सांवला । दोईवल तोपी मयुल पुछाची खांद्यावली कांबला ॥१॥ तेणें माझी केली तवाली मग मी तेथूनी पलाली । पलतां पलतां घसलून पलली दोईची घागल फुतली ॥२॥ माझे घुलगे फुतले मग मी ललत बथले । तिकून आले शालंगपानी मला पोताशीं धलिलें ॥३॥ मला पोताशीं धलिलें माझें समाधान केलें । निवृत्तीचे कृपें सुख हें ज्ञानदेवा लाधलें ॥४॥

## सौरी.

९७५. **होय सौरी आतां उघडा घाली माथा** । परपुरुषीं रमल्या बाई त्याचीं पतिव्रता ॥१॥ कर्मेंवीण सौरी झालें आलें संतापाशीं । ज्ञान डौर घेऊनि करीं लिंग देह नाशी ॥२॥ रांडव राहूं नका बाई पाहुनि करा वर । तेचि तुम्हीं सुखी व्हाल आह्यव मरण बर ॥३॥ रांडावा ज्या ज्या मरती बाई त्यासी नाना योनी । स्वामी करूनि सुखी होई खुंटती येणीं जाणीं ॥४॥ निवृत्तीप्रसादें ज्ञानदेव बोले। स्वामी करूनी सुखी होई निजानंदीं डोले ॥५॥

## विरहिण.

९७६. **संसार वो ग्रामीं गेला सांडुनी** । माझे अंत:करणीं माहियेर ॥१॥ सासुरवासिनी मी वो परदेशिनी । कां नये अझुनी मूळ मज ॥२॥ आणिक एक अवधारा । मज दिधलें हीनवरा । माझें कांहीं सर्वेश्वरा न विचारिशी ॥३॥ व्याली वेदना जाणे वांझ कांहीं नेणे । बालक काय जाणे तहान भूक ॥४॥ तैसी ते नव्हे लेकुराची माये । कृष्ण माझी धाये मोकलिते ॥५॥ आशा मनशा तृष्णा कल्पना चौघी नणंदा । पाणीण रे चिंता सासू माझी ॥६॥ सासुरा हा स्वार्थ कांहीं न विचारी परमार्थ । आतां करीन घात तयावरी ॥७॥ दुरळ हा प्रपंच दुष्ट भावे दीर । इहीं मज थोर कष्टविलें ॥८॥ काम क्रोध थोर बोलती बडिवार । मज ह्मणती पोर निर्दैवाचें ॥९॥ नैश्वर गहिवरु दाटतसे गळा । आसुवें ढळढळां

गळताती ॥१०॥ सासुरयाचे घरीं करित होतें काम। अवचित विंदान मांडियेलें ॥११॥ घरा सोळा सांधी बहात्तर कोठे। नवही दारवंटे झाडीत होते ॥१२॥ चोळी साउलें हिरोनि घेतलें। उघडें पाठविलें माहेराशी ॥१३॥ समर्थाची लेकी परि मी संताची पोसणी। विमानीं बैसोनि जातें देखा ॥१४॥ बाप चक्रधरा रुक्मादेविवरा। उबगला संसारा येऊं नेदी ॥१५॥

---

## गीतामाहात्म्य.

९७७. **भगवद्गीता हेचि थोर** । येणें चुके जन्म वेरझार। वैकुंठवासीं निरंतर। भवसागर उतरेल ॥१॥ राम नाम सार धरी। तेंचि तारक सृष्टीवरी। त्याचेनि संगें निरंतरी। भवसागर तरसील ॥२॥ व्यर्थ प्रपंच टवाळ। येणें साधिली काल वेळ। नाम तुझें जन्म मूळ। हें केवळ परिसावें ॥३॥ त्रिकाळ साधिलें नाम। दूर होतील विघ्न कर्म। साधितील धर्म नेम। हें पुरुषोत्तम बोलियले ॥४॥ तंव अनुष्ठान सुगम। साधिले सर्व सिद्धी नेम। क्षेम असेल सर्व धर्म। सर्वकाळ फळले॥५॥ज्ञानदेव कर्म अकर्ता। पावन जाला श्रीअनंता। सुखदु:खाचा हरी भोक्ता। सर्वकाळ आम्हां आला ॥६॥

९७८. **व्यर्थ प्रपंच टवाळ** । सार एक निर्मळ। कृपा करी हरी कृपाळ। दीन दयाळ हरी माझा ॥१॥ क्षमा शांति दया रूपी। तोची तरेल स्वरूपीं। नामें तरले महापापी। ऐसा ब्रह्मा बोलिला ॥२॥ गीतेमाजी अर्जुनाशी हरी सांगे साक्षी जैशी। जो रत होतसे हरि-भक्तीशी। तो नेमेशी तरेल ॥३॥ ज्ञानदेवें भाष्यें केलें। गीता ज्ञान विस्तारलें। भक्तीं भाग्यवंतीं घेतलें। भाष्येंकरूनी गीतेच्या ४

---

## गुरु.

९७९. **गुरु हा संतकुलींचा राजा** । गुरु हा प्राणविसांवा माझा गुरूवीण देव दुजा। पाहतां नाहीं त्रिलोकीं ॥१॥ गुरु हा सुखाचा सागरु। गुरु हा प्रेमाचा आगरु। गुरु हा धैर्याचा डोंगरु। कदाकाळीं डळमळीना ॥२॥ गुरु वैराग्याचें मूळ। गुरु हा परब्रह्म केवळ।

गुरु सोडवी तात्काळ । गांठ लिंगदेहाची ॥३॥ गुरु हा साधकाशी साह्य । गुरु हा भक्तलागीं माय । गुरु हा कामधेनु गाय । भक्तांघरीं दुभतसे ॥४॥ गुरु घाली ज्ञानांजन । गुरु दाखवी निज धन । गुरु सौभाग्य देऊन । साधुबोध नांदवी ॥५॥ गुरु मुक्तीचें मंडन । गुरु दुष्टाचें दंडन । गुरु पापाचें खंडन । नानापरी वारितसे ॥६॥ काया काशी गुरु उपदेशी । तारक मंत्र दिला आम्हाशीं । बाप रखुमादेविवराशी । ध्यान मानसीं लागलें ॥७॥

९८०. **गुरुज्ञान नाहीं ज्याशी** । तरुणोपाय नाहीं त्याशी । तो नावडे ऋषीकेशी । व्यर्थ जन्मासी तो आला ॥१॥ देव धर्म नेणे कांहीं । धरी प्रपंचाची सोई । त्या कोठेंही थार नाहीं हें वेद बोलिलासे ॥२॥ कृष्ण कथा जो नायके । रामनाम न ह्मणे मुखें । तया सोस कोटी दुःखें । जन्म योनी भोगूं लागेल ॥३॥ ज्ञानदेवीं अभ्यास केला । सर्व संसार हा तारिला । रामकृष्णें भवपाश तोडिला । सर्व पितरांसहित ॥ ४ ॥

९८१. **नित्य धर्म नाम पाठ** । तोचि वैकुंठींची वाट । गुरु भजनीं जो विनट । तोचि हरिभक्तु जाणावा ॥१॥ धन्य धन्य त्याचा वंश । धन्य तो आला जन्मास । तयाजवळी हृषीकेश । सर्वकाळ नांदतु असे ॥२॥ रामकृष्ण स्मरण जप । तेंची तयाचें अमुप तप । तो वास करील कोटी कल्प । वैकुंठपीठ नगरीशी ॥३॥ ज्ञानदेवीं जप कला । हरि समाधीसी साधिला । हरिमंत्रें प्रोक्षिला । सर्व संसार निर्धारें ॥४॥

---

## संत.

९८२. **साखरेचा ऊस जरी होय पुढती** । मथितां घृतीं काय क्षीर निवडे ॥१॥ माघारें जीवन जरी वाहे सरिता । तरिच जन्मा येती हरिचे दास ॥२॥ विविधा मति भाक्ति जे करिती । ते अंतीं नव्हती संसार बापा ॥३॥ कापुराचे मसि जरी लिहिजे लिखित । तरि छाये पडे हात प्रकृतीचे ॥४॥ पवना पाठीं पांगुळें लागती । तैं जन्मा येति हरिचे दास ॥५॥ संत वैष्णव हरिदासा जे नर

निंदिती । ते वरपडे होती प्रेम किंकर ॥६॥ निवृत्तिदास म्हणे विठ्ठली जे भजती । ते जन्मा न येती भाक माझी ॥७॥

९८३. **अमृताची कुंडी निंद्रिस्तां मरण** । ह्मणें त्या दूषण बोलसी रया ॥१॥ वासना संग धीट प्रकृति कनिष्ठ । भोगूनी वैकुंठ जन्म घेती ॥२॥ तैसें नव्हे सारासार तत्त्व निवृत्ती । बुडउनि प्रवृति आपण नांदे ॥३॥ ज्ञानदेव बोले अमृत सरिता । सर्वांघटीं पुरता हरि नांदे ॥४॥

९८४. **उपजोनी नरदेहीं** । जयाशी हरिभक्ति नाहीं । तोचि भूमिभारू पाहीं । व्यर्थ जन्म त्याचा गेला ॥१॥ पशुप्राणी तया जोडी । नेघेचि हरिनाम कावडी । तो कैसेनि परथडी । नामेंवीण पावेल ॥२॥ जिव्हा बेडुकी चावट । विसरली हरिनाम पाठ । ते चुकले चुकले वाट । वैकुंठींची जाण रया ॥३॥ बाप रखुमादेवि निर्धार । नामें तरले सचराचर । जो रामकृष्णीं निरंतर । जिवें जपु करील रया ॥४॥

९८५. **रामकृष्ण जप सोपा** । येणें हरती जन्म खेपा । संसारू तुटेल महा पापा । धन्य भक्त तो धरातळीं ॥१॥ जया हरीची जपमाळी । तोचि पडिला सर्व सुकाळीं । तया भय नाहीं कदाकाळीं । ऐसें ब्रह्मा बोलियला ॥२॥ बापरखुमादेवी हरी । नामें भक्ताशीं अंगिकारी । नित्य सेवन श्रीहरी । तोचि हरीचा भक्त जाणावा ॥३॥

९८६. **हरिभक्त संत झाले हो अनेक** । त्यामाजी निष्टक कांहीं ऐक ॥१॥ शुक वामदेव शौनक नारद । अजामेळा प्रऱ्हाद बिभीषण ॥२॥ ध्रुव पराशर व्यास पुंडलिक । अर्जुन वाल्मिक अंबरीश ॥३॥ रुक्मांगद भीष्म बगदालभ्यसूत । सिब्री हनुमंत परिक्षिती ॥४॥ कश्यपादि अत्री गौतम वशिष्ठ । भारद्वाज श्रेष्ट मार्कंडेयो ॥५॥ बळी कृपाचार्य इंद्र सूर्य चंद्र । ब्रह्मा आदि इंद्र पूर्णरूक ॥६॥ सर्वांचा एक आहें मी किंकर । म्हणे ज्ञानेश्वर वैष्णवांसी ॥७॥

## स्वस्वरूपस्थिति.

९८७. **सहा चार अठरा धांडोळिती ज्यातें ।** परी नेणवे सखा तो जवळी असतां ॥१॥ सखा निजसुखाचा जवळी असतां । पुढें पहातां जाले वेडे चौघेजण ॥२॥ बोलों तरी आतां मौन्य पडिलें माये । शब्द हा न साहे सांगों कैसें ॥३॥ चिद्रुपाचा प्रकाश तोचि आनंदाचा साभास । गुणागुणी नाश नातळेचि ॥४॥ तें गिळुनीयां द्वंद्वासहित प्रपंचभास । तेथ स्थुळादि ब्रह्मांडास गिळुनी ठेले ॥५॥ ऐसिया सुख वस्ती आत्मप्रभा संविती । प्रकाशीं प्रकाश स्थिती पूर्ण ठेली ॥६॥ तेथ बिंब प्रतीबिंब भान । सरलें ज्ञानाविज्ञान । हाचि नवलाव जाण तयेठायीं ॥७॥ निवृत्तिदास ह्मणे ज्याचें तो जाणे । आतां जें बोलणें तोचि शिण ॥८॥

९८८. **आतां आपणया आपण विचारी ।** सेखीं प्रकृती ना पुरुष निर्धारीं रया ॥१॥ आतां प्रेतांचे अळंकार सोहोळले । कीं शब्दज्ञानें जे डौरले । दीप न देखती कांहीं केले । ऐसें जाणोनियां सिण न मानिती प्रतिष्ठा भोगिती भले रया ॥२॥ बापरखुमादेविवरा विठ्ठला देखतांचि जे बोधले । तेणें सुखें होउनि सर्वात्मक जें असतांचि देहीं विस्तारलें । येणें निवृत्तीरायें खुणा दाउनि सकळ बोलतां सिण ह्मणें होईल रया ॥३॥

९८९. **अवघाचि शृंगारू डोईचे दुरडी ।** डोळेचि मुरडी परतोनियां ॥१॥ देखिलें स्वरूप विठ्ठल नामरूप । पारुषेना चित्त त्याचे चरणाहुनी ॥२॥ बापरखुमादेविवरु विठ्ठल सुखनिधी । अवघीची उपाधी तुटली माझी ॥३॥

९९०. **ऐशिया माजी तो निज एकांतीं राहिला ।** विठ्ठल अनुसरला भावें एके ॥१॥ मित्य प्रळय निद्रिस्त नित्य प्रळय मृत्य । कल्पांतीं जीव जात मायाही नाहीं तेथ ॥२॥ तेंचि तूं होऊनि राहें विश्वाशी । ठायींच्या ठायीं निवसी अरे जना ॥३॥ तेथें नाहीं दुःख नाहीं तहान भूक । विवेका विवेक नाहीं तेथें ॥४॥ ऐसें तें पाहोनी तये तृप्ति राहोनी । तेंचि तूं जाणोनी होईं बापा ॥५॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलुगे माये । स्वस्वरूपीं राहे तये कृपा ॥६॥

**९९१. नाहीं जातिकूळ तुझें म्यां पुशिलें** । परी मन मावळलें देखोनियां ॥१॥ तुझेंचि कुवाडें सांगेन तुजपुढें । तेणें मुक्तीचीं कवाडें उघडती ॥२॥ दुजापाशीं सांगतां वाटे लाजिरवाणें । हांसतील पिसुणें प्रपंचाचीं ॥३॥ आतां उगवितांचि भलें नुगवितां सांपडलें । ज्ञानदेव बोले निवृत्तीशी ॥४॥

**९९२. अवघा सुखरूप अवघाचि रूपीं** । आवघाचि आपीं धरुनी ठेला ॥१॥ नाम तें अवघें उच्चारिसी वेगें । येर तें वाउगें कर्महीन ॥२॥ निवृत्ति गुरुप्रसादें नामीं निमग्न । नाम म्हणतां यज्ञ कोटी रया ॥३॥

**९९३. मन हें धालें मन हें धालें** पूर्ण विठ्ठलचि झालें । अंतर-बाह्य रंगुनि गेलें विठ्ठलची ॥१॥ विठ्ठल म्हणतां हरलें पाप पदरीं आलें पुण्य माप । धाला दिनाचा मायबाप विठ्ठलची ॥२॥ विठ्ठल जळीं स्थळीं भरला ठाव कोठें नाहीं उरला । आज म्यां दृष्टीनें पाहिला विठ्ठलची ॥३॥ ऐसा भाव धरुनी मनीं विठ्ठल आणिला निजध्यानीं । अखंड वदो माझी वाणी विठ्ठलची ॥४॥ तो हा चंद्र-भागे तीरा पुंडलिकें दिधला थारा । बापरखुमादेविवरा जडलें पायीं विठ्ठलची ॥५॥

## कर्मविधिनिषेध.

**९९४. पृथःकारे कर्म आचरितां** । विधि जिज्ञाशी काय सत्ता । अष्टादश पराणें नानामतें आचरतां । परि तयांसी विधि विवेक न कळे तत्वता । कर्म कळा जयाची वाचा उच्चारितां । ऐशी नाना द्वंद्वें उपाधिकें जल्पती परि एकही नेणे तेथींची वार्ता रया ॥१॥ ऐशी भ्रांती साम्य बोलती सकळे । परि नकळे पूर्ण सत्ता रया ॥२॥ निजब्रम्ह बुद्धि नेणसी । गव्हारा वाउगा का शिणशी । या साठीं भ्रमुनियां बरळशी। पहिले नव्हे तुजसंकल्पें करिशी नाना गोष्टी रया ॥३॥ आतां अथातो धर्म जिज्ञासा ब्रम्ह जिज्ञासिक वचन। हें तंव वेदींचे प्रमाण। तरी वेदे जें वदावितें नकळे वेद कळा लय लक्ष धारण। पूजा समाधीचेनि यज्ञ यागादिकें कर्मैं । जपतप अनुष्ठान नाना उपासना

मंत्रयंत्रादि साधनें। धांडोळितां परि तें एकही न घडे ब्रह्म जिज्ञासिक वचन। येणें सुखासाठीं बापा होशी पैं हिंपुष्टी स्वानंद जीवन सुख आहे आन रया ॥४॥ नाना अर्थवाद उपाधि शब्दज्ञानें तेणें। केविं शुद्ध होती यांचीं मनें। नाना मुद्रा संकल्पाचिया वाढवितां तेणें। केविं पाविजे ब्रम्हज्ञानें। मी ब्रम्ह ऐसें शब्दें वाखाणुं जाशी तरीं तेणें। ब्रम्ह ऐसें केविं होणें। ब्रम्हाहंमस्मी बोध वाचे उच्चारितां हेंही अहंकाराचें लेणें। आतां परतें सकळही वाव जाणोनियां कांहीं आपलें स्वहित करणें। बापरखुमादेविवर विठ्ठल चिंतितां निज-सुखाशी येऊं नेदी उणें ॥५॥

९९५. **बहुशास्त्र जल्पणें वेद त्रिकांडपणें**। बोलती लक्षणें त्रिविधमुक्ती ॥१॥ नानामतें उत्सृंखळे म्हणोनि जासि विकळे ययापरी ॥२॥ ह्मणोनि तया वाटा जाऊं नको अव्हाटा। या संकल्पा फुकटा येवों नेदी ॥३॥ परतोनीयां पाहीं करीं आठवण। तूं आहेसी कोण विचारीं पां ॥४॥ विचारुनी निरुतें संत संगें पंथें। जन्ममृत्यु तूंतें न बाधी कांहीं ॥५॥ म्हणोनि यम नियम प्राणायाम प्रत्याहार आटणि। वाउगाचि बांधोनि सिणसी कां पां ॥६॥ ऐसें गंधर्वपुर कीं मृगजळावें नीर। येथींचा विचार क्लेसी क्षीदक्षीण न करीं बापा ॥७॥ मतें या भ्रामकें वेश्याचेनी सुखें। पालट एके सोंगें जाली ॥८॥ क्षीरनिरा निवाड याचेनि नव्हे कांहीं। निजगुरू पाही तो विरळा असे ॥९॥ म्हणोनि याच्या चरणीं घालोनियां मिठी। निजपदीं बैसवी शेवटीं तुज ॥१०॥ आतां सांडि मांडि न करी निश्चय एक धरी। तूं आत्म निर्विकारी सदोदित ॥११॥ म्हणोनि तूं सर्वगत सर्व साक्षी सुख। तेथें पंचभूती नातळेचि ॥१२॥ आतां न करी तूं अनुमान ज्ञान ना विज्ञान। स्वयें सिद्धी आपण होउनि राहे ॥१३॥ हेचि पुढता पुढती सांगों तूज किती। श्रुती नेती नेती मौन्यावल्या ॥१४॥ निवृत्तीदास म्हणे अनुभवी तो जाणे। येरा लाजिरवाणे टकमक ॥१५॥

९९६. **पदत्रयादि विलक्षण नातळे वर्णावर्ण**। पंचभूतिकपण नातळे ज्यासि ॥१॥ ते स्वयं प्रमाणें घनावलेनपणें। द्वैताद्वैत नेणे

तैसें आहे ॥२॥ नामरूपाचा भेद तुटलासे संबंध । स्वयें निजानंद भोगी बापा ॥३॥ सारुनि लक्ष लक्षणा शास्त्राचा उगाणा । तेथ वेदादि षदर्शना नुमगे पाहीं ॥४॥ तयामाजि तें असतसे निरुतें न चोजवे पंथें नवल ज्याचें ॥५॥ म्हणोनियां परिसा चौंचीचि उजरी । तेंचि निर्विकारी प्रकाशलें ॥६॥ निवृतिदास ह्मणे हा निजभाव । बोलों नये ठाव तैसें जालें ॥७॥

## नामग्रहण.

९९७. **जप तप अनुष्ठान** । नित्य आमुचें रामधन । रामकृष्ण नारायण । हाचि जिव्हार सर्वदा ॥१॥ जयाशीं अमृत घट । रामकृष्ण घडघडाट । हेचि पूर्वजाची वाट । सर्व जिवाशी तारक ॥२॥ गोविंद गोविंद राम । सर्व साधिलें सुगम । नलगे ती तपें उत्तम रामकृष्ण पुरे आम्हां ॥३॥ ज्ञानदेवि स्नान ध्यान । रामराम नारायण । इतुकेंचि पुरे अनुष्ठान । हेंचि जीवन शिवाचें ॥४॥

९९८. **समाधि धन्य रामनामें** । आम्हां सर्व कर्मं समे । कृष्ण वाचे नित्य नेमें । जिव्हे पाठ हरी गोविंद ॥१॥ हेचि तारक पाठांतर । नित्य समाधीचें घर । शिव शंभूसी निरंतर । जपमाळ सर्वदा ॥२॥ जीवाचें जीवन श्रीहरी । चिंता प्राणी याची हरी । अंतीं चतुर्भुज करी । सर्व श्रीहरी माझा तो ॥३॥ ज्ञानदेव सर्वांपरी । यंत्र साधिलें श्रीहरी । वैकुंठीचा विहारी । हृदयांतरीं घातला ॥४॥

९९९. **सकळ सांप्रदाय श्रीहरी** । जो बैसोनि जप करी । जिव्हे महादेवाचे अंतरीं । सर्वकाळ वसतसे ॥१॥ रामनामें जप करी । तोचि तरे भवसागरीं । पितरां सहित निर्धारीं । वैकुंठपुरीं पावले ॥२॥ नित्य सत्य समाधान । निर्मळ करावें मन । नित्य तयासी नारायण । वैकुंठवास करील ॥३॥ बापरखुमादेविवर सिद्धि । तरुणोपाय हेचि बुद्धि । कृपा कराल कृपानिधी । ऐशिया भक्तांशीं जाणावें ॥४॥

**१०००. धर्म वसे जेथें। सर्व कार्य होय तेथें** । पित्या सहित मनोरथें। सिद्धि पावेल सर्वथा॥१॥ धन्य धन्य पितृव्रत। धन्य धन्य

धर्मे कृतार्थ । धन्य धन्य वेदाचा मतितार्थ । रामकृष्ण मुखीं नाम ॥२॥ जंववरी आयुष्य आहे। तंववरी हरीची सोये । हरी हरी मुखीं राहे। तो सुखी होय अंतीं देखा ॥३॥ ज्ञान ध्यानें निवे संध्या। ज्ञान-विज्ञान हाचि धंदा । रामकृष्ण हरी मुकुंदा । परमानंदा जगद्‌गुरू ॥४॥ ज्ञानदेवें सुकाळ केला । हरी हृदयीं सांठविला । हरिपाठ हाचि साधिला अनंत अनंत परवडी ॥५॥

**१००१. पतीत पावन श्रीहरी। रामकृष्ण मुरारी** । या वाहे चराचरीं । तो एक स्वामी जी आमुचा ॥१॥ धन्य धन्य आमुचें जन्म मुखीं रामराम उत्तम । जया रामनामें प्रेम । तोचि तरेल सर्वथा ॥२॥ आयुष्य जाऊं नेदी व्यर्थ हरीनामीं जो आर्त । हरि-वीण नेणें आणीक । पंथ धन्य जन्म तयाचा॥३॥ज्ञानदेवें नेम केला। श्रीहरी हृदयीं सांठविला । त्यांनीं संसार अबोला आला । देह खचला संतसंगें ॥४॥

॥ श्रीविठ्ठल ॥

# श्रीसोपानदेवमहाराज.

## पंढरीमाहात्म्य.

१. उघडली दृष्टी इंद्रियां सकट । वैकुंठीची वाट पंढरी जाणा ॥१॥ दृष्टीभरी पाहें विठ्ठल दैवत । पूर्ण मनोरथ विठ्ठलदेव ॥२॥ हाचि मार्ग सोपा जनासी उघड । विषयाचें जाड टाकीं परतें ॥३॥ सोपान ह्मणे गुंफसी सर्वथा । मग नव्हे उलथा भक्तिपंथें ॥४॥

## पंढरींतील काला.

२. चलारे वैष्णवहो जाऊं पंढरीसी । प्रेमांमृत खूण मागों त्या विठ्ठलासी ॥१॥ चालिले गोपाळ वाताती वाकुलिया । भरले प्रेमरसें मग ते वाताती टाळिया ॥२॥ दिंडया गरुडटके मृदंगाचे नाद । गाताती विठ्ठलनाम करिताती आल्हाद ॥३॥ पावले पंढरी भीमा देखियेली दृष्टी । वैष्णवाचा गजरु आनंदें हेलावली सृष्टी ॥४॥ गजरु गोपाळांचा श्रवणीं पडियेला । शंखचक्र करीं विठ्ठल सामोरा आला ॥५॥ कांसवदृष्टी न्याहाळी तूं रंगीं नाचतु पैं उगला । सोपान ह्मणे आह्मीं वाळुवंटीं केला काला ॥६॥

## नाममहिमा.

३. आणिक ऐकें गा दूता । जेथें रामनाम कथा । तेथें करद्वय जोडूनी हनुमंता । सदा सन्मुख असिसे ॥१॥ रामनाम चाले घोषु । तो धन्य देशु धन्य दिवसु । प्रेम कळा महा उल्हासु । जगन्निवासु विनावितुसे ॥२॥ दिंडया पताका मृदंग । टाळ घोष नामें सुरंग । तेथें आपण पांडुरंग । भक्तसंगें नाचत ॥३॥ तया भक्ता तिष्ठती मुक्ती ।

पुरुषार्थ तरी नामें कीर्ति । रामनामीं तया तृप्ती । ऐसें त्रिजगतीं । यमु सांगातु ॥४॥ ज्या नामें शंकर निवाला । गणिका अजामेळ पद पावला । अहिल्येचा शाप दग्ध जाला । तोची पान्हा दिधला पांडुरंगें ॥५॥ चित्रगुप्त म्हणती यमा । काय करावें गा धर्मा । लोक रातले रामनामा । पुरुषोत्तमा विठ्ठल देवा ॥६॥ कळिकाळासी दाटुगें नाम । रुद्रें धरिलें महा प्रेम । त्रिभुवनीं विस्तारिलें सप्रेम । रामनाम उच्चारी यम तोही तरला जाणा ॥७॥ ऐसें नाम अगाध बीज । उच्चारी तो होय चतुर्भुज । सोपान म्हणे हें गुज । उमाशंकर देवाचें८

४. **सर्वकाळ ध्यान हरिरूप ज्याचें** । तया सर्व रूप साचें जवळी असे ॥१॥ हरी हरी जाला प्रपंच अबोला । हरीसुखें निवाला तोचि धन्य ॥२॥ हरी हेंचि मन संपन्न अखंड । नित्यता ब्रह्मांड त्याचे देह ॥३॥ सोपान विदेही सर्वरूपीं बिंबतु । हरी रूपीं रतु जीव शिवा ॥४॥

५. **मनाचे मवाळ हरिरूप चिंतिती** । रामकृष्ण मूर्ति नित्य कथा ॥१॥ रामकृष्ण ध्यान सदा पैं सर्वदा । न पवेल आपदा नाना योनी ॥२॥ हरि ध्यान जप मुक्त पैं अनंत । जीव शिवीं रत सर्वकाळ ॥३॥ सोपान प्रेमा आनंद हरीचा । तुटला मोहाचा मोहपाश४

६. **आवडीचें मार्गें प्रवृत्तीचें नेघे** । नाममार्गें वळगें निघें रया ॥१॥ नाम परब्रह्म नाम परब्रह्म । नित्य रामनाम जपीजेसु ॥२॥ अंतरींच्या सुखें बाहिरिलिया वेखें । परब्रम्ह सुखें जपतुसें ॥३॥ सोपान निवांत रामनाम मुखांत । नेणें दुजी मात हरीविण ॥४॥

७. **सबाह्य कोंदलें निवांत उगलें** । रामरसें रंगलें अरे जना ॥१॥ हरि राम कृष्ण हरि राम कृष्ण । दिननिशीं प्रश्न मुखें करा ॥२॥ तरा पैं संसार रामनामें निरंतर । अखंड जिव्हार रामरसें ॥३॥ सोपान जपतु रामनामीं रतु । निरंतर स्मरतु रामकृष्ण ॥४॥

८. **अव्यक्ताच्या घरीं प्रकृति कामारी** । निघे माझ्या घरीं दडोनियां ॥१॥ तैसें नका करूं प्रगट सर्वेश्वरु । हरिनाम उच्चारु जपा वाचे ॥२॥ विज्ञानीं पैं ज्ञान आटलेंसे पूर्ण । उभयतां चैतन्य तैसा हरि ॥३॥ सोपान निवांत रामनामीं रत । संसार उचित रामनाम ॥४॥

९. **मोक्षालागीं धन वेंचावें नलगे ।** रामकृष्ण वोळगे जपीजेसु ॥१॥ रामकृष्ण मुखें तया अनंत सुखें। तो जाय विशेषें वैकुंठभुवना ॥२॥ वेगाचेनि वेगें जया लागवेगें। प्रपंच वाउगे हरिनामें ॥३॥ सोपान संचित रामनामामृत। नित्यता सेवित हरिकथा ॥४॥

१०. **ज्याचे मुखीं हरि तोचि धन्य ये जगीं ।** तरला पैं वेगीं वेदु बोले ॥१॥ हरि हाचि आदठा तत्व पैं सोहपें। हरितील पापें हरिनामें ॥२॥ वैकुंठींचें सुख नलगे पैं चित्तीं । हरि हेचि मूर्ति विठ्ठल ध्यावो ॥३॥ याचेनि स्मरणें कैवल्य साचार । सोपान विचार हरि जपे ॥४॥

११. **हरिनाम जपें सहस्रवरि सोपें।** जातीलेर पापें अनंत-कोटी ॥१॥ हरिविण नाम नाहींपारे सार। दुसरा विचार करूं नको ॥२॥ हरि ध्यान चोख पवित्र परिकर । नित्यता शंकर हरिध्यानीं ॥३॥ सोपान ह्मणे हरि जप करारे सर्वथा। न पवाल व्यथा भवजाळीं ॥४॥

१२. **रूप हें सांवळें भोगिताती डोळे ।** उद्धवा सोहळे अक्रुरासी ॥१॥ पदरज वंदी ध्यान तें गोविंदीं। उद्धव मुकुंदीं तल्लीनता ॥२॥ विदुर सुखाचा नाम जपे वाचा। श्रीकृष्ण तयाचा अंगीकारी ॥३॥ निवृत्तीचें ध्यान ज्ञानदेव खूण । सोपान आपण नामपाठ ॥४॥

---

## आपल्या स्थितीसंबंधानें देवाशीं उद्गार.

१३. **कृष्णाचिया पंथें चालिलों दातारा।** तंव मार्ग येकसरा तुज-माजी ॥१॥ आदि ब्रह्ममूर्ति तूंचि विष्णु स्थिती । तुज कैवल्यपति मोल नाहीं ॥२॥ अमोल्य जे वस्तु पुंडलिक देवा । जगाचा वि-सावा जनकु माझा ॥३॥ सोपान ह्मणे सांकडें तुजचि सर्व कोडें । विनावितु मी वाडें चरणापाशीं ॥४॥

१४. **राम कृष्ण मूर्ति या पुजीतसे भावें ।** सवें तुवांचि व्हावें केजीराजा ॥१॥ रामनाम ह्मणे नित्य काळ सदां। नेणें दुजा धंदा तुजवीण ॥२॥ माहेर आठवे करितां कामना। तुझ्या चरणीं वा-

सना जडोनि ठेली ॥३॥ सोपान म्हणे सरतें तुजचि आवडतें। माझ्या मनोरथें तुझी आशा ॥४॥

**१५. मी नेणें भक्ति नेणें त्या मुक्ति** । तुझ्या नामपंथीं मार्गु मना ॥१॥ हेंची मज चाड न करीं मी आशा। तुज हृषीकेशा चिंतितुसें ॥२॥ तूंची माझें धन जोडी हे निजाची। जननी तूं आमुची जीवलगी ॥३॥ सोपान ह्मणे तुजविण न कळे। तुजमाजी सोहळें मनें केलें ॥४॥

**१६. सर्वघटीं रूप समसारिखें आहे** । ह्मणोनियां ते सोय आह्मां भक्तां ॥१॥ निर्गुणीं सगुण गुणांमाजी गुण । जन तूं संपूर्ण दिससी आह्मां ॥२॥ तेंची रूप रूपस दाविशी प्रकाश। पंढरीनिवास होऊनी ठासी ॥३॥ सोपान सलगी न बोलतां उगा। तुजविण वाउगा ठावो नाहीं ॥४॥

**१७. सागरींचें तोय जगा निवारीत** । मागुतें भरत पूर्णपणें ॥१॥ तैसे आम्ही दास तुजमाजी उदास। तूं आमुचा निवास सर्व देवा ॥२॥ तुजमाजी विरों सुखदुःख विसरों। तुझ्या नामें तरों येची जन्मीं ॥३॥ सोपान निकट बोलोनि सरळ। तुष्टला गोपाळ अभय देत ॥४॥

---

## आपल्या स्थितीसंबंधानें जनांशीं उद्गार.

**१८. हरिसुखवेषें नाचोत सर्वदा** । गोविंद परमानंदा हरिबोधें ॥१॥ रामकृष्ण हरी या नामीं आनंदु। नित्यता गोविंदु आह्मां घरीं ॥२॥ निर्गुण नेणों सगुण आचार। सर्वकाळीं नर ब्रह्मरूप ॥३॥ सोपान पादप अवघेंचि हरिरूप। हरिविण स्वरूप नेघे चित्तीं ॥४॥

**१९. गोपाळ अच्युत हा नाममहिमा** । नित्यता पूर्णिमा आह्मां देहीं ॥१॥ रामकृष्ण नाम हा जप परम। ऐसा नित्य नेम सारूं रया ॥२॥ वासना वोढाळ नेघे पैं बरळ। नित्यता अढळ गोपाळ-सेवूं ॥३॥ सोपान सार जपतुसे नाम। दिननिशीं नेम हृदयांतु ॥४॥

**२०. गोविंद माधव हा जपु आमुचा** । नाहीं प्रपंचाचा आह्मां लेशु ॥१॥ गोविंद स्मरणें नित्यता पारणें। हरिनाम पठणें मोक्ष-मुक्ति ॥२॥ नलगती तीर्थें एक गोविंद पुरे। वेगीं कृष्ण धुरें

वोळगों सदा ॥३॥ सोपान सांगत गोविंद स्मरणें। नित्यता पैं ध्यान गोविंद ऐसें ॥४॥

२१. **विठ्ठल पैं सार हा जपु आमुचा** । अनित्याशी वाचा नित्यनेमु ॥१॥ गोविंद श्रीहरि हेंचि तो उच्चारी । शिव चराचरीं आत्मारामु ॥२॥ नामेंविण नेणें दुजयाची मातु । गोविंद स्मरतु शिवराणा ॥३॥ सोपान धारणा गोविंद पाठाचि । कोटि पैं कुळांची कुळवटी ॥४॥

२२. **हरिविण दुजें न देखे चित्त माझें** । म्हणोनि सहजें विचरतु ॥१॥ सर्व हरि हरि तो माझा कैवारी । दुजी भरोवरी नेघों आह्मी ॥२॥ राम हा सकळ आह्मां सर्व आहे । दुजें तें न साहे परब्रह्मीं ॥३॥ सोपान सलगी विनवितो तुम्हां । सर्व हा परमात्मा आम्हां दिसे ॥४॥

२३. **हरिवीण दुजें नावडे पैं दैवत** । ऱ्हीही तो समर्थ बोले सृष्टि ॥१॥ हरिराम गोविंद नित्य हाचि छंद । हृदयीं आनंद प्रेमबोधु २ हरी हेंचि दैवत समर्थ पैं आमुचें । बोलणें वेदाचें बोलती मुनी ३॥ सोपान आलगटु नामपाठ वाचे । नित्य विठ्ठलाचे चरण हृदयीं ॥४॥

---

## निवृत्तिनाथप्रसादानें प्राप्त झालेली स्थिति.

२४. **नाहीं नाहीं भान न दिसे प्रपंच** । रोहिणी आहाच मृगजळ ॥१॥ तुटलासे सांठा वासना चोखाळ । दिननिशीं फळ राम जाला ॥२॥ रामेंविण दुजें नाहीं पैं हो बिजें । बोलतु सहजें वेदु जाणा ३ निवृत्ति खुणा ज्ञानदेवा हरी । सोपान झडकरी झोंबियेला४

२५. **तुझा तूंचि थोर तुज नाहीं पार** । आमुचा आचार विठ्ठलदेव ॥१॥ आपीं सधर सर्व हा श्रीधर । सर्व कुळाचार पांडुरंग॥२॥ न दिसे दुसरें निर्धारितां खरें । श्रीगुरुविचारें कळलें आह्मां ॥३॥ सोपान म्हणे रखुमादेविवर । तूंचि आमुचें पर कुळवटीं ॥४॥

२६. **मी माझी कल्पना पळाली वासना** । जनीं जनार्दना सेवीतुसे ॥१॥ तूं तंव संपन्न आमुचें हो धन । सांगितली खूण निवृत्तीदेवीं ॥२॥ तुजमाजी प्रेम गेलें सप्रेमें । जप व्रत नेम

हारपलें ॥३॥ सोपान सगळा न दिसे इहीं डोळां । तूंचि बा गोपाळा आत्माराम ॥४॥

२७. **आत्मरूप सखा आत्मपणें चोख** । निर्गुणींचें चोख सगुणीं जालें ॥१॥ रूप अरूप रूपामाजी सर्व । रूपीं भावाभाव नाठवती ॥२॥ बुडाले सगुण नाहीं मी तूं पण ॥ अंतरींची खूण मावळली ॥३॥ सोपान गुरूतें तें ब्रह्म पुरतें । पुसोनि आरुतें ठाकीयेली ॥४॥

२८. **पहाते न नटे मन तिये वाटे** । बोलणेंची खुंटे बोलणेंपणें ॥१॥ परतल्या श्रुती पडियेलें मौन । शास्त्र तें संपन्न नेणे तया ॥२॥ गेला तो आचार आवघाची विचार । परे परता पर परब्रह्म ॥३॥ सोपान दयाळ गुरूनामें बळ । आपण निखळ आपरूपें ॥४॥

२९. **दिन व्योम तारा ग्रहगण शेखीं** । एक हृषीकेशी सर्व आह्मां ॥१॥ ब्रह्मेंविण नाहीं रिता ठावो पाहीं । निवृत्तीच्या ठायीं बुडी देत ॥२॥ सर्व हें निखळ आत्माराम सर्व । नाहीं देहभाव विकल्पता ॥३॥ सोपान निकट गुरुनाम पेठ । नित्यता वैकुंठ जवळी असे ॥४॥

३०. **आह्मी नेणों माया नेणों ते काया** । ब्रह्म लवलाह्या आह्मां माजी ॥१॥ मीं तूं गेले ब्रह्मीं मन गेलें पूर्णीं । वासना ते जनीं ब्रह्म जाली ॥२॥ जिवशिवभाव आपणचि देव । केला अनुभव गुरुमुखें ॥३॥ सोपान ब्रह्म वर्ततसे सम । प्रपंचाचा भ्रम नाहीं नाहीं ॥४॥

३१. **दुजेपणीं ठाव द्वैत तें फेडिलें** । अद्वैतीं बिंबलें तेजोमय ॥१॥ तेजाकार दिशा बिंबीं बिंब एक । निवृत्तीनें चोख दाखविलें ॥२॥ निमाली वासना बुडाली भावना । गेली ते कल्पना ठाव नाहीं ॥३॥ सोपान नैश्वर परब्रह्म साचार । सेवितु अपार नाम घोटें ॥४॥

३२ **तिहींचे त्रिगुणें रजतममिश्रित** । त्यामाजि त्वरित जन्म माझा ॥१॥ पूर्व पुण्य चोख आचरलों आह्मी । तरिच इये जन्मीं भक्ति आम्हां ॥२॥ शांति क्षमा दया निवृति माउली । अखंड साउली कांसवदृष्टी ॥३॥ सोपान ह्मणे तें जगा जीवन मोल । भिवरा विठ्ठल दैवत आह्मां ॥४॥

---

## उपदेश.

३३. **हरि असे देहीं हाचि भावो खरा ।** वायां तूं सैरा धांवूं नको ॥१॥ धांवतां अवचटें पडशील व्यसनीं । संसारघसणीं योनिमाळे ॥२॥ हरिचेंनि ध्यान निरंतर करीं । बाह्य अभ्यंतरीं एकु रामु ॥३॥ सोपान म्हणे राम नांदे सर्वां घटीं । विश्वीं जगजेठी क्षरलासे ४

३४. **हरि नांदे देहीं ऐसा भावो आहे।** परतोनि पाहें अरे जना ॥१॥ परतलिया दृष्टी चैतन्याची दृष्टि । नामेंच वैकुंठीं पावे जना २ हा बोधु श्रीरंगीं अर्जुना उपदेशु । सर्व हृषीकेशु सर्वा रूपीं ॥३॥ सोपान धारणा हरि नांदे सर्वत्र । त्याचेंचि चरित्र क्षरलेंसे ॥४॥

३५. **हरिविण भावो न धरावा पोटीं।** सर्व भावें सृष्टि एका तत्त्वें ॥१॥ तत्वता श्रीहरि सर्वा घटीं आहे । उभारोनि बाहे वेद बोले २ हरिविण नाहीं जीव शिव पाहीं । शिवाच्याही देहीं आत्मा हरी ३ सोपान म्हणे हरीविण नाहीं तत्त्व । हरि हाचि सर्वत्त सर्वीं वसे ॥४॥

३६. **शरीर निर्मळ वासना टवाळ ।** कां रे तूं बरळ भक्तिवीण ॥१॥ सर्व ब्रह्म निर्मळ नेणसि सोंवळें । एकाचि गोपाळें जन वन ॥२॥ आप पृथ्वी तेज वायो व्योम । पंचभूतीं सम वर्ततसे ॥३॥ सोपान म्हणे गुरूचा उपदेश शुद्ध । तरीच वासना प्रबुद्ध तया नरा ॥४॥

३७. **मन आधीं मुंडीं वासनेतें खंडीं ।** विठ्ठल ब्रम्हांडीं एक आत्मा ॥१॥ मन हें सोंवळें सदा शौच करी । तुज निरंतरीं हरि पावे ॥२॥ विवेक वैराग्य ज्ञानाचें सौभाग्य । सोंवळा आरोग्य हरि देखा ॥३॥ सोपान नेणें सलगीचा सोंवळा । नित्य वेळोवेळां स्मरे हरी ॥४॥

३८. **पृथ्वी सोंवळी आकाश सोंवळें ।** मन हें वोंवळें अभक्तांचें ॥१॥ ब्रह्म हें सोंवळें न देखों वोंवळें । असों खेळमेळें इये जनीं ॥२॥ ब्रह्मांड पंढरी सोंवळी हे खरी । तरसी निर्धारीं एक्या नामें ॥३॥ सोपान अखंड सोंवळा प्रचंड । न बोलें वितंड हरिविण ॥४॥

## ज्ञान.

३९. **राम सर्वोत्तम या नामें निखळ ।** जन हें सफळ दिसताहे ॥१॥ भिन्न नाहीं दुजे सर्व आतमराज । नाचताती भोज योगीराज

॥२॥ माता पिता देव गृह दारा जन । सर्व जनार्दन सर्वारूपीं ॥३॥ सोपान खेचर ब्रह्म माजिवडे । ब्रह्मांडा येवढे आत्माराम ॥४॥

४०. **काढलें कुटाळ वासना बरळ** । सर्व हा गोपाळ भरियेला ॥१॥ गेलें पैं परतें शरीर हें रितें । नाशिवंत भूतें दुरी केलीं ॥२॥ स्थावर जंगम स्थावरिला राम । सर्वगत शाम निःसंदेहें ॥३॥ सोपान विनटे परब्रह्म घोटे । प्रपंच सपाटे निवटियेला ॥४॥

४१. **हरी असे देहीं सर्वकाळ संपन्न** । म्हणोनी चिंतन निरंतर ॥१॥ हरिविण नाहीं हरिविण नाहीं । क्षिशाद्रुम पाहीं बिंबलासे ॥२॥ हरिविण देवो नाहीं अन्य भावो । हरि असे सर्व देहभावीं ॥३॥ सोपान सांगतु हरि सर्वत्र वसे। भाग्यवंत दिसे सर्व काळ ॥४॥

४२. **पाहाणें परिसणें नादरूपीं गेलें**। निराकार ठेलें एकतत्त्वेंसी ॥१॥ एकतत्वेंसी हरी एक रूप माझा । भिन्नभाव दुजा नाहीं नाहीं ॥२॥ संग परिकर सांपडला आम्हां । सर्व आत्मारामा पूर्णपणें॥३॥ सोपान देव्हडें मन माजिवडें । ब्रह्मांड येवढें गिळियेलें ॥४॥

४३. **नाद रूप ठसा निरालंब जाला** । सगुणीं उदेला तेजाकार ॥१॥ तेजरूप तेजीं आपरूप काजीं । जीवशिव भोजीं नांदत आहे ॥२॥ राहातें पाहातें जिवातें पोखितें । आपणची उखितें दिसे एक ॥३॥ सोपानीं नलगे प्रपंची वियोग । ब्रह्मार्पण भोग नुरे तोही ॥४॥

४४. **नाद रसीं लीन ब्रह्म सामावलें** । त्यामाजि सानुलें मन चोख ॥१॥ मन हें निकट ब्रह्मरूपें चोख । ब्रह्मीं ब्रह्म लेख एकपणें ॥२॥ साशंकित गावो जाला परिमाण । घट मठ दिन हारपला॥३॥ सोपान सोपारें निरालंब निर्धारें । नंदाचें गोजिरें माजि खेळे ॥४॥

४५. **नाद ब्रह्म मुसें नादरूप वसे** । तैसा जनीं दिसे आत्मपणें ॥१॥ बाहेर साबडा आत्मा दिसे उघडा । मातियेचा वेढा जीवनालागीं ॥२॥ तैसें हें शरीर आत्मपणें नीट । मन हें निकट चोखाळपणें ॥३॥ सोपान साजिरें ब्रह्म तें गोजिरें। जीवन साकारें ब्रह्म हेतु ॥४॥

४६. **शांति दया क्षमा तेथील उपाया** । निर्गुणीं ते माया आपरूप ॥१॥ ज्योतिरूप छाया सर्व हें निर्गुण । आत्मारामीं भिन्न नाहीं नाहीं ॥२॥ मौन्य परे मिठी पश्यंतीसी नुठी । मध्यमेच्या

बेटीं खुंटे तारूं ॥३॥ सोपान वैखरी देहामाजी भारी । पूर्ण तो श्रीहरी बिंबीं बिंब ॥४॥

४७. **वैकुंठ सगळें न करूं आगळें** । मन ब्रह्ममेळे एक ठेलें॥१॥ उपमे वैकुंठ ब्रह्म हें तत्त्व बीज । सूचना अखंड सर्वांभूतीं ॥२॥ उदयोस्तु परिमाण ब्रह्म । चंद्र सूर्य नेम हारपलें ॥३॥ सोपान तो क्षेत्री जन हेंची क्षेत्र । तेथें तो विचित्र हारपला ॥४॥

४८. **ज्ञानदेवीं ज्ञान नाहीं तेथें भिन्न** । प्रपंचाचें भरण तेथें नाहीं ॥१॥ स्वरूपाची खूण होउनी सकळ । भोगी सर्वकाळ चित्सत्ता ॥२॥ आत्मा परमात्मा भेदाभेद द्वंद्व । एकतत्व अभेद जनीं वनीं ॥३॥ सोपान दीपन दिपीं तें जीवन । तयामाजी मन एक झालें ॥४॥

४९. **निःकाम निश्चळ निश्चित स्वरूप** । तेथें निर्विकल्प मन गेलें ॥१॥ ध्येय गेलें ध्यान ध्याता माजी पूर्ण । आपण सनातन होउनी ठेला ॥२॥ निर्गुण निरालंब निर्विकार फळ । आपणाचि सकळ होउनी ठेला ॥३॥ सोपान जिव्हाळें मनाचें तें आलें । परब्रह्म सांवळें तयामाजी ॥४॥

५०. **आपरूप हरी आपणचि देव** । आपणची भाव सर्व जाला ॥१॥ सर्व हरी हरी बाह्य अभ्यंतरीं । एक चराचरीं आत्माराम ॥२॥ सर्व काळ सम नाहीं तेथें विषम । आपणची राम सर्व ज्योती ॥३॥ सोपान तिष्ठत रामनामीं लीन । मन तेथें मौन्य एकपणें ॥४॥

५१. **हरिवीण नाहीं वेदादिकां मती** । श्रुती त्या संपती जया रूपीं ॥१॥ हरी हाचि सर्व उपनिषद भाव । रोहिणीचि माव जनीं दिसे ॥२॥ सर्वघटीं राम जीवशिव सम । सर्वरूपें ब्रह्म भरलें सदा ॥३॥ सोपान निकट परब्रह्म सेवी । सर्व हा गोसावी विठ्ठलराज ॥४॥

## घोंगडी.

५२. **घोंगडिया साठीं पंढरीये पेठीं** । वैष्णवाची दाटी होती तेथें ॥१॥ घोंगडियांचें मोल पैं खरें । रामटका देई एक पुरे ॥२॥ घोंगडिया घोंगडिया पाड दाविती । एक एक दाविती एकापुढें ॥३॥ सोपान घोंगडी घडी केली । चरणीं राहिली निवृत्तीच्या ॥४॥

॥ श्रीविठ्ठल ॥

# श्रीमुक्ताई.

## पंढरीमाहात्म्य.

**१. मुक्त जीव सदा होति पैं नामपाठें** । तेंचि रूप विटे देखिलें आम्हीं ॥१॥ पुंडालिकें विठ्ठल आणिला पंढरी । आणूनि लवकरीं तारिलें जग ॥ २ ॥ ऐसें पुण्य केलें एका पुंडालिकेंची । निरसली जनाची भ्रमभूली ॥३॥ मुक्ताई चिंतनें मुक्त पैं जाली । चरणीं समरसली हरिपाठें ॥४॥

**२. शून्यापरतें पाही तंव शून्य तेंही नाहीं** । पाहातें पाहोनि ठायीं ठेवियलें ॥१॥ कैसागे माये हा तारकु दिवटा । पंढरीं वैकुंठा प्रगटला ॥२॥ न कळे याची गती आदि मध्य अंतीं । जेथें श्रुति नेति नेति प्रगटल्या ॥३॥ मुक्ताई सप्रेम विठ्ठल संभ्रम । शून्याही शून्य सम शेजबाज ॥४॥

**३. प्रकृति निर्गुण प्रकृति सगुण** । दीपें दीप पूर्ण एका तत्त्वें ॥१॥ देखिलेंगे माये पंढरिपाटणीं । पुंडलिका आंगणीं विठ्ठलराज ॥२॥ विज्ञानेंसी तेज सज्ञानेंसी निज । निर्गुणेंसी चोज केलें सये ॥३॥ मुक्ताई तारक सम्यक विठ्ठल । निवृत्तीनें चोखाळ दाखविलें ॥४॥

---

## नाम.

**४. अलिप्त संसारीं हरिनामपाठें** । जाईजे वैकुंठे मुक्तलग ॥१॥ हरिवीण मुक्त न करि हो सर्वदा । संसारआपदा भव तोडी ॥२॥ आशेच्या निराशीं अचेतना वारी । चेतविल हरी आप आपरूपें ॥३॥ मुक्ताई जीवन्मुक्तची सर्वदा । अभिन्न पैं भेदा भेदियेलें ॥४॥

५. **आधीं तूं मुक्तचि होतासिरे प्राणिया** । परि वासनें पापिणिया नाडिलासी ॥१॥ आधींचें आठवीं मग घेई परी । हरिनाम जिव्हारी मंत्रसार ॥२॥ आदि मध्य हरी ऊर्ध्व पैं वैकुंठ । जाईल वासना हरि होईल प्रगट ॥३॥ एकतत्त्व धरीं हरिनाम गोड । येर तें काबाड विषय ओढी ॥४॥ नानामतें सांडीं वासना पापिणी। एक नारायणीं चाड धरीं ॥५॥ मुक्ताई मुक्तलग सांडिली हे वासना। मुक्तामुक्ती राना हरिपाठ ॥६॥

६. **नाम मंत्रें हरी निजदासां पावे** । ऐकोनी यां धावे झडकरी ॥१॥ सुदर्शन करीं पावे लवकरी । पांडवां साहाकारी श्रीकृष्ण रया ॥२॥ निजानंद दावी उघड पैं वैकुंठ । नामेंचि प्रगट आह्मांलागीं ॥३॥ मुक्ताई जीवन मुक्त हा संसार । हरीं पारावार केला आम्हीं ॥४॥

७. **भजनभावो देहीं नित्यनाम पैठा** । नामेंचि वैकुंठा गणिका गेली ॥१॥ नाममंत्र आम्हां हरीरामकृष्ण । दिननिशीं प्रश्न मुक्तिमार्गु ॥२॥ नामचि तारकु तरले भवसिंधु । हरिनाम छंदु मंत्रसार ॥३॥ मुक्ताई चिंतन हरिप्रेम पोटीं । नित्य नाम घोटी अमृत सदा ४

८. **मुक्त पैं अखंड त्यासि पैं फावलें** । मुक्तचि घडलें हरिच्या पाठें ॥१॥ रामकृष्णें मुक्त जाले पैं अनंत । तरले पतीत युगानयुगीं ॥२॥ कृष्णनामें जीव झाले सदा शिव । वैकुंठ राणिव मुक्त सदा ॥३॥ मुक्ताई संजीवन मुक्तमुक्ति कोडें। जालें पैं निवाडें हरिरूप ॥४॥

९. **मुक्तामुक्त दोन्ही नाईकतो कर्णीं** । हरिनामपर्वणी सदा काळ ॥१॥ नाहीं काळ तेथें आम्हां वेळ कैची । हरिनामछंदाची गोडी थोरी ॥२॥ नाना विघ्न बाधा नाईकों आम्ही कदा । निरंतर धंदा रामकृष्ण ॥३॥ मुक्तपणें मुक्त मुक्ताई पैं रत । हरिनाम स्मरत सर्वकाळ ॥४॥

१०. **आदि मध्य ऊर्ध्व मुक्त भक्त हरी** । सबाह्य अभ्यंतरीं हरि एकु ॥१॥ नलगती तीर्थें हरिरूपें मुक्त । अवघेंचि सूक्त जपिनिलें ॥२॥ ज्याचेनि नामें मुक्त पैं जडमूढ । तरले दगड समुद्रीं देखा॥३॥मुक्ताई हरिनामें सर्वदा पैं मुक्त । नाहीं आदि अंत उरला आम्हां ॥४॥

---

## संत.

**११. आदि अंतु हरि सर्वांघटीं पूर्ण** । जाणोनि संतजन प्रेमभरित ॥१॥ रामनाम चित्तें प्रेम वोसंडत । नित्यानित्य तृप्त हरिभक्ती ॥२॥ शांति क्षमा दया सावध पैं चित्तीं । आनंदें डुल्लती सनकादिक ॥३॥ मुक्ताई म्हणे नाम श्रीहरींचें जोडीं । नित्यता आवडीं चरणसेवा ॥४॥

**१२. परब्रह्मीं चित्त निरंतर धंदा** । तया नाहीं कदा गर्भवास ॥१॥ उपजोनी जनीं धन्य ते योनी । चित्त नारायणीं मुक्तलग ॥२॥ अव्यक्तीं पैं व्यक्ति चित्तासि अनुभव । सर्व सर्वीं देव भरला दिसे ॥३॥ ज्ञेय ज्ञाता ज्ञान उन्मनीं विज्ञान । चित्त नारायण झालें त्याचें ॥४॥ आदि अंतीं हरि सर्व त्याचा जाला । परतोनी अबोला प्रपंचेसी ॥५॥ मुक्ताईचें चित्त निरंतर मुक्त । हरि हेंचि संचित आम्हां घरीं ॥६॥

**१३. सर्वीं सर्व सुख अहं तेंचि दुःख** । मोहममताविष त्यजियेलें ॥१॥ साधक बाधक करूनि विवेक । मति मार्ग तर्क शोधियेला ॥२॥ सर्वतीर्थ हरि दुभाळु धेनुवा । वोळला कणवा चानकाचा ॥३॥ सूक्ष्ममार्ग त्याचा भक्त देहीं मायेचा । आकळावयाचा सत्व धरीं ॥४॥ वेद जंव वाणी श्रुति तुपें काहाणी । ऐको जाय कर्णीं तंव परता जाय ॥५॥ मुक्ताई सोहंभावें भरलें दिसे देवें । मूर्तामूर्त सोहंभावे हरि घोटी ६

---

## आपल्या स्थितीसंबंधानें जनांशीं उद्गार.

**१४. पूजा पूज्य वीते पूजक पैं चित्तें** । घाली दंडवते भावशिळा ॥१॥ चंपक सुमनें पूजी कातळीनें । धूप दिप मनें मानासिक ॥२॥ भावातीत भावो वोगरी अरावो । पाहुणा पंढरीरावो हरि माझा ॥३॥ मुक्ताई संपन्न विस्तारूनि अन्न । सेवी नारायण हरि माझा ॥४॥

**१५. अविट न विटे हरिचे हे गुण** । सर्व सनातन ध्यान रूपें ॥१॥ साध्य हें साधन हरिरूपें ध्यान । रामकृष्ण कीर्तन मुक्त आह्मी ॥२॥ असंगेंचि नटु नटलों पैं साचे । नाहीं त्या यमाचें भय आह्मां ॥३॥ मुक्तता पूर्णता मुक्ताई साधली । साधन दिसली चांगयासी ॥४॥

---

## सद्गुरुप्रसादानें प्राप्त झालेल्या स्थितीचें वर्णन.

१६. **व्यक्त अव्यक्तीचें रूपस मोहाचें** । एकतत्त्व दीपाचें हृदयीं नांदे ॥१॥ चांगया फावलें फावोनी घेतलें । निवृत्तीनें दिधलें आमुच्या करीं ॥२॥ आदि मध्य यासी सर्वत्र निवासी । एकरूपें निशी दवडितु ॥३॥ मुक्ताई पूर्णता एकरूपें चित्ता । आदि अंतु कथा सांडियेली ॥४॥

१७. **मनें मन चोरी मनोमन धरी** । कुंडली आधारीं सहस्रदळीं ॥१॥ मन हें वोगरु आदि हरिहरु । करी पाहुणेरु आदिरूपा ॥२॥ साविया विसरू घेसील पाडिभरू। गुरुकृपा विरु विरे सदा ॥३॥ मुक्त मुक्त चित्तें गुरुमार्गे विते । पावन त्वरिते भवीं भाव ॥४॥

१८. **सर्व रूपीं निर्गुण संचलें पैं सर्वदा** । आकार संपदा नाहीं तया ॥१॥ आकारिती भक्त मायामय काम । सर्वत्र निःसिम अंतरीं आहे ॥२॥ वृत्तीचा उच्छेदु निवृत्ति तत्त्वता । सर्वही समता सांगितली ॥३॥ मुक्ताई अविट मुक्तपंथरत । जीवीं शिवीं अनंत तत्त्वविद ॥४॥

१९. **उर्णाचिया गळां बांधिली दोरी** । पाहों जाय घरीं तंव तंतु नाहीं ॥१॥ तैसें झालें बाई जंव एकतत्व नाहीं । दुजी जंव साई तंव हें अंध ॥२॥ ऐसी मी हो अंध जात होतें वायां । प्रकृति सावया पावली तेथें ॥३॥ मुक्ताई सावध करी निवृत्तिराज । हरिप्रेमें उमज एकतत्वें ॥४॥

---

## उपदेश.

२०. **सहस्रदळीं हरि आत्मा हा कुसरी** । नांदे देहा भीतरीं अलिप्त सदा ॥१॥ रविबिंब बिंबे घटमठीं सदा । तें नातळे पैं कदा तैसा आम्हां ॥२॥ अलिप्त श्रीहरि सेवी कां झडकरी । सेवितां झडकरी हरिच होआल ॥३॥ चंदनाच्या दृतीं वेधल्या वनस्पती । तैसी आहे संगतीं या हरिपाठें ॥४॥ मुक्ताई चिंतित चिंतामणी चित्तीं । इच्छिले पावती भक्त सदा ॥५॥

२१. **नादाबिंदा भेटी जे वेळीं पैं जाली** । ऐशी एके बोली बोलती जीव ॥१॥ उगेंचि मोहन धरूनि प्रपंचीं । त्यासी पैं यमाची नगरी आहे ॥२॥ जीव जंतु जड त्यासी उपदेशीं । त्यासी गर्भवासीं घाली देवो ॥३॥ मुक्ताई श्रीहरी उपदेशी निवृत्ति । संसार पुढती नाहीं आह्मां ॥४॥

२२. **देउळींचा देवो घरभरी भावो** । कळसेवीण वावो जातु असे ॥१॥ जाताती वाउगे नटनाटयसोंगें । चित्तअनुरागें भजतीना ॥२॥ असोनि न दिसे उगयाचि पिसे । घेती वायां वसे सज्जनेवीण॥३॥ रावो रंक कोहं न म्हणेचि सोहं । साकारलें ओहं न कळे तया ॥४॥ भ्रमाचेनि भूली वायाचि घरकुली । माया आड ठेली अरे रया ॥५॥ मुक्ताई परेसी दुभतें चहूंसी । सत्रावी सर्वरसीं एका देवें ॥६॥

२३. **विश्रांति मनाची निजशांति साची** । मग त्या यमाची भेटी नाहीं ॥१॥ अधिकारी मन मग सारी स्नान । रोकडेंचि सा धन आलें हातां ॥२॥ साधिलें साधन नित्य अनुष्ठान । चित्तीं नारा-यण मंत्र जपे ॥३॥ मुक्ताई प्रवीण नारायण धन । नित्य मंत्रें स्नान करी वेगीं ॥४॥

२४. **मुक्तपणें सांग देवो होय देवांग** । मीपणें उद्वेग नेघे रया ॥१॥ वाउगें मीपण आथिलें प्रवीण । एक नारायण तत्त्व खरें ॥२॥ मुक्ता मुक्ती दोन्ही करी कारे शिराणी । द्वैताची काहाणी नाहीं तुज ॥३॥मुक्ताई अद्वैत द्वैतीं द्वैतातीत । अवघाचि अनंत दिसे देहीं ॥४॥

२५. **अंतर बाह्य निकें सर्व इंद्रियांचें चोज** । निजीं निजबीज एकतत्त्व ॥१॥ आदि नाहीं अनादि नाहीं । तें रूप पाहीं अविट बाईये २ मुक्ताई संजीवन तत्वता निर्गुण । आकार सगुण प्रपंचींचा ॥३॥

२६. **नामबळें देहीं असोनियां मुक्त** । शांति क्षमा चित्त हरिभ-जनें ॥१॥ दया धरा चित्तीं सर्वभूतीं करुणा। निरंतर वासना हरिरूपीं ॥२॥ माधव मुकुंद हरिनाम चित्तीं । सर्व पैं मुक्ति नामपाठें ॥३॥ मुक्ता-ईचें धन हरिनामें उच्चारु । अवघाचि संसारु मुक्त केला ॥४॥

२७. **करणें जंव कांहीं करूं जाये शेवट** । तंव पडे आडवाट द्वैतभावें ॥१॥ राहिलें करणें नचले पैं कर्म । हरिवीण देहधर्म चुक-

ताहे ॥२॥ मोक्षालागीं उपाय करितोसि नाना । तंव साधनीं परतां पडो पाहे ॥३॥ मुक्ताई करि हरिश्रवण पाठ । तेणें मोक्षमार्ग नीट सकळ साधे ॥४॥

२८. मुक्तपणें ब्रीद बांधोनियां द्विज । नेणती ते बीज केशव हरी ॥१॥ ज्याचेनि मुक्तता सर्वही पैं मुक्त । करूनियां रत न सेविती ॥२॥ वेदीं बोलियेलें ब्रह्मार्पणभावें । सदा मुक्त व्हावें अरे जना ॥३॥ मुक्ताई मुक्त हरिनाम सेवित । अवघेंचि मुक्त सेवितां हरी ॥४॥

---

## ज्ञान.

२९. उजिवडु कोंडें घेतसो निवाडें । आपुलिये चाडे जीवनकळा ॥१॥ एकरूप दिसे सर्वांघटीं भासे । एक हृषिकेशें व्यापियेलें ॥२॥ त्रिपुटीं भेदुनी सर्वत्रगामिनी । एका रूपें मोहिनी तेही सदा ॥३॥ नित्यता उन्मत्त अवघेंचि भरित । एकतत्त्वें दावित सोहं भावें॥४॥ मुक्ताई सांगती कैसेनि गुंपती । माया देवी समाप्ति निजतत्त्वीं ॥५॥

३०. विस्तारूनी रूप सांगितलें तत्त्वीं । कैसेनि परतत्त्वीं वोळखी जाली ॥१॥ सोहंभावें ठसा कोण ते पैठा । उभाउभी वाटा कैसा जातु ॥२॥ या नाहीं सज्ञान हा अवघा विज्ञान । आपरूप धन सर्वांरूपीं ॥३॥ मुक्ताई मुक्तता सर्वपणें पुरता । मुक्ता मुक्ति अपैता निजबोधें ॥४॥

३१. मुक्तामुक्त कोंडें पाहिलें निवाडें । ब्रह्मांडा एवढें महत्तत्त्व ॥१॥ निजतत्त्व आप अवघाचि परिपाक । एका रूपें दीपक लावियेला ॥२॥ आदि मध्य निज निर्गुण सहज । समाधि निजतेज आह्मां रामू ॥३॥ मुक्ताईचें धन आत्माराम गूण । देखिलें निधान हृदयघटीं ॥४॥

३२. निर्गुणाची सेज सगुणाची बाज । तेथें केशीराज पहुडले ॥१॥ कैसें याचें करणें दिवसा चांदिणें। सबळें उठणें एक तत्त्वीं॥२॥ नाहीं या ममता अवधीच समता । आदि अंतु बिंबतां नलगे वेळू ॥३॥ मुक्ताई सधन सर्वत्र नारायण । जीवशिव संपूर्ण एकातत्त्वें ४

**३३. दिवसा शीतळ निशियेसी बरळ ।** अधऊर्ध्व केवळ निज-बीज ॥१॥ या आदि नाहीं अनादिही नाहीं । कैचा मोहप्रवाहीं दिसेचिना ॥२॥ शक्तीचे संपुष्टीं मुक्ता मुक्त घट । अवघें वैकुंठ दिसताहे ॥३॥ मुक्ताई परिपाक अवघें रूप एक। देखिलें सम्यक् सोहंभावें ४

**३४. जेथें जें पाहे तें तेथें आहे ।** उभारोनि बाहे वेद सांगे १॥ सोमकांतीं झरा कोठील दुसरा । तत्त्वीं तत्त्व धरा निजदृष्टी ॥२॥ हेतु मातु आम्हां अवघाचि परमात्मा । सोहंभावें सोहं आत्मा सर्वी असे॥३॥ मुक्तलग खूण मुक्ताई प्रमाण । देहीं देहो सौजन्य निजतेजें ॥४॥

**३५. पूर्णपणें सार अविट आचार ।** सारासार विचार निजतेजें ॥१॥ निर्गुणीं आकार सर्वत्र साकार । एकरूपें विचार निजतेजें ॥२॥ मुक्ताई चैतन्य अवघें चिद्घन । आदि अंतु खूण निवृत्तीची ॥३॥

**३६. आदि मध्य अंतु न कळोनि भ्रांतु ।** असे जो सततु निज-तत्त्वें ॥१॥ कैसेनि तत्त्वतां तत्त्व पैं अनंता । एकतत्त्वें समता आपेंआप ॥२॥ आप जंव नाहीं पर पाहासी काई । विश्वपणें होई निजतत्त्वीं ॥३॥ माजि मजवटा चित्त नेत तटा । परब्रह्म वैकुंठा चित्तानुसारें ॥४॥ मुक्ताई सांगती मुक्तनामपंक्ति । हरिनामें शांति प्रपंचाची ॥५॥

**३७. मुक्तलग चित्तें मुक्त पैं सर्वदा ।** रामकृष्ण गोविंदा वाचे नित्य ॥१॥ हरिहरि छंदु तोडी भवकंदु । नित्य नामानंदु जपें रया ॥२॥ सर्वत्र रूपडें भरलेंसे दृश्य । ज्ञाता ज्ञेयभास हरिमाजी ॥३॥ मुक्ताई सधन हरीरूप चित्तीं । संसारसमाप्ति हरिच्या नामें ॥४॥

**३८. चित्तासी व्यापक व्यापुनियां दुरी ।** तोंचि माजिघरीं नांदे सदा ॥१॥ दिसे मध्य सुख मुक्तलग हरी । शांति वसे घरीं सदोदित ॥२॥ नाहीं या शेवट अवघाचि निघोट । गुरुतत्त्वें वाट चैतन्यासी ॥३॥ मुक्ताई संपन्न मुक्त पैं सेजुळे । सर्वत्र उभविले मुक्ति चोख ॥४॥

**३९. प्रालब्ध संचित आचरण गोमटें ।** निवृत्ति तटाकें निघालों आम्ही ॥१॥ मुळींचा पदार्थ मुळींच पैं गेला । परतोनि अबोला संसारासी ॥२॥ सत्यमिथ्याभाव सत्वर फळला । हृदयीं सामावला हरिराज ॥३॥ अव्यक्त आकार साकार हे स्फूर्ति । जीवेंशिवें

प्राप्ति ऐसें केलें ॥४॥ सकाम निष्काम वृत्तीचा निज फेर । वैकुंठाकार दाखविलें ॥५॥ मुक्तलग मुक्त मुक्ताईचें तट । अवघेंचि वैकुंठ निघोट रया ॥६॥

४०. **शांति क्षमा वसे देहीं देव पैसे** । चित्त समरसें मुक्त मेळु ॥१॥ निर्गुणें उपरमु देव पुरुषोत्तमु । प्रकृति संगमु चेतनेचा ॥२॥ सज्ञानी दिवटा अज्ञानी तो पैठा । निवृत्तीच्या तटा नेतु भक्ता ॥३॥ मुक्ताई दिवस अवघा हृषीकेश । केशवेंविण वास शून्य पैसे ॥४॥

---

## कूट.

४१. **देउळाच्या कळशीं नांदे एक ऋषी** । तया घातली पुशी योगेश्वरी ॥१॥ दिवसा चांदिणें रात्रीं पडे ऊष्ण । कैसेंनि कठिण तत्त्व जालें ॥२॥ ऋषी ह्मणे चापेकळिकाळा पैं कांपे । प्रकाश पिपे निघोन जाय ॥३॥ ठायींच्या ठायीं असें पहातां न दिसे । मनाच्या धारसें एक होय ॥४॥ एकट एकलें वायांचि पैं गुंफलें । मुक्त पैं वरिलें सहज असे ॥५॥ वैकुंठ अविट असोनि प्रकट । वायांचि अडवाट मुक्ताई ह्मणे ॥६॥

४२. **मुंगी उडाली आकाशीं** । तिणें गिळिलें सूर्याशीं ॥१॥ थोर नवलाव जाला । वांझे पुत्र प्रसवला ॥२॥ विंचु पाताळाशीं जाय । शेष माथा वंदी पाय ॥३॥ माशी व्याली घार झाली । देखोन मुक्ताई हांसली ॥४॥

॥ श्रीविठ्ठल ॥

# श्रीचांगदेवमहाराज.

## मुक्ताई व चांगदेव यांचा संवाद.

१. **स्वप्नींचा आत्मा केउता आहे** । मागुता ये हें नवल काई ॥१॥ चांगा म्हणे बाई सांग मुक्ताबाई । लटिकें साच वर्ततें देहीं ॥२॥ मुक्ताई म्हणे चांगया भ्रमिस्त देहीं । निर्धारीं राहीं स्वप्न कैचें ॥३॥

२. **बंधन नाहीं बद्ध नाहीं** । साच कीं लटिकें तेंही नाहीं ॥१॥ भेद नाहीं भेदसी काई । साच कीं लटिकें वर्ततें देहीं ॥२॥ चांगा ह्मणे सांग मुक्ताई । साच कीं लटिकें वर्ततें देहीं ॥३॥

३. **नाहीं सुखदुःख पापपुण्य नाहीं** । नाहीं कर्मधर्म कल्पना नाहीं ॥१॥ नाहीं मोक्ष ना भवबंधन नाहीं ॥२॥ ह्मणे वटेश्वरा ब्रह्म नाहीं । सहजसिद्ध बोले मुक्ताई ॥३॥

४. **हेमीं हेम प्रचित पाहीं** । अनुभव आलिया सांगावें तें काई ॥१॥ सोहंकार मन न सोडी साचें । मी नाहीं तेथें तूं कैचें ॥२॥ अहंतेसीं सोहं तें गूज । मुक्ताई म्हणे चांगया बूझ ॥३॥

५. **मी माझें दुरित आशापाश चित्तीं** । मोह ममता भ्रांति अहंभावें ॥१॥ हरितसे तेज अभिमान ताठा । एकतत्वें वैकुंठा हरि-पाठें ॥२॥ नाशिवंत देह पंचतत्व मोळी । वायांचि वाहाटुळी उडोनि जाये ॥३॥ मुक्ताई जीवन चांगया दिधलें । निर्गुणीं साधिलें घर कैसें ॥४॥

६. **ऐकें चांगया फळ फळासि आलें** । येऊनियां नासूनी गेलें ॥१॥ सोडीं सोडीं भवाची भ्रांति । तेणें होय अज्ञान निवृत्ति ॥२॥ चांगा वटेश्वरीं फळला । विज्ञानफळीं परिपाका आला ॥३॥

७. **गुण ना निर्गुण शब्दातीत** । तेथें तूं निश्चित बाळा निज ॥१॥ पाळणा लाविला हृदयकमळीं । मुक्ताई जवळी सादविते ॥२॥ शांति क्षमा विदेह पैं वर्णिती । नांव पैं ठेविती अद्वैतासी ॥३॥ वटेश्वरसूत चांगा अवधूत । मुक्ताई शांतवीत ज्ञानदृष्टी ॥४॥

८. **गुणातीत डाहाळीं पाळणा लाविला** । तेथें सुत पहुडला मुक्ताईचा ॥१॥ निजी निज बाळा न करीं पैं आळी । अनुहात टाळी वाजवितें ॥२॥ निद्रा ना जागृति भोगी पैं उन्मनीं । लक्ष ते भेदुनि निज पाटीं ॥३॥ निभ्रांत आतां पाळणा विणवुनी । मन हें बोधोनी पवन दोरा॥४॥एकविससहस्र श्वास वेळोवेळां । बाळा तोही डोळा स्थिर करी ॥५॥ निद्रा ना जागृति निजसील काई । परियेसी चांगया बोले मुक्ताई ॥६॥

९. **बाळक चुकलें सकुमार तान्हुलें** । त्यानें पैं सांडिलें माया-जाळ ॥१॥ जो जो जो जो पुत्रातें निजवी । अनुहात ओवी निःश-ब्दाची ॥२॥ मावळली दिशा वाचा पैं खुंटली । माया पैं भे-टली मुक्ताबाई ॥३॥ मुक्ताई ह्मणे नांव पैं ठेवीन । सुता बोला-वीन वटेश्वरा ॥४॥

१०. **आपुलिया मारुनी येई कां भेटी** । मग गोल्हाटीं सांठवीन ॥१॥ शांति धाया मेळवीन तुज । मग तूं बूझ सोहंकारीं ॥२॥ सोहं सोहं सोहं हाचि धरीं छंदु । सुखें निद्रा करीं अद्वैतीरे ॥३॥ तेथें जाग पां जाग नीज पां नीज । मग तुज चेवो केचा ॥४॥ तेथें ओळखी नाहीं विसरु नाहीं । चिदानंदीं पाहीं रूप तुझें ॥५॥ द्वैता-द्वैत भासले पाई । वटेश्वरसुता बोले मुक्ताई ॥६॥

११. **अविनाश पाळणा अव्यक्तें विणिला** । तेथें पहुडला यो-गिराज ॥१॥ जो ज़ो जो जो म्हणतसे माया । साकारातीत निजरे चांगया ॥२॥ सोहं सोहं षट्चक्रीं न्यासे । तुज परिये देतां मीच न दिसे ॥३॥ ऐशी निद्रा तुज लागोरे पुत्रा । मुक्ताई खेचरा उप-देशी मंत्र ॥४॥

१२. **ब्रह्मांड गोळकीं पवनाच्या पालखीं** । अवधूत कवतुकीं पहुडलासे ॥१॥ बोलवी चांगया मुक्ताई माता । ब्रह्मविद्या परीये

सुख देतां ॥२॥ डोळा लाउनी निर्जी निजला निवांत । स्वप्नीं वटे-
श्वर देखिला निवांत ॥३॥

१३. **रूप ना छाया त्रिगुणरहित** । ज्योतिस्वरूप हें पां नित्य॥१॥
जाणें येणें नाहीं ते निर्गुण पाही । चैतन्य होई शुद्धबुद्ध॥२॥ मुक्ताई
म्हणे चांगया वटेश्वरा । निरुता पाहें स्वयें साकारा ॥३॥

१४. **चांगा जन्मला माध्यान्ह काळीं** । मायबापें दोन्ही नाहींशीं
जालीं॥१॥ मुळींच चांगा नाहींसा जाला। मुक्ताई ह्मणे चांगया भला-
भला ॥२॥ वटेश्वर चांगा मुळीं लागला । पोसणा घेतला मुक्ताईनें ३

१५. **सुखाचे शेवटीं दुःख आलें भेटी** । भेटलियासाठीं तेंही नुरे
॥१॥ सुख तें कवण दुःख तें कवण । दोहीं अज्ञान करीं पारे ॥२॥
मुक्ताई ह्मणे चांगया चेई । स्वयंभू चेइला वटेश्वरीं ॥३॥

१६. **जेथें एक दुजें नाहीं** । प्रपंचाची काहाणी तेथें कांहीं ॥१॥
तेथें कांहींच नाहीं तेथें कांहींच नाहीं । सोय धरीं आपुलीरे ॥२॥
वटेश्वरसुतातें बोले मुक्ताई । सोहंभावें अखंडित राहीं ॥३॥

१७. **राउळींचे कर चुकले जाण** । गिवसिताती साहीजणें वेळो-
वेळीं ॥१॥ करीं कर धरियला मुष्टीं । करें समाविलें आपुल्या दृष्टीं
॥२॥ मुक्ताई करें लेईलें अंजन । चांगया निधान उपदेशिलें ॥३॥

१८. **टेंकावरी टेंक त्यावरी टेकुली** । तेथें एक बाळी विस्मो
करी ॥१॥ तिचें नांव काय त्याचें नांव काय । विचारोनि पाहे
मनामाजी ॥२॥ डोळियांतील बाहुली जालिसे गरुवारू । तिशी
सुईण मेळवा अरुवारु ॥३॥ सुईचें आणीवर रचिलें पाठार । मुक्ताई
म्हणे चांगया सांग याचा विचार ॥४॥

१९. **आकाशाचा शेंडा घार रांधी मांडा** । काउळा वाढी कांदा
कुल्लाळ भोजन करी ॥१॥ दिहा पडे चांदणें रात्रीं पडे ऊष्ण । चोर
घरटी घाली तराळ घाली खाण ॥२॥ सासुनें खादलें उंडे सुन
तरळे । लेकी लासिली जांवाई गडबडा लोळे ॥३॥ धमकत घुसळण
घातलें पारी । वटेश्वरसुता ह्मणे मुक्ताई अवधारी ॥४॥

२०. **दृश्य आणि द्रष्टा हे पैलीकडे** । बाहिंजु पाहतां आत्मज्ञान
खडे ॥१॥ इकडे तिकडे माया हे सांडे । न देखती तरी पैलही मूडे
॥२॥ मुक्ताई म्हणे चांगया भला । जें दाविलें तें आपण भला ॥३॥

२१. **वेदश्रुती ठक पडियेली वाचा** । तेथें कवणपाड तुझिया बोलाचा ॥१॥ कांहीं बोलसी तरी अबोलणें बोल । बोलणें बोलसी तरी तितुकें खोल ॥२॥ अनिर्वाच्य ब्रह्म न वर्णवे वाणी । बोलों म्हणती ते न लजती मनीं ॥३॥ बोलणें अबोलणें वटेश्वरीं गूज । मुक्ताई म्हणे चांगया बूझ ॥४॥

२२. **बुथिचेनि बोले नाहीं मविले** । सेखि पाहे तंव कांहीं ना जाले ॥१॥ बुद्धि बुडाली वासना खुंटली । तैसी परी जाली काय सांगों ॥२॥ मुक्ताई म्हणे चांगया नवल वितलें । असतां मीं माझें हारपलें ॥३॥

२३. **अहंकार अविद्या हेंचि पैं घोंगडी** । पांगुरता गोडी नाहीं मज ॥१॥ घोंगडें नेलें नारायणा । अछिप होतो बोल कोणा ॥ध्रु॥ आशा तृष्णा दोघी बहिणी । लोळती धरणीं घोंगडीया ॥२॥ हिंसा निंदा चिंता या तिघी जणी । घोंगडीया आटणी होतसे ॥३॥ घोंगडे माझें फाडलें पोरी । काम क्रोध दोघीं सहोदरी ॥४॥ मुक्ताई म्हणे घोंगडें सांडीं । वटेश्वरीं मांडीं ठाण आतां ॥५॥

२४. **मुक्त होतासि तो कां बद्ध झालासी** । आपल्या बंधनें आपण बांधलासी ॥१॥ सांडीं बंधन सोय धरीं गव्हारा । जाईं मूळस्थाना आपुलिया ॥२॥ तेर्थीच्या तेथें राहीं परियेसी । चांगया बोले मुक्ताईशी ॥३॥

---

## ज्ञानोपदेश.

२५. **भावें भक्ति करूनि वैराग्य जोडसी** । तरी तूं पावसी ब्रह्म सुखा ॥१॥ ज्ञानतत्त्वीं करीं करीं हा विचार । निर्गुणीं आकार निरामय ॥२॥ चांग्या सोय धरी ज्ञान वटेश्वरीं । मुक्ताई जिव्हारीं बोध करी ॥३॥

२६. **सोहं तें होतें कोहं जालें** । निज विसरलें काय सांगों ॥१॥ मार्ग चुकला विसर पडला । वरपढा जाला विषय चोरा ॥२॥ वटेश्वर चांगा ज्ञानदीपें उजळला । सोहं शब्दीं लावियला बाईयांनो॥३॥

२७. **ऐलाड हुडाचे पैलाड हुडाचे** । जागवा जागवा हरीचे ॥१॥ भलेरे भलेरे दास गोपाळाचे । भक्तिबोधें बोधले साचे ॥२॥ चांगदेव ह्मणे वटेश्वराचे ॥३॥

२८. **अवघी डोळां पाहूं गेलिये** । तंव अवघा अवघेंचि जालिये ॥१॥ काय सांगों गे माय अवघाचि आहे । अवघेनसी पाहे वटेश्वरीं ॥२॥ अवघेपणाची मज पडिलिसे भ्रांती । अवघाचि मी संतीं सांडवलों ॥३॥ वटेश्वर चांगा अवघाचि आहे । अवघेनसी पाहे वटेश्वरीं ॥४॥

२९. **आकार पुजितां निराकार जालें** । शून्यीं बुडालें बाईयांनो ॥१॥ शून्याचा अंकूर शून्य फळलें । व्योमाकार जालें मन तेथें ॥२॥ तेथें फळ ना डाळ जाति ना कुळ । वटेश्वर चांगा जाला निर्मूळ ॥३॥

३०. **प्रकृतीचें पूजन प्रकृतीच्या ठायीं** । असतां तोही परि चोजवेना ॥१॥ जळामाजीं भानु बिंबला दिसे । तैसा देहीं दिसे परमात्मा ॥२॥ पुष्पामाजी परिमळ राहिला निश्चळ । तैसा तो अकळ लक्षा नये ॥३॥ हें बोलणें सिद्धांतीचें शेवटीं । चांगया वेदांतीं कथन केलें ॥४॥

३१. **आनंदवनीं भ्रतार होता** । झुरकर उडाला गेला केउता १ नाम नाहीं रूप नाहीं । पाहों गेलों तों कांहींच नाहीं ॥२॥ ऋषि राहिला शब्द निमाला । वटेश्वर चांगा विस्मित झाला ॥३॥

३२. **पतिव्रते पुंश्चलि सांगात जाला** । दोहींतें भेटला एक देखा ॥१॥ दोहींचा गुण एक जाला । निर्गुण दादुला सोहंकारु ॥२॥ आपुला सांडिला परावा मांडिला । घराचार नासला काय सांगों ॥३॥ वटेश्वरीं व्याभिचार जाला । परपुरुष भुंजला शून्यें तेथें ॥४॥

३३. **पतिव्रता नारी व्याभिचार केला** । परपुरुष पूजिला बाईयांनो ॥१॥ पातिव्रता नारी ऐसें म्हणावें । नांव पैं ठेवावें अव्यक्तासी ॥२॥ चांगा द्वैत होता तो अद्वैत जाला । सोहं शब्दीं राहिला वटेश्वरीं ॥३॥

३४. **एकवीस सहस्र श्वास ते उच्छ्वासी** । तो योगियां अभ्यासी स्थिर स्थिर ॥ १ ॥ गमना गमन नाहीं संसार पैं नाहीं । वटे-

श्वरीं सोयी सांगितली ॥२॥ वटेश्वर जगीं जिव्हाळा । सोहं शब्दीं राहिला वटेश्वरीं ॥३॥

३५. **निरंजन वनीं केशव फुलला।** डोंगर शोभला ब्रह्मगिरी ॥१॥ तेथें सुमन झाडीन अनुहातें । शिष्ट अनुभवुनि बुद्धि तोचि जाला ॥२॥ चांगा वटेश्वरीं केशव फुलला। भ्रमर जाला रस घ्यावया ॥३॥

३६. **सहज समाधीं बैसला योगी ।** सुषुन्मामार्गीं निरोधोनियां ॥१॥ गोल्हाटमंडळ भेदोनियां जाये । नाहीं तें पाहे डोळेभरी ॥२॥ चांगा वटेश्वर सोहं जाला । अवघाचि गिळीयेला बाईयेवो ॥३॥

३७. **सोहं न बुद्धि पैं वेगळें ।** अहं सांठवलें बाईयांनो ॥१॥ अहं मथितां सोहं आहे । अविद्यामायें व्यापियेलें ॥२॥ अहंकार सांडी बोध पैं जाला । चांगया मोहिला चांगदेवें ॥३॥

३८. **दीपकळिका शोधितां कांहींच नाहीं ।** मावळला गेला कवणे ठायीं ॥१॥ दृष्टी तत्त्वसार शोधणें काई । भीतरी पाहतां बाहिजु नाहीं ॥२॥ सेखिं जे सरले सरोनि जे उरले । चांगया दिधलें चोरोनियां ॥३॥

३९. **वळे ना वरुशे नई पूर आला ।** कोरडिये नई जन बुडाला ॥१॥ बुडतो काय बोंब न होय । थडियेचा पाहे कवतुक ॥२॥ बुडाला बुडाला ऐसें जन लोक म्हणती । सेखीं उडी कोणी न घालिती ॥३॥ मुक्ताई सांगडी वटेश्वर तारूं। चांगा पैलपारु उतारिला ॥४॥

४०. **सत्रावी दोहतां कांहींच नाहीं ।** दोहन तें पाहीं ब्रह्मस्थानीं ॥१॥ दो स्तनीं पान्हाईली तिसरेनी दोहिली । दोहन ते उरली विश्वंभरा ॥२॥ चांगा वटेश्वर विश्वंभर जाला । प्रेमें तो लाधला क्षीर देखा ॥३॥

४१. **डोळे पैं दोंदिल जाले माझे ।** आपुलें सहजें रूप देखे॥१॥ सुखाची माऊली भेटावया आली । स्तनपान जाली याचकासी ॥२॥ माझें सुख सुखेंचि भोगावें । डोळया पाडावें डोळेवीण ॥३॥ वटेश्वर चांगा शून्यीं बुडाला । डोळसु जाला परब्रह्मीं ॥४॥

४२. **पोहों गेलें तंव मी माझी हारपलें।** ठकाचि ठेलें काय सांगों ॥१॥ मन ब्रह्मीं वेडावलें सोहं शब्दीं हारपलें । इंद्रियांसहित बुडालें

काय सांगों ॥२॥ पारुषली मति अतिज्ञान ज्योति । वटेश्वरीं निवृत्ति चांगा म्हणे ॥३॥

४३. **मोहन दुर्बुद्धि पैं वेगळें** । अहं सांठवलें बाईयेवो ॥१॥ अहं मथिता सोहं आहे । अविद्यामायें व्यापियेलें ॥२॥ अहंकार सांडी बोध झाला । चांगा मोहिला चांगदेवीं ॥३॥

४४. **यंत्राची युक्ती शब्द प्रकाशे** । बोल बोले तंव डोळा न दिसे ॥१॥ रुणझुण रुणझुण कीनरी वाजे । येणेंचि आनंदें त्रिभुवन गाजे ॥२॥ चांगा वटेश्वर नादीं निमाला । ब्रह्म पाहतां ब्रह्मचि जाला ॥३॥

४५. **गुणातीत पाहतां एक** । एक पाहतां नाहीं द्वैत ॥१॥ सांडी सांडी द्वैतभावो । वटेश्वरीं ध्याये देवो रया ॥२॥ चांगा वटेश्वरीं निजभावो । येर सांडुनी सकळिक वावो ॥३॥

४६. **गुण नाहीं तेथें निर्गुण** । गुणातीत शुद्ध चैतन्य ॥१॥ गुण-संबंध भाविसी काई । गुणातीत निर्गुण ध्याई ॥२॥ चांगा वटेश्वरीं निर्गुण । भक्तिभावें झाला सगुण ॥३॥

४७. **अरे क्षीरापरिस नवनीत आगळें** । क्षीर सांडवलें येर तूप भावो ॥१॥ तेथें क्षीरना तूप स्वयंभ नवतीत । ब्रह्म सदोदित मालावलें ॥२॥ वटेश्वर चांगा तुपीं पैं गोठला । पोट फिटला भ्रांतियेचा ॥३॥

४८. **साकार पूजितां निराकार जालें**। शुन्यीं बुडालें बाईयेवो ॥१॥ शून्याच्या आकारीं शून्यचि फळलें । व्योमाकारें मन तैसेंचि जालें ॥२॥ तेथें फूल ना फळ जाति ना कूळ । वटेश्वरीं चांगा जाला निर्मळ ॥३॥

४९. **अवघिया मुकलों अवघें विसरलों** । अवघाचि जालों वटेश्वरू ॥१॥ अवघेपणाची पडियेली भ्रांती । अवघें मी संतीं सांडविलें ॥२॥ वटेश्वर चांगा संत पैं जाला । अवघ्यासी बुडाला परब्रह्मीं ॥३॥

५०. **मही अंबु तेज मारुत** । गगन सामावे ज्ञानपरी ज्ञानी ॥१॥ परी मी असें तें वेगळें अद्वैता परतें । श्रुती म्हणती ज्यातें नेती नेती ॥२॥ स्थूळ सूक्ष्मापरतें कारणा वरतें। त्याहुनी परतें परात्पर ॥३॥ मन बुद्धि चित्त इंद्रियेंसी अहंकार । सामावे आकार निराकारीं ॥४॥

पदपिंडा रूप रूपातीत सहज । अव्यक्त परि बीज ह्मणती त्यातें ।।५।। शिवगोत्री चांगा म्हणे आवाच्य नित्य । तें वटेश्वरीं सत्य सांगितलें ।।६।।

५१. **तुझा तूं चुकलासी गिवसुनि घेईं** । सांडीं देहवासना नाहीं तें घेई ।।१।। सोहं सोहं हा घेई विचार । हें जाणतो वटेश्वर ।।२।। शब्दातीत जाणोनि निरुतें। चांगया वटेश्वरीं जन्मा भरितें ।।३।।

५२. **भ्रमराचें मरण कमळणीपुष्पीं** । तैसें योगियास विषयसुख ।।१।। आवडी वालभा डोळ्यां देख । तैसें पाहे सुख ज्ञानदृष्टीं ।।२।। जोडिलें सुख नवजाये । तैसा चांगा पाहे वटेश्वरीं ।।३।।

५३. **मनसंकल्प शुद्ध पैं नव्हे** । येऱ्हवीं सदोदित आहे चिदानंदीं ।।१।। मनातें बुडवोनी इंद्रियातें दवडुनी । मी हें सोडुनी सोहं धरी २ चांगा वटेश्वरी सोहं झाला । अवघाचि बुडाला ज्ञानडोहीं ३

५४. **देवी देवो जाला भावासी अबोला** । निमोनि उरला आपपरें ।।१।। आधीं आप पाही मग पडे वाही । प्रपंचें डोहीं बुडों नको ।।२।। जंव नाहीं कृपा गुरु फळीं बापा । । तंव कैसेनी दीपा पावशील ।।३।। मुक्ताई चांगया तत्त्वें तत्त्व लया । हरिभावीं माया हारपली ।।४।।

५५. **मुक्त हांतासि तो बंध पावसी** । आपल्या दोरीं आपण बांधिलासी ।।१।। सोय धरीं मूळ स्थान न सोडीं । बंधन तोडीं आलियारे ।।२।। चांगा वटेश्वरीं विनवितो दातारा। वायांची संसारा आणियले ।।३।।

५६. **मोळी विकुनी खीर वोखटी** । आंबिल गोमटी बैसालिया।।१।। कऱ्हे बारा गांवे येरझारा करी । शेखीं पोट भरी कांव्यावरी ।।२।। बुडीं फळ लाभे तरी शेंडिया कां धावावें । वायां कां भोंवतें भोंवे चांगा म्हणे ।।३।।

५७. **रूप नाहीं तेथें नांव नाहीं** । गुण नाहीं तेथें निर्गुण नाहीं ।।१।। रूप नाहीं तेथें मन सांगावया गेलें । आपणचि बुडालें अरुपींरे ।।२।। चांगा वटेश्वरीं रूप ना गुण । सहज निर्गुण बाईयांनो ।।३।।

५८. **आकार नाहीं मा भाविसी काई** । देहीं देवरूप होउनि

राहीं ॥१॥ आकार नाहीं आकार नाहीं । शून्य बोध पाहीं शून्याशून्यीं ॥२॥ व्योमीं व्योम हारपलें जैसें। चांगा वटेश्वरा देखतां तैसें ३

५९. **आकाशींचे फळ फळासी आलें** । वटेश्वर ब्रह्म तैसें देखिलें ॥१॥ फुल नाहीं तेथें फळ नाहीं । तत्त्वमसी बोध उमजोनी पाहीं ॥२॥ चांगा ह्मणे वटेश्वर आपणापें ध्याई । मग निजलिंग तूंचि होईं ॥३॥

६०. **कर्म धर्म जाति नाहीं भेदु** । वायां माया बहू वाढवसी ॥१॥ सांडिं अभिमान सांडिं अभिमान । चिदानंदीं लीन होई पारे ॥२॥ जरी सांडिशील भ्रमु होसील लीनु । तरी चांगा ह्मणे तनु वटेश्वरीं ॥३॥

६१. **देह नाहीं तेथें प्रपंच काई** । आन ठायीं ब्रम्ह सांगसी काई ॥१॥ माझें मी नाहीं माझें मी नाहीं । अहंकार डोहीं बुडालासी ॥२॥ चांगा म्हणे मन भुललें पायीं । वटेश्वर न देखतां गिवसिसी काई ॥३॥

६२. **व्योम अभ्र दोन्हीं भासलें आप** । तैसें विश्व ब्रह्म व्यालें तद्रूप ॥१ तेथें अभ्र ना छाया विश्व ना माया । एकलें ब्रह्म सदोदित ॥२॥ वटेश्वर चांगा रूप ना गुण । सहज निर्गुण बाईयांनो॥३॥

६३. **आहे तें सांडीं नाहीं तें सांडीं** । सेखीं उरे तेंचि तूं मांडीं ॥१॥ सांडी तें सांडी मांडीतें मांडी । सांडणें मांडणें दोन्ही सांडी ॥२॥ चांगा ह्मणे मुक्ताईची आण । सांगितली खूण वटेश्वरीं ॥३॥

६४ **आरे ते ते ते ते ते ते ते ते**। चहूंहुनी परतें तें ॥१॥ ते ते काई ते ते पाही । ते ठायीं राही नाहीं होउनियां ॥२॥ नव्हे तें काय कैसें पैं जालें। चांगया वटेश्वरीं अनुभवें पाहिलें ॥३॥

---

## कूट.

६५. **क्रोधाची आगटी बांधोनियां पोटीं** । सासुरिया पाठीं लागतसे ॥१॥ पाहावो इचें केवढें ढाल । आल्यासवें करीतसे बोल ॥२॥ लाज सांडोनि निःशंक झाली । पांचाही बांधिली पाठीवरी ॥३॥ चांगा म्हण जीवींचें गुज । वटेश्वरीं मज सांगितलें ॥४॥

६६. **मृगजळावरी मुंगियाच्या हारी** । दुरूनी नारी दावितसे ॥१॥ मुंगी लाठी मुंगी लाठी । वैकुंठींच्या खुणा सांगतसे गोष्टी ॥२ मुंगिचिया गळां तुळशिचा लोहडणा । चांगा वटेश्वर सांगतो खुणा३

६७. **सासूचे आधीं सून जन्मली** । सून मारून सासू नोवरी झाली ॥१॥ आचोजीं चोजवितलें । तें स्वर्गीं जाणवलेंरे भाई ॥२॥ पुत्र पितयाचा व्रतबंध करी । वांझ सासु कन्यादान दे नोवरी ॥३॥ सिद्धांतीचें वर्म अनुभवीं जाणे । वटेश्वर चांगा बोलिला खुणे ॥४॥

६८. **नोवरीचे हातीं चित्रीव काठी** । नोवरी लागे संन्याशापाठीं ॥१॥ नारायण ह्मणा नारायण म्हणा । नारायण म्हणा वो नोवरीवो ॥२॥ विश्वरूप नोवरी संन्याशा रातली। त्या आम्हां भली सोयरीक जाली ॥ ३ ॥ दिगंबर नोवरा क्षपणिक वऱ्हाडी । वटेश्वर चांगा वाहतो लुगडीं ॥४॥

६९. **नोवरीचे पोटीं नोवरा जन्मला** । सोहळा जाला काय सांगों ॥१॥ नोवऱ्यानें नोवरी देखिलिचि नाहीं । सोहळा होतो सांगों काई ॥२॥ तो नोवरा नातुडे कोणा । मुक्ताई चांगया सांगतसे खुणा ॥३॥

७०. **कुडी हे नोवरी आत्मा हा नोवरा** । दोघें पर्णूं जाती निरंतरा ॥१॥ पांचही प्राण सर्वही वऱ्हाडी । आशा तृष्णा दोन्ही देशधडी ॥२॥ शांति निवृत्ति दोघी सुवासिनी । भक्ति करवली सखी बहिणी ॥३॥ वटेश्वर चांगा वरधवा । तुम्हीं नेऊनि मध्यें बैसवा ४

७१. **आत्मा हा नोवरा कुडी हे नोवरी** । लिंबलोण करीं वोहरासी ॥१॥ सोहळा जाला नोवरा गांवा गेला । वेगीं आइती करा नोवरी बोलावा ॥२॥ न्हाणिली धुणिली गजस्कंधीं मिरवली । बोळवीत गेली चौघेंजणें ॥३॥ ज्याची नोवरी त्या हातीं लाविली । चांगा म्हणे आतां निश्चित झाली ॥४॥

७२. **नोवरीच्या गळां तुळशीच्या माळा** । वऱ्हाडी सकळां तुम्हीं व्हावें ॥१॥ मांडाल आपुला घराचार । नोवरी साचार पर्णिलिये ॥२॥ वरमायेचे चीर वोहमाय नेसली । त्या आह्मां भली सोयरीक झाली ॥३॥ वटेश्वर चांगा नोवरीचे पाठी । सनकादिक गोष्टी करिताती ॥४॥

७३. **वऱ्हाडी आले संसारनगरा** । चांगा नोवरा केळवला ॥१॥ हातीं कांकण उभा वटेश्वरीं । शांति हे नोवरी पर्णावया ॥२॥ पर्णिली शांति बैसली पाटीं । मुक्ताई करवली हळदुली वाटी ॥३॥

७४. आकाश कवाळिलें मुंगीनें बाही । तेथें एक नवल वितलें पाहीं ॥१॥ नवल जालें नवल जालें । विश्व व्यापिलें मुर्कुटानें ॥२॥ वटेश्वरीं चांगा सूक्ष्म स्थूळ । जाति ना कूळ बाईयांनो ॥३॥

---

## अंबुला.

७५. अंबुला विकावया हटासि नेला । मोल जालें तंव पळुनी गेला ॥१॥ अंबुला पळे मी त्याचे पाठीं । लोक कवतुक पहाती दिठीं ॥२॥ सांदी बिदी ठेविली राखणे । षट्दर्शनें लाविलीं भांडणें ॥३॥ पळतां अंबुला पदरीं धरिला । चांगाया स्वामी वटेश्वरीं भेटला ॥४॥

७६. अंबुल्यासवें सुतली गोरी । पाहे तंव अंबुला नेला चोरी ॥१॥ अंबुला तुम्हीं विसंबा झणें । अंबुलीयावीण जेवीत सुणे ॥२॥ चांगा म्हणे जागा जागारे भाई । देहा खन पडिलें भाई ॥३॥

---

## घोंगडी.

७७. अवघी घोंगडी नेली हाटा । दावी चोहटा पंढरीरावो ॥१॥ घोंगडें खांदीं छपावया जाय । मागुता चांगा नये तोगें माय ॥२॥ छपितां घोंगडें देखिलें बरें । टाकिलें उदारे पांडुरंगें ॥३॥ घोंगडिया तेणें घातली मिठी । संसारा तुटी म्हणे चांगा ॥४॥

॥ श्री ॥

## श्रीमत्‌जगद्‌गुरु संतपंचक माहात्म्य.

उभारिला ध्वज तिहीं लोकांवरी । ऐशी चराचरीं कीर्ति ज्याची॥ १ ॥ते हे **निवृत्तिनाथ ज्ञानेश्वर सोपान । मुक्ताबाई** ज्ञान दीप्ति कळा ॥ २ ॥ धरुनी सगुण रूपें केली क्रीडा । बोलविला रेडा निगमवाक्यें ॥ ३ ॥ वरी बैसवुनी चालविली भिंती । **चांगदेवा**प्रती भेटी दिली ॥ ४ ॥ मग वास केला अळंकपुरासीं । पिंपळ द्वाराशीं कनकाचा ॥ ५ ॥ निळा म्हणे ज्यांच्या नामें करितां घोष । नातळती दोष कळिकाळाचे ६

### आरती.

जयदेव जयदेव जय ज्ञानसिंधु । नामस्मरणें तुमच्या तुटती भवबंधु ॥ध्रु०॥ होतां कृपा तुमची पशु बोले वेद । निर्जिव चाले भिंती महिमा अगाध ॥ भगवद्गीता टीका ज्ञानेश्वरी शुद्ध । करुनि भाविक लोकां केला निजबोध ॥ १ ॥ चवदाशें वर्षांचे तपी रहिवाशी । येउनि चांगदेव लागले चरणासी ॥ करुनि कृपा देवें अनुग्रहिलें त्यासी । देउनि आत्मज्ञान केलें सहवासी ॥ २ ॥ समाधि समयीं सकल संत समुदाय । घेउनि सुरवर आले श्रीपंढरीराव ॥ द्वारीं अजानवृक्ष सुवर्ण-पिंपळ समाव । जाणुनि महिमा निळा मागे चरणांतळीं ठाव ॥ ३ ॥

# श्रीनिवृत्तिनाथमहाराज

यांच्या

## अभंगांचा वर्णानुक्रम.


| अभंग. | अभंगांक | अभंग. | अभंगांक | अभंग. | अभंगांक. |
|---|---|---|---|---|---|
| अ. | | आदीची अनादि | ५५ | एकेविण पाहा | ३६३ |
| अकर्ता पैं कर्ता | ७ | आद्यरूपसार | ७९ | क. | |
| अखंड जपतु | २५३ | आनंद सर्वांचा | २३५ | कमळाच्या स्कंधीं | ३०२ |
| अचेत आत्मा | २७७ | आपपर शून्य | ३११ | करुणाकल्लोळणी | ३७३ |
| अजन्मा जन्मला | १०२ | आपुलेनि हातें | २४३ | कल्पना काजळी | ३१७ |
| अद्वैत अमरकंदु | ७४ | आमुचा आचार | १५६ | कल्पना कोंडूनि | १७९ |
| अंधारिये रातीं | ११७ | आम्हां जप राम | १३८ | कल्पना मासोळी | ३१४ |
| अनंत ब्रह्मांडें | १६८ | आह्मां हेंचि थोर | १३९ | कल्पितें कल्पिलें | १८१ |
| अनंत रचना | ७७ | आम्ही किरण तूं | १९३ | कळिकेसी ज्योति | ३६९ |
| अनंतरूप देव | १२७ | आम्ही चकोर | १९२ | कामना कामीकु | २६४ |
| अनंत सृष्टि घटा | ९४ | आम्हीं बोध | १९४ | काया हे ब्रह्मांड | ३५८ |
| अनुभवाच्यागांवीं | १९५ | आशा पिपाशा | २५० | कारण परियेस | ८० |
| अपशब्द कानीं | ३१० | उ. | | काला तंव | २४० |
| अरूप बागडे | ५१ | उघडूनियां दृष्टी | २३७ | कांसवीचीं पिलीं | १४३ |
| अवीट अमोला | २१२ | उघडें स्वरूप | २२६ | काळवेषें दुरी | २३२ |
| अव्यक्त आकार | ९० | उन्मनी अवस्था | ३४५ | कैवल्य देहीं | ३२४ |
| अव्यक्ताचे घरीं | ३६२ | उपजे तें मरे | [illegible] | ख. | |
| अष्टांग साधनें | १२१ | उपरति मनाचीं | २९० | खुंटलें वेदांत | २० |
| आ. | | उफराटी माळ | १०५ | खुंटलें साधन | ९७ |
| आकार निढळीं | ३६७ | ए. | | खुंटिनलें मन | १७१ |
| आकारी दिसे | ३४[illegible] | एक तत्व सांगति | १६० | ग. | |
| आगम निगम | ३१६ | एक तत्व हरि | २८८ | गगनग्रास घोटी | १२५ |
| आगमा निगमा | ११५ | एकतत्व हरि | ३७० | गगनग्रास घोंटी | ११४ |
| आदिनाथ उमा | १३५ | एक देव आहे | १६२ | गगन घोटीत | ७१ |
| आदि मध्य अंतीं | १९० | एकरूपें दिसे | ३४४ | गगनवाड दृष्टी | १६ |
| आदि मध्य वावो | ३३ | एकेविण तत्व | ३६४ | गगनाचिये खोपे | ४१ |
| आदिरूप सममूळ | २५ | एकेविण दुर्जे | २९१ | गगनीं अभ्र चाले | ३३० |

| अभंग. | अभंगांक. |
|---|---|
| गगनीं उन्मनीं | ४२ |
| गगनींचा ईश | ३३२ |
| गगनींचा गगनीं | ७२ |
| गगनींचा घन | ३६१ |
| गगनींची तारा | २७५ |
| गगनीं बोळलें | ४३ |
| गयनि गहिवरु | ३०३ |
| गोकुळीं वैकुंठ | ५८ |
| गोत वित्त चित्त | ८२ |
| गोत वित्त धन | ८६ |
| गोपाळ संवगडे | २३८ |
| गोंविले चरणीं | ३५३ |
| ग्रासूनि भान मान | १५ |
| **च.** | |
| चतुरानन घन | १२३ |
| चराचरीं हरी | १४० |
| चातकाचें ध्यान | १७५ |
| चांगया लाधलें | २४४ |
| चिंतितां साधक | १३३ |
| चेतवि चेतवि | १४८ |
| चंदनाचें झाड | १८७ |
| **छ.** | |
| छेदिला समूळ | २११ |
| छेदिला हा वृक्ष | १५१ |
| **ज.** | |
| जनांसी तारक | २२७ |
| जनीं जनार्दन | २४७ |
| जपतां कुंटिणी | २८९ |
| जयामाजी दीक्षा | ७५ |
| जाणिवेचेनि पैसे | ३४० |
| जाणोनि नेणते | ८४ |
| जेथ रूप रेखा | ८१ |
| जेथुनि उद्धारु | १ |
| जेथूनियां परा | १०९ |
| जेथें न रिघे ठाव | १२८ |
| जेथें नाहीं मोल | १३० |
| जेथें नाहीं वेदु | १२० |
| जेथें पाहे तेथें | ३७४ |
| जेथें रूप रेखा ना | ३४ |
| ज्या कारणें | १३१ |
| ज्याचेनि सुखें | ३६० |
| ज्याचे मुखीं | २५१ |
| ज्याचेनि स्मरणें | ३९ |
| ज्या नाम अनंत | २९ |
| ज्या रूपाकारणें | १२४ |
| ज्या रूपा कारणें | १०४ |
| **त.** | |
| तारक प्रसिद्ध | ११३ |
| तिमिर पडलें | ३२६ |
| तुटलें पडळ | १५४ |
| तेथें नाहीं मोल | २१ |
| तंत आणि वितंत | ३५२ |
| तंव आनंदला | २३९ |
| त्रिभंगीं त्रिभंग | ३८ |
| त्रैलोक्य पावन | १७७ |
| **द.** | |
| दिननिशी नाहीं | १६३ |
| दिसे वरी वरी | ३२७ |
| दीपाची कळिका | ३३८ |
| दुजियाची निंदा | ३०९ |
| दुजेपणा मिठी | ५० |
| दुभिलें द्विज- | ११९ |
| देव मुगुटमणी | ६५ |
| देवेंविण ठावो | ३३३ |
| देहाची दिवटी | ३५४ |
| देहाच्या दीपकीं | ३०४ |
| देहाच्या देउळीं | १८५ |
| देहीं देव आहे | ३०६ |
| द्वेषितां अच्युता | ३२२ |
| द्वैताचा दुकाळ | १८९ |
| द्वैताचिये प्रभे | १६४ |
| द्वैताची वाढी | २७६ |
| **ध.** | |
| धन्य हा खेचर | ३०१ |
| धीराचे पैं धीर | ६३ |
| ध्यान धरा हरीं | २७९ |
| ध्यान ना उन्मनीं | १९७ |
| ध्यानाची धारणा | १२२ |
| ध्येय ध्याता | ३४७ |
| ध्येय ध्याय मनीं | २३१ |
| **न.** | |
| न जाणाति कळा | २४५ |
| न देखों सादृश्य | १०० |
| नलगती धनें | २६६ |
| नलगे मंत्रसार | २५६ |
| न साधे तें योगी | १०७ |
| न साहात दुजे- | ११० |
| न साहे दुजेपण | ६१ |
| नसे तो ब्रह्मांडीं | १९ |
| नव्हे हें पोखणें | १४१ |
| नाम नाहीं वाचे | २५४ |
| नाममंत्रसार नित्य | २८१ |
| नाम मुखीं सदा | २४९ |
| नामरूपीं सोय | १८० |
| नामाचेनि बळें | २५५ |
| नामाचेनि स्मरणें | २५८ |
| नामामृत पिक | २८५ |
| नामींरूपीं गोडी | ९६ |
| नाहीं काळ वेळ | २०१ |

| अभंग. | अभंगांक. | अभंग. | अभंगांक. | अभंग. | अभंगांक. |
|---|---|---|---|---|---|
| नाहीं छाया माया | २२ | नेणती महिमा | १७ | प्रल्हाद परीक्षिती | २७१ |
| नाहीं जनीं विजनीं | १८२ | नेणें पैं द्वैत | १६६ | प्रवृत्ति निवृत्ति | २८३ |
| नाहीं त्या आचारु | १०१ | **प.** | | प्राकृत संस्कृत | १४६ |
| नाहीं दिन मान | ३६५ | परनिंदा झणीं | २६२ | प्राणिया उद्धार | २३० |
| नाहीं यासि गोत | २३३ | परंपरा भक्त | ३४३ | प्रारब्ध संचित | २२४ |
| नाहीं हा आकार | ६२ | परम समाधान | १५२ | पृथ्वी हे श्रीराम | १४५ |
| निकट वेल्हाळ | ९८ | परापवाद कानीं | २६१ | **ब.** | |
| निगम आगम | ३२ | परासि परते | ३०८ | बिंबीं बिंब एक | ५६ |
| निगम नियम | २०९ | परिपूर्ण ब्रह्म | ३५९ | बुद्धि बोध नाहीं | १६९ |
| निजतेज बीज | १६५ | परेसि परता न | १०३ | ब्रह्मांड उतरडी | ६८ |
| निज लक्षाचें | १२६ | परेसि परता | १२ | ब्रम्हांड करी हरी | ५४ |
| नित्य नाम वाचे | २५२ | पहातां साधन | २१८ | ब्रह्मादिक पूजा | ६७ |
| नित्य निर्गुण | ९५ | पांडुरंग हरि | २४२ | **भ.** | |
| नित्य हरिकथा | २२३ | पितांबर दीपडें | ३७१ | भरतें ना रितें | ९९ |
| निर्दोषरहित सर्व | ११ | पितृगोत माता | ३२३ | भवजळ काया | २२२ |
| निमाली ते निशी | १९९ | पितृ पिता हरी | ३२१ | भवसागर सार | २६५ |
| निरपेक्षता मन | ७३ | पितृ मातृ निंदिता | ३१३ | भवार्णव हेतु | ३१५ |
| निरशून्य गगनीं | ४५ | पियूष पुरतें | १० | भक्तिचें महिमान | ३५० |
| निरशून्य गगनीं | २७ | पिंड हा न धरी | २२८ | भक्तिज्ञान वैराग्य | ३२८ |
| निरशून्य बिंबीं | ९१ | पुंडलिकपेठ | २१९ | भावभक्ति प्रेम | २४६ |
| निराकार वस्तु | २१७ | पुंडलिक सुख | २७२ | भावयुक्त भजतां | १०८ |
| निराकारी घर | ३५६ | पुंडलिकाचें भाग्य | २१४ | भाग्याचेनी भाग्य | २१६ |
| निराकृत कृत्य | ८७ | पुरुष प्रकृति | १८८ | भाग्येंविण नसे | ३१८ |
| निराकृती धीर | ३१ | पूर्णबोधें धाले | १३० | भांडवल हरि | २०५ |
| निरालंब देव | ४९ | पूर्विलीये क्षेत्रीं | १९६ | भेदूनी ब्रह्मांड | ३३९ |
| निरालंब बीज | ६९ | पंचतत्व कळा | ९२ | **म.** | |
| निरालंब सार | २८ | पंढरीये चोख | २१३ | मथीन मथन | ८८ |
| निरासि निर्गुण | ४८ | प्रकृतीचा पैठा | १४७ | मध्यबिंदुनाद | ३५ |
| निराळ निरसी | ४७ | प्रकृतीचेनी घाये | ३६८ | मन कामना हरी | २२० |
| निरोपम गगनीं | ४६ | प्रतिपाळ सम | २३ | मन गेलें देवीं | २८७ |
| निःसंदेह हरि | ३१९ | प्रथम अक्षर | ३५७ | मन निवटलें | ८९ |
| नीट पाठ आह्मां | ९ | प्रपंच टवाळ | १७८ | मनाची वासना | १६१ |
| नुघडि तो दृष्टी | २३४ | प्रपंचाची वस्ती | १८३ | माता पिता | १३६ |

| अभंग. | अभंगांक. | अभंग. | अभंगांक. | अभंग. | अभंगांक. |
|---|---|---|---|---|---|
| मातेचें बाळक | १७३ | विवरण सार | २०८ | **स.** | |
| मारुनि कल्पना | १५५ | विवेक वैराग्य | २०६ | सजीव साजिरी | १८४ |
| मी पण कळलें | २६३ | विश्राम धर्मता | ६ | सनकसनंदन | ३४६ |
| मीपणें सगळा | १२९ | विश्रामींचा श्रम | १७४ | समता धरा आधीं | ३०५ |
| मी माझी कल्पना | १९८ | विश्वाचा चाळकु | ८३ | समता वर्तावी | ३३६ |
| मी माझें रोकडें | ३३५ | विश्वातें ठेऊनि | ३६ | सम सुखाचें | २८४ |
| मेघ अमृताला | ५२ | विश्वाद्य अनाद्य | ३० | सप्त पाताळें | १३४ |
| मोडिला तो खेळ | २१० | विश्वंभर मूर्ति | ३७ | सत्यभामा माये | २३६ |
| मोक्षमुक्ति चारी | ३३१ | विश्वामाजी अक्षर | ३६६ | सर्व काम धन | २२५ |
| मोक्षाचेनि देठें | २८२ | विश्वीं विश्वपती | ११९ | सर्व परिपूर्ण | २०४ |
| मंगल मांगल्य ब्रह्म | १४ | विश्वीं हा विश्वा- | २९६ | सर्वभूतीं दया | २७४ |
| म्हणवितो नंदाचा | १६७ | विस्तार विश्वाचा | ११२ | सर्व रूपें हरि | २९५ |
| मृगजळ भास | ८५ | विस्तार हरिचा | १५३ | सर्व स्वरूप नाम | ५९ |
| **य.** | | वेगु करीं मना | २५७ | सर्व हरि दिसे | ३०७ |
| योगियांचें धन | ६४ | वेद बीज साचें | ६६ | सर्व हरि ब्रम्ह | ३४९ |
| **र.** | | वेदादिक सम | २०२ | सर्वां घटीं वसे | १५७ |
| रसज्ञ रसाचा | ७६ | वैकुंठ कैलास त्या | २६ | साकार निराकार | १४२ |
| रामनाम नित्य | २५९ | वैकुंठ दुमतें नंदा- | ५७ | साधक बाधक | १७६ |
| रामनाम मुखीं | २६८ | वैकुंठ दैवत देवा- | ७० | सार हें निःसार | १४४ |
| रामनाम वाचे | २९४ | वैभव विलास | २ | सारासार धीर | ८ |
| रामराम जप | २७० | वैष्णवांचा मेळ | २४१ | सिद्धीचें साधन | १८ |
| रूप ना अरूप | ४ | वोळलें दुमतें | ३०० | सुखदुःख कांहीं | ३२० |
| रूप ध्यावो | २७८ | व्यर्थ हा प्रपंच | ३५५ | सुमनाची लता | १५० |
| रूपस रूपडें दिसे | २०० | व्याप्तरूपें थोर | ७८ | सुमना सुवासु | १३२ |
| रूपाचें रूपस | २१५ | व्योमामाजी तारा | १७० | सूर्यातें निवटी | १०६ |
| **ल.** | | **श.** | | सोपान संवगडा | २९९ |
| लटिका संसार | ३२९ | शांति क्षमा दया | २९७ | | |
| **व.** | | शांतीचें भजन | २६७ | सौजन्य समाधान | १७२ |
| वर्ण व्यक्ती सख्ये | १३ | शिव शांति तेजें | २०७ | संसार भ्रमें भ्रमले | ३४१ |
| वासनेचें द्वैत | ३१२ | शून्य साकार | २६९ | संसार सुफळ | २९३ |
| विकट विकास | ४० | शून्य हें पुशिलें | ३७२ | स्थिर धीर नीर | ५ |
| विठ्ठल श्रीहरी | २२१ | श्यामाची श्याम | १११ | स्वरूप साजणी | १५९ |
| विनट विठ्ठला | ३५१ | श्रुतिशास्त्र वेद | ३४८ | सृष्टीच्या संमता | १८६ |

| अभंग. | अभंगांक |
|---|---|
| **ह.** | |
| हरि आत्मा होय | १४९ |
| हरिदास संगें | २९८ |
| हरि प्रेम नित्या | २४८ |
| हरिमार्ग सार | २९२ |
| हरिविण चित्तीं | २७३ |
| हरिविण दैवत | २६० |

| अभंग. | अभंगांक. |
|---|---|
| हरिविण न दिसे | १५८ |
| हरिविण भाव | २८६ |
| हरिविण भावो | २८० |
| हरिविण व्यर्थ | २२९ |
| हरी हेंचि खूण | २०३ |
| हा पुरुष कीं | ११६ |
| हिरण्यगर्भ माया | ९३ |
| हें व्यापूनी निराळा | ६० |

| अभंग. | अभंगांक. |
|---|---|
| **क्ष.** | |
| क्षमा सम नेम | ३३७ |
| क्षीराचा क्षीराब्धि | ४४ |
| क्षेमाचा विस्तार | ३२५ |
| **ज्ञ.** | |
| ज्ञानघन मुक्ति | १९१ |
| ज्ञानाचिया गोष्टी | ३३४ |
| ज्ञानेंसि विज्ञान | २४ |
| ज्ञानेंसि विज्ञानि | ५३ |

# श्रीज्ञानदेवमहाराज

यांच्या

## अभंगांचा वर्णानुक्रम.


| अभंग. | अभंगांक. |
|---|---|
| अ. | |
| ॐनमो भगवते | २९४ |
| ॐनमो शिवा | ७२३ |
| ॐकार अक्षर- | ७५२ |
| अकरावरी सातवें | १७८ |
| अकरा खणावरी | ७४२ |
| अकल्पित द्रुम | १९७ |
| अकार उकार म- | ८१४ |
| अकार उकार म- | २१५ |
| अकारी अर्धमात्रा | ८०३ |
| अखंड तमासा | ८६९ |
| अखंड हरि वाचेसी | २११ |
| अगाधपण माझें | १७७ |
| अगुणाचिया | ३१५ |
| अग्नीचे पोटीं | ८४७ |
| अग्नीच्या पाठारीं | ९१५ |
| अचिंत बाळक | ७२९ |
| अष्टदळ पाहे | ९१ |
| अष्टभावें भोगितां | ६७३ |
| अष्टही अंगें | ४१८ |
| अष्टांगयोगें न | २५३ |
| अठरा दिगांतीं- | ६२६ |
| अढळ सप्रेम | २३८ |
| अद्वैत अंचुला | ६७० |
| अद्वैत पेटेहुनि | ७०० |
| अद्वैत येणें | ४३५ |
| अद्वैताची झडपणी | ४०६ |

| अभंग. | अभंगांक. |
|---|---|
| अधिक देखणें | ३५४ |
| अनुपम्य तेजें | ११६ |
| अनुपम्य मनोहर | २ |
| अनुभवें अनुभवु | १६० |
| अनुभव खुण मी | १३२ |
| अनुभव जाला | ४०२ |
| अनुभव रहणी- | ५२२ |
| अनुहत ध्वनी | ८५३ |
| अनंत अनंता- | १४१ |
| अनंत नामांचें | २३२ |
| अनंतीं अनंत | ५५१ |
| अभाव संगती | २२७ |
| अमानत्व स्थिती | ९५७ |
| अमित सूर्य | ३५७ |
| अमित्य भुवनीं | १५२ |
| अमोलिक रत्न | ५६४ |
| अमृताची कुंडी | ९८३ |
| अमृताची क्षीर | ८४१ |
| अरे अरे ज्ञाना | १०६ |
| अरे अरे ज्ञाना | १०० |
| अरे अरे ज्ञाना | १०१ |
| अरे मना तूं | ४५२ |
| अरे मना तूं | ४५३ |
| अरे स्वरूपा कारणें | ९८ |
| अलक्ष लक्षीं मी | ७२१ |
| अवघड तें एक | १५६ |
| अवघां डोळां | ३१८ |

| अभंग. | अभंगांक. |
|---|---|
| अवघाचि शृंगारु | ९८९ |
| अवघाचि संसार | ८१ |
| अवघाचि संसार | २०८ |
| अवघा सुखरूप | ९९२ |
| अवघेंचि मनें | ३८८ |
| अवघ्या बाहीं | ३४३ |
| अवचित वरपडी | ६८२ |
| अवचिता परिमळु | ६४४ |
| अवेवीं सावेव | १०७ |
| अव्यक्त मसुराकार | ७९२ |
| अशौचिया जपों | २७८ |
| असार घेंई जे | ५३९ |
| असे तें न दिसे | ४७७ |
| अहंते न पाहें | ५३२ |
| अळुमाळु सोय | २३६ |
| अक्षराचि ब्रह्म | ८८९ |
| अज्ञाना स्वरूप | ९०३ |
| आ. | |
| आउट हात | ४७० |
| आकानिकेळेची- | ७९ |
| आकार स्थूळ | ३१३ |
| आकारीं नाहीं | १२९ |
| आकारेंवीण | ६२४ |
| आकाश जें दिसे | ७८४ |
| आकाश हें असे | ८४६ |
| आकाशाचा शेंडा | ७८६ |
| आकाशाची गुंफा | ७९४ |

| अभंग. | अभंगांक. |
|---|---|
| आकाशाचे अंतीं | ८७२ |
| आकाशाचे ठायीं | ८६८ |
| आकाशीं मळा | ७९९ |
| आगरींचे क्षीर | ६०५ |
| आजि लाजलें | ४५५ |
| आजिवरी होते | ६६५ |
| आजि शुभ लवे | ६४६ |
| आजि संसार | २०७ |
| आजी सोनियाचा | २२३ |
| आठवितां नुपरे | ६९२ |
| आठवितां विसरलें | २५९ |
| आठवी तंव तूंचि | ३३४ |
| आणिक पाईक | ६८९ |
| आतासिकुसुम | ३० |
| आतां आपणया | ९८८ |
| आतां ओंठ पिठी | ८७१ |
| आत्मतेजें तेज | ११४ |
| आत्मरूपीं नाहीं | ८९८ |
| आत्मरूपीं रूप | १११ |
| आत्मज्ञान जया | ८०१ |
| आत्मा आंगें | ३६५ |
| आत्मा एक बाई | ८०२ |
| आत्मा पूर्णपणीं | ८५८ |
| आत्माराम देखे | ८५४ |
| आत्माराम नयनीं | ८७३ |
| आदि आत्म- | ७११ |
| आदि पुरुषा जय | ३०० |
| आदिमध्य अंत | १०८ |
| आदि मध्य अंत | ३९५ |
| आदि मध्य प्रांत | ३४२ |
| आधार चक्रीं | ६१९ |
| आधींच तूं ज्ञान | ११८ |
| आधीं चरे पाठीं | ६०१ |
| आनुनेणें कांहीं | ६४ |
| आनंदले वैष्णव | २१२ |
| आनंदाच्या लाटीं | ५७ |
| आनंदुरे आजि | ५२० |
| आपणासि आपण | ५६१ |
| आपला गुणग्राम | ३७५ |
| आपीं आप माये | ५५० |
| आपुलिये सुखें | ३०६ |
| आपुलेनि रंगें | २८८ |
| आपुलें कांहीं | १५४ |
| आपुलेनि भारें | १८३ |
| आमुचिया देवा | ९५९ |
| आह्मीं कापडीरे | ७२२ |
| आह्मीं संन्यास | ४३१ |
| आरेवरी आररे | ९७३ |
| आरंभीं आवडी | २५१ |
| आलाडु आडु | ५७७ |
| आलियाचा संतोष | ४४९ |
| आलिया जवळा | २२६ |
| आल्हादपण काय | ३३० |
| आवेगे ज्ञान | २१९ |
| आवो कमळनयनीं | ५२५ |
| आस पुरऊनि | ४१६ |
| आस्वादु स्वादु ये | ४१२ |
| आहे तें पाहीं | ४२७ |
| **इ.** | |
| इडा वाम दक्षिणे | ८३५ |
| इवलेंसें रोप | १३४ |
| **ई.** | |
| ईश्वर तो देव | ९३४ |
| **उ.** | |
| उजव्या अंगें | ७३० |
| उत्तम तें परि | ९४० |
| उन्मनि अवस्था | १८४ |
| उन्मनी संयोगें | ८०८ |
| उपजलें देह | ४७३ |
| उपजोनि नरदेहीं | ९८४ |
| उपजोनि संसारीं | ४७१ |
| उपदेश अगोचर | ७४७ |
| उपदेश उपराति | ७४६ |
| उपदेश ब्रह्मज्ञान | ७४८ |
| उपदेश मदलसा | ७४९ |
| **ऋ.** | |
| ऋणाचेनि मिसें | १६७ |
| **ए.** | |
| एकचि मीपणें | ९०० |
| एक तत्त्व नाम | ७७८ |
| एकतत्त्व बाही | ३४१ |
| एकतत्त्व साधी | १८२ |
| एक नाम हरी | ७६७ |
| एक पाहतां दुजें | ५७८ |
| एकभान गिळूं | ३९९ |
| एक माझी माता | ९६३ |
| एक मूर्ख नेणती | २६३ |
| एका एक गुज | ८०७ |
| एका पांडुरंगें | ४६४ |
| एकांतींचें गुज | ४२२ |
| एकांती बाळा | १४ |
| एकी धांवे सुनाट | ८३ |
| एकी ह्मणे ग्रह | ३८६ |
| एकी ह्मणे भाव | ६० |
| एकुचि एकला | ६८७ |
| **ऐ.** | |
| ऐकरे सुमना | ८९३ |
| ऐका हा शेवट | ८८१ |
| ऐकें तूं ज्ञान | १२० |

| अभंग. | अभंगांक. |
|---|---|
| ऐशिया माजी | ९९० |
| ऐसा अवतार | ५५ |
| ऐसा गे माये | ७३६ |
| ऐसा योगिराज | ८०६ |
| ऐसें हें अंडज | १०२ |
| **औ.** | |
| औट पिठातळीं | ८५५ |
| औट पिठावरी | ८६४ |
| औट पीठ डोंगरीं | ७९७ |
| औट हात चर्म | ५४६ |
| **अं.** | |
| अंजनाचें अंजन | ८१३ |
| अंजनीं अंजन | ३७२ |
| अंजनीं संपूर्ण | ३७९ |
| अंडज जारज | २५४ |
| अंतरींचा विस्तारु | ३९७ |
| अंतरींच्या सुखा | १३८ |
| अंध पंगु दृढ | ७१७ |
| अंबुला माहेरी | ६७१ |
| अंबुला विकून | ६७६ |
| अंबुला विकुनी | ६८३ |
| अंबुला होता तो | ६७८ |
| **क.** | |
| कर्पूर अग्नीसी | ४६१ |
| कमळावरी कमळ | १८६ |
| कर्म आणि धर्म | २५६ |
| कर्मत्याग करितां | ९०६ |
| कर्माचिया रेखा | २७४ |
| कर्मास्तव झालों | ६६७ |
| करीं वो अद्वैत | ३४९ |
| कल्पद्रुमा तळीं | ५८६ |
| कल्पना वृक्षासी | ७० |
| कवणाचि चाड | ९०२ |
| कवतुक पाहा- | ४४० |
| कळिकेमाजी जो- | ९११ |
| कानीं घालूनियां | ४८३ |
| कान्हया गोवळु | ६२३ |
| कान्होबा तुझी | ७०८ |
| कापुरा अग्नि | ५७१ |
| कापुराची सोय | ३९६ |
| कापुराचे कळिवर | १३० |
| कापुराचें कलेवर | २३९ |
| कापुराचें मांडें | ४१४ |
| कापुरीं परिमळु | २३० |
| कामारिकरुणा | ४८९ |
| काय करिशी | २०१ |
| काय सांगू तूतें | ९७४ |
| कांरे स्फुंदतोसी | २४८ |
| कासयाची चाड | ६६४ |
| कासया प्रतिष्ठा | ९६० |
| कासवाच्या परी | ९२६ |
| कासवीचें तूप | ७४३ |
| कां सांडिसी | ४५१ |
| कांहीं न करिजे | ३२० |
| कांहीं नव्हे तो | २४ |
| काळ वेळ नाम | ७७३ |
| काळा पुरुष | ८१८ |
| काळा पैं गोवळु | ३१७ |
| काळा लपंडाई | ४३४ |
| काळिये रात्रींचा | ५९६ |
| काळी कोसी | ६०४ |
| काळें ना सांवळें | ७४० |
| काळें ना सांवळें ध- | ६९८ |
| काळेपणाचा आवो | ३८ |
| कितिये स्तुति | ३३५ |
| कुंचे पताकाचे | २२१ |
| कुंचे पताका | २२० |
| कूटाकूट अंतीं | ४२१ |
| केवळ निराभास | ९१३ |
| कैसें बोटानें | ७४१ |
| कोटीची भरोवरी | ४२९ |
| कोणाचें हें रूप | ८२२ |
| कोंवळे ठुसठुसीत | ५९९ |
| कृष्णें वेधली | ६३१ |
| **ख.** | |
| खळें दान देसी | ११२ |
| **ग.** | |
| गगन डोळां | ३६६ |
| गगन डोळां | ३६८ |
| गगनमंडळीं नारी | ८१० |
| गगनाहूनि व्याप- | ९३० |
| गगनीं भासले | ९५० |
| गरुवार जाली | ६८५ |
| गाते श्रोते | २८९ |
| गायी चालिल्या | ५८४ |
| गायी तिचें | ६०२ |
| गुजगुजीत रूप | ८२० |
| गुणाचेनि आटोपें | ६४७ |
| गुणें सकुमार | ५९१ |
| गुरु हा संत | ९७९ |
| गुरुज्ञान नाहीं | ९८० |
| गोकुळीं कमळ | ५७९ |
| गोवळेपणाची | ५८९ |
| **घ.** | |
| घटु जें जें होय | ८९६ |
| घनु वाजे घुणु- | ६३२ |
| घरदार वोसटें | ४४७ |
| घुळघुळा वाजती | ७१९ |

| अभंग. | अभंगांक. |
|---|---|
| घोंगडी घेऊनि | ६९७ |
| **च.** | |
| चतुर्देहाची भरणी | १९८ |
| चतुरपणें चतुराननु | ४५ |
| चवाळ्याची | ७०४ |
| चहूं वेदीं जाण | ७५४ |
| चहूं शून्याआरुतें | ७९० |
| चहूं शून्याचा | ७८३ |
| चक्राकारचक्ररूप | ४३९ |
| चातकाची तृषा | १६६ |
| चातकाचें जीवन | ५११ |
| चातकेंविण लक्ष | ४२३ |
| चालतां लवडस- | ६२१ |
| चित्तींचें चैतन्य | ९२ |
| चिदानंद रूप | ८ |
| चिंचेच्या पानीं | ७२५ |
| चिंतिलें अपैसें | ४९१ |
| चुकलिया चुकें | ५०२ |
| चैतन्य चोरूनि | १८० |
| चैतन्य हें दिसे | ८६७ |
| चोराचिया संगें | ४८४ |
| चोहटा मिष्टान्न | ९३९ |
| चौ तेरा आह्मी | १९५ |
| चौदा भुवनीं | १५५ |
| चौ दारवंटा | ३६७ |
| चौदा विद्या जरी | ९२५ |
| चौऱ्यांयशीं लक्ष | ६९५ |
| चौऱ्यांयशीं लक्ष | ४७२ |
| चंचळ चांदिणें | ४६ |
| चंद्रा पूर्णिमे | ३०४ |
| **ज.** | |
| जगत्र धांवताहे | ५५९ |

| अभंग. | अभंगांक. |
|---|---|
| जगामाजी श्रेष्ठ | ८९५ |
| जगासी गवसणी | ३४८ |
| जटिल धुळधुसिर | ५८१ |
| जडांतील शुद्धांश | ८३१ |
| जतनेलागीं जी- | ४१९ |
| जन वन हरी | ५३३ |
| जनीं वनीं हरी | ३६२ |
| जन्मजन्मांतरीं | २३७ |
| जन्म जरा दुःख | २६७ |
| जन्म मरणातें ना- | ९१९ |
| जन्मा आवर्ती | १३६ |
| जन्माचें व्याज | १९२ |
| जन्मोजन्मींच्या | ६३ |
| जप तप अनुष्ठान | ९९७ |
| जप तप कर्म | ७७६ |
| जयाचिये ठायीं | ८८८ |
| जयातें पाहतां | ६२ |
| जरासंदुमल्लमर्दनु | २३ |
| जहाला इंद्रशेष | ९२४ |
| जळधराच्या | ६१७ |
| जळवायुवेगें | ९३५ |
| जागतां निज | ६९१ |
| जागृती पुसे | ६६० |
| जाणीव नेणीव | ७७७ |
| जाणों गेल्यें तंव | ४०८ |
| जाणोनि नेणपण | ३७८ |
| जायाची घोंगडी | ७०७ |
| जालोनी पाईके | ६८६ |
| जिणें देऊनि | ५४८ |
| जिता जिणें | ५५६ |
| जियेचा अंबुला | ६७२ |
| जिव्हेच्या निढळी | २७९ |
| जीवन कैसें | २०० |

| अभंग. | अभंगांक. |
|---|---|
| जीवाचिया जीवा | ६४१ |
| जुगादींचें जुग | ३६४ |
| जे येथें होतें तें | ७८ |
| जें जें पाहूं जाय | ८९४ |
| जें ब्रह्मीं पाहतां | १६९ |
| जें शंभूनें धरिलें | २७२ |
| जोडूनियां जोडी | ७१ |
| जोहार मायबाप | ७४५ |
| जंव या वायूचा | ४८० |
| जंववरी रे तंववरी | ४८५ |
| जंववरी जाड | ४८१ |
| ज्याचिये आवडी | ६५३ |
| ज्याचेनि तेजें | २४१ |
| ज्याचें गुणनाम | ५४ |
| ज्योतिस ज्योती | ३९४ |
| **ट.** | |
| टपपरी धरिला | ३६० |
| **ठ.** | |
| ठसावलीं देहीं | ३५८ |
| ठाकुनि आलिये | ६१५ |
| **ड.** | |
| डोळा माझा बाप | ८६१ |
| डोळांची पाहा | ७८१ |
| डोळियांत डोळा | ८२३ |
| डोळ्याची निशी | ३०७ |
| **त.** | |
| तनु चोरिली | ३४४ |
| तनुमनु धनें | ४२५ |
| तत्वतां पैं तत्त्व | ९५ |
| तत्त्वमस्यादि | २७७ |
| तत्वें तत्व धरी | ६१ |
| तळवे तळवटीं असे | ६५ |
| तापत्रयीं तापलीं | ४४६ |

| अभंग. | अभंगांक. |
|---|---|
| तिहिं शून्यावरती | ९७० |
| तिहीं त्रिगुणीं | २३५ |
| तिही त्रिपुटी | ६०३ |
| तीर्थ व्रत नेम | ७६४ |
| तुज जाणावया | ३२९ |
| तुज पासाव | २९५ |
| तुजमाजी विरावें | १८५ |
| तुजविण येकलीरे | ६२९ |
| तुज सगुण म्हणों | ५ |
| तुझिया गुणासाठीं | ३१६ |
| तुझी गुण कीर्ति | ३१० |
| तुझी सेवा करीन | ३०९ |
| तुझिये निढळीं | ५९८ |
| तुझे पवाडे सांगतां | ३११ |
| तुझें घोंगडें | ६९४ |
| तुझेनि बळें | ३२३ |
| तुडतालेवांचुनि | ३४५ |
| तुर्या तें महाकारण | ८७८ |
| तुर्येमध्यें माझा | ८७४ |
| तूं तो माझें मी | ९६३ |
| तूं माझा स्वामी | ७०६ |
| तूंरे कांबळा डांगेवरी | ९ |
| तूं विष्णु ह्मणोन | २९८ |
| तूं विटेवरी सखये | ७४४ |
| तें अवघेंचि नव्हे | ४२४ |
| तेंचि ब्रह्मरूप | ८८३ |
| तेंचि ज्ञानियासीं | ८८२ |
| तैं सत्व रज तमें | ४५८ |
| तो आपुलिया | ३०३ |
| तोंडें जाले | ४४४ |
| तृप्ति भुकेली | १४५ |
| त्यागुनि कैलास | ८९७ |
| त्वचोचिया राना | ६१४ |
| त्रिगुण असार | ७५५ |
| त्रिगुणाचें मूळ | ७८८ |
| त्रिपदा चतुष्पदा | ११७ |
| त्रिपुटी उलटु | ५२८ |
| त्रिपुटी भेदुनी | ७६ |
| त्रिभंगी देहुडा | ६ |
| त्रिभुवना परतें | ५०४ |
| त्रिभुवनांचें सुख | २४७ |
| त्रिभुवनीचें सुख | ६४९ |
| त्रिवेणीचें स्नान | ९६१ |
| त्रिवेणी संगमीं | ७६२ |
| **थ.** | |
| थोकलें पांचा | ३५९ |
| **द.** | |
| दशमद्वार अग्र | ८३० |
| दसवियेद्वारीं | २२४ |
| दिप दिगांतरीं | १९० |
| दिपाचेनि तेजें | ३९० |
| दिपीं दीप सामावे | ४६३ |
| दिव्य औषधीची | ५३४ |
| दिव्यरूप चक्षु | ८१७ |
| दीनपण दवडुनि | १९१ |
| दीपदीपिका | ५१३ |
| दीप प्रकाश दीपीं | १६५ |
| दीपिकेमाजी | ५४७ |
| दुजें द्वैत सांडी | ५९ |
| दुजेपणाचा भावो | ४०३ |
| दुजेपणाचा भावो | ४८२ |
| दुजेपणीचा भावो | ३८७ |
| दुर्जनाच्यासंगें | ९१७ |
| दुडी वरी दुडी | ६११ |
| दुधावरिली साय | ३४७ |
| दुरी ना जवळी | ३५३ |
| दुरुनि एक ऋण | १९३ |
| दुरूळु अंचुला | ६७४ |
| दुर्लभुरे दुर्लभुरे | ४८६ |
| देउळा आधीं | ७३१ |
| देऊनियां भेटी | ६५४ |
| देखणें देखाल | ५५७ |
| देखावया लागी | १७४ |
| देखिले तुमचें | १४४ |
| देखोनी पुजावया | १६४ |
| देखोनि हांव | २९७ |
| देव आहे जैसा | ११ |
| देव ते कल्पित | ९५४ |
| देव नाहीं तेथें | ९५५ |
| देव देव ह्मणुनि | ९५६ |
| देवाचिया द्वारीं | ७५३ |
| देवा तुज चुक- | ७१३ |
| देवा तुज नेणतानां | ३०२ |
| देवाविण शून्य- | २६९ |
| देह दंडुनि पाईक | ६९० |
| देह धर्मी काज | ११५ |
| देहभाव ठेवावे | १२४ |
| देहाचेनि दीपकें | २०४ |
| देहा लाजियेली | ७२६ |
| दोही बाही संतांची | ५६ |
| दृष्टीचें गुज | ३७० |
| दृष्टीचें सुख | ५५४ |
| दृष्टीमाजी रूप | ९७२ |
| दृश्यादृश्य नातळे | १३७ |
| द्वीपो द्वीपींचे | ४७६ |
| द्वैताद्वैत विरहित | ६१२ |
| **ध.** | |
| धर्म अर्थ काम | ७१५ |
| धर्म वसे जेथें | १००० |

अभंग. अभंगांक.

धरसील तरी ४९२
धांवत धांवत ८१२
ध्यान धारणा ४००
ध्येय ध्याता ४५६

**न.**

न गणवे परिमाणें ३७४
न गमे हा संसारु ६६९
न चलती शब्द ५८
न चुकतां चुकलें ३७३
नभ नभाचेनि १५
नयनाचें अंजन ८०९
नयनांचे आंगणी ८६२
नयनाचे शेजारीं ७९६
नयनांतील रूप ८६०
नवल देखिलें ४३
नवा आंत ८३२
नवाचिया माझारीं ९७१
नवांची खाणी १७०
नवांहूनि परतें ४०
नव्हे त्याची ३६९
नागोठाणीं गोपाळ ५८७
नाथिलें अभाळ ८९२
नाद बिंद कळा ४०५
नाद भेद सिद्ध ४९०
नाम पवित्र २७५
नाम प्रल्हाद २७१
नाममाला घे पवि- २६४
नामरूपीं प्रीति ३३२
नाम संकीर्तन ७७२
नासिकाचा प्राण ८२६
नाहीं जातिकूळ ९९१
नाहीं तें तूं काय ५६८
निर्गुण चवाळें ७०५
निर्गुणाचा पालऊ ४२८
निर्गुणाची छाया ३८९
निर्गुणाची वार्ता ५७५
निर्गुणाचे रंगीं ७८०
निर्गुणाचे हातीं ३९८
निजगुजा गूज २२
निज तेज बीज १०९
निज ब्रह्माब्रह्म २५
निजाचें तेज १२६
निजानंद हें पैं २९०
निर्जिवां दगडांची ४९३
नित्यता समाधि ५३०
नित्य धर्म नाम ९८१
नित्य नेम नामीं ७७४
नित्य सत्यामित ७६६
निमिष न लगे ३२१
निर्मिला म्हणसी ५४०
निरखित निरखित १८७
निरंजन वना ६३६
निरंजना गाई ७०२
निरंतर ध्याता २६६
निरालंब घोंगडें ६९९
निरालंब स्तंब १८९
निशियेचे भरी ७२७
निशी दिवस ८६६
निळा वर्ण ब्रह्म- ८४५
निळियेच्या निशी ६३८
निळिये निकरे ६३९
निळिये पेरगीं ३३
निळिये मंडळी ३१
निळिये रजनीं ३५
निळिये सारणी ३६
निळें हें व्योम ३४
नीळ वर्ण रजे ३२
नेणण्याचें रूप ९६९
नेणते ठायीं मन १७५
नेणो विठो मार्ग ६७
नेत्र लावुनि १७९

**प.**

पडलें दूर देशीं ३२८
पढियंते कीरु ५६५
पति जन्मला ७३९
पतीचा जिव्हाळा २०३
पतीत पावन १००१
पदपदार्थ संपन्नता २३३
पदत्रयादि विलक्ष- ९९६
पदोपदीं निजपदा १३३
पन्नास अक्षरी २८६
परतोन पाहासी ३३७
परदीपींहूनि सूक्ष्म ४६८
परब्रह्म सांवळे ५९२
परब्रह्मीं वस्ती १२८
परिमळाची धांव ३२६
परियेसी गव्हारा ५०३
परेचे शिखरावरी ८२५
परे पडे मिठी १४९
परेसी जंव पाहे १०३
परेंसि परतें २४६
परेहुनिपर वैखरी ८९९
पर्वताप्रमाणें पातक ७५९
पर्वतु गोफणिये ७३५
पश्चिम मार्गीं ८३४
पश्चिममार्ग बापा ८३८
पहातें पाहाणें १२२
पहा त्रिभुवनीं ८००
पाइका मोल ६८०

| अभंग. | अभंगांक |
|---|---|
| पाणियाचें मोतीं | ८१५ |
| पातेजोनि खेंवासि | ७७ |
| पावया लुब्ध | ५८३ |
| पावया छंदें | ६०० |
| पावलोंजी ह्मणे | ३२२ |
| पाहाणेंचि पाहासि | ५६९ |
| पाहणें जें कांहीं | ९२८ |
| पाहणें पाहातें | ५६२ |
| पाहतां पाहाणें | ५२७ |
| पाहतां वटाचा | ४०७ |
| पाहतां सप्त पाताळें | ३६१ |
| पाहातें पाहूं गेलों | ८८७ |
| पाहे पां ध्वजेचें | ३२४ |
| पाहोनियां दिठी | ५३१ |
| पाळण्याची परी | ६२५ |
| पांच पाटया | ६२७ |
| पांचही वऱ्हाडी | ६८४ |
| पांचा दामांचा | ६३३ |
| पांचासहित लया- | १९६ |
| पांचांची वाट | ४१५ |
| पांडुरंगकांति दिव्य | ७ |
| पिंडचि ब्रह्मांड | ८८६ |
| पिंड निर्माण | ५७० |
| पुण्य जोडूनियां | ९१६ |
| पुण्याशीं जोडितां | ९१२ |
| पुरुषेंविण नारी | ७२८ |
| पुरे जरी म्हणों | ३७६ |
| पुरे पुरे वो आतां | ३५६ |
| पूर्व जन्मीं पाप | ७१२ |
| पूर्वजन्मीं सुकृतें | २२२ |
| पूर्वदिशे भानु | २०२ |
| पूर्वप्राप्ति दैवयोगें | ७१६ |
| पूर्वेचा हा भानु | ९४३ |

| अभंग. | अभंगांक |
|---|---|
| पेंडारा दाऊनियां | ६४३ |
| पैल गोल्हाट | २८ |
| पैल तो गे काऊ | ६४५ |
| पैल मेरूच्या | ७३३ |
| पैल विळाचिये | ६५१ |
| पैल सुखाचोनि | १२ |
| पौर्णिमेच्या दिनीं | ९१० |
| पंचबाणें माझें | ४३७ |
| पंचविसा वेगळें | १४२ |
| पंढरपूरचा निळा | ६५७ |
| पंढरीचे वाटे | ६९ |
| पंधरयाची खाणी | ३५५ |
| प्रकाशें देखिलें | ५७६ |
| प्रकृतीचें पूजन | १३५ |
| प्रणवच देह | ८३७ |
| प्रणवाची शक्ती | ८४२ |
| प्रणवाचे भेद | ८२७ |
| प्रणवाचें आकाश | ८३९ |
| प्रणवाचें रूप | ८४० |
| प्रणवासी रूप | ८३६ |
| प्रथम नमूं तो | ३५१ |
| प्रपंचाचें जग- | ४४८ |
| प्रभा कळिका दीप | ६५६ |
| प्राण जाये प्रेत | १५८ |
| प्राणाची पैं सखी | ९४ |
| प्राणासवें सखी | ९३ |
| प्राप्तीविण फळ | २२९ |
| प्रेम जयाचें कथे- | २७० |
| प्रेमडोहीं मन | ७२० |
| प्रेमाचा जिव्हाळा | २५७ |
| पृथःकारे कर्म | ९९४ |
| पृथ्वी आइणी | १५९ |

| अभंग. | अभंगांक. |
|---|---|
| **फ.** | |
| फळाचें बीज कीं | ३१२ |
| फुगडी फूगे बाई | ६१० |
| **ब.** | |
| बरवा वो हरि | ४ |
| बरवीं पाउलें | ५०८ |
| बहुता वऱ्हाडा | ४६९ |
| बहु शास्त्र जल्पणें | ९९५ |
| बाबा ममता | ७१८ |
| बारावे वरतें | ४१३ |
| बावनाचे संगती | १६८ |
| बाहिजु भीतरी | ५५३ |
| बुद्धि मात चित्त | ४६० |
| बोधलिया अंज- | ५७३ |
| बोलतां बोलु | ५१७ |
| ब्रह्म जयाचिये | ९२० |
| ब्रम्हपदाची प्राप्ति | ३७१ |
| ब्रह्म प्राप्ती पूर्ण | ९५२ |
| ब्रह्मज्ञानी पुरुष | ८६५ |
| ब्रह्माचा गोंडा | ७०३ |
| ब्रह्माची पुतळी | १७१ |
| ब्रह्मांडाचे भुवनीं | ७८७ |
| ब्रह्मादिकां आठकु | १९ |
| ब्रह्मा विष्णु रुद्र | ९०९ |
| ब्रह्मीं ब्रह्म होणें | १४८ |
| **भ.** | |
| भगवद्गीता होचि | ९७७ |
| भक्तिचिया चाडा | ५८० |
| भक्तीचें तें ज्ञान | २७३ |
| भलें बोलोनि | ५६० |
| भवाब्धी सागरीं | ६०७ |
| भाग्याचा उदयो | २१७ |
| भावाचेनी बळें | २३५ |

| अभंग. | अभंगांक. | अभंग. | अभंगांक. | अभंग. | अभंगांक. |
|---|---|---|---|---|---|
| भावेंविण भक्ति | ७५६ | मनें मुरऊनि करी | ७८९ | मे दुरार्थि कर | ६१६ |
| भुलणें चालणें | ९०१ | ममता पुसे सये | ९० | मेरू परतें एक | ५२६ |
| भुक्ति मुक्ति कारणें | ३१४ | मरण न येतां | ९४८ | मोहाचें मोहाळ | ३८५ |
| भेटिसी गेलिये | ६५९ | मलयानिळ | ५१४ | मोक्ष मेल्या पाठीं | ९४७ |
| भेटी जाली धुरेसी | ३३३ | महा तेजा आंत | ८८० | मंगळमूर्ति तूं कीं | ३०८ |
| भोंवरी सांडुनि | ५९७ | महावाक्यार्थ तें | ८२९ | मंत्र तंत्र यंत्र | ८९१ |
| भ्रम धरिसी या | २६१ | माझिया घोंगडीया | ६९६ | ह्मणोनि तुझें रूप | ३०५ |
| भ्रमर रस द्वंद्व | ११९ | माझिये हृदयीं | २४० | मृत्यु लोका | ७१४ |
| भ्रमरीच्या ध्यासें | ९६७ | माझी प्रकृती | ४३२ | मृगजळाच्या जळीं | ४६६ |
| भ्रुवामध्यें तेज | ८३३ | माझी शंका फिट- | ६६२ | मृगजळाचे डोहीं | ४६७ |
| म. | | माझें चवाळें रंगा- | ७०१ | मृत्तिकेची खंती | ९४५ |
| मज तुरंबा कां | ६३० | माझे जिवींची | ८० | मृत्युचेनि मापें | ३८१ |
| मजमाजी पाहतां | १६३ | माझें स्वरूप | ४०९ | य. | |
| मज स्वप्न लेव- | ७३२ | माझ्या कान्हाचें | २८२ | यमधर्म सांगे | २७६ |
| मतमतांतरें | ४४३ | माते आधीं कन्या | ७३८ | यम नियम | ३०१ |
| मदनमूर्ति तूं | ५९३ | माथे टेकित | ५८५ | यश कीर्ति वानु | २२८ |
| मदनमूर्ति विश्वीं | १८ | मायबापें आमुचीं | ६५० | या अमरामाजी | २१० |
| मदालसा ह्मणे | ७५१ | माया विवर्जित | १५७ | यातीकुळ माझें | ६५२ |
| मन मारुनियां | १७६ | मायिक हे सृष्टि | ९१८ | या पिकलिया | ४९४ |
| मन मुरडुनी घात- | ६३७ | मीच माझा डोळा | ८७६ | येउनि वऱ्हाडणी | ८२ |
| मन मुरडोनि | ३९ | मीतूंपण विकल्प | १६२ | येकि सांगे मातु | ४१० |
| मन मुरे मग | ५६६ | मी तूं प्रवृत्तिसी | ३५२ | येणेंचि आश्रमें | ४५० |
| मन वाचा बंदु | ४३६ | मी देहीं ह्मणतां | ९४६ | येणें रूपें पाहा- | ६४० |
| मन सुमन घा- | ३४६ | मीपण माझें हार- | ६६६ | येथें तेथें दुरि तो | ५३७ |
| मन हें अवघें | ८८४ | मी बोल बोलें | ४३० | येरी ह्मणे भेद | ८४ |
| मन हें धालें | ९९३ | मी माझें करूनी | ३२५ | ये सातें आलिया | ५१८ |
| मन हें राम | १७३ | मी माझें अद्वैत | १४० | योग तो कठीण | ९५८ |
| मन हें लावा | ८२८ | मी माझें म्हणतां | ४७८ | योगयाग विधी | ७५७ |
| मन हें लोधलें | ३३६ | मी माझें म्हणतां | ६४२ | योगिया दुर्लभ तो | ४०४ |
| मनाचा भाव | ५३ | मी माझें मोहित | ३५० | योगियां मुनी- | ५८२ |
| मनाचि वाती | ४१७ | मुक्तत्वाचि भ्रांती | ९२९ | र. | |
| मनाची सृष्टी | ५४२ | मुक्ति पावावया | ९३३ | रजा पासूनियां | ९२२ |
| मनें करुनि | ६६१ | मूळ ना डाळ | ४८ | रवि तेज किरण | ११३ |

| अभंग. | अभंगांक. |
|---|---|
| रसने वोरसु | २८० |
| रक्तवर्ण स्थूळ | ८६३ |
| रामकृष्ण गोविंदाचें | २८५ |
| रामकृष्ण जप | ९८५ |
| रामकृष्ण नामें ये | २५८ |
| रामनामा वाटा | २५५ |
| राम बरवा कृष्ण | २९ |
| राज्यपद गाढा | ३३८ |
| रात्री दिवस | ६९३ |
| रांगतु रंगणीं | ६२२ |
| रुणुझुणु रुणुझुणुरे | ५१९ |
| रूप पहातां लोचनीं | १ |
| रूप सामावलें | १६१ |
| रंगा येई वो रंगा | ३२७ |
| **ल.** | |
| लवण पवन | ३८३ |
| लक्ष चौऱ्यांयशीं | ९४४ |
| लक्ष लावुनि अंत- | ५९० |
| लक्ष लावुनि | ५०९ |
| लाउनि मनगणीची | १३ |
| लेकुरें नसतील | ६१८ |
| लेवुनि अंजन | १३९ |
| **व.** | |
| वडाच्या पानीं | ७२४ |
| वर मुळें शेंडा | ८११ |
| वर्ण ना व्यक्ति | ९६८ |
| वर्षाकाळीं नादियां | ९३७ |
| वाहिलिया येईरे | ४९९ |
| वऱ्हाड न होतां | ६८१ |
| वाजतसे बोंब | ७२ |
| वायूनें वळावें | ५०६ |
| वाराणशी यात्रे | ७५ |
| वासनेचें बीज | ८९० |
| वांझेचिये पोरा | ९४१ |
| विचारितां देहीं | ६६८ |
| विटंबुनी काया | ४४५ |
| विठ्ठलनाम नुचारि | २६० |
| विठ्ठल यात्रे | २०९ |
| विठ्ठल विठ्ठल न | २६२ |
| विठ्ठलु नाहीं जये | २९३ |
| विदेह आत्मलिंगा | ७१० |
| विवेक नदीये | ७४ |
| विश्रांतीचें स्थान | १२५ |
| विश्व ब्रह्म भासे | ८१९ |
| विश्व भुलवी योग | २७ |
| विश्वरूप पाहे तंव | ९७ |
| विश्वाचें आर्त | ४०१ |
| विष्णुविण जप | ७६१ |
| विष्णुविण मार्ग | ४६५ |
| विक्षेपतां नाना | ९०५ |
| विज्ञानाचें ज्ञान | ५० |
| वेदवाणी चांग | ४८८ |
| वेदशास्त्र प्रमाण | ७७१ |
| वेदप्रमाण करावया | १६ |
| वेदांत सिद्धांत | ९२७ |
| वोल्हावलें मन | २०६ |
| वोजावालिया | ४८७ |
| व्रतें तपें तीर्थें | ५६७ |
| वृत्तीचा उच्छेद | ३९३ |
| वृंदावनीं आनं- | ५९५ |
| वृंदावनीं वनमा- | ५०५ |
| व्यक्ताचे अव्यक्तीं | ५२९ |
| व्यक्ताव्यक्त दिठी | १३१ |
| व्यर्थ प्रपंच टवाळ | ९७८ |
| व्योमाचे पालऊ | ३१९ |
| **श.** | |
| शर्करेची गोडी | २१६ |
| शत अश्वमेध | ९४२ |
| शब्द निर्गुण | ५०७ |
| शरीर वरिवरि | ४४२ |
| शरीर हें स्थळ | ७३ |
| शहाणियाची दासी | ३३१ |
| शाहाणे सितरे | ४६२ |
| शांति दिसे ओहं | ५४४ |
| शांति क्षमा दया | ५३८ |
| शामाचिया घरा | ६६३ |
| शास्त्रार्थाची वाणी | ८७५ |
| शिव भवानी | २९१ |
| शिव शक्तिचा | ८४४ |
| शुद्ध मती गती | १५३ |
| शून्य नाहीं निर- | ६२८ |
| शून्य निरसुनि | ९३६ |
| शून्य शोधिलें | ७९१ |
| शून्य हे चार मह्रा | ८०४ |
| शून्याचा उद्भव | ८७० |
| शून्याचा शेवट | ७८२ |
| शून्याचे भुवनीं | ८५६ |
| शून्याचें जें | ८०५ |
| शून्याशून्य धार | ५४३ |
| श्रवण त्वचा | २३१ |
| श्रवण घ्राण | ४५४ |
| श्रवणें कीर्तनें | २१३ |
| श्रीगुरु देवराया | ७५० |
| श्रीगुरु सारिखा | १४७ |
| श्रुतीं सांगितलें | ५७४ |
| श्रुतीस्मृति वचन | २१ |
| शृंगार करुनी | ४४१ |

| अभंग. | अभंगांक. |
|---|---|
| **ष.** | |
| षड्चक्रीं कुंभार | ५१० |
| षट्चक्रें बंद | ७९५ |
| **स.** | |
| सकळ तीर्थें | १२३ |
| सकळ धर्मांचें | ३८१ |
| सकळ नेणोनियां | २८७ |
| सकळमंगळनिधी | २५० |
| सकळ सांप्रदाय | ९९९ |
| सकळहि कळा | ५५८ |
| सकार हकारीं | ८१६ |
| सकुमार वेल्हाळ | २४० |
| सकुमार साकार | ५१५ |
| सकुमार साखर | ४९७ |
| सखी प्रती सखी | ८७ |
| सखी म्हणे बाई | ८५ |
| सखी सांगे सार | ८८ |
| सगुण अंबुला | ६७७ |
| सगुण देह बापा | ८५२ |
| सगुण निर्गुण | ९९६ |
| सगुणाची सेज | ४२६ |
| सगुणींच्या रातीं | ३९१ |
| सगुणीं निर्गुण | ८८५ |
| सत्य ज्ञानानंत | ३ |
| सत्व रज तम | ८७७ |
| सत्व रज तम | ८५७ |
| सत्व रज तम | १४३ |
| सत्राविये कोठडिये | १९४ |
| सत्रावीचा खेळ | ७९३ |
| सत्रावीचे गांवीं | ८४८ |
| सदा परीपूर्ण | २९२ |
| सद्गुरु निवृत्ति | ८२४ |
| सद्गुरूवांचूनी संसा | ९२१ |
| सद्गुरूसारिखा | ९६४ |
| सदैवपण आलें | १८८ |
| सभा समस्त | ७०९ |
| सममुखें शेजे | १५० |
| समरसें घटु | २४२ |
| समर्थ सोयरा | ४३३ |
| समाधि धन्य | ९९८ |
| समाधी हरीची | ७६५ |
| समाधी साधन | २४५ |
| समाधींचें साधन | २६५ |
| सम्यक् करी | ८९ |
| सर्वगत निर्धारिता | २९९ |
| सर्व जीव तूं | २९६ |
| सर्व व्यापक | २३४ |
| सर्वत्र परिपूर्ण | ९३८ |
| सर्वत्र समान | २४३ |
| सर्व सुख गोडी | ७७९ |
| सर्वादि सर्वसाक्षी | २० |
| सर्वांग देखणें | ५३५ |
| सरिता येऊनियां | ९१४ |
| सहज कर्मभक्ति | २४९ |
| सहस्त्रदळ ब्रह्मरंध्र | ७८५ |
| सहस्त्रदळ ब्रह्मरंध | ८५१ |
| सहस्त्रदळ साजिरें | ८४९ |
| सहस्त्रदळ बिंदु | ८२१ |
| सहा चार अठरा | ९८७ |
| सज्ञानीं पाहतां | ५४१ |
| साई सडियातें | ६०६ |
| साउमा जंव | ५४५ |
| साकारु निराकारु | १५१ |
| साखरेचा ऊंस | ९८२ |
| सांग सखिये बाई | ८६ |
| सांगाति आमुचि- | ५९४ |
| सांगेन तें ऐक | ५५५ |
| सातता वसोनी | ३९२ |
| सात पांच तीन | ७७५ |
| साता व्योमापरतें | ४३८ |
| साती वारी दोन्ही | १७ |
| साध्य साधन | १२१ |
| साधुचा महिमा | ९३२ |
| साधुबोध झाला | ७५८ |
| साभिमानें करुनि | ९२३ |
| साय सडियाचें | ५४९ |
| सायुज्य सदन | ३८४ |
| सायुज्यसदनीं | ५२४ |
| सारंग धरू तो | २६ |
| सार सप्तमीसि | १०४ |
| सार सार सार | २८३ |
| सारासार दोन्ही | ५१ |
| सांवळा सकुमार | १४६ |
| सावळियाचें तेज | ४२ |
| सांवळिये तेजीं | २४४ |
| सांवळिये निळी | ६१३ |
| सांवळी प्रतिमा | ६४८ |
| सांवळिये बुंथी | ६३५ |
| सांवळें परब्रह्म | ६३४ |
| सांवळेचें तेज | ४१ |
| सिद्ध सांडोनि | १७२ |
| सिद्धांतींचें सार | ९०७ |
| सिंहाचें दुग्ध | ९३१ |
| सुकालिये गंगे | ७३७ |
| सुकुमार वेल्हाळ- | २४० |
| सुकुमार सुरस | ५१६ |
| सुख आपलें | ४५७ |
| सुख तेथें दुःख | ९०८ |
| सुख शृंगार | ५१२ |

| अभंग. | अभंगांक. |
|---|---|
| सुख शेजारीं | ६५५ |
| सुखसोज्वळ | ५२१ |
| सुखाचा निधी | ६८० |
| सुखाचि आवडी | ९५३ |
| सुखाचिया गोठी | ५०० |
| सुखाचिये गोठी | ६५८ |
| सुखादि सुख | ४११ |
| सुखीं सुख मुरे | ११० |
| सुची अंबुला | ६७५ |
| सुढाळ ढाळाचें | ४९६ |
| सुनीळ जें ब्रम्ह | ८७९ |
| सुनीळ गगना | ३७ |
| सुवर्णाचा चुरा | ९५१ |
| सुवर्णाचें भांडें | ९६२ |
| सुवेळेची शेज | ३६३ |
| सुंदर सुरेख | १० |
| सुंदर राजसु | ४९५ |
| सूक्ष्म साध्य | १०५ |
| सेजे सुता भूमी | ७३४ |
| सेवितां वारुणी | ९०४ |
| सोनयाचा दिवस | २५२ |
| सोहंकारी माया | ७९८ |
| सोळा कळी चंद्र | २१८ |
| सोंग संपादणी | १२७ |
| संत भेटती आजि | २१४ |
| संतांचे संगती | ७६० |
| संपत्ति विपत्ति | २६८ |
| संसार कथा | ५३६ |
| संसाराचे नाहीं | ९४९ |
| संसार यात्रा | ४७४ |
| संसारसातें आलों | ९६ |
| संसार वो प्रामीं | ९७६ |
| संसारा तुकलिये | १९९ |
| संसारा येऊनि | ४७५ |
| स्थावर जंगम | ८४३ |
| स्थूल देह सूक्ष्म | ८५० |
| स्मरों केंसेनि | ४२० |
| स्वर्ग जयाची | ४७ |
| स्वरूपाचेनी भानें | ६७९ |
| स्वरूपाचे ध्यानीं | ८५९ |
| स्वरूपावबोधु | ५२३ |
| स्वरूपीं पाहातां | ३८२ |
| स्वरूपीं पाहातां | ५२ |
| स्वप्नाचेनी भ्रमें | ५७२ |
| स्वप्नींचा घाई | ४९८ |
| स्वप्नीचेनी धनें | ४७९ |
| स्वप्नींचें सुख | २०५ |
| स्वप्नीचेनि सुखें | ४५९ |
| स्वभावें विचरतां | ५५२ |
| स्वामींचे रूपेनें | ९९ |
| **ह.** | |
| हमामा घाली | ६०९ |
| हमामारे पोरा | ६०८ |
| हरपली सत्ता | ४४ |
| हरि आलारे | २८४ |
| हरि उच्चारणीं | ७६३ |
| हरि प्रेम सरोवरी | ५८८ |
| हरिपाठ कीर्ति | ७६९ |
| हरि बुद्धि जपे | ७६८ |
| हरिभक्त संत | ९८६ |
| हरिवंश पुराण | ७७० |
| हस्ती घोडे हरण | १८१ |
| हें नव्हे आजि | ६८ |
| हे पृथ्वी तुझे | ५०१ |
| होय सौरी आतां | ९७५ |
| होरे तूं विठ्ठला | ३३९ |
| **क्ष.** | |
| क्षीरसागरांचें | ६६ |
| **ज्ञ.** | |
| ज्ञानप्राप्ति लागीं | ९६५ |
| ज्ञान विज्ञान | ४९ |
| ज्ञान हेंचि गाय | ६२० |
| ज्ञानाचें गरोदर | ३७७ |
| ज्ञानें ध्यान पटीं | ३८० |

# श्रीसोपानदेवमहाराज

यांच्या

## अभंगांचा वर्णानुक्रम.


| अभंग. | अभंगांक. | अभंग. | अभंगांक. | अभंग. | अभंगांक. |
|---|---|---|---|---|---|
| अव्यक्ताचे घरीं | ८ | नादरसीं लीन | ४४ | वैकुंठ सगळें | ४७ |
| आणिक ऐकें गा | ३ | नाद रूप ठसा | ४३ | शरीर निर्मळ | ३६ |
| आत्मरूप सखा | २७ | नाद ब्रह्म मुसें | ४५ | शांति दया क्षमा | ४६ |
| आपरूप हरि | ५० | नाहीं नाहीं भान | २४ | सबाह्य कोंदलें | ७ |
| आम्ही नेणों माया | ३० | निःकाम निश्चळ | ४९ | सर्व काळ ध्यान | ४ |
| आवडीचे मार्गे | ६ | पाहणें परिसणें | ४२ | सर्व घटीं रूप | १६ |
| उघडली दृष्टि | १ | पाहाते न नटे | २८ | सागरींचे तोय | १७ |
| काढलें कुदाळ | ४० | पृथ्वी सोंवळी | ३८ | हरि असे देहीं | ४१ |
| कृष्णाचिया पंथें | १३ | मन आधीं मुंडीं | ३७ | हरि असे देहीं | ३३ |
| गोपाळ अच्युत | १९ | मनाचे मवाळ | ५ | हरिनाम जपें | ११ |
| गोविंद माधव | २० | मी नेणें भक्ति | १५ | हरि नांदे देहीं | ३४ |
| घोंगडियासाठीं | ५२ | मी माझी कल्पना | २६ | हरिविण दुजें | २२ |
| चलारे वैष्णवहो | २ | मोक्षालागीं धन | ९ | हरिविण दुजें न | २३ |
| ज्याचे मुखीं हरि | १० | रामकृष्ण मूर्ति | १४ | हरिवीण नाहीं | ५१ |
| तिहींचे त्रिगुणें | ३२ | राम सर्वोत्तम | ३९ | हरिवीण भावो | ३५ |
| तुझा तूंचि थोर | २५ | रूप हें सांवळें | १२ | हरिसुखवेषें | १८ |
| दिन व्योम तारा | २९ | विठ्ठल पैं सार | २१ | ज्ञानदेवीं ज्ञान | ४८ |
| दुजेपणीं ठाव | ३१ | | | | |

# श्रीमुक्ताई

यांच्या

## अभंगांचा वर्णानुक्रम.


| अभंग. | अभंगांक | अभंग. | अभंगांक. | अभंग. | अभंगांक. |
|---|---|---|---|---|---|
| अलिप्त संसारीं | ४ | देउळींचा देवो | २२ | मुक्तपणें सांग देवो | २४ |
| अविट न विटे | १५ | नादाबिंदा भेटी | २१ | मुक्त पैं अखंड | ८ |
| आदि अंतु हरि | ११ | नामबळें देहीं | २६ | मुक्तलग चित्तें | ३७ |
| आदि मध्य अंतु | ३६ | नाम मंत्रें हरि | ६ | मुक्तामुक्त कोडें | ३१ |
| आदि मध्य ऊर्ध्व | १० | निर्गुणांची सेज | ३२ | मुक्तामुक्त दोन्ही | ९ |
| आधीं तूं मुक्तचि | ५ | परब्रम्हीं चित्त | १२ | मुंगी उडाली आ- | ४२ |
| उजिवडु कोडें | २९ | पूजा पूज्य वित्तें | १४ | व्यक्त व्यक्तीचें | १६ |
| उर्णाचिया गळां | १९ | पूर्णपणें सार | ३५ | विश्रांति मनाची | २३ |
| अंतर बाह्य निर्के | २५ | प्रकृति निर्गुण | ३ | विस्तारूनि रूप | ३० |
| करणें जंव कांहीं | २७ | प्रालब्ध संचित | ३९ | शांति क्षमा वसे | ४० |
| चित्तासी व्यापक | ३८ | भजनभावो देहीं | ७ | शून्यापरतें पाही | २ |
| जेथें जें पाहे | ३४ | मनें मन चोरी | १७ | सर्व रूपीं निर्गुण | १८ |
| दिवसा शीतळ | ३३ | मुक्तजीव सदा | १ | सर्वी सर्व सुख अहं | १३ |
| देउळाच्या कळशीं | ४१ | मुक्तपणें ब्रीद | २८ | सहस्त्रदळीं हरी | २० |

# श्रीचांगदेवमहाराज

यांच्या

## अभंगांचा वर्णानुक्रम.


| अभंग. | अभंगांक. | अभंग. | अभंगांक. | अभंग. | अभंगांक. |
|---|---|---|---|---|---|
| अरे क्षीरापरीस | ४७ | गुणातीत डाहाळी | ८ | मनसंकल्प शुद्ध पैं | ५३ |
| अवघी घोंगडी | ७७ | गुणातीत पाहतां | ४५ | मही अंबु तेज | ५० |
| अवघि डोळां | २८ | चांगा जन्मला | १४ | मी माझें दुरित | ५ |
| अवघिया मुकलों | ४९ | जेथें एक दुजें | १६ | मुक्त होतासि तो | २४ |
| अविनाश पाळणा | ११ | टेंकावरी टेंक | १८ | मुक्त होतासि तो | ५५ |
| अहंकार अविद्या | २३ | डोळे पैं दोंदिल | ४१ | मोहन दुर्बुद्धि पैं | ४३ |
| आकार नाहीं | ५८ | तुझा तूं चुकलासि | ५१ | मोळी विकुनि | ५६ |
| आकार पूजितां | २९ | दीप कळिका | ३८ | मृगजळावरी मुंगि- | ६६ |
| आकाश कवळिलें | ७४ | देवी देवो जाला | ५४ | यंत्राचीं युक्ति | ४४ |
| आकाशाचा शेंडा | १९ | देह नाहीं तेथें | ६१ | राउळींचे कर | १७ |
| आकाशींचें फळ | ५९ | दृश्य आणि द्रष्टा | २० | रूप ना छाया | १३ |
| आत्मा हा नोवरा | ७१ | नाहीं सुखदुःख | ३ | रूप नाहीं तेथें | ५७ |
| आनंदवनीं भ्रतार | ३१ | निरंजन वनीं | ३५ | व्योम अभ्र दोन्हीं | ६२ |
| आपुलिया मारुनी | १० | नोवरीचे पोटीं नोवरा | ६९ | वऱ्हाडी आले | ७३ |
| आरे ते ते ते ते | ६४ | नोवरीचे हातीं | ६८ | वळेना वरुपे | ३९ |
| आहे ते सांडी | ६३ | नोवरीच्या गळां | ७२ | वेदश्रुती ठक | २१ |
| एकवीस सहस्र | ३४ | पतिव्रता नारी | ३३ | सत्रावी दोहतां | ४० |
| ऐकें चांगया फळ | ६ | पतिव्रते पुंश्चलि | ३२ | सहजसमाधीं बैसला | ३६ |
| ऐलाड हुडाचे | २७ | गेहीं गेलें तंव | ४२ | साकार पूजितां | ४८ |
| अंबुला विकावया | ७५ | प्रकृतीचें पूजन | ३० | सासूचे आधीं | ६७ |
| अंबुल्यासवें सुतली | ७६ | बाळक चुकलें | ९ | सुखाचे शेवटीं | १५ |
| कर्म धर्म जाति | ६० | बुधिचेनि बोले | २२ | सोहं तें होतें | २६ |
| कुडी हे नोवरी | ७० | बंधन नाहीं बद्ध | २ | सोहं न बुद्धि | ३७ |
| क्रोधाची आगटी | ६५ | ब्रह्मांड गोळकीं | १२ | स्वप्नींचा आत्मा | १ |
| गुण ना निर्गुण | ७ | भावेंभक्ति करूनी | २५ | हेमी हेम प्रचित | ४ |
| गुण नाहीं तेथें | ४६ | भ्रमराचें मरण | ५२ | | |